छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४–१९२२) एक चिकित्सक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
नम्रता रामचंद्र पाटील
P.R.No.02114007296

मार्गदर्शक
डॉ. भास्कर धाटावकर
इतिहास विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

जून २०२१

प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, **'छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४-१९२२) : एक चिकित्सक अभ्यास'** हा शोधप्रबंध मी डॉ. भास्कर धाटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात पीएच.डी. (इतिहास) पदवीसाठी प्रस्तुत शोधप्रबंध सादर करण्यात येत आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : मुंबई
दिनांक : जून २०२१

(नम्रता रामचंद्र पाटील)
संशोधक

प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, **'छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४–१९२२) : एक चिकित्सक अभ्यास'** या शीर्षकाचा प्रस्तुत शोधप्रबंध हा श्रीमती नम्रता रामचंद्र पाटील, यांचे स्वत:चे लिखाण असून, ते माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहेत. या लेखनासाठी वापरण्यात आलेल्या शोध साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे पीएच.डी. (इतिहास) पदवीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : जून २०२१

(डॉ. भास्कर धाटावकर)
मार्गदर्शक

ऋणनिर्देश

'छत्रपती शाहू महाराजानी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४ – १९२२) : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पीएच. डी. पदवीसाठी शोधप्रबंध सादर करण्यासाठी संधी मिळाली, त्याबद्दल विद्यापीठाची मी ऋणी आहे. या कामात मला अनेकांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले, त्यासाठी सर्वांचे ऋण व्यक्त करणे, हे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक डॉ. भास्कर धाटावकर यांचे मी सर्वप्रथम मन:पूर्वक आभार व्यक्त करते. सरांनी दिलेल्या वारंवार प्रोत्साहनामुळेच संशोधनाची आवड निर्माण होऊन हा प्रबंध मी करू शकले. त्यांनी मार्गदर्शन करताना प्रत्येक महत्त्वपूर्ण गोष्टीची माहिती दिली. तसेच यासंदर्भात अधिक माहितीसाठी लागणारी ऐतिहासिक अशी दुर्मिळ पुस्तके त्यांच्या स्वत:च्या ग्रंथसंपदेतून मला उपलब्ध करून दिलेली होती. सरांचा अनुभव व अभ्यासासाठीची शिस्त यामुळेच हे संशोधन मी पूर्ण करू शकले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. कुलकर्णी सर व डॉ. नलिनी वाघमारे यांनी वारंवार प्रोत्साहन दिले. वाघमारे मॅडम यांनी या प्रबंध कामासाठी सकारात्मक ऊर्जा दिली, त्याबद्दल त्यांचे मी आभार मानते. वनविभागातील वरिष्ठांच्या सहकार्याशिवाय हे काम वेळेत पूर्ण झाले नसते, हे ही तितकेच खरे.

पुराभिलेख कार्यालय मुंबई, कोल्हापूर व पुणे येथील सहाय्यक संचालक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबरोबरच कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयातील संकलक विनायक पाटील, संशोधन सहाय्यक स. दी. वाडकर, तसेच इतर कर्मचारी संदीप हुमरे, मनोज पाटील, प्रशांत शिरोवलीकर, अमेय जाधव यांनी वेळोवेळी सहकार्य केले. विशेष करून कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयातून शाहू महाराजांसंबंधीत पत्रव्यवहार, हुजूर ठराव, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, करवीर सरकारचे गॅझेट, तसेच शाहू दप्तर याबरोबरच राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, राजर्षी शाहू छत्रपती रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र, शाहू महाराजांचे निवडक आदेश असे अनेक संदर्भ साहित्य उपलब्ध करून दिले, यामुळे त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

डॉ. आर डी. गायकवाड सर, माजी इतिहास विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले विद्यापीठ यांनी मोलाचे मार्गदर्शन दिले. तसेच प्रा. श्री. दुधभाते सर यांनी हे काम पूर्ण होण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. कोल्हापूर पुरालेखागार येथील अभिलेखाधिकारी श्री. गणेश खोडके यांचे या संशोधनासाठी मला खूप मोलाचे सहकार्य मिळाले आहे. त्यांच्याकडील काही पुस्तके त्यांनी या कामासाठी उपलब्ध करून दिली, त्यामुळे त्यांच्या ऋणातच रहाणे मला जास्त आवडेल.

माझ्या कुटुंबाच्या सहकार्याशिवाय संशोधन कार्य शक्यच नव्हते, माझे वडील श्री. रामचंद्र पाटील व आई कमल पाटील, यांचे सतत प्रोत्साहन मिळत होते. वडीलांकडून मिळालेले प्रोत्साहन व सातत्याने नवीन काहीतरी शिकत राहणे या आईच्या शिकवणीमुळे मला या संशोधन कामात ऊर्जा मिळत गेली. बंधू तुषार पाटील, पती नरेंद्र पाटील यांचे ही मोलाचे योगदान मिळत गेले. अशा सर्वच ज्ञात व अज्ञात व्यक्तींच्या सहकार्य व पाठिंब्यामुळेच हे संशोधन कार्य मला पूर्ण करता आले, त्याबद्दल मी त्यांची नेहमीच ऋणी आहे.

(नम्रता रामचंद्र पाटील)

सारांश

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात छत्रपती शाहू महाराजांचे स्थान अग्रक्रमावर आहे. आपल्या प्रजेशी असलेली बांधिलकी व लोकहितासाठी प्रबळ इच्छाशक्ती यांच्या बळावर लोककल्याणकारी राज्य कसे निर्माण होऊ शकते याचा आदर्श वस्तूपाठच राजर्षींनी आपल्या २८ वर्षांच्या राज्यकारभारातून घालून दिलेला होता. ब्रिटिश अधिपत्याखाली राहून आपले राज्य लोकहितासाठी आहे, त्यांच्या हितावरच संस्थानाचे हित आहे, हे ओळखून लोककल्याणकारी योजना राबवणे हे तत्कालीन परिस्थितीत तितके सोपे नव्हते, अनेक निर्णय घेण्यास मर्यादा होत्या, तरीही लोककल्याण हाच ध्यास ठेवून महाराजांनी उपलब्ध परिस्थितीतही कुशलतेने विविध धोरणे आखून संस्थानाचा नियोजनबद्ध विकास केला. ज्यातून संस्थानातील नागरिक आत्मनिर्भर होऊ शकले, साहजिकच तत्कालीन परिस्थितीत शेती, पाणी, तसेच औद्योगिकीकरण आदीमध्ये देशातील एक प्रगत संस्थान म्हणून कोल्हापूर नावारूपाला आले.

शाहू महाराजांनी सन १८९४ पासून राज्यकारभार पहावयास सुरवात केली. त्यावेळी सामाजीक राजकीय परिस्थिती तितकीशी अनुकूल नव्हती आणि कोल्हापूर संस्थानाची आर्थिक स्थिती ही बहुतांशपणे शेतीआधारीत जीवनावर असल्याने प्रतिकूलच होती. सन १८९६–९७, सन १८९९–१९००, १९१८–१९ ही वर्षे पूर्णतः दुष्काळाची होती. त्यात संस्थानातील सर्वसामान्य जनता होरपळली जात होती. त्याचे स्वरूप आणि परिणाम जाणून घेण्यासाठी महाराजांनी जातीने काही भागात केलेल्या दौऱ्यात त्यांना रयतेची गरीबी, अज्ञानीपणा, जमिनीची झालेली वाताहत, अवर्षणामुळे पाण्याची कमतरता आणि त्याचा शेतमालावर झालेला परिणाम, व्यापारी व सावकारी वर्गाकडून केली जाणारी पिळवणूक ही सर्व अवस्था निदर्शनास आली.

राज्याची घडी बसवतानाच प्राधान्याने त्यांनी दुष्काळावर मात करण्याचे प्रयत्न चालू केले. विशेषत: शेतीसुधारणेवर आणि पाणीसाठा वाढीवर त्यांनी दिलेला भर महत्वाचा आहे. ठिकठिकाणाच्या दुष्काळग्रस्त् भागांची माहिती तातडीने दरबाराला मिळण्याबाबतची व्यवस्था महाराजांनी केलेली होती. लोकांची स्थिती कशी आहे, जनावरांची स्थिती काय आहे तसेच पाण्याचा पुरवठा किती आणि कितपत पुरणारा आहे, धान्याची–गवताची उपलब्धी किती आहे याची माहिती दरबारातर्फे वेळोवेळी घेऊन त्यावर योग्य उपाययोजना केल्या जात. दुष्काळी

काळात महाराजांनी दरबारातर्फे स्वतंत्र दुष्काळ विभागच निर्माण करून दुष्काळ आयुक्त म्हणून आपल्या दिवाणांचीच नेमणूक केली. उपाययोजना अधिक प्रभावी होऊन दुष्काळाची झळ कमी व्हावी म्हणून तातडीने कमी व मध्यम मुदतीची कामे सरकारतर्फे सुरु केली. जसे स्वस्त धान्य दुकान, धान्याची आयात, दुष्काळी कामे काढून रोजगार उपलब्धी, रस्ते व पुल बांधणी, दुष्काळी भत्ता, तात्पुरत्या दुष्काळी कचेऱ्या, शेतकऱ्यांना तगाई, मोफत मदत व शिधावाटप, आश्रयासाठी धर्मशाळांची सोय, लहान मुलांची सोय इत्यादी कामे या काळात केली गेली. महाराजांनी आपल्या माणसांना जगवताना राज्यातील जनावरांची तेवढयाच मायेने काळजी घेतली. अशा संकटकाळी सावकारी व व्यापारी वर्गाच्या मनमानीवर प्रतिबंध घालण्यासाठी कधी कठोर नियमावली लागू केली, तर कधी सवलतीचे सहाय्य त्यांनाही देऊ केले. तत्कालीन उपाययोजनांमुळे प्रजेला दुष्काळी संकटातून सावरण्याचे बळ मिळत गेले.

महाराजांनी दुष्काळावर मात करताना केवळ प्रजेला मदत करणे हे धेय्य न ठेवता त्यांना दुष्काळापासून कायमस्वरुपी मुक्ती देण्याच्या दृष्टीने कार्य सुरू केले.

संस्थानातील असमाधानकारक शेती उत्पादन आणि पारंपारीक पद्धतीने केलेली शेती असे स्वरुप संस्थानातील शेतीबाबत होते. अशा परिस्थितीत संस्थानाचा विकास व्हावयाचा असेल तर प्रथम शेतीचा विकास होणे आवश्यक होते, तर शेतीव्यवसाय हा पूर्णपणे पावसावर अवलंबून होता. संस्थानात पाण्याची परिस्थिती बिकटच होती. अशावेळी जलव्यवस्थापनाने शेतीला आणि जनतेला कायमस्वरुपी पाणी पुरवठयाचे कार्य करणे अत्यंत गरजेचे होते. संस्थानाची आर्थिक कुवत मर्यादित होती. पाण्याची कमतरता भागविण्यासाठी संस्थानातच उपलब्ध असलेल्या पाणी स्त्रोतांचा वापर करणे आर्थिकदृष्याही सोईचे होते. यासाठी महाराजांनी वेळोवेळी योग्य ती धोरणे राबविली आणि संस्थानात विविध ठिकाणी जलसाठयांचे प्रयत्न सुरू झाले.

दुष्काळ परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सन १९०२ साली महाराजांनी सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहिर केले. या खात्याद्वारे संस्थानात अस्तित्वात असलेल्या पाटबंधाऱ्यांच्या सोईची प्रत्येक गावानुसार तपशीलवार पहाणी करण्याची जबाबदारी पाटबंधारे खात्यावर सोपवली. त्यासाठी जुन्या विहिरींची– तलावांची दुरुस्ती, नवीन विहिर व तलाव बांधण्यावर भर, धरण–

बांधरा बांधणे इत्यादी उपाययोजना हाती घेतल्या. याच बरोबरीने शाहू महाराजांनी जलसाठयांचे नियोजन व संवर्धन करण्यासाठीच्या अनेक निर्णयांची काटेकोरपणे कडक अंमलबजावणी केली. ज्यात पाणी स्वच्छतेवर अधिक भर दिला गेला. जनावरांसाठी सुद्धा स्वतंत्र पाणवठे तयार करणाऱ्या महाराजांनी विनापरवाना पाणी वापरावर मात्र तेवढेच कडक निर्बंध घातले. पिकांना लागेल तेवढेच पाणी पुरविण्याची व्यवस्था केली. शेतीसाठी पाणी पुरविताना पाणी हशील व पिकप्रकारांची सांगड घातली. लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देताना पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नियमावली लागू केली. प्रसंगी पाणी हशील आगावू घेतले गेले. काही प्रसंगी दुष्काळाची तीव्रता ओळखून लोकांना मोफत पाणी पुरवठा ही महाराजांनी केलेला होता. पाण्याच्या वापरावर समानतेच्या न्यायाने दलित व वंचित समाजाला विनासायास पाणी मिळावे यासाठी ठराव मंजूर केले. जलवाढीसाठी पर्यावरण रक्षणाचे कार्य करताना अनेक हितकारक निर्णय घेतले.

शाहू महाराजांनी संस्थानात ठिकठिकाणी जल नियोजन सुरु केलेले असतानाच आपल्या परदेशवारीत तेथील शेती व उदयोग प्रकल्प पाहिले. पाण्याची कमतरता असूनही योग्य नियोजनाने त्या देशांनी त्यांचा प्रदेश सुजलाम सुफलाम करून साधलेली प्रगती नजरेखालून घातलेली होती. आपल्या संस्थानाच्या प्रगतीसाठी अशाच प्रकारे कार्य करण्यासाठी महाराजांनी अनेक पातळींवर प्रयत्न सुरु केले. त्याचेच एक फलित म्हणजे सन १९०९ साली प्रत्यक्ष राधानगरी धरणाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पास सुरवात झाली. या प्रकल्पास सर्वतोपरी मदत व मार्गदर्शन मिळण्यासाठी महाराज विविध पातळींवर झटत होते. याचे महत्व एवढे होते की, त्याच्या पूर्ततेसाठी त्यांनी स्वत:ला किती वाहून घेतले होते हे त्यांच्याच पुढील वाक्यावरुन दिसून येते "My life work will have been when I complete this project' आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत महाराजांनी या प्रकल्पाचा पाठपुरावा तर केलाच पण संस्थानाला जलस्वयंपूर्ण करत विकासाला पाठबळ दिले. पुढील काळात संस्थानातील शेतीक्षेत्रात झालेली वाढ हे महाराजांच्या जल नियोजनाचेच फलित होय.

शाहू महाराजांनी एकीकडे दुष्काळ निवारणार्थ विविध उपाययोजना हाती घेत पाण्याबाबत सक्षमता मिळवण्याकडे वाटचाल सुरु केलेली होती, तर दुसरीकडे राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य

स्त्रोत असलेल्या शेतीसाठी उत्तेजन देण्याचे कार्य सुरू केले होते. शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाचाच मार्ग अवलंबला. शेतकऱ्यांमध्ये आधुनिक दृष्टीकोन विकसित होऊन शेतीविकास साधण्यासाठी संवादाच्या माध्यमातून वैचारीक मशागत केली. शेती सुधारणांवर भर देऊन सुधारीत शेती पद्धतीच्या प्रसारास चालना दिली. यात शेती सुधारणा पुस्तकांचे वाटप करण्यापासून शेतकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला. शेतकी सुधारणांसाठी तगाईची व्यवस्था केली. शेतीला पर्यायी व इतर नवीन लागवडीचे प्रयोग करणास उत्तेजन दिले. चहा, कॉफी, तुती, वेलदोडे असे नवीन प्रयोग यशस्वी केले. शेती संशोधन करण्यावर भर देऊन आदर्श शेतीचे प्रयोग केले . महाराजांनी शेतकऱ्यांसाठी वेळोवेळी भांडवल पुरवठा केला. आधुनिक शेतीज्ञानासाठी शेतीविषयक प्रदर्शने भरविली. तंत्रज्ञानावर आधारीत अशी आधुनिक अवजारे वापरण्यास प्रोत्साहन दिले. शेतीउपयुक्त तंत्रज्ञानाच्या शिक्षणासह किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटसारखी शेतकी बाबींवर मार्गदर्शन करणारी संस्था स्थापन केली. शेतकऱ्यांना शेती बरोबरच शेतीपूरक व्यवसायाच्या नवनवीन संधी उपलब्ध व्हाव्यात यास्तव प्रयत्नशील राहिले.

संस्थानात शेतीसुधारणांबरोबरच शेतमालासाठी आवश्यक अशा बाजारपेठांची निर्मिती केली. उदयोगधंदे वाढीस प्रोत्साहन दिले. आर्थिक मदत व सवलती यामुळे संस्थानात व्यापारवृद्धी झाली. शाहूसूत गिरणी ही पहिली कापड गिरणी महाराजांच्याच पुढाकाराने संस्थानात उभी राहिलेली होती. कोल्हापूर संस्थानात निर्माण झालेल्या उदयोग व्यवसायाच्या पोषक वातावरणामुळे विद्युत कारखाने, मोटर कंपनी, जिनिंग फॅक्टरी, चांदीचा कारखाना असे अनेक प्रकारचे कारखाने स्थिर झाले. शाहूपुरी सारखी व्यापारी पेठ नावारूपाला आणण्याचे श्रेय हे महाराजांचेच आहे. कोल्हापूर संस्थानात सहकार कायदा करून सहकाराचा पाया शाहू महाराजांच्याच राजवटीत घातला गेला.

शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ हाती घेतलेल्या कार्यामध्ये जलसाठा प्रकल्पांमुळे शेतीला कायमस्वरूपी उपलब्ध होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे विविध उत्पादनवाढीला विशेषत: ऊस लागवडीला चालना मिळाली. ऊसाचे उत्पादन एवढे वाढले की, पुढे गुळाची प्रसिद्ध बाजारपेठ निर्माण होऊन पर्यायाने त्याही पुढील काळात साखर कारखान्यांची वाढलेली संख्या हे चित्र

दिसू लागले होते. यासोबत इतर उद्योगधंदे वाढल्याने संस्थान उदयमनगरी बनले. सुबत्ता व आर्थिक स्थिरतेमुळे शेतीबरोबरच इतर क्षेत्रातही वाव मिळून त्यांच्या सोयी वाढत्या प्रमाणवर उपलब्ध झाल्या. व्यापार, वाहतूक, दळणवळण विस्तारले. अन्नधान्य वाढायला मदत झाली. शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागल्याने शेतीतील गुंतवणूक वाढून शेती संशोधन वाढू लागले. शेतीतील बदल, वीजनिर्मिती यामुळे घरगुती उद्योग, लघुउदयोग, शेतीवर आधारीत जोड व्यवसाय यांचा विकास होत गेला. या सर्व बदलांमुळे रोजगारसंधी वाढण्यास मदतच झाली.

शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणाच्या पार्श्वभूमीवर शेतीविकास व जलव्यवस्थापन या कार्यासंबंधाने केलेल्या तत्कालीन उपाययोजना व धोरणांच्या अंमलबजावणीमुळे संस्थानातील सर्वसामान्यांना मोठा आधार मिळून दुष्काळी परिस्थितीवर मात करणे शक्य होऊ शकले. त्याचबरोबर संस्थानातील दिर्घकालीन विकासांच्या योजनांची पायाभरणी होऊ शकली. साधारण शंभर वर्षापूर्वी महाराजांनी केलेल्या शेतीविकास व पाणी व्यवस्थापनाचे धोरण संस्थानाच्या पुढील विकासाची नांदीही ठरली. आजही त्यांची धोरणे तेवढीच उपयुक्त ठरतात, या सर्वांचा वेध प्रस्तुत संशोधन प्रबंधातून घेण्यात आला आहे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्र
१.	**प्रस्तावना**	१ – १५
२.	**प्रकरण पहिले :** भारतातील ब्रिटिशकालीन दुष्काळ : व्याख्या, सिद्धांत आणि ऐतिहासिक आढावा	१६–४५
३.	**प्रकरण दुसरे :** छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि भारतातील तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती	४६–८३
४.	**प्रकरण तिसरे :** दुष्काळ निवारणार्थ केलेल्या तत्कालीन उपाययोजना	८४–१२८
५.	**प्रकरण चौथे :** शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन	१२९–१९४
६.	**प्रकरण पाचवे :** शेती विकासाची आधुनिक धोरणे व नवीन प्रयोग	१९५–२७८
७.	**प्रकरण सहावे :** समारोप (सारांश आणि निष्कर्ष)	२७९–३०५
८.	**संदर्भसूची**	३०६–३१०
९.	**परिशिष्टे** छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीतील निवडक ऐतिहासिक दस्ताऐवज व छायाचित्रे	३११–३३६

तक्ते, आलेख, आकृत्या, सूची

तक्ता– रंकाळे तलावातील शेतीसाठी पीकनिहाय पाणीपुरवठा आणि त्याचा प्रतिएकरी दर

वर्ग १ बारा महिने पाणी देणे	**वर्ग २ आठ महिने पाणी देणे**	**वर्ग ३ चार महिने पाणी देणे**	**वर्ग ४ दोन महिने पाणी देणे**	**शेरा**
दर एकरास १६ रुपये प्रमाणे	दर एकरास ६ रुपये प्रमाणे	दर एकरास ४ रुपये प्रमाणे	दर एकरास २ रुपये प्रमाणे	
१. ऊस २. पानमळा ३. पेरु, अंजीर, नारिंगे, आंबे, केळी वगैरे ४. फुलझाडे ५.विलायती गवत	१. उत्तम गहू २. भात ३. सातू ४.उत्तम पानमळा ५. बटाटे ६. भुयमूग ७. रताळे ८. हळद ९. मिर्च्या १०. कांदे ११. तंबाकू १२. वांगी	१. गहू बक्षी २. कापूस ३. अंबाडी ४. शाळू ५. हरभरा ६. तुरी ७. काळे तीळ ८. लसूण ९. गाजरे १०. जवस ११. काकडया १२. दोडके वगैरे	१. हलक्या साळी २. बाजरी ३. जोंधळे ४.हुलगे (कुलत्या) ५. मूग, मटकी, उडीद ६. राळे ७. राजिगरे ८. मका वगैरे	जे जमीन नांगरण्यास सुलभ नाही, ती नांगरण्यास पाणी घेतल्यास दर एकरास १ रुपयामागे आकार धरण्याचा आहे.

(स्रोत : जाहीरनामा करवीर सरकार गॅझेट भाग १, दि . ४/१२/१८९७, पृ. १३७६)

तक्ता – तलावाचे वगैरे पाणी लोकांच्या जमिनीस पिकांकरिता वगैरे देण्यात येते, त्याचे हशील प्रत्येक एकरास ठरल्याबद्दल

नंबर	बारा महिने पाणी देणे		आठ महिने पाणी देणे		चार महिने पाणी देणे		दोन महिने पाणी देणे	शेरा
	वर्ग १	वर्ग २	वर्ग ३	वर्ग ४	वर्ग ५	वर्ग ६	वर्ग ७	
	एक एकरास ४०	एक एकरास ३५	एक एकरास १६	एक एकरास १५	एक एकरास ६	एक एकरास ४	एक एकरास ५	
	बागायत पिके			जिराईत पिके		रब्बीची पिके	खरीपची पिके	
१	२	३	४	५	६	७	८	९
१	ऊस	ऊस	पानमळा	हळद	उत्तम गहू	बक्षी गहू	हलक्या साळी	जे जमीन नांगरण्यास सुलभ नाही, ती नांगरण्यास पाणी घेतल्यास दर एकरास १ रुपयामागे आकार धरण्याचा आहे.
२			पेरू, अंजिर, नारंगी		भात	कापूस	बाजरी	
३			आंबे, केळी वगैरे		सातू	आंबाडी	जोंधळे (ज्वारी)	
४			फुलझाडे		उत्तम पानसाळ	शाळू	हुलगे	
५			विलायती गवत		बटाटे	हरभरा	मूग, मटकी, उडीद	

६					भुईमूग	तुरी	राळे	
७					रताळी	काळे तीळ	राजगीरे	
८					मिरच्या	लसूण	मक्का वगैरे	
९					कांदे	गाजरे		
१०					तंबाकू	जवस		
११					वांगी	काकडया		
१२						दोडके वगैरे		

धरण बांधकामाच्या खर्चाचा वर्षनिहाय आढावा

वर्ष	वर्षातील बांधकाम घनफूट	एकूण बांधकाम घनफूट	वर्षातील खर्च रुपयांमध्ये	एकूण खर्च रुपयांमध्ये	कामगार
१९११–१२	२,५२,७००	८,६६,४००	१२९,१७३	माहिती अनुपल्ब्ध	३१००
१९१२–१३	४,१०,५७७	१५,४१,६१२	१,४७,०६७	४,८६,१०७	३१००
१९१३–१४	९१२९७७	२४,५४,५८९	२,०७,९६८	६,९४,०७६	३१००
१९१४–१५	७,६१,०००	३२,१५,५८९	१,९९,१६७	८,९३,२४३	३१००
१९१५–१६	६,००,०००	३८,१५,५८९	२,२५,२१९	११,१८,४६२	माहिती अनुपल्ब्ध
१९१६–१७	५,०९,३००	४३,२४,९००	१,८३,७०४	१३,०२,१६६	२०६०
१९१७–१८	६१,१२८	४३,८६,०२८	३३,९६४	१३,३६,१३०	माहिती अनुपल्ब्ध

(संदर्भ: १९११–१२ ते १९१७–१८ पर्यंतचे संस्थानातील वार्षिक प्रशासकीय अहवाल)

दुष्काळ निवारणासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च (१८९६–९८)

अ.क्र.	कामाचा तपशील	झालेला खर्च (रुपये)
१	नवीन रस्ते बांधणी	१,३७,३९३
२	तलावांची दुरुस्ती	७७,१९२
३	रस्त्यांची किरकोळ दुरुस्ती	१,३०,३९०
४	दुष्काळसंबंधीत इतर पायाभूत कामांच्या बाबी	३०,७३९
५	दुष्काळ निवारण कामे	४१४२३७
६	धान्य मोबदला	४१८७१
७	गोरगरीबांसाठीचा निवारा	२९९०८
८	दुष्काळ निवारणावरील प्रशासनाच्या बाबी	२०१६१
९	गरीबांच्या आश्रमावरील अन्नधान्यांचा प्रश्न	३३९२
१०	इतर साधसामुग्री	३३७९०

(संदर्भ : Administrative Report year 1896-1898)

शाहू महाराजांच्या काळातील विहिरींचा तपशील व त्यात होत गेलेली वाढ

अ. क्र.	वर्ष	पक्क्या विहिरी	कच्च्या विहिरी
१	१९०६–०७	५४८४	८३९
२	१९०७–०८	५५६३	७७७
३	१९०८–०९	११,२१५	८७६
४	१९०९–१०	११०५२	८७८
५	१९१०–११	१०,६६८	९६२
६	१९११–१२	१०,६६९	९६५
७	१९१२–१३	११,००६	१३८७
८	१९१३–१४	१०,८९५	१३०९
९	१९१४–१५	१०,८४७	१३३२
१०	१९१५–१६	११,००५	९७५
११	१९१६–१७	११,००५	१०४०
१२	१९१७–१८	१०,६३६	९९०
१३	१९१८–१९	१०,८१८	९८४
१४	१९१९–२०	१०,८९६	१०२७
१५	१९२०–२१	१०,८६८	११२२
१६	१९२१–२२	१०,९३०	११२७

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानाचे प्रशासकीय अहवाल (१९०६–१९२२)

शाहू महाराजांच्या सुरुवातीच्या व शेवटच्या काळातील पावसाची सरासरी

सन १८९५-९६

ठिकाण	१९९५-९६ मध्ये पडलेल्या पावसाचे प्रमाण		मागील पाच वर्षामध्ये पडलेल्या पावसाची सरासरी	
	इंच	सें.मी	इंच	सें.मी.
करवीर	५४	८३	४४	६३
पन्हाळा	६८	२५	६७	६३
अळता	४१	०२	३६	०१
शिरोळ	२६	३९	२८	६३
रायबाग	२९	८१	२६	८२
गडहिंग्लज	३८	२८	३९	५५
कटकोळ	२०	६८	२०	७४
भूदरगड	६५	१२	७३	२२
विशालगड	७१	२०	७६	००
बावडा	२०८	५०	२४१	९०
कागल	४४	१६	८८	७२
इचलकरंजी	४१	६९	३२	८४
आजरा	७१	३७	८२	४१

(संदर्भ : Administrative Report year १८९५-१८९६)

सन १८९८-९९

ठिकाण	१८९८-९९ मध्ये पडलेल्या पावसाचे प्रमाण		मागील पाच वर्षामध्ये पडलेल्या पावसाची सरासरी	
	इंच	सें.मी	इंच	सें.मी.
करवीर	४९	९६	४५	१७
पन्हाळा	६७	२५	६८	९६
अळता	३३	९१	३१	१६
शिरोळ	१९	८५	२६	३८
गडहिंग्लज	५१	०१	८८	८७

भूदरगड	८१	२६	७०	९८
रायबाग	२६	४९	२७	२१
कटकोळ	२०	९९	२४	७७
विशालगड	४२	९७	४०	८१
बावडा	२७४	७९	२६०	५०
कागल	४२	९७	४०	८४
इचलकरंजी	२२	९६	३३	५५
आजरा	८२	८३	८६	०१

(संदर्भ : Administrative Report year 1898-1899)

शाहू महाराजांच्या शेवटच्या कारकीर्दीतील पावसाची वार्षिक सरासरी

सन १९२०–२१

ठिकाण	१९२०–२१ मधील पावसाची सरासरी												
	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टे.	ऑक्टो.	नोव्हे.	डिसे.	जाने.	फेब्रु.	मार्च	एकूण
कोल्हापूर	१.८६	...	५.५५	१२.९४	६.४४	२.२७	५.३९	२.८१	...	...	...	...	३७.२६
पन्हाळा	०.८५	...	७.९५	१६.९४	१५.४	३.७५	३.८०	०.५४	...	...	...	...	४३.८४
चिंचवड	...	...	८.२	१७.४५	१.७१	४.५९	४.५२	...	...	...	...	...	३६.२९
हातकणंगले	...	०.२२	२.३७	८.४	६.७	२.२९	५.९	१.५५	...	...	...	...	२५.६३
शिरोळ	...	...	...	३.५६	२.३	०.८०	४.४	२.०	...	...	...	...	१२.४३
वडगांव	...	...	२.५६	१४.७८	४.२७	१.५६	५.९२	१.६	...	...	...	...	३०.१५
रायबाग	०.४०	०.६	२.१८	३.६७	१.१	१.४	८.२५	५.१५	...	०.५१	...	...	२२.३१
गडहिंग्लज	४.२	...	७.८९	८.१	६.१६	१.७७	५.६६	६.७	...	०.२९	०.३५	...	३९.२२
कटकोळ	०.११	०.३१	०.८०	२.५५	०.२८	०.११	५.३७	८.४७	...	०.२९	...	...	१८.१९
गारगोटी	०.१५	.	१२.२१	२१.९	१४.८३	४.७१	४.६५	५.४४	...	०.२९	...	...	६४.७
मलकापूर	०.२८	...	१२.९५	१८.६७	१७.७७	६.९९	७.५८	१.५०	...	...	...	...	६५.७२
बावडा	...	...	३०.३२	५५.१३	५८.८८	२५.८४	१४.१०	३.५७	...	...	...	...	१८७.८४
कागल	१.४२	...	४.९७	६.९२	६.५१	१.७२	४.१६	२.२०	...	०.२८	...	...	२८.१८
कापशी	२.३८	...	१०.३८	११.४७	७.८१	२.५४	४.३१	४.२७	...	०.२७	०.१५	...	४४.०१
इचलकरंजी	०.१३	०.३	२.४४	६.८९	३.३९	१.६०	५.५९	२.१६	...	...	...	...	२२.३२

आजरा	१.७२	...	१८.५९	२४.४	२३.३३	७.०१	१.६१	४.५०	...	...	...	...	८१.००

(संदर्भ : Administrative Report year 1920-21)

१) पन्हाळा व भुदरगड या भागात केलेली चहा लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१९०९–१०	६	१७१	६४
२	१९१२–१३	७	२७९	१०५
३	१९१६–१७	११	३३३	१६६
४	१९१८–१९	११	७६८	३८४
५	१९१९–२०	११	२४०	१२०
६	१९२०–२१	११	१७६	८८
७	१९२१–२२	११	५५२	२७६

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय अहवाल सन १९०९–१९२२)

संस्थानातील कॉफी लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१८९५ –९६	१५	४७६	२८८
२	१८९७–९८	१५	५७३	२७६
३	१९००–०१	१५	६६०	२३८
४	१९११–१२	४	१२०	४५
५	१९१५–१६	४	५४३	२०४
६	१९१८–१९	४	३८४	१४४
७	१९२०–२१	४	२१०	७९
८	१९२१–२२	४	५०	१९

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय अहवाल सन १८९५–१९२२)

पन्हाळा व भुदरगड येथील वेलदोडा लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१८९५-९६	१	२०	४५
२	१८९९-१९००	१	३६	१७१
३	१९०१-०२	१	१०	२६
४	१९१२-१३	१	८०	२००
५	१९१४-१५	१	६८	२१२
६	१९१६-१७	१	८३	२६०
७	१९१७-१८	१	२७५	५१७

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानाचे प्रशासकीय अहवाल सन १८९५-१९१८)

कोल्हापूर व प्रांतातील संरजामशाही भागात लागवडीखालील क्षेत्र

सन १८९५-९६

राज्य	एकूण क्षेत्र (एकरमध्ये)	लागवडीखालील क्षेत्र (एकरमध्ये)
कोल्हापूर स्टेट	१०,८३,७२३	९,८८,३३८
विशालगड	५९,९५२	३३,९३८
बावडा	८८,२३४	८८,२३४
कापशी	१८,२३०	१८,१६२
कागल(सिनिअर)	६४,१०८	६२,१२९
कागल (ज्युनिअर)	१०,०६७	१०,०६१
इचलकरंजी	१,०४,५१०	९४,००४
एकूण	१४,२८,८२७	१२,९४,८७०

(संदर्भ : Administrative Report year 1895-1896)

सन १८९८-९९

राज्य	एकूण क्षेत्र (एकरमध्ये)	लागवडीखालील क्षेत्र (एकरमध्ये)
कोल्हापूर स्टेट	१०,८२,९००	९,८४,०२५
विशालगड	५९,९६४	३०,५२९
बावडा	८८,२३४	८८,२३४
कापशी	१८,२३६	१८,१६८
कागल(सिनिअर)	६४,४३०	६२,४५३
कागल (ज्युनिअर)	१०,०९९	१०,०१९
इचलकरंजी	१,०५,०४८	९८,११८
एकूण	१४,२८,९०८	१२,८६,६२९

(संदर्भ : Administrative Report year 1898-1899)

खरीप व रब्बी पिकांच्या उत्पन्नाची नोंद

सन १८९५–९६

ठिकाण	खरीप					रब्बी						
	तांदूळ	नागली	बाजरी	ज्वारी	राळ	गहू	तंबाखू	तूर	शाळू	चणा	भूईमूग	शेंगदाणे
करवीर	१२	१२	६	१२	२	४	२	१४	१०	६	८	८
पन्हाळा	१०	८	८	१२	८	६	८	८	१२	८	४	१२
आळता	..	१०	८	८	६	१२	..	१२	६	६	४	४
शिरोळ	६	८	१२	१०	६	८	..	१२	५	८	४	४
रायबाग	..	४	१२	१२	८	८	१	१०	४	८	...	...
गडहिंग्लज	८	१२	१२	१४	१०	८	१०	८	८	१०	६	११
कटकोळ	..	..	४	६	८	६	...	..	...	६	...	..
भूदरगड	१०	९	..	१०	४	६	४	१०	८	८	...	८
विशालगड	१०	८	६	१०	४	४	४	८	६	३	८	२
बावडा	६	११	..	..	..	..	...	८	...	..	...	८
कागल	१४	१४	१०	१०	१४	१०	१२	१२	८	१०	...	१२
इचलकरंजी	११	११	८	९	८	१२	९	९	११	१०	१०	८

(संदर्भ : Administrative Report year 1895-1896)

सन – १९२१–२२

ठिकाण	खरीप								रब्बी				
	ज्वारी	बाजरी	पेडी	रागी	वरई	तूर	उडीद	कपाशी	शाळू	गहू	चणा डाळ	तंबाखू	भूईमूग
करवीर	५०	२५	२५	२५	६	२५	१२	२५	६	२५	२५	२५	२५
हातकणंगले	६३	२५	१२	२५	..	३०	२५	३०	५५	२५	३०	४२	...
	२५	..	७५	६०	५०	२५	१२	..	५०	५०	२५	...	५०
गडहिंग्लज	७५	२५	५०	३६	३६	७३	२५	५०	५०	३६	५०	५०	६२
भूदरगड	२५	..	५०	२५	६	१२	१२	..	६	...	१२	१२	६
रायबाग	५०	५०	...	..	..	३०	५०	..	७५	७५	७५	७५	७५
कटकोळ	२५	२५	...	..	..	६	१२	१२	२५	२५	१२	...	...
चनवाड	१२	..	५०	६५	१२	२५	५	..	१२	१२	२५	३६	५०
राधानगरी	२५	..	५०	२५	६	१२	१२	..	..	..	१२	...	१२
विशालगड	२५	..	५०	३६	..	१२	...	..	२५	२५	२५	५०	१३
बावडा	..	..	३०	२५	३६	...	...	...	७५	७५	...	७५	...
कागल	७५	६०	७५	५०	..	८८	३६	७५	६०	६०	७५	५०	६०
इचलकरंजी	८८	६०	७५	७५	..	५०	...	...			...		५०

(संदर्भ : Administrative Report year 1921-1922)

छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४ - १९२२) एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना

- संशोधन विषयाचे महत्त्व
- संशोधनाची उद्दिष्टे
- संशोधनाची गृहितके
- संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा
- संशोधन पद्धती
- संशोधनाची व्याप्ती
- प्रबंधाचा आकृतीबंध

प्रस्तावना

इतिहास खऱ्या अर्थाने युगपुरुषांच्या कर्तृत्वाचा आलेख आहे, असे विख्यात इतिहास लेखक थॉमस कार्लाईल मानतात. काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर होतात व आपल्या कार्याचा ठसा त्या कालखंडावर सोडून जातात. शाहू महाराज हे असेच इतिहासात अजरामर झालेले छत्रपती आहेत. कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार हाती घेतल्यानंतर अत्यंत धीराने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने संस्थानाचा सर्वांगिण विकास साधत भविष्यकाळावर जो ठसा उमटविला आहे, त्या कार्याचे मूल्यमापन करणे महत्त्वाचे ठरते.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे. एक प्रजाहितदक्ष, लोककल्याणकारी व बहुजन समाजाचा उद्धार करणारा राजा, म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे, तर हिंदूस्यानच्या इतिहासात त्यांचे एक अलौकिक स्थान आहे. तत्कालीन इतर संस्थानिकांप्रमाणे राजौश्वार्याच्या सुखोपभोगात न रमता राजसत्ता हे समाजसेवेचे साधन आहे या तत्वाने शाहू महाराज यांनी आपला राजकारभार केला. आपल्या प्रजेच्या सर्वागीण उन्नतीसाठी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, कला–क्रीडांचा प्रसार. जातिभेद–निवारण, आंतरजातीय विवाह, शेती, व्यापार व उद्योग उत्तेजन, पाणी व्यवस्थापन, सामाजीक सुधारणा इत्यादी अनेक विधायक सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणण्यात महाराज सातत्याने आघाडीवर राहिले होते.

शाहू महाराजांना २ एप्रिल, १८९४ रोजी वयाच्या विसाव्या वर्षी संस्थानाची अधिकार सूत्रे छत्रपती म्हणून हाती आली आणि तेव्हापासून ६ मे, १९२२ रोजी त्यांचे निधनापर्यंतच्या आपल्या एकूण २८ वर्षाच्या या राज्यकारभार काळात पूर्वानुभव, निरिक्षण व दूरदृष्टीने कृती करून कोल्हापूर संस्थानास त्यांनी नावलौकीक मिळवून दिला.

त्याकाळात भारतावर असलेले ब्रिटीशांचे राज्य आणि संस्थाने यांच्या संबंधाचा विचार केला, तर कोल्हापूर संस्थान हे ही ब्रिटींशाच्या नियंत्राणाखाली असलेले संस्थान होते. संस्थानाची सामाजिक व राजकीय परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती आणि आर्थिक स्थितीही प्रतिकूल

होती. अशाही स्थितीत महाराजांनी आपले प्रजाहित कार्य नेटाने चालू ठेवले. इतर प्रगतशील देशंसारखेच आपले संस्थान व्हावे म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत विविध क्षेत्रात अभिनव प्रयोग करत आपल्या संस्थानाच्या विकासाचा त्यांनी मार्ग मोकळा केला होता. ख–या अर्थाने लोकांचा राजा म्हणून समाजाच्या हृदयावर त्यांचे नाव कोरले गेले आहे.

साधारणतः शतकापूर्वी शाहू महाराजांनी जे कार्य केले ते त्यांच्या दूरदृष्टीचे व काळाच्याही पुढे जाऊन विचार करण्याच्या प्रवृत्तीचे दर्शन घडविते अशा विचारांची गरज आजही आहे.

आजचा वर्तमान हा भूतकाळात घडलेल्या घटनांचा परिणाम असतो या न्यायाने कोल्हापूर संस्थानात सन १८९४–१९२२ या छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यकारभार काळात पडलेल्या दुष्काळांचा तत्कालीन समाजव्यवस्थेवर झालेला परिणाम व त्याअनुषंगाने शाहू महाराजांनी केलेल्या कार्यापेकी प्रामुख्याने राज्याचे प्रमुख उत्पन्न असलेले शेती आणि पर्यायाने जल या दोन महत्वाच्या जीवनावश्यक घटकांचा विकास, संवर्धन व नियोजनासाठी केलेले कार्य, औदयोगीकरणाची धोरणे आणि त्यामुळे संस्थानात विकासाच्या दृष्टीने घडून आलेले बदल याचा अभ्यास या विषयाद्वारे करण्याचा मानस आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

शाहू महाराजांचे चरित्र व कार्य यांचेबद्दल वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या अंगाने खूप लिखाण झालेले आहे. त्यातून त्यांच्या अनेकविध कार्यपैलूंवर प्रकाश टाकला गेला आहे. त्या त्या विषयाच्या स्वरूपाने उपलब्ध कागदपत्रांचा अभ्यास झालेला आहे. परंतु छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन या कामासंबंधाने फारसे लिखाण झालेले नाही. विशेषतः दुष्काळ निमूर्लनाच्या अनुषंगाने शेती व जलव्यवस्थापनासंदर्भात महाराजांनी केलेले ठराव, त्यावर घेतलेले निर्णय याबाबतचा तपशीलवार अभ्यास पुढे येत नाही, ज्यामुळे महाराजांनी दुष्काळ ही इष्टापत्ती मानून जलव्यवस्थापनातून शेती विकासासाठी केलेल्या दीर्घकालीन उपाययोजनांवर तितका प्रकाश पडत नाही. त्यांच्या या उपाययोजनांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत अभ्यासातून केला आहे.

राधानगरी धरणाच्या अनुषंगाने त्या क्षेत्रापुरता लिखाण झालेले आढळते. तथापि, शाहू

महाराजांनी कायमस्वरुपी दुष्काळ निवारणार्थ केलेल्या कार्यामधील वेगळेपण सिद्ध करण्यातील अनेक महत्वाच्या धोरणांपैकी राधानगरी धरण हा एक भाग होता. संपूर्ण संस्थानाला जलस्वयंपूर्ण करण्यासाठी महाराजांनी केवळ एक धरणच नाही तर गावागावंमधून पाणीस्त्रोताची व्यवस्था होण्यासाठी तेथे अन्य काही उपायांनी पाणवठे निर्माण करण्यावर आणि ते सुस्थितीत राहण्यावर भर दिला होता. पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी नियम केले होते. शेतीसुधारणांवर भर देताना त्यांनी नवीन पिकांच्या लागवड पद्धतीवर व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत शेती करण्याला प्राधान्य दिले. यासाठी सरकार पातळीवरुन प्रयोग करून लोकांना मार्गदर्शन केले. शेतमालासाठी आवश्यक अशा बाजारपेठा निर्मिती केली. व्यापारीवर्गाला कोल्हापूरात स्थिर होण्यासाठी अनेकवेळा मदतीचा हात दिला. उदयोग क्षेत्रांच्या वाढीसाठी प्रयत्न केले, अशा ज्या अनेक उपायोजना केल्या त्याचा आढवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

दुष्काळ निवारणार्थ काम करताना महाराजांनी शेती व पाणी या दोन एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या घटकांचे महत्व जाणून त्यांच्या विकास व संवर्धनासाठी अनेक छोटे–मोठे प्रयत्न केले, योजना आखल्या, ठराव व जाहिरनामे काढले यातूनच पुढे संस्थानाच्या विकासाचा पाया घातला गेला. शाहू महाराजांच्या या कार्याचे महत्व जाणण्यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

इतिहासात भूतकाळात घडलेल्या घटनांच्या परिणामांचा प्रभाव हा भविष्यकाळावरही उमटतो. या न्यायानेच साधारण १०० वर्षापूर्वीचे वातावरण आणि त्यावेळचा कोल्हापूर संस्थानमधला दुष्काळ, त्यावेळेची परिस्थिती व त्याचे होत असलेले परिणाम, आजपेक्षा नक्कीच वेगळ्या स्वरुपाचे होते पण, त्याच्या बरोबरीने टक्कर देत उभे राहून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकाळात पडलेल्या दुष्काळस्थितीचा सामना करताना आपल्या प्रजेची झालेली दैन्यावस्था प्रत्यक्ष पाहून वास्तवाची खातरजमा करून घेतली. त्यातून बाहेर पडण्याची गरज बघून त्यासाठी धान्याचा पुरवठा व पाण्याची उपलब्धता यासारख्या काही तातडीने उपाययोजना अंमलात आणल्या. त्यानंतर अल्पमुदतीच्या व काही दीर्घकालीन मुदतीच्या योजनांद्वारे अशा संकटांवर कायमपणे मात करण्यासाठी प्रामुख्याने शेतीसुधारणा– विकास आणि त्यास जलव्यवस्थापनाची जोड या कार्यामुळे त्यांनी दुष्काळाला यशस्वी तोंड तर दिलेच परंतू पुढे

यामुळे संस्थानाचा झालेला विकास व हरितक्रांतीसारखा सुयोग्य परिणाम आपण आजही अनुभवू शकतो. यासाठी शाहू महाराजांचे फार मोठे योगदान आहे त्याचा अभ्यास करण्याच्या हेतूने या विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) ब्रिटिशकालीन भारतात पडलेल्या महत्त्वाच्या दुष्काळाच्या परिस्थितीचा आढावा घेणे

२) कोल्हापूर संस्थानातील दुष्काळाच्या परिस्थितीचा आढावा घेणे.

३) दुष्काळ निवारणविषयी शाहू महाराजांचा असलेला दृष्टीकोन आणि त्यांनी केलेल्या तत्कालीन उपाय व सुधारणा यांचा आढावा घेणे.

४) दुष्काळ निवारणासाठी राबविलेल्या दीर्घकालीन धोरणांचा अभ्यास करणे.

५) शाहू महाराजांनी शेतीक्षेत्र विकासासाठी घेतलेल्या नावीन्यपूर्ण व आधुनिक धोरणांचा अभ्यास करणे

६) जलव्यवस्थापनासाठी महाराजांनी राबविलेली धोरणे व केलेले उपाय यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

७) शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ केलेल्या शेतीविकास व जलव्यवस्थापनाचे सकारात्मक परिणाम अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके

१) शेती विकास व जलव्यवस्थापनेबाबत महाराजांनी दिलेली आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, अभिवन प्रयोग व दूरदृष्टीने घेतलेले निर्णय यामुळे दुष्काळावर मात करण्यात कोल्हापूर हे संस्थान यशस्वी झाले होते.

२) छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळाच्या निवारणार्थ घेतलेल्या ठोस धोरणांमुळे कृषीक्षेत्रात व जलक्षेत्रात क्रांती घडून आली व त्याचे चांगले परिणाम आजही हरीतक्रांतीच्या रूपात दिसून येतात.

संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा

संशोधन करत असताना आपल्या विषयाशी निगडीत असलेले इतर साहित्यांचा अभ्यास, संदर्भग्रंथ, मासिके, संबंधीत विषयाची पुस्तके यांच्या आधारे अभ्यास करणे आवश्यक असते. आपल्या संशोधनाच्या दृष्टीने उपयोगी होईल असे संदर्भ आपल्याला अशा इतर साहित्यांमधून मिळत असतात, शिवाय आपल्या विषयाला एक दिशादर्शक म्हणून यांचे महत्त्व असते. अन्य साहित्यांमधून आपल्या विषयाच्या अनुषंगाने इतर कोणाचे लिखाण झालेले नाही याची खात्री होण्यासाठी आणि झाले असल्यास त्या लिखाणांचा त्या विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोन आपल्या दृष्टीकोनाहून भिन्न आहे हे समजण्यासाठी अशा संदर्भ साहित्यांचा आढावा घेणे गरजेचे ठरते.

'छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन (१८९४–१९२२) एक चिकित्सक अभ्यास' हा विषय शोधप्रबंधासाठी निवडल्यावर त्या अनुषंगाने इतर काही संदर्भ साधने मिळविणे हे क्रमप्राप्त होते.

१) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१

सदर पुस्तकातून छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तीमत्वाचा व त्यांच्या कार्याचा समग्रपणे वेध घेण्यात आला आहे. तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्रात घडलेल्या विविध घटनांचे विवेचन यासह अनेक महत्वाच्या लेखकांनी शाहू महाराजांविषयी घेतलेला लेखाजोखा व संदर्भ यात आहेत. शाहू महाराजांनी राज्यकारभार करताना काढलेले अनेक जाहिरनामे, भाषणे यासारखे महत्त्वाचे संदर्भ या पुस्तकातून मिळतात.

२) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश : भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८

राज्य शासनाच्या पुराभिलेख विभागाकडून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आलेले आहे. राज्यकारभार करताना शाहू महाराजांनी विविध लोककल्याणकारी धोरणे राबवताना विविध निर्णय घेतले त्यातील निवडक ठराव प्रस्तुत पुस्तकात घेतलेला आहे. यात सन १९१८ पर्यंतचे ठराव पहावयास मिळतात. कारभारातील शिस्त, शेती व व्यापार, उद्योग, उत्तेजन,

शिक्षण प्रसार, कला व क्रीडा क्षेत्राला उत्तेजन, प्लेगचा बंदोबस्त व सामाजिक सुधारणा अशा महत्वपूर्ण ठरावांची माहिती यातून मिळते.

३) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव (संपा), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश : भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९.

राज्य शासनाने प्रकाशित केलेल्या या प्रस्तुत पुस्तकात सन १९१८–१९२२ या काळात छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या समोर आलेल्या प्रकरणांवर दिलेल्या निवडक आदेशांचा समावेश आहे. यासंबंधीत प्रकाशित झालेल्या पहिल्या भागाप्रमाणेच या पुस्तकातही शिक्षण, सामाजिक संस्था, शेतीचे नवीन प्रयोग, तसेच समाजोपयोगी सुधारणा अशा महत्वाच्या विविधांगी कार्याचे दर्शन यातून होते.

४) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर (१८८९–१९२२).

कोल्हापूर संस्थानाच्या सदर गॅझेटमधून विविध विभागाचे अहवाल, आदेश प्रकाशित केलेले आढळतात. कृषी खाते, मुलकी खाते, पोलिस खाते, शिक्षण खाते, जंगल खाते अशा खात्यांमार्फत महाराजांनी दिलेल्या विविध हुकूमांची माहिती यातून मिळते. करवीर गॅझेट हे माझ्या संशोधनाचे प्राथमिक साधन म्हणून वापरलेले आहे.

५) कोल्हापूर संस्थानाकडून प्रकाशित झालेले सन १८९१ ते १९२२ चे प्रशासकीय अहवाल

ब्रिटीश सरकारने पोलिटिकल एजंटच्या माध्यमातून करवीर संस्थानाचा आर्थिक ताळेबंद व राजकीय घडामोडी लिहिण्याची एक दीर्घ परंपरा येथे विकसित केलेली होती. या प्रक्रियेतून संस्थानात वर्षभरात ज्या ज्या घडामोडी घडत त्याचे सविस्तर तपशीलवार माहिती या अहवालांमधून मिळते. संस्थानाची प्रगती कशी झाली, कोणत्या सुधारणा केल्या गेल्या, खर्चाची तरतूद कशी केली गेली अशी महत्वाची माहिती यातून मिळते. सदर अहवाल हे माझ्या प्राथमिक साधनांमधील एक महत्वाचे माहितीस्त्रोत आहे.

६) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४

छत्रपती शाहूंच्या वादळी व महनीय व्यक्तीमत्वासंबंधीत व त्यांनी केलेल्या विविध कार्यांसंबंधीत माहिती सदर पुस्तकातून मिळते. महाराजांनी संस्थानाच्या प्रगतीसाठी केलेले कार्य तसेच त्यांच्या धार्मिक, शैक्षणिक, राजकीय योगदानाची माहिती या पुस्तकाद्वारे मिळते.

७) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५.

सदर पुस्तकात कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक विकास करण्यामागची शाहू महाराजांची भूमिका स्पष्ट केलेली आहे. महाराजांचे त्यामगील विचार व प्रत्यक्ष कृती यातून शेती, पाटबंधारे, उदयोग, सहकार, दुष्काळासारख्या संकटाचा मुकाबला सार्वजनिक आयात–निर्यात अशा अनेक आर्थिक विकासाच्या कामगिरीचा परिचय या पुस्तकातून होतो.

८) कीर धनंजय, राजर्षी शाहू : एक समाजक्रांतीकारक राजा, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९७९

सदर पुस्तकाचे लेखक हे शाहू महाराजांच्या चरीत्रांचा अभ्यास करणा–या लेखकांमधे विशेष ओळखले जातात. त्यांनी या पुस्तकातून महाराजांच्या संस्थानाप्रती दिलेल्या योगदानाचा वस्तुनिष्ठ आढावा घेतलेला आहे. सामाजीक सुधारणा, शेती क्षेत्रातील बदल , प्रभावी शिक्षण याबरोबरीने जाती निर्मूलनासारख्या महाराजांच्या कार्याचा आढावा यातून अभ्यासता येतो.

०९) सेन अर्मत्य, पॉवर्टी अँड फॅमिन्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्युयॉर्क, १९८१.

पश्चिम बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळामागील कारणांची मिमांसा या पुस्तकातून करण्यात आली आहे. ब्रिटीश काळातील दुष्काळ आणि अन्न–धान्य पुरवठा यासंदर्भाने या पुस्तकामध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे. लेखकाच्या मतानुसार, तत्कालीन परिस्थितीत कोणत्याही अन्नाचा तुटवडा नव्हता. केवळ सरकारचे धोरण याला कसे कारणीभूत ठरले होते, याचा वेध डॉ. सेन यांनी घेतला.

१०) भगत रा. तु., राजर्षी शाहू शिक्षण विषयक विचार आणि कार्य, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, १९८१.

शाहू महाराजांनी केलेल्या कार्यापैकी शिक्षणावरील त्यांचे कार्य हे आजपर्यंत सर्वांनाच अभ्यासण्याजोगे आहे. निरक्षर समाजाला जागे करण्याची ताकद शिक्षणात आहे हे ओळखून महाराजांनी शिक्षणाचे मोठे कार्य केलेले आहे. त्यांच्या शिक्षणविषयक विचार कार्याची प्रेरणा घेऊन त्याबाबतचा संकलनात्मक असा अभ्यास लेखकाने यात विशद केला आहे.

११) तोफखाने, वा. द., राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६३.

छत्रपतींच्या सानिध्यात शेवटची काही वर्षे लेखकाने घालविली आहेत. महाराजांच्या विविध व मनोहर दर्शनाचे अंतरंग त्यांनी या पुस्तकात उलगडून दाखवलेले आहे. महाराजांचे त्यांच्यावर असलेल्या मित्रवत प्रेमामुळे त्यांनी त्यांच्या निकट आयुष्यातील विविध प्रसंगाचे सार या पुस्तकात लिहिलेले आहे.

१२) भेलके अशोक, सिंचन व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१२.

लेखक हे शासकीय अभियंता असून त्यांनी पाणी प्रश्नावर शासकीय कामाचा अनुभव कायदा यांचा समन्वये साधून आपले विचार मांडलेले आहेत. भारतातील विविध भागातील सिंचनाची शासनाची धोरणे नेमकी काय आहेत याचा तपशील यात दिलेला आहे. सिंचनाच्या पद्धतींची चर्चा केली आहे. याचबरोबर आजच्या काळातील बदलाची गरज त्यात मांडली आहे.

१३) माळगावकर मनोहर, छत्रपती ऑफ कोल्हापूर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७१.

सदर पुस्तक हे आपल्याला कोल्हापूरच्या मराठा साम्राज्याविषयी विस्तृत माहिती देते. कोल्हापूरचा इतिहास, कोल्हापूर संस्थानाच्या राजगादीवर आलेल्या छत्रपतींची भूमिका व तत्कालीन वातावरण याचा अभ्यास यात केलेला आहे. छत्रतींच्या विस्तृत कार्याची माहिती या पुस्तकातून होण्यास मदत होते.

१४) डॉ. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८ ते १८९४), निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००९.

सन १८३८ पासून सन १८९४ पर्यंतच्या कालावधीत कोल्हापूर संस्थानाअंतर्गत जी विविध स्थित्यंतरे घडून आली. त्या सर्वांचा साक्षेपी आढावा डॉ. शिंदे यांनी या ग्रंथातून घेतलेला आहे. राजर्षी शाहूमहाराज पूर्व कालखंडातील घडामोडीवर विशेष प्रकाश टाकण्यात आल्याने शाहू महाराजांच्या राज्यकारभाराची पार्श्वभूमी कशी तयार झाली, हे समजण्यास मदत होते.

१५) घुगे व्ही. बी., शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, 'द कोल्हापूर रायटर्स सोसायटी लि. कोल्हापूर, १९७६.

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांविषयी सांगोपांग माहिती या पुस्तकातून मिळते. १९ व्या शतकापासून २० व्या शतकाच्या पूर्वाधापर्यंतचा आर्थिक विचारांचा धांडोळा घेत शाहू महाराजांच्या विचारांचा प्रवास यात लेखकांनी कथन केला आहे.

संशोधन पद्धती

सदर शोधप्रबंध हा ऐतिहासिक स्वरुपाचा असल्याने आवश्यक ती ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधनाच्या विश्लेषणाचे स्वरुप स्थूल व विवेचनात्मक आहे. या प्रबंधासाठी ऐतिहासिक दस्तऐवज हा प्रमुख आधार आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे शोधप्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे. शाहू महाराजांच्या राजकारभारासंबंधीत उपलब्ध असलेले पुरालेखागार विभागांमधील येथील प्रशासकीय अहवालाची कागदपत्रे, ठराव बुक , हुजूर ऑफिसमधील संबंधीत कागदपत्रे, करवीर सरकारची गॅझेट, शाहूकालीन पत्रव्यवहार आणि समकालीन विषयासंबंधीत काही पत्रव्यवहार यांच्या आधारे मांडणी करण्यात आली आहे. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, कोल्हापूरची वरदायिनी राधानगरी धरण योजना, राजर्षी शाहू राजा व माणूस अशा संदर्भग्रथांच्या आधारे मांडणी करण्यात आली आहे.

संशोधनाची व्याप्ती

छत्रपती शाहू महाराजांनी सन १८९४–१९२२ या कालावधीत राज्यकारभार केला. याच कालावधीपुरता या संशोधनाची व्याप्ती आहे. या कालखंडात संस्थानात पडलेल्या दुष्काळाचे निवारण करताना कृषी आणि जल हे महत्त्वपूर्ण घटक केंद्रस्थानी ठेवून अनेक उपक्रम हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. त्यातून संस्थानाचा विकास कसा घडवून आणला, याबाबीचे यथार्थ विवेचन करणे हा या संशोधनाचा मुख्य केंद्रबिंदू राहणार आहे.

प्रबंधाचा आकृतीबंध

संशेधनासाठी विषयाच्या उपलब्ध माहिती आधारे प्रामुख्याने सहा प्रकरणांमधे विभागणी करण्यात आलेली आहे.

१) प्रकरण पहिले– भारतातील ब्रिटिशकालीन दुष्काळ : व्याख्या, सिद्धांत आणि ऐतिहासिक आढावा

भारतातील ब्रिटीश राजवटीत देशभरात विविध ठिकाणी काही महत्त्वाचे दुष्काळ पडलेले होते. त्या दुष्काळाचा लोकांवर झालेला परिणाम यांचा थोडक्यात आढावा या प्रकरणातून घेतला आहे. दुष्काळाच्या संदर्भाने अनेक तज्ज्ञांनी केलेली व्याख्या त्याचा त्या परिस्थितीशी जोडलेला संदर्भ तितकाच महत्त्वाचा आहे.

ब्रिटीश राजवटीत त्यांच्या नफा कमवण्याच्या धोरणांमुळे खेडयांच्या स्वयंपूर्णतवर घातलेला घाला व त्याचा येथील लोकांवर झालेला परिणाम, ब्रिटीशांच्या अंकीत असलेल्या संस्थानिकांचे धोरण, यामुळे सर्वसामान्य जनतेला बहुतेक वेळा दुष्काळाच्या भयंकर यातना सहन कराव्या लागत होत्या. दुष्काळाची दाहकता ही तो सोसण्याच्या क्षमतेपलिकडे जाताना राज्यकर्त्यांनी फारसे न केलेले प्रयत्न यामुळे मृत्यूदर वाढलेला होता. डॉ. अमर्त्य सेन यांनी मांडलेला दुष्काळाचा सिद्धांत यात मांडून त्यांनी राज्यकर्त्यांच्या याबाबतीतल्या उदासिनतेवर जे मत मांडले आहे, त्याचा आढावा घेतला आहे. पश्चिम बंगालमधे पडलेल्या मोठया दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटीश प्रशासनाचे धोरणात्मक निर्णय कसे करणीभूत ठरले याचा उहापोह त्यांनी त्यांच्या पुस्तकात मांडलेला होता. अन्नधान्य उपलब्ध असूनही ते लोकांपर्यंत योग्य नियोजन

करून पोहचविले नसल्याने अनेकांना दुष्काळाची झळ पोहचली व मृत्यूस सामोरे जावे लागले असे त्यांनी प्रतिपादन केले त्याची मांडणी केलेली आहे.

या शिवाय माल्थ्युसियन लोकसंख्यावाढीचा सिद्धांत हा देखिल तितकाच या संबंधात आपले भाष्य करतो. गोविंद गोपाळ टिपणीस हे भारतातील विचावंत होते. त्यांनी भारतातील वातावरणाचा अभ्यास करून आपल्या 'हिंदुस्थानातील दुष्काळ' या पुस्तकात दुष्काळाची जी कारणे नमूद केलेली आहेत, ती तेव्हाही व आजही करावयाच्या उपायांसाठी दिशा दाखविणारी आहेत. त्यांचा आढावा या प्रकरणातून घेतला आहे.

२) प्रकरण दुसरे – छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण आणि तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती

कोल्हापूरला मोठा इतिहास आहे. या संस्थानात प्राचीन आध्यात्मिक, धार्मिक तीर्थक्षेत्र असून, संस्थानाला सांस्कृतिक वैभव लाभलेले आहे. या सर्व वैभवाचा आणि समृद्ध परंपरेचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या सामाजिक न्यायाचा आदर्श आणि सर्वधर्मसमभावाचा ऐतिहासिक वारसा संस्थानाला लाभला आहे. हाच वारसा जपत शाहू महाराजांची जडणघडण झालेली दिसून येते.

ब्रिटिशांनी भारतातील सर्व भागांत आपला अंमल प्रस्थापित केल्यानंतर राज्यकारभार सुरळित चालण्याच्या हेतूने का होईना पण त्याच्या माध्यमातून देशभरात आर्थिक, राजकीय, सामाजिक सुधारणेला चालना मिळण्यास सुरुवात झाली होती. आधुनिक शिक्षण आणि मूल्य व्यवस्थेचा भारताला परिचय ब्रिटिश वसाहतवादाच्या काळात झालेला होता. या काळात शैक्षणिक घडामोडींबरोबरच सामाजीक परिवर्तनाच्या घडामोडींनासुद्धा चालना मिळाली. यातूनच भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणा होण्यास सुरुवात झाली. गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले, महर्षी केशव धोंडो कर्वे, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, राजा राममोहन रॉय अशा थोर समाजसुधारकांनी त्या काळात समाजसुधारणांसाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे अनेकांना यातून प्रेरणा मिळत गेली. सतीबंदीसारखे कायदे, शिक्षणाचा प्रसार याच प्रयत्नांमुळे झाले. याचा कुठेतरी शाहू महाराजांवर कळत नकळत परिणाम झालेला होता. पुढे त्यांनी अशाच विचारांचा केलेला अंगीकार त्यांच्या कृतीतूनही दिसून येतो.

कोल्हापूर संस्थानाचा थोडक्यात इतिहास ते ब्रिटीशांचे कोल्हापूर संस्थानावरील नियंत्रण या बाबींचा आढावा यात घेण्यात आला आहे. शाहू महाराजांचे दत्तकविधान आणि त्यांच्या गुरुजनांचा त्यांच्यावर असलेला प्रभाव या सर्व घटकांचा छत्रपती शाहू महाराजांच्या जडणघडणीला कारणीभूत ठरली. त्यांच्या प्रजाहित ध्येयाचे प्रतिबिंब त्यांनी राज्याभिषेकावेळी प्रजेसाठी काढलेल्या जाहिरनाम्यातून प्रतित होते. हा प्रवास या प्रकरणातून पहाणार आहोत.

प्रकरण तिसरे– दुष्काळ निवारणार्थ केलेल्या तत्कालीन उपाययोजना

छत्रपतींच्या राजवटीत त्यांना सुरवातीलाच दुष्काळाला सामोरे जावे लागल्याने त्यांनी राज्यातील जनतेला यातून सावरण्यासाठी तातडीने प्रयत्न केले. त्याची तिव्रता कमी करण्यासाठी प्रथम संस्थानातील विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन आपल्या रयतेशी संवाद साधला. सरकारच्या पातळीवर कार्यपद्धतीत सुधारणा करून लोकांसाठी प्रथम अन्नधान्य देण्याची व्यवस्था केली सावकारांना त्यावेळी सहकार्य करण्यास आवाहन केले, प्रसंगी त्यांच्यासाठी नियमावली केली. दुष्काळ निवारणासाठी स्वतंत्रपणे एक खाते निर्माण करून गावागावातील लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचेल याची व्यवस्था केली. माणसांनाच नाही तर जनावरांना तात्काळ पाण्याच्या सोईसाठी विविध उपाय केले व सरकारी तिजोरीतून आर्थिक मदत केली. सर्वसामान्याना रोजगार मिळण्यासाठी विविध योजनांमधून कामे काढली. गरीब रयतेच्या प्राथमिक गरजांना पूर्ण केले. निवा–याची सोय केली. अनाथ व लहान मुलांची तेवढीच काळजी घेतली, आणि या बरोबरीने आलेल्या त्यावेळेच्या साथिच्या रोगांनाही नियंत्राणात ठेवले या सर्व कार्याचा वेध प्रस्तुत प्रकरणातून घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे – शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन

छत्रपती शाहू महाराज यांनी दुष्काळ निवारणासाठी तातडीच्या काही प्रयत्नांबरोबरच दीर्घकाळासाठी व भविष्यात उपयोगी पडतील अशा धोरणांची अंमलबजावणी या दुष्काळाच्या संकटातून कायम बाहेर पडण्यासाठी केली होती. त्यात मुख्य पाण्याचे नियोजन हा केंद्रबिंदू होता.

अन्नधान्य बाहेरून सुद्धा येऊ शकते परंतू, पाण्याची सोय मात्र राज्यातच होणे गरजेचे होते.

संस्थानातील शेतीजीवन पावसावर अवलंबून असल्याने त्यांनी यादृष्टीने अनेक छोटे मोठे निर्णय घेतले. अगदी छोट्यातल्या छोटया पाण्याच्या साठयापासून राधानगरी सारखा एक मोठा प्रकल्प येथपर्यंत पाण्याच्या नियोजनाची धोरणे महाराजांनी आखली होती. स्वतंत्र पाटबांधारे खाते स्थापून त्यासाठीच काम करणारा स्वतंत्र अधिकारी नेमून पाण्याच्या नियोजनात सूसुत्रता आणली.

उपलब्ध पाण्याची चांगली व्यवस्था करण्याबरोबरच नवीन पाण्याच्या उपलब्धतेच्या संधी निर्माण केल्या. विहिर, नदी, तलाव यांचेसंबंधाने ठिकठिकाणी कामे केली. शाहू महाराजांनी पाण्याचे कार्य केवळ निर्माण करणे एवढयावरच सिमित न ठेवता पाण्याच्या स्वच्छतेसाठीचे केलेले उपाय व नियम, पाण्याचा अपव्यय टाळण्याचे नियम, जनावरांसाठी स्वतंत्र पाणीसोय, बहुजन वर्गाच्या पाण्याची व्यवस्था, राधानगरी धरणासारख्या भव्य प्रकल्पाची उभारणी इ. उपायही केले होते. विशेष म्हणजे महाराजांनी पाण्याच्या कर आकारणी बाबतही तितक्याच कठोरपणे अंमलबजावणी करून लोकांना त्याच्या वापराचे नियम घालून शिस्त लावली होती.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यावरण आणि पाणी यांच्या संबंधाचे महत्व जाणून महाराजांनी पर्यावरण संवर्धनाचे कामाला महत्व दिल्याचे दिसते. त्यावरचे विविध उपाय केलेले होते, वेळप्रसंगी सरकारातून खर्च करण्याचे आदेश ही दिलेले होते. या त्यांच्या कार्याचा दृष्टीकोन व पाणी व्यवस्थापन यांचा आढावा या प्रकरणातून घेतला आहे.

प्रकरण पाचवे – शेती विकासाचे आधुनिक धोरणे व नवीन प्रयोग

संस्थानातील शेती सुधारण्यासाठी शाहू महाराजांनी घेतलेल्या दिर्घकालीन धोरणांमधील महत्वाच्या धोरणांपैकी जलव्यवस्थापनाचे धोरण हा पाया होता. या बरोबरीने महाराजांनी आपल्या शेतीप्रधान राज्याला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी काही योजनांचा अवलंब केला. शेती क्षेत्रात इतर देशांनी केलेले काम व त्यांची सफलता लक्षात घेऊन येथील लोकांसाठी त्याच धर्तीवर आधुनिक विचारधारेने अत्याधुनिक व नाविन्यपूर्ण असे प्रयोगांना चालना दिली. प्रशासनाच्या पातळीवर प्रयोग सुरु करून शेती सुधारणांसाठी एक नियोजनबद्ध कार्यक्रमच हाती घेतलेला होता.

सुरवातीच्या काळात त्यांनी आपल्या शेतकऱ्यांमधील अडचणी समजावून घेत त्यावर मात करण्याच्या दृष्टीने प्रथम शिक्षणाचे अस्त्र वापरले होते. सहाजिकच नवीन जाणीवा निर्माण करण्याबरोबरच या लोकांना शेती सुधारणांसाठी आवश्यक तेथे कर्जस्वरुपात वा मदतीच्या स्वरुपात नेहमीच सहकार्य केले. शेतकी शिक्षणासाठी पुस्तकाचा अवलंब, प्रचाराचा मार्ग तर कधी अशा शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना परदेशी जाण्यासाठी मदतीचे कार्य केले.

जमिनीतून उत्पन्न भरघोस व कसदार पीक यावे यासाठी पारंपरिक पिकांबरोबरच नवीन पद्धतीच्या पिकांची लागवड सुरू करुन लोकांना त्यासाठी प्रवृत्त केले. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतीत सुधारणांचे प्रयत्न केले. यासाठी शासकीय स्तरावर शेतकी संस्था, आदर्श शेती, प्रदर्शने, शेती संशोधन, वृक्षपार्क, रोपवाटीका इत्यादीवर भर दिला. याच जोडीने शेती पूरक व्यवसायाला चालना दिली. शेतीतील विकासासाठी व्यापार, उदयोग व सहकार क्षेत्र यांचे योगदान व त्यासाठीचे महाराजांचे प्रयत्न याचा वेध या प्रकरणातून घेतला आहे.

प्रकरण सहावे – समारोप (सारांश आणि निष्कर्ष)

कोल्हापूर संस्थानतील दुष्काळ निवारण करण्याच्या हेतूने महाराजांकडून करण्यात आलले प्रयत्न आणि त्यातून संस्थानात शेती व जलविकासाच्या दृष्टिकोनातून झालेले सकारात्मक बदल याचा वेध या प्रकरणांमध्ये घेण्यात येणार आहे. शाहू महाराजांच्या लोकोपयोगी कामांवर त्यांच्या आधुनिक विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या वैचारीक योगदानाचा परामर्श यात घेतला आहे. शाहू महाराजांच्या एकूणच राजकीय कारार्कीर्दीत त्यांनी योजलेल्या निश्चित योजनांमुळे संस्थानाचा जलव्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून झालेल्या शेती विकासाचा तपशील आढावा आकडेवारीसह घेतला जाणार आहे. यामधे दुष्काळातून सावरण्यासाठी केलेल्या योजनांचा तपशील, जलव्यवस्थापनामुळे सिंचनात झालेली वाढ, शेतीमधील पिकांच्या उत्पन्नातील वाढ, पावसाची वाढलेली सरासरी आणि या सर्वांबरोबरीने कोल्हापूर संस्थानात सहकार–व्यापार–उदयोग यांची झालेली वाढ या सर्व सकारात्मक परिणामांचा आढावा आवश्यक तेथे आकडेवारीच्या माध्यमातून या प्रकरणात देण्यात आले आहेत.

***

प्रकरण पहिले

भारतातील ब्रिटिशकालीन दुष्काळ : व्याख्या, सिद्धांत आणि ऐतिहासिक आढावा

प्रस्तावना

दुष्काळ : संकल्पना, इतिहास आणि परिणाम

दुष्काळाची व्याख्या

१) संयुक्त राष्ट्रसंघ

२) केंब्रिज डिक्शनरी

३) एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका

४) ख्रिस्तोफर बॅरेट

५. होवे आणि देवरेक्स (२००४)

६. संयुक्त राष्ट्राची अन्न व कृषी संघटना (२००८)

७. हेकविल आणि मोरेन (१९९१)

शेतीबाबत दुष्काळविषयक सिद्धांत

अ. दुष्काळविषयक अमर्त्य सेन यांचा सिद्धांत

१) शासकीय धोरणांना अपयश

२) बाजारपेठेवर नियंत्रण

३) सर्वसामान्यांचा हक्क

४) अन्नधान्याच्या उपलब्धतेची वानवा

५) शासनाच्या धोरणात असमान विनिमय

ब. दुष्काळविषयक माल्थसियन लोकसंख्यावाढीचा सिद्धांत

क. गोविंद गोपाळ टिपणीस यांचा दुष्काळविषयक सिद्धांत

१) नैसर्गिक पर्जन्यमान असमानता

२) टोळ धाड किंवा पाखरांची धाड

३) शेतीची उत्पादकता आणि नैसर्गिक साधन संपत्ती

४) शेती कसण्याच्या साधनाची टंचाई

५) शेतकऱ्याचे अज्ञान

६) सरकारचे महसुलीसंदर्भातील नियम

७) प्रांतामधील समन्वय आणि सहकार्य

८) अमर्यादित अन्नधान्याच्या निर्यातीवर बंदी

९) परदेश गमन आणि व्यापारी प्रगती

१०) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती

११) बहुजनांचे दारिद्र्य

ब्रिटिशकालीन भारतातील दुष्काळ : ऐतिहासिक आढावा

१) सन १७७०–७३ बंगालमधील दुष्काळ

२) सन १७८२–८४ चा चाळीसा दुष्काळ

३) डोजी बारा दुष्काळ किंवा सन १७८८–९४ चा कवटीचा दुष्काळ

४) सन १८३७–३८ चा आग्रा दुष्काळ

५) सन १८६०-६१ चा अप्पर दोआब दुष्काळ

६) सन १८६६ चा ओरिसाचा दुष्काळ

७) सन १८६९ चा राजस्थान दुष्काळ

८) सन १८७३-७४ चा बिहार दुष्काळ

९) सन १८७६-७८ चा दक्षिण भारत दुष्काळ

१०) सन १८९६-१८९७ चा भारतीय दुष्काळ

११) सन १८९९-१९०० चा भारतीय दुष्काळ

१२) सन १९४३ मधील बंगालचा दुष्काळ

१३) शाहू महाराजकालीन कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ

प्रकरण पहिले

भारतातील ब्रिटिशकालीन दुष्काळ : व्याख्या, सिद्धांत आणि ऐतिहासिक आढावा

प्राचीन काळापासून विविध देशांमध्ये विविध प्रांतांमध्ये अनेकवेळा दुष्काळ पडल्याच्या नोंदी इतिहासामध्ये आढळतात. प्रत्येक भागातील स्थितीनुसार याची कारणे जरी वेगवेगळी असली तरी बहुतेक वेळा यात प्राणहानी झाल्याच्या नोंदींवरुन दुष्काळात मानवी क्षमता किती हतबल होतात हे दिसते. दुष्काळाचे स्वरूप समजण्यासाठी काही विचारवंतांनी केलेली व्याख्या, त्याचे सिद्धांत, परिणाम आणि ब्रिटीशकालीन भारतामध्ये पडलेल्या काही महत्त्वाच्या दुष्काळांचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

प्रस्तावना

भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांच्या वसाहतवादी धोरणांद्वारे त्यांनी नैसर्गिक साधनसंपत्तीची सतत लूट करत देशाचे आर्थिक शोषण केले. विशेषतः ब्रिटिशांनी पहिला हल्ला चढविला तो येथील खेडी आणि कृषी व्यवस्थेतील स्वयंपूर्णतेवर. येथील कृषी व्यवस्था ही जरी पारंपरिक उत्पादन साधनांवर आधारित असली, तरी ती स्वयंपूर्ण होती. त्यामुळे शेतीतील विविध आदाने (Inputs) आजच्यासारखी बाजारपेठेवर अवलंबून नव्हती. एकोणिसाव्या शतकातील आधुनिकीकरणाच्या वातावरणात ब्रिटिशांनी प्रामुख्याने त्यांच्या उत्पादनाचे आणि शोषणाचे मुख्य साधन असलेल्या शेती क्षेत्राला दुय्यम स्थान देऊन कारखानदारीला प्रोत्साहन देण्याचे धोरण हाती घेतले. साहजिकच येथे औद्योगिक क्रांतीच्या माध्यमातून कच्च्या मालावर आधारीत कारखानदारी विकसित होत गेली; मात्र त्यासाठी लागणारा कच्चा माल उत्पादित करण्यास बाध्य करून, देशातील शेतकरी वर्गाचे आणि शेती आधारित विविध पूरक घटकांचे शोषण करण्याचे धोरण राबविले गेले.

ब्रिटिशांनी औद्योगिक क्रांती घडवून आणली. त्या माध्यमातून त्यांनी कारखानदारी निर्माण केली होती; पण ब्रिटनमध्ये कृषी उत्पादकता कमी होती, साहजिकच पीक पद्धती व पीक उत्पादन कारखानादारीस आवश्यक अशा कच्च्या मालाची गरज तितकीशी भागविण्यास समर्थ नव्हती.

त्यामुळे त्यांनी आपल्या देशातील कारखानदारीला प्रोत्साहन देऊन वसाहतिक देशांमध्ये औद्योगिकीकरणास आणि कारखानदारीस पूरक असलेल्या शेती पद्धतीवर भर दिला.

भारतासारख्या देशांमध्ये त्यांनी आपली सत्ता प्रस्थापित करून पहिल्यांदा जमीनमालकी यात आमुलाग्र बदल घडवून आणला. त्यानुसार जमीन हा खासगी मालमत्तेचा विषय झाला.. जमीन मालकीसाठी प्रामुख्याने ब्रिटिशांनी तीन पद्धतीची रचना अस्तित्वात आणली. महालवारी पद्धत, रयतवारी पद्धत, जमीनदारी पद्धत.

ब्रिटीश वसाहतवादामध्ये ब्रिटिशांनी त्यांना हितवर्धक ठरू शकतील या अनुषंगाने जमिनीसंदर्भातील धोरणांची, कायद्याची निर्मिती करून अंमलबजावणी केली. विशेषतः कायम जमीन धारणा कायदा जो पूर्व बंगाल, बिहार आणि ओरिसा या क्षेत्रामध्ये ब्रिटिशांनी लागू केला होता. तर उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या भागांमध्ये तात्पुरता जमीन धारणा कायदा लागू केलेला होता. रयतवारी पद्धत मुख्यत्वे दक्षिण आणि उत्तर भारतातील महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात या राज्यांमध्ये लागू केली होती. या तिन्ही क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या जमीन धारणा कायद्याची अंमलबजावणी केल्यामुळे आर्थिक विकासामध्ये आणि राजकीय हितसंबंधात फरक केला गेला. हा जमीन धारणा कायदा लागू केल्यामुळे स्वातंत्र्यानंतर सुद्धा भारतामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि आर्थिक विकास होण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या. विशेषतः पश्चिम आणि दक्षिण भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास झाला; पण पूर्वेकडे जुनीच उत्पादन व्यवस्था कायम राहिली. उत्पादन शक्तीचा विकास आणि उत्पादन साधनांचा विकास यामध्येसुद्धा तफावत असल्याचे स्पष्ट दिसून येते.[१] उत्पादनाचे उद्दिष्ट म्हणजेच उपजीविकेसाठी तसेच बाजारपेठेतून नफा कमावण्यासाठी उत्पादन पद्धती नियंत्रण आणि मालकी हितसंबंध या दोन घटकांच्या आधारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शेतसारा आणि जमिनीला भाडे हे पैशाच्या स्वरूपात मिळत होते. पैसा हा भाडे स्वरूपात मिळत होता. म्हणजेच हा व्याजाचा व्यवहार होता. अशी व्यवस्था ब्रिटिश काळामध्ये उदयाला आली होती. परिणामी वसाहतवादी देशातील पारंपरिक अर्थव्यवस्था पूर्णतः कोलमडून गेली होती; आणि त्यातच त्या काळात पडलेल्या दुष्काळातून येथील सामान्य नागरिकांना सावरणे अशक्य झाले . शिवाय दुष्काळ निवारणासाठी फारशा कोणत्याही तरतूदी या ब्रिटिशकालीन व्यवस्थेकडून

करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे या दुष्काळात हजारो नागरिकांना आपल्या प्राणास मुकावे लागले.

ब्रिटिशांनी देशभर आपले अधिपत्य निर्माण केल्यानंतर येथील अर्थव्यवस्थेला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. ब्रिटिशांनी येथे जी करपद्धती लागू केली, त्या करपद्धतीमुळे भारतीय जनतेचे आर्थिक शोषण होऊ लागले होते. ब्रिटिशांच्या शोषणाचा प्राथमिक आणि प्रारंभीचा आधार शेती आणि शेतीतील करपद्धती हेच होते. एका बाजूला महालवारी पद्धत, जमीनदारी पद्धत, रयतवारी पद्धत याची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांकडून मोठा महसूल वसूल करणारी करपद्धती आकारण्याचे धोरण घेण्यात आले होते. दुसऱ्या बाजूला भारतातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेती व्यवसाय हा पूर्णतः पावसावर आधारित होता. शेतीची सर्व उत्पादन साधने ही पारंपरिक स्वरूपाची होती. निसर्गातील बदलाच्या दृष्टिकोनातून शेती हा व्यवसाय संवेदनशील असल्याने निसर्गातील बदल हा शेतीवर पर्यायाने कृषी अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम घडवून आणणारा होता.

या कालखंडामध्ये लोकसंख्येचा जन्मदर अत्यंत कमी होता. याचे कारण स्पष्ट आहे की, दुष्काळ, अन्नधान्याचा अपुरा साठा याचा परिणाम मृत्यूदर वाढण्यात आणि जन्मदर घटण्यात झालेला दिसून येतो. याचे दूरगामी परिणाम भारतीय समाजावर झाल्याचे दिसून येते. उदा. दुष्काळामुळे १८७६– ७८ मध्ये अंदाजे पाच लाख लोकांचा मृत्यू झालेला होता. आठ लाख लोकसंख्येपैकी हजारी एक याप्रमाणे कॉलरा, मलेरिया, प्लेग अशा साथरोगांमुळे लाखो लोकांना आपले जीवन गमवावे लागले.

दुष्काळ : संकल्पना, इतिहास आणि परिणाम

दुष्काळाची व्याख्या किंवा परिभाषा निश्चित करणे तसे अवघड आहे. कारण दुष्काळाची परिभाषा ठरवायची असेल, तर तिचे मानांकन, निकष निश्चित करणे गरजेचे असते. हे मानांकन, निकष त्या त्या भौगोलिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीवर अवलंबून असतात; आणि ती सर्वत्र सारखीच असतील, याची शक्यता नसते. त्यामुळे दुष्काळाच्या परिभाषेसंदर्भात बऱ्याचदा एकमत होतांना आढळत नाही.

काही विचारवंतांनी पाण्याची आणि त्यायोगे अन्नस्रोतांची अनुपलब्धता अथवा त्याची तीव्र टंचाई असलेला भाग म्हणजे दुष्काळग्रस्त भाग असे नमूद केले आहे. दुष्काळाची तीव्रता ही त्या त्या वेळेच्या आणि काळाच्या चौकटीमध्ये बसताना अनेक महिने, वर्ष अशा दीर्घ कालखंडाच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे. विशिष्ट एका परिस्थितीमध्ये किंवा कालखंडामध्ये दुष्काळ येण्यास वातावरणातील आकस्मिक बदल, वृक्षतोड, ज्वालामुखींचे उद्रेक किंवा वणवे इत्यादी कारणांनी उद्भवलेले पर्यावरणीय जलचक्रातील दोष कारणीभूत असू शकतात. दुष्काळात अन्नपाण्याच्या अभावी माणसांसह बहुसंख्य जीवांना प्राणास मुकावे लागते. अशी परिस्थिती असलेल्या भागाचे दुष्काळग्रस्त भाग म्हणून वर्णन केले जाते. दुष्काळी परिस्थितीचा शेती क्षेत्रावर खूप मोठा परिणाम होत असतो. अशा बाधित क्षेत्रातील लोकांना अन्नधान्यासह पाण्याची तीव्र टंचाईचा सामना करावा लागतो.. त्यांचे जीवन पूर्ववत होण्यासाठी अनेक महिने किंवा वर्ष जावे लागतात, त्यामुळे दुष्काळाचा कालावधी निश्चित करणे तसे कठीण आहे. तरीही त्यासंदर्भात जागतिक स्तरावरील अनेक संस्था, लेखक आणि विचारवंत यांनी विविध व्याख्या केल्या आहेत, त्या पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

दुष्काळाची व्याख्या

१) संयुक्त राष्ट्रसंघ

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवतावादी निकषानुसार, दुष्काळ म्हणजे अन्नधान्याची मोठी कमतरता. ज्या भागात आहे, जिथे अन्नधान्याअभावी मृत्यू, कुपोषण आणि उपासमार यांसारखी संकटे उद्भवतात, तो भूभाग दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने ३० टक्के कुटुंबांना क्षमताअभावी अन्नधान्याच्या टंचाईला सामोरे जावे लागते. तसेच पीक उत्पादकतेची मर्यादित क्षमता असल्यामुळे ३० टक्के पेक्षा जास्त मुले कुपोषित झाल्यामुळे, दहा हजार व्यक्तींच्या मागे दोन व्यक्तींना दर दिवशी मृत्यूला सामोरे जावे लागत असल्यामुळे त्याठिकाणी दुष्काळ जाहीर केला जातो.

२) केंब्रिज डिक्शनरी

विशिष्ट कालावधीमध्ये लोकांना अन्नधान्याची उणीव असते आणि त्यासोबतच जास्त आजारपण उद्भवते, ज्यातून मोठी लोकसंख्या प्राणास मुकते, तेव्हा त्या परिस्थितीला दुष्काळ असे म्हणतात.

३) एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका

पर्जन्याचा अभाव वा अपुऱ्या पर्जन्याची दीर्घकाळ स्थिती राहिली, तर जल समतोल बिघडतो. त्यातून पाणी टंचाई, पिकांचे नुकसान, जलप्रवाह खंडित होणे, भूजल पातळीत घट होणे, मातीतील आर्द्रता निघून जाऊन ती बंजर होणे यांसारखे विविध परिणाम उद्भवतात. बाष्पीभवन (Evaporation)आणि बाष्पोत्सर्जन (Transpiration) हे अशा स्थितीत वाढते. त्यामुळे पावसावरही परिणाम झालेला दिसून येतो. हीच परिस्थिती दुष्काळास कारणीभूत ठरते.

४) ख्रिस्तोफर बॅरेट (अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातील विकास अर्थशास्त्र शिकवणारा अन्न–तज्ज्ञ)

दुष्काळ म्हणजे अन्नाअभावी होणाऱ्या उपासमारीतून मृत्यूला सामोरी जाण्याची स्थिती. ही स्थिती अन्न उपलब्ध नसल्याने किंवा उपलब्ध असूनही ते लोकांपर्यंत न पोहोचल्याने उद्भवू शकते. त्यातून अगदी थेट उपासमार किंवा बहुधा अप्रत्यक्षरीत्या, गंभीर पोषणाशी संबंधित आजार किंवा दुखापतीसारख्या आव्हांना सामोरे जावे लागते.[२] दुष्काळाचे निकष ठरवत असताना लेखक पुढे जाऊन नमूद करतात की, दुष्काळाचे परिणाम प्रामुख्याने तीन स्तरावर होतात. टंचाईसदृश स्थिती, टंचाईची स्थिती आणि थेट दुष्काळ. या अवस्थेत अन्न असुरक्षितता निर्माण होते, त्याला दुष्काळ म्हणतात, जेव्हा सलग तीन सलग वर्षे पीक घेण्यात अपयशी ठरण्याची स्थिती असते, किंवा पीक उत्पादनाचा अभाव असतो, तेव्हा अन्नधान्याचे दरही प्रभावित होतात. अनेक लोक उपासमारीने बाधित होतात. अर्थात हे निकष व्यक्तिसापेक्ष आहेत.

५. होवे आणि देवरेक्स (२००४)

दुष्काळाची व्याख्या करताना म्हणतात की, दरवर्षी १०,००० पेक्षा अधिक लोकांच्या मृत्यूचे प्रमाण असल्यास आणि एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांहून अधिक प्रमाणात तीव्र कुपोषणाचे प्रमाण असल्यास ती परिस्थिती दुष्काळ परिस्थिती आहे, असे दर्शविते. म्हणून दुष्काळी स्थितीत मृत्यूची संख्या आणि कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे, असे निदर्शनास येते.[३]

६. संयुक्त राष्ट्राची अन्न व कृषी संघटना (२००८)

दररोज १०,००० लोकांकरिता दोन व्यक्तींपेक्षा जास्त क्रूर मृत्यूचे प्रमाण; ३० टक्केपेक्षा जास्त जागतिक तीव्र कुपोषणाचा प्रसार; आणि २० टक्क्यांहून अधिक कुटुंबीयांना अत्यंत अन्नटंचाईचा सामना करावा लागतो, त्याला 'दुष्काळ' म्हणतात.[४]

७. हेकविल आणि मोरेन (१९९१)

दुष्काळ म्हणजे असे सूचित करायचे आहे की, मृत्युदर, रोगग्रस्त स्थिती आणि पौष्टिक स्थिती या सर्वांचे परीक्षण केले जावे; परंतु तीव्र कुपोषण किंवा रोगग्रस्त स्थितीच्या व्याप्तीसाठी कोणतीही विशिष्ट सीमा ठरवू शकत नाही. दुष्काळाची परिस्थिती ठरवण्यासाठी किमान मानांकन म्हणून दररोज १०,००० मृत्यूदर सूचवतात.[५]

शेतीबाबत दुष्काळविषयक सिद्धांत

अ) अमर्त्य सेन यांचा दुष्काळविषयक सिद्धांत

अमर्त्य सेन हे जगप्रसिद्ध अर्थतज्ञ आहेत. जगामध्ये नावाजलेल्या नोबेल पारितोषिकाने त्यांना गौरविण्यात आले आहे. समकालीन जगाच्या विविध समस्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून विवेचन त्यांनी केले आहे. मानवी विकास, शासनाचा हस्तक्षेप, दुष्काळाचा प्रश्न, शेतीचा प्रश्न यांसारख्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना अमर्त्य सेन यांनी आपल्या लिखाणात अतिशय महत्त्व दिले आहे. १९४३ मध्ये पश्चिम बंगालमधील दुष्काळाबाबत त्यांनी अत्यंत सूक्ष्म मांडणी केली आहे. दुष्काळाच्या प्रश्नावर त्यांचे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे Poverty and Famines (1981) हे आहे. या

पुस्तकातून त्यांनी ब्रिटिश काळामध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळाला कशाप्रकारे ब्रिटिश प्रशासनाचे धोरणात्मक निर्णय जबाबदार होते, याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अमर्त्य सेन यांचा सिद्धांत प्रस्थापित होण्याअगोदर दुष्काळाची कारणामिमांसाही प्रामुख्याने अन्नधान्याची उपलब्धता नसल्यामुळे दुष्काळ पडल्याचे अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. अमर्त्य सेन यांनी अन्नधान्याचा पुरवठा किंवा कमतरता या सिद्धांताला आव्हान देऊन त्यांनी अन्नधान्याची उपलब्धता अस्तित्वात असतानासुद्धा त्याठिकाणी अन्नधान्याच्या हक्काचा अभाव हे खऱ्या अर्थाने दुष्काळ निर्मितीचे महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले. कोणत्याही समाजव्यवस्थेमध्ये लोकांना त्यांच्या हक्काबद्दल व जागृतीबद्दल शासनाच्या पातळीवर किंवा शासकीय धोरणाच्या पातळीवर कमतरता असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. समाजात अस्तित्वात असलेल्या वस्तू आणि सेवा या सर्वसामान्य लोकांना उपलब्ध होण्यासाठी शासकीय पातळीवर त्यांच्या हक्काची मान्यता असणे, अत्यंत आवश्यक आहे. सर्वसामान्यांना सेवा आणि वस्तू यावरील हक्क अस्तित्वात नसेल, तर त्यापासून ते वंचित राहतात. म्हणून त्यांना वस्तू आणि सेवा निवडण्याचं मुक्त स्वातंत्र्य असले पाहिजे, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. त्यांच्या अन्न–वस्त्र–निवारा या पायाभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. लोकांना वस्तू आणि सेवांचे स्वातंत्र्य लाभले पाहिजे, तरच तो समाज प्रगतीच्या दिशेने जाऊ शकतो, हे त्यांचे महत्त्वाचे प्रतिपादन आहे.[६]

अमर्त्य सेन यांच्या मतानुसार, १९४३ मधील बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळाचे मूल्यमापन करताना तत्कालीन ब्रिटिश शासनाकडून अन्नधान्याच्या पुरवठ्याअभावी दुष्काळ पडला असल्याचे स्पष्ट करण्यात आले; मात्र यातून ब्रिटिशांनी आपली जबाबदारी नाकारून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. कारण ब्रिटिशांनी मुळात येथील नागरिकांचा अन्नधान्याचा हक्क आणि त्यांची उपलब्धता करण्याचा हक्कच नाकारलेला होता. अन्नधान्याची अनुपलब्धतेअभावी दुष्काळ पडत नसतो. त्यामध्ये अनेक महत्त्वाच्या कारणांचा समावेश असतो.

अमर्त्य सेन यांनी आपल्या अभ्यासातून दाखवून दिले आहे की, १९४३ मध्ये बंगालमध्ये अन्नधान्याची उपलब्धताही अगोदरच्या काही वर्षांच्या तुलनेत अधिक होती. त्यांनी आपल्या

पुस्तकातून दाखवून दिले आहे की, १९४३ मध्ये उपलब्ध असलेले अन्नधान्य आणि त्याचा साठा हा १९४१ पेक्षा तेरा टक्क्यांनी जास्त होता. तरीसुद्धा १९४३ च्या दुष्काळात हजारो लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागले. यामागच्या कारणाचा शोध घेताना ते स्पष्ट करतात की, १९४३ मध्ये प्रचंड महागाई वाढली होती. पश्चिम बंगालमध्ये वाढत्या महागाईवर कोणत्याही प्रकारचे शासनाचे निर्बंध नव्हते. या काळामध्ये वाढलेली महागाई याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धामध्ये ब्रिटिशांनी घेतलेला सहभाग.

ब्रिटिशांनी दुसऱ्या महायुद्धामध्ये सहभाग घेतल्यामुळे अन्नधान्य व इतर महत्त्वाच्या सेवा यांच्या किंमतीमध्ये वाढ केली होती. अन्नधान्यांच्या आणि इतर महत्त्वपूर्ण सेवांच्या किमती याचा दूरगामी परिणाम शेतमजुरांवर झाल्याचे त्यांनी प्रतिपादन केले आहे. वाढत्या महागाईमुळे त्यांना मिळणारी मजुरी याच्यामध्ये अस्थिरता निर्माण झाली. म्हणून अन्नधान्याच्या किमती तीनशे टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात वाढल्याचे दिसते आणि याचा परिणाम पश्चिम बंगालच्या दुष्काळावर झाल्याचे नमूद केले आहे.[७]

१) शासकीय धोरणांना अपयश

बंगालमध्ये पडलेला दुष्काळ हा अन्नधान्याच्या अपऱ्या उपलब्धतेमुळे निर्माण झाल्याचे ब्रिटिश प्रशासनाकडून सांगण्यात येत होते. या सिद्धांताला विरोध करून खऱ्या अर्थाने ब्रिटिशांकडून धोरणात्मक पातळीवर अन्नधान्याची उपलब्धता करून देण्यात अपयश आल्याचे सेन यांनी दाखवून दिले. ब्रिटिश सरकारने वस्तू आणि सेवांच्या किमतीही वाढवल्या होत्या. वाढत असलेल्या किमतीवर शासनाने कोणत्याही प्रकारचे बंधन किंवा नियंत्रण घातलेले नव्हते . बाजारपेठेमध्ये उपलब्ध असलेले अन्नधान्य, वस्तू आणि सेवा याच्या किमती बाजारपेठेच्या नियमानुसार आणि नफ्यानुसार वाढवण्यात आलेल्या होत्या. वस्तू आणि सेवा यांच्या किमती वाढल्यामुळे दुष्काळाला सामोरे जावे लागले असे प्रतिपादन अमर्त्य सेन यांनी केले. त्यासोबतच बंगालमधील शेतमजुरांच्या मजुरीमध्ये मोठी घट झाली होती. मजुरीबाबत शासनाचे नियंत्रण नव्हते. मजुरीमध्ये घट करून मालक शेतमजुराला जास्तीत जास्त वेळ श्रम आणि कमीत कमी मोबदला देऊन राबवून घेत होते.

२) बाजारपेठेवर नियंत्रण

अन्नधान्याची उपलब्धता असून सुद्धा बाजारपेठेमध्ये ते अन्नधान्य सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यात आले नाही. बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळाचा आढावा घेत असताना अमर्त्य सेन यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की,. अन्नधान्य सर्वसामान्य लोकांना उपलब्ध करून देणे हे शासनाचे एक महत्त्वाचे काम आहे. सर्वसामान्य लोकांना अन्नधान्य उपलब्ध होत नसेल तर अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो. पश्चिम बंगालमध्ये अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत १३ टक्के अधिक अन्नधान्य उत्पादित झालेले होते. उत्पादित झालेले अन्नधान्य यावर शासनाचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण प्रस्थापित नव्हते. उत्पादित झालेले अन्नधान्य बाजारपेठेत शेतकऱ्यांकडून अल्प दरात खरेदी करून महागड्या दरात व्यापाऱ्यांकडून विकले जात होते. त्याबाबत सरकारने कसलेही नियंत्रण न ठेवण्याची भूमिका घेतल्याने धान्यांचे भाव वाढले ते नागरिकांना न परवडणारे होते. त्यामुळे अन्नधान्य अल्पदरात खरेदी करून, पुरेशा प्रमाणात पुरवण्याची व्यवस्था करणे; आणि अन्नधान्याच्या बाजारपेठेवर शासनाचे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे असते. अशा नियंत्रणाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण दुष्काळ निर्मितीमागील असल्याचे अमर्त्य सेन यांनी प्रतिपादन केले आहे.

३) सर्वसामान्यांचा हक्क

सर्वसामान्य लोकांच्या हक्काबाबत शासन शासकीय पातळीवर आणि बाजारपेठेच्या व्यवहारात बऱ्याचदा उदासीन असते. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवण्यासाठी शासनाने शासकीय धोरणाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून द्यावी लागते. सर्वसामान्य लोकांना वस्तू आणि सेवा उपलब्ध नसतील, तर अनेक संकटाला सामोरे जावे लागते. बाजारपेठा नेहमीच नफ्यासाठी स्व मालकीच्या सेवा आणि वस्तू यावर नियंत्रण ठेवतात` बाजारपेठेमध्ये मालकीच्या असलेल्या वस्तू आणि सेवा हे आपल्या मनमानी पद्धतीने वितरित करतात आणि हव्या त्या किमतीला बाजारपेठेमध्ये लोकांना उपलब्ध करून देतात, पण सर्वसामान्य जनता जी प्रामुख्याने कमी वेतनावर किंवा मजुरीवर जगत असते, त्यांना अन्नधान्य आणि सेवेसाठी बाजारपेठेवर अवलंबून राहण्याची गरज पडू नये, यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न केले गेले पाहिजे. अन्यथा ते बाजारपेठेच्या व्यवस्थेला बळी पडतात, पर्यायाने त्यांना

दुष्काळासारख्या संकटाला सामोरे जावे लागते. सर्वसामान्यांना अन्नधान्य उपलब्ध होण्यासाठी अन्नधान्याचे कोठार व योग्य वितरण व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे असते. सर्वसामान्य लोकांसाठी केवळ धान्याचे दुकान असून भागणार नाही, तर त्यासाठी त्यांना धान्याच्या किमती लोकांच्या आवाक्यात आणणेदेखील गरजेचे आहे. सर्वसामान्यांना हक्क मान्य करावा, ही अमर्त्य सेन यांची भूमिका आहे.

४) अन्नधान्याच्या उपलब्धतेची वानवा

बंगालमध्ये १९४३ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागले. बंगालमध्ये जवळपास तीन लाख लोकांना अन्नधान्य आणि पाण्याविना आपले प्राण गमवावे लागले. दुष्काळादरम्यान लोकांना तगून राहण्यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारची सकारात्मक धोरणाची आखणी केली गेली नव्हती. परिणामी, अन्नधान्यांची टंचाई निर्माण होऊन अनेक लोक दुष्काळाला बळी पडले. दुष्काळासंदर्भात ब्रिटिशांकडून करण्यात आलेल्या अभ्यासात अन्नधान्याची उपलब्धता कमी झाल्यामुळे दुष्काळ पडल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र ही दुष्काळाची कारणामिमांसा चुकीची असल्याचे सांगत अमर्त्य सेन यांनी बंगालमधील अन्नधान्याची उपलब्धता गतप्रभ करून देण्यात शासकीय धोरणांचा महत्त्वाचा भाग होता हे त्यांनी नमूद केले आहे. बंगालमधील १९४३ ला अन्नाची उपलब्धता आणि उत्पादकता ही पूर्वीपेक्षा तेरा टक्क्यांनी जास्त होती, पण सर्वसामान्य लोकांना अन्नाची उपलब्धता करून घेण्यात शासन मोठ्या पद्धतीने कमी पडले आहे. शासनपातळीवर अन्नधान्याचा हक्क लोकांना नाकारल्यामुळे दुष्काळात अनेकांना मृत्यू पत्कारावा लागल्याचे नमूद केले आहे.

५) शासनाच्या धोरणात असमान विनिमय

ब्रिटिश वसाहतवादी शासनाने नागरिकांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात भेदभाव केला आहे. त्यांचा एकमेव उद्देश लोकांचे शोषण करून जास्तीत जास्त करसंकलन करणे हा होता. १९४३ ला पडलेला दुष्काळ याला सर्वस्वी जबाबदार ब्रिटिश सरकार होते. १९३९ ते १९४५ या काळामध्ये ब्रिटिशांनी दुसऱ्या महायुद्धामध्ये सहभाग घेतला होता. यामुळे सैन्याला लागणारे शस्त्रपुरवठा, अन्नधान्य व इतर महत्त्वाच्या सेवा त्यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.. मात्र १९४३ मध्ये देशभर दुष्काळ पडलेला होता. बंगालमध्ये त्याचे प्रमाण तीव्र होते. ब्रिटनचे

तत्कालीन पंतप्रधान चर्चिल यांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे येथील दुष्काळग्रस्तांना शासनाकडून कसलीही मदत करण्यात आली नाही. चर्चिल यांनी येथील निधी युद्धामध्ये वळवला होता. त्यामुळे देशात अन्नाची टंचाई निर्माण होऊन उपासमारीने अनेकजण मृत्यूची शिकार ठरले.[८]

ब) दुष्काळविषयक माल्थसियन लोकसंख्यावाढीचा सिद्धांत

लोकसंख्यावाढ हे सुद्धा दुष्काळामागील एक महत्त्वाचे कारण आहे, अशा प्रकारचे प्रतिपादन अनेक विचारवंत आणि इतिहासकारांनी केले आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये उद्भवलेल्या दुष्काळाने तेथील हजारो लोकांचा जीव घेतला गेला. २०११ मध्ये येथील सुमारे अडीच लाख नागरिक मृत्यू पावले अशाप्रकारचा अहवाल इंग्लंडच्या शासनाकडून शाश्वत विकास आयोगाच्या नावाखाली देण्यात आलेला होता. दुष्काळ वाढण्यामागे येथील लोकसंख्यावाढ कारणीभूत आहे, याबाबतचे स्पष्टीकरण देताना अनेक तर्क देण्यात आले आहेत, ते पुढीलप्रमाणेः

थॉमस रॉबर्ट माल्थस या इंग्रज राजकीय अर्थशास्त्रज्ञाने लोकसंख्यावाढीविषयी अभ्यास केलेला आहे. लोकसंख्या ही काळानुसार वाढत जाते, असे त्यांचे म्हणणे आहे. त्या तुलनेत इथली नैसर्गिक साधन संपत्ती वाढत नाही. त्यामुळे लोकसंख्येची वाढ आणि नैसर्गिक साधनसंपत्ती यांच्यात समतोल राहात नाही. त्याचबरोबर लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात मृत्यूदर कमी होतो. त्याचा परिणाम लोकसंख्यावाढीत होऊन ती परिस्थिती दुष्काळास कारणीभूत ठरत असते, अशा प्रकारचा सिद्धांत ते मांडतात.[९]

दुष्काळ वाढल्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवत असतो आणि लोकसंख्येची वाढ ही सातत्याने होत असल्यामुळे दुष्काळाची तीव्रताही वाढत जाते; म्हणून अन्नधान्य आणि लोकसंख्या याचा परस्पर संबंध असल्याचा निष्कर्ष अनेक विचारवंत आणि लेखकांनी काढला आहे.

क) गोविंद गोपाळ टिपणीस यांचा दुष्काळविषयक सिद्धांत

गोविंद गोपाळ टिपणीस यांचे 'हिंदुस्थानातील दुष्काळ' (सन १९०५) हे पुस्तक भारताच्या दुष्काळाचे एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. गोविंद गोपाळ टिपणीस यांनी तत्कालीन भारतातील

दुष्काळामागील कारणामीमांसा केली आहे. दुष्काळाबाबत विशिष्ट चौकट मांडून त्यांनी या पुस्तकाचे लिखाण केले आहे. हे पुस्तक ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यावेळच्या भारताच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाच्या दृष्टीने वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तत्कालीन ब्रिटिश वसाहतवादी काळामध्ये दुष्काळाचा प्रश्न हा केवळ निसर्गनिर्मित संकट आहे, असे मानले गेले. या संकटावर मात करण्यासाठी मानवी क्षमता आणि मानवी हस्तक्षेप करण्याकडे दुर्लक्ष करत केवळ सामोरे जाणे हाच एकमेव पर्याय उपलब्ध असतो. मानवी क्षमता आणि मानवी हस्तक्षेप या बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. दुष्काळ निसर्गनिर्मित असला तरी दुष्काळाचा सामना करण्यासाठी शासनाचे धोरणात्मक निर्णय महत्त्वाचे ठरतात. या बाबीकडे ब्रिटीश प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. इतकेच नाही तर ब्रिटिशांचे भारतातील दुष्काळाकडे बघण्याचा दृष्टिकोन नैसर्गिक कोप किंवा संकट या मांडणीच्या पलीकडे जात नाही. ब्रिटिश प्रशासनाचे आणि अधिकाऱ्यांचे भारतीय इतिहास लेखनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा त्यांच्या हितसंबंधाच्या आधारित निर्धारित केला गेला होता. तत्कालीन परिस्थितीमध्ये भारतातील इतिहास लेखन भारतातील इतिहासकारांकडून लिहिणे अत्यंत गरजेचे होते. त्यादृष्टिकोनातून टिपणीस यांचे यासंदर्भात हे पुस्तक महत्त्वाचे आहे. भारतातील दुष्काळाचे आणि बहुजन समाजातील दारिद्र्याचे परस्पर संबंध कशा प्रकारचे आहे हे सांगण्याचाही प्रयत्न या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. गोविंद गोपाळ टिपणीस यांनी भारतातील दुष्काळाचे प्रामुख्याने अकरा कारणे सांगीतली आहेत, त्याबाबतचा सविस्तर आढावा त्यांनी आपल्या पुस्तकात घेतला आहे.

१) नैसर्गिक पर्जन्यमान असमानता

भारतातील शेती क्षेत्रासाठी आवश्यक असणारे नैसर्गिक पर्जन्यमान कधी कमी तर कधी जास्त असते. त्यामुळे त्याचा परिणाम शेतीवर होत असतो. नैसर्गिक पर्जन्यमान कमी अधिक असल्यामुळे शेतीमध्ये येणारे पीक कायमस्वरूपी नसते. त्यामुळे शेतीचे खूप नुकसान झाल्याचे गोविंद गोपाळ टिपणीस यांनी आपल्या पुस्तकामधून सांगितले आहे. टिपणीस यांनी दुष्काळ पडण्यासाठी कमी पर्जन्यमान हेसुद्धा एक महत्त्वाचे घटक असल्याचे नमूद केले आहे. कमी पाऊस पडल्यामुळे पिके सुकून जातात. ज्यामुळे अन्नधान्याअभावी दुष्काळाच्या आणि

उपासमारीच्या परिस्थितीला लोकांना सामोरे जावे लागते.[१०] टिपणीस यांनी भारताच्या पर्जन्यमानाचा अचूक वेध घेऊन दुष्काळी परिस्थितीमागे पर्जन्यमानातील असमानता हे एक महत्त्वाचे कारण असल्याबाबतचे विवेचन केले आहे.

२) टोळ धाड किंवा पाखरांची धाड

गोपाळ गोविंद टिपणीस यांनी दुष्काळाचा वेध घेताना विविध कारणांचा समावेश केला आहे. शेतकरी अन्नधान्य पिकवण्यासाठी शेतीमध्ये मेहनत आणि काबाडकष्ट करतो. पीक लागवडीपासून ते काढणीपर्यंतच्या कामात त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यापैकी एक अडचण म्हणजे विविध पक्षी आणि प्राण्यांपासून पिकाला होत असलेला धोका. पीक हाताशी आले असताना पिकाचे नुकसान करण्याचे काम त्यांच्या माध्यमातून केली जाते. म्हणून गोपाळ गोविंद टिपणीसांनी आपल्या पुस्तकामध्ये विविध टोळधाड किंवा पाखरांची धाड हे दुष्काळाचे एक प्रमुख कारण मानले आहे. पक्ष्यांमुळे उभ्या पिकाची नासाडी होऊन अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो. यातूनच दुष्काळ निर्माण होत असल्याचे प्रतिपादन लेखकाने केले आहे.[११] १९०३–०४ मध्ये मुंबई इलाख्यात मोठ्या प्रमाणात पिकांवर टोळधाडीचे हल्ले झाले होते. त्यातून पिकांचे अतोनात नुकसान होत होते. या टोळ्याधाडीच्या प्रतिबंधासाठी त्या काळात अडीच लाख रुपये खर्च करावे लागले असल्याचा उल्लेख टिपणीस यांनी पुस्तकात केला आहे.

३) शेतीची उत्पादकता आणि नैसर्गिक साधन संपत्ती

कोणती शेती पिकासाठी योग्य आहे, हे समजणेसुद्धा अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या देशाची उपजीविका ही लोह, सोने, तांबे यांसारख्या खनिज धातूंवर वा कोळसा, रॉकेल इ. द्रव्यांवर किंवा समुद्रातील मोती, पोवळे अशा वस्तू, हस्तकौशल्यांवर किंवा यांत्रिक सामुग्रीतील व्यापारावर अवलंबून नसते. किंबहुना ती त्या देशातील शेतीच्या कच्च्या मालावरच अवलंबून असते, तेथे दुष्काळ पडण्याचा संभव असतो. याद्वारे येणारे दारिद्र्य हे भौतिक दारिद्र्य असते, असे लेखकाचे मत आहे. तेथील मोठ्या लोकसंख्येला शेतीतील उत्पादन पुरेसे होत नाही, पर्यायाने त्या देशातील लोकांना आपल्या उपजीविकेसाठी बाहेरच्या देशातून अन्नधान्य

आयात करावे लागते. हे धान्य पुरेशा प्रमाणात मिळतेच, याची शाश्वती नसल्याने दुष्काळ पडत असतो, अशा प्रकारचे मत लेखकाने व्यक्त केले आहे.

४) शेती कसण्याच्या साधनाची टंचाई

अयोग्य लागवड पद्धती आणि अशास्त्रीय शेतीची साधने हेसुद्धा दुष्काळ पडण्यास कारणीभूत घटक आहेत. शेती करण्यासाठी जी पारंपरिक उत्पादनाची साधने आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने औत, नांगर यासारख्या साधनांचा समावेश होतो, ती जर उपलब्ध नसतील तर त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो. किंबहुना शेती करण्यासाठी अशा साधनांची उपलब्धता नसल्यामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होते. शेती उत्पादनाच्या कृत्रिम टंचाईचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो. शेतीचे उत्पादन कमी प्रमाणात असल्यामुळे पुरेशा प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता समाजात होत नाही. परिणामी, अन्नधान्य मुबलक प्रमाणात किंवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. याचा दूरगामी परिणाम पुन्हा शेतीच्या उत्पादनावर होतो. म्हणून शेती कसण्यासाठी जी साधने आहेत, ती उपलब्ध करून देणे, हेसुद्धा दुष्काळ निर्मूलनावर एक महत्त्वाचे उपाय असल्याचे नमूद केलेले आहे.

५) शेतकऱ्यांचे अज्ञान

शेती उत्पादन करीत असताना शेती उत्पादनाबाबत शेतकरी साक्षर आहे का? शेतीच्या व्यवसायाबद्दल खऱ्या अर्थाने तो सजग व सक्षम आहे का? कोणते पीक कोणत्या मोसमात घ्यावे याबद्दलची पुरेशी माहिती त्या शेतकऱ्याला आहे का? हे शेती उत्पादनाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे ठरते. याबाबत शेतकऱ्याचे अज्ञान हे दुष्काळ निर्मितीमागचे कारण ठरते. शेतीमध्ये घेत असलेले पीक, हवामानाचा अंदाज, शेतीची उत्पादकता, उपलब्ध असलेले भांडवल याचे परस्पर संबंध खूप महत्त्वाचे असतात. म्हणून शेतकऱ्यांना या सर्व बाबी माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. या बाबी शेतकऱ्यांना माहीत नसतील तर दुष्काळासारख्या मोठ्या संकटाला सामोरे जावे लागते.

६) सरकारचे महसुलीसंदर्भातील नियम

शेतीची चांगली उत्पादकता असेल, शेतकऱ्यांना अन्नधान्याबद्दल आणि हवामानाबद्दल पुरेशी माहिती असेल, एकूणच शेतीची उत्पादकता अनुकूल असेल तर शेतकऱ्यांनाही चांगला फायदा होतो; पण शेतकऱ्यांना या सर्व बाबी जर अनुकूल असतील आणि सरकारचे महसुली संदर्भातील नियम अत्यंत जाचक व अन्यायकारक असतील तर दुष्काळ निर्माण होण्यास हा घटक प्रभावी ठरतो. शेतकरी आपल्या शेतामध्ये रात्रंदिवस मेहनत करतो. समाजासाठी अन्न पिकवतो व समाजाची गरज भागवत असतो. रात्रंदिवस मेहनत करून शेतमालाचे भरघोस उत्पादन होत असेल, आणि तरीही त्या जमिनीवरील पिकापोटी शासनाकडून जास्त महसूल आकारला जात असेल, तर शेतकरी हा तोट्यामध्ये जातो किंवा त्याचा नफा कमी होतो. म्हणून सरकारच्या महसुलीसंदर्भातील नियम हे सुद्धा एक महत्त्वाचे कारण आहे.

शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता लागते. त्याची तजवीज करून शेतीत उत्पादित होणारे अन्नधान्य बाजारपेठेमध्ये विकून तो आपली उपजीविका भागवत असतो. बाजारपेठेमध्ये विकून मिळणारा जो पैसा आहे, तो पैसा जर चांगल्या प्रतीमध्ये शेतीमध्ये गुंतवायचा असेल, तर त्याला पैशाची बचत केली पाहिजे. शेतकऱ्यांना स्वतःचे भांडवल उभे करता आले पाहिजे. शेतीतून उत्पादित होणाऱ्या शेतमालाच्या विक्रीतून मिळणारा सर्व पैसा हा महसूल भरण्यासाठी जात असेल, तर त्यातून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. संकटाच्या काळामध्ये त्याच्याकडे भांडवलाची कमतरता असल्यामुळे तो शेतीचे किंवा स्वतःचे अस्तित्व टिकवण्यात अपयशी होतो आणि म्हणून दुष्काळ निर्मिती होते, अशा प्रकारचे मत लेखकाने प्रतिपादन केले आहे.

७) प्रांतामधील समन्वय आणि सहकार्य

देशामध्ये दुष्काळाची स्थिती निर्माण झाली असेल, तर एका राज्यांनी दुसऱ्या राज्याला सहकार्य केले पाहिजे. वेळप्रसंगी आपल्या प्रांतातील जनतेपुरते ठेवून अतिरिक्त अन्नधान्य व इतर सुविधा शेजारच्या प्रांतातील जनतेसाठी उपलब्ध करून दिले पाहिजे. असे झाले तरच, देशपातळीवरील दुष्काळाची स्थिती दूर करता येऊ शकते, अन्यथा ते अशक्य असते. वातावरण हे सर्वत्र एकाच वेळी शेती अनुकूल राहिल असे नाही. ज्या प्रांतात अनुकूल हवामान

आहे, त्या प्रांतातील शेतमालाचे उत्पादन चांगल्या प्रकारे होते, तर ज्या प्रांतात प्रतिकूल हवामान असेल, तेथील शेती धोक्यात आलेली असते. प्रांताप्रातांत परस्पर समन्वय आणि सहकार्य राहिले, तर दुष्काळी स्थितीचा समर्थपणे सामना करता येऊ शकेल.

८) अमर्यादित अन्नधान्याच्या निर्यातीवर बंदी

अन्नधान्याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना त्यांची अन्नधान्याची गरज भागवण्याची क्षमता पुरेशी होते. शेतीमध्ये उत्पादित होणारे अन्नधान्य ही केवळ निर्यातीसाठी वापरले जात असेल तर त्या राज्यांमध्ये भीषण दुष्काळ पडण्याचा संभव असतो. त्या त्या राज्यात पिकणारे अन्नधान्य हे त्या राज्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले गेले, तर दुष्काळाची तीव्रता कमी करण्यास मदत होते. ते राज्य स्वयंपूर्णरीत्या विकसित होण्यामागे अन्नधान्याची साठवण व्यवस्था असणे ही सुद्धा महत्त्वाची मदत होते. उत्पादित अन्नधान्यांची सुरक्षित साठवण हे एक महत्त्वाचे आव्हान अनेक राज्यांसमोर होते. त्यामुळे उत्पादित होणारा माल लगेच निर्यात केला, तर अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन दुष्काळाची स्थिती अनेक राज्यांमध्ये उद्भवली असल्याचे इतिहासातून दिसून येते. साहजिकच अन्नधान्याची साठवण करण्याची अक्षमता ही बाब दुष्काळी स्थिती निर्माण होण्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. म्हणून अन्नधान्यांची साठवण क्षमता वाढवून संपूर्ण अन्नधान्याच्या निर्यातीवर बंदी घालणे हे दुष्काळ निवारणातील एक महत्त्वाची उपाययोजना आहे.

९) परदेश गमन आणि व्यापारी प्रगती

शेती क्षेत्रातील रोजगारधारण क्षमता मर्यादित आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थितीनुसार शेतीतील अवलंबित्व कमी करणे गरजेचे असते. त्याचाच एक पर्याय म्हणजे व्यापार आणि परदेशगमन. बाहेरील देशात जाऊन उद्योग व्यवसाय केल्यास शेतीवरील भार कमी होऊ शकेल. त्यासाठी लोकांतील कौशल्यगुणांचा विकास करणे गरजेचे असते. अन्यथा शेतीक्षेत्रावर मर्यादेपेक्षा अधिक मनुष्यबळाचा भार पडला, तर उत्पादन खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण होऊन, शेतीवर अतिरिक्त मनुष्यबळाचा भार पडतो. यावर इतर देशात जाऊन व्यवसाय करण्याची कुशलता आणि कौशल्य नसेल, तर दुष्काळ पडू शकतो. लेखकाच्या मतानुसार, कोणत्याही देशाच्या लोकसंख्येपैकी मर्यादित लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असेल आणि

बहुसंख्य लोकसंख्या जर विविध व्यवसाय आणि उद्योगांमध्ये सक्रिय असेल, तर दुष्काळ निवारण करता येते.

१०) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली असेल, तर दुष्काळावर तो मात करू शकतो. त्यामुळे दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली असणे हे खूप गरजेचे आहे. शेतकरी हा नेहमी दारिद्र्यामध्ये जगत असेल, तर दुष्काळ निर्मूलन होण्यास खूप मोठी अडचण येते. शेतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी भांडवल असणे गरजेचे आहे. भांडवल गुंतविण्यासाठी त्याची आर्थिक परिस्थिती चांगली असणे आवश्यक आहे. म्हणून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत असेल, तर कोणत्याही संकटाला तो सामोरे जाऊ शकतो. म्हणून लेखकाच्या मतानुसार शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर सुद्धा दुष्काळावर मात करण्याची क्षमता अवलंबून असते.

११) बहुजनांचे दारिद्र्य

ज्या देशांमध्ये बहुसंख्यांक जनता उपाशीपोटी राहते, जी शिक्षणापासून वंचित राहते, त्या देशातील जनसमुदाय दुष्काळी स्थितीत तग धरण्याची कमी शक्यता असते. सर्वसामान्यपणे कोणत्याही समाजात अभिजन आणि बहुजन हे दोन वर्ग अस्तित्वात असतात. यातील भेद नष्ट करायचे असेल तर त्यासाठी दारिद्र्य कायमस्वरूपी नष्ट झाले पाहिजे. बहुजन समाजामध्ये केवळ आर्थिक दारिद्र्य नसते, तर सांस्कृतिक आणि सामाजिक दारिद्र्यसुद्धा असते. अशा दारिद्र्यामुळे दुष्काळ निर्मितीला चालना मिळते.[१२]

ब्रिटिशकालीन भारतातील दुष्काळ : ऐतिहासिक आढावा

जगभरात अनेक मोठे दुष्काळ पडण्याचा इतिहास आहे. अशा दुष्काळामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. मानवीय विकासासमोरील अडथळ्यामध्ये दुष्काळ हा एक महत्त्वाचा घटक असल्याचे इतिहास सांगतो. सर्वसाधारणपणे दुष्काळाच्या विभागणीच्या चार कालखंडामध्ये आपण इतिहास पाहू शकतो. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, आधुनिक काळ आणि समकालीन काळामध्ये दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. मानवी विकासाच्या अनेक

टप्प्यांत दुष्काळ निवारणांचे प्रयत्न झालेत; मात्र ते पुरेसे ठरले नाहीत. विशेषतः मध्ययुगीन काळामध्ये जो दुष्काळ जगभरात, भारतीय उपखंडामध्ये पडला होता, त्याचे पुरेशा प्रमाणात निवारण करण्यासाठी मानवी समूह आणि शासनकर्ता वर्ग अपयशी ठरल्याचे दिसते. भारताच्या इतिहासामध्ये विशेषतः ब्रिटिश राजवटीच्या अस्तित्वानंतर कोणत्या भागामध्ये किती प्रकारचा दुष्काळ पडला आणि त्यातून एकूण मानवी हानी किती झाली? याचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे.

भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर शोषण हेच त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. ब्रिटिश राजवटीत असे धोरणे राबविली की ज्यातून सर्वसामान्यांवर अन्याय अत्याचार होत होते. ब्रिटिशांची जाचक कर पद्धती, जमिनीचे असमान वाटप, नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट, अन्यायकारक पद्धती, महालवारी, रयतवारी आणि जमीनदारी पद्धती यांच्या माध्यमातून भारतीय जनतेवर मोठा अन्याय आणि अत्याचार केला. शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यांसारख्या पायाभूत सुविधांसाठी ब्रिटिशांनी पुरेसे लक्ष दिले नाही. दुष्काळ ही सुद्धा एक नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहिले गेली. मानवी कल्याणाच्या दृष्टिकोनातून दुष्काळ निवारण करण्याची भूमिका ब्रिटिशांनी नाकारली आहे. त्यामुळे ब्रिटिशकालीन दुष्काळात सुमारे साठ लाख लोकांना आपले जीव गमवावे लागले. म्हणून ब्रिटिश काळामध्ये कशा प्रकारचा दुष्काळ पडला होता, याचा ऐतिहासिक आढावा घेणे अत्यंत गरजेचे आहे.[१३]

१) सन १७७० –७३ मधील बंगालचा दुष्काळ

ब्रिटिश राजवट भारतामध्ये स्थिर झाल्यानंतर बंगाल प्रांतांमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. या प्रांतात प्रामुख्याने जमीनदारी पद्धत अस्तित्वात असल्यामुळे शेतकरी आणि शेतमजूर जमीनदाराकडून शेती भाड्याने घेऊन शेती करत असत. बंगालमध्ये कोणत्याही प्रकारच्या सिंचनाची सुविधा अस्तित्वात नव्हती. अन्नधान्याची साठवणूक करण्याची क्षमता त्या काळामध्ये प्रचलित समाज व्यवस्थेमध्ये अस्तित्वात नव्हती. बंगाल हा भाग प्रामुख्याने बिहार, केंद्रीय बंगाल, उत्तर बंगाल या भागांमध्ये विखुरलेला होता. आणि या भागात सर्वाधिक प्रमाणात तीव्र दुष्काळ होता. हा दुष्काळ प्रामुख्याने नैसर्गिक साधन संपत्तीचे असमान वाटप, वाढत असलेली कर पद्धती, यांसारख्या अनेक कारणांमुळे पडला होता. भारतामध्ये विशेषतः बंगालमध्ये १७६९

अनेक नैसर्गिक संकटे निर्माण झाली होती. १७७३ च्या दुष्काळामध्ये जवळपास दहा लाख लोकांचा मृत्यू झालेला होता. बंगालमधल्या एकूण लोकसंख्येच्या एक तृतीयांश लोकसंख्या ही दुष्काळात मृत्युमुखी पडली होती.[१४]

२) सन १७८२–८४ चा चाळीसा दुष्काळ

बंगालनंतरचा हा दुसरा एक महत्त्वाचा दुष्काळ होता तो म्हणजे चाळीसा दुष्काळ (१७८२–८४) या नावाने ओळखला जातो. या दुष्काळामुळे दिल्ली, पश्चिम अवध, पूर्व पंजाब प्रदेश, राजपुताना आणि काश्मीर या भागातील जवळपास ११ दशलक्ष लोकांचा मृत्यू झालेला होता. पाऊस न पडल्यामुळे लागवड केलेली अनेक अन्नधान्याची पिके शेतकऱ्यांच्या हातून गेली होती. शिवाय त्या काळात तिथे अन्नधान्याची साठवण करण्यासाठी कोणत्याही प्रकारची यंत्रणा व संरचना अस्तित्वात नव्हती. त्यामुळे त्याअगोदरच्या वर्षातही उत्पादित झालेले अन्नधान्य सुरक्षित राहिले नव्हते. परिणामी, त्या भागात पडलेल्या दुष्काळामुळे अनेकांना प्राणास मुकावे लागले. दुष्काळामध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांमध्ये शेतमजुरांची संख्या ही सर्वाधिक होती..[१५]

३) डोजी बारा दुष्काळ किंवा १७८८–९४ चा कवटीचा दुष्काळ

या दुष्काळाची तीव्रता दक्षिण मराठा राज्य डेक्कन गुजरात आणि मारवाडी या क्षेत्रापर्यंत व्यापक होती. पाऊस नियमित न पडल्यामुळे याचा दूरगामी परिणाम शेतीच्या अर्थव्यवस्थेवर पडला. दुष्काळाच्या काळात शेतकरी हवालदिल झाला होता. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची सहाय्यता शासकीय स्तरावर मिळाली नव्हती. उलट शेतकऱ्यांचे दुष्काळाच्या काळात सुद्धा दुहेरी शोषण होत होते. एका बाजूला ब्रिटिशांनी लावलेली अवास्तव कर पद्धती आणि दुसऱ्या बाजूला जमीनदाराकडून अन्याय, अत्याचार होत होते. त्यात दुष्काळ आल्यामुळे शेतमजूर, शेतकरी अन्नधान्य आणि पाण्याविना तडफडून मृत्यू पावले.[१६]

४) सन १८३७–३८ चा आग्रा दुष्काळ

हा दुष्काळसुद्धा मान्सूनची अनियमितता यामुळे पडला होता. सलग तीन वर्ष या प्रदेशांमध्ये पावसाने हजेरी लावली नव्हती. पाऊस नियमित नसल्यामुळे शेतीमध्ये कोणत्याही प्रकारचे पीक घेणे अशक्य झाले होते. स्थानिक पातळीवर तीव्र पाणी टंचाई आणि अन्नधान्याचा तुटवडा

या दोन मोठ्या संकटांचा सामना करावा लागला. तीव्र दुष्काळाच्या स्थितीत स्थानिक व्यापाऱ्यांनी अन्नधान्यावर कब्जा मिळवून महागड्या दराने ते अन्नधान्य विकत होते. महाग अन्नधान्य विकत घेण्यासाठी मोठ्या व्याजदरावर कर्जे देऊन शेतकऱ्यांकडील जमिनींसह विविध शेतीउपयोगी साहित्य गहाण ठेवून, त्यांची पिळवणूक करत होते. या भागातील दुष्काळाची व्याप्ती ही प्रामुख्याने मध्य-दोब आणि उत्तर-पश्चिम प्रांतातील ट्रान्स-जुम्ना जिल्हे या क्षेत्रात व्यापक होती. या दुष्काळामध्ये जवळपास आठ लाख नागरिकांनी आपले प्राण गमावले.[१७]

५) सन १८६०-६१ चा अप्पर दोआब दुष्काळ

ब्रिटिश वसाहतवादी काळात हा एक महत्त्वाचा दुष्काळ होता. या दुष्काळामध्ये मोठी वित्तीय हानी झाली. सलग पाच वर्षांपासून पाऊस न पडल्यामुळे शेतीचे खूप नुकसान झाले. हजारो लोक अन्नधान्याविना तडफडून मृत्यूमुखी पडले होते. दोआबच्या दुष्काळाची व्याप्तीही भारताच्या उत्तर-पश्चिम प्रांतातील गंगा-यमुना दोआब, रोहिलखंड आणि अवध, पंजाबमधील दिल्ली आणि हिसार विभाग यापर्यंत होती. या दुष्काळाने जवळपास दोन लाख लोकांचा जीव घेतला होता. हा सर्व भाग ब्रिटिश साम्राज्यवादाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत होता.[१८]

६) सन १८६६ चा ओरिसाचा दुष्काळ

ओरिसा आणि बिहारमध्ये १८६६ पूर्वी तीन वर्षापूर्वीपासून पाऊस पडलेला नव्हता. परिणामी तिथे शेतीच्या सिंचनाबरोबरच पिण्यासाठी पाणी उपलब्ध नव्हते. परिणामी दरम्यानच्या काळात बाजारपेठेत अन्नधान्यांची तीव्र टंचाई भासू लागली. यातून नागरिकांना सावरण्यासाठी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडून कोणतेही सहकार्य मिळाले नाही. त्यातच कॉलरा, मलेरिया यांसारख्या रोगाची साथ आली. या दोन्ही संकटात जवळपास चार ते पाच दशलक्ष लोकसंख्या मृत्युमुखी पडली. १८६६ मध्ये ओरिसामधील ८,१४,४६९, बिहारमधील १,३५,६७६ लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागले. येथे जवळपास तीन वर्षे दुष्काळाची स्थिती कायम होती. या दुष्काळात सुमारे चार ते पाच दशलक्ष लोक मृत्यूमुखी पडले. या दुष्काळाचा परिणाम हा दोन्ही राज्यांतील सुमारे ३३% लोकसंख्येवर झाला. तीन वर्षांमध्ये एक दशलक्ष लोकसंख्या कमी होण्यात त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येते.[१९]

७) सन १८६९ चा राजस्थान दुष्काळ

हा दुष्काळ राजपुताना दुष्काळ म्हणून सुद्धा ओळखला जातो. सोबतच या दुष्काळाला विशेषतः महान राजपुताचा दुष्काळ किंवा बुंदेलखंड दुष्काळ म्हणून सुद्धा ओळखले जाते. हा दुष्काळ प्रामुख्याने पावसाची अनियमितता आणि अन्नधान्याचा तुटवडा यामुळे पडल्याचे दिसून येते. याचा परिणाम बुंदेलखंडातील २,९६,००० किलोमीटर क्षेत्रावर होऊन १.५२ कोटी आसपास लोकांना आपले जीवन गमवावे लागले.

या दुष्काळाचा परिणाम म्हणून प्राथमिक पातळीवर ४,४५,००,००० लोकांवरती परिणाम झाला होता. राजपुताना दुष्काळाची व्याप्ती खूप मोठी होती. विशेषतः हा दुष्काळ बुंदेलखंडाबरोबरच राजपुताना राज्यांत, अजमेरचा ब्रिटीश प्रदेश, गुजरात, उत्तर डेक्कन जिल्हे, मध्य प्रांतांचा जुब्बलपूर विभाग, बेरार, संयुक्त प्रांतांचा आग्रा, बुंदेलखंड विभाग आणि पंजाबचा हिसार विभागात तीव्रतेने जाणवत होता.[२०]

८) सन १८७३–७४ चा बिहारचा दुष्काळ

हा दुष्काळ बिहार आणि पश्चिम बंगालच्या परिसरावर पडलेला होता. या दुष्काळाचा परिणाम जवळपास २१.५ दशलक्ष लोकसंख्येवर झालेला होता. या दुष्काळाची तीव्रता बिहारचे शेजारील प्रांत, उत्तर–पश्चिम प्रांत आणि अवध या भागावर सुद्धा झाला होता. दुष्काळाची तीव्रता प्रामुख्याने १४०,००० चौरस किलोमीटर (५४,००० चौरस मैल) इतकी होती.[२१]

९) सन १८७६–७८ चा दक्षिण भारत दुष्काळ

या दुष्काळाला सर्वांत मोठा दुष्काळ या नावाने सुद्धा ओळखले जाते. हा दुष्काळ मद्रास प्रांत, मुंबई प्रांत, मैसूर प्रांत इथपर्यंत पसरला होता. विशेषतः या दुष्काळामध्ये सुमारे २ दशलक्ष लोक प्रतिवर्ष आपल्या प्राणास मुकले. या दुष्काळाची तीव्रता ६७०,००० स्क्वेअर किलोमीटरपर्यंत या दुष्काळाची व्याप्ती वाढली होती. एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ५८,५००,००० इतकी लोकसंख्या दुष्काळबाधीत होती. या दुष्काळात मद्रास प्रांतामध्ये अन्नधान्य आणि तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागले.[२२]

१०) सन १८९६–१८९७ चा भारतीय दुष्काळ

हा दुष्काळ सुरुवातीला बुंदेलखंड या भागात झालेला होता. भारतातील बुंदेलखंडासोबतच, संयुक्त प्रांत, मध्य प्रांत, बॉम्बे प्रेसिडेन्सी, मद्रास प्रेसिडेन्सी या भागात या दुष्काळाची व्याप्ती वाढली होती. नंतर पंजाबमधील हिसार जिल्ह्यापर्यंत, पुढे राजपूताना, हैदराबाद अशा अनेक भागांमध्ये हा दुष्काळ विस्तारला होता. म्हणून या दुष्काळाला भारतातला सर्वांत मोठा दुष्काळ या नावानेसुद्धा ओळखले जाते. हा दुष्काळ दोन वर्षांपेक्षा अधिक काळ होता या दुष्काळाने सुमारे ३०७,००० चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापले होते. त्यामुळे येथील सुमारे ६९.५ दशलक्ष लोकांना या दुष्काळाचा फटका बसला होता. म्हणून हा दुष्काळ एका अर्थाने सर्वाधिक मोठा दुष्काळ मानला जातो. या दुष्काळामध्ये जवळपास एक दशलक्ष लोक मृत्यू पावले.[२३]

११) सन १८९९–१९०० चा भारतीय दुष्काळ

भारताच्या दुष्काळातील एक भीषण दुष्काळ म्हणून १८९९–१९०० मधील दुष्काळाचा उल्लेख अनेक इतिहासकार करतात. या दुष्काळाची व्याप्ती ही मद्रास, बॉम्बे, डेक्कन, बंगाल, संयुक्त प्रांत, मध्य प्रांत या भागापर्यंत होती. या दुष्काळामध्ये जवळपास पाच दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले होते. या काळात पावसाच्या अनियमितपणामुळे कृषी उत्पादन बुडीत निघाले. परिणामी देशभर दुष्काळाची स्थिती निर्माण झालेली होती. एकूण भूभागाच्या ४,७६,००० चौरस किलोमीटर इतकी त्याची व्याप्ती होती. ५९.५ लाख लोकांना या दुष्काळाच्या झळा बसलेल्या होत्या. अनियमित पाऊसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले होते. अन्नधान्याची व पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत होती.[२४]

१२) सन १९४३ मधील बंगालचा दुष्काळ

बंगाल प्रांतातील सर्वाधिक मोठा दुष्काळ म्हणून १९४३ मधील दुष्काळ ओळखला जातो. ब्रिटिशांच्या कारकिर्दीतील बंगालमधील शेवटचा दुष्काळ हाच आहे. या दुष्काळामुळे बंगालमधील जवळपास तीन दशलक्षाहून अधिक लोक बळी पडल्याची नोंद आहे. ब्रिटिश सरकारची याबाबतची अनास्था या दुष्काळास कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. कारण या काळात नागरिकांसाठी अन्नधान्याची उपलब्धता करून देण्याऐवजी ब्रिटिश सरकारने अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंची आयात थांबवण्याचे धोरण हाती घेतले. त्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन दुष्काळाची स्थिती निर्माण झाल्याचा आरोप अनेक अभ्यासक करतात.

याच दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू होते. दुसऱ्या महायुद्धासाठी लागणारे सैन्य, सेवा, नागरी सेवा वसाहतवादी देशातून पाठवण्याचे धोरण ब्रिटिश शासनाने घेतले होते.

ब्रिटिशांचे तत्कालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी भारतामध्ये तांदूळ आणि गहू यांची आयात थांबवली असे अनेक अभ्यासक नमूद करतात. दुष्काळाच्या संदर्भातील मांडणी करतांना अमर्त्य सेन यांनी बंगालमध्ये दुष्काळाची स्थिती उद्भवण्यामागे बाजारपेठेतील सर्वसामान्य लोकांचा अन्नधान्यावरील हक्क, अन्नधान्य उपलब्ध करून घेण्याचा हक्क, अन्नधान्य वितरणाच्या संस्थात्मक रचनेचा अभाव यासारखी विविध कारणे कारणीभूत असल्याचे सांगितले आहे. बंगालच्या या दुष्काळामध्ये अन्नटंचाई निर्माण होऊन सुमारे ३५ लाख लोकांचा उपासमारीमुळे मृत्यू झाला, तरी त्यावर्षी ब्रिटिश शासनाकडून ३ लाख टन अन्नधान्याची निर्यात केली गेली. त्याचा म्हणून २.५ दशलक्ष लोक दुष्काळबाधित झाले.[२५]

भारताच्या इतिहासातील हा कालखंड 'काळा इतिहास' या नावाने ओळखला जातो. तत्कालीन ब्रिटिश शासनाकडून कोणत्याही प्रकारची शासकीय स्तरावर दुष्काळ निवारणाची जबाबदारी घेण्यात आली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागामध्ये हजारो लोक अन्नपाण्याविना तडफडून मृत्यू पावले हा इतिहास आहे. पावसाची अनियमितता हे जरी दुष्काळाचे तत्कालीन कारण असले, तरी त्याबाबतची जबाबदारी ब्रिटिश सरकारने झटकली होती. दुष्काळ हटवण्याऐवजी दुष्काळ हा निसर्गाच्या अनियमिततेचा परिणाम आहे, असे सांगून ते आपल्या कर्तव्यापासून दूर राहिले.

पश्चिम बंगालमधील भीषण दुष्काळामध्ये हजारो शेतकरी आणि शेतमजूर मृत्यूमुखी पडत होते. त्याच दरम्यान दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी इंग्लडमधून अन्नधान्य आयात करण्यावर प्रतिबंध घालण्याचा निर्णय घेतला. भारताला निर्यात होणारे अन्नधान्य हे दुसऱ्या महायुद्धासाठी वापरण्याचे आदेश त्यांनीच दिल्यामुळे भारतातील हजारो लोकांना आपले प्राण गमवावे लागले. ब्रिटिश सरकारच्या या धोरणाविरोधात भारतामध्ये शेतकऱ्यांचे आणि शेतमजुरांचे उठावसुद्धा झाले होते.

१३) शाहू महाराजकालीन कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ

महाराजांनी कोल्हापूर राज्यकारभाराचा पदभार स्वीकारला, त्याच काळादरम्यान संस्थानातील प्रजा तीव्र दुष्काळाच्या खाईत होरपळत होती. १८९४-९५, १८९६-९७ आणि १८९९-१९०० ही तीन वर्षे प्रामुख्याने दुष्काळी राहिली. त्यापुढील काळातही (१९१८-१९) दुष्काळाचे सावट होते. त्यामुळे येथील शेती उत्पादनावर विशेषतः अन्न धान्य उत्पादनात प्रचंड घट झाली होती. शेती व्यवसाय हा संस्थानाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असल्याने अर्थव्यवस्थाही डबघाईला आली होती. बहुसंख्य नागरिकांची उपजीविका शेतीवर असल्याने शेती क्षेत्राची उत्पादकता वाढणे आवश्यक होते. मात्र दुष्काळी स्थितीमुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून असलेल्यांचा रोजगार आणि अन्नसुरक्षा धोक्यात येऊन त्यांना उपासमारीला सामोरे जावे लागत होते. त्याहून वाईट स्थिती शेतकऱ्यांकडील पशुधन आणि वन्यजीवांची होती. दुष्काळामुळे पाणी टंचाईसह चारा टंचाई असल्याने शेतकऱ्यांना पशुधन बाजारात विकणे अपरिहार्य झाले होते. तर अनेकांना सावकारांकडून मोठ्या व्याजदरावर कर्ज घेऊन बाजारातील व्यापाऱ्यांनी मनमानी करून महाग केलेले अन्नधान्य विकत घ्यावे लागत होते. अशी गंभीर स्थिती असण्याच्या काळात संस्थानाची सूत्रे शाहू महाराजांकडे आली.

तत्कालीन परिस्थितीत संस्थानावर अप्रत्यक्ष सत्ता ब्रिटिशांची होती. छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांच्या कारकिर्दीमध्ये ब्रिटीश राज्यकर्त्यांशी झालेल्या करारामुळे कोल्हापूरची स्वायतत्ता नष्ट झालेली होती. ब्रिटिशांच्या राजकीय प्रतिनिधी अर्थात पॉलिटिकल एजंटाच्या माध्यमातून संस्थानाची सर्व राजकीय आणि सैनिकी धोरणे ठरवून ती अंमलात आणली जात होती. संस्थानावर अप्रत्यक्ष सत्ता ही ब्रिटिशांची असल्यामुळे विविध आर्थिक निर्णय प्रक्रियेमध्ये ब्रिटिशांचे वर्चस्व होते. त्यामुळे संस्थान जरी लोकहितकारी असलेल्या छत्रपतींचे असले, तरी कोणतेही निर्णय ते ब्रिटिशांच्या संमतीशिवाय ते घेऊ शकत नव्हते. अशा परिस्थितीत महाराजांनी दुष्काळात जनतेला साथ देऊन त्यांना त्यातून बाहेर काढण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे इतर संस्थानाच्या तुलनेत कोल्हापुरातील जनतेला दुष्काळाची तितकीशी झळ पोहोचू शकली नाही. महाराजांची ही दूरदृष्टी आणि त्यांची लोककल्याणकारी धोरणे कुणालाही नाकारता येत नाही.[२६]

ब्रिटिश वसाहतवादी काळात दुष्काळात लाखो लोक मृत्यूमुखी पडले. तर कुपोषणामुळे अनेकांना अनारोग्याला सामोरे जावे लागत होते. पुरेशा अन्नधान्याची अनुपब्धता, लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नव्हते, सलग दोन – तीन वर्ष मान्सूनची अनियमितता असल्यामुळे शेतीच्या गुणवत्तेवरही दूरगामी परिणाम झाला होता. अन्नधान्य उत्पादनामध्ये घट झालेली होती. त्यात भरीस भर ही प्लेग, मलेरिया या संसर्गजन्य रोगांनी डोके वर काढले. दुष्काळ आणि संसर्गजन्य साथीने लाखो लोकांचा बळी घेतला. हीच परिस्थिती भारताच्या विविध संस्थानांमध्ये होती. मात्र कोल्हापूर संस्थानातील प्रजेसाठी अनेक कल्याणकारी धोरणे महाराजांनी राबविली आणि संस्थानाला कायमस्वरूपी दुष्काळ मुक्तीकडे नेले होते. शाहू महाराज हे लोककल्याणकारी राजे होते, हे निर्विवादपणे सिद्ध होते.

संदर्भसूची :

१. Ghosh Ambika, Emerging Capitalism in Indian Agriculture, Peoples Publishing House , New Delhi, , 1988, P- 15-22

२. http://www.thenewhumanitarian.org/report/89121/analysis-what-famine, DOW,12/06/2019

३. https://www.oxfordbibliographies.com/view/document, DOW 12/08/2017

४. कित्ता

५. https://www.oxfordbibliographies.com/view/document/obo9780199846733/obo-9780199846733-0083.xml , DOW 17/06/2018

६. Sen Amartya, (1982) Poverty and Famines: An Essay on Entitlement and Deprivation Oxford University Press, New York, U.S. 1981, या पुस्तकातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा सारांश संदर्भ म्हणून घेण्यात आला आहे.

७. Sen Amartya, Poverty and Famines: An Essay on Entitlement and Deprivation Oxford University Press, 1981, P-52-86

८. Sen Amartya, (1982) Poverty and Famines: An Essay on Entitlement and Deprivation Oxford University Press, New York, U.S. 1981, या पुस्तकातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा सारांश संदर्भ म्हणून घेण्यात आला आहे.

९. S. Ambirajan, Malthusian Population Theory and Indian Famine Policy in the Nineteenth Century,Population Studies, Vol. 30, No. 1 (Mar.,1976), P. 5-14

१०. हातेकर नीरज, पडवळ राजन, (संपा.) दोन जुने अभिजात अर्थशास्त्रीय निबंध, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१३, पृ. ६१

११. कित्ता,६१

१२. कित्ता ६१–११५

१३. Report On The General Administration Of The Kolhapur-1891-92 To 1898-99

१४. Charles Blair, Indian Famine, Agricole Reprints Corporation, New Delhi,1986, P-233

१५. Datt Romesh, Open Letter to Lord Curzon on Famines and Land Assessments in India, Kegan Paul Trench Trubner and Company, London, 1900, P-19-20

१६. Datt Romesh, Open Letter to Lord Curzon on Famines and Land Assessments in India, Kegan Paul Trench Trubner and Company, London, 1900, P-21

१७. Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880, P-09

१८. Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880, P-11-12

१९. Orissa Famine of 1866: Demographic and Economic Consequences Bidyut Mohanty, Economic, and Political Weekly, Vol. 28, No. 1/2 (Jan. 2-9, 1993), P. 55-57, 59-66.

२०. Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880, P-14

२१. Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880, P-15-16

२२. Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880, P-19-20

२३. Datt Romesh, Open Letter to Lord Curzon on Famines and Land Assessments in India, Kegan Paul Trench Trubner and Company, London, 1900, P-31-32

२४. Datt Romesh, Open Letter to Lord Curzon on Famines and Land Assessments in India, Kegan Paul Trench Trubner and Company, London, 1900, P-33

२५. देसाई दत्ता, पाणी दुष्काळ आणि विकास, भोळे भा. ल., बेडकिहाळ किशोर (संपा.) शतकांतराच्या वळणावर, आंबेडकर अकादमी, सातारा, २००६, पृ. ३८६

२६. Report on the General Administration of the Kolhapur-1896-1919.

प्रकरण दुसरे

छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण आणि भारतातील तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती

प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दपूर्व महाराष्ट्रातील परिस्थिती

१) १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांची प्रशासकीय पकड

२) महाराष्ट्रातील दुष्काळ (१८७६-७७)

३) आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सुधारणांना वेग

४) महात्मा फुलें यांची विचारधारा

५) शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण प्रक्रियेला वेग

६) आधुनिक मध्यमवर्गाचा उदय

७) आधुनिक मुद्रित प्रसारमाध्यमे

८) राष्ट्रवादाच्या जडणघडणीचा कालखंड

कोल्हापूर संस्थानाचा संक्षिप्त इतिहास

कोल्हापूर नावाच्या उत्पत्तीबद्दल आख्यायिका

अ) आर्य द्रविड संस्कृतीच्या काळातील आख्यायिका

आ) भौगोलिक उत्पत्तीसंबधीची आख्यायिका

इ) सांस्कृतिक आख्यायिका

ई) धार्मिक आख्यायिका

छत्रपती घराण्याचा राजर्षी शाहूंपर्यंतचा इतिहास

कोल्हापूर संस्थानाची छत्रपती शाहूपूर्वकालीन परिस्थिती

अ) प्रशासकीय व्यवस्था

आ) शेतीप्रधान राजकीय अर्थव्यवस्था

इ) अवर्षणग्रस्त कोल्हापूर संस्थान

ई) पारंपरिक पीक पद्धती

उ) सावकार आणि कुलकर्णी यांचे वर्चस्व

ऊ) आधुनिक शिक्षणाचा अभाव

ए) अविकसित व्यापारी क्षेत्र

ऐ) अविकसित औद्योगिक क्षेत्र

औ) जातीधर्माचे वर्चस्व आणि अंधश्रद्धा, कर्मकांडात बुडालेला समाज

ब्रिटिशांचे अधिपत्य आणि संस्थानाची स्वायत्तता

शाहू महाराजांची जडणघडण

१) आबासाहेब घाडगे यांच्यांकडून मिळालेला पुरोगामी वारसा

२) आदर्श शिक्षक

३) शैक्षणिक काळातील पर्यटनाचा प्रभाव

४) पाश्चिमात्य जगाचा प्रभाव

५) आधुनिक सामाजिक संस्थांचा प्रभाव

शाहू महाराजांचा शपथविधी आणि राज्यकारभारास प्रारंभ

प्रकरण दुसरे

छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती

प्रस्तावना

कोल्हापूरच्या इतिहासामध्ये लोकोत्तर राजा म्हणून शाहू महाराज ओळखले जातात. शिवछत्रपतींचा वारसा त्यांनी उत्तमपणे जोपासला, हे त्यांच्या एकूणच राज्यकारभारातून दिसून येते. छत्रपती या नात्याने कोल्हापूरच्या राजगादीवर आल्यानंतर त्यांनी रयतेला न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून सतत प्रयत्न केले. आपल्या रयतेच्या सर्वांगिण विकासासाठी आयुष्य वेचले व लोकांचे राजे म्हणून आपले अढळ स्थान बहुजन समाजाच्या मनात कायम केले. महाराजांनी संस्थानात आरक्षणासारखा क्रांतीकारक महत्त्वाचा निर्णय घेतला, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. त्यासाठी केवळ कायदेशीर तरतुदीच केल्या नाहीत, तर त्यापुढे जाऊन त्यांनी प्रत्यक्ष आपल्या नातेवाईकांचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. ज्यातून प्रस्थापीत समाजव्यवस्थेतील वंचिताचे शोषण करणाऱ्या जातव्यवस्थेला त्यांनी आव्हान दिले.

भविष्यकाळाचा वेध घेणाऱ्या व त्या अनुषंगाने सुरवातीपासूनच काम करणाऱ्या छत्रपतींच्या कार्य कर्तुत्त्वामुळे कोल्हापूर संस्थान हे इतर संस्थानाच्या तुलनेत प्रगत, लोकशाहीवादी संस्थान होते. त्याचे मुख्य शिलेदार असलेल्या महाराजांची जडणघडण नेमकी कशी झाली, त्यांच्या जडणघडणीत कारणीभूत असणारी तत्कालीन सामाजिक, राजकीय आर्थिक, आणि शैक्षणिक परिस्थिती नेमकी काय होती, राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी देशातील, महाराष्ट्रातील, संस्थानातील एकंदरीत परिस्थिती कशी होती याचा आढावा प्रस्तूत प्रकरणातून घेतला जाणार आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दपूर्व महाराष्ट्रातील परिस्थिती

शाहूपूर्व काळात महाराष्ट्रात तसेच कोल्हापूर संस्थानात देखिल बऱ्याच राजकीय, आर्थिक, सामाजिक घडामोडींच्या घटना घडत होत्या. त्याचा परिणाम समाजातील लोकांवर पडत असून

कळत–नकळतपणे जो बदल घडत होता, त्यामागची कारणमीमांसा, त्या काळात घडलेल्या घटनांच्या बदलांचा शाहू महाराजांवर कसा प्रभाव पडला होता या सर्वांचा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते.

इ.स. १८१८ ला पेशवाईचे राज्य संपून महाराष्ट्रात ब्रिटिशांचा अमंल सुरू झाला आणि वतनदार, जहागिरदार मंडळींना पूर्वीप्रमाणेच वागण्याची मोकळिक मिळाली. इंग्रजांनी पेशवाई संपुष्टात आणल्यावर निर्माण झालेली पोकळी केवळ येथील मराठी लोकांचा रोष व विरोध होऊ नये यासाठी सातारा गादीवर छत्रपतींचे राज्य पुन:स्थापित केले. छत्रपती प्रतापसिंह यांना राज्याभिषेक करुन मराठी राज्य निर्माण केले परंतू संपूर्ण भारत आपल्या अंमलाखाली आणणाऱ्या धूर्त ब्रिटीशांनी विविध कारस्थाने करुन व दत्तक वारसा नामंजूर करुन सातारा गादी १८३९ मध्ये लवकरच खालसा केली. त्यामुळे मराठा साम्राज्याची कोल्हापूर ही एकच गादी शिल्लक होती. इंग्रजांनी आपली सत्ता विस्तारताना प्रत्यक्ष त्यांच्या अंमलाखालचा भाग आणि संस्थानिकांच्या ताब्यात असलेला भाग या दोहोंवर आपली सत्ता व वचक कसा राहील याची नेहमीच काळजी घेतली.

राज्यकारभार करताना त्यांना सोयिस्कर जावे या दृष्टीने त्यांनी जसे येथील लोकांवर जूलूम करुन त्यांचे शोषण केले तसेच काही चांगल्या सुधारणाही अपरिहार्यतेमुळे केल्या. एकोणिसावे शतक हे बऱ्याच चांगल्या सुधारणांचे शतक मानले जाते व ब्रिटीशांच्या अंमलामुळे या सुधारणा भारतातही त्यांच्याकडून केल्या गेल्या त्याचा परिणाम एकूणच त्यावेळच्या लोकजीवनावर झालेला होता.

कोणत्याही महान व्यक्ती किंवा समाजसुधारक हे तत्कालीन परिस्थितीचे अपत्य असतात. तत्कालीन परिस्थितीच त्या व्यक्तीच्या जडणघडणीत मोठी भूमिका पार पाडत असते. ती व्यक्ती एखादा निर्णय घेते, त्यामागे केवळ त्या व्यक्तीची आत्मनिष्ठ भूमिका कारणीभूत नसते, तर त्या काळातील सर्व परिस्थितीचा त्यात विचार केलेला असतो. शाहू महाराजांनी संस्थानाचा ज्या काळात राज्यकारभार स्वीकारला, त्या काळात भारताच्या प्रत्येक भागात ब्रिटिशांचे साम्राज्य विस्तारलेले होते. त्यातूनच शिक्षण, तंत्रज्ञानात्मक विकास, आधुनिक मूल्याचा विस्तार, प्रचार आणि प्रसार, मुद्रण व्यवस्थेचा शोध, राजकीय, सामाजिक, आर्थिक सुधारणांना वेग,

पाश्चिमात्यांची तत्वज्ञानावरील विचारसरणी यांसारखे अनेक महत्त्वाचे बदल या काळात घडत होते. या पार्श्वभूमीचा परिणाम शाहू महाराजांच्या आचार विचारांवर झालेला दिसून येतो. व त्यातूनच त्यांनी समाजोपयोगी केलेल्या कार्यामागील भूमिका स्पष्ट होण्यास मदत होते.

१)१८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांची प्रशासकीय पकड

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारत हा वेगवेगळ्या संस्थानांमध्ये विस्तारलेला होता. मोघल साम्राज्य, मराठा साम्राज्य, राजपुताना साम्राज्य अशा अनेकविध संस्थानांचे अस्तित्व भारताच्या कानाकोपऱ्यात विखुरलेले होते. तसेच पंजाब, दिल्ली, औंध, सिंध अशा प्रांतांमध्ये संस्थानिकाकडून राज्यकारभार पाहिला जात होता. भारतातील विविध प्रांतांमधील संस्थाने आणि त्यांचे सत्ताधीश राजे–महाराजे यांच्या राज्यकारभाराला पहिल्यांदा आव्हान ब्रिटिश वसाहतवादाने दिले होते. ब्रिटिशांनी सोळाव्या शतकात भारतात प्रवेश केला असला, तरी त्यांचा प्रारंभिक टप्पा हा व्यापारी क्षेत्र हे होते. व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले ही एक प्रचलित म्हण हे ब्रिटिश वसाहतवादाच्या विस्ताराचे एक महत्त्वाचे द्योतक म्हणता येईल. ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करून त्यामाध्यमातून आपल्या औद्योगिक क्षेत्राला चालना देण्याचे काम सुरू केले होते. १७५७ मध्ये प्लासीची लढाई जिंकून भारतातल्या संस्थानांवर आपला वचक दाखवून दिला होता. प्लासीच्या लढाईपासून ब्रिटिशांच्या साम्राज्याचा विस्तार खूप जलदगतीने होण्यास सुरुवात झाली होती. या लढाईनंतर हळूहळू ब्रिटिशांनी आपली स्वतंत्र सेना उभी केली होती. तैनाती फौज हे या सैन्याचे नाव होते. विविध राज्याच्या संरक्षणासाठी वेळप्रसंगी राजाच्या विरोधात युद्ध करण्यासाठी या सैन्याचा वापर ब्रिटिशांनी केलेला होता. प्लासीच्या लढाईपासून ते १८५७ च्या लढाईपर्यंत अनेक संस्थानिकांनी ब्रिटिशांविरोधात युद्ध केले होते. देशातला आदिवासी समुदायसुद्धा ब्रिटिशाविरोधात लढला होता. मात्र ब्रिटिशांपुढे त्यांचा निभाव लागला नाही. १८५७ च्या उठावात तर त्यांचा पूर्णपणे पराभव झाला होता. तरीही या उठावाने ब्रिटिशांच्या सत्तेला आव्हान मिळाले होते, त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या मनात ब्रिटिशांविरोधात असंतोषाची बीजे रोवली गेली होती. हा उठाव अपयशी होण्यामध्ये ब्रिटिशांना विरोध करण्यामध्ये भारतातील विविध संस्थाने एकत्र येण्यात संस्थानिकांना आलेले अपयश, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची व

युद्धजन्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी कोणत्याही प्रकारची तयारी नसणे, ब्रिटिशांचे प्रगत युद्धकौशल्य अशा विविध बाबी कारणीभूत ठरल्या. साहजिकच भारतातील राजे, संस्थानिकांचा त्यांच्यासमोर निभाव लागणे कठीण होते. त्यामुळे अठराशे सत्तावन्नच्या उठावानंतर भारतात ब्रिटिशांची सत्ता अधिकृतरीत्या स्थिर झाली होती. इंग्लंडच्या राणीकडून भारतातील सर्व राज्यकारभार पाहण्यासाठी औपचारिक सत्ताग्रहण केले गेले. १८५८ चा कायदा भारतात लागू करून राणीने ब्रिटीशांची राजकीय सत्ता व प्रशासकीय सत्ता कशाप्रकारे चालेल, याबाबतचे नियम त्यामध्ये जाहीर केले होते.

२) महाराष्ट्रातील दुष्काळ (१८७६–७७)

१८७६ – ७७ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. पावसाची अनियमितता हे त्या दुष्काळाचे कारण असले तरी लोकांना पिण्याच्या पाण्यापासून ते अन्नधान्यापर्यंतच्या टंचाईला सामारे जावे लागले. दुष्काळी परिस्थितीत पावसाची कमतरता आणि शेती नापीक झाल्याने येथील शेतकरी हवालदिल झालेला होता. या दुष्काळातून सावरण्यासाठी ब्रिटिश सरकारने कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर वाढले. गाव सोडून शहराकडे येणे व आपली उपजीविका भागवणे हा उपाय जरी अस्तित्वात असला तरी, ब्रिटिश राजवटीच्या काळात शहराचा विकासही मर्यादित स्वरूपात झालेला होता. औद्योगिकीकरणाला त्या काळात चालना मिळत असली तरी अमर्यादित लोकांना सामावून घेण्याचा शहराचा अवकाशही मर्यादित होता. त्यामुळे ग्रामीण भागातून होत असलेल्या स्थलांतरामुळे शहरातसुद्धा अनेक संकटांना सामोरे जावे लागत होते. मात्र तत्कालीन ब्रिटिश सरकारने दुष्काळ निवारणासाठी फॅमिन कमिशनसारख्या ठराविक योजनांपलीकडे फारशा उपाययोजना केलेल्या नव्हत्या. शिवाय त्या योजनाही त्यांनी तितक्या प्रभावीपणे राबविलेल्या नव्हत्या. किंबहुना दुर्लक्षच जास्त झाल्याचे आढळते. त्याविरोधात राज्यातील अनेक शेतकरी, शेतमजुरांनी संप पुकारले होते, मात्र त्यांची कसलीच दखल ब्रिटिशांनी घेतली नाही. त्यांच्याविरोधात विद्रोह होऊ नये म्हणून नेमण्यात आलेल्या समितीकडून शेतकऱ्यांना अन्नधान्य आणि रोजगार देण्यात यावा, दुष्काळ संपवण्यासाठी सरकारी कामे काढण्यात यावीत व मजुरीचा दर वाढवावा अशा अनेक प्रकारच्या उपाययोजना

सुचविण्यात येऊन थोडीफार कामे त्यामधून झाली, पण अशा कोणत्याही उपाययोजनेची ठोस अंमलबजावणी झालेली नव्हती.[१]

३) आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सुधारणांना वेग

देशभर आपली सत्ता प्रस्थापित करताना इथल्या सर्व साधनसंपत्तीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित करणे आणि त्यातून मिळणारा महसूल आपल्या देशात घेऊन जाणे हाच ब्रिटिशांचा मुख्य उद्देश होता. हा उद्देश साध्य करण्यासाठी आणि त्या दृष्टीने राज्यकारभार हाकण्यासाठी ब्रिटिशांना नोकरदार वर्ग निर्माण करण्याची गरज भासली त्यातूनच या देशात सामाजिक, आर्थिक सुधारणा करणे तितकेच आवश्यक होते. सत्ता विस्ताराचा हा त्यांचा एक अपरिहार्य भाग होता. भारतामध्ये आपल्या उद्देशाना उपयोगी पडतील अशा प्रशासकीय सुधारणा करून त्या माध्यमातून भारतावर वर्चस्व प्रस्थापित करता येईल हा विचार होता. त्याचबरोबर या वसाहतिक देशात उत्पादीत होणारा कच्चा माल आपल्या देशात निर्यात करणे तेथील पक्का माल भारतात पाठवणे यासाठी त्यांना भारतात बाजारपेठ निर्माण करणे गरजेचे होते. शिवाय पुन्हा भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी ही बाजारपेठ महत्वाची होती. यातून येथील समुदायाचे आणि नैसर्गिक संपत्तीचे शोषण करून मोठा महसूल मिळवला जात होता. तथापि त्यांनी काही केलेल्या सुधारणामुळे येथील नागरीकांच्या समाज जिवनावर परिणाम होऊन त्यांच्यामध्ये नवविचारांची जाणिव होऊ लागली होती.

ब्रिटीशांनी राज्य कारभार सोयीसाठी रेल्वे क्षेत्रामध्ये गुंतवणूक करून रेल्वेचे जाळे भारतात विस्तारण्याची सुरुवात केली. अनेकविध उदयोगक्षेत्र जसे कोळसा, जूटमिल, कापड गिरणी इत्यादीमध्ये भांडवल गुंतवणूक करून अशा उदयोगांना चालना दिली. तसेच याबरोबरीने वित्तीय आणि बँकींग क्षेत्राचा विस्तार करण्याला प्राधान्य क्रम देऊन अधिकाधिक नफा कमवण्यास सुरुवात केली. त्याच बरोबर आपला राज्यकारभारही ते स्थिर करत गेले.

१८५८ चा कायदा भारतात लागू झाल्यानंतर देशातील सत्तेची सुत्रे ईस्ट इंडीया कंपनीच्या प्रशासकीय विभागाकडे आली. या प्रशासकीय विभागस्तरावर ब्रिटीशांच्या संसदेच्या कार्यकारी शक्तीच्या माध्यमातून हा सर्व राज्यकारभार पाहण्याची सुरुवात केली गेली. ब्रिटीश कॅबिनेट ही या सर्व निर्णयप्रक्रियेमध्ये एक महत्त्वाची संस्था होती. गव्हर्नर जनरल हे ब्रिटिशांचा प्रशासकीय

व्यवहार बघण्यासाठी महत्त्वाचे सूत्रधार होते. या सर्व पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा आपल्याला समजून घेता येतील. प्रशासकीय सुधारणा करत असताना त्यांनी प्रामुख्याने तीन भागांमध्ये यांची विभागणी केली. पहिला भाग बंगालचा, दुसरा भाग मद्रास आणि तिसरा भाग मुंबई. हे सर्व प्रशासकीय विभाग प्रामुख्याने ब्रिटिशांच्या कार्यकारी मंडळाकडून चालवले जात असत. या प्रशासकीय सुधारणाच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतात राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. लॉर्ड मेयो यांनी केंद्रीय आणि प्रांतीय यामध्ये अधिकारांचे वाटप करून वित्तीय व कर वसुली यांसारख्या क्षेत्रांचा विस्तार करण्यासाठी चालना दिली.[२]

प्रशासनाच्या सेवेमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांबरोबरच भारतातल्या बुध्दीजीवी लोकांना सुध्दा घेणे एक गरज बनली होती. त्यासाठी त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवा ही स्पर्धा परीक्षा येथे लागू केली. व या माध्यमातून त्यांना आवश्यक असा नोकरशहा वर्ग निवडला जात होता. सदर स्पर्धा परिक्षा लंडनमधून घेतल्या जात होत्या . रविंद्रनाथ टागोर यांचे बंधू सत्येंद्रनाथ टागोर हे अशा प्रकारची भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा पास होऊन प्रशासकीय सेवेत रूजू होणारे पहिले भारतीय ठरले होते.

इथल्या लोकांना आपल्या प्रशासनाच्या कारभारात रूजू करण्याचा उद्देश हा वरवर जरी सुधारणावादी दृष्टीने व्यापक वाटत असला तरी त्यामागे त्यांची प्रशासन व्यवस्था मजबूत होणे व कारकून वर्ग निर्माण करणे हाच विचार त्यापाठीमागे दडलेला होता. महत्वाच्या खात्यांवर ब्रिटीश अधिकाऱ्यांची नेमणूक करून त्यांनी नेहमीच स्वत:च्या व्यक्तींना प्राधान्य दिले.

इंग्रजांनी या देशात कारभाराची सोय म्हणून काही सुविधा उपलब्ध करून दिल्या तसेच साम्राज्य विस्तारण्यास उपयोगी असे सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, पोस्ट, टेलीग्राम, जंगल, अभियांत्रिकी, पोलीस यासारखे खाते निर्माण करून इथल्या व्यवस्थेत बऱ्याच प्रमाणत सुसंगता आणली. यामुळे येथील दळणवळण वाढून एकमेकांचा संपर्क लवकरात लवकर घडू लागला व देशभरात घडणाऱ्या घटना लगेचच येथील जनतेला कळू लागल्या.

तत्कालीन काळामध्ये भारतातील सर्वसामान्य जनता ही अंधश्रद्धा, सतीप्रथा, जात व्यवस्था इत्यादी अनेक कर्मकांडामध्ये बुडाली होती; परंतु ब्रिटीश सरकारने सतीप्रथा बंदी, विधवा पुर्नविवाह, सर्वसामान्यांना शिक्षणाचा अधिकार यासारख्या कायद्यान्वये समाजात काही

प्रमाणात सामाजिक सुधारणांना चालना दिली. ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यांसारख्या चळवळींचा उदय त्याच काळात झाला व पुढे आर्य समाजाच्या मूल्यांनी प्रभावित होऊन शाहू महाराजांनी जातीव्यवस्था मोडून काढण्यासाठी काम केले. ब्रिटिशांच्या अशा काही धोरणांमुळे भारतातील मध्यम वर्गामध्ये हळूहळू का होईना पण सुधारणावादाविषयी जागृती घडून येत होती.

४) महात्मा फुले यांची विचारधारा

महात्मा फुले यांना आपण क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून ओळखतो. बहुजन समाजाचे दु:ख आपल्या लेखणीतून पुढे आणणारे आणि त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी आयुष्य वेचणारे महात्मा फुले हे तळागाळातील वंचित समाजासाठी एक भक्कम आधार होते. ब्रिटिशांनी या एकोणिसाव्या शतकाच्या आधुनिकतेनुसार भारतात इंग्रजी शिक्षण देण्याचे सरकारी धोरण जाहीर केले होते. या शिक्षण धोरणाने पाश्चात्य शिक्षणाची गंगा महाराष्ट्रातसुद्धा आली होती. तथापि सुरुवातीला या शिक्षणाचा फायदा पारशी, प्रभू, ब्राम्हण यासारख्या उच्चवर्णीय व पुढारलेल्या वर्गांना मिळत होता; परंतु त्याचवेळी येथील अन्य बहुजन वर्गाला मात्र शिक्षणाची संधी नाकारलेली होती. त्यांच्यावर अन्याय-अत्याचार होत होते. प्रामुख्याने त्यांच्यातील अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, सरकार व सावकार यांच्याकडून होणारी पिळवणूक, दुष्काळासारखे संकट अशा अनेक कारणांमुळे त्यांचे जीवन खडतरच बनले होते. अशावेळी महात्मा फुले यांनी या समाजाचे एकप्रकारे नेतृत्त्व करून तथाकथित उच्चवर्णीय यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेच्या विरोधामध्ये जाण्याचा निर्णय घेतला. या लोकांवरील अन्याय अत्याचार विरोधात त्यांनी संघर्ष केला. यासाठी त्यांनी शिक्षणासारखे कार्य करून एक मोठे योगदान दिलेले आहे. पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा उघडली. तत्कालीन समाजातील सनातन विचारांच्या लोकांनी त्यांच्या या महिला शिक्षण धोरणाला मोठा विरोध केला, पण महात्मा फुले यांनी कशाचीही पर्वा न करता महिला शिक्षणाचा प्रसार करण्याच्या मतावर ठाम राहिले. त्यासाठी स्वत:च्या पत्नीस सुशिक्षित करून तिला प्रथम शिक्षिका बनवले आणि शिक्षण प्रसाराचे कार्य मोठ्या जोमाने सुरू ठेवले.

शिक्षणासोबतच त्यांनी जातव्यवस्थेविरोधात गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड इत्यादी ग्रंथामधून लढाई सुरू केली. माणसांतील माणूसपण नष्ट करण्यामागे ही जातव्यवस्थाच कारणीभूत असते

हे त्यांनी ओळखले होते. त्याकाळात अज्ञानपणामुळे शेतकऱ्यांचे शोषण रुढी–परंपरांच्या नावाखाली पद्धतशीर होत होते. अंधश्रद्धेच्या माध्यमातून समाजाला नाडले जात होते. या सर्वांच्या विरोधात त्यांनी ठाम उभे राहून शेतकऱ्यांना व बहुजन समाजाला जागविण्याचा व संघटीत करण्याचा प्रयत्न केला. विधवा पुर्नविवाह, आंतरजातीय विवाह यासारख्या प्रश्नांचे गांभीर्य ओळखून त्यासाठी कार्य केले. १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना करून आपण सर्वजण एकाच ईश्वराची लेकरे असून त्यांची भक्ती करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही ही भूमिका घेऊन पर्यायी मूल्य आणि संस्कृतीच्या निर्मिती प्रक्रियेला महात्मा फुले यांनी वेग दिला.[३]

५) शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण प्रक्रियेला वेग

भारतीय लोकांना शिक्षणाची संधी दिली, तर ते आपल्या सत्तेला आव्हान निर्माण करू शकतात, याची जाणीव ब्रिटिशांना होती. त्यामुळे शिक्षणाच्या प्रचार–प्रसारास त्यांचा तत्त्वतः विरोध होता. मात्र देशातील साम्राज्यविस्तार आणि राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टिकोनातून लागणारा कर्मचारी आणि अधिकारी वर्ग हा येथूनच उपलब्ध करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होणे गरजेचे होतेच. याच काळात इंग्लडमध्ये आधुनिक उदारमतवादी विचाराचा विस्तार होत होता. साहजिकच भारतात आपले साम्राज्य कायम ठेवण्यासाठी शिक्षण क्षेत्रावर काही खर्च करण्याची गरज होती. ती ओळखून त्यासाठी त्यांनी काही मिशनरी शाळा सुरू केल्या आणि या देशात शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. पुढे ब्रिटिशांनी देशभर इंग्रजी शिक्षण देण्याचे धोरण सुरू करून आधुनिक शिक्षणाला प्रारंभ केला. कलकत्ता, मुंबई, मद्रास या ठिकाणी त्यांनी उच्च शिक्षणासाठी विद्यापीठांची स्थापना केली होती. ख्रिश्चन मिशनरी शाळांच्या माध्यमातून त्यांनी काही प्रमाणात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण द्यायला सुरुवात केली होती. तथापि, त्याचे प्रमाण खूप नगण्य होते, तरी या व्यवस्थेमुळे येथील समाज शिक्षणाच्या पायवाटेवरुन चालण्यास समर्थ होऊ लागला. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाल्याने येथे एक नवीन विचारांचे चैतन्य निर्माण होऊ शकले.[४]

भारतामध्ये ब्रिटिशांनी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यास जरी सुरुवात केली तरी यावर त्यांनी कमी खर्च केल्याचे दिसते. १८८६ मध्ये ब्रिटिशांकडे भारतामधून जमा होणारी कराच्या

स्वरूपातील रक्कमही एकूण ४७ कोटी होती. त्यापैकी त्यांनी १९.४१ कोटी सैन्यावर खर्च केले होते. १७ कोटी रुपये नागरिक प्रशासकीय बाबीवर खर्च केले होते. केवळ दोन कोटी रुपये शिक्षण व आरोग्य या घटकावर खर्च केलेला होता.[५] या खर्चाच्या आकडेवारीवरून ब्रिटिशांचा सार्वजनिक शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन काय होता, हे लक्षात येते. पण यातील एक सकारात्मक भाग हा होता की, बहुतांश जनता ही शिक्षित झालेली होती. देशभरातील सर्वसामान्यांमध्ये जागृती घडवून आणण्यात भारतातील या उच्चशिक्षित पिढीचे एक महत्त्वाचे योगदान राहिले आहे. शिक्षणाचे क्षेत्र मध्यमवर्गीय उच्चमध्यमवर्गीय लोकापर्यंत जरी मर्यादित होते; तरी या पिढीने प्रामुख्याने भारतातील सर्वसामान्य जनतेला अंधश्रद्धा, धार्मिक आणि जातीय चालीरीती यांसारख्या अनेक अनिष्ठ रुढींतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला होता. गोपाळ कृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी या शिक्षणाचा फायदा सर्वसामान्यांना करून देऊन त्यांना अज्ञानाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रात त्यांनी केलेल्या राजकीय व सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने शिक्षण हा एक महत्त्वाचा भाग म्हणता येईल.[६]

६) आधुनिक मध्यमवर्गाचा उदय

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर समाजात दोन वर्ग उदयाला आलेले होते. एक वर्ग हा कामगार होता, तो प्रामुख्याने आपल्या श्रम शक्तीच्या आधारे आपला उदरनिर्वाह करत होता. दुसऱ्या बाजूला भांडवलदार वर्ग जो उत्पादन साधनांची मालकी व आपले वर्चस्व प्रस्थापित करून कामगारांचे शोषण करत होता. या पार्श्वभूमीवर या दोन वर्गांबरोबर आणखी एक तिसरा वर्ग भांडवलदार वर्गाच्या बाजूने उदयाला आलेला होता. किंबहुना भांडवलदार वर्गाने त्याला जन्माला घातले होते. तो वर्ग म्हणजे मध्यम वर्ग होय. मध्यमवर्ग हा प्रामुख्याने उच्चशिक्षित, आधुनिक मूल्याचा परिचय असलेला, नोकरशहा, शिक्षक किंवा इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये कार्यरत होता. कामगारवर्गापेक्षा वरच्या वेतन श्रेणीत वरच्या स्तरावर हा मध्यम वर्ग कार्यरत होता.

अशा मध्यमवर्गाने जगाच्या इतिहासामध्ये काही सकारात्मक आणि महत्त्वाची भूमिका सुद्धा पार पाडल्याचे दिसून येते. भारतातही १९ व्या शतकाच्या काळात मध्यमवर्ग विकसित होण्यामध्ये

ब्रिटिश वसाहतवादाने मोलाचा हातभार लावला. ब्रिटिशांनी वसाहतवादाबरोबरच जे शिक्षण देण्याचे कार्य केले, त्यामुळे समाजात क्रांती होण्यास सुरुवात झाली. या सार्वत्रिक शिक्षणाचा फायदा घेऊन भारतातील उच्चजातीय वर्गाने ब्रिटिशांच्या प्रशासकीय सेवेमध्ये काम करण्यास सुरुवात केली होती. ब्रिटिशांच्या प्रशासकीय सेवेत काम करायचे असेल, तर त्यांना आधुनिक शिक्षण विशेषतः इंग्रजी भाषा आत्मसात करणे अत्यंत गरजेचे होते. भारतातील मध्यमवर्गाने या सर्व गोष्टी आत्मसात करून ब्रिटिशांच्या प्रशासकीय सेवेमध्ये सक्रिय सहभाग दिला. ब्रिटिशांच्या पगारावर जगणाऱ्या या वर्गाने सामाजिक सुधारणेला साह्यभूत भूमिका अदा केलेली दिसते.

ब्रिटिशांनी भारतीय उपखंडात राज्यकारभाराच्या सोईसाठी विविध क्षेत्रांचा विकास केला. त्यातून येथे अनेक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. त्यामुळेच आधुनिक व इंग्रजी शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीय समाजाला त्यातील विविध क्षेत्रात काम करणे शक्य होत गेले. साहाजिकच त्यामुळे देशभरात मध्यमवर्ग उदयाला येण्यास सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल झालेली होती. भारतातला मध्यमवर्ग खऱ्या अर्थाने वसाहतवादाच्या कालखंडात जन्माला आलेला आहे. आधुनिक पाश्चिमात्य शिक्षण मिळाल्याने मध्यमवर्गाला आधुनिक मूल्ये समजली होती. त्यामुळे या वर्गातील एक मोठा घटक स्वातंत्र्य चळवळीतही सक्रिय सहभाग घेत होता. राष्ट्रवाद चळवळ जनसामान्यांत रुजवण्यात या वर्गातील एक घटक सक्रिय होता, तर दुसरा घटक समाजात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत होता. समाजातील जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, धार्मिक गुलामगिरी यांसारख्या अनेक अनिष्ठ रूढी, परंपरांना बळकटी देणाऱ्या समाजातील संस्थांमुळे सर्वसामान्यांचे जीवन दयनीय झालेले होते. त्या जोखडातून सर्वसामान्यांना मुक्त करण्यासाठी मध्यमवर्गातील काही लोकांनी समाजसुधारणेसाठी सातत्याने प्रयत्न करून परिस्थितीत चांगले बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.[७]

७) आधुनिक मुद्रित प्रसारमाध्यमे

ब्रिटिशांनी आपली सत्ता देशभर प्रस्थापित केल्यानंतर औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या विविध धोरणांच्या आधाराने येथील सामान्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण झालेली होती. शिक्षण धोरणांमुळे समाजात जो नवा दृष्टिकोन तयार झाला होता, त्याचे प्रतिबिंब हे

त्यावेळच्या वृत्तपत्रांमध्ये सुद्धा दिसून येत होते. आधुनिक मुद्रित प्रसारमाध्यमांची ओळख भारतातील सर्वसामान्य जनतेला इंग्रजांनी आपल्या राजवटीतच करून दिली.

प्रारंभिक पातळीवर अशी प्रसारमाध्यमे ब्रिटिशांनी इंग्रजी भाषेतून सुरू केली, त्यासाठी छपाईचे तंत्र इथे विकसित केले. त्यामुळे भारतातील सामाजिक सुधारणा करणाऱ्या वर्गानेसुद्धा या मुद्रित प्रसारमाध्यमाचा वापर हा सर्वसामान्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी व प्रबोधन करण्यासाठी पुरेपूर उपयोग केल्याचे दिसते. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीच्या विचारांमुळे याच प्रसारमाध्यमांचा वापर करून ब्रिटिशांच्या जनहितविरोधी धोरणावर टीकाटिप्पणी होण्यास सुरुवात तर झालीच होती, शिवाय त्यांच्या कारभार शैलीबाबत लोकांचा चिकित्सक दृष्टिकोन तयार होण्यास सुद्धा याच प्रसारमाध्यमाचा खूप उपयोग होऊ लागला.

राजा राममोहन रॉय, पंडीत विद्यासागर, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांसारख्या अनेक स्वातंत्र्य चळवळीतील प्रभृतींनी आणि सामाजिक सुधारणांच्या व्यक्तींनी मुद्रित प्रसारमाध्यमांचा व्यापक प्रमाणात उपयोग करून एक प्रकारे त्यांचा विस्तार करण्यात मोठी भूमिका पार पडली. अशा प्रसारमाध्यमांमधून विविध लेख, विचार मांडून प्रसंगी टिका टिप्पणी करून लोक जागृती केली. राष्ट्रवादी चळवळीतदेखील प्रसारमाध्यमांचा वापर प्रभावीपणे करण्यात येऊ लागला. पर्यायाने असे म्हणता येईल की आधुनिक प्रसारमाध्यमे ही राष्ट्रवादी चळवळीचे एक महत्वाचे हत्यार ठरली. सदर मुद्रित प्रसार माध्यमाचा वापर करण्यात प्रारंभिक टप्प्यात इंग्रजी भाषेचा जरी वापर केला गेला असला, तरी भारतातील समाजसुधारकांनी आपल्या मातृभाषेतून वर्तमानपत्रे ही निर्माण करून चळवळ अधिकच विस्तृत केली. दर्पण , केसरी, मराठा, सुधारक या सारख्या वर्तमानपत्रांनी लोकांना योग्य व अयोग्य याची जाणिव करून समाज परिवर्तनासाठी मोलाचा हातभार लावला.[८]

८. राष्ट्रवादाच्या जडणघडणीचा कालखंड

देशातील विविध प्रांतांमध्ये १९ व्या शतकात ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधात चळवळी उभ्या राहिल्या. ब्रिटिश साम्राज्यवादाला विरोध करणे आणि देशांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करणे गरजेचे वाटू लागले होते. गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांसारख्या अनेक मोठ्या नेत्यांमुळे राष्ट्रवादी चळवळीला चालना मिळाली.

ब्रिटिशांचा अन्याय आणि अत्याचार दिवसेंदिवस वाढत होता. ब्रिटिशांनी निर्माण केलेली महसूल पद्धत, जमिनीच्या वाटपाचे असमान भाग यांसारख्या अनेक महत्त्वाच्या बाबींमुळे भारतीय जनमानसांमध्ये असंतोषाची भावना वाढत जात होती. म्हणून राष्ट्रवादी चळवळ ही एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात व्यापक अर्थाने विस्तारलेली दिसून येते त्याचा परिणाम पुन्हा समाजातच विविध अंगाने प्रतिबिंबिंत होत होता.[९]

अशाप्रकारे संपूर्ण देशभरातच इंग्रजांच्या राजवटीत चांगला वाईट बदल घडू लागला होता. त्याच्या अनुषंगाने त्या काळात ज्या घडामोडी झाल्या, त्यांचा परिणामही छत्रपतींच्या जीवनावर झाल्याचे दिसून येतो.

कोल्हापूर संस्थानाचा संक्षिप्त इतिहास

दक्षिण भागात असलेल्या संस्थांनांमधे कोल्हापूरला वैशिष्ट्यपूर्ण संस्थान म्हणून ओळखले जाते. या राज्याचा वैभवपूर्ण इतिहास इतिहासकारांच्या मते चार टप्प्यांमध्ये असून, प्राचीन काळात तिसऱ्या शतकापासून मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, अशा बलाढ्य राजवटीखाली हा भाग होता. त्यानंतर साधारण दोनशे वर्ष शिलाहारांचे राज्य असताना कोल्हापूरला महत्त्व प्राप्त झाले होते. त्यानंतर आलेल्या यादवांचासुद्धा या नगरीचे महत्त्व वाढविण्यात हातभार आहे. मुस्लिम कालावधीत कोल्हापूर हे बऱ्याच कालावधीपर्यंत त्यांच्या अंकीत होते. त्यातही अंदाजे एकशे पन्नास वर्ष हा प्रदेश अदिलशाहीकडे होता. शिवरायांनी १६५९ मध्ये पन्हाळा जिंकल्यावर हा प्रदेश मराठा साम्राज्यात आला.

ऐतिहासिक असलेल्या या संस्थानाबद्दल अनेक आख्यायिका व लोकप्रिय मिथकसुद्धा अस्तित्वात आलेले आहेत. कोल्हापूर शहर किंवा संस्थान कसे विकसित झाले. कोल्हापूर हे नाव कसे अस्तित्वात आले. या सर्वांचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

कोणतेही संस्थान आणि त्यांची नावे त्या संस्थानात अस्तित्वात असलेल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक बाबींच्या अनुषंगाने घडलेल्या विविध प्रक्रियेतून नावारूपाला आलेले आहेत. कोल्हापूर संस्थानाचे नाव सुद्धा अशाच विविध प्रतिकांमधून प्रचलित झाले.

कोल्हापूर संस्थान हे एक प्राचीन संस्थान म्हणून ओळखले जाते. नैसर्गिक साधनसंपत्तीनी ते समृद्ध होते. अशी समृद्ध नैसर्गिक साधनसंपदा कोल्हापुरला लाभल्याने त्याठिकाणी निर्माण होणारी संस्कृतीसुद्धा अत्यंत समृद्ध होती. कोल्हापूर हे प्राचीन काळापासून धार्मिक संस्थान म्हणून सुद्धा ओळखले जाते. पन्हाळगडासारखा समृद्ध वारसा कोल्हापूरला लाभल्याने प्राचीन वैभवाने समृद्ध असलेले संस्थान म्हणून त्याची ओळख सर्वत्र प्रचलित होती.

पंचगंगा नदी हीसुद्धा कोल्हापूरच्या शहराच्या वैभवाची एक महत्त्वाची खूण मानली जाते. जगाच्या इतिहासामध्ये ज्या काही संस्कृती निर्माण झाल्या आहेत, त्यांचा उदय, विकास व विस्तार नदीकाठीच झाला आहे. कोल्हापूरलासुद्धा पंचगंगासारखी नदी लाभली. तिच्या किनारी पसरलेल्या कोल्हापूरचा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विकास झाल्याचे आपल्याला दिसते. कोल्हापूर हे नाव अस्तित्वात येण्यापूर्वी कोल्हापूरला 'करवीर' या नावानेसुद्धा ते ओळखले जात होते. संस्थानाचा गौरव हा प्रामुख्याने दक्षिण काशी या नावानेसुद्धा होत होता. भारताच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये काशीचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. काशी हे केंद्र जसे उत्तर भारतामध्ये एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखले जाते, तशाच प्रकारे दक्षिण काशी या आध्यात्मिक केंद्राच्या नावाने त्या काळापासून कोल्हापूरला ओळखले जाते. त्यावेळेपासूनच दक्षिण भारतातील अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभवाचे स्थान म्हणून कोल्हापूर अस्तित्वात होते.[१०]

कोल्हापूर नावाच्या उत्पत्तीबद्दल आख्यायिका

जगाच्या इतिहासात प्राचीन काळापासून किंवा जेव्हापासून मानवी जीवन अस्तित्वात आले होते व ज्यावेळी लिखाणाची परंपरा अस्तित्वात नव्हती तेव्हासुद्धा काही खुणांच्या आधारे वा चित्रलिपींच्या आधारे आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. लिखाणाची परंपरा किंवा भाषेचे व्याकरण ही एक आधुनिक काळामध्ये विकसित झालेली महत्त्वाची साधना आहे.

मुद्रणकलेचा जेव्हा शोध लागला, तेव्हा मानवांनी आपल्या भाषिक संस्कृती आणि परंपरा यांच्या आधारे लेखनाला सुरुवात केली होती. त्यापूर्वी ही सर्व देवाण-घेवाण आणि परंपरा व बहुतांश लोकांच्या मौखिक परंपरेतून जोपासली जात होती. मौखिक परंपरा आणि आख्यायिका या

एकूणच मानवी जीवनाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग होते. म्हणून आजसुद्धा इतिहास लेखनामध्ये आख्यायिकाचे आणि मौखिक परंपरेचे महत्त्वाचे स्थान आहे.

अ) आर्य द्रविड संस्कृतीच्या काळातील आख्यायिका

भारतातील मूळ लोक हे द्रविड वंशाचे आहेत. द्रविड वंशाच्या लोकांना बाहेरून आलेल्या आर्यांनी कपट, कारस्थान करून पराजित केले आणि सत्तेवर विराजमान झाले असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. त्याप्रित्यर्थ इतिहासकारांकडून अनेक ऐतिहासिक दस्ताऐवज आज उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. साहजिकच कोल्हापूर संस्थानातसुद्धा द्रविड वंशीयांची संस्कृती आणि राज्यव्यवस्था नांदत होती. त्याबाबत स्पष्टता देणारी अनेक दस्ताऐवज उपलब्ध आहेत. द्रविड संस्कृतीत 'कोल्हा' हा प्राणी झेंड्याचे प्रतीक म्हणून वापरले जात होते. पुढे संस्थानाच्या नावात कोल्हा या प्राण्याच्या नावाचे समावेशन होऊन 'कोल्हापूर' असे नाव अस्तित्वात आले असल्याचे मत अनेक इतिहासकारांनी मांडले आहे.[११]

आ) भौगोलिक उत्पत्तीविषयीची आख्यायिका

१. या संस्थानात 'कोल्हा' या प्राण्याची संख्या जास्त असल्याने कोल्ह्याचे संस्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. यातूनच पुढे नामविस्तार होऊन कोल्हापूर हे नाव प्रचलित झाले असल्याचे अनेक इतिहासकारांनी नमूद केले आहे.

२. प्राचीन काळी बहुसंख्य लोक हे कोळी (कोल्हा) जमातीचे होते. त्यामुळे राज्यकारभारावर व सांस्कृतिक जडणघडणीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले. साहजिकच त्यांच्या नावाने म्हणजे कोल्हापूर या नावाने हे संस्थान प्रचलित झाले असल्याचे अनेक इतिहासकारांनी नमूद केले आहे.

३. संस्थानामध्ये राजाला 'शगाल' म्हणत असत. 'शगाल कोल्हा' या नावाच्या राजाने राज्यकारभारावर आपला मोठा ठसा उमटवला होता. यावरून कोल्हापूर हे नाव पडले, अशी एक आख्यायिका प्रचलित आहे.

४. कोल्हापूर हे 'कोल्हार' शब्दाचे अपभ्रंश आहे, असे वर्णन विविध कोशात दिसून येते. डॉ. खरे यांच्या मतानुसार, 'कोहलू' यासारख्या शब्दापासून कोल्हापूर हे नाव या नगरीला पडले असावे[१२]

इ) सांस्कृतिक आख्यायिका

करवीरची उत्पत्तीसुद्धा संस्कृतीच्या आधारे कशी झाली हे अशाच वेगवेगळ्या प्रकारे त्यांनी सांगितले आहे. महालक्ष्मीने वसवलेले नगर म्हणून त्याच 'करवीर' हे नाव लागले. करदारी (कर– गदा) कुरवीर, करवीर म्हणजे गदा धारण करणाऱ्या लक्ष्मीचे नगर अशी एक उत्पत्ती सांगितली जाते. कोल्हापूर व करवीर या पिता–पुत्रांना काबुली टेकडीवर महालक्ष्मीने ठार मारले म्हणून या राक्षसांच्या नावावरून 'करवीर' हे नाव पडले असावे. करवीर या शब्दाची उत्पत्ती कृपान, हळदी, बेलवडी, चाफेवाडी, पडवळवाडी, ही वनस्पतीवाचक स्थूलवाचक नावांत आढळते. कोल्हापूर वसण्यापूर्वी येथे विपुल प्रमाणात कावेरीच्या झाडांचे आस्तित्व होते, त्यावरून करवीर वा कोल्हापूर हे नाव पडले असावे.[१३]

ई) धार्मिक आख्यायिका

१. पद्मपुराणात अशी एक दंतकथा आहे की, कोल्हासूर नावाचा एक दैत्य होता. त्याला करवीर नावाचा एक मुलगा होता. त्याने आपल्या राजधानीला आपल्या नावावरून कोल्हापूर हे नाव दिले. त्याने आपल्या राज्यातील सर्व धर्म नष्ट करण्यास सुरुवात केली. म्हणून लोकांनी त्याच्यापासून धर्माचे रक्षण करण्यासाठी महालक्ष्मीची प्रार्थना केली. महालक्ष्मीने कोल्हासुराला ठार मारले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा करवीर यांच्यात पुन्हा लढाई चालू झाली; पण त्यालाही तिथे ठार मारले; पण त्यांनी सांगितले की, माझ्या मृत्यूनंतर माझे वंश नष्ट होत आहे. पुढील काळात माझे आणि माझ्या वडिलांचे नाव कोणालाही आठवणार नाही. तेव्हा महालक्ष्मीने त्याला वचन दिले की, कोल्हापूर शहराला कोल्हापूर व करवीर अशा दोन्ही नावांनी संबोधले जाईल. कोल्हासुराचा वध जिथे झाला, ते ठिकाण म्हणून या नगरीला कोल्हापूर हे नाव पडले असावे.[१४]

२. १८५४ ग्रॅहम्स अहवालात करवीर राज्याविषयी असे म्हटले आहे की, पुराणांमध्ये या प्रदेशाची ओळख करवीर या नावाने आहे. करवीर याचा अर्थ महालक्ष्मीदेवींचा प्रदेश किंवा महालक्ष्मीची गादी असणारा प्रदेश असा होतो. महापूर आल्यानंतर त्या प्रदेशातील लोकांना वाचवण्यासाठी कोल्हे या टेकडीवरून जो विधी केला जात होता, त्यावरून कोल्हापूर हे नाव विस्तारले गेले, अशी आख्यायिका आहे.[१५]

स. मा. गर्गे म्हणतात, कोल्हापूर हे कोल्हार शब्दाचा अपभ्रंश असू शकेल? तसे असेल तर कमलपुष्पांचे नगर असे त्याचे कलात्मक वर्णन करावे लागेल. कदाचित प्रलयंकर महालक्ष्मी सहकार्याने उत्पादिलेले नगर म्हणून त्याला करवीर हे नाव लाभले असेल. कदाचित कोल्हासुराचे वधस्थान म्हणून त्याला कोल्हापूर म्हटले गेले असावे.[१६] महालक्ष्मीचे मंदिर झाल्यापासून करवीर हा शब्द वापरला गेला आहे. यापूर्वी कोल्हापूर, कोरलागिरी अशा नावांचा उल्लेख आढळतो. याचा अर्थ असा की, कोल्हापूरचे देवालय स्थापन होण्यापूर्वी व नंतर मी कोल्हापूर शहराचे नाव कोल्हापूर असेच होते. कोल्हापूर म्हणजे शांततेचे गाव म्हणूनही ओळखले जाऊ लागले.[१७]

छत्रपती घराण्याचा राजर्षी शाहूंपर्यंतचा इतिहास

सोळाव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून सर्वसामान्य जनतेला आणि कष्टकऱ्यांना न्याय दिला होता. आपल्या धोरण आणि निर्णयातून त्यांनी जनहिताय राजाचा आदर्श निर्माण केला होता. या मराठयांच्या स्वराज्यात सर्वसामान्य रयत, शेतकरी, महिला व सर्व जाती धर्मातील नागरिकांना त्यांनी सन्मानाचे जीवन मिळवून देण्याचा प्रयत्न केला. संस्थानाचा कारभार पाहताना महाराजांनी हाच आदर्श वारसा पुढे चालवला. अशा पराक्रमी वंशाचे वारस म्हणून कोल्हापूर घराण्याचा इतिहास समजून घेणे हे क्रमप्राप्त ठरते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य रयतेच्या हिताचे राज्य होते. मोगलांविरूद्ध अठरापगड जातींतील लोकांना एकत्र करून स्थापन केलेल्या या स्वराज्यामध्ये अनेक प्रजाहिताचे निर्णय छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतले. दुष्काळामध्ये शेतसारा कमी करून महाराज शेतकऱ्यांच्या आणि इतर सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी नेहमीच राहिले.

रयतेच्या कल्याणासाठी ते कायम झटत राहिले. शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्याचे जनक म्हणूनच ओळखले जाते. अंतर्गत आणि बाह्य शत्रुंशी यशस्वी लढा देत महाराजांनी एक समताधिष्ठित वारसा पुढच्या पिढीला दिला. राज्यकारभारासाठी त्यांना खूप कमी कालावधी लाभला. त्यांच्यानंतर त्यांच्याइतकेच समर्थ असलेले छत्रपती संभाजी राजांकडे साम्राज्याची सूत्रे आली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण पराक्रमाच्या आणि प्रतिभेच्या जोरावरच झाली होती. युद्धकौशल्य, डावपेच, आत्मकौशल्ये यांसारख्या अनेक कौशल्यांमध्ये पारंगत करून त्यांना राज्यकारभार चालवण्याच्या दृष्टिकोनातून प्रशिक्षित केले होते.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्याची सूत्रे संभाजी महाराजांकडे सहजरीत्या आली नाही. त्यावेळी मोगलासारख्या परकियाबरोबरच विविध संस्थानिक आणि स्वकियांसोबतच्या कुरघोडीविरोधात लढावे लागले. यात निर्णायक लढा देत संभाजी महाराज यांनी आपल्या वडिलांनंतर स्वराज्याचा विस्तार अतिशय प्रभावीपणे केला. लोककल्याणकारी राज्यासाठी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. मोगल साम्राज्याच्या विरोधामध्ये मोठा संघर्ष करून मराठा साम्राज्य अतिशय प्रभावीपणे राखले. मात्र मोगल सम्राट औरंगजेब हा मोठा धूर्त राजकारणी होता. त्याने टाकलेल्या कपटी डावपेचांमुळे संभाजी महाराज त्याच्या हाती लागले आणि औरंगजेबाकडून अतिशय क्रूर रीतीने ते ठार मारले गेले.

संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर मराठा साम्राज्यात अंतर्गत अस्थिरता आणि राजकीय अराजकता निर्माण झाली होती. याच काळात ब्रिटिशांनी भारतात आपली पाळमुळे रुजवण्यास सुरुवात केली होती. छत्रपती संभाजी महाराजांनंतर मराठी साम्राज्याचा विस्तार कोण करेल? स्वराज्याचे रक्षण कोण करेल यासारखे प्रश्न पडलेले होते. संभाजी महाराजांनंतर त्यांचे सुपुत्र हे औरंगजेबाच्या कैदेत असल्याने, त्यानंतर राजाराम महाराज यांनी मराठा साम्राज्याचे रक्षण केले, परंतु अल्पवधीत १७०० मध्ये त्यांचे निधन झाल्याने त्यांची पत्नी महाराणी ताराबाई यांनी समर्थपणे मराठा राज्याचे नेतृत्व करून राज्य सुरक्षित केले. शाहू महाराजांची कैदेतून सुटका झाल्यावर मात्र मराठा राज्यावर दोन पक्षांनी हक्क सांगितला. त्यातच ब्रिटिशांनी

घेतलेल्या धोरणांमुळेही स्वराज्यात पुढे फूट पडून १७०८ ला सातारा व इ.स.१७१० ला कोल्हापूर गादी निर्माण होऊन पुढे ब्रिटिशांच्या काळातही संस्थान आपले अस्तित्व राखून होते.

वारणेचा तह

कोल्हापूर आणि सातारा या दोन्ही संस्थानात मोठा कलह निर्माण झालेला होता. ही दोन्ही संस्थाने मराठा साम्राज्याअंतर्गत एक व्हावीत, अशी छत्रपती संभाजी (पहिले) महाराजांची पुरेपूर इच्छा होती, पण ती फलद्रुप झाली नाही. संभाजी महाराजांच्या काळामध्ये कोल्हापूरच्या संस्थानातील अंतर्गत कलह आणि अविश्वासाचे वातावरण राहिले. या अंतर्गत कलहाचा फायदा ब्रिटिशांना झालेला दिसतो. १७३१ मध्ये सातारकर आणि कोल्हापूरचे संभाजी महाराज यांच्यामध्ये एक करार झाला. तो करार वारणेचा तह या नावाने ओळखला जातो. या तहातील प्रमुख तरतुदीमध्ये प्रादेशिक मुलखाची विभागणी करण्यात आली. उत्तरेस वारणा, ईशान्येस कृष्णा व दक्षिणेस तुंबडा हा प्रदेश संभाजी महाराजाकडे राहिला, तर कोल्हापूर संस्थान वेगळे ठेवण्यात आले.

संभाजी महाराजांच्या निधनानंतर संस्थानाचा राज्यकारभार छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांच्याकडे आला. छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) हे एक पराक्रमी राजे होते. त्यांनी कोल्हापूर संस्थानाअंतर्गत त्यांनी अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. १७६२ ते १८१३ दरम्यान कोल्हापूरची गादी सांभाळून त्यांनी मोठा साम्राज्यविस्तार केला. त्यांनी हाती घेतलेल्या धोरणामुळे त्यांचे काळात संस्थानात निर्माण झालेल्या दुष्काळावर प्रभावीपणे काही उपाययोजना करण्यात आल्या होत्या. याच काळात संस्थानातील विविध गडकरी आणि गडप्रमुखांनी स्वतःला स्वयंघोषित राजा म्हणून स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे शिवाजी महाराज (दुसरे) यांना या गडकऱ्यांविरोधात मोठा संघर्ष करावा लागला. त्यांनी केलेल्या संघर्षामुळेच संस्थानातील गडकऱ्यांचे बंड, पावनगड बंडासारखी सर्व बंडे मोडीत निघाली.

छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांनी आपल्या कालावधीत राज्यात सुव्यवस्था आणण्याचे प्रयत्न केले होते. मोठे बंड मोडीत काढून कोल्हापूर संस्थान एकत्र ठेवण्यात त्यांना यश आले;

पण अल्पावधीतच त्यांचे १८१३ ला निधन झाले. मात्र शिवाजी महाराजांच्या निधनाने संस्थानांमध्ये ब्रिटिशांचा हस्तक्षेप वाढू लागला.

छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांच्या निधनानंतर संस्थानाच्या राज्यकारभाराचा पदभार त्यांचे चिरंजीव शंभू बाबासाहेब महाराज (तिसरे संभाजी) यांच्याकडे आला. बाबासाहेब महाराजाच्या काळात संस्थानात अतिशय असुरक्षिततेचे वातावरण तयार झाले होते. बाबासाहेब महाराज राज्यकारभाराच्या दृष्टिकोणातून सक्षम नेतृत्व म्हणून पुढे येण्यास मर्यादा जाणवू लागल्या. त्यामुळे संस्थानात अंतर्गत बंडाळी माजून त्यातूनच १८२१ मध्ये त्यांचा खून झाला. बाबासाहेब महाराज यांच्या खुनानंतर संस्थानाच्या राजगादीवर शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज आले. दरम्यानच्या काळात भारताच्या विविध संस्थानांमध्ये ब्रिटिशांचा हस्तक्षेप वाढत होता. साहजिकच कोल्हापूर संस्थानातही ब्रिटिशांच्या कारवाया आणि त्यांचा हस्तक्षेप वाढू लागला. संस्थान आणि यांच्यातील संबंध हे वादग्रस्त होत गेले. पर्यायाने शहाजी महाराज आणि ब्रिटीशांचे नेहमीच तणावाचे संबंध राहिले होते. त्यामुळे ब्रिटिशांनी विविध करारातून संस्थानावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केला; पण शहाजी महाराज कारकीर्द संस्थानासाठी फार चांगली नसल्याचे अनेक इतिहासकार दावा करतात. शहाजी महाराजांनंतर त्यानंतर छ. शिवाजी (तिसरे) उर्फ बाबासाहेब महाराज यांनी १८३८ ते १८६६ या कालावधीत कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली. या काळात त्यांना अनेक अंतर्गत बंडाळीला सामोरे जावे लागले. उदाहरणार्थ, गडकरी लोकांनी बंड केले होते. या बंडाचा यशस्वीरीत्या नायनाट करून कोल्हापूर संस्थानाअंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्यात प्रयत्न केला; पण त्याला फारसे यश मिळाले नाही. कारण त्याच काळात ब्रिटिशांचा साम्राज्य विस्तार हा जास्तीत जास्त वाढत होता. अत्याधुनिक शस्त्र व सैन्याच्या आधारे ब्रिटिशांना विविध संस्थानात आपले अधिपत्य प्रस्थापित करण्यात यश आले होते. कोल्हापूर संस्थानामध्येसुद्धा त्यांनी परिस्थितीचा फायदा घेऊन आपले नियंत्रण प्रस्थापित करण्यात यश मिळवले आणि कोल्हापूरचे पहिले पॉलिटिकल एजंट म्हणून ब्रिटिशांकडून मेजर ग्रॅहम यांची नियुक्ती करण्यात आली.[१८]

इ.स. १८६६ ला छत्रपती शिवाजी उर्फ बाबासाहेब महाराज यांच्या निधनानंतर सन १८६६ ते १८७० दरम्यान संस्थानाच्या राजगादीवर पाटणकर घराण्यातून राजाराम यांना दत्तक घेण्यात

आले. त्यांनी कारभार करताना अनेक महत्त्वपूर्ण धोरणे घेऊन संस्थानाच्या विकासाला मोठी चालना दिली. संस्थानात राजाराम हायस्कूल सुरू करून प्रामुख्याने शिक्षणाचा प्रसार करण्याचा नावीन्यपूर्ण प्रयोग केला. त्यांच्या पुढाकारातून १८७० मध्ये संस्थानात राजाराम कॉलेज उभे राहिले. मात्र राजाराम महाराजांचेही लवकरच अल्पवयात परदेश दौऱ्याचेवेळी परदेशातच इटली येथील फ्लॉरेन्स येथे निधन झाले. त्यामुळे संस्थानाची सुत्रे चौथे शिवाजी महाराज (१८७१-१८८३) यांच्याकडे आली. कोल्हापूर संस्थानाचे अंतर्गत संस्थानिक म्हणून जन्मजात वारसा कोणी राहिलेला नव्हता. त्यामुळे संस्थानाचा राज्यकारभार चालवण्यासाठी सावर्डेकर घराण्यामधून चौथे शिवाजी यांना दत्तक घेण्यात आलेले होते. या छत्रपतींच्या राजवटीत त्यांनीसुद्धा संस्थानामधील त्यावेळच्या दुष्काळस्थितीला, अंतर्गत बंडाळीला तोंड देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला होता तथापि, त्यांचा भ्रमिष्ट मनस्थितीतच मृत्यू झाला. मृत्यूसमयी त्यांनाही संतती नसल्याने वारसा प्रश्न पुनःश्च निर्माण झाला त्यावेळी त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी घाटगे घराण्यातून इ. स. १८८४ ला शाहू छत्रपती यांना दत्तक घेतले आणि त्यांची कारकीर्द ही पुढे अभूतपूर्व अशीच ठरली.[१९]

कोल्हापूर संस्थानाची छत्रपती शाहूपूर्वकालीन परिस्थिती

इंग्रजांचा एकछत्री अंमल जवळपास सर्वच भारतात पसरलेला होता. अनेक राज्ये-संस्थाने या ना त्या कारणांनी इंग्रज राजवटीच्या अंमलाखाली प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आलेले होते. कोल्हापूर संस्थानानेदेखिल आपले सार्वभौमत्व हे इंग्रजांबरोबर १८१२ मध्ये झालेल्या करारानुसार गमावले होते. पुढे हळूहळू संस्थानावर इंग्रजांची पकड घट्ट होण्यासारख्या घटना घडत गेल्या व ते ब्रिटिशांचे मांडलिक संस्थान बनले. संस्थानाचा राज्यकारभार हा शाहू महाराज राजगादीवर येईपर्यंत मुख्यत्वे इंग्रजांनी नेमलेल्या पॉलिटीकल एजन्ट वा दिवाणामार्फतच चालत असे. प्रशासनाचा कारभार हा राज-प्रतिनिधी मंडळाच्या हातात होता.

अ) प्रशासकीय व्यवस्था

शाहू महाराज सत्तेवर येण्यापूर्वी कोल्हापूरात पारंपरिक प्रशासन कार्यप्रणालीतून राज्यकारभार चालविण्यात येत असे. साधारणत: या पारंपरिक पद्धतीत अष्टप्रधान मंडळ या पद्धतीची रचना छत्रपती शिवाजी (तिसरे) यांच्या कालावधीपर्यंत अंमलात होती; परंतु त्यांच्यानंतर मात्र

कोल्हापुरात ब्रिटिशांच्या धोरणांमुळे त्यांच्या सल्ल्यानुसार वा करारानुसार राज्यकारभार होण्यास सुरवात झालेली होती. पॉलिटिकल एजन्ट वा त्यांच्या हेतूंना सहाय्यकारक अशा अधिकाऱ्याची नेमणूक करून त्यास कारभाराचे मुखत्यारी दिली जाई. दुसरीकडे जहागीरदार यांचेही त्यांच्या क्षेत्रावर अंमल असल्याने तो भाग अप्रत्यक्षरीत्याच नियंत्रणात होता. राजगादीवर कोणीही छत्रपती असले, तरी मुलकी व लष्करी अधिकार इंग्रजांच्या अधिकारात असल्याने तसेच उद्दाम नोकरशाहीवर्ग त्यांच्या सहाय्याला असल्याने प्रजेवर अन्याय होतच होते. अराजकता, विषम न्यायनिवाडा, कामामध्ये दिरंगाई अशा प्रकारचा कारभार त्यावेळी चालू होता.

आ) शेतीप्रधान राजकीय अर्थव्यवस्था

ब्रिटिश काळामध्ये भारत हा देश कृषिप्रधान देश होता. भारतातील अर्थव्यवस्था ही शेतीच्या उत्पादनावर चालत होती. शेतीमधून निघणारे उत्पादन हे प्रामुख्याने विनिमयाचे व वितरणाचे प्रमुख साधन होते. सर्वसामान्य जनता शेतीशी व शेती व्यवहाराशी निगडीत व्यवसायांमध्ये आपला उदरनिर्वाह करत होती. अठरा अलुतेदार आणि बारा बलुतेदार यांच्यामुळे येथील समाजजीवन स्वयंपूर्ण होते. १८९१च्या आकडेवारीचा विचार केला असता जवळपास ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीवर होती. साहजिकच कोल्हापूर संस्थानातील अर्थव्यवस्था, येथील राजकीय व्यवस्था हीदेखिल सर्व कृषी क्षेत्रावरच आधारित होती.[२०]

इ) अवर्षणग्रस्त कोल्हापूर संस्थान

कोल्हापूरची अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान असली तरी येथील शेती नैसर्गिक पावसावरच आधारित होती. साहजिकच शाहू महाराजपूर्व काळात लहरी हवामानामुळे येथे कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ पडत होता. परिणामी अनेक नागरिकांची उपासमार होऊन ते मृत्यूमुखी पडत होते. महाराजांकडे राज्यकारभार येण्याअगोदर संस्थानात केवळ दोन ते तीन टक्केच सिंचनाची सुविधा होती. सिंचनाच्या सुविधेमध्ये प्रामुख्याने नदी आणि नाले याचा समावेश होता. नदी आणि नाल्याच्या काठची शेती तेवढी सिंचनाखाली येत होती. त्यापासून दूर असलेल्या शेतीसाठी सिंचनसुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शासकीय स्तरावर कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले जात नव्हते. लहरी पाऊसमानापुढे संस्थानातील जनता हतबल झालेली

होती. निसर्गाचा कोप होणे ही इश्वरेच्छा आहे, अशा समजूतीत इथली सर्वसामान्य जनता जगत होती.

ई) पारंपरिक पीक पद्धती

शाहू महाराज पूर्व कालखंडात संस्थानातील बहुतांश शेती ही पारंपरिक पीक आधारित होती. त्यामुळे येथे उत्पादित होणारा शेतमाल हा आधुनिक बाजारपेठत विकला जाईल, असा नव्हता. पारंपरिक पिकांमध्ये अन्नधान्याचा विशेषतः ज्वारी, बाजरी, वरई, गहू, तूर, हरभरा, भूईमूग आणि भात या पिकांचा समावेश होता.[२१] या पारंपरिक पिकांना बाजारपेठेत मूल्यही अतिशय कमी मिळत होते. तरीही या पिकाद्वारे स्थानिक शेतकऱ्यांची अन्नधान्याची गरज भागवली जात होती. शेती लागवडीतील अन्नधान्याच्या पिकांतून त्यांना आर्थिक उत्पन्न किंवा नफा कमावता येत नव्हता. पर्यायाने येथील शेतीचे अर्थकारण खूप कमी होते. साहजिकच सर्वसामान्यांची उपजीविकाही अतिशय तुटपूंजी राहिली. काही प्रमाणात तंबाखू, भुईमूग आणि ऊस यांचा आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिकांमध्ये समावेश होतो पण तोही अगदी त्रोटक समावेश होता, ज्यातून म्हणावा तितका आर्थिक फायदा येथील शेतकऱ्यांना घेता येत नसे. येथील बहुतांश शेतकऱ्यांचा कल पारंपरिक पिकांची लागवड करण्याकडे असे. साहजिकच संस्थानाच्या प्रमुख उत्पादनाचा आधार आणि विनिमयाचे माध्यम पारंपरिक पिकांचे उत्पादन हेच होते. परिणामी, या भागाचा विकास मर्यादितच असे.

उ) सावकार आणि कुलकर्णी यांचे वर्चस्व

संस्थानात शाहूपूर्व काळात आधुनिक रोजगाराच्या संधी फारशा उपलब्ध नव्हत्या. शेती हे उत्पन्नाचे एकमेव साधन होते. त्याला लागणारा पैसा हा सावकारांकडून घ्यावे लागत होते. त्यामुळे या सावकार वर्गाच्या हातात येथील अर्थव्यवस्थेच्या नाड्या होत्या. याच जोरावर स्थानिक सावकार वर्ग संस्थानातील शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करत असताना त्यावर मोठ्या रकमेचे व्याज आकारले जात होते. या कर्जापोटी शेतकऱ्यांची जमीन, त्यांच्या घरातील सोने–नाणे आदी गहाण पडत असे.

शाहूपूर्व काळात संस्थानातील कुलकर्णी वतन हे दुसरे महत्त्वाचे वर्चस्व केंद्र होते. स्थानिक पातळीवर म्हणजेच गावाच्या पातळीवर आर्थिक आणि राजकीय अधिकार कुलकर्णी यांना मिळत होते. गावाच्या प्रशासकीय व राजकीय बाबीविषयीचे निर्णय कुलकर्णी घेत होते. गावातील प्रमुख सत्तास्थानापैकी असलेले कुलकर्णी हेच तेथे सावकारी करत असत. त्यामुळे राजकीय सत्ता व सावकारशाही यांच्या केंद्रस्थानीही कुलकर्णी हे होते, हे निश्चित. साहजिकच येथील सर्वसामान्याच्या शोषणाला सावकारांबरोबरच कुलकर्णी यांचाही मोठा हातभार होता, यात शंका नाही. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती डबघाईला येण्यामध्ये किंवा दारिद्र्यवस्था निर्माण होण्यामागील कुलकर्णी वतन हे महत्त्वाचे कारण होते. म्हणून महाराजांपूर्वी संस्थानामध्ये शेतकऱ्यांना बऱ्याचदा कुलकर्णी वतनामुळे योग्य न्याय मिळत नव्हता.[२२]

ऊ) आधुनिक शिक्षणाचा अभाव

एकोणिसाव्या शतकात सार्वत्रिक शिक्षणाची तात्त्विक भूमिका ब्रिटिशांच्या माध्यमातून मांडण्यात आली. ब्रिटिशांनी भारतामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या माध्यमातून शाळा आणि महाविद्यालय सुरू केले होते. यामधून शिकणाऱ्यांत उच्चजातीय लोकांचा समावेश होता. ब्रिटिशांचा धोरणात्मक निर्णय जरी सार्वत्रिक शिक्षणाचा असला, तरी त्यामध्ये सर्वाधिक लाभ आणि प्रवेश करण्याची क्षमता उच्चजातीय तरुण-तरुणीची होती. ब्रिटिशांकडून जरी शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली होती, तरी त्याचा लाभ येथील उच्चजातीय वर्गालाच बहुतेककरून होत होता. मुळा शिक्षणाचा प्रसार करण्यामागे त्यांना येथील राज्यकारभार चालवण्यासाठी प्रशासनास उपयुक्त मनुष्यबळ उपलब्ध होणे इतपतच मर्यादित उद्देश होता. यामुळे या शिक्षण प्रक्रियेमध्ये सर्वसामान्य कष्टकरी लोकांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. कोल्हापुरातही निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते. संस्थानाच्या प्रशासनातसुद्धा ब्राह्मण, पारशी या समुदायाचे भरणा जास्त होता. या समुदायामध्येच साक्षरतेचे प्रमाण जास्त होते. तत्कालीन स्थितीत कोल्हापूर संस्थानातील एकूण साक्षरतेचे प्रमाण केवळ २.८ टक्के होते. साहजिकच बहुतांश समाज हा निरक्षर असल्याकारणाने अंधश्रद्धा आणि कर्मकांडाचा त्यांचेवर प्रभाव होता. मात्र संस्थानाच्या सत्तेवर आलेल्या शाहू महाराजांनी सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळावा आणि शिक्षणानेच समाजाची

उन्नती होईल या विचारांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे शिक्षणाचा निर्णय घेतला. ज्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षणाची दारे खुली झाली.[२३]

ए) अविकसित व्यापारी क्षेत्र

शाहू महाराजपूर्व कालखंडात पारंपरिक शेती उत्पादनावर आधारित कृषी व्यवस्था होती. साहजिकच तिथे व्यापारी क्षेत्राचा विकास न होणे हे स्वाभाविक होते. कारण बाजारपेठेला चालना देऊ शकेल, असे कोणतेही उत्पादन तेथील कृषी क्षेत्रातून उत्पादित होत नव्हते. विशेषतः जे उत्पादन शेतीतून निघे, त्याला बाजारपेठेत तितकेसे मूल्य नव्हते. संस्थानात बाजारपेठेत पर्यायाने व्यापारी क्षेत्रात सुधारणा करण्याबाबत मोठी अनास्था होती. त्याचबरोबर व्यापारी क्षेत्र आणि बाजारपेठेचा विकास व्हावा, यासाठी शासकीय पातळीवर कोणतीही ठोस धोरणे हाती घेतली जात नव्हती. तीच स्थिती दळणवळणाच्या सुविधांबाबतची होती. ब्रिटिश सत्तेच्या माध्यमातून कोल्हापूर शहरातील रेल्वेचे १८९१ मध्ये औपचारिक उद्घाटन झाले होते. कोल्हापूर हे शहर रेल्वेचे स्टेशन म्हणून मान्यतासुद्धा मिळाली होती, मात्र रेल्वे हे व्यापारी क्षेत्राचा विकास करण्यासाठी उपयुक्त ठरेल, या दृष्टिने पूर्वी अजिबात विचार करण्यात आला नव्हता.

ऐ) अविकसित औद्योगिक क्षेत्र

शाहू महाराजपूर्व काळात संस्थानात ना औद्योगिक विकास झालेला होता ना त्यासाठी सकारात्मक वातावरण होते. त्यामुळे औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यासाठी अगदी प्रशासकीय पातळीवर किंवा धोरणात्मक पातळीवरही काही निर्णय घेतले जावेत, हा विचारसुद्धा नसल्याने त्या पातळीवर उदासीनताच होती.

शाहू महाराजांअगोदर संस्थानात जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट, राजाराम महाविद्यालय यांसारख्या बोटावर मोजण्याइतक्या संस्था होत्या. या संस्थेद्वारे मिळणाऱ्या प्रशिक्षणातून तांत्रिक कौशल्य प्राप्त मनुष्यबळ निर्माण होत होते, हे जरी खरी असले, तरी तेथे औद्योगिक विकास एका मर्यादेपर्यंत होता. कारण संस्थानात औद्योगिक विकास साधण्यासाठी

वित्तीय पुरवठा होणे आवश्यक असते, त्यासाठी वित्तिय बँका स्थापन करणे आवश्यक असते. मात्र शाहूपूर्व काळात औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून कोणतेही प्रयत्न न झाल्यामुळे येथे ना रोजगार निर्माण झाला, ना एखाद्या कारखान्याची निर्मिती झाली. स्थानिक पातळीवरील केवळ आठ टक्के क्षेत्र औद्योगिक क्षेत्राखाली होते. या सर्व परिस्थितीची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यामुळे पुढे राजगादीवर आल्यावर त्यांनी संस्थानात औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून अनेक धोरणे हाती घेतली. औद्योगिक क्षेत्राला पुरेसा औद्योगिक पुरवठा व्हावा, यासाठी त्यांनी वित्तीय बँका निर्माण केल्या. ज्यातून संस्थानाची वाटचाल औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या दिशेने होत गेली.

ओ) जातीधर्माचे वर्चस्व आणि अंधश्रद्धा, कर्मकांडात बुडालेला समाज

शाहूपूर्व काळात सर्वसामान्य जनतेच्या व्यवहारात जातीचे आणि धर्माचे प्रभुत्व होते. संस्थानात जातीभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, कर्मकांड यासारख्या अनेक अनिष्ट रूढी आणि परंपरा आदी अस्तित्वात होत्या. त्यामुळे येथील सामान्य जनता मानसिक गुलामगिरीत जगत होती. बहुंताश जनसमुदाय अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात खितपत पडला होता. जातीय आणि धार्मिक मानसिकता असल्यामुळे लोकांना येणाऱ्या संकटाला सामोरे जाण्याची मानसिकतासुद्धा नव्हती. दुष्काळाचे किंवा इतर कोणतेही संकट असेल, तर हा निसर्गाचा कोप आहे, अशा मानसिकतेत जनता सामोरी जात होती. देवाधर्माच्या नावाखाली त्यांचे खूप शोषण होत होते. जात आधारित भेदभावातून विशिष्ट जनसमुदायावर अन्याय अत्याचार होत होते आणि ते सर्व एक मागील जन्माच्या कर्मावर आधारित असल्याचे त्यांच्यावर बिंबवले जात असे. त्यामुळे येथील जनता मानसिक गुलामगिरीमध्ये जगत होती. महिलांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य अस्तित्वात नव्हते. शाहूपूर्व कोल्हापुरात आधुनिक शिक्षण अस्तित्वात नसल्यामुळे कष्टकरी समाजाची अवस्था अत्यंत गुलामीची आणि दयनीय होती. साक्षरतेचे प्रमाण अतिशय अल्प असल्यामुळे बहुतांश समुदाय अज्ञानीच राहिला होता. त्यामुळे शाहू महाराज राजगादीवर आल्यानंतर त्यांनी सार्वत्रिक शिक्षण धोरणाचा अवलंब केला.

ब्रिटिशांचे अधिपत्य आणि संस्थानाची स्वायत्तता

अठराव्या शतकात ब्रिटिशांनी आपले साम्राज्य विस्तारण्यास सुरुवात केली होती. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला होता. ब्रिटिशांनी साम्राज्यविस्तार प्रामुख्याने दोन पातळीवर केला. एका बाजूला ज्या संस्थानाचा विस्तार हा मोठा आहे, त्या ठिकाणी त्यांनी आपल्या प्रत्यक्ष वसाहती स्थापन करण्याचा विचार केला. त्या राज्यांमध्ये अप्रत्यक्षरीत्या एकछत्री अंमल अंमलात आणून त्यावर आपले अधिपत्य प्रस्थापित केले. दुसऱ्या बाजूला अप्रत्यक्षरीत्या काही राज्याचे सार्वभौमत्व आपल्या राजकीय प्रतिनिधिच्या माध्यमातून साम्राज्यविस्तार करण्यास सुरुवात केली.

दुसरे छत्रपती शिवाजींच्या काळात ब्रिटिशांचा हस्तक्षेप वाढून त्याचा अंमल सुरू झाला. त्यामुळे संस्थानाच्या सार्वभौमत्वाला बाधा आली. सन १८१२ मध्ये त्यांनी शिवाजी महाराजांना एक करार करण्यास भाग पाडले, ज्यामध्ये कोल्हापूर संस्थानाने इंग्रज सरकारचा सल्ला घेतल्याशिवाय कोणत्याही परकीय सत्तेची लढाई करू नये. तसा काही प्रसंग उद्भवल्यास प्रथम इंग्रजांना कळवावे, अशा काही अटी होत्या. या करारामुळे संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्व आणि सार्वभौमत्व नष्ट झाले.

१८२६ मध्ये ब्रिटिशांनी पुन्हा एकदा कोल्हापूर संस्थानावर काही बंधने घातली. ब्रिटिशांनी कोल्हापूरच्या लष्करी अधिकारावरसुद्धा मर्यादा आणणारा आणखीन एक करार करण्यास भाग पाडले. तो करार म्हणजे यापुढे संस्थानाचा राज्यकारभार हा कंपनी सरकारच्या पंसतीच्या अधिकाऱ्याच्या नेमणूकीद्वारेच केला जाईल. या कराराद्वारे संस्थानाकडील लष्करी व मुलकी अधिकार काढून घेऊन ते इंग्रज आणि कंपनी बहाद्दरांकडे देण्यात आले. त्यामुळे यापुढे आता संस्थानावर असलेल्या छत्रपतींना लष्करी व मुलकी अधिकार असणार नाहीत, हे या कराराने सिद्ध झाले. त्यानंतर पुढे ब्रिटिशांनी १८४४ मध्ये दाजी कृष्ण पंडित यांची कारभारी म्हणून नेमणूक केली. यामुळे संस्थानात ब्रिटिशांविरूद्ध रोष निर्माण होऊ लागला. विशेषतः ब्रिटिशांच्या विरोधात गडकऱ्यांकडून उठाव करण्यात येऊ लागले. हे उठाव मोडून काढण्यासाठी संस्थानावर आपले पूर्ण वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटिशांकडून कोल्हापूर राज्यात मेजर ग्रॅहम याची पॉलिटिकल सुपरिटेंडेंटपदी नेमणूक करण्यात आली. या पॉलिटिकल सुपरिटेंडेंटला

संस्थानाचे सर्व मुलकी व लष्करी अधिकार प्रदान करण्यात आले. पुढे याच पॉलिटिकल सुपरिटेंडेंटचे पॉलिटिकल एजंट या नावांमध्ये रूपांतर झाले. अशाप्रकारे ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यवादी धोरणातून कोल्हापूर संस्थानावरही आपले नियंत्रण प्रस्थापित केले. कोल्हापूर संस्थान अंतर्गत होणाऱ्या घडामोडी, मुलकी व लष्करी अधिकार यासंदर्भातील सर्व नियंत्रण ब्रिटिश राजवटीकडे आले. कोल्हापूर संस्थानावर ब्रिटिशांचे वर्चस्व निर्माण झाल्याने संस्थानाची स्वायत्तता पूर्णतः नष्ट झाली.[२४]

शाहू महाराजांची जडणघडण

शाहू महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत राजा कसा असावा व राज्यकारभार हा रयतेसाठी कसा असावा याचे उदाहरण प्रत्यक्ष आपल्याच कृतीतून दाखवून दिले होते. जयसिंगराव घाटगे कागलकर यांचा थोरला मुलगा यशवंतराव (जन्म : २६ जून १८७४) यांना छत्रपती घराण्यात दत्तक घेण्यात आले. १७ मार्च १८८४ रोजी त्यांचे दत्तकविधान झाले आणि छत्रपती शाहू महाराज असे त्यांचे नामकरण करण्यात आले. कोल्हापूर संस्थानाच्या इतिहासात हा योग पुढे जाऊन कायम चिरस्मरणीय ठरला. पुढील काळात शाहू महाराजांनी आपल्या संस्थानाची बांधणी आणि उभारणी समता, न्याय या आधुनिक मूल्यांवर केली. विविध लोकोपयोगी कामे करून जनतेला प्रगतीची दिशा दाखवली. साहजिकच त्यांची कारकीर्द, त्यांची लोक कल्याणाची धोरणे समजून घेताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या जडणघडणीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

१) आबासाहेब घाडगे यांच्यांकडून मिळालेला पुरोगामी वारसा

छत्रपती शाहू महाराजांचे वडील आबासाहेब घाटगे उर्फ जयसिंगराव हे पुरोगामी विचाराचे व्यक्तिमत्त्व होते. कागलच्या थोरल्या पातीचे जहागीरदार म्हणून ते नावारूपाला आले होते. १८८२ मध्ये कोल्हापूरचे रीजेंट म्हणून त्यांनी काम पाहिले होते. बाबासाहेब यांनी कागलच्या जहागिरीकडून मुलांसाठी अकरा शाळा काढल्या होत्या आणि मुलींसाठी एक शाळा काढली होती. शिवाय जहागिरीच्या भागात सर्वसामान्यांसाठी दोन इंग्रजी माध्यमाच्या शाळासुद्धा सुरू केल्या होत्या. आधुनिक विचारांच्या आधारे समाज बदलता येतो, ही आबासाहेब घाटगे यांची धारणा होती. त्यांच्यामुळे कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणाला चालना दिली गेली. संस्थानाची

प्रगती व्हावी, यासाठी आधुनिक शेती कशाप्रकारे केली जावी, शेतीसोबतच पशुसंवर्धनाची आवश्यकता व त्याची आवड जोपासली जावी, यासाठी ते उत्कृष्ट जनावरांचे आणि उत्कृष्ट शेतीमालाचे प्रदर्शन भरवले जाई.

शाहू महाराज यांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यामुळे आबासाहेब घाटगे यांनी आईची उणीव भरून काढून महाराजांना लहानाचे मोठे केले. शाहू महाराज सर्व क्षेत्रांमध्ये पारंगत व्हावेत, यासाठी आबासाहेबांनी महाराजांना आधुनिक शिक्षणाची गोडी लावली. याचा प्रभाव महाराजांच्या जीवनावरती पडल्याचे दिसून येते.[२५]

२) आदर्श शिक्षक

शाहू महाराजांना एका बाजूला वडिलांचा पुरोगामी वारसा मिळाला, तर दुसऱ्या बाजूला लहानपणापासूनच चांगले आणि आदर्श व्यक्तिमत्त्व असलेले शिक्षक मिळाले. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वची घडण झालेली दिसून येते. सर एस. एम. फ्रेझर आणि सर रघुनाथराव व्यंकोजी सबनीस या दोन शिक्षकांचे महाराजांना मार्गदर्शन लाभले. सर फ्रेझर आधुनिक विचाराचे आणि चांगले शिक्षक होते. ब्रिटिशांच्या प्रशासकीय सेवेमध्ये आयसीएस अधिकारी म्हणून सर फ्रेझर यांची नेमणूक झाली होती. १८८९ मध्ये इंग्रज सरकारने त्यांची महाराजांचे ट्यूटर आणि गार्डियन म्हणून नियुक्ती केली. सर फ्रेझर यांनी महाराजांना खूप चांगल्या प्रकारे घडविले.

रघुनाथ सबनीस हे सुद्धा एक अत्यंत बुद्धिमान व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व होते. शाहू महाराजांना राज्यकारभाचे शिक्षण देण्यात त्यांचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. संस्थानाचा राज्यकारभार स्वीकारल्यानंतर शाहू महाराजांनी त्यांची हुजूर चिटणीस म्हणून नियुक्ती केली होती. सबनिसांच्या मार्गदर्शनाखाली महाराजांनी राज्यांमध्ये अनेक सुधारणा घडवल्या. पुढे सबनीस संस्थानाचे दिवाणही झाले.

एकूणच महाराजांच्या जडणघडणीमध्ये सबनीसांचे महत्त्वाचे योगदान राहिले. कारण त्यांच्या शिकवणुकीत आधुनिक आणि परंपरा यांचा समन्वय होता. त्यांचे इंग्रजीबरोबरच संस्कृत भाषेवरही प्रभुत्व होते. महाराजांना त्यांनी एकनिष्ठतेची आणि आधुनिक मूल्याची शिकवण दिली, त्याचबरोबर सल्लामसलत करून राज्यकारभार चालवण्याचे त्यांनी महाराजांना प्रशिक्षण दिले.[२६]

३) शैक्षणिक काळातील पर्यटनाचा प्रभाव

शाहू महाराजांचे सन १८८५-१९९४ या काळात पुस्तकी शिक्षण पूर्ण झाले होते. पुढे राज्याचे राज्यकर्ते म्हणून त्यांची कारकीर्द नि:पक्ष अशा पातळीवरची व्हावी, त्यांच्यात राज्यकारभारासाठी केवळ पुस्तकांमधील ज्ञान पुरेसे नसून त्याबरोबरच प्रत्यक्ष अनुभवाची साथ मिळून ते प्रगल्भ होणे अत्यंत गरजेचे आहे, शिवाय त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडावे हे त्यांचे गुरु सर फ्रेजर ओळखून होते. यासाठी त्यांनी एकूण तीन शैक्षणिक सहलींचे नियोजन केले होते.

१) १६ नोव्हेंबर १८९० ते २७ डिसेंबर १८९० या काळात उत्तर भारतातील सहलीमधून तेथील समाजव्यवस्था, विविध व्यक्तींची ओळख, नाशिक येथील तीर्थस्थळे आणि त्यामधील भाविकांची लूटमार, पुजाऱ्यांचा लोभी कारभार इ. जवळून बघणे शक्य झाले.

२) ५ नोव्हेंबर १८९१ ते २४ डिसेंबर १८९१ या काळात त्यांनी दक्षिण भारतातील मद्रास, तंजावर, धारवाड, विजापूर, हैद्राबाद, पाँडेचेरी, श्रीलंका, बंगळूर, म्हैसूर इ. दक्षिण भागात सहल केली. तेथील अनेक प्रेक्षणीय स्थळांची माहिती त्यांना झाली. तंजावर-म्हैसूर येथील लोकांच्या प्रेमाने ते जसे भारावून गेले होते, तसेच मद्रास येथील माणसांकडून गाड्या ओढल्या जाणाऱ्या दृश्यामुळे अस्वस्थ ही झाले होते. माणूसपण जपण्यासाठी त्यांच्यावर अन्याय होऊ नये हा धडा त्यांना तेथेच मिळाला असावा.

३) २८ ऑक्टोबर १८९२ ते २४ डिसेंबर १८९२ या शेवटच्या टप्प्यातील देशांतर्गत सहली महाराजांनी हा पुणे, मुंबई, बडोदा, जोधपूर, दिल्ली, हरीद्वार, पेशावर, कराची आदी विविध भागांत केल्या होत्या. त्या दरम्यानच्या सहलीत त्या मुलुखातील आदरतिथ्य, सुंदर कलाकुसरीची वास्तू, सुवर्णमंदिरातील शिस्त, भव्यता, कराचीतील त्यांच्या आजोबांच्या कथा, आणि मिश्र संस्कृतीच्या मुंबईचे दर्शन यामुळे त्यांच्या विचारांच्या दिशा आधुनिक झाल्या.

या तीनही पर्यटनामुळे शाहू महाराजांच्या जडणघडणीत, त्यांच्या जाणिवेत प्रगल्भता येऊन त्यांचा राज्यकारभार हा नेहमीच प्रजाहित जपणारे असाच राहिला.[२७]

४) पाश्चिमात्य जगाचा प्रभाव

संस्थानाच्या राज्यकारभाराचा पदभार हाती घेतल्यानंतर शाहू महाराजांनी इंग्लंड आणि इटलीसारख्या देशांचा प्रवास केला. या देशांमधील औद्योगिक क्रांतीमुळे रोजगारनिर्मिती, आधुनिक प्रचार-प्रसार झालेला होता. शेतीच्या क्षेत्रामध्ये विकास झालेला होता. जुन्या आणि पारंपरिक मूल्यांपासून फारकत घेऊन समाजात गतीशीलता प्राप्त करून देण्यात या क्रांतीने मोठे योगदान दिले होते. या सर्व क्रांतीचा प्रभाव महाराजांवर पडलेला होता. संस्थानातील जनता भौतिकदृष्ट्या संपन्न झाली पाहिजे, आधुनिक शिक्षणाच्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हायला हवी, जातीय व्यवस्थेसारखी मागास समाज व्यवस्था नष्ट झाली पाहिजे, सर्वांना शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे. शेतीच्या क्षेत्रात अत्याधुनिक तंत्राचा उपयोग केला गेला पाहिजे, याची जाणीव शाहू महाराजांना इंग्लड आणि इटलीसारख्या देशाच्या प्रवासानंतर प्रकर्षाने झाली. याच जाणिवेतून महाराजांनी राज्यकारभार करताना संस्थानातील रयतेसाठी शिक्षण, रोजगार यांसाख्या भौतिक गोष्टी उपलब्ध करून देऊन संस्थानात क्रांती घडवून आणली.

५) आधुनिक सामाजिक संस्थांचा प्रभाव

एकोणिसावे शतक हे आधुनिक समाजाचे शतक होते. भारताच्या जडणघडणीमध्ये एकोणिसावे शतक आधुनिक पर्व म्हणता येईल. या काळात सामाजिक संस्थांनी दिलेले योगदान हे भारताची जडणघडण घडवून आणण्यात महत्त्वाचे ठरले. जातआधरित समाजव्यवस्थेमुळे भारतातील बहुतांश लोकसमुदाय अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी-परंपरा, कर्मकांडात जखडलेला होता. या समाजव्यवस्थेत स्त्रियांचे शोषण होत होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात यामध्ये आधुनिक मूल्यांची कास धरणारा एक मध्यमवर्ग सुद्धा उदयाला आला होता.

या मध्यमवर्गाच्या उदयाबरोबर इथे आधुनिक मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी विविध सामाजिक संस्था उभ्या राहिल्या. विशेषतः ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज अशा अनेक सामाजिक संस्थाची स्थापना होऊन समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरांची चिकित्सा करण्यात येऊ लागली. या संस्थांच्या योगदानामुळे धर्माच्या जाचक अटी

आणि शोषण एका मर्यादेपर्यंत शिथिल होऊ शकले. समाजाची जडणघडण करण्यात या संस्थांचे असलेले महत्त्व लक्षात घेऊन काही सामाजिक संस्थांचा विशेषतः आर्य समाज आणि सत्यशोधक समाज यांचा जवळून अभ्यास केला होता. आर्य समाजाच्या प्रभावी संस्कारातून महाराजांना हिंदू धर्मातील कर्मठ रूढी आणि परंपरेच्या विरोधात सक्रियपणे लढण्याची प्रेरणा मिळाली.

महात्मा फुले स्थापित सत्यशोधक समाज हा मुळातच धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा व त्यासोबत ब्राह्मणी वर्चस्वाच्या विरोधात सक्रियपणे लढत होता. साहजिकच सत्यशोधक समाजाचा महाराजांवर मोठा प्रभाव जाणवत होता. सत्यशोधक समाजापासून प्रेरणा घेऊन जातीव्यवस्थेचे विरोधात लढून पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात महाराजांना यश आले होते.[२८]

शाहू महाराजांचा शपथविधी आणि राज्यकारभारास प्रारंभ

महाराजांनी वयाच्या विसाव्या वर्षी संस्थानाच्या राज्यकारभाराचा पदभार हाती घेतला. दि. २ एप्रिल १८९४ रोजी झालेल्या या पदग्रहणाप्रसंगी गव्हर्नर लॉड हॅरिश हे उपस्थित होते. हे राज्य प्रजाजनांसाठी आहे, त्यांचे दु:ख निवारण आणि त्यांच्या कल्याणाप्रद आयुष्याची कामना हेच कर्तव्य असे महाराजांनी मनाशी ठरवून स्वत:च्या राज्याभिषेकावेळी तसे स्पष्टपणे आपल्या प्रजाजनांसमोर जाहीर केले.

जाहिरनामा[२९]

फाल्गुन वद्य ११ इंदुवासंरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यांजकडून–

या जाहीरनाम्याच्या द्वारें कोल्हापूर इलाख्यांतील आमच्या तमाम प्रजाजनांस जाहीर करण्यात येते कीं, आजपर्यंत आम्ही अल्पवयी असल्या कारणाने कोल्हापूर संस्थानचा राज्य कारभार कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन यांच्या हातून चालविण्यात येत होता ; परंतु आम्ही आता प्रौढावस्थेत आल्या कारणाने आज रोजी त्यांची कारकीर्द संपून आमच्या राज्याचा पूर्ण अखत्यार आमच्या हाती आला आहे, व त्याप्रमाणे आम्ही आज म्हणजे तारीख दोन माहे एप्रिल इसवी सन एक हजार आठशे चौऱ्याण्णव पासून तो चालविण्यास सुरुवात केली आहे.

आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धि व्हावी, व आमचे संस्थानची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतु परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहान थोर जाहागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदिकरून तमाम प्रजाजन शुद्ध अंतःकरणापासून 'मोठया राजनिष्ठेनें आह्मांस सहाय्य करतील अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दीर्घ काळपर्यंत चालवून सफल करावी अशी मी त्यां जगन्नियंत्या परमात्म्याची एक भावें प्रार्थना करितो.

कोल्हापूर, नवीन राजवाडा

तारिख २, एप्रिल १८९४.

शाहू महाराजांची संस्थानाच्या प्रमुखपदी निवड झाल्याचा आनंद केवळ कोल्हापूर संस्थानातील थोरा–मोठ्यानाच झाला असे नाही, तर तत्कालीन परिस्थितीत देशातील मोठे प्रस्थ असलेल्या अनेकांनी त्यांचे कौतुक केले. लोकमान्य टिळकांनी आपल्या 'केसरी' वृत्तपत्रातून महाराजांचे अभिनंदन केले. त्या लेखातून टिळकांनी, 'हा दिवस सर्व महाराष्ट्रीय आनंदात तर खरा, पण त्याहून कोल्हापूरच्या प्रदेशासाठी हा एक कपिलाषष्टीचा अपूर्व योग आहे', अशा शब्दात महाराजांचा गौरव केला.[३०]

गोपाळ कृष्ण गोखले यांनी सार्वजनिक सभेतर्फे पुण्यात शाहू महाराजांचे कौतुक केले. त्यावेळी शाहू महाराजाबद्दल बोलताना ते म्हणाले होते की, ''कोल्हापूरची गादी म्हणजे मराठ्याच्या पराक्रमाचे आज हयात असलेले दृश्य चिन्ह आहे असे सर्वांना वाटत असून गादीवर आरूढ होणाऱ्या छत्रपतींवषयी अखिल महाराष्ट्रातील लोकांना व प्रत्यक्ष त्यांच्या छत्राखाली नसलेल्या लोकांना देखील नेहमी पराकाष्ठेचे प्रेम व आदर वाटत राहील. आपल्या प्रजजनांचे सौख्य प्रगती साधणे आपले पहिले कर्तव्य आहे, यात तिळमात्र शंका नाही तथापि सामान्यपणे आपण सर्वांच्या मातृभूमीच्या विशेषत: महाराष्ट्राचा अभुदय यासाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे आपल्या संस्थानाच्या प्रजाजनांमध्ये संबंधित असलेल्या आपल्या कर्तव्याच्या खालोखाल हे एक महत्त्वाचे कर्तव्य आहे.''[३१]

प्रशासकीय विभागाची रचना

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रशासन कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने प्रशासनात काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या. पेटा आणि महाल अशा दोन भागांमध्ये प्रशासनाचे विभाजन होते. यामध्ये कोल्हापूर संस्थानाचे १० प्रशासकीय विभाग होते. करवीर, आळते, पन्हाळा, शिरोळ, गडहिंग्लज, भुदरगड, रायबाग, चनवाड, कटकोळ, राधानगरी या विभागांवर शाहू महाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. छत्रपतींचे स्वतःच्या नियंत्रणाखाली या क्षेत्रावर प्रशासन चालत असे, तर दुसऱ्या बाजूला सहा जहागिरी होत्या, ज्यावर प्रत्यक्ष सत्ता जहागीरदाराची होती आणि अप्रत्यक्ष सत्ता नियंत्रण शाहू महाराजांचे होते.

शाहू महाराजांच्या राज्यकारभाराची मुख्य खाती तीन होती.

१) जनरल खाते
२) मुलकी खाते
३) न्याय खाते

जनरल खात्याचे प्रमुख दिवाण, मुलकी खात्याचे प्रमुख सरसुभे तर न्याय खात्याचे प्रमुख सरन्यायाधीश हे होते. संस्थानाच्या कारभारासाठी या तीन खाते प्रमुखांच्या अधिपत्याखाली इतर विविध खाती व कार्यालये कार्यरत होती. राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतल्यावर महाराजांनी या तीनही खात्यांमध्ये समन्वय आणण्यासाठी व स्वत:च्या नियंत्रणाखाली असलेले हुजूर कार्यालय निर्माण केले. महाराजांचे सर्व आदेश या कार्यालयामार्फत जारी होत असत. या कार्यालयासाठी स्वतंत्र हूजूर रेकॉर्ड ऑफिसही होते. अशा प्रकारे महाराजांनी प्रशासनात सुव्यवस्थितपणा आणून राज्यकारभारास सुरुवात केली होती.[३२]

संदर्भसूची

१. खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सन १९९४, पृ. ९०

2. Hunter W. W., A Life Of The Earl Of Mayq : Smith Elder Co., London, 1875 , P - 1-108

३. पाटील प. सी., महात्मा जोतिराव फुले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९०, पृ. २९

४. भोसले एस. एस., (संपा.) क्रांतीसुक्त राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. १७

5. Venkatanarayanan S., Tracing the Genealogy of Elementary Education Policy in India Till Independence, Sage Publication, Open Sage, October-December 2013,

६. खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९४, पृ. ९०

७. कित्ता – ७

8. Tyagi Isha, Influence of print technology in building national consciousness in colonial south India, International Journal of Advanced Education and Research, Volume 2; Issue 3; May 2017; P- 253-255

9. Desai R., Social Background of Indian Nationalism, Popular Prakashan, Bombay, 2011

१०. भिडे ध. रं. आणि देशपांडे पु. ल. (संपा.) कोल्हापूर दर्शन, कोल्हापूरचा इतिहास स. मा. गर्गे, दीक्षित इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस, पुणे , १९७१, पृ. ४१

११. सूर्यवंशी गणपतराव, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन इचलकरंजी, १९७८, पृ. १–६

१२. कित्ता, पृ. ८

१३. कीर धनंजय, राजर्षी छत्रपती शाहू : एक समाजक्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पृ . १७

१४. सूर्यवंशी गणपतराव, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन इचलकरंजी, १९७८, पृ. ७

15. Grahm D. C. A Statistical Reports of the Kolhakpur State, 1854

१६. भिडे ध. रं. आणि देशपांडे पु. ल (संपा.) कोल्हापूर दर्शन, कोल्हापूरचा इतिहास स. मा. गर्गे, दीक्षित इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७१, पृ. ४१

१७. सूर्यवंशी गणपतराव, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ. १८

१८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (संपादक– पानसरे गोविंद), राजर्षी शाहू, आर्थिक धोरण आणि विचार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००१, पृ. १८

१९. गर्गे सदाशिव मार्तंड, करवीर रियासत (करवीर छत्रपती घराण्याचा इतिहास १७१०– १९४९), श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट न्यू पॅलेस, कोल्हापूर २००३, पृ. १८

२०. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. २५

21. Report On The General Administration Of The Kolhapur-1891-92

२२. गर्गे स. मा., करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, १९८०, पृ. ६१५

२३. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (संपादक– पानसरे गोविंद), राजर्षी शाहू, आर्थिक धोरण आणि विचार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००१, पृ. १७

२४. कित्ता, १६

२५. कित्ता २७

२६. कित्ता २९

२७. तावरे स्नेहल, इंगवले शोभा (संपा.), जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे योगदान, भाग एक, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१९, पृ. १६५

२८. भोसले एस. एस., (संपा.), क्रांतीसुक्त राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. ५४

२९. हूजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दिनांक २ एप्रिल, १८९४,

३०. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. १८

३१. कित्ता १८

३२. पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ०२

***

प्रकरण तिसरे

दुष्काळ निवारणार्थ केलेल्या तत्कालीन उपाययोजना

प्रस्तावना

प्रशासकीय योजना

१) दुष्काळ दौरा व लोकांशी संवाद

२) लोकाभिमुख प्रशासन

३) कारभारयंत्रणेतील शिस्त

४) प्रशासन खात्यांत काटकसर

५) दुष्काळ कामात हलगर्जीपणा केल्याने बडतर्फी

अन्नधान्याबाबत तातडीच्या उपाययोजना

१) धान्याची बाहेरुन आयात

२) अन्नधान्य किंमत वाढीवर प्रतिबंध

३) स्वस्त अन्नधान्याच्या दुकानांची निर्मिती

दुष्काळ निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा

१) दुष्काळनिवारण कक्ष

२) दुष्काळ निवारण कचेऱ्या

३) दुष्काळ अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक

४) कटकोळ महालातील दुष्काळ परिस्थितीबाबत उपाय

शेतकरी वर्गासाठी उपाययोजना

१) शेतकरी लोकांवरील अन्याय दूर करण्याबाबत सूचना

२) उभ्या पिकांना सावकारांपासून संरक्षण

३) शेतीसाठी बी, औत, जनावरे घेण्यासाठी मदत

पाण्याच्या उपलब्धीसाठी केलेली व्यवस्था

१) विविध स्तरावर पाण्याची सोय

२) तलावाबाबत उपाययोजना

३) दुष्काळातील धरण प्रोजेक्ट योजना

४) दुष्काळामुळे पाणीपट्टीस तात्पुरती स्थगिती

दुष्काळाच्या अनुषंगाने केलेल्या अन्य उपाययोजना

१) पायाभूत सुविधा व रोजगार संधी

२) कामानुसार मोबदला

३) नोकरदारांसाठी दुष्काळी निर्वाहभत्ता

४) लहान मुलांना सांभाळण्यासाठी पगारी आयांची नेमणूक

५) दुष्काळग्रस्त गरिबांसाठी आश्रम निवारा व्यवस्था

६) अनाथ वेडे लोकांकरीता कपडे खरेदी

७) दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी स्वस्तात बोर्डिंगची व्यवस्था

८) धर्मशाळेच्या खर्चास मंजुरी

९) दुष्काळात दलितांना तगाई देणे

सावकारीवर नियंत्रण

१) सावकार वर्गासाठीचे नियम

२) साठेबाजीबाबत हुकूम

३) पाटील–कुलकर्णी यांना स्वतःच्या गावात देवघेव व व्यापार न करण्याचा हुकूम

जनावरांसाठी केलेल्या उपाययोजना

१) जनावरे सरकारी थट्टीत सोडणेबाबत

२) स्वत:च्या मालकीची जनावरे प्रजेस देणे

३) सरकारातून जनावरांसाठी गवत उपलब्ध करून देणेबाबत

४) गवत लावून कुरण करण्यासाठी सरकारतर्फे जमिनी घेणे

५) जनावराची योग्य काळजी घेण्यासाठीची शिस्त

संसर्गजन्य साथीच्या रोगांवरील उपाययोजना

१) प्लेगबाबत उपाययोजना

अ) प्लेग बंदोबस्तादरम्यान मयत कुटुंबियाचा उदरनिवार्ह, शिक्षण यासाठी खास तरतूद

ब) प्लेगमुळे सार्वजनिक सुट्टी

क) प्लेगसाठी प्रतिबंधात्मक उपाय व विशेष सवलती

ड) वैद्यकीय तपासणी

२) कॉलरा रोग प्रतिबंधक उपाय

अ) तलावाचे पाणी स्वच्छ ठेवणे

ब) पाण्यात औषधी द्रव्यांची फवारणी

क) पाणी स्वच्छतेसाठी औषध खरेदी

पहिले महायुद्ध आणि कोल्हापूर संस्थान

प्रकरण तिसरे

दुष्काळ निवारणार्थ केलेल्या तत्कालीन उपाययोजना

प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराज यांनी सन १८९४ ला राज्यकारभारास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात जणू त्यांची परीक्षाच घेण्यासाठी दुष्काळाचे भयंकर संकट आले होते. त्याच्या काळात साधारणत: तीन वेळा दुष्काळाला तोंड द्यावे लागले होते; परंतु हेच संकट त्यांनी संधी मानून पुढे त्यावर यशस्वीपणे मात करून आपली कर्तबगारीची चुणूकच दाखवून दिली. दुष्काळ निवारणार्थ त्यांनी राज्यातील अन्नधान्याच्या केलेल्या उपाययोजना, गोरगरिबांसाठी निवारा, शेतकऱ्यासाठी दिलेल्या अनेक सवलती, सावकारांनी शेतकरी व सर्वसामान्य प्रजेला लुबाडू नये म्हणून केलेले कडक नियम, प्रशासनातील कार्यप्रणाली, तातडीने केलेली पाणी उपलब्धीची व्यवस्था, कष्टकरी लोकांना दिलेली त्या काळातील रोजगाराची संधी या अनेक बाबींमधून ज्या तातडीच्या उपाययोजना केल्या, त्यांचा आढावा या प्रकरणातून घेतला जाणार आहे.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात देशभर भीषण दुष्काळ होता. कोल्हापूर संस्थान हे यास अपवाद नव्हते. देशात व राज्यात एकंदरित भौगोलिक परिस्थिती ही सर्वत्र सारखीच आढळत नाही. त्यामुळे हवामानही वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे आढळते. येथील जनजीवन हे बहुतांश कृषी आधारित असल्याने पर्जन्यमानास अत्यंत महत्त्व आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे व शेतीवरील होणाऱ्या परिणामामुळे बऱ्याचवेळा दुष्काळसदृश स्थिती होत असल्याने लोकजीवन विस्कळीत होत राहते. राज्यातील काही भागांत कुठे उंच सखल, तर कुठे घाटमाथा अशी जमीन पहायला मिळते. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये पावसाचे प्रमाण आपोआपच जास्त, तर इतर काही भागांत खूपच कमी पाणी पडते. असे विषम पर्जन्यमान आणि पावसाचा लहरीपणा यामुळे येथे अनेकदा दुष्काळाचे सावट असायचे. जनतेची असलेली हलाखीची स्थिती, पारंपरिक पद्धतीची शेती, अपुरा जलसाठा व प्रशासनाची उदासीनता यामुळे या नैसर्गिक आपत्तीला तोंड देणे कठीण जात असे आणि पर्यायाने अशा परिस्थितीत लोकांची अवस्था अधिकाधिक बिघडत असे.

शाहू महाराजांना त्यांच्या राजवटीत एकूण १८९६-९७, १८९९-१९००, १९१८-१९ या काळात मुख्यत: दुष्काळाचा सामना करावा लागला होता. दुष्काळामुळे संस्थानातील शेती क्षेत्राचे मोठे नुकसान झाले होते. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसह शेतमजूर आणि इतर कारागीर वर्गांच्या आर्थिक परिस्थितीवर याचा विपरीत परिणाम झाला होता. अवर्षणामुळे जमिनीची दुर्दशा झाली होती. नद्या-नाले, विहिरी यांमधील पाणी ही आटले होते, याचा परिणाम शेतमालावर होऊन शेतीमधून कमी उत्पादन होण्यावर झाला. अन्नपाण्याविना नागरिकांची उपासमार होत होती. रोजगार नसल्याने संस्थानातील बहुतांश जनसमुदाय विपन्नावस्थेत जीवन जगत होता, तरीही शेतकऱ्यांकडील शेतसारा जहागीरदार व सावकार अशा तत्सम वर्गाकडून सक्तीने वसूल करण्याचे धोरण हाती घेतले जात होते.

कमी उत्पादनाच्या धान्याचे किंमतीत भरमसाठ वाढ झाली. यातच व्यापारी वर्गाने लोकांची लूट करून स्वत:चा फायदा करून घेण्याचे काम सुरू केले. शिवाय तत्कालीन परिस्थितीत पडलेला दुष्काळ हा निसर्गनिर्मित असल्याचे सांगत ब्रिटिशांनी नेमलेल्या प्रशासकीय समितीकडूनसुद्धा ठोस कारणे दाखवली गेली नाहीत. त्यामुळे दुष्काळ निवारणाकरिता त्यांच्याकडूनही कसलीही भरीव तरतूद केली गेली नव्हती. परिणामी, संस्थानातील बहुतांश जनता दुष्काळाने पोळून निघत होती.

या परिस्थितीतून रयतेला बाहेर काढण्यासाठी शाहू महाराजांनी पुढीलप्रमाणे तात्कालिक काही अल्प व मध्यम मुदतीच्या तातडीने करावयाच्या उपाययोजनेबरोबरच आगामी काळासाठी काही दीर्घकालीन प्रकल्प हाती घेऊन दुष्काळपासून प्रजेला सावरण्याचे बळ दिले.

प्रशासकीय योजना

शाहू महाराज पूर्व काळात राज्यांअंतर्गत बंडाळी असण्यासह संस्थानावर दुष्काळाची छाया होती. संस्थानाच्या राजगादीवर आल्यानंतर महाराजांनी प्रथमतः प्रशासनाला कार्यक्षम बनवण्याचे काम हाती घेतले. त्याचबरोबर दुष्काळ निवारणार्थ प्रशासकीय पातळीवर विविध निर्णय घ्यायला सुरुवात केली. प्रशासन हे प्रजेकरिता असते. त्यानुसार आपला राज्यकारभार असावा, यासाठी महाराजांनी आपल्या प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांना शिस्त लावून नियोजनबद्ध कार्यप्रणाली आखली.

१) दुष्काळ दौरा व लोकांशी संवाद

दुष्काळाच्या संकटग्रस्त परिस्थितीचा अंदाज महाराजांना आलेला होता आणि त्यासाठी केवळ ऐकीव वा समोर आलेल्या माहितीवर विश्वास ठेवून त्याबाबत काही उपाय करावे, असे त्यांच्या मनाला पटणारे नव्हते. खरे तर दुष्काळाबरोबरच त्यावेळी प्लेगसारख्या संसर्गजन्य आजारांचासुद्धा प्रादुर्भाव वाढला होता. लोकांच्या मनात भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली होती. ती दूर करून त्यांच्यात या परिस्थितीतही आत्मविश्वास जागवला पाहिजे. या हेतूने महाराजांनी केवळ दरबारात बसून निर्णय घेण्याऐवजी प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा निर्णय घेतला. दुष्काळाबरोबर आलेला प्लेग अशा दुहेरी संकटात संस्थान सापडले होते. त्याअनुषंगाने त्यावर उपाय करण्याअगोदर वास्तवात स्थिती नक्की काय व कशी आहे यासाठी महाराजांनी बाधित भागांचे प्रत्यक्ष दौरे केले.

रायबाग, गडहिंग्लज व कटकोळ या भागात तीन-चार वर्षांपासून पाऊस नव्हता. शेतीचे उप्तन्न पूर्णतः घटण्यासह पाण्याची टंचाई तेथे जास्त होती. म्हणून महाराजांनी नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला १८९६ मध्ये या भागाचा दौरा आयोजित केला. त्याच धर्तीवर जानेवारी १८९७ ते मार्च १८९७ मध्ये भुदरगड व पन्हाळा या दुष्काळी पेठ्यांतील भागात व्यक्तीशः पहाणी दौरा केला. या पेठ्यातील लोकसंख्या बरीच होती. त्यामुळे दुष्काळाने बाधित असलेल्यांची संख्याही तितकीच मोठी होती. माणसांबरोबरीने गुरे-ढोरे, जनावरे यांचीही अवस्था दयनीय होती हे प्रत्यक्षात अनुभवले. त्यांनी लोकांसमोर जाऊन त्यांचेशी याबाबत चर्चा करून त्यांना यातून बाहेर काढण्याचे आश्वासन दिले व दुष्काळ निवारणासाठीचा कृती आराखडा तयार केला.[१]

या सर्वांचा परिणाम म्हणून संस्थानातील नागरिकांच्या मनामध्ये महाराजांप्रती आणि त्यांच्या राज्यकारभाराप्रती आत्मियता निर्माण झाली आणि त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले. महाराजांनी या प्रत्यक्ष भेटीदरम्यान 'दुष्काळ निवारणाकरिता संस्थान सदैव तुमच्या पाठीशी आहे, हा आत्मविश्वास लोकांना दिला. श्री लट्ठे यांनी आपल्या चरित्रात शाहू महाराजांनी दुष्काळनिवारणासाठी लोकांना दिलेल्या प्रत्यक्ष भेटीबद्दल नोंदवले आहे की, His Highness inspected the different Petas and visited some of the principal villages in each. The tour commenced with the inspection of the Gadhinglaj Peta wherein are situated sane of the places notorious for the depredations and other atrocities of the

Berad gang. His Highness talked, as is his wont, to the prisoners under trial who were confined in the Peta Kacheri cells. Most of them, of course, piea dad innocence. One of them, however, complained that he had been under trial for months and only wished for speedy justice. His Highness took note of it and after due inquiry of the matter, a circular was issued calling upon all Magistrates to furnish monthly returns of prisoners, remaining under trial for more than a month, with statement of reasons for the same. [2]

२) लोकाभिमुख प्रशासन

दुष्काळाचे निवारण करण्यासाठी सुरुवातीला सरकारकडून विविध उपाययोजना करण्याची गरज असते. तथापि, पूर्वीची प्रशासकीय व्यवस्था ही तितकीशी कार्यक्षम नव्हती शिवाय नोकरवर्गाचे वर्चस्व जास्त व लोकोपयोगी कामे कमी अशा राज्यकारभाराच्या भूमिकेत होती. प्रशासन हे लोकांना जबाबदार असते, हे सूत्रच प्रशासकीय स्तरावर कार्य करणाऱ्या अधिकारी–जबाबदार व्यक्तींना माहीत नव्हते. संस्थानाच्या प्रशासकीय रचनेमध्ये स्थानिक पातळीवर असलेले पोलिस, महसूल अधिकारी किंवा इतर अधिकारी हे सर्व स्थानिक पातळीवर वर्चस्व दाखवून लोकांचे शोषण करून, खोटी आश्वासने देऊन त्यांना लुटण्याचे काम करत होते. या प्रशासकीय व्यवस्थेचे महाराजांनी बारकाईने निरीक्षण केले.

राज्यरोहणाच्यावेळीच प्रजा सुखी असावी ही इच्छा व्यक्त केलेली होती. त्यामुळे गादीवर आल्यावर त्यांनी प्रथमपासूनच पूर्वीच्या अनागोंदी कारभारास आळा घालण्यासाठी काही बदल प्रशासनात केले, जेणेकरून प्रशासनात पारदर्शीपणा व गतीमानता येईल व प्रशासन हे रयतेसाठी असून सर्वांना समान वागणूक हेच धेय्य छत्रपतींनी ठेवल्याने त्यादृष्टीने त्यांनी काही अन्यायकारक बाबी काढून टाकल्या तर काही कायद्याची कडक अंमलबजावणी सुरु केली. हुजूर ऑफिससारख्या महत्त्वाच्या खात्यामार्फत त्यांनी प्रशासनावर आपला योग्य तो वचक बसविला होता.

संस्थानाचा राज्यकारभार स्वीकारल्यानंतर अवघ्या बारा दिवसांमध्ये शाहू महाराजांनी संस्थानात लोककल्याणकारी धोरणाची अंमलबजावणी स्वतःपासूनच करण्यास सुरुवात केली. त्या अनुषंगाने त्यांनी दिलेले काही निवडक आदेश खालीलप्रमाणेः

१) गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ वगैरे धान्य, साखर, मसाला वगैरे सामुग्री खुद्द हुजूरचे मुदपाकखान्याकडे स्वारीच्या लोकांकरिता लागेल, ती यथाशक्य सर्व कोल्हापूरहून खाजगी खात्याकडून नेण्यात यावी.

२) बकरी, कोंबडी, अंडी हे जिन्नस घेण्याकरिता स्वारी निघण्याचे अगोदर खासगीकडील मुद्दाम एक कामगार पाठविण्यात यावा. त्याचे मुक्कामाचे ठिकाण नजीक जो बाजारगाव असेल त्या गावी बाजाराच्या दिवशी जाऊन सर्व जिन्नस मालकास रोख पैसे जेव्हाचे तेव्हा, जेथल्या तिथे देऊन घ्यावी, सर्पणाबद्दलही त्याचप्रमाणे आगाऊ तजवीज करावी. सामानाच्या पैशाचा बटवडा करणे तो त्यावेळी मुलकी कामगार गावी हजर असल्यास त्याच्यासमोर पैसा अदा करून त्याची सही घ्यावी. तसा कोणी नसल्यास गावकामगार पाटील–कुलकर्णी यांचे समक्ष पैसे अदा करून मालकाची पावती घ्यावी व कामगारांची साक्ष घ्यावी.

३) दुधाबद्दल खाजगी थट्टीपैकी म्हैशी स्वारीबरोबर नेण्याची तजवीज ठेवावी. कदाचित ही तजवीज न घडेल, तर खाजगी खात्याकडील वर नमूद केलेले कामगारांनी किंवा कारकुनाने नजीकच्या गावाचे इसमाकडून स्वतः दूध घेऊन मालकास गावी भाव असेल. त्याप्रमाणे ताबडतोब जेथल्या तेथे सर्व पैसे चूकवून द्यावा. स्वारीचा कूच होईपर्यंत ठेवू नये.

४) गवत सरकारी कुरणे बहुतांश सर्व पेट्यानिहाय आहेत. सबब लोकांकडून हे जिन्नस घेण्याचे कारण नाहीच. कदाचित प्रसंगोपात् खरेदी करावा लागल्यास रोख पैसा मालकास जेव्हाचे तेव्हा देऊन घ्यावा.[३]

लोकाभिमुख प्रशासन होण्याच्या दृष्टिकोनातून काही नियम निश्चित करून लोकांना लुबाडण्याच्या अधिकाऱ्यांच्या वृत्तींचा त्यांनी बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला.

मुलकी खात्याचे, जंगल खात्याचे व सार्वजनीक बांधकाम खाते या तीन खात्यांचा सर्वसामान्यपणे रयतेशी व त्या भागाशी वारंवार संपर्क असतो म्हणून दुष्काळी भागात पहाणी दौरा करतेवेळी या तीन खात्यांच्या अधिकाऱ्यांना त्यांनी सोबतीला घेतले होते. ज्यातून त्यांना दुष्काळाविषयीची अधिक माहिती, लोकांची स्थिती, त्यांची मानसिकता, पशुधनासाठी

चारापाण्याची सोय याची माहिती मिळू शकेल. या आधारावर तसे आदेश सर्व महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

३) कारभार यंत्रणेतील शिस्त

राज्यावर येण्यापूर्वी संस्थानाचा कारभार हा ब्रिटीश प्रतिनिधींच्या व काही मूठभर उच्चवर्णीयांच्या हातात होता. हे अधिकारी स्वतःच्या फायद्यापलीकडे फारसे जात नसत. नोकरवर्ग हा आळशी, बेजबाबदार, हुकूमशाहीने वागणूक करणारा असा होता. प्रजेच्या दैन्याची त्यांना फिकीर नसल्यासारखीच वागणूक होती. राजकारभार करताना कारभारयंत्रणेमध्ये बदल करून त्यांना शिस्त लावणे गरजेचे आहे, हे महाराजांनी तात्काळ जाणले होते. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या कारकीर्दीत अनेकवेळा नियम करून आपल्या प्रशासकीय कारभारात एक सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला. हे राज्य रयतेचे आणि त्यासाठीच राज्य करावयाचे हे प्रत्येक नोकरवर्गाने जाणले पाहिजे यासाठी महाराजांनी प्रथम आपला कारभार सुनियंत्रीत केला. यामुळे केवळ दुष्काळच नाही तर अनेक बाबींमध्ये रयतेच्या सेवांसाठी सकारात्मक बदल दिसून आले. दुष्काळकाळात तर अशा नियमांमुळे ज्या काही उपयायोजना आखल्या होत्या त्या लोकांपर्यंत पोहचवून त्यांना त्याचे फायदे याच शिस्तबद्ध कारभारामुळे शक्य झाले होते. शाहू महाराजांचे हुजूर ऑफिस हे विविध खात्यांचे वरिष्ठ खाते असून त्यावर प्रत्यक्षात महाराजांचाच अंमल होता.

महाराजांसमोर कोणताही प्रस्ताव आणावयाच्या आगोदर संबंधीत कर्मचाऱ्याने त्या प्रस्तावाचा सारांश लिहून त्याखाली आपली सही करावी व त्यानंतरच महाराजांसमोर सहीसाठी सादर करावेत जेणेकरून कोणत्याही निकालाबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित होईल ही प्रथा त्यांच्याकाळी सुरू करण्यात आली.[४]

कोणत्याही कामासाठी प्रथम लेखी दाखला झाला असेल तो आणावा आणि त्यावर अंमलबजावणी करावी अशी सक्त ताकीदच दिली होती.[५]

प्रत्येक कर्मचाऱ्याने समजेल अशी स्पष्ट स्वाक्षरी करावी असा प्रत्येक खात्याला हुकूम दिला गेल्याने अराजकता व गोंधळाचे वातावरण कमी होण्यास मदत झाली.[६]

प्रत्येक खात्याचा वार्षिक अहवालासारखा विषय व इतर अन्य महत्वाचे विषय हे ठरलेल्या वेळेपर्यंतच सादर करावेत अशा स्पष्ट सूचना होत्या. वेळेनुसार कामाची माहिती ही त्या त्या कार्यालयाकडे वेळेतच गेली नाही तर शिल्लक राहिलेल्या कामाबद्दल १ रुपया दंड करण्याचा हुकूम महाराजांनी केला होता.[७]

राज्यातील सर्व कार्यालयातील एकूणच उपस्थितीसाठी महाराजांनी कठोर नियम घालून दिले. वेळेची किंमत अशा दुष्काळी काळात अधिक समजते. प्रत्येक कर्मचारी वेळेमधेच उपस्थित आहे असे त्यांच्या कार्यालयाचे हजेरीपत्रक वरीष्ठांच्या स्वाक्षरीने हुजूर कार्यालयात साडेअकरा वाजेपर्यंत आलेच पाहिजे तसेच वरीष्ठांनी सुद्धा स्वत:च्या येण्याची वेळ नमूद करावी अशी आज्ञाच केली होती.[८]

कर्मचाऱ्यांच्या रजेबाबतचे नियम ठरवून देताना रजा हा आपला हक्क नाही त्यामुळे नुसता अर्ज न पाठविता रजा मंजूर करूनच ती उपभोगावी अन्यथा गैरहजेरी लावण्यात येईल हे नमूद केले होते.[९]

बहुतेकवेळा काही कमर्चारी बदली झाल्यास आपले गाव सोडून अन्य ठिकाणी जाण्यास तयार होत नाहीत, ही बाब जाणून जर बढतीच्या ठिकाणी कोणी जाण्यास तयार नसेल तर त्यास पुढील पाच वर्षे बढती देऊ नये असा नियम केलेला होता. यामुळे नोकरशहांच्या एकाधिकारशाहीला आळा बसून लोकांची कामे सुरळीतपणे पार पाडण्यास मदतच झाली होती.[१०]

प्रशासनातील कामचुकारपणा टाळण्यासाठी अशा लोकांना पदानवत करणे वा त्यांची पगारकपात करणे किंवा त्यांना दंड देणे इ. प्रसंगानरुप शिक्षा देण्याची महाराजांनी सक्त ताकीदच दिली होती. यामुळे ही कारभारात एक वक्तशिरपणा येण्यास मदत झाली होती.[११]

अशा नोकरवर्गासाठी केलेल्या नियमावलीमुळे कारभारात सुटसुटीतपणा वाढून पारदर्शी कारभारास सुरुवात होऊ लागली. कर्मचाऱ्यांवर अधिकार व जबाबदारीचे योग्य भान आल्याने राज्यातील लोकांमध्ये व सरकारमध्ये योग्य तो दुवा सांधण्याचे काम यशस्वी होत गेले परिणामी

लोकांना त्यांची कामे वेळेत होऊ लागल्याने शाहू महाराजांच्या राजकारभारावर विश्वास निर्माण होऊ शकला.

४) प्रशासन खात्यांत काटकसर

संस्थानातील दुष्काळाचा आढावा घेताना महाराजांना खर्च व तरतूदी इ. बहुतेक बाबींची कल्पना येऊ लागली होती. वास्तवीक आजही जेव्हा राज्यावर एखादे नैसर्गिक संकट उभे राहते त्यावेळी सरकार अनावश्यक बाबींच्या खर्चामध्ये काटकार करावयास सुरवात करते. परंतू महाराज यांनी त्याकाळात हा उपाय अंमलात आणला होता. संस्थानाची आर्थिक स्थिती सुरुवातीला प्रतिकूलच होती. दुष्काळ व प्लेगच्या पार्श्वभूमीवर विविध खात्यातील खर्चांमध्ये कोठे काटकसर करता येईल याची माहिती घेण्यासाठी एक कमीटी नेमली होती व त्या कमीटीस आवश्यक ती सर्व माहिती सर्व खात्यातील अधिकाऱ्यांनी पुरवावी असे आदेश दिलेले होते. महाराजांनी पुढील गांभिर्य ओळखून विविध खात्यांमधील अनावश्यक उधळपट्टीस आळा घालून तो निधी दुष्काळोपयोगी कामासाठी वळवल्याचे दिसते.[१२]

५) दुष्काळ कामात हलगर्जीपणा केल्याने बडतर्फी

सुरुवातीच्या दुष्काळासंबंधात महाराजांनी काही कामे हाती घेतलेली होती. अशा कामांवरील कर्मचारी वर्गाने सचोटीने काम करणे अपेक्षित असते शिवाय महाराजांचा तसा कटाक्ष नेहमीच असे. परंतू प्रारंभीच्या दुष्काळीकामात हंगामी नेमलेले कॅशियर मि. गणेश भेडसगावकर यांनी ओव्हरसियर रानडे यांच्या हाताखालील कारकूनाच्या सहाय्ययाने कामाच्या पैशात अफरातफर केलेली आढळली होती. यास्तव त्याचेकडून रक्कम वसूल करून तो व आणखी ३ दोषी कर्मचारींना सरकारी नोकरीतून बडतर्फ केले. जास्तीतजास्त पारदर्शीपणा प्रशासनात असण्यावर महाराजांनी नेहमीच भर दिला.[१३]

अन्नधान्याबाबत तातडीच्या उपाययोजना

दुष्काळात सर्वप्रथम लोकांची उपासमार थांबविणे अत्यंत आवश्यक होते. महाराजांनी संस्थानातील अन्नधान्याचा आढावा घेऊन तातडीने काही पावले उचलली जेणेकरून राज्यात

भूकबळी जाऊ नये. लोकांना या प्रसंगातून बाहेर काढण्यासाठी प्रथम त्यांना जगवणे महत्वाचे होते.

१) धान्याची बाहेरून आयात

दुष्काळाच्या काळात प्रामुख्याने शेतीत उत्पन्न कमी होत होते किंवा शेतीचे नुकसान होऊन धान्याची टंचाई भासत होती. अन्नाविना जगणे कठीणच होते. उपासमारी, बेकारी यामुळे जीव जगवणे अशावेळी पहिल्यांदा गरजेचे असते. राज्यातील लोकांशी चर्चा झाल्याने त्यांना पिकांची अवस्था माहित होती. राज्यातील असलेले धान्य हे पुरेसे नसून केवळ यामुळे लोकांची उपासमार होऊन अनर्थ होऊ नये यावर अल्पकाळात व तातडीने सर्व लोकांपर्यंत धान्य पोहचवणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी शेजारील कर्नाटक प्रदेशातून आपल्या व्यापारांना धान्याची खरेदी करण्यास सांगीतले व ते एवढयावरच थांबले नाहित तर छत्रपती म्हणून त्यांनी स्वत: म्हैसूरच्या महाराजांना करवीर नगरीला धान्य पुरवठा करण्यासाठी विनंती करून तेथून तांदूळ व इतर धान्य मागविले होते. तसेच त्यांनी ब्रिटिश सरकारकडूनही धान्य आयात करून ते लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी जातीने दिले होते.[१४]

२) अन्नधान्य दरवाढीवर प्रतिबंध

संस्थानात दुष्काळामुळे निर्माण झालेल्या अन्नधान्य टंचाईचा ताण प्रामुख्याने अर्थव्यवस्थेवरही पडलेला होता. दरम्यानच्या काळात सलग दोन–तीन वर्षे पाऊस न झाल्याने शेतीतून काही उत्पन्न मिळाले नाही. परिणामी, तत्कालीन स्थितीतून आपण जगू की मरू अशी बिकट परिस्थिती लोकांसमोर उद्भवली होती. उपासमार टाळण्यासाठी सावकाराकडून मोठ्या व्याजावर पैसे घेऊन अन्नधान्यांची खरेदी करणे भाग पडत होते. यात भर पडली, ती व्यापारी वर्गाकडून केल्या जाणाऱ्या अन्नधान्याच्या साठेबाजीची. यातून हा वर्ग सामान्य जनाची लूट करत होता. अन्नधान्याचा केलेला साठा अव्वाच्या सव्वा दराने शेतकऱ्यांना आणि लोकांना विकत होते. ही सर्व परिस्थिती महाराजांनी प्रत्यक्ष प्रजाभेटीअंतर्गत अनुभवलेली असल्याने यावर मात करण्यासाठी महाराजांनी तात्काळ अन्नधान्याच्या किमती कमी करण्यासाठी व्यापारी वर्गाला आदेश दिला होता. या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात ठेवण्यासाठी त्यांनी व्यापारी वर्गाला विश्वासात घेऊन थोडा फायदा कमी करावा वा प्रसंगी तूट सोसून माल उपलब्ध करून दयावा

असे सांगीतले. एवढेच नव्हे तर व्यापाऱ्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई दरबारातून दिली जाईल अशी हमी दिली. खुद्द महाराज यात लक्ष घालून असल्याने जीवनावश्यक वस्तू खरेदीपेक्षा कमी भावाने दिल्या गेल्या. व कमी किमतीमुळे झालेला तो तोटा व्यापारांना देण्यासाठी दरबारतर्फे गॅरेंटी निधी योजना तयार करून त्यामाधून आर्थिक निधी दरबारातून देऊन व्यापारीवर्गास आश्वस्त केले.[१५]

सन १८९७ मध्ये दुष्काळामुळे धान्याच्या किंमतीत झालेली वाढ ही सन १८९८ मध्ये महाराजांच्या प्रयत्नामुळे कमी झालेली होती हे त्यावेळेच्या प्रशासकीय वार्षिक अहवालांतून दिसून येते. यासर्वांचा परिणाम अन्नधान्याच्या किमती कमी करण्यात यश मिळाले.

३) स्वस्त अन्नधान्याच्या दुकानांची निर्मिती

तत्कालीन परिस्थितीत अवर्षण पडून पर्जन्यआधारित असलेली शेतीतून अल्पउत्पन्न झाल्याने ऐकीकडे अन्नधान्याची टंचाई तर दुसरीकडे आवश्यक वस्तूंच्या भरमसाठ वाढलेल्या किंमतीमुळे उपासमारीला सामोरे जावे लागत होते. अशावेळी महाराजांनी स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करणारी एक व्यवस्थाच निर्माण केली.

या व्यवस्थेमार्फत प्रथम ८५०० रुपये वर्गणी जमवून स्वस्त किंमतीचे धान्याचे दुकान सुरु करण्यात आले. ना नफा ना तोटा या तत्त्वावर दुकानांमधून माल विक्री होत होती. बऱ्याचदा त्यात तोटा झाला तरी दरबारातून त्याची भरपाई मिळाल्याने या स्वस्त अन्नधान्य योजनेला संस्थानात भरभरुन प्रतिसाद मिळाला. सुरवातीला व्यापारांना ४,००० रु. बिनव्याजी दिले गेले होते तर २,५०० रुपये बीनव्याजी कर्जाऊ देण्याचे आश्वासदेखील दिल्याने ही योजना फलद्रुप झाली होती. अनेक भागांमध्ये स्वस्त अन्नधान्यांच्या केंद्रातून अनुदानावर आधारित तांदूळ, गहू, तूर, हरभरा डाळ, ज्वारी बाजरी यांसारख्या धान्यांचा ही पुरवठा करून महाराजांनी दुष्काळ खरोखरच सुसह्य केला.[१६]

दुष्काळ निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा

शाहू महाराजांनी दुष्काळ काळात प्रत्यक्षपणे रयतेशी संपर्क साधून त्यांची अवस्था पाहिली होती. राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकांना मदत मिळावी व त्यांनी या संकटातून बाहेर यावे

यासाठी प्रशासनीक पातळीवर काही अमुलाग्र बदल केले आणि त्या माध्यमातून गावागावातील परिस्थितीचा अभ्यास करून त्यांना आवश्यक ती मदत देण्यासाठी स्वतंत्रपणे यंत्रणा राबविली.

१) दुष्काळ निवारण कक्ष

समोर आलेल्या दुष्काळाच्या संकटातून तातडीने काही उपाय करून जनतेला यातून बाहेर काढण्यासाठी स्वत: महाराज जातीने लक्ष देऊन विविध मार्गाने प्रयत्नरत होते. राजसत्ता ग्रहणापासूनच त्यांनी या संकटाचे रुप ओळखून त्याचे निवारणाचे हरएकप्रयत्न चालूच ठेवले होते. राजांनी आपले प्रशासन लोकाभिमूख केलेले होते. या दुष्काळ इष्टापत्ती निवारणसाठी स्वतंत्रपणे कार्ययंत्रणा चालू करण्याच्या इच्छेने त्यांनी आपल्या संस्थानात स्वतंत्र दुष्काळ निवारण कक्षच स्थापन केला. इतर संस्थानात अशाप्रकारे लोकांसाठी इतक्या तळमळीने कोणतीच तजवीज होत नसताना शाहू महाराजांनी मात्र स्वतंत्र कक्ष निर्मिती करून वेगळीच वाट दाखवली. दुष्काळ आयुक्त म्हणून दिवाणासारख्या मोठ्या हुद्द्यांवरील अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. तसेच या कक्षाला सक्षमपणे चालविण्यासाठी भास्करराव जाधव यांची सहसरसुभेदार म्हणून नेमणूक करून त्यांना दुष्काळ विभागाची स्वंतत्रपणे सुत्रे दिली. भास्करराव जाधव हे शेतकरी कुटुंबातीलच होते त्यामुळे त्यांना शेतीप्रधान जनतेची अवस्था लवकर समजता आली. त्यांनी तातडीने काम सुरू करून या खात्यामार्फत विविध योजना कार्यान्वीत केल्या, संपूर्ण परिस्थितीचा अंदाज या कक्षामुळे त्यांना लवकर येत गेला व त्याच तातडीने त्यांनी निवारणयंत्रणा राबविली. लोकांपर्यंत लवकर पोहचता यावे यासाठी शाहू महाराजांनी आपला राजवाडा, ब्रिटीश प्रतिनिधींचे कार्यालय व काही महत्वाच्या ठिकाणी दळणवळणाचे प्रभावी साधन म्हणून टेलिफोन बसवून घेतला होता.[१७]

२) दुष्काळ निवारण कचेऱ्या

दुष्काळखाते हा विभाग स्वतंत्र स्थापला तरी गावपातळीवरील दुष्काळाच्या हालहवालीचा, रयतेच्या गरजांचा, संस्थानातील साधन संपत्तीचा अहवाल मिळणे तेवढेच जरुरी होते. यासाठी विभागाबरोबरच राजर्षी शाहूंनी कचेऱ्या ही स्थापन केल्या. प्रथम आपल्या दिवाण कचेरीत एक कार्यालय उघडले तसेच तालुका पातळीवर मामलेदार कार्यालयात कचेऱ्या चालू केल्या. ही स्वतंत्र व्यवस्था गावातील दुष्काळ स्थिती व अन्नधान्याच्या बाबी, रिलीफ कामांचा तपशील,

आवश्यक कामांची तरतूदी इ. माहिती गोळा करून वरच्या कार्यालयात पाठवत असत. या कचेऱ्यांमध्ये लागणाऱ्या आवश्यक त्या वस्तूंचा साठा, अवजारे इ. साधने एकत्रित असत.[१८] या कामासाठी छत्रपती शाहू महाराजांनी २६ हजार १६४ इतका खर्च केल्याची माहिती १८९६–९७ च्या प्रशासकीय अहवालात नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. यामुळे उपलब्ध निधीचा व वस्तूंचा, आवश्यक त्या ठिकाणी आवश्यक तेवढाच तातडीने वापर करून सुनियोजन करता आले. दुष्काळ निर्मूलन कचेरी हे खऱ्या अर्थाने लोकांना शासकीय मदत व मार्गदर्शन करणारे केंद्र होते.

३) दुष्काळ अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक

१८९९–१९०० सालच्या अवर्षणामुळे दुष्काळग्रस्त परिस्थिती परत एकदा संस्थानाला भेडसावू लागली होती. महागाई जाणवू लागल्याने अशावेळी इतर उपाययोजना तर हाती घेतलेल्या होत्याच, परंतू सदर योजना नीट हाताळल्या जाव्यात व संस्थानातील लोकांची, प्राण्यांची चांगल्या प्रकारे व्यवस्था होणे तेवढेच महत्वाचे आहे हे महाराजांना वाटत होते. यासाठी त्यांनी स्वत:चे दिवाण रावसाहेब सबनीस यांची दुष्काळ अधिकारी म्हणून नेमणूक केली. त्यांना सहाय्याकरीता भास्कर जाधव यांची सहाय्यक दुष्काळ अधिकारी म्हणून नेमणूक केली. त्याचदरम्यान पेटाशिरोळ व रायबाग महल यांसारख्या अनेक भागात दुष्काळाची तीव्रता अधिक झाली होती. त्यामुळे तेथील व्यवस्था पाहण्यासाठी करवीर कोर्टामधील मुनसफ नारायण शिवराम बापट यांची त्यांचे हाताखाली नियुक्ती करून मनुष्यबळ पुरवले गेले. जेणेकरून लोकांना मोठा दिलासा मिळेल व तेथील एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेता येईल ही भूमिका होती.[१९]

नंतरच्या दुष्काळीकाळातही छत्रपती शाहू महाराजांनी खुद्द करवीर इलाक्यात त्यांनी युसुफ अब्दुल्ला यांची दुष्काळ निवारण करण्याच्या कामासाठी नेमणूक केली. तेथील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी महाराजांनी त्यांना वर्ग १ चे अधिकारही दिलेले होते. यामुळे कामामध्ये विलंब होणार नाही व काही समस्या खालच्या पातळीवरच सोडवता येतील, अशी जबाबदारीही त्यांच्यावर सोपवली. यामुळे संस्थानातील जनतेमध्ये सरकारप्रती मानसिक आधार वाटू लागला.[२०]

४) कटकोळ महालातील दुष्काळ परिस्थितीबाबत उपाय

दुष्काळ काळातील कटकोळ महाल या भागात सर्वात जास्त दुष्काळाची तीव्रता होती. तेथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शाहू महाराजांनी विशेष आदेश काढले होते. यावरून तेथील गंभीर स्थितीचा अंदाज येतो. शाहू महाराज दुष्काळाच्या संवेदनशील भागाबाबत जास्त जागृत असत व त्यासाठी त्वरीत प्रयत्न त्यांनी वेळोवेळी केलेले होते.

करवीर राज्यातील अनेक ठिकाणाच्या दुष्काळापेक्षा कटकोळ महालासारख्या भागात याचे परिणाम जास्त असल्याचे सुरुवातीच्या काळात छत्रपतींनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी दौऱ्यात अनुभवले होतेच. १९०९ सालीही त्याची चिन्हे दिसू लागल्यावर तातडीने तेथे सरकारकडून करण्यात येणारी रिलिफ कामे सुरू करून प्रथम तलावाचे काम सुरु करण्याच्या सूचना राजेंनी दिल्या, तसेच त्यावेळी गावातल्या गावात रोजगाराची कामे देऊ नये, अस आगोदरचा त्यांचा आदेश तात्पुरत्या स्वरुपात या गावापुरता स्थगित करून त्याच गावची माणसे सदरच्या रिलीफ कामासाठी घेण्याचा आदेश त्यांनी काम लवकर सुरु होऊन गाव लवकर सावरेल, या उद्देशाने दिला. तलाव बांधकामाचा खर्च तलाव कमिटीतून करावा तसेच फक्त तेवढाच भाग या इलाक्यात समाविष्ठ असून इतर भाग दुसऱ्या जहागीरदारांचा आहे तेव्हा त्यांच्या भागातील लोकांसाठी त्यांनी दुष्काळसंबंधाने काय उपाय केले आहेत किंवा कसे ते प्रत्यक्ष तेथील स्थिती पाहून अहवाल देणेबाबत सूचविले होते; जेणेकरून त्याबाबत नंतर विचार करता येऊ शकेल, या हेतूने शाहू राजांनी तात्काळ कामाच्या सूचना दिल्या. तसेच दुष्काळसंबंधाने लोकांचे हाल कोणत्याही प्रकाराने होऊ नये म्हणून अगदी तातडीने रिलिफ कामे करण्याची सक्त ताकीद दिली.

हा ठराव दुष्काळातील उपाययोजनासंदर्भातील एक महत्वाचा ठराव आहे. यातून राजर्षींची कामाची तत्परता तर दिसतेच पण आपली प्रजा नसलेल्या दुसऱ्या भागातील लोकांचाही पुढे विचार करून त्यांचेसाठी काम करण्याची त्यांची इच्छा दाखवतो.[२१]

शेतकरी वर्गासाठी उपाययोजना

१) शेतकरी लोकांवरील अन्याय दूर करण्याबाबत सूचना

गडहिंग्लज हा भाग सुद्धा बऱ्याचवेळा दुष्काळ सावटाखाली असायचा त्यावेळी दुष्काळीकामे तेथे केली जायची याच कामाचा भाग म्हणून म्युनिसल कमिटीने त्या भागात पाण्याची कमतरता पडू नये यासाठी तेथील नदीवर धरण बांधले होते. परंतू, यासाठी त्यांनी शेतकारी लोकांकडून मदत ४० रु. घेतले होते ते महाराजांना अजिबात पटले नाही, कारण लोकसहभागाव्यतिरिक्त जेव्हा सरकारातून अशा पद्धतीची दुष्काळ कामे केली जातात, तेव्हा ती सरकारी खर्चानेच व्हावी व त्याचा रयतेला भुर्दंड बसू नये, हा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे तसे करणे कमिटीस करता येणार नाही सबब पुढे असे होऊ नये याचाही स्पष्ट ठराव करून त्यांनी सरकारची जबाबदारी निश्चित केली.[२२]

२) उभ्या पिकांना सावकारांपासून संरक्षण

गावातील शेतकऱ्यास पैशांची गरज ही त्यावेळी स्थानिक पातळीवर सावकार वा बलुतेदार यांचेकडून भागविली जायची. बऱ्याचदा हा व्यवहार गावागावांतून चालत असे, परंतु जर शेतकऱ्यांकडून ठराविक काळात ही रक्कम परत आली नाही, तर हेच सावकार त्यांना लुबाडून त्यांचे शेतातले पिकलेले धान्य ही घेऊन जात असत. दुष्काळाच्या काळात तर याचे वाईट परिणाम शेतकऱ्यांवर होत असे. या गोष्टींचा विचार करून शेतकऱ्यांवर होणारा हा अन्याय दूर करण्यासाठी महाराजांनी सावकार व बलुतेदार लोकांना असे कृत्य करण्यास सक्त मनाई केली आणि जुलुमी रितीने जर बैत घेण्याची जबरदस्ती केली तर १०० रु. दंड किंवा ४ दिवसांची सक्तमजुरीच्या शिक्षेचा हुकूम दिला होता. शेतकऱ्यासाठी सुखावह अशी मानसिक मदतच करण्याचा हा प्रयत्न होता.[२३]

३) शेतीसाठी बी, औत, जनावरे घेण्यासाठी मदत

दुष्काळाला निपटताना शेतकरी लोकांना मुख्य प्रश्न भेडसावतो तो म्हणजे जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किंमती. शेतकरी वर्ग हा शेतीवर अवलंबून असतो आणि या अवर्षणात अन्नधान्याचे कमी उत्पादन पर्यायाने पुरेसा पैसा हाती नसणे हे होत असते. त्यातच महागाई वाढल्याने आवश्यक ती शेतीसामुग्री जसे औत, बी–बीयाणे, जनावरे खरेदी इ. साठी मग कर्ज काढण्याची वेळ येते. कर्जासाठी वारंवार सावकार वर्गावर अवलंबून राहावे लागते आणि याचा फायदा अर्थातच हे सावकार जास्त व्याज लावून, जमिनी लुबाडून, घेत असत. त्यामुळे पुन्हा

शेतकऱ्यांवर शेतीमालासाठी, अवजारांसाठी बी–बियाणांसाठी कर्ज घ्यायची वेळ यायची. पण यातूनही दुष्काळ काळात सावरण्यासाठी शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी कर्जे देणे, तसेच अगोदरचे कर्जे या काळात घेऊ नये आणि या काळात त्यांच्या जमिनीतून वा मिळकतीतून काहीही घेऊ नये असे सावकार लोकांना आवाहन करून त्यांनी शेतकऱ्यांना शक्य तितकी मदत करावी असा दुष्काळ खात्यातून जाहीरनामाच प्रसिद्ध केलेला होता.[२४]

पाणी उपलब्धीसाठी केलेली व्यवस्था

१) विविध स्तरावर पाण्याची सोय

अन्नधान्य आयात करून वा कोठारात असलेले धान्य लोकांपर्यंत पोहोचवता येते, मात्र पाण्याबाबत असे शक्य नाही, हे त्यांच्या लक्षात आले होते. संस्थानात पाण्याचा स्रोत मुख्यत्वे पाऊस पडण्यावर अवलंबून होता. दुष्काळ काळात अवर्षणामुळे हा प्रश्न तितकाच चिंताजनक होता. अनेक भागात विशेषतः मलकापूर भागांमध्ये पिण्याचे पाणी सुद्धा उपलब्ध नव्हते.

ही समस्या संस्थानातच सोडविणे क्रमप्राप्त असल्याने गावांमध्ये असलेले विहिर, तलाव, नद्या आदींद्वारे यामध्ये पाणीसाठ्याची क्षमता वाढवण्याची गरज ओळखून त्यांनी अल्प व मध्यम मुदतीच्या दुष्काळ निवारणाच्या योजनांमधून तातडीने काही आदेश देऊन नदीकाठच्या व गावांमधील विहिरीचे, नाल्यांचे खोदकामाचे आदेश दिले. त्यासाठी आवश्यक तो निधी त्यांनी संस्थानामार्फत उपलब्ध करून दिला. ज्यातून गावोगावी विहिरी खोदण्याचे काम सुरू करण्यात आले. नवीन विहीर खोदण्यासोबतच जुन्या विहिरींचे बांधकाम करण्यास वा दुरुस्त करून अधिक पाणीसाठ्याच्या दृष्टीने खोल केल्या. विहिरीतील व तलावांती गाळ काढण्याचे कामही त्या काळात करण्यात आले. संस्थानातील अनेक तलावांची दुर्दशा झाली होती. त्यांच्या दुरुस्तीचे कामही त्वरित हाती घेतले. मात्र हे सर्व करताना लोकांचाही सहभाग त्यात असला पाहिजे, याबाबतही ते आग्रही राहिले आणि लोकांनीही तितकाच प्रतिसाद त्याला देऊन श्रमदानाचे सहकार्य ही केले. त्याची प्रचिती खालील कामांमधून दिसून येते.

- सुरुड गावातील तलाव हा महाराजांच्या पूर्वीपासून पाणी पुरवठ्याचे एक साधन होते. तथापि, त्यांच्या पडझडीमुळे तेथून पाण्याचा वापर म्हणावा तसा होत नव्हता, हे लक्षात

घेऊन त्या तलावाची दुरुस्ती करून घेतल्यास त्याचा वापर योग्य होईल, हे ओळखून महाराजांनी दुष्काळ काळात तातडीने ८०० रुपयांची तरतूद मि. गुप्ते यांना आपल्या खाजगीकडून देण्याचे आदेश दिले व त्याची दुरुस्ती करून घेतली.[२५]

- मिण या गावातील शेरीच्या जमिनीवरील विहिरीची पडझड झालेली होती. तिच्या तात्काळ दुरुस्ती करून घेण्यासाठी १,८४६ रुपये खर्च केला व तेथील गावकऱ्यांना पाणी सोय केली.[२६]
- वडगाव रूकडी शिरोळ या भागांमध्ये नवीन तलावाचे बांधकामाची सुरुवात ही दुष्काळ काळात महाराजांच्याच पुढाकाराने झाले. त्या तलावाच्या कामाची देखरेख करण्यासाठी पांडुरंग केशव यांची नेमणूक केली होती.[२७]
- या व्यतिरिक्त कळंबे हासुद्धा महत्त्वाचा तलाव होता, त्या तलावाचे जे पाणी सरकारी खर्चाने गावात दिले जायचे. त्याच्या सांडपाण्याची मोरी गाळाने भरलेली होती, त्याची दुरुस्ती लोकल फंडातून करून घेऊन तलाव वाहता राहिल व पाण्याची सोय अधिक चांगली होईल, हे तर बघितलेच पण तेथे भांडी घासणे वगैरेस मनाई करून तो तलाव स्वच्छ राहिल यासाठी लोकांना कळावे म्हणून जाहिरनामा काढण्याची परवानगी दिली गेली. व दुष्काळी काळात शक्य होईल तसे आगोदरच उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर कसा चांगल्या रितीने करता येईल हे प्रथम पाहिले.[२८]

या दुष्काळी योजनेच्या कामांमधून केलेल्या काही कामांमुळे पाण्याचा प्रश्न तात्पुरता सोडविण्यात यश मिळवले, परंतु येथील पाणी टंचाईची समस्या कायमस्वरुपी दूर व्हावी व पुरेशा पाणी उपलब्धीतून भविष्यात प्रगती घडवावी या धेय्याने महाराजांनी पुढे याचा स्वतंत्र विभाग स्थापून त्यास स्वतंत्र अधिकारी नेमून दिर्घकालीन योजनाही राबविल्या.

२) तलावाबाबत उपाययोजना

संस्थानात राबविण्यात येणाऱ्या दुष्काळ कामांमधून सरकारखात्यांमार्फत विविध ठिकाणी पाणीसाठा वाढावा वा असलेला पाणीस्त्रोत अधिक क्षमतेचा होऊन भविष्यकाळातही पाण्याची समस्या येऊ नये म्हणून प्राथमिक स्तरावर काही उपाय केले गेले. संस्थानात तलावांची संख्या

जास्त असल्याने त्यांच्या माध्यमातून पाण्याचा वापर करण्यासाठी त्यांचे काम काढण्यात आले होते. त्यासाठी तिजोरीतून खर्च केला गेला.

- **तलावातील गाळ काढणे–** अवर्षणामुळे दुष्काळ स्थिती आली तेव्हा कोल्हापूर शहरातील रंकाळे, पद्माळे संबाळे, महार तलाव, जीनाल्याचे धरण, वरुणतीर्थ तलाव असे बहुतांश तलावातील पाणी सुकून गेल्याने त्यांचे पात्र दिसू लागले होते. तलावात गाळ त्यावेळी स्पष्ट दिसतो.

- अशा सुकलेल्या पात्रातील साठलेला गाळ काढणे सोपे होते. असा गाळ खरेतर शेतकरी लोकांना शेतीसाठी उपयोगी असतो. त्यामुळे एकीकडे तलावातील गाळ काढल्याने तलावाची पाणी धारण क्षमता वाढेल आणि दुसरीकडे लोकांना त्यांच्या कामासाठी हाच गाळ उपयोगी पडेल असा दोन्ही प्रकारचा फायदा असल्याने लोकांना मोफत गाळ काढून नेण्यासाठी मंजुरी दिलेली होती.[२९]

- पन्हाळ भागातील सोमाळे तलाव असाच गाळ भरल्यामुळे तितकासा वापरला जात नव्हता तेव्हा महाराजांनी या काळात तेथील मामलेदारांना आज्ञा करून त्या तलावातील गाळ काढून एक विहिर सुद्धा बांधण्याची आज्ञा केली आणि तेथे पाण्याची सोय करून घेतली.[३०]

- कोल्हापूर शहरातील कोटीतीर्थ तलावाला बांध घालून पाण्याची सोय चांगली रहावी यासाठी रू. ६७१ मंजूर केले होते.[३१]

- मुडशिंगी पेट्यामधील करवीर या गावी रुपये ५,५३२ एवढी रक्कम खर्च करून तेथील तलाव दुरुस्त करून गावकऱ्याचा पाणी प्रश्न मिटवला.[३२]

- वडगाव येथे नवीन तलाव बांधण्याचे काम चालू केले होते आणि त्या कामासाठी लावलेले मजूर संख्या जास्त होती. महाराजांनी या जास्तीच्या मनुष्यबळाचा उपयोग करून, जवळच्याच सातवे व ज्योतिबा डोंगर या भागातील तलाव दुरुस्त करून घेतली होती.[३३]

३) दुष्काळातील धरण प्रोजेक्ट योजना

राजर्षी शाहूंनी तातडीने करावयाची मध्यम मुदतीची दुष्काळ कामे हाती घेतली होती, त्यात पाण्याच्या संबंधाने अनेक कामे करण्यात येत होती. सार्वजनिकरीत्या नदी-तलावाबाबत जी कामे शक्य होती, ती करून दुष्काळात रयतेला पाण्याच्या टंचाईपासून वाचविण्याचे प्रयत्न चालू होते. दुष्काळ संबंधाने कामे करण्यासाठी काही नवीन छोटी मोठी धरणे बांधणे गरजेचे होते. याच धर्तीवर वळीवडे नदीवर धरण बांधावयाचे ठरल्यावर त्या धरण प्रोजेक्टकरिता ४०० रुपयांची मंजुरी दिली, तसेच चनवाड येथील नदीवरदेखील असे धरण बांधता येईल का, याचा सर्वे करण्याकरिता ३०० रु. मंजुरी दिली होती. भुदरगड पेट्यात जास्त दुष्काळ असल्याने तेथील कामांवर विशेष लक्ष दिले जात असे.[३४] चनवाड येथे पाण्याचा पुरवठा होण्यासाठी त्या भागातील अंबर्डे या नदीवर धरण बांधण्यास आवश्यक ती रक्कम खर्च करावी, अशा सूचना महाराजांनी प्रशासनाला दिल्या होत्या.[३५]

४) दुष्काळामुळे पाणीपट्टीस तात्पुरती स्थगिती

संस्थानात पावसाची अनियमितता व दुष्काळ यामुळे पाणीसाठा नियोजन महत्त्वाचे होते. उपलब्ध पाणी काटकसरीने वापरण्यावर महाराजांचा भर होता. शिवाय तसे अनेक नियम ही घालून दिले होते. जो शेतकरी वा गाव जास्त पाणी वापरेल, त्याला जास्त पाणीपट्टी दयावी लागेल अशी पद्धत होती. परंतु दुष्काळी काळात काही बाबतीत रयतेच्या परिस्थितीचा विचारही करावा लागतो. असा प्रसंग शिरोळ येथील कल्लेश्वर तलावाचे काम चालू होते, त्यावेळी आला. तेथे तलावाचे काम सुरू होते आणि त्यातील पाणी गावकऱ्यांना मिळत होते, परंतु काम चालू असताना पाणी पुरवठा कमी होता, पण पाणीपट्टी नियमानुसार द्यावीच लागत होती. यासाठी त्यांनी अर्ज दाखल केला होता. त्यावर दुष्काळामुळे अगोदरच गावकऱ्यांची झालेली आर्थिक स्थिती पाहून महाराजांनी त्या तलावातून नंतर जेव्हा पाणी भरपूर येईल, तेव्हा पाणीपट्टी घ्यावी, तोपर्यंत घेऊ नये असा ही आदेश देऊन लोकांना संकटकाळात मोठा आधार दिला.[३६]

दुष्काळाच्या अनुषंगाने केलेल्या अन्य उपाययोजना

१) पायाभूत सुविधा व रोजगार संधी

महाराष्ट्रामध्ये प्रचलित असलेली व यशस्वी झालेली योजना म्हणजे रोजगार हमी योजना. सन १९७२ च्या काळात राज्यात भीषण दुष्काळाची स्थिती होती. या परिस्थितीत लोकांच्या आर्थिक स्थैर्यासाठी हाताला काम मिळाले पाहिजे, ही भूमिका महाराष्ट्र शासनाने घेतली होती. रोजगार हमी योजना भारतामध्ये विविध राज्यांमध्ये लागू करण्यात आली व खूप प्रसिद्ध पावली; पण साधारण शंभर वर्षांपूर्वी छत्रपतींनी हीच योजना आपल्या संस्थानात १८९९–१९०० मध्ये पडलेल्या दुष्काळाचा सामना लोकांना समर्थपणे करता यावा, यासाठी केली होती.

दुष्काळामुळे शेतीतील अनेक रोजगार संपुष्टात येतात लोकांच्या हाताला काम नसते; परिणामी हलाखीच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष परिणाम त्यांच्या आर्थिक जीवनावर होतो. यावर उपाय म्हणून सर्वसामान्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना व्यापक पातळीवर राबविणे गरजेचे आहे, ही बाब महाराजांच्या लक्षात आली होती. मात्र त्यांनी ही योजना राबविताना दोन बाबीकडे कटाक्षाने लक्ष दिले, ते म्हणजे एका बाजूला लोकांना हाताला काम आणि कामानुसार दाम मिळाले पाहिजे; त्यासोबतच लोकांकडून होणारे काम हे उत्पादक स्वरूपाचे असले पाहिजे. या सर्व बाबींचा विचार करून मध्यम व अल्प मुदतीची काही कामे त्यांनी काढली. विहिर खोदणे, दुरुस्त करणे, नद्यांमधील गाळ काढणे इत्यादी कामांसोबत सार्वजनिक स्तरावर उपयोगी पडणारे काम म्हणजे रस्ते बांधणे, नदीवर पूल बांधणे, पक्क्या सडका बांधणे यासाठी कार्य सुरु केले.

निपाणी – दाजीपूरचा असाच एक महत्त्वाचा दळणवळणाचा रस्ता त्यांनी खास ब्रिटीशांची परवानगी घेऊन याच योजनेंतर्गत बांधून काढला. शिवाय तीन मोठे पूलांचेही बांधकाम तेथे केले गेले. कटकोळ व पन्हाळा या दुर्गम भागात दळणवळणाअभावी दुष्काळी परिस्थतीत तातडीने मदत पोहचवणे कठीण होत होते. त्यामुळे तेथे त्यांनी त्यांनी पक्के आणि मजबूत रस्ते बांधले. नदीपात्रातून ये–जा करण्यासाठी पूल बांधले. यामुळे तेथे संपर्कजाळे तयार होऊ शकले.[३७]

या काळात लोकसहभागातून कामे करण्यावर भर दिला गेला होता. असेच काम पन्हाळा पेटेत पोर्ले या गावातील लोकांनी पाण्याकरीता सार्वजनिक विहिर बांधायचे प्रस्तवित केल्यावर त्याला

२५ रुपयांचे २००० दगड (जंगलाकडचे) मोफत देण्याची महाराजांनी तजवीज केली व त्यांना जास्त खर्चाचा बोजा पडू दिला नाही.[३८]

असाच लोकसहभागातून विहिर बांधण्याच्या कामाचा संभापूर येथील गावाचा प्रकार होता. त्या गावच्या लोकांना व जनावरांना पिण्याचे पाणी नव्हते. परंतु गावातील देवळाजवळ गोसाव्याची विहिर नावाने ओळखली जाणारी विहिर होती ती जर अधिक खोदली तर पाणी लागणार होते व हे काम गावकऱ्यांकडून कंत्राटी पद्धतीने करून घेतले असते तर १९२० रुपयांचा खर्च अपेक्षीत होता, प्रत्यक्षात इंजिनीयर खात्याकडून हे काम केले तर ७५० रुपयात काम होण्यासारखे असल्याने त्यावेळी सरकारी खात्यातून हे काम सुरु करण्याचे आदेश दिले व त्यानंतर त्या कामास लागणाऱ्या ३७५ रु. आगाऊ रकमेस मंजुरी त्वरीत दिली. पण, ते काम दुष्काळ काळात लोकांमार्फतच करून घ्यावे हा महाराजांचा आदेशच होता.[३९] त्यांच्या आदेशानुसार स्थानिकांच्या सहभागातून काम पूर्ण केले गेले.

संस्थानातील दळणवळणाची सोय सुधारण्यासाठी दुष्काळवेळी जी सार्वजनीक बांधकाम खात्याने कामे काढली होती त्यात गगनबावडा ते अनुस्कूऱ्यापर्यंतचा रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. तेथील रस्ता दुरुस्त झाल्याशिवाय गाव व व्यापार सुरु होणार नाही हे बघून त्या रस्त्याचे काम सुरु केले पण त्यावर लगेचच दुरुस्ती नाके न बसविण्याच्या सूचना महाराजांनी देऊन तात्पुरती सवलतसुद्धा लोकांना दिली होती.[४०]

ज्योतिबा देवस्थानाच्या डोंगराचे महत्त्व बघता तेथून गिरोलीपर्यंतचा रस्ता बांधण्याच्या कामासाठी रु. ५ हजार २९९.४७ इतका खर्च फंडातून करण्यास मंजूरी दिली होती.[४१]

पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये प्रथम प्रायोगिक तत्वावर १८ ठिकाणी जी कामे हाती घेण्यात आली त्यात प्रामुख्याने रस्त्याची कामे घेतलेली होती. त्यानंतर त्या योजनेत यश मिळाल्याचे बघून नियमीत कामे सुरु झाली. प्रामुख्याने कटकोळ व पन्हाळा पेठ येथे दुष्काळ तिव्र असल्याने दुष्काळी कामे त्याठिकाणी जास्त प्रमाणात करण्यात आली होती. संस्थानाच पाण्याच्या तलावासाठी कळंबा तलावाचा बांध रुपये ३८, ५२२ खर्चून दुरुस्त केला, तर शिरोळमधील कल्लेश्वर तलावावर रु. ७,६५७ खर्च केले, त्याचबरोबर अतिग्रे व रकांळा तलावाचा एरियादेखील रु २,४०० खर्चून विस्तार केला. [४२]

अशा योजना खरोखरच खूप प्रभावी ठरून, त्यांच्या अंमलबजावणीत लोकसहभाग ही मोठा दिसून आला व पर्यायाने संस्थानातील गावे पायाभूत सुविधांमुळे व दळणवळण संपर्काने जवळ येऊ शकली.

२) कामानुसार मोबदला

संस्थानात दरबाराकडून दुष्काळ सुसह्य होऊन लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच राज्यात सार्वजनिक पातळीवरील कामे होऊन संस्थानाचा विकास व्हावा याच दृष्टीने रोजगार हमी योजनेची तसेच दुष्काळी रिलीफ कामे सरकारातून सुरू करण्यात आलेली होती. गावातल्या गावात लोकांना रोजगार मिळावा या हेतूने प्रथम लोकांकडून त्यांच्याच गावात काम करून घेतले जाई परंतू, त्यावेळीही असलेल्या भ्रष्टाचाराची उदाहरणे समोर आली. आपल्याच गावात काम असल्याने गरज नसलेले लोकही पैसे मिळतात, म्हणून नाव नोंद करत तर काही लोक कामावर जात नसत वा टाळाटाळ करत असत. ज्या स्त्रिया कधी कामावर आल्याच नाहीत, अशांच्या नावापुढे त्यांना पैसे दिल्याच्या नोंदी होऊ लागल्या. याचा अर्थ शाहू महाराजांच्या लक्षात येऊन पैशाचा अपव्यय थांबवावा व कामामध्ये सुद्धा पारदर्शीपणा असावा म्हणून त्यांनी ज्यांना गरज आहे त्यांनी दूरच्या गावांमध्ये जाऊन काम करावे आणि जेवढे काम तेवढे पैसे असे धोरण ठेवले, त्यामुळे खरोखरच आवश्यक त्या माणसांना काम मिळू लागले आणि खोट्या हजेरीच्या नोंदीना चाप बसला.[४३] दुष्काळी कामाचा पगाार हा आठवडयातून एकदा बाजाराच्या दिवशी कामगारांना दिला जायचा अशी नोंद १८९६ च्या प्रशासकीय अहवालातून मिळते. यामुळे पैसे वाटपातही एकप्रकारची सुसुत्रता आणलेली दिसून येते.

३) नोकरदारांसाठी दुष्काळी निर्वाहभत्ता

संस्थानातील नोकरदार आणि प्रशासकीय वर्गालाही दुष्काळाचा फटका बसलेला होता. कारण दुष्काळामुळे अन्नधान्याच्या, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढलेल्या होत्या. त्यांना मिळणाऱ्या पगारात त्या वाढीव खर्चाची तोंडमिळवणी करणे त्यांनाही अशक्य होते. शिवाय दुष्काळी स्थितीमुळे त्यांना रात्रंदिवस दुष्काळ निवारणाची कामे करावी लागत होती. दुष्काळ नष्ट झाला पाहिजे, या भूमिकेतून नोकरदार वर्ग गावांमध्ये, शेतांवरती लोकांमध्ये जाऊन लोकांमध्ये नवी उमेद तयार करत आहेत, हे शाहू महाराजांनी हेरले होते. त्याचाच भाग म्हणून

महाराजांनी १ नोव्हेंबर १८९६ पासून सरकारी नोकरदार वर्ग आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी दुष्काळी भत्ता सुरू केला. हा भत्ता जोंधळ्याच्या किमतीतील वाढीच्या निकषावर ठरवला जात होता. त्यानंतरदेखील दुष्काळ व युद्धामुळे महागाई वाढल्याने दि. १७ जानेवारी १९१९ पासून पुढील नऊ महिने त्यांनी नोकरदार व कर्मचारी वर्गास त्यांच्या हुद्द्याच्या श्रेणीनुसार दुष्काळ भत्ता दिल्याची नोंद सरकारी कागदपत्रातून आढळते. त्यामुळे दुष्काळी स्थितीतही नोकरदारांच्या पायाभूत गरजा भागवण्यात या भत्त्याची मोठी मदत झाली. कोल्हापूर संस्थान लोकाभिमुख करायचे असेल, तर त्या अगोदर प्रशासन लोकाभिमुख केले पाहिजे, पण प्रशासनातील प्रत्येक नोकरवर्ग जो लोकांसाठी काम करतो आहे, त्याची गरजसुद्धा भागली पाहिजे, तोसुद्धा समाधानी असला पाहिजे, ही भूमिका महाराजांची होती.[४४]

शाहू महाराजांनी दुष्काळी भत्ता संस्थानामधील सरकारी नोकरदार वर्गाबरोबरच शिक्षकांनासुद्धा लागू केला. शिक्षक जे प्रामुख्याने गावांमध्ये ज्ञानदानाचे काम करतात. गावातील दलित–बहुजन समाजातील मुला–मुलींना शिक्षण देण्याचे काम करतात, त्यांनासुद्धा दुष्काळाच्या संकटाने घेरलेले होते. शिक्षकांनासुद्धा दुष्काळी भत्ता लागू केल्याने सार्वजनिक शिक्षण प्रक्रियेत त्यांची सक्रियता वाढली. एकोणिसाव्या शतकातच त्यांनी प्रशासकीय नोकर, अधिकारी वर्गाला आणि शिक्षकांना दुष्काळी भत्ता लागू केल्यामुळे त्यांचा व्यापक दृष्टिकोन लक्षात येते. आधुनिक शासकीय नोकरांना अशा प्रकारचे भत्ते देण्यासाठी शासकीय स्तरावर विविध समित्यांनी महाराजांच्या या कामाची दखल अशा स्वरूपात घेतल्याचे आपल्याला दिसते.[४५]

४) लहान मुलांना सांभाळण्यासाठी पगारी आयांची नेमणूक

दरबारातून रोजगार हमी योजनेची कामे धडाक्यात सुरू होती. या कामांसाठी गावातून–बाहेरगावातून काम करण्यासाठी कामगार वर्ग येत असे. या लोकांमधील पुरुष व स्त्रियादेखील कामावर जात असत. त्यावेळी त्यांची लहान मुले कामाच्या ठिकाणी झाडाखाली वा रस्त्याच्या कडेला वा शेतात झोळीत अशी ठेवून त्यांचे पालक काम करत असत. या मुलांची उपासमार, केविलवाणे जिणे बघून महाराजांना खूप वाईट वाटले. त्यानंतर त्यांनी अशा लहान मुलांना सांभाळण्यासाठी भरपगारी आयांची नेमणूक केली. मुलांची काळजी घेणे, त्यांचे औषध, अन्न, पाणी बघणे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करायचे, ही त्या आयांची मुख्य जबाबदारी

होती. त्या काळात ४,१४६ लहान मुलांची काळजी घेण्याची जबाबदारी घेण्यात आली. त्यासाठी एकूण आयांच्या वेतनांवरती झालेला खर्च ३१ हजार ३५३ इतका होता, हे सन १८९६–९७ च्या प्रशासकीय अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. या लहान मुलांची काळजी घेतल्यामुळे त्यांचे आई–वडील निर्धास्तपणे रोजगार हमी योजनेवर काम करीत असत. मुलांच्या निकोप वाढीला चांगल्या वातावरणाची गरज महाराजांनी ओळखली होती.[४६]

५) दुष्काळग्रस्त गरीबांसाठी आश्रम निवारा व्यवस्था

दुष्काळाच्या काळामध्ये संस्थानामधील सर्वसाधारण माणसे स्वत:ची व कुटुंबाची काळजी घेऊ शकत होते, पण जे जोक निराधार होते, गरीब, म्हातारे, आंधळे–पांगळे, विविध रोगांनी पिडीत होते. त्यांना या काळात खरोखरच मदतीची अपेक्षा होती. महाराजांनी या लोकांनाही आधार दिला. कटकोळ, वळीवडा, तिरोडा, कोल्हापूर, वडगाव, शिरोळ व भागात आश्रम काढले. गरीब व पिडीतांना या आश्रमात राहण्याची सोय करण्यात आली. त्यासोबतच त्यांना कपडे पुरवण्याची सोयसुद्धा करण्यात आली होती. रोगराईने त्रस्त झालेल्या लोकांना त्यांच्या औषधांसाठी व इतर खर्चासाठी महाराजांनी आश्रमाला संस्थानाच्या तिजोरीतून देणग्या देण्याची योजना केली. मोफत औषधे वाटण्यावर रुपये ५०० खर्च झाल्याचे १८९६–९७ च्या प्रशासकीय अहवालातून दिसून येते. आश्रमातील सर्व निवासी लोकांना योग्य तो आहार मिळण्यासाठी व खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. काही ठिकाणी अन्नछत्रेही सुरू केली होती. आश्रमात न येऊ शकलेल्यांसाठी त्यांचे जेवण त्यांचे घरी देण्याचीही व्यवस्था ठेवली गेली होती. यातून ४८ हजार ७८५ नागरिकांना जेवणाची सोय झाली. त्याचबरोबर त्यांच्या औषधपाण्यासाठी अंदाजे ५०० रुपये खर्च करण्यात आला होता.[४७]

६) अनाथ, वेडे लोकांकरिता कपडे खरेदी

राज्यातील प्रजेला या संकटातून सावरण्यासाठी विविध प्रयत्न केले जात असताना महाराजांनी अनाथ व वेडे असणाऱ्या लोकांचीही तितकीच आस्थेने काळजी घेतली. त्यांचे कुटुंब नसताना महाराज यांनी स्वत: कुटुंबप्रमुख या नात्याने रुपये ३५ इतके खर्च करून दुष्काळात त्यांना कपडे पुरविले होते.[४८]

७) दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी स्वस्तात बोर्डिंगची व्यवस्था

सर्वसामान्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याची मोहीम राबवण्यात येत होती. मात्र दुष्काळाचा परिणाम संस्थानातील शिक्षणाच्या मोहिमेवरही होत होता. दुष्काळाच्या काळामध्येसुद्धा मुलांच्या शिक्षणाची कोणतीही गैरसोय होता कामा नये, दुष्काळामुळे त्यांच्या शिक्षणावर कोणताही नकारात्मक परिणाम होऊ नये, त्यांचे शिक्षण बंद पडू नये, यासाठी महाराजांनी राजाराम कॉलेज आणि राजाराम हायस्कूलमधील सर्व मुला–मुलींना बोर्डिंगमध्ये मोफत राहण्याची सुविधा सुरू केली. बोर्डिंगमध्ये राहणाऱ्या सर्व मुला–मुलींना राहण्या–जेवण्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या काळात संस्थानाकडून करण्यात आली होती.[४९]

८) धर्मशाळेच्या खर्चास मंजुरी

धर्मशाळा या प्रामुख्याने परगावाहून आलेल्या गोरगरिबांची विश्रांतीची आणि मुक्कामाची ठिकाणे असतात. समाजातील असे अनेक घटक एका गावातून दुसऱ्या गावात आपल्या उपजीविकेसाठी भटकंती करत असतात. धार्मिक कार्यक्रम म्हणून अनेक महाराज, साधुसंत किंवा विविध पंथातील लोक विविध ठिकाणी जात असतात. अशा वेळी त्यांना निवाऱ्यासाठी जागा हवी असते. अशा सर्व लोकांसाठी धर्मशाळा अतिशय उपयोगी ठरतात. त्यामुळे महाराजांनी गावोगावी धर्मशाळा बांधण्यास आणि आहे त्या धर्मशाळांना अनुदान देण्याला प्राधान्याने मंजुरी दिली. त्यामुळे दुष्काळी स्थितीत अशा धर्मशाळांचा मोठा आधार मिळाला.

वाडी रत्नागिरीतील ज्योतिबाच्या डोंगरावर दोन धर्मशाळा बांधण्यासाठी महाराजांनी दोन हजार रुपयांचे अनुदान दिले. या धर्मशाळा दोन पातळीवर बांधण्यात आल्या. त्यात एक धर्मशाळा विशेष लोकांसाठी आणि सर्वसामान्यांकरिता दुसऱ्या प्रकारची धर्मशाळा बांधली. त्यासोबत धर्मशाळा बांधण्यासाठी जी लाकडाची आवश्यकता आहे, तीसुद्धा जंगलातून तोडून घेण्याची परवानगी स्थानिक संस्थेला व प्रशासनाला दिली होती. यामुळे धर्मशाळा ही केवळ एका जातीची किंवा धर्माची न राहता सर्वसामान्य दीनदुबळ्या लोकांचे आश्रयस्थान बनली होती. दुष्काळाच्या संकटात अनेक लोकांना धर्मशाळेतून मोठा आश्रय मिळाला.[५०]

वाडी रत्नागिरी येथे धर्मशाळा बांधण्यास रु. १ हजार २७५ एवढ्या रकमेची मंजूरी दिली आणि ही रक्कम कराच्या उत्पन्नतून खर्च करण्याचेही आदेश दिले होते.[५१]

९) दुष्काळात दलितांना तगाई देणे

भीषण दुष्काळाचे सावट व त्याचा दूरगामी परिणाम शेती आणि शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांवर होत होता. दुष्काळी परिस्थितीत शेतीतील उत्पादन नसल्यामुळे रोजगार निर्मिती नव्हती. रोजच्या निर्वाहासाठी आणि शेती कसण्यासाठी बऱ्याचदा शेतकऱ्यांना कर्जाची गरज असते. गावांमध्ये सावकार वा जमीनदार हे ही शेतकऱ्यांना कर्जे देतात, परंतु त्यांचे कर्ज जास्त रकमेच्या वस्तू वा जमिनी तारण घेऊनही भरमसाठ व्याजदराने असते. याचा फटका सर्वाधिक दलित वर्गास बसत होता. यावर सरकारातून अशा संकटात मदत म्हणून तगाईच्या रूपाने अल्प वा मध्यम मुदतीचे कर्ज सवलतीच्या दराने दिले जायचे. यामुळे प्रजेला विशेषतः दलितांना उपजीविकेसाठी खूप मोठा दिलासा मिळायचा.

खोदशी पेटा आळते येथील महार लोकांनी दुष्काळ चालू असल्याने २०० रुपयांची तगाई मागितली होती. त्यावर ५००० रु.किंमतीची व दरसाल २०० रुपये उत्पन्नाची जमीन तारण म्हणून घेऊन नियमानुसार व्याजदराने ४ वर्षात ते फेडण्याच्या अटीवर त्यांना त्वरीत तगाई मंजूर करून महाराजांनी बहुजन समाजाला नेहमीच मदत केलेली होती.[५२]

सावकारीवर नियंत्रण

१) सावकार वर्गासाठीचे नियम

दुष्काळाच्या काळामध्ये शेतकरी व कामगार वर्गाला आपल्या निर्वाहासाठी काही वेळा कर्ज घ्यावे लागायचे. स्थानिक पातळीवरील सावकार हे या गोष्टीचा फायदा घेऊन जबर व्याज लावून सर्वसामान्यांना लुबाडण्याचे काम करत असत. व्याज न दिल्यास शेतकऱ्यांची जमीन, त्यांचे दागिने, वा इतर किंमती वस्तू इत्यादी हडप करीत होते. कर्जासंबंधाने चौकशीत महाराजांना खालील गोष्टी समोर आल्या.

- बरेच सावकार योग्य हिशोब ठेवत नाहीत.

- बहुदा पावत्या देतच नाहीत.
- बहुतकरून व्याजाचा दर जबर असतो.

सावकारांचा हा अनागोंदी कारभार नियंत्रणात आणण्यासाठी सावकारीसंबंधित काही महत्त्वाचे नियम लागू केले. त्या नियमावलीमध्ये प्रामुख्याने एकूण दहा नियमांचा समावेश करण्यात आला.

१. सावकार म्हणजे एका इसमास एका वेळी पन्नास रुपये किंवा एक किंवा अनेक कुळे मिळून एकंदर पाचशे रुपये किंवा अधिक रक्कम ज्याचे कर्जी गेले आहेत तो–
२. प्रत्येक सावकाराने आपल्या देवघेवीच्या सर्व व्यवहाराचे हिशोब एका बांधलेल्या पुस्तकात ठेविले पाहिजेत. सदर बुकाच्या प्रत्येक पानावर सबरजिस्ट्रार (सावकाराचे व्यापार करण्याचे राहण्याचे ठिकाण ज्या हद्दीत असेल, त्या हद्दीचा सब–रजिस्ट्रार) शिक्का करून घ्यावा व अखेर एकूणात बांधण्यात यावी. प्रत्येक १०० पानास ४–चार प्रो याबद्दल मेहनताना आकारण्यात येईल. हा खर्च सावकाराने देण्याचा आहे.
३. प्रत्येक सावकारांनी कीर्द व खतावणी अशी दोन बुके तरी ठेवलीच पाहिजे व त्यात प्रत्येक रक्कम लिहिली पाहिजे.
४. कूळ मागेल त्या वेळी त्याच्या खात्याचा उतारा – सावकाराने त्यास दिला पाहिजे व स्वतःचे खाते त्यास दाखविले पाहिजे.
५. प्रत्येक रकमेबद्दल मग ती कितीही लहान असो, सावकाराने ताबडतोब पावती दिली पाहिजे.
६. यापुढे अशा व्यक्तीने हिशोब न ठेविल्यास कोणत्याही सावकारास केवळ दस्ताऐवजवरून किंवा तोंडी पुराव्यावरून किंवा लेखी कबुलीवरून दावा देवविला जाणार नाही. इतर पुराव्याबरोबरच कीर्द खात्याचा पुरावा पाहिजे.
७. सावकार यांनी घेण्याच्या दस्तावर किंवा कबुलीयतीवर बिन सही करणाराची निशाणी न घेता त्याच्या डाव्या हाताचा ठसा घेतला पाहिजे.
८. प्रत्येक स्टांपव्हेंडरनेही या प्रमाणेच विकताना स्टांप विकताना स्टांपावर विकत घेणाराचा आंगठा उठवून घ्यावा.

९. आंगठे कसे उठवून घ्यावयाचे, याचे शिक्षण सावकार, त्याचे नोकर स्टांपव्हेंडर यांस कोणत्याही सब-रजिस्ट्रार कचेरीत मोफत मिळेल.

१०. हे नियम १३२८ फ. पासून अंमलात येतील. त्यापूर्वी म्हणजे ६-६-१८ चे आत सावकार लोकांनी वह्या नोंदून नेल्या पाहिजेत, याची प्रसिद्धी गॅझिटात करावी.

महाराजांनी दि. १२-३-१९१८ मध्ये केलेल्या सावकार व सावकारीसंदर्भातील नियमावलीमुळे अनियमित सावकारशाहीला प्रतिबंध बसला.[५३]

२) साठेबाजीबाबत हुकूम

व्यापारी लोकांनी दुष्काळी काळात प्रजेला लुबाडू नये, अशी महाराजांची सक्त ताकीद होती, तरीही काही व्यापारी लोक दुष्काळी परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी मनमानी करतच होते. धान्याची मुद्दाम साठेबाजी करून ते चढ्या भावाने बाजारात विकण्याचे धोरण त्यांनी सुरूच ठेवले होते. यात सामान्य जनता भरडली जात होती. मुंबई परिसरातील अशाच एका व्यापाऱ्याने तांदूळ शिल्लक असूनही तो बाजारात विक्रीसाठी न आणता तसाच दाबून ठेवल्याची घटना घडल्याने त्यास प्रतिबंध म्हणून मुंबई इलाख्यात नियम जारी केले होते. महाराजांनी त्याच धर्तीवर आपल्या संस्थानातील अशा प्रकाराचा अहवाल मागविला आणि राज्यात अशा घटना कुठे कुठे घडत आहेत, याची माहिती मागविली. राज्यातील व्यापाऱ्यांकडून अन्नधान्य असे दडवून ठेऊन गरीबांची कुचंबणा करू नये व गरीबांना जिन्नस खरेदीसाठी जादा किंमत द्यावी लागू नये यासाठी त्यांनी साठेबाजी प्रवृत्तीला तात्काळ पायबंद घालण्यासाठी साठेबाजीसंदर्भाच्या ठरावात पुढील महत्त्वाचे नियमच लागू केले होते.

१. खाण्याच्या धान्यापैकी म्हणजे रंगून तांदूळ, ऑस्ट्रेलियन गहू व दुसरे जीनसांपैकी रॉकेल, तेल यापैकी कोणी व्यापारी इसम फार नफा मिळविण्याचे हेतूने आपल्याजवळ असलेला माल दाबून ठेवून विक्रीस काढीत नाही, असे समजून येईल तेव्हा अशा धान्याचा कबजा कंट्रोलर ऑफ प्रायसीज, कोल्हापूर यांनी अगर त्यांनी ज्या इसमास याबाबतीत मुद्दाम हुकूम दिला असेल असा इसमाने धान्याचे मालकास अगर ते ज्यांचे प्रत्यक्ष कबजात असेल त्यात एकमेकांचे आपसात रीतीने जी रक्कम ठरेल ती देऊन

अगर अशी आपसात रीतीने जी किंमत ठरली नाही तर सदर अधिकारी यांनी योग्य ती किंमत देऊन अगर देण्यास कबूल करून सदरचे धान्य कबजात घ्यावे.

२. करवीर सरकारचे हद्दीत ज्या कोणाजवळ रेसिडेन्सी अगर कोल्हापूर कंट्रोलर यांच्या पासावाचून रॉकेल खरेदी केले आहे, असे आढळून येईल, तर ते योग्य मार्गे घेतलेले नाही असे समजून ठरीव दराप्रमाणे तेलाचे मालकास अगर ते ज्यांचे कबजात असेल त्यास किंमत देऊन कब्जात घेण्याचा अधिकार कंट्रोलर ऑफ प्रायजीस कोल्हापूर यास देण्यात आलेला आहे. असा माल कबजात घेतल्यावर कंट्रोलरवर लोकांच्या सोयीसाठी लायसनदरामार्फत विक्री करतील अगर योग्य ती अन्य व्यवस्था करतील व्यापाराखेरीज ज्या इतर इसमाने या पूर्वी काही स्टॉक करून ठेविला असेल त्यात अगर एक डब्यापेक्षा कमी तेल खरेदी केले असेल अगर करील त्यास लागू नाही.

३. वरील हुकमाविरुद्ध ज्याचकडून वर्तन होईल त्यास जाहीरनामा नंबर ४७/ २४– ३–१८ यात जी शिक्षा सांगितली आहे तीस तो पात्र होईल.

४. कबजात घेतलेल्या मालाची किंमत जेव्हा तडजोडीने कंट्रोलर व व्यापारी यांचे दरम्यान ठरली जाणार नाही, तेव्हा ज्या व्यापाऱ्यास त्यात आपले नुकसान आहे, असे वाटेल त्यास कंट्रोलरचे ठरावावर अपील करण्याचा अधिकार आहे.

५. सदरचे अपील पुढील कमेटी पुढे चालेल–

   १. मेहरबान रावबहादुर एक्टिंग दिवाण साहेब

   २. रावसाहेब डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट

   ३. रा. रा. रामराव काळोबा लाटकर (कोणीतरी व्यापारी घालणेचा)

६. कंट्रोलर यांनी कबजात माल घेतलेपासून अगर त्यांनी किंमत देण्यास पुढे केलेपासून १४ दिवसांत अपील दाखल केले पाहिजे.

७. दोन्ही बाजू ऐकून घेऊन अपील कोर्ट समरी निकाल देईल. मेंबर्समध्ये जेव्हा मतभेद असेल तेव्हा बहुमतांचा निकाल अखेरचा समजणे. यावर पुढे अपील अगर तपासणी नाही. यास वकील मुखत्यार वगरैस घेतले जाणार नाही.

८. दर आठवड्यास खालील धान्यांचे किमान दर ठरवून देण्यात येतील ती धान्ये – तांदूळ, जोंधळे, गहू व हरभरे तसेच गोडेतेल व मीठ

९. रॉकेल तेलाचेही दर मुंबईचे दरास अनुसरून ठरवून देण्यात येतील.

यामुळे कोल्हापूरात व्यापारांवर वचक राहून धान्याचे वितरण विना अडथळे होण्यास मदत झाली.[५४]

३) पाटील–कुलकर्णी यांना स्वतःच्या गावात देवघेव व व्यापार न करण्याचा हुकूम

तत्कालीन गाव रचनेनुसार गावातील पाटील व कुलकर्णी हे गावचे प्रमुख असत. गावातील लोकांना ते सांगतील. त्याप्रमाणे वागावे लागे. बऱ्याचदा ते अरेरावी करत असत आणि गरीब लोकांना त्रास देत. सावकाराबरोबरच हे धनाढ्य गावचे पाटील व कुलकर्णी आपापल्या गावात देवघेवीचे व्यवहार करून गरीब लोकांना त्रास देतात. हे समजल्यावर महाराजांनी तत्काळ असे व्यवहार करण्याला विरोध करून मनाई केली आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या वतीने त्यांच्या अन्य कोणी नातेवाईकांनीदेखील गावकऱ्यांना तसा त्रास देऊ नये, यासाठी त्यांच्यावरही नियम लागू केला होता. लोकांना लुबाडणाऱ्यांवर महाराजांचा नेहमीच वचक राहिला होता.[५५]

जनावरांसाठी केलेल्या उपाययोजना

शेती वा शेतीपूरक व्यवसायासाठी पशुधन जवळ बाळगणे ही प्राथमिक गरज होती. त्या काळात देशभरात व संस्थानातही पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेती व्यवसायासाठी गाय, बैल, म्हैस, बकरी, शेळी, कोबंडी इत्यादींसारख्या जनावरांची आवश्यकता होती. केवळ शेतीच नव्हे, तर शेतीवर आधारीत इतर व्यवसाय जसे दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन यासाठी बहुतेक शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांकडे ही गुरे–ढोरे, जनावरे असायची. आजही अशा जनावरांची गरज शेतीपूरक व्यवसायास लागते, तर त्या काळात आजच्याइतकी आधुनिक अवजारे वा तंत्रज्ञानाचा म्हणावा तेवढा वापर होत नसताना या जनावरांवर बहुतांशपणे अवलंबून राहून शेती वा पूरक व्यवसायातून उदरनिर्वाह होता.

त्या काळातील दुष्काळाची भयाणता बघता केवळ माणसेच नव्हे तर जनावरांवर देखिल परिणाम होऊन त्यांची अवस्था चारा–पाण्यावीना हालाखीची झाली होती. त्यांना सांभाळणे त्यांच्या मालकांना कठीण जात होते. महाराजांनी माणसांचेच नाही तर मुक्या प्राण्यांचेदेखील

हाल होऊ दिले नाहित. त्यांना सुद्धा या दुष्काळातून वाचविले पाहिजे या उदात्त हेतूने खालीलप्रमाणे विशेष काळजी घेतली जाईल असे पाहिले.

१) जनावरे सरकारी थट्टीत सोडणेबाबत

दुष्काळात तगून राहणे हे मनुष्यास सुद्धा बऱ्याचदा अवघड जाते तेथे बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना, जनावरांना तग धरणे तर कठीणच असते. शेती व्यवसायात बैलासारखे पशुधन अत्यंत उपयोगाचे असते परंतू या काळात चारा–पाण्याच्या कमतरतेमुळे ते विकण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर पर्याय नव्हता. ही बाब लक्षात घेऊन महाराजांनी कोल्हापूर व पदमाळ्याजवळ सरकारी थट्टी उभारुन जनावरांच्या पोषणासाठी काही नियम घालून जाहीर केले की, इलाक्यातील ज्या गरीब लोकांस स्वत:च्या जनावरांचे रक्षण वा पोषण करणे जमत नसेल त्यांनी ती सरकारी जागेत आणून तेथील डॉक्टरांचे ताब्यात द्यावीत.[५६]

चारा वैरणासाठी महाराजांनी मोठ्या निधीची तरतूद तर केलीच, परंतू दुष्काळ संपल्यावर आपापली जनावरे पुन्हा घेऊन जाण्याबाबतही लोकांना मोकळीक दिलेली होती. महाराजांनी आपल्या इलाक्यातील जनावरांची ही जबाबदारी घेतली होती.

२) स्वत:च्या मालकीची जनावरे प्रजेस देणे

दुष्ळाळ संपल्यावर सरकारजमा असलेली ही जनावरे जेव्हा परत घेऊन जाण्यासाठी त्यांचे मूळ मालक येत असत. त्यावेळी खऱ्या मालकांचे जनावरे इतर कोणीतरी आपली जनावरे सांगून घेऊन गेल्याचे निदर्शनास यायचे. खरेतर त्यावेळी ती परिस्थिती पहाता आवश्यक ती कागदपत्रे वा जनावरांच्या मूळ मालकांची माहिती परिपूर्ण ठेवली गेली नसल्याने त्याचा फायदा काही लोकांनी अशा पद्धतीने घेतला होता. परंतू ज्याची त्याची जनावरे ही त्याला देणे ही सरकारची जबाबदारी असल्याने शाहू महाराजांनी स्वत:च्या मालकीची सुमारे शंभर जनावरे देऊन वेळ प्रसंगी स्वत:ची संपत्ती ही रयतेसाठी दिली.[५७]

३) सरकारातून जनावरांसाठी गवत उपलब्ध करून देणेबाबत.

सन १९०० ला देखील म्हणावा तसा पाऊस न पडल्याने जनावरांच्या चाऱ्याच्या किंमतीत वाढ झालेली होती. गवत कडबा इत्यादीसाठीची वणवण पुन्हा शेतकऱ्यांना करावी लागत होती.

पशुधन व इतर कामासाठी गवताची कमतरता असल्याने सरकारातून गवत कापून ते कमी किमतीत रयतेस उपलब्ध करून दिले जायचे, जेणेकरून त्या जनावरांच्या चारा वैरणासाठी लोकांना फिरावे लागणार नाही.

सन १९०० च्या प्रशासकीय नोंदीनुसार, वागजाई व मल्हारपेठेत या दोन ठिकाणी सरकारातून दोन प्रकारचे गवत (काळे व शेंडे) कापून रयतेच्या उपयोगासाठी उपलब्ध करून दिलेले होते. त्याचा त्या सालातील सरकारचा भाव पुढीलप्रमाणे लावला होता.[५८]

वागजाई येथील भाव

नवे शेंडे गवत लहान पेंडी	हजारी किंमत २ रूपये
नवे शेंडे गवत मोठी पेंडी	हजारी किंमत ९ रूपये
शेंडे व काळे मिश्र जुने गवत मोठी पेंडी	हजारी किंमत साडेचार रूपये

मल्हारपेठ येथील भाव

नवे शेंडे गवत लहान पेंडी	हजारी किंमत दीड रूपये
नवे शेंडे गवत मोठी पेंडी	हजारी किंमत साडेचार रूपये
नवे डोंगरी काळे गवत चांगले मोठी पेंडी	हजारी किंमत १० रूपये

गरजूंना रास्त भावाने हे गवत त्या ठिकाणच्या दुष्काळ तीव्रतेनुसार व गवताच्या प्रकारानुसार ठरवून दिले जायचे.

४) गवत लावून कुरण करण्यासाठी सरकारतर्फे जमिनी घेणे

शाहू महाराजांनी जनावरांच्या पोषणाच्या काळजीपोटी सरकारी जमिनीवर काही ठिकाणी गवत लावून कुरणे तयार केलेली होती. त्यातून या प्राण्यांना गवताचा चारा उपलब्ध करून दिला जायचा. शिरोळ तालुक्यातील उदगाव या गावाच्या बाजूला जमीन घेऊन तेथे गवत लावण्याच्या उद्देशाने काही लोकांच्या जमीनी सरकारकडून घेतल्या गेल्या. त्याठिकाणी फक्त

गवत लावण्यासाठी एकूण ६६.३८ एकर गुंठे जमीन घेतली आणि ३६,४८८ एवढी रक्कम त्या लोकांना त्याबदल्यात मोबदला दिला गेला.[५९]

५) जनावराची योग्य काळजी घेण्यासाठीची शिस्त

दुष्काळ निवारण कामात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीय संवेदनशीलता जागृत ठेवण्यासाठी महाराजांनी कर्मचाऱ्यांना दुष्काळी भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे प्रशासनातील कोणत्याही अधिकारी, कर्मचाऱ्याने नियमबाह्य वर्तन करू नये, कामात कुचराई करू नये, यासाठी कडक नियम केले होते, फक्त माणसांबरोबरच चांगला व्यवहार करणे पुरेसे नसून मुक्या जनावरांसाठी सुद्धा वर्तन चांगले असावे ही अपेक्षा यातून होती. असाच एक प्रसंग कासारवाडी व येवलूज या ठिकाणी घडला.

तेथे सरकारी थट्टीतील जनावरांच्या पोषण व रक्षणासाठी संतू माणिक राऊत या कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. मात्र त्याने एकदा सवलत देऊनही आपले काम सुधारले नाही. झाडलोट, शेण काढणे इत्यादी व्यवस्था नीट होत नव्हती व तो आपल्या कामाप्रती प्रामाणिक नसल्याचे आणि कामात हलगर्जीपणा करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे महाराजांनी त्याला नोकरीवरून कमी करण्याचा निर्णय घेतला होता. जनावरांच्या पालनापोषणासाठी असा कठोर निर्णय घेऊन इतर कर्मचाऱ्यांवरही वचक बसवून इतर लोकांनाही कामाच्या नियमाचे पालन करण्याच्या सूचना दिल्या होत्या.[६०]

संस्थानातील नागरिकांचे पशुधन जगावे यासाठी महाराजांनी घेतलेल्या पशुधन पोषणाच्या संदर्भातील निर्णयामुळे संस्थानातील पशुधनाची चांगली जोपासना झाली आणि ज्यातून दुष्काळी स्थितीतही येथील पशुधन संख्या ४,२७,६२९ वरून ४,३४९४९ वर पोहोचल्याची नोंद १८९६-९७च्या प्रशासकीय अहवालात दिसून येते.

संसर्गजन्य साथीच्या रोगांवरील उपाययोजना

अ) प्लेगबाबत उपाययोजना

दुष्काळात तेरावा महिना असे प्लेगमुळे त्यावेळेचे वातावरण तयार झालेले होते. मुंबई इलाख्यात १८९६ च्या दरम्यान पसरत असलेला प्लेग संस्थानात सुद्धा दाखल झालेला हेाता. प्लेग सारख्या संसर्गजन्य रोगामुळे लोकांचा मृत्यूदर अचानकपणे वाढत होता. संस्थानातील दुष्काळाची झळही प्लेग, कॉलरा सारख्या साथीच्या आजारांमुळे अधिकच जाणवत होती. परंतु महाराजांनी या रोगावर दुष्काळनिवारणासोबतच अनेक उपाय करून त्यास आटोक्यात आणले होते.

ही साथ पसरू नये म्हणून स्वत: शाहू महाराज लोकांमध्ये जाऊन त्यांची भीती जावी यासाठी माहिती देत. प्लेग पसरू नये म्हणून गावाबाहेर वस्ती करण्यासाठी त्यांनी आर्थिक मदत केली, प्रत्येकाने वैदयकीय तपासणी करण्याचा दंडक घालून दिला होता. नवीन झालेल्या वस्तीवर व गावात पहारा देण्यासाठी जादाचा पोलिस बंदोबस्त ठेवला होता. त्यासाठी पन्नास हंगामी पोलिसाची नेमणूक केली होती. त्याचबरोबर भास्करराव जाधव यांच्याकडे प्लेग आयुक्त म्हणून जबाबदारी दिली. काही विशेष बाबींची अंमलबजावणी त्यांनी याकाळात जनतेचे हितास्तव केल्या.[६१]

१८९७ मध्ये प्लेग आयुक्त दिवाण कुंवरजी यांची नेमणूक झाल्यावर त्यांनीही संस्थानात अनेक कॅम्प उभे करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी भरीव योगदान दिले.

१) प्लेग बंदोबस्तादरम्यान मयत कुटुंबियाचा उदरनिर्वाह, शिक्षण यासाठी खास तरतूद

संस्थानातील दुष्काळनिवारण्याच्या कार्यात जसे सरकारी कर्मचारी कार्यरत होते तसेच या रोगावर प्रतिबंध करण्याच्या कामात ते रात्रंदिवस राजाज्ञा प्रमाणे झटत होते परंतू हया कर्तव्याचे वेळी काही नोकरदारांना आपला जीव गमवावा लागला होता. त्यांच्या कुटुंबाला वाऱ्यावर न सोडता आर्थिक मदतीसह कुटुंबातील इतर सदस्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे धोरण महाराजांनी संस्थानात राबवले. आनंदाबाई सखारामजी कुलकर्णी या महिलेला आपल्या पतीचा जीव गमावल्यामुळे त्यांच्या दोन मुलांना सरकारी आश्रयासोबतच शिक्षणाचा खर्च संस्थानाअंतर्गत करणे शक्य व्हावे यासाठी तिला शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आदेश देऊन स्थैर्य दिले.[६२]

२) प्लेगमुळे सार्वजनिक सुट्टी

प्लेगसारख्या त्वरीत पसरणाऱ्या संसर्गाला अटकाव करणे तितकेच अत्यावश्यक असून नोकरदार वर्गांना प्रवास करणे हे जीवघेणे होऊ नये यासाठी छत्रपतींनी तीन दिवस शासकीय कार्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन आगावू खबरदारी घेतली होती.[६३]

३) प्लेगसाठी प्रतिबंधात्मक उपाय व विशेष सवलती

प्लेगमुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात आलेले होते. महाराज दुष्काळाबाबत जितके संवेदनशील होते, तितकेच प्लेगसारख्या आजाराबाबत अत्यंत दक्ष होते. लोकांना काही विशेष सवलती देऊन इन्शूलेशन्स घेण्यास महाराजांनी प्रोत्साहनपर सवलती दिल्या होत्या पहिल्यामध्ये इन्शुलेशन टोचून घेणाऱ्या शासकीय नोकरास पगारी चार दिवसाची सुट्टी दिली. दुसऱ्या प्रकारची सवलत म्हणजे इन्शुलेशन टोचून घेणाऱ्या कैद्याला दोन महिन्यांची शिक्षा कमी करण्याची भूमिका घेतली. त्यासाठी महाराज विविध कारागृहात जाऊन स्वतः कैद्यांची भेट घेऊन त्यांना इन्शुलेशन टोचून घेण्यास प्रोत्साहित करत होते.[६४]

४) वैद्यकीय तपासणी

बाहेरगावाहून येणाऱ्या लोकांमुळे करवीर नगरात प्लेग पसरू नये याची अगोदरच खबरदारी घेण्यासाठी रेल्वेचे ठिकाणासह इतर भागात वैदयकीय तपासणीची व्यवस्था केली बाहेरगावाहून आलेल्या लोकांनी कोल्हापूरात आल्यापासून दहा दिवसांपर्यंत हॉस्पीटलला राहणे आवश्यक असून अशा रोगीबांबत माहिती त्वरीत देऊन त्यांना डिसइन्फेक्ट करण्याचा उपाय योजावा असा हुकुमनामाच त्यांनी काढला होता. आजची कॉरन्टाईन संकल्पना त्यावेळी महाराजांनी प्रभावीपणे राबविली होती.[६५]

आ) कॉलरा रोग प्रतिबंधक उपाय

१) तलावाचे पाणी स्वच्छ ठेवणे

प्लेगसारखाच कॉलरा हा साथीचा रोग पाण्यातून पसरणारा होता . संस्थानात बऱ्याचदा यात्रा–जत्रांचे वेळी लोकांची सामुहीक गर्दी होत असते त्यांच्या वापराने तेथील परिसर व पाणी

लगेचच खराब होण्यास सुरवात होते आणि याचमुळे साथ लवकर पसरते. महाराजांनी चिंचोलीच्या यात्रेतून आलेल्या अनुभवातून सार्वजनीक ठिकाणी शक्यतो एकत्र येण्यावर बंधने घातली पण असा प्रकार ज्योतिबाच्या यात्रेत होऊ नये म्हणून सन १९१२ ला भरणाऱ्या चैत्र पौर्णिमेच्या यात्रेअगोदरच तेथील गायमुख तलावाचे पाणी स्वच्छ ठेवण्याच्या सूचना दिल्या व स्वतंत्र कर्मचारी लावून नेहमीच तेथील साफसफाई करत राहण्याची सक्त ताकीद दिली होती जेणेकरून साथीस प्रतिबंध होईल.[६६]

२) पाण्यात औषधी द्रव्ये फवारणी

या व्यतिरिक्त कॉलरावर सर्वसाधारणपणे पाणी स्वच्छता हा उत्तम पूर्वोपचार असल्याने गावातील नदीचे पाणी औषधी द्रव्याने स्वच्छ करण्याचा आदेश देऊन त्याच्या खर्चाची तरतूद ही म्युनिपल फंडातून केली गेली.[६७]

३) पाणी स्वच्छतेसाठी औषध खरेदी

कॉलराच्या रोगाला अटकाव होण्यासाठी पाण्यात औषधी द्रव्ये टाकून ते पाणी स्वच्छ ठेवणे गरजेचे होते म्हणून त्यावरील औषधे खरेदीस ५०० रुपयांची स्पेशल मंजूरी सरकारातून देऊन अशी औषधे आणून ठिकठिकाणच्या पाण्यात टाकण्याची काळजी घेतली होती.[६८]

पहिले महायुद्ध आणि कोल्हापूर संस्थान

सन १९१४ ला पहिले महायुद्ध सुरू झाले होते. भारतावर ब्रिटिशांचे राज्य असल्याने भारतातील लोकांनाही त्या युद्धात ब्रिटिशांच्या बाजूने लढणे अपरिहार्य होते. भारतातील साधनसंपत्ती, रोख पैशांच्या स्वरूपातील निधी, युद्धासाठी वापरण्यापासून ते अनेक भागातून लोकांना लष्कर भरती करून युद्धासाठी पाठविले गेले होते. कोल्हापूर संस्थान हे सुद्धा ब्रिटीशांच्या अंमलाखाली असल्याने युद्धासाठी ब्रिटीशांना मदत करणे भागच होते. संस्थानामार्फत पहिल्या महायुद्धासाठी कोल्हापूर संस्थानातून भरीव आर्थिक मदत करण्यात आलेली होती. युद्धाची परिस्थिती ओळखून त्यासाठी निधी जमविण्यास महाराजांनी स्वत: जातीने प्रयत्न केले होते. सुरुवातीला स्वत: त्यांनी युद्धफंडासाठी २० हजार रुपये तर स्त्री कल्याणसाठीच्या फंडासाठी ४ हजार रुपये देणगी दिली होती. युवराजांनीही या युद्धकर्जाबाबत

भरीव काम करून अंदाजे २ लाख रुपये जमा केले होते. तसेच या युद्धाकर्जला मदत म्हणून ५ लाख रुपये देण्याचा मनोदय केला होता. कोल्हापूर दरबाराकडून ५,५४,२०० चे वॉर बॉन्डस घेऊन मदत केली तर संस्थानातील प्रजेकडून अंदाजे १३-१४ लाख रुपये जमा होऊन युद्धकर्ज स्वरुपात मदत करण्यात आली होती. सन १९१५ ला त्यांनी संस्थानातर्फे वॉर रिलिफ फंड म्हणून ३९ हजारांची रक्कम पाठविलेली होती. याबरोबरच रुग्णवाहीका व इतर साहित्याचा पुरवठासुद्धा करण्यात आलेला होता. या व्यतिरिक्त युद्धासाठीच्या लष्कर भरती होणाऱ्या लोकांना काही सवलती जाहिर केल्या. युद्धातील जखमींच्या वैदयकीय खर्चाचा भार सुद्धा महाराजांनी उचलला होता. या सर्वांचा परिणाम संस्थानाच्या आर्थिक तिजोरीवर झाला होता. त्यामुळे काही योजनांवरही विपरीत परिणाम झाला.[६९]

युद्धाचा कालावधी हा महाराजांच्या मध्य कारकीर्दीतला आहे. संस्थानात दुष्काळाचे संकट हे राजवटीच्या सुरुवातीपासून असल्याने त्या काळात राबविलेल्या अल्प व मध्यम मुदतीच्या तातडीच्या योजनांद्वारे महाराजांनी दुष्काळ स्थिती योग्य प्रमाणत आटोक्यात आणली होती. अर्थात, दुष्काळ निवारणाच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी सुरू केलेल्या उपाययोजना व कामांमध्ये पायाभूत सुविधांबरोबरच भविष्यकालीन विकास सुविधांचाही अंतर्भाव होता.

पहिल्या महायुद्धामुळे संस्थानावर अतिरक्त आर्थिक ताण पडून निधींचा तुटवडा जाणवू लागला होता. अशांतता निर्माण होऊन वस्तूंच्या किंमती वाढत होत्या. परंतु यामुळे दुष्काळसंबंधीत करण्यात येत असलेल्या कामांचा विचार करता प्राथमिक स्वरुपाच्या व आवश्यक कमी मुदतीच्या कामांवर फारसा परिणाम न होता दीर्घ मुदतीच्या व जास्त खर्चिक कामांवर मात्र थोडाफार परिणाम पडलेला तत्कालीन दस्ताऐवजावरून दिसून येतो. जसे की, राधानगरी धरणासारख्या मोठया स्वरुपाच्या खर्चिक असलेल्या प्रकल्पावरील काही खर्च कमी करण्याची वेळ या पहिल्या महायुद्धाच्या काळात आली होती.

या स्थितीमध्ये काही योजनांचा आढावा घेऊन त्यावरील खर्च कमी करावा लागला तर काही योजना तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करून ती रक्कम महायुद्धाकडे वळवली गेली होती. अर्थातच, असे असले तरी शाहू महाराजांनी आपल्या जनतेच्या हितासाठी असलेल्या योजना

प्रसंगी स्वत: आर्थिक भार सोसूनही चालू ठेवल्या व रयतेच्या कल्याणसाठी वेळोवेळी खर्चही केलेला होता.

युद्धकाळात संस्थानातील व्यापारांना वस्तूंचे दर न वाढविण्याच्या सूचनाही महाराजांनी दिलेल्या होत्या. युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा घेत महायुद्धाच्या काळात व्यापारांनी आपल्या वस्तूंच्या दरात वाढ केल्याने मुंबई सरकारने बॉम्बे गॅझेट मधे ठराव करून त्यास प्रतिबंध केला होता. त्याच धर्तीवर शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सुद्धा तशाच प्रकारे ऑगस्ट १९१४ ला एक ठराव मंजूर केला. त्यात ते स्पष्टपणे नमूद करतात की, अँग्लो जर्मन लढाईमुळे व्यापारी लोकांनी दर महाग केले आहेत, ते तसे न करणे आपल्या इलाक्यात ही जरूरी असून, त्याची तजवीज त्वरीत करावी.[७०]

महाराजांनी दुष्काळाबरोबरीने आलेल्या रोगसंकटांना तसेच आपत्तींना त्याच ताकदीने तोंड दिले. छत्रपतींनी आपल्या संस्थानात दुष्काळ निवरणासाठी तातडीने काही अल्प-मध्यम मुदतींची कामे हाती घेऊन उपाययोजना राबविल्या. याचा परिणाम म्हणून या दुष्काळ काळात संपूर्ण भारतात अंदाजे दहा हजार लोक मृत्यूमुखी पडले होते. त्याचवेळी कोल्हापूरच्या राज्यात मात्र महाराजांनी एकही भूकबळी जाऊ दिला नाही, हे त्यांनी दुष्काळनिवारणार्थ केलेल्या कार्यामुळेच शक्य झाले होते.

संदर्भसूची

१) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.११८

2) Latthe -. B. - Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur (Vol. I), Time Press, Bombay, 1924

३) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर दि. १४/०४/१८९४ पृ. ६८.

४) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. १३/१२/१९२१, पृ. २०२

५) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. २९/६/१९१८, पृ. ९७

६) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. ११/१०/१९१३, पृ. २६५

७) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. २/०९/१९१६ पृ. २६६

८) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. २८/८/१९१६ पृ. १८

९) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. २३/११/१८९५, पृ. २४९

१०) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. २६/१/१८९५, पृ. २१

११) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, कोल्हापूर, दि. १०/३/१९०० पृ. ६१

१२) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग–१, कोल्हापूर, दि.२८/७/१९००, पृ. २०३

१३) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग–१, कोल्हापूर, दि.१/४/१८९९ पृ. ६२

१४) सूर्यवंशी कृ.गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे,१९८४, पृ. ११९

१५) कित्ता ११९

१६) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. १५०

१७) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे,१९८४, पृ.१२३

१८) कित्ता १२३

१९) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग–१, कोल्हापूर, दि. २०/१/१९०० पृ. १८

२०) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग–१, कोल्हापूर, दि. १/२/१९१९, पृ. १४

२१) हुजूर ऑफिस, ठराव बुक ७२, ठराव क्र. ५८०, दि. ९/१/१९०९, कोल्हापूर, पृ. २४

२२) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६०, ठराव क्र. ५७३, दि. २१/१२/१९०६, कोल्हापूर, पृ. ६०

२३) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग १, कोल्हापूर, २१/६/१९१९, पृ. ८३

२४) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग १, कोल्हापूर, दि. ६/६/१९००.

२५) हुजूर ऑफिस, ठराव बुक–५०, ठराव क्र. ११३१, दि. ६/६/१९०४, कोल्हापूर, पृ. २७०

२६) हुजूर ऑफिस, ठराव बुक ३२, ठराव क्र.–९१०, दि.१२/५/१८९९, कोल्हापूर.

२७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ३५, ठराव क्र.–६९२, दि.२८/०१/१९००, कोल्हापूर.

२८) हुजूर ऑफिस, ठराव बुक ९७, ठराव क्र. ६८१, दि. २१/२/१९१३, कोल्हापूर, पृ. ३०४

२९) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग १, दि. २४/३/१९०६, कोल्हापूर, पृ. ७२

३०) हुजूर ऑफिस, ठराव बुक ३९, ठराव क्र.२३८, दि. २४/७/१९०३. कोल्हापूर.

३१) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५८, ठराव क्र. ५७२, दि. ४/१२/१९०५, कोल्हापूर

३२) हुजूर ऑफिस, ठराव बुक ३५, ठराव क्र. ८५८, दि. २७/३/१९००.

३३) हुजूर ऑफिस, ठराव बुक ३५, ठराव क्र. ९७०, दि. २/५/१९००, कोल्हापूर, पृ. ३०४

३४) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५८, ठराव क्र. ६९२, दि. ९/१/१९०६, कोल्हापूर, पृ. ९९

३५) हुजूर ऑफिस, ठराव बुक ४६, ठराव क्र. ५७६, दि. १७/३/१९०३, कोल्हापूर.

३६) हुजूर ऑफिस, ठराव बुक ४८, ठराव क्र.७८, दि. २७/६/१९०३, कोल्हापूर, पृ. १९९

३७) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.१२१

३८) हुजूर ऑफिस, ठराव बुक ८१, ठराव क्र. २९१ दि. १६/९/१९१०, कोल्हापूर, पृ. १२६

३९) हुजूर ऑफिस, ठराव बुक ९४, ठराव क्र.१२९४, दि. १४/५/१९१२, कोल्हापूर, पृ. ५६४

४०) हुजूर ऑफिस, मुलकी ठराव क्र. १०८१, दिनांक २९/५/१९०० कोल्हापूर.

४१) हुजूर ऑफिस, इमारत ठराव क्र. १७६, दिनांक ३०/८/१९१६ कोल्हापूर .

४२) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि. श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन प्रकाशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ४२

४३) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहूराजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १८८४, पृ.१२२

४४) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग १, दि. २५ / ०१/१९१९, कोल्हापूर, पृ. ३२.

४५) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. १५४

४६) कित्ता १५६

४७) कित्ता १५६

४८) हुजूर ऑफिस, किरकोळ ठराव १४४, दिनांक २५/७/१८९९, कोल्हापूर

४९) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. १५७

५०) हुजूर ऑफिस, पब्लिक वर्क्स खाते, ठराव क्रमांक २८८, दिनांक ३०.८.१९०७, कोल्हापूर.

५१) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ४३

५२) हुजूर ऑफिस, ठराव बुक–५८, दि. ९/१/१९०६, कोल्हापूर, पृ. ९९

५३) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १८०

५४) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव, (संपा.), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ.४१

५५) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ.१२९

५६) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग १, दि.२०/१/१९००, कोल्हापूर, पृ. १७

५७) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे, १९८४, पृ.१२१

५८) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग १, कोल्हापूर, दि.१७/३/१९००, पृ.६७

५९) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे, गॅझेट, भाग–१, कोल्हापूर, दि. ५/१२/१९१४, पृ. क्र. ३६०

६०) हुजूर ऑफिस, खाजगी खाते, ठराव क्रमांक १८०, कोल्हापूर, दि. १६/११/१८९४,

६१) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १८

६२) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ३४

६३) कित्ता ४४

६४) कित्ता ४५

६५) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट भाग–१ कोल्हापूर, दि. ४/१०/१९०२, पृ.२१०

६६) हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव क्रमांक ११३९, कोल्हापूर, दिनांक १२/४/१९०९,

६७) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ५८, ठराव क्र. ४ दि. १२/६/१९०६ कोल्हापूर, पृ. २९०

६८) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५८, ठराव क्र. ९९७ दि. १६ / ०४/ १९०६ पृ. २०८

६९) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. २००–२०३

७०) हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव क्र. २४९, दि. १८/८/१९१४, कोल्हापूर.

प्रकरण चौथे

शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन

प्रस्तावना

शाहू महाराजांचे काळात असलेली पाण्याची व्यवस्था

शाहू महाराजांचे जलनियोजन

१) स्वतंत्र पाटबंधारे खाते

२) इरीगेशन ऑफिसर

३) इरिगेशन कामांची माहिती

पाणी स्वच्छतेबाबत केलेल्या उपाययोजना

सार्वजनिक पाणी उपलब्धतेसाठी केलेले नियोजन

१) पाण्यासाठी हौद व्यवस्था

२) जनावरांसाठी हौदाचे बांधकाम

३) शहरात येणाऱ्या लोकांच्या पाण्याची सोय

४) सरकारी बागेस बारडीने पाणीपुरवठा

५) तलावाचे पाणी गावापर्यंत नेण्याची योजना

६) पोलिस पाटील यांनी विनापरवाना पाणी वापरल्याबद्दल दंड

७) ज्योतिबा डोंगराच्या पायथ्याशी धक्का बांधण्यास भरीव आर्थिक तरतूद

८) पाण्यासाठी केलेली सोय

मोफत पाणी पुरवठा

१) कब्रस्थानासाठी मोफत पाणी

२) मुसलमान लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय

३) विठोबा देवळात येणाऱ्या लोकांना मोफत पाणी

बहुजन वर्गासाठी पाण्याची सोय

१) सार्वजनिक ठिकाणी पाण्यासाठी विटाळ न मानता समान संधी

२) दलितांना पाण्याच्या हक्काचा न्याय निवाडा

३) दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र विहिरी बांधण्याची व्यवस्था

विहिरींबाबतची व्यवस्था

१) सार्वजनिक उपयोगाकरिता विहीर खुली करणे

२) नवीन विहिरींचे बांधकाम

३) विहिरींच्या दुरुस्तीसाठी आर्थिक मदत

तलावाबाबत केलेल्या उपाययोजना

१) कळंबे तलावाच्या निगराणीसाठीचे खास अधिकार

२) तलाव दुरुस्ती व अन्य कामांसाठीची आर्थिक मदत

३) नवीन तलाव बांधण्यास आर्थिक मदत

४) श्री महालक्ष्मी तलावाची कल्पना काढल्याने इनाम

५) श्री महालक्ष्मी तलावाबाबत कामे (राधानगरी धरण)

६) श्री महालक्ष्मी तलावाच्या कामासाठी जाणाऱ्या घरांचा मोबदला

७) नवीन तलाव बांधकामासाठी लागणाऱ्या जागेचा मोबदला

धरणाच्या बांधकामाबाबत दिलेल्या सूचना

१) एक तोंडी तलाव व पक्के धरण बांधणी

पाणी कर आकारणी –

१) शेतीतील पिकांच्या प्रकारानुसार पाणीपट्टीचा दर

२) पाणी कर जमा करून घेण्याचा नियम

३) सरकारी पाणदरीतून पाणी नेल्यास कर आकारणी

४) पाणी कराचे पैसे परत देणेबाबत

५) पाण्याचा कर आगाऊ घेणेबाबत

६) कळंबे तलावाच्या पाणीदरात फेरफार न करणेबाबत

७) पाण्यावरील सहामाही पद्धतीची कर आकारणी

पर्यावरण रक्षणविषयक केलेले कार्य

१) रस्त्याच्या कडेची झाडे तोडल्याबद्दल दिलेली समज

२) जनावरांसाठी झाडांची खास योजना

३) जनावरांसाठी झाडे तोडू नये म्हणून ताकीद

४) रस्त्यावरील छायेसाठी झाडे न तोडण्याबाबत

५) झाडे लावण्यासाठी आर्थिक तरतूद

६) रस्त्याच्या बाजूच्या झाडांचे रक्षण करणे

७) झाडांचे नुकसान होऊ नये म्हणून घेतलेली खबरदारी

८) झाडांना पाणी घालण्यासाठी आर्थिक मदत

९) झाडांना पाणी घालण्यासाठी जनावरांचा उपयोग

१०) जंगल संवर्धनासाठी केलेले उपाय

११) वणवा लागू नये यासाठी उपाय

राधानगरी धरण

१) राधानगरी धरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

२) राधानगरी धरणाच्या बांधकामाचा प्राथमिक टप्पा

३) राधानगरी धरणाचा दुसरा टप्पा

४) राधानगरी धरणाच्या बांधकामाचा शेवटचा टप्पा

प्रकरण चौथे

शेती विकासासाठी केलेले जलव्यवस्थापन

प्रस्तावना

एखाद्या संकटाचे संधीत कसे रूपांतर करावे, हे शाहू महाराजांच्या अनेक उपक्रमशील कार्यातून यथार्थपणे दिसून येते. दुष्काळाचे संकट हेच भविष्यातील जलकार्यासाठी संधी बनून महाराजांना दिशादर्शक ठरले. दुष्काळात तत्कालीन तातडीने करावयाच्या उपाययोजनांमुळे जनजीवन स्थिर होण्यास मदत झाली होती. राज्यातील अर्थजीवन कृषीआधारीत होते तेव्हा शेतकरी वर्गाला सुस्थिर बनवण्यासाठी केवळ बी–बियाणे, अवजारे यांची मदत करणे, त्यांच्या जनावरांची काळजी घेणे, या गोष्टी करून चालणारे नव्हते तर शेतीचा विकास होण्यासाठी काही सुधारणांबरोबरच शेतीला पाण्याची सक्षम जोड देणे तेवढेच आवश्यक होते. संस्थानाची पाण्याची तहान भागवण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध जलस्रोतांचा उपयोग करून जलजाळे निर्माण करणे हाच पर्याय असल्याचे महाराजांनी ओळखले होते. पावसाचे पाणी साठवण्यासह वाहते पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढवण्यासारखी जलनियोजनाचे अनेक उपक्रम त्यांनी हाती घेतले.

महाराजांनी संस्थानात दुष्काळ निर्मुलनासाठी ज्या दीर्घमुदतीच्या योजना आखल्या त्यात जलव्यवस्थापनविषयी घेतलेल्या निर्णयांचा फार मोठा वाटा आहे. त्यातूनच शेती विकास व इतर पूरक विकास झालेला पहावयास मिळतो. त्यांनी पाणी उपलब्धतेसाठी केलेले प्रयत्न , पाण्याची जपवणूक ते वाढण्यासाठी केलेले जलनियोजन, तंत्रज्ञानाची जोड, आर्थिक तरतूद, व पर्यावरण रक्षण उपाय याचा अभ्यास या प्रकरणातून केला आहे.

शाहू महाराजांच्या काळात असलेली पाण्याची व्यवस्था

कोल्हापूर संस्थानातही इतर भागांमध्ये असते तसे गावांना नद्या व तलावातून पाणी मिळत असे. कोल्हापूर शहरातील कात्यायनी देवीच्या मंदिराजवळ पाण्याचे कुंड नैसर्गिक झऱ्यामुळे नेहमी भरलेले असायचे. ते कुंडातील पाणी कळंबा तलावात आणून सोडले जायचे. तेथे

मातीचा बांध घालून पाणी अडवून ते पाणी 'पाण्याचा खजिना' या ठिकाणी साठवले जाई. नंतर या साठ्यातून शहराला व जवळपासच्या विहिरींना पाणी पुरवठा केला जायचा. हे पाणी पिण्यासह शेती व इतर कामांसाठी उपयोगी पडत असे. शिवाय कळंबा तलावाचे पाणलोट क्षेत्र विशाल असल्याने त्यात पावसाच्या पाण्याचाही तितकाच भरणा होत होता. त्यामुळे या पाण्याचा वापर शेतीच्या सिंचनासाठी होत होता.

संस्थानातील जलस्रोतांमध्ये पंचगंगा, वारणा, हिरण्यकेशी व वेदगंगा या मुख्य नद्यांचा समावेश होता. भोगावती, कुंभी कासारी, तुळशी, धामणी या पाच उपनद्या शहराच्या आसपासच्या भागातून वाहत असल्याने त्यातून त्याभागाला पाणी मिळत असे. रंकाळे, पद्माळे, सिदाळे, पेटाळे, रावणेश्वर, सुरुडतलाव, महारतळे, साकोली तलाव, फिरंगाई इत्यादी तलाव आणि कोटीतीर्थ, कपिलतिर्थ सारखे छोटी तीर्थे ही पाणीपुरवठ्याची साधने होती.[१]

या शिवाय गावागांवात अनेक ठिकाणी असलेल्या विहिरी पाण्याचा महत्त्वाचा स्त्रोत होता. शेतीसाठी या पाण्याचा वापर होत असे. बहुतेक वेळा या त्या गावातील नद्यांवर मातीचे बांध घालून तयार झालेल्या जलसाठ्याचा वापर शेतीसाठी केला जाई; परंतु हे सर्व पावसावर अवलंबून असायचे. साहजिकच उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवायची.

शाहू महाराजांचे जलनियोजन

तत्कालीन परिस्थितीत पाणीटंचाईवर ठोस उपाययोजना उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे माणसाचेच नाही, तर जनावरांचेही हाल खूप व्हायचे. या सर्वांचा विचार करून महाराजांनी त्या दुष्काळी काळात नद्या–तलाव–विहिरी यांच्यातील गाळ काढणे, त्यांची दुरुस्ती करणे वा नवीन बांधकाम करणे, छोटे–मोठे धरण बांधकामास गती देणे इत्यादी तातडीच्या उपाययोजना केल्या. त्यातून काही प्रमाणात पाणी संकटावर मात करण्याचे प्रयत्न सुरू राहिले. मात्र, कायमस्वरूपी असे भरीव काम करणे तेवढेच आवश्यक होते व त्यासाठी नियोजन आखणे महत्त्वाचे होते.

परदेशातील प्रगतशील देशांचा प्रत्यक्ष दौरा करताना त्यांनी साध्य केलेल्या प्रगतीमागच्या कारक घटकांचा आणि बदलांचा अभ्यास 'राजर्षी'नी केला होता. अनियमीत पाऊस पाण्यावर

आधारलेल्या पारंपरिक शेतीत बदल करून अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रथम राज्यातच पाणीसाठा स्वयंपूर्ण करणे अधिक आवश्यक होते.

१) स्वतंत्र पाटबंधारे खाते

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत पाटबंधाऱ्याची कामे होत असत. तथापि, छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ काळात पाण्याच्या नियोजनासाठी ज्याप्रकारे पाटबंधाऱ्यासंबंधीत कामे सुरू केली. त्यातून त्यांना अशा कामांचा मोठा आवाका व त्याचे महत्त्व लक्षात आले होते. यातूनच त्यांनी एक अभूतपूर्व व दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला. सन १९०२ साली त्यांनी सार्वजनिक बांधकामामधून पाटबंधारे (इरीगेशन) विभाग वेगळा काढून त्याची स्वतंत्रपणे कार्यप्रणाली चालू केली. अनेक इतिहासकारांमधे हा क्रांतीकारी व संस्थानांच्या इतिहासातील प्रथम प्रयोग असण्याबाबत एकमत आहे. या निर्णयामुळे पुढे शेतीला सिंचनासाठी अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकले. स्वतंत्र पाटबंधारे विभाग निर्माण केल्याचा जाहीरनामा करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये दिनांक ८ फेब्रुवारी १९०२ ला प्रसिद्ध करण्यात आला. [२]

जाहिरनामा

तारिख ३, फेब्रुवारी १९०२

करवीर इलाक्यात दुष्काळाचा प्रतिबंध करण्यासाठी इरिगेशनचे काम चालू करण्याबद्दल मि. शंकर सिताराम गुप्ते यास इरिगेशन ऑफिसर नेमण्यात आल्याबद्दल वगैरे हुजुरून नंबर १०४ तारिख २३ जानेवारी सन १९०२चे आज्ञेत आले ते खाली लिहिलेप्रमाणे:–

दुष्काळाचा प्रतिबंध करण्यास पाटबंधाऱ्याच्या कामाचा, (इरिगेशनचा) फार उपयोग होतो, असे नजरेस आल्यावरून मोठमोठ्या तळ्यांची कामे सुरू करण्यात आली आहेत. हया तळ्यांच्या व संस्थानातील इतर तळ्यांचा व विहिरींच्या इरिगेशनचे कामी जास्त उपयोग व्हावा, या हेतूने त्या कामी प. वर्क्स खात्यांत इरिगेशन डिव्हिजन निराळी करण्यात येऊन त्यांजवर मि. शंकर सिताराम गुप्ते यांस इरिगेशन ऑफिसर नेमण्यात आले आहे, त्यांनी प्रथमत: खाली लिहिलेले माहितीचा रिपोर्ट सत्वर करणेचा:–

संस्थानात इरिगेशन होण्याचे तलाव कोठे आहेत, त्यांस पाण्याचा पुरवठा कोठून होतो, वर्षभर प्रत्येक तिमाही किती पाणी येते, किती पाण्याचा उपयोग करिता येईल, ताल बांधून पाणी आल्यास गाळ कोणत्या जातीचा येईल, त्यापासून शेतीस फायदा अगर गैर फायदा होईल वगैरे गोष्टींबद्दल माहिती खुलासेवार घेणेची.

असलेल्या तलावाचे पाण्याचा इरिगेशनचे कामी उपयोग होईल की नाही, होत असल्यास अदमासे किती एकर जमीन भिजेल व त्यास खर्च काय येईल, ज्या तलावाचे इरिगेशनपासून सरकारास थोडे उत्पन्न येऊन रयतेचा फायदा लवकर मिळणेजोगा असेल, अशा तलावांबद्दल इरिगेशन प्रोजेक्ट लवकर तयार करून पूर्ण हकिकतीचा वेगळा रिपोर्ट करावा.

संस्थानात असलेले तलाव सरकारी व खाजगी विहिरीवर किती एकर जमीन भिजते, याचा प्रत्येक तालुक्याचा गांववार निराळा तक्ता तयार करणेचा. या तक्त्यात विहिरीचे पाणी किती मोटांस किती दिवस पुरते व त्यावर कोणते जातीची किती एकर पिके दरसाल होतात व विहीर सुधारण्याजोगी आहे की कसे, ही माहिती असावी. तलावाचीही याप्रमाणेच माहिती देऊन निराळा तक्ता करणेचा. तक्त्याचा नमुना आपल्याकडून जावा व त्याची एक प्रत हुजूर पाठवावी.

या डिव्हिजनकडे एक ड्राप्समन पगार २०, एक मेस्त्री पगार १५ व एक कारकून पगार बारा रुपये याप्रमाणे व सर्वेस लागणारे सामानाकरिता तूर्त (६००) रुपयेची ग्रॉंट मंजूर केली आहे. सदरहूसंबंधी मि. गुप्ते व रावसाहेब विचारे यांचा अभिप्राय मागऊन तो आपले अभिप्रायसह हुजूर पाठवावा.

सदर इरिगेशन ऑफिसर यांस प्रत्येक तालुक्यांतील रेव्हिन्यू ऑफिसर यांजकडून लागेल ती माहिती व जरूर लागल्यास योग्य ती मदत ताबडतोब देण्यात यावी. म्हणून वगैरे आज्ञेत आले आहे.

R. V. SABANIS

दिवाण, सरकार करवीर

जाहिरनाम्यातील तपशील बघता संस्थानात असलेल्या पाण्याची उपलब्धता व उपयुक्तता, याची कल्पना यावी व या खात्यामार्फत भविष्यात करावयाच्या कामाचा आराखडा तयार करता यावा यासाठी महाराजांनी किती खोलवर जाऊन प्रत्येक बाबींचा अहवाल मागवला होता हे समजून येते.

२) इरीगेशन ऑफिसर

स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करण्यामागचा उद्देश त्यांनी विचारपूर्वक घेतला होता. कोल्हापूर संस्थानातील दुष्काळाला प्रतिबंध करण्यासाठी या पाटबंधारे कामाचा चांगलाच उपयोग झाल्याचे दिसले होते. व त्यातून मोठी तळी– विहिरी यांची कामे सुरू झालेली होती. या सर्व कामांचा इरिगेशनसाठी पुढे चांगला फायदा व्हावा व त्या कामांवर स्वतंत्रपणे देखरेख व्हावी आणि त्या विभागाला स्वतंत्रपणे काम करण्याची मुभा मिळेल हाच हेतू यामागे होता. अत्याधुनिक पद्धतीच्या स्वतंत्र खात्याची गरज त्यावेळी महाराजांनी जाणली होती. या स्वतंत्रपणे काम करणाऱ्या खात्यावर तेवढेच सक्षम नेतृत्व असणेही आवश्यक होते. यामुळे त्यांनी आपल्या जाहिरनाम्यातच पहिले इरिगेशन ऑफिसर म्हणून मि. शंकर सिताराम गुप्ते या सिंचनाच्या ज्ञानात पारंगत असलेल्या अधिकाऱ्याची नेमणूक केल्याचे जाहिर केले. अशी नेमणूक ही इरिगेशन खात्यात पहिलीच नेमणूक तर होतीच, पण संस्थानात केलेला हा पहिलाच प्रयोग होता.

महाराजांना गुण हेरून माणसे जवळ करण्याची कला अवगत होती. त्यामुळे त्यांनी या खत्यावर गुप्ते यांची नेमणूक केल्याने त्यांच्या कौशल्याचा व अनुभवाचा फायदा हा त्या विभागास झाला. त्यांनी खात्याची जबाबादारी ही उत्तमपणे पार पाडून या खात्याला महत्त्व आणले ते पाहून महाराजांनी केलेली त्यांची नियुक्ती सार्थ ठरली. केवळ नियुक्ती करून न थांबता त्यांना त्यावेळेचे रितीनुसार चांगले वेतन ही दिले हेाते. कामासंबंधीत काही अधिकार व जबाबदारी ही दिली, शिवाय या कामासाठी कुशल मनुष्यबळाचीही गरज असल्याने असे मनुष्यबळ ही उपलब्ध करून दिले होते.

३) इरिगेशन कामाची माहिती

स्वतंत्र पाटबंधारे खात्यामार्फत संस्थानाच्या तलाव, विहिरीमधील पाण्याचा इरिगेशनसाठी कशा रीतीने फायदा होईल, संस्थानातील तलावांपासून किती जमीन भिजते, किती लोकांना यातून उत्पन्न होते, वर्षभर पाण्याचा साठा कसा असतो याचा विस्तृत तपशीलवार अभ्यास करून अहवाल तयार करणे, त्यानुसार इरिगेशनने आराखडा तयार करून कामाची दिशा ठरविणे या बाबींचा तपशील महाराजांनी मागवला होता. अशी माहिती प्रत्येक भागातून देणे अपेक्षीत होते. अशाच प्रकारे खालील एक नमुना तक्ता करवीर इलाक्यातील इरिगेशनबद्दलची माहिती मिळवण्यासाठी पाठविण्यात आला होता. यातील मुद्यांवरून त्या त्या भागातील जलकामांची माहिती कशी संकलित केली गेली, हे समजण्यास मदत होते.

पेटा –करवीर इलाक्यातील इरिगेशनबद्दलची माहिती		
	एकर	शेरा
१. सन १८९९– १९०० चे दुष्काळसाली बागईताकरिता भिजविलेली जमीन		
सरकारी कालव्याने –		
सरकारी तळ्यांचे पाण्याने –		
खाजगी तळ्यांचे पाण्याने –		
विहिरीचे पाण्याने –		
इतर साधनांनी		
एकूण		
२. सदरप्रमाणे तपशीलवार सन १९०० –१९०१ सालाबद्दल		
एकूण		

३. सदर कामाकडे किती विहिरींचा उपयोग करण्यात आला पक्या – कच्च्या–		
एकूण		
४. खाजगी व सरकारी तलावांची संख्या (सदर प्रमाणे उपयोगात आणल्यापूर्ती)		
एकूण		
५. गेल्या ३० वर्षात इरिगेशनचे उपयोगाकरिता केलेल्या सरकारी कामगाऱ्या		
एकूण		
६. सदरहू कामाकडे किती खर्च झाला – मागाहून काही सुधारणा झाल्या असल्यास त्यासुद्धा (रिपेरिचा खर्च खेरीज करून)		
एकूण		
७. गेल्या १० वर्षात सदरहू कारणाकरिता रयतेस किती तगाई देण्यात आली		
एकूण		

सदरी नमूद झाल्याप्रमाणे माहिती भरून ती होता होईल तो लवकर पाठवावी.

तारीख ३० माहे जुलाई, सन १९०२.

बी. व्ही. जाधव

ॲ. सरसुभे

वरील नमुना तक्ता पाहिल्यास दुष्काळ काळातील तलाव, विहीर, या माध्यमातून सिंचनाखाली आलेली जमीन, त्यावरील खर्च, त्यासाठी सरकारी खात्याकडून झालेली कामगिरी, लोकांना दिलेली तगाई यांचा एकाच दृष्टीक्षेपात अंदाज घेण्यासाठी अशा प्रकारे माहिती घेण्याचा प्रयत्नही झालेला दिसतो.[३]

पाणी स्वच्छतेबाबत केलेल्या उपाययोजना

दुष्काळातील काळात पाऊस कमी पडल्याने जमिनीची आर्द्रता कमी झालेली असते. त्यात नैसर्गिक पाणी कमी असणे आणि उपलब्ध विहीर, नद्या, तलाव, इत्यादींमधील पाणीसाठा ही उन्हाळ्यात लवकरच आटू लागतो. या काळात खरी गरज असते ती आहे ते पाणी नियोजन करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याची. केवळ पाणीसाठा करून उपयोग नाही तर असे पाणी स्वच्छ राहणे तितकेच आवश्यक असते, म्हणून महाराजांनी पाण्याच्या स्वच्छतेचे नियोजन करताना काही आदेश जारी केले ,काही तरतूदी केल्या व काही ठिकाणी नियम घालून दिले.

- **सांडपाण्याची व्यवस्था :** शाहू महाराजांनी केवळ पाण्याचे जलजाळे निर्मितीचे काम केले नाही, तर मुख्यत्वे ते पाणी घाण होणार नाही यासाठी प्रयत्न केलेले आहेत. कोल्हापूर शहराच्या संबंधाने पाण्याच्या स्वच्छतेबाबत किंवा सांडपाण्याबाबत सन १८३० साली शहाजी छत्रपती यांच्या काळात त्यांनी आपल्या प्रजेला उद्देशून जारी केलेल्या आज्ञापत्रानुसार लोकांनी रोज दिवसातून एक-दोन वेळा तरी आपल्या घरासमोरील रस्ता झाडून स्वच्छ करावा व आपल्या घराच्या मोरीचे पाणी रस्त्यावरील मोठ्या गटारातूनच जाईल याची काळजी घ्यावी. तसेच सांडपाणी रस्त्यावर सोडू नये. अशा प्रकारे आवाहन केलेले होते. त्याकाळी कोल्हापूर हे तलावांचे शहर जरी असले तरी एकूणच अस्वच्छता बघता लोकांना सामूहिक जबाबदारीचे भान यावे यासाठी असा आदेश काढावा लागला होता.

  त्यानंतरही पोलिटिकल मेजर ग्रॅहॅम यांनी १८४४ च्या आपल्या अहवालात कोल्हापूरमध्ये स्वच्छतेचे व आरोग्याचे कोणतेही नियम नसल्याने येथे प्लेगचा उपद्रव होतो, असे नमूद

केले होते तर कर्नल फेरीस यांनी १८७१ साली स्वच्छतेची कोणतीच व्यवस्था नसून, सर्वत्र दुर्गंधी पसरल्याचे स्पष्टपणे नमूद केले होते. यावरूनच कोल्हापूर शहराची पाण्याच्या स्वच्छतेबाबतची परिस्थिती काय असेल याची कल्पना येते. तथापि, शाहू महाराज यांनी मात्र त्यांच्या राजवटीत पाण्याच्या नियोजनामध्ये पाणी स्वच्छतेला वा सांडपाण्याने पाणी खराब होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न केलेले होते.

कोल्हापूर शहराच्या मध्यभागातच कपिलतीर्थ नावाचे कुंड होते. ते पवित्र असल्याचे मानून अनेक धार्मिक कामांच्यावेळी तेथे लोक स्नान करत असत. कपिलतीर्थच्या आजूबाजूला असलेल्या वस्तीमधून सोडलेली घाण, सांडपाणी तेथेच येऊन त्या कुंडातील पाण्यात झिरपत असे, परिणामी संपूर्ण कुंडातील पाणी खराब होऊन लोकांच्या अनारोग्यास व साथीच्या रोगास आमंत्रण देणारे ठरत होते. महत्त्वाची बाब म्हणजे याच कुंडातील पाणी लोक पिण्यासाठी सुद्धा वापरत असत. दुष्काळ आणि साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव बघता शाहू महाराजांनी याचा गंभीर विचार करून लोकांच्याच भल्यासाठी असे सांडपाणी मिसळून खराब होत असलेले ते कुंड नगरपालिकेला सक्त आदेश देऊन त्वरीत बुजवून टाकले होते. संस्थानातील सांडपाण्याला प्रतिबंध करून उपलब्ध पाण्याच्या शुद्धतेकडेही महाराजांनी तेवढेच गांर्भियाने पाहिले होते.[४]

सांडपाण्याची सोय होण्यासाठी शहरातील जेलच्या पूर्वबाजूस खंदक खणून तेथून घाण पाणी जाण्यासाठी गटार तयार करण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी ठराव क्र. १७३ दि. २३ /०७/१९१४ नुसार १,६४० इतक्या रकमेची मंजुरी देण्यात आली.

- कोल्हापूरमधील महार तलावाचा उपयोग लोकांकडून केला जात असे. जेव्हा या महार तलावात बाजूच्या गटारीतून पाणी जाऊन ते पाणी खराब होत आहे, हे लक्षात आल्यावर ते गटार तात्काळ बांधून घेण्याचे महाराजांचे आदेश होते. प्रत्यक्षात ते गटार सरलष्कर यांच्या हद्दीतून जात असल्याने त्याना त्या जागेचा मोबदला देऊन ती गटारीची जागा सरकार ताब्यात घेऊन सरकारमार्फत त्याचे काम करावे, अशी सूचना महाराजांनी देऊन तलावातील पाणी स्वच्छ राहण्याची काळजी घेतली होती.[५]

- पंचगंगा ही नदी कोल्हापूर शहरासाठी महत्त्वाची नदी असल्याने तिचे पाणी खराब होऊ नये म्हणून योग्य ती खबरदारी घेतली जावी असा महाराजांचा आदेश होता. या नदीतून शहराला पाणीपुरवठा होत असल्याने व शहर हे नदीकाठावरच वसलेले असल्याने गावकरी या नदीचा वापर अनेक कारणांसाठी करायचे. बऱ्याचवेळा आजूबाजूची लोक तेथे कपडे धुणे, गाडया धुणे व जनावरांना अंघोळ घालण्यासाठी पाण्यात नेणे इ. करत असल्याने नदीचे पाणी घाण होत होते हे जाणून त्यावर उपाय म्हणून लोकांना इंजिन लावून बाहेर पाणी काढून देण्याच्या सूचना सरकारातून दिल्या गेल्या होत्या.[६] तसेच दि. ४ जुलै १९०१ ला पंचगंगेतील तुंबलेले घाण पाणी जाण्यासाठी रु. २५ खर्च करून स्वतंत्र चर काढला होता.
- कोल्हापूर शहारातील महत्त्वाचा तलाव असलेल्या कळंबे तलावातील पाणी हे पिण्यासाठी, शेतीसाठी वा अन्य उद्योगांसाठी वापरले जायचे, परंतु या तलावात लोक स्नान करतात, कपडे धुतात, जनावरे पाण्यात जाऊ देतात, या कारणामुळे त्यातील पाणी खराब होत आहे, हे लक्षात घेऊन न्यायखात्याकडून जाहिरनामा काढून तलावाच्या पात्रापासून ४०० वारापर्यंत कोणी जाऊ नये, गेल्यास पोलिस कारवाई होईल, असे निर्देश दिले आणि लोकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला.[७] या तलावाचे पाणी खराब होऊ यासाठी काही दिवस पोलिस बंदोबस्त पुरवावा आणि त्याचा खर्च इंजिनिअर खात्याकडून करावा, असे निर्देश दि. ५ फेब्रुवारी १९०२ च्या ठरावात नमूद करण्यात आले.
- प्लेगचे वेळी संसर्ग होऊ नये, यासाठी गावागावांतून लोकांना बाहेर पडून गावाबाहेरच्या मोकळ्या जागेत वा मळ्यात राहायची सोय केली होती. कोल्हापूर शहारातील काही लोकांनी शहरातील कळंबे तलावामध्ये पाणी जेथून येते. त्याच्या पाळीमध्ये प्लेगच्या काळात काही झोपड्या बांधल्या होत्या, त्यामुळे पाणी खराब होत असल्याचे निदर्शनास आले तसेच तेथेही प्लेगच्या प्रादुर्भावामुळे पाणी दूषित होण्याचा संभव होता. म्हणून तेथील झोपड्या त्वरीत काढून टाकण्यात आल्या व पुढे तेथे झोपड्या बांधून राहता येणार नाही, ही सूचनाही दिली. शिवाय नियमाविरुद्ध वागल्यास कायद्याने शिक्षा केली जाईल, असे जाहीरच केले होते.[८]

- त्यानंतर कळंबे तलावाचे पाणी घाण होण्याबाबतच्या तक्रारी येत होत्या. सखोल चौकशी केल्यानंतर समजले की, प्लेगमुळे अनेक लोक अजूनही गावाबाहेर राहतात व तलावातच ते भांडी, कपडे धुतात; त्यामुळे पाणी दूषित होत आहे. हा तलाव पिण्यासाठी अतिशय महत्त्वाचा असल्याने पाणी स्वच्छ ठेवणे क्रमप्राप्त होते. म्हणून या पाण्याचा वापर लोकांनी पिण्यासाठी करावा, त्यात कपडे, भांडी धुऊ नयेत, असा दंडकच महाराजांनी काढला.[९]
- करवीर पेट्यातील मौजे इस्पूर्ली येथील धर्मशाळेसमोर असलेली विहीर सार्वजनिक होती. त्यातील पाण्याचा वापर पिण्यासाठी लोक करत असत. परंतु तेथेही काही लोक विहिरीत कपडे धुतात व पाणी खराब होते. यासाठी त्या विहिरीच्या वापरावर कायदा लागू करून कोणत्याही मार्गाने विहिरीचे पाणी खराब होणार नाही याची सक्त समज दिली होती.[१०]
- वाडी रत्नागिरी येथील ज्योतिबा देवस्थानामुळे तेथे यात्रा नेहमीच भरत असे. अशा यात्रांमध्ये स्वच्छता राखणे गरजेचे होते. त्यामुळे येथील तलावातील स्वच्छता राखण्यासाठी दरसाल रु.१४६ एवढया पगारावर स्वतंत्र माणसाची नेमणूक करावी आणि त्या कामासाठी देवाच्या कर उत्पन्नातून दरसाल रक्कम देण्यात यावी अशी सूचना महाराजांनी दिली.[११]
- अतिग्रे तलाव हा महाराजांच्या काळात आळते गावाजवळ बांधण्यात आलेला होता. त्या ठिकाणी तलावाच्या आसपास काही लोकांनी विहिरी काढून शेतासाठी पाण्याची व्यवस्था केली होती; परंतु त्याचवेळी ते पाणी शेतासाठी वापरण्यात येणाऱ्या खतांमुळे खराब होत होते. हे लक्षात आल्यावर महाराजांनी सदर तलावाच्या २०० यार्डपर्यंत खणलेल्या विहिरीतून ज्या शेतीला पाणीपुरवठा होतो, त्यांना पाणीपट्टी द्यावीच लागेल, असा आदेश दिला. याचबरोबर राज्यात इतर तलावांना लागू असलेले नियम या ही तलावाला लागू होतील, असे निश्चित केले. विशेष करून या तलावापासून २०० यार्डपर्यंतच्या जमिनीवर कोणतेही सोनखत वा दुसरे खत घालून तेथे घाण करू नये, असा आदेश दिला. तलावांच्या स्वच्छतेबाबत ते नेहमीच आग्रही होते. [१२]
- संस्थानातील तलाव नद्या इत्यादींमधील पाणी हे बऱ्याचदा पिण्यासाठी वापरले जायचे शिवाय शेतीसाठी व इतर आवश्यक गोष्टींसाठी यामधूनच पाणी पुरवले जायचे. दुष्काळाच्या

व प्लेगच्या त्या काळात अगोदरच पाणी टंचाई असल्याने आहे ते पाणी खरेतर स्वच्छ ठेवणे हे प्राधान्याने महत्त्वाचे होते. तरीही काही ठिकाणी पाणी घाण होण्याच्या घटना घडत असत. असेच वाडी नृसिंह या तीर्थक्षेत्रावर बाजूने वाहणाऱ्या कृष्णा नदीमुळे तेथेच बरेचजण धार्मिक विधी करत असत. ब्राम्हण वर्गात कोणी संन्यासी मेला, तर त्याचे दहन न करता त्याला नदीत जलसमाधी देण्याचा त्यावेळचा प्रघात होता; परंतु ते प्रेत नदीत वाहून न गेल्याने बुडून किंवा कुजून सार्वजनिक घाण होत होती. यावर महाराजांनी आपल्या हद्दीत नदीला जेव्हा पाणी कमी असेल, तेव्हा असा प्रकार न करण्याबाबत ब्राम्हण वर्गाला आवाहन करून व पूर्णपणे बंदी घालून नियमांचे पालन करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या.[१३]

- पंचगंगा या मोठ्या नदीचे पाणी सुस्थितीत रहावे व लोकांची सोय व्हावी, म्हणून एकूण ९ घाटांपैकी रजपूत किंवा वैष्णव घाट, ब्राह्मण घाट, विटाळशीचा घाट आणि मराठ्यांचा घाट या ४ घाटांवरील पाण्याचा उपयोग केवळ पेयजल म्हणून करावा आणि उर्वरित घाटांचा उपयोग लोकांना स्नान वा इतर सार्वजनिक कामे करण्यासाठी करावा अशी आज्ञाच महाराजांनी दिलेली होती आणि नदीवरील पाण्याच्या वापराचे नियम घालून केले होते.[१४]

सार्वजनिक पाणी उपलब्धतेसाठी केलेले नियोजन

१) पाण्यासाठी हौद व्यवस्था

सार्वजनिक कामासाठी पाणी वापरायचे असेल, तर अशावेळी छोटे हौद फारच उपयोगी पडत असत. त्यावेळी कोल्हापूरात असे हौद खाजगी किंवा सार्वजनिक बांधले जात असत. कोल्हापुरातील उत्तर रस्त्याच्या बाजूस असलेल्या श्री. शिरगांवकर यांच्या कंपाऊंडमध्ये शाहू महाराजांच्या आदेशाने सरकारकडून लोकांना सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून हौद बांधला व त्याला पाऊण इंच व्यासाची नळी लावून लोकांना पाणी देण्याची सोय केली.[१५]

याचसारखे दुसरे उदाहरण म्हणजे शाहूपुरी येथील बळवंत सखाराम मुळे यांस शाहुपुरीत हौद बांधून नळीने पाणी घेण्यासाठी रु. १५२ रक्कम मंजूर केली; परंतु हे काम पाण्याची सोय

सार्वजनिक व्हावी म्हणून सरकारतर्फे करण्यात येऊन त्यावर श्री. मुळे यांना हौदावर अधिकार न ठेवण्याची आज्ञा दिली होती.[१६]

पन्हाळा नगरात खास पायदळातील (Infranty) लोकांसाठी खास पाण्यासाठी हौद बांधण्यास रु.११३ ठराव बुक १०८ दि. २०/०५/१९१४ नुसार मंजूर केल्याची नोंद मिळते.

२) जनावरांसाठी हौदाचे बांधकाम

महाराजांनी जशी जनावरांच्या चाऱ्याची काळजी घेतली होती तसेच त्यांच्यासाठी पिण्याचे पाणी मिळावे म्हणून हौद बांधून खास पाणवठे तयार केले होते. कोल्हापुर शहरातील शनिवार वेशीबाहेर जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, यासाठी शमसुद्दीन यांच्या दुकानाजवळ २७ रुपये खर्च करून हौद बांधला आणि त्या हौदात नळाद्वारे पाणी सोडण्याची व्यवस्था केल्याचा उल्लेख दि. २१ फेब्रुवारी १९०२ च्या ठरावात येतो. त्याचबरोबर ब्याकूड ओढ्याजवळ केवळ घोड्यांना पाणी पिण्यासाठी एक हौद बांधला होता, त्याला ७८ रुपयांची विशेष मंजुरी देऊन विशेष पाण्याची सोय केली होती.[१७]

राजपूतवाडी येथील कुरण भागात ठराव क्र. ६१३ दि. २७/१२/१९०३ नुसार जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून हौद बांधण्यात रु १३४ खर्च केले होते. तर पन्हाळा पेठ्यातील जिऊर गावात येथे असलेल्या सरकारी जमिनीचा लिलाव केवळ तेथे पिण्याच्या पाण्याचा झरा असल्यामुळे रद्द केला होता, हे ठराव क्र. ४३८ दि. ६/०२/१९०३ या नोंदीवरून दिसून येते.

३) शहरात येणाऱ्या लोकांच्या पाण्याची सोय

कोल्हापूर शहर हे संस्थानातील बाजारपेठेचे व सरकारी कामांसाठी मुख्य ठिकाण होते. राज्यातल्या विविध भागांतून किंवा इतर बाहेरील ठिकाणांहूनसुद्धा बऱ्याच लोकांची या शहरात कामानिमित्ताने वा बाजारहाटच्या निमित्ताने ये-जा होत असे; परंतु बऱ्याचवेळा शहरात बाहेरून येणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवत असे व त्यांचे फार हाल होत असत. ही बाब लक्षात आल्यावर महाराजांनी शहरातील काही मुख्य ठिकाणी जसे - बाजाराचे ठिकाण नवीन मार्केटची जागा, करवीर पेठ्यातील मोक्याच्या जागा, विशेष करून रेल्वे स्टेशन येथे

पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. येथे पाण्यासाठी लागणाऱ्या भांड्याच्या खरेदीसाठी महाराजांनी आगावू १०० रुपये तत्काळ मंजूर केले व बाहेरील प्रवासी वा इलाक्यातील अन्य येणाऱ्या लोकांची व्यवस्थाही उत्तम होईल याकडे लक्ष दिले.[१८]

४) सरकारी बागेस बारडीने पाणीपुरवठा

कळंबे तलावाचे पाणी गतवर्षीपेक्षा (१९११) कमी असल्याने सरकारी बागास पाटाने पाणी देऊ नये, त्याऐवजी हौदातून बारडीने पाणी घातल्यास पाण्याचा तुटवडा पडणार नाही. तशी स्थितीच उद्‌भवल्यास त्याचा अंदाज घेऊन १५ दिवसांची आगावू नोटीस द्यावी आणि खासगी बागेकडील पाणी अजिबंद करावे, त्यावर महाराजांकडून अभिप्राय मंजूर झाला.[१९] अशा प्रकारे पाणी टंचाईच्या काळात पाण्याचे सूक्ष्म नियोजन करतानासुद्धा बागांसाठी केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यादरम्यान होणाऱ्या अनावश्यक पाणीवापराला पायबंद घालण्याची सूचना महाराजांनी केली होती, हे दिसून येते.

५) तलावाचे पाणी गावापर्यंत नेण्याची योजना

शाहू महाराजांनी जनतेला पाणी मिळावे यासाठी विविध प्रयत्न केलेले आढळतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे गायमुख तलावातील पाणी हे सोनतळी व कुशीरे या गावापर्यंत नेण्याचे ठरविले होते. त्यासाठी एकूण ९०० रूपयांचा खर्च होता, पण गावमदतीतून रू. ६०० मिळणार होते व उर्वरीत ३०० रु. ची मागणी सरकारात केली होती, पण पाण्यासाठी लोकांची सोय होत आहे, हे बघून महाराजांच्या आज्ञेने पूर्ण ९०० रूपयांची रक्कम सरकारातून दिली गेली.[२०] त्याचप्रमाणे रुकडी गावातसुद्धा ४ इंची नळीने पाणी आणण्याचे काम तातडीने करावे आणि तोपर्यंत वडगाव गावाजवळ पाण्याची जशी सोय केली, तशीच येथेही तात्पुरत्या स्वरूपात पाणी उपलब्ध करून द्यावेत, असा आदेश महाराजांनी दि. १८ एप्रिल १९०१ रोजी काढला.

६) पोलिस पाटील यांनी विनापरवाना पाणी वापरल्याबद्दल दंड

पाणीटंचाई ही दुष्काळातील मोठी समस्या होती. जे आहे ते जपून वापरणे महत्त्वाचे होते. परंतु गावस्तरावरील वरिष्ठ अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करण्याच्या घटना महाराजांच्या कानावर येत. पाणी वाटपाच्या काही नियमांना ते बगल देत असत. यामुळे एकूण जल

नियोजनावर परिणाम होऊन सामान्यांच्या हक्काचे पाणी अशा घटनांमुळे कमी मिळायचे. सरुड या गावी तेथील पोलिस पाटील याने चक्क तलावातील पाणी फोडून भाताच्या शेतीस दिल्याचे महाराजांना कळले, तेव्हा ते पोलिस पाटील असूनही या विनापरवाना पाणी वापराबद्दल त्यांस ५ रु. चा दंड व पुन्हा ही चूक न करण्याची ताकीद दिली आणि असा प्रकार इतर गावांत होऊ नये म्हणून जो कोणी न विचारता पाणी घेईल त्यास दुप्पट आकार लावला जाईल, असा दंडकही त्यांनी घातला. यावरून महाराज किती काटेकोर पाणी वापराबाबत दक्ष होते, हे कळतेच आणि नियम सर्वांसाठी एकच राहतील, असे कडक धोरण ही ठेवत असत.[२१]

७) ज्योतिबा डोंगराच्या पायथ्याजवळ धक्का बांधण्यास भरीव आर्थिक तरतूद

करवीर राज्यातील ज्योतिबा डोंगर प्राचिन काळापासून प्रसिद्ध आहे. ज्योतिबांचे देवस्थान हे एक धार्मिक स्थळ येथे असल्याने हा भाग लोकांच्या वर्दळीचाच असायचा. राज्यातील जनता यात्रेच्यावेळी किंवा देवधर्माच्या कार्यासाठी येथे येत असत. या डोंगरावर एक तलाव असून त्याच्या पायथ्याशी 'उंबरण्याचे पाण्याचा धक्का' म्हणून पाण्याची सोय केलेली होती. येथे पाणी टंचाई होऊ नये, यासाठी अनेक उपाययोजनाही सरकारकडून करण्यात आल्या. त्यासाठी वेळोवेळी मदतही पुरवण्यात आली. या ठिकाणी लोकांची गैरसोय होऊन नये म्हणून त्या उंबरण्याच्या धक्क्यासाठी खर्चही खूपदा केल्याचे आढळते. या धक्क्याच्या उभारणीसाठी महाराजांनी मि. गुप्ते यांची खास नेमणूक केली होती आणि या कामासाठी रु. ८००० एवढ्या मोठ्या रकमेची तरतूद केली होती.[२२]

या ज्योतिबा डोंगराच्या वर जो तलाव होता, तो तेथील पाण्याचा मुख्य स्त्रोत होता. त्यातूनच डोंगराच्या खाली उंबरण्याजवळ व अन्य आसपासच्या भागांना पाण्याचा पुरवठा होत असे, परंतु एकदा अचानकपणे तो तलाव फुटल्याने त्याला पुन:नवीन पद्धतीने बांधण्यासाठी महाराजांनी तातडीने त्या भागाचा सर्वे करण्याचे आदेश खात्याला दिले होते व त्यासाठी रु. २५ ची रक्कम तातडीने मंजूर केली गेली. पुढे सन १९०९ मध्ये याच उंबरण्याच्या ठिकाणाचे पाणी जाण्यासाठी रुपये ९५४ खर्चाची तरतूद करून तेथे वॉल्व्ह बसविण्याचे काम करून घेतले होते.[२३]

८) पाण्यासाठी केलेली सोय

शाहू महाराजांनी कोल्हापूरातील कानाकोपऱ्यांत पाणवठे निर्माण होण्यासाठी पाटबंधारे माध्यमातून कामाच्या योजना सुरू केलेल्या होत्या. भविष्यात लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागू नये व तेथेच स्थानिक जलव्यवस्था व्हावी यासाठी खर्चाची तरतूद नेहमीच केलेली होती. त्यांनी विविध माध्यमातून राज्यातील पाण्याचे साठे वाढविण्यावर भर दिला होता.

- कोल्हापूर येथील पंचगंगा नदीवर विणीविणीच्या घाटाची दुरुस्ती केली तर तेथील पाणी वापरण्यास सोईचे होईल, या दृष्टीने त्याच्या दुरुस्तीसाठी रु. १ हजार १२३.१८९ एवढी रक्कम खर्च करून घाट दुरुस्त करून घेतला होता.[२४]
- भोपळेवाडी येथील गावातील लोकांच्या पाण्यासाठी वारंवार होत असलेली गैरसोय बघून तेथे रूपये ५७ खर्चून तातडीने पाण्याची सोय करण्याचे आदेश महाराजांनी दिलेले होते.[२५] हातकंणगले गावातील ओढ्यावर धक्का बांधण्यासाठी ८१८ रुपये खर्चाची तरतूद केली होती. पण जास्तीचा खर्च वाढल्याने महाराजांनी पुन्हा २५० रुपयांची मंजुरी देऊन तिथे पाण्याची व्यवस्था केल्यांची नोंद दि. ५ जून १९०९ ठरावात दिसून येते.
- राधानगरी व चनवाड हे दोन महाल महाराजांच्या काळात नव्याने निर्माण झालेले होते. त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्याचे काम चालू होते. त्यात तेथील एकूण पीक पाणी आणि महत्त्वाचे म्हणजे पावसाच्या पिकाचे अहवाल महाराजांनी मागवले होते. त्या भागात पाऊस मोजण्यासाठी विशेष यंत्रांची स्थापना करण्यात आली होती.[२६]
- वडगाव येथील लोकांना पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी तेथील विहिरीत पंप लावून त्यातून नळीतून हौदापर्यंत पाणी नेण्याची व्यवस्था करण्यासाठी १५० रुपयांची तरतूद केल्याची नोंद ठराव बुक क्र.११९ मधील ठराव क्र. ६५२ (दि. ३०/०३/१९१६) मध्ये आढळते.

मोफत पाणी पुरवठा

संस्थानात पाण्यासंबंधाने महाराजांचे प्रयत्न विविध स्तरावर चालूच होते. दुष्काळ कायमचा जावा, या हेतूने पाणीसाठा वाढविण्यावर भर देणे चालू होते. विविध नियम घालून अनावश्यक

पाण्याच्या गैरवापराला आळा घालण्यात आला होता. तथापि, काही बाबतीत मात्र महाराजांनी प्रजेसाठी मोफत पाण्याचा पुरवठा ही केलेला आहे व प्रसंगी तसे ठराव मंजूर करून आर्थिक तरतूद सरकार तिजोरीतून केल्याचे तत्कालीन दस्तऐवजावरून दिसून येते.

१) कब्रस्थानासाठी मोफत पाणी

करवीर राज्यात मुसलमान लोकांचीही काही ठराविक वस्ती असल्याने त्यांच्या धार्मिक दफनभूमी असलेल्या कब्रस्थानाला १ इंची पाण्याची नळीद्वारे मोफत पाणी मिळावे, अशा मागणीचा अर्ज महाराजांकडे आला होता, त्यास मान्यता देताना पाऊण इंची नळीला अर्धा इंची व्यासाचा कॉक जोडून कब्रस्थानाला मोफत पाणी पुरवठा करण्याचे निर्देश महाराजांनी प्रशासनाला दिले होते. त्याशिवाय सदरचे काम हे ८ दिवसांत झाले पाहिजे, अशी सूचना देऊन हे पाणी मोफत देण्याचा आदेश दिला. एवढेच नाही तर या नळी घालण्याच्या कामाचा खर्च व त्या पाण्याचा करदेखील पुढे घेऊ नये अशी आज्ञा केलेली होती. कब्रस्थानासारख्या बाबींच्या कामासाठी पाणी मोफत देण्याचा त्यांचा हा निर्णय त्यांची सर्वधर्मसमानता दाखवून देतो.[२७]

२) मुसलमान लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय

पिण्याचे पाणी हे खरे तर नैसर्गिक देणगी आहे पण त्या काळच्या जातीपातीमुळे हे साधे पाणीसुद्धा काही लोकांचा विटाळ होतो म्हणून दिले जायचे नाही किंवा त्यांच्या कामाला दिरंगाई केली जायची. पन्हाळगडावर असलेल्या हजरत पीर दुकताल यांच्या दर्ग्याजवळ मुसलमान लोकांची घरे होती. तेथे पिण्याच्या पाण्याची खूपच गैरसोय होत होती; परंतु तेथे असलेल्या कमंडलूतीर्थ नावाच्या विहिरीचे पाणी सरकारातून नळ लावून दिल्यास त्यांची सोय होणार होती आणि त्यासाठी ते खर्चही करण्याला तयार होते. अशा अर्जावर महाराजांनी लगेचच हे काम सरकारी खात्याच्या देखरेखीखाली करून घ्यावे व त्यांना मोफत पाणी पुरवावे, असे आदेश देत मुसलमान लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली. [२८]

३) विठोबा देवळात येणाऱ्या लोकांना मोफत पाणी

कोल्हापूर शहरातील उत्तरेश्वराच्या जवळ विठ्ठल मंदीर असल्याने तेथे अनेक लोक नेहमीच भजनकिर्तनासाठी जमा होत असत, पण त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. यासाठी

केवळ नळाचा खर्च लोकांकडून घेऊन नंतर त्यांना पाणी पूर्णपणे मोफत देण्याचा आदेश शाहू महाराजांनी दिला होता.[२९]

बहुजन वर्गासाठी पाण्याची सोय

१) सार्वजनिक ठिकाणी पाण्यासाठी विटाळ न मानता समान संधी

त्या काळी भारतात असलेल्या तीव्र जातीभेदांमुळे बहुजन वर्गाला अत्यंत हलाखीचे व दुर्देवी असे जीवन जगावे लागत होते. पाण्यासारखा निसर्गसिद्ध हक्कासाठीसुद्धा त्यांना झगडावे लागत होते. संस्थानातही हीच परिस्थिती होती. अगदी पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत जीवनाला आवश्यक गोष्टींबाबत येथे नको तेवढा भेद मानला जायचा. राजर्षी महाराजांनी प्रथमपासूनच आपल्या राज्याची उभारणी ही समानतेच्या पायावर असेल असे धोरण ठेवले होते. जातीव्यवस्थेला नेहमीच विरोध करून प्रसंगी राजपदाचे अधिकार वापरून या वर्गास अभय दिले हाते. त्या काळी सार्वजनिक ठिकाणी वा विहिरींवर अशा वर्गाला पाणी घेण्याचा अधिकार नव्हता.

महाराजांनी ही परिस्थिती बदलायचे ठरवले होते. नुसतेच पाणी उपलब्ध व जलस्रोत संवर्धन करून समाज दुष्काळातून सावरणारा नव्हता, तर ते पाणी सर्वांना मिळाले पाहिजे, त्यातूनच दुष्काळाची स्थिती सुसह्य होऊ शकेल, असे त्यांना वाटत होते. 'ख्रिश्चन लोक सार्वजनिक विहिरीवर सर्वांना जसे एकसमान वागवतात, कुणाचाही विटाळ मानत नाही, हे महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे त्यांनी संस्थानातील सर्व सार्वजनिक ठिकाणे विशेषतः विहिरी, नदीचे पाणवठे अशा ठिकाणी कोणताही भेदभाव वा विटाळ मानता कामा नये, असा आदेश दिला होता. हा आदेश न जुमानल्याचे लक्षात असल्यास त्याला त्या गावाचा पाटील, तलाठी यांना जबाबदार धरावे, असा हुकूमही त्यांनी काढला होता. प्रशासनामार्फत बहुजन वर्गांचे अधिकार अशा प्रकारे अबाधित राहतील, हीच त्यांची भावना होती.[३०]

२) दलितांना पाण्याच्या हक्काचा न्याय निवाडा

महाराजांनी दलित व बहुजन वर्गाचे जातीभेद नष्ट करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नेहमीच न्याय दिलेला आहे. त्यावेळी समाजात जाती व्यवस्था पाळली जात होती. उच्चवर्णीय

लोक सार्वजनिक ठिकाणीही दलित वर्गास पाणी वापरण्यासाठी परवानगी देत नसत. दुष्काळाच्या काळात तर या बहुजन वर्गाचे फारच हाल होत असे. त्यांना पाण्यासाठी आसुसलेल्या नजरेने विनवणी करावी लागे, तरी काही वेळा त्यांना न्याय मिळत नसे. शाहू महाराजांनी हे अनुभवले होते. जात व्यवस्था मोडून काढून सर्वांना समान न्यायदान त्यांनी आपल्या राजवटीत केलेले आहे, हे एका प्रसंगातून ठळकपणे दिसून येते.

संस्थानातील आसुर्ले गावात तेथील दलित लोकांना व इतर जनावरांना गावातील ओढ्यातील पाणी घेऊन जाण्याला त्या गावच्या लोकांनी मनाई केल्याची तक्रार महाराजांसमोर आल्यावर त्यावर न्याय देताना त्यांनी स्पष्ट केले की, मामलेदार यांनी पंच लोकांसमोर समज द्यावी व त्यातून ऐकले नाही, तर खटला दाखल करावा. एवढेच नव्हे तर वतनदार पाटील असले तरी याबाबतच्या कारवाईत त्यांचे उत्पन्न जप्त करावे. [३१]

३) दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र विहिरी बांधण्याची व्यवस्था

तत्कालीन परिस्थितीत गावाच्या एकूण सामाजिक रचनेमध्ये दलितांना गावाबाहेर ठेवले जात होते. सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार त्यांच्यासोबत केला जात नव्हता. अस्पृश्यता, विटाळ यांसारख्या अनिष्ट पद्धतींनी दलितांना सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले जायचे. हे वास्तव लक्षात घेऊन महाराजांनी त्यांच्या मुक्तीसाठी जातिव्यवस्थेच्या विरोधात प्रखरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतलेला होता. दलित समाजाला जातीपातीमुळे सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याला हात लावू दिला जात नसे. अशावेळी त्यांची हलाखीची स्थिती बघता त्यांच्यासाठी महाराजांनी नेहमीच सरकारी आर्थिक मदत दिलेली होती.

- वाडी रत्नागिरी येथील दलितांकरिता पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र विहीर बांधण्याची मंजुरी देऊन त्यासाठी आलेला १८३ रुपये इतका खर्च शाहू महाराजांनी देवस्थानाच्या उत्पन्नातून देण्याची व्यवस्था केलेली होती.
- मौजे नरंदे या गावातील दलित लोकांनी मिळून त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची विहीर खोदण्याचे काम सुरू केले होते, परंतु पैशाअभावी ते काम अर्धवट राहिले होते. या

कामासाठी महाराजांनी तगाई न देता ५० रुपयांचे अनुदान देऊन विहीर बांधकाम पूर्ण करण्यासाठी मदत केली. [३२]

- हातकणंगले या पेट्यातील हर्ले येथील गावासाठी एक असाच महत्त्वपूर्ण ठराव महाराजांनी केला होता. तेथील मांग लोकांस पिण्याच्या पाण्याची गैरसोय होते, हे तेथे दिलेल्या भेटीत बघितल्याने तेथील गावात असलेल्या पाण्याची खाण आणि तिच्या बाजूची २ एकर जमीन मांग लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्यांच्या ताब्यात देण्याची आज्ञा केली आणि त्या घेतलेल्या जमिनीच्या राऊ व भागुजी धनगर या मालकांस दुसरी तेवढीच जी पसंत असेल, ती जागा द्यावी अशी सूचना गावकामगारास प्रत्यक्ष बोलावून दिली आणि त्याप्रमाणे शासकीय कागदपत्रांत सुद्धा नोंद व्हावी, यावर महाराजांनी जातीने लक्ष दिले होते.[३३]

दुष्काळाच्या स्थितीत दलित–मांग अशा कोणत्याही लोकांशी पाण्यासंबंधाने व्यवहार करताना जातीभेद आड येऊ नये आणि त्यांना तेवढ्याच तत्परतेने पाणी उपलब्ध होईल, यासाठी बहुतेक वेळा नियमच करून काम करून घेतलेले दिसते. त्यामागे महाराजांची सामाजिक न्यायाची भूमिका होती.

विहिरींबाबातची व्यवस्था

१) सार्वजनिक उपयोगाकतिा विहीर खुली करणे

जलकार्यासाठी संस्थानात विविध ठिकाणी कामे चालली होती. उपलब्ध असलेला व नव्याने तयार करण्यात येत असलेला साठा दोन्हीही लोकांसाठी तेवढाच महत्त्वाचा होता. नद्यांच्या तुलनेत विहिरींमधून पाणी कमी असले तरी पाण्यासाठी अशा विहिरी गावोगाव खोदलेल्या असतात व तेथील लोकसंख्येपुरता बहुदा त्यातील पाण्याचा पुरेसा उपयोग होतो. परंतु एखाद्यावेळी एखाद्या विशिष्ठ जातीचे लोक किंवा समुदाय त्यांच्या ताब्यातील विहिरींवर सर्वांना येण्यास मज्जाव करतात. किंवा खाजगी ताब्यात असलेल्या विहिरींमधून इतर कोणाही बाहेरच्या लोकांना पाणी न्यायला मज्जाव करत असतात. त्यातील पाणी पिण्यासाठीसुद्धा दिले जात नाही. एरव्ही नसले तरी उन्हाळयात व दुष्काळात मात्र लोकांना पाण्याची गरज असतेच. अशावेळी

जर सार्वजनिक विहीर असेल, तर सर्वांना पाण्याची सोय होते. हे लक्षात घेऊन सार्वजनिक विहिरी बांधणे, उपलब्ध सार्वजनिक विहिरींची दुरुस्त करणे, खासगी विहिरी सार्वजनिक उपयोगासाठी खुल्या करणे अशा प्रकारचे अनेक ठराव वेळोवेळी महाराजांनी मंजूर केलेले दिसते.

- राधानगरी महालमधील मांगोळी गावात एक मोठी वर्तुळकार विहीर होती. तिचा २७३ फूट घेर होता. दक्षिण उत्तर साडेपंच्याऐंशी लांबी फूट आणि ४८ फूट पूर्व पश्चिम लांबी होती. तिच्या चारी बाजूला काही लोकांच्या जमिनी होत्या. त्यामुळे त्या जमिनीचे मालक विहिरी पाणीवापराला इतर लोकांना मज्जाव करत होते. ती विहीर सर्व गावकऱ्यांसाठी उपयोगाची असल्याने तिचा सार्वजनिक वापर व्हावा, म्हणून ती सर्वांसाठी खुली करण्याची आज्ञा शाहू महाराजांनी दिली आणि तिथल्या तिथे गावाच्यो पाण्याचा प्रश्न सोडविला.[३४] याच राधानगरी येथे नवी वसाहत वसल्यानंतर तेथे पिण्यासाठी सार्वजनिक विहीर बांधण्याला ७६.७.१० एवढ्या रकमेची मंजुरी दिली होती.[३५]
- पटणकुटी येथील आप्पा जमगोंडा पाटील यांची विहीर सार्वजनिक उपयोगासाठी बांधण्याचा प्रस्ताव होता. त्यास एकूण १ हजार ७०२ रुपये लागणार होते. त्यापैकी ६०० रुपये स्वत: पाटील खर्च करणार होते, तर ७७१.२ रुपये गावकऱ्यांनी गावमदत केली होती. म्हणून उरलेली रक्कम रु. ३३०.१५.१० हे लोकल फंडामधून देण्याचे आदेश महाराजांनी तात्काळ देऊन लोकसहभागाच्या या उपक्रमास मदत केली. [३६]
- कोल्हापूर शहरात पूर्वी कोटीतिर्थ तलाव होता, परंतु त्याचे पाणी आजूबाजूच्या वस्तीतील सांडपाणी मिसळल्यामुळे प्रदूषित होत होते. त्यापासून परिसरातील नागरिकांना अनारोग्यास सामोरे जावे लागत होते. त्यामुळे शाहु महाराजाच्या आज्ञेने तो तलाव नगरपालिकेकडून बुजवण्यात आला होता. मात्र तेथील लोकांना पाण्याची गैरसोय होत होती. त्यामुळे तेथे एक नवीन विहीर काढल्यास पाण्याची सोय होऊन कोटीतीर्थाचे पाणी पुन्हा विहिरीच्या रुपाने आल्याने पूज्य व पवित्र काम होईल, या हेतूने तेथे विहीर बांधण्याची सूचना दिली.[३७]

- रजपूतवाडी येथील राहाटाच्या विहिरीत गाळ वाढला होता. त्यामुळे त्याची पाणी धारण क्षमता कमी झाली होती. हा गाळ काढण्याच्या कामासाठी महाराजांनी १०० रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्याचे आदेश काढले.[३८]
- चनवाड या नवीन उपविभागातील भोपळेवाडी येथे ५० रुपयांचे स्पेशल मंजूरी करून त्या गावाला झरा बांधून पाण्याची सोय करण्यात आली होती.[३९]
- मादळे या गावातील पाण्याचा झरा दुरुस्त करण्यासाठी १०० रुपये तेथील मामलेदारास दिल्याची नोंद ठराव बुक क्र. ५० अ मधील क्रमांक १०२१ (दि. १६/०५/१९०४) मध्ये आढळते.

२) नवीन विहिरींचे बांधकाम

संस्थानाअंतर्गत पाण्याचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टिकोनातून महाराजांनी एका बाजूला राधानगरी धरणाचा विशाल प्रकल्प हाती घेतलाच होता, त्याचबरोबर स्थानिक स्तरावर जलस्रोत निर्माण करण्याच्या हेतूने अनेक जलसंवर्धनाचे अनेक लहान-लहान प्रकल्प गावोगावी राबवले होते. जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी जागवेरच मुरवण्यासाठी लहान मोठ्या नाल्यावर बांध घालून पाणी अडवण्याबरोबरच कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधण्यास महाराजांनी प्रोत्साहन दिले; पण त्याचबरोबर पेयजल, घरगुती वापर आणि सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्याचा एक चांगला पर्याय म्हणून शाहू महाराजांनी विहिरींचे महत्त्व लक्षात घेऊन गावोगावी त्यांच्या बांधकामाला प्राधान्य दिले. या विहिरी बांधणीमध्ये तत्कालीन परिस्थितीतील आधुनिक तंत्राचाही उपयोग त्यांनी केला.

विहीर बांधकाम करताना महाराजांनी इरिगेशनच्या माध्यमातून तीन पातळीवर काम केल्याचे दिसते. प्रारंभी महाराजांनी अस्तित्वातील विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करण्याचे काम हाती घेतले. त्या सर्व अभ्यासाचा एक अहवाल करण्यासाठी शासकीय पातळीवरील विविध कर्मचाऱ्यांना गाव आणि शिवारामध्ये अस्तित्वात असलेल्या विहिरींची नोंदणी करण्यास सांगितले. अनेक वर्षापासून विहीर अस्तित्वात आहेत. पण त्या विहिरींच्या झालेल्या पडझडीमुळे त्या नामशेष होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे या अभ्यासातून निदर्शनास आले. अशा नामशेष होत असलेल्या किंवा पडझड होत असलेल्या विहिरी यांची

स्वतंत्र यादी करून महाराजांनी या विहिरींचे आधुनिक पद्धतीने बांधकाम करण्याचे आदेश दिले त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूदही करण्यात आली होती. दुसऱ्या बाजूला त्यांच्या खोलीकरणाचेही काम हाती घेतले. त्यांवर केलेला खर्च त्यांच्या काही प्रशासकीय दस्तऐवजांमधून समजण्यास मदत होते.

- गावगावांमध्ये विहीर बांधण्यासाठी तेथल्या लोकांची मदत घेतली जायची. बऱ्याचवेळा सरकारकडून टेंडर काढून विहीर बांधण्यात आलेल्या आहेत. रायबाग गावाच्या डोंगरावर विहीर काढण्यासाठी बाळा तांबोळी यांचे टेंडर मंजूर करून त्यासाठी येणारा खर्च रु. ६०० अदा केले होते.[४०]
- भाडळे गावातील ग्रामस्थांनी सार्वजनिक विहीर बांधणीचे काम हाती घेतले होते. त्यासाठी गावाकडून अंगमेहनतीसह ३७० रुपये उभे करण्यात आले होते. ते काम मुलकी खात्यामार्फत करण्यासाठी महाराजांनी लोकल फंडातून आठशे रुपयांची तरतूद करण्याचे आदेश दिल्याची नोंद दि. ७ जून १९०४ च्या ठरावातून दिसून येते.
- राजकलावंतीणीच्या शेतात विहीर नव्हती. तेथल्या आसपासच्या लोकांनाही पिण्यासाठी उपयोग होईल, म्हणून शाहू महाराजांच्या आज्ञेने त्या ठिकाणी खोदली होती. त्यावर एकूण खर्च रु. ४६२.१.१० एवढा मंजूर केला गेला.[४१]
- ब्याकूड गावातील डोंगरावर विहीर बांधण्यासाठी खर्चाची तजवीज व्हावी म्हणून ४०० रु. आगावू देण्याचे आदेश महाराजांनी दिले.[४२] ब्याकूड गावच्या डोगरावर जी विहीर बांधण्यासाठी जानेवारी १९१० ला महाराजांनी आगावू रक्कम जी दिली होती त्यातून काम सुरू केले होते, पण लगेचच पुढच्याच महिन्यात त्यात अधिकचा खर्च रु. ५०० झाल्यामुळे ती ही रक्कम आगावू स्वरूपात देऊन विहीर खोदण्याचे काम करून घेण्याचे आदेश दिले. [४३]
- कोल्हापूरातील आंब्याच्या वाडीजवळ प्रयाग तिकटी म्हणून जे ठिकाण होते, त्या ठिकाणी नवीन विहीर बांधण्यासाठी सरकारी खात्यातून रू. १ हजार ३२३ इतकी रक्कम मंजूर केली गेली.[४४]

- नवीन राजवाडा आणि रमणमळा या ठिकाणी नवीन विहीर बांधण्यासाठी अनुक्रमे प्रत्येकी ८१८ रु व ६६८ रुपये मंजूर केले, ज्यातून तेथील परिसरासाठी पाणी उपलब्ध झाले.[४५]
- शिरोळ या महत्त्वाच्या भागात असलेल्या आगार तलावात विहीर बांधण्यासाठी तब्बल १००० रुपये मंजूर करून बांधकाम केले.[४६]
- चनवाड कचेरीजवळ विहिर बांधण्यासाठी ४०३ रुपये अनामत रक्कम दिले होते. पण वाढता खर्च लक्षात घेऊन संस्थानाकडून २३६ निधी मंजूर करण्यात आल्याची नोंद दि. २५ जानेवारी १९०४ च्या ठराव बुक क्र ५० अ मध्ये आढळते.

३) विहिरींच्या दुरुस्तीसाठी आर्थिक मदत

ज्या प्रकारे संस्थानात एकीकडे नवीन विहिरींच्या खोदकामाचे उपाय करून पाण्याचा स्त्रोत वाढवण्याचे प्रयत्न चालू होते. त्याचबरोबर दुसरीकडे पडझड झालेल्या, वापरात नसलेल्या गाळाने भरलेल्या वा अन्य कारणाने उपयोगात येऊ न शकलेल्या अशा विहिरींचा शोध घेऊन त्यांच्या दुरुस्ती करण्याच्या कामावरही शाहू महाराजांनी भर दिला होता.

- रासबाग गावातील सर्वे नंबर ४६१ या ठिकाणी असलेली एक विहीर दुरुस्त करण्यासाठी सरकारातून रु. ४८८ मंजूर केले.[४७]
- टेंबलाईजवळील विहीर फोडून गाळ काढण्यासाठी एकूण रुपये १ हजार ९२० रुपये मंजुरी दिल्याची नोंद दि. १७ फेब्रुवारी १९०४च्या ठरावातून दिसून येते.
- रजपूतवाडी येथील दोन विहिरीच्या दुरुस्तीवरील खर्च अनुक्रमे रु. १,६२५ आणि रु. २,०७३ इतका झाल्याची नोंद दि. १०/१२/१९०३ च्या ठराव क्र. ५९२ मध्ये आढळते.
- करवीर नगरातील वळिंगे पानमळ्यातील विहीर दुरुस्तीसाठी ८७५.३.३ रक्कम सरकार तिजोरीतून अदा केली.[४८]

- करवीर पेट्यातील बेले या गावातील पडझड झालेली विहिरीच्या दुरुस्तीसाठी लोकल फंडातून रु. ४६७ एवढी तरतूद करावी अशी सूचना केल्याची नोंद दि. १६/११/१९०५च्या ठराव क्र. ७९८ मध्ये दिसते.
- वाडी रत्नागिरी या ठिकाणी यात्रेकरुंची नेहमीच ये-जा असल्याने त्यांना पाण्याची कमतरता भासू नये यासाठी नेहमीच सरकारकडून सोय केलेली असायची. तेथील चव्हाण तळे, बेडूक विहीर, कारदगेकराची विहीर अशा तीन ठिकाणच्या विहीरींची दुरुस्ती करण्याला प्राधान्य देऊन त्यासाठी २०० ते ३०० रुपयांपर्यंत खर्च करावा अशी मंजूरी दिली होती.[४९]

तलावाबाबत केलेल्या उपाययोजना

१) कळंबे तलावाच्या निगराणीसाठीचे खास अधिकार

छ. शाहू महाराजांपूर्वी कोल्हापुरात जी पाणी व्यवस्था होती. त्यात कळंबा तलाव हा शहरासाठी फारच महत्त्वाचा होता. येथील लोकांच्या दैनंदिन वापरासाठी, पिण्यासाठी तसेच शेती उत्पादनासाठी , उद्योगधंदे इत्यादीसाठी पाण्याची गरज या तलावातून भागविली जायची. शाहू महाराजांच्या काळातही हा तलाव लोकांना पाणी पुरवठ्याचे एक महत्त्वाचे साधन होते. सहाजिकच या तलावाची दुरुस्ती करणे, त्यातील पाण्याचे नियोजन करणे व मुख्य म्हणजे ते पाणी घाण होणार नाही याची सर्वात जास्त काळजी घेणे ही कामे सरकारला करणे गरजेचे होते. करवीर शहराचे पाणी खाते महाराजांनी म्युनिसिपल खात्याकडे वर्ग केले होते. त्याअनुषंगाने छत्रपती महाराजांनी खालीलप्रमाणे काही अधिकारच त्यांना प्रदान केले होते.

- कळंबे तलावात मासे मारून अगर अन्य तऱ्हेने जर कोणी पाणी घाण केले, तर त्यास २५ रुपयेपर्यंत दंड अगर पंधरा दिवसांची सक्त मजुरीची शिक्षा देणे.
- कळंबे तलावाचे बांधाच्या तलावासभोवार हद्दीची व ज्या पाटाने पाणी खजिन्यात आणिले आले आहे, त्या पाटाची, भंडारीची अगर पाण्याचे खजिन्याची जर कोणी नादुरुस्ती केली तर त्यास पंचवीस रुपयेपर्यंत दंड करणे.

- कळंबे तलावाचे हद्दीत बिगरहुकूम गवत कापणे व नेणे, झाडझुड तोडून नेणे तसेच आंब्याची, चिंचाची अगर आवळ्याची फळे बिगरहुकुम काढून जर कोणी नेली, तर त्यास २५ रुपये पर्यंत दंड करणे.

- कळंबे तलावाचे पाणी शहरात व ज्या ज्या भागात देण्यात आले आहे त्या भागाचे सार्वजनिक व्हाल्व अगर लोकांचे घरचे व्हाल्व बिगर हुकूम सरकारी मनुष्याकडून अगर दुसरे इसमाकडून अगर स्वतः जर कोणी सोडून घेईल, तर त्यास पंचवीस रुपये पर्यंत दंड अगर आठ दिवसांची शिक्षा देणे व त्याचे घरचे पाणी बंद करणे .

- पाणी सोडण्याची चावी अगर तशाप्रकारचे हत्यार जवळ ठेवून जर कोणी पाणी सोडून घेतले तर त्यास २५ रुपये पर्यंत दंड करणे.

- सार्वजनिक चावीवर अगर आसपास जर कोणी भांडी घासली अगर कपडे धुतले तर त्यास एक रुपया दंड करणे.

- लोकांचे घरात दिलेल्या पाण्याचा उपयोग बागेस अगर केळीस पाटाने पाणी देण्याकडे करावयाचा नाही, अगर चावीचे पाणी विनाकारण वाहू देणेचे नाही. या विरुद्ध जर कोणी वर्तन केले तर त्यास वीस रुपये पर्यंत दंड व घरचे पाणी बंद करणे.

- कळंबे तलावाचे हद्दीत जनावरे आल्यास त्याजबद्दल स्वतंत्र कोंड तलावाचे हद्दीत करून त्यात जनावरे घालणे व कोंडवाड्याचे ॲक्टप्रमाणे तजवीज करून वसूल म्युनिसिपालिटीचे खजिन्यात जमा करणे.

- नदीचे पाण्याबद्दल खालील नियम तीन महिने मुदतीपर्यंत अमलात येतील. जनावरे मर्यादित केलेल्या जागेत कोणी नेणेची नाहीत अगर त्यास पाणी पाजविणेचे नाही. जनावरांकरिता दोहोंबाजूस स्पेशल जागा करून देण्यात आल्या आहेत, याविरुद्ध वर्तन केल्यास प्रत्येक जनावरांबद्दल आठ आणे दंड करणे.

- मर्यादित केलेल्या जागेत कपडे धुणेचे नाहीत जर कोणी धुतले तर त्यास ८ आणे दंड करणे, आंघोळ करणेस तूर्त परवानगी देणेत आली आहे प्रसंगानुसार ती ही बंद करण्यात येईल.

- पाणी कोणतेही रितीने जर कोणी घाण केले तर त्यास पंचवीस रुपयेपर्यंत दंड करणे.

म्युनिसिटीला दिलेल्या वरील अधिकाराचे तपशील बघता महाराजांनी या पाण्यासाठी काटेकोरपणे नियम केलेले दिसतात. महाराजांनी म्युनिसिपालिटीला नदीवरील पाण्यासाठीचे अधिकार देऊन जर कोणी गुन्हा केलाच तर तात्काळ फैसला होण्याच्या दृष्टीने गुन्हयाबद्दल चौकशी करण्याचाही अधिकार देऊ केला.[५०]

२) तलाव दुरुस्ती व अन्य कामांसाठीची आर्थिक मदत

राज्यात काही तलाव बुजलेले होते, तर काही गाळ साचल्याने निरूपयोगी झालेले होते. अनेकांची पडझड झालेली असल्याने ते दुरुस्तीअभावी निरूपयोगी ठरत होते. महाराजांनी जलनियोजन करताना पाणी साठा वाढविण्यासाठी अशा नादुरुस्त तलावांचा शोध घेण्याचे काम हाती घेतले. कारण अशा तलावातून शेतीसाठी सिंचन क्षमता वृद्धिंगत होऊन आधुनिक शेती आणि नवनवीन पीक लागवड करणे शक्य होते. करवीर शहरातील १२ तलावांची दुरुस्ती, देखरेख, त्यातील पाण्याची व्यवस्था आणि त्यातून होणारी सर्व प्रकारची जमा अशी विविध कामे पब्लिक वर्क्स या खात्याकडून करण्याचा आदेश महाराजांनी दिला असल्याचे दि. १५ सप्टेंबर १९०० च्या आदेश बुकमधून दिसून येते.

- कोल्हापूरातील मोठ्या आकाराचा कळंबे तलावाचा बांध तुटल्याने तेथील पाणी वाया जाऊ नये व शहरात पाणी टंचाई होऊ नये, यासाठी त्याच्या दुरुस्तीला ब्रिटीश इंजिनिअर यांचा अहवाल घेऊन लागणारे १६ हजार ५१३ रुपयांचे एस्टीमेट ब्रिटिश इंजीनियरच्या सूचनेनुसार योग्य असल्याने त्यावेळेच्या बजेटात ७ हजार ३६४ रु. इतकी रकमेची तरतूद केली आणि बाकी ९००० रुपयांचीही स्पेशल मंजूरी देण्यात आली होती.[५१] तसेच या तलावाच्या पाटाची सुधारणा करण्यासाठी ४४० रुपये व

पाटात ९ इंची नळी घालण्यासाठी ८३७ रुपये मिळून रुपये १ हजार २७७ रुपयांची मंजुरी दिल्याची नोंद दि. ४ डिसेंबर १९०८च्या ठरावात दिसून येते.

- काही वेळा पडझड असलेल्या तलावाची दुरुस्ती करणेही तेवढेच महत्त्वाचे असल्याने महाराजांनी यासाठी ही भरीव तरतूद करण्याचे ठराव केले होते. अशाच एका अतिग्रे तलावात पाणी साठा वाढावा म्हणून त्यात दुसरे पाच नाले सोडण्याचे ठरवून त्या खर्चास ३५०० रु. मंजूर झाले पण आगोदर या तलावाची दुरुस्ती करावी लागली त्यावेळी रिपेअरींग चे ३०० रु. व अधिक ४९५ रु. लागले त्या अधिक ७९५ रु. खर्चास मंजुरी देऊन दुरुस्तीचे कामास महत्त्व दिले.[५२]
- शिरोळ तलावात जास्त पाणी येण्यासाठी तलावाचा इनलेट दुरुस्तीस ५८२ रु. मंजूर केले.[५३]
- रायबाग येथील आबू तलाव बराच नादुरुस्त झाल्याचे शाहू महाराजांनी तेथील भेटीच्या वेळी पाहिले होते ही अवस्था बघून त्यांनी तो तात्काळ दुरुस्ती साठी तिथेच आज्ञा दिली आणि याबरोबरीने १५ रूपये पगारावर एक मेस्त्रीची नेमणूक करून हे काम लवकरात लवकर होईल् असे बघितले.[५४]
- कोलिक तलावात चर काढण्याच्या कामासाठी १० हजार रुपये, रावणेश्वर तलावाच्या दुरुस्तीसाठी ५ हजार रुपये असे एकूण १५ हजार रुपयांची रक्कम श्री. गायकवाड दप्तरदार यांच्याकडे त्यांची या कामासाठी स्पशेल ड्युटी लावून ही रक्कम त्यांच्याकडे सूपूर्द केल्याची माहिती ठराव क्र. ७४१ दि. १० /०३/१९१४ नुसार मिळते.

३) नवीन तलाव बांधण्यास आर्थिक मदत

संस्थानात पाणी साठा म्हणावा तेवढ्या प्रमाणात पुरेसा नव्हता. शिवाय पारंपरिक पद्धतीने पाणी साठविले जायचे वा पावसामुळे जे पाणी मिळायचे. ते नदी नाले, तलाव विहीर यामधून जेवढे साठले जायचे, तेवढेच मिळायचे व यांची संख्या खूप अशी नव्हती. त्यामुळे उन्हाळ्यात पाणी टंचाई होत असे. पावसाचे पाणी योग्य तंत्रज्ञानाने साठविणे आणि त्याची साठवण क्षमता वाढून ते योग्य रितीने जमिनीत मुरवणे व सिंचनाखाली आणणे महत्त्वाचे होते. यासाठी नवीन तलावांची आखणी करून ते बांधण्यासाठी सरकारातून पैशांची तरतूद केली जायची.

महाराजांनी आधुनिक दृष्टीकोन ठेवून अशा पाण्याच्या क्षमता वाढविणाऱ्या प्रकल्पांना नेहमीच प्राधान्य देऊन पैशांची तजवीज कायम केली.

महाराजांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे वडगाव येथे नवीन तलाव बांधण्याचे काम सुरू झाले होते, तसेच नवीन राजवाडा येथे ही तलाव बांधण्याचे काम केले. त्यावेळी तब्बल ६ हजार ४३४.१४ रुपये खर्च केले होते.[५५]

सोनतळे येथे शाहू महाराजांचा मुक्काम नेहमीच असायचा. तेथील लोकांसाठी नवीन तलाव बांधावा, म्हणून तब्बल ८००० रुपये त्यांनी मंजूर केलेले होते.[५६]

४) श्री महालक्ष्मी तलावाची कल्पना काढल्याने इनाम

छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानाच्या प्रगतीसाठी वाहून घेतले होते. त्यातही त्यांनी दुष्काळावर कायम मात करण्यासाठी एक मोठे धरण बांधण्याचे स्वप्न पाहिले होते. या त्यांच्या स्वप्नामध्ये कोल्हापूर संस्थानाचे इंजिनियर श्री. रा.सा. दाजीराव अमृतराव विचारे यांनी सर्वप्रथम श्री महालक्ष्मी तलावाची कल्पना काढली होती. त्यांच्या मूळ कल्पनेला महाराजांनी आपले धेय्य बनवून पुढे कार्य केले. त्याची जाण महाराजांनी ठेवून त्यांना इनाम जमीन देण्याचा एक आदेशच सन १९११ साली काढला होता. त्यात ते नमूद करतात –

रा.सा. दाजीराव अमृतराव विचारे ए. इंजिनीयर कोल्हापूर यांनी सरकारी नोकरी इमानेइतबारे बहुत प्रकारे केली व श्री महाराणी लक्ष्मीबाई तलावाची कल्पना काढल्यामुळे आम्ही कृपाळू होऊन त्यास कसबा करवीर गाव रानातील सर्वे नंबर १९९ पैकी शाहूपुरीकडे वसाहती करिता दिलेली जमीन वजा जाता व मारुतीचे विहिरीपासून पाटणकराचे हद्दीपर्यंत पूर्व बाजूची जागा रस्त्यापर्यंत वजा जाता बाकी राहिलेली जागा जमीन त्यास जात इनाम वंशपरंपरा करून दिली आहे ती त्यांचे ताब्यात एकदम देण्याची तजवीज करावी. आलहिदा रितीप्रमाणे चिटणीस दप्तरातून सनद देण्यात यावी.[५७]

५) श्री महालक्ष्मी तलावाबाबत कामे (राधानगरी धरण)

श्री महालक्ष्मी तलाव हा भोगावती नदीवर बांधण्यात आलेले मोठे धरण (राधानगरी धरण) हे शाहू महाराजांच्या जीवनाचे एक ध्येय होते. तलावाच्या पायथ्याजवळ आपल्या कन्येच्या नावाने

वसविलेल्या राधानगरीमुळे या तलावाला पुढे राधानगरी धरण म्हणून ओळखले जाऊ लागले. राधानगरी धरण ही महाराजांची महत्त्वाकांक्षी योजना असल्याने त्यांनी वेळोवेळी त्यावर लागेल तेवढा खर्च केलेला होता. त्यातील काही खर्चांच्या बाबी बघता हे संस्थानातील सर्वात मोठे धरण असल्याची सहज कल्पना येते.

शाहू महाराजांनी आपल्या एका ठरावात नमूद केले की, १९१२ सालापर्यंत २ लक्ष रुपयांची मंजूरी दिली असून ती रक्कम खर्च झाली आहे. आणि या वर्षी म्हणजे १९१२ साली ५०,०००/– रुपयांची स्पेशल मंजुरी देण्याचा आणि पुढील वर्षी तीन लक्ष पन्नास हजार रुपयांची मंजुरी होण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यास तातडीने मंजुरी दिली. तसेच या तलावासाठी लागणारी यंत्रसामुग्री, वाहतुकीसाठी रेल्वेरूळ टाकणे, परदेशी कंपन्यांना या कामासाठी सहभागी करून घेणे अशा विविध कामांवर महाराजांचे जातीने लक्ष होते. त्यावरील खर्चात त्यांनी कोणतीही कपात केली नसल्याचे स्पष्ट होते.[५८]

श्री महालक्ष्मी तलावाचे काम दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर झाले. त्यावेळी १९.७.३ रुपये एवढा झालेला खर्च मंजूर करून त्यावेळेच्या रितीप्रमाणे श्री लक्ष्मी तलावाचे (राधानगरी) उद्घाटन केले. या तलावाच्या प्रोजेक्टसाठी चिफ ऑफ कागल यांना सन १९०८ मध्ये ५०० रु. आगावू रक्कम देऊन देखरेख व्यवस्था चोख ठेवण्यास सांगितले होते. या तलावाच्या कामासाठी डिसेंबर १९०९ पर्यंत ४० हजार रुपयांचा खर्च करण्याची मंजुरी दिल्याची नोंद ठराव क्र. ४१६ (दि. ४/१०/१९०९) मध्ये आढळते. सन १९११ मध्ये या कामासाठी २ लाख रुपयांची मंजुरी देऊन महाराजांनी सातत्याने या कामाकडे लक्ष दिलेले होते.[५९]

सन १९११ च्या ऑक्टोबरमध्ये राधानगरी धरणाच्या डाव्या बाजूच्या कालव्याचे परीक्षण करण्यासाठी महाराजांच्या खुद्द आज्ञेवरून २००० रुपये विशेष मंजुरी देण्यात येऊन ते काम ही तत्परतेने करण्यात आले होते. तसेच या कामाच्या अनुषंगाने ऑगस्ट १९११ ते जून १९१२ या कालावधीत विशेष खर्च रुपये ३४४.१५.६ आणि अन्य त्यासंबंधीतच कामांसाठी आलेला खर्च १,२०,९४४.११.१ ही मोठी रक्कम त्यावेळी त्यासाठी लागल्याची नोंद तत्कालीन जमाखर्चाच्या ठराव मंजुरीवरून समजते.[६०]

६) श्री महालक्ष्मी तलावाच्या कामासाठी जाणाऱ्या घरांचा मोबदला

श्री महालक्ष्मी तलाव हे सर्वात मोठे धरण होईल, अशा पद्धतीनेच त्याचा आराखडा बनवून सुरुवात झालेली होती. या सार्वजनिक कामासाठी धरण परिसरातील जमिनी घेतल्या गेल्या. काही गावांतील लोकांच्या ज्या जमिनी या तलावकामासाठी गेल्या त्यांना दुसरीकडे जमिनी देऊन त्याची भरपाई केलेली होती.

या तलावाच्या कामासाठी धरण परिसरातील येजीवडे गावातील २४ घरे जात होती त्या लोकांस ७२५.२.६ रुपये देऊन त्यांची घरे सरकारात जमा करून मोबदला मंजूर केला होता. त्याचबाजूचे असणे या गावची ११२ घरे जात असल्याने त्यांच्या मालकांना २६७७.१०.६ कॉम्पेनसेशन देऊन त्यांची घरे सरकारजमा करण्यात आलेली होती. तसेच तलावासाठी शेळप येथील ७१ घरे सुद्धा सरकार जमा करून मालकांस ३२१.१५.६ मोबदला मंजूर केला होता.[६१]

७) नवीन तलाव बांधकामासाठी लागणाऱ्या जागेचा मोबदला

संस्थानाला दुष्काळचा सामना करावा लागू नये यासाठी इरिगेशन खात्याने तलावांसंदर्भातील विविध कामे सुरू केली होती. सरकारी खात्यामार्फत नवीन तलावांसाठी जागांचा शोध घेऊन योग्य ठिकाणाची जागा तलाव बांधकामासाठी घेण्यात येत होती. अशा जागांवरील वस्तीची काही घरे त्यात जात असत, तेव्हा त्या घरमालकांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देऊन तलावाच्या बांधकामाचा अडथळा दूर केला जायचा.

सोनतळी बंगल्यानजीक पाण्याच्या सोईसाठी एक तलाव बांधण्यात येणार असल्याने त्यासाठी काही जमिनी घेण्यात येणार होत्या. तेव्हा त्या जमिनीसाठी मोबदला म्हणून कोल्हापूरहून वडगाव येथे जाणाऱ्या जुन्या रस्त्यापैकी ज्या पुष्कळ पडीक जमिनी होत्या, त्या द्याव्यात किंवा ज्या लोकांना त्यात तोटा होत असेल, तर त्यांना दुसरी एखादी जागा द्यावी अशी लेखी आज्ञाच महाराजांनी दिली होती.[६२]

वडगाव गावाजवळसुद्धा जो तलाव बांधण्याचा प्रस्ताव होता, त्यासाठी ज्या जमीन घेतल्या जाणार होत्या, त्याचा मोबदला म्हणून संबंधित शेतकऱ्यांना इतर जमिनी दिल्या, पण जे लोक

शेतकरी नव्हते व ज्यांच्या जमिनी माळरानाच्या होत्या, त्यांना मग मोबदला म्हणून २४०० रु. मंजूर करून भरपाई देण्यात आली.[६३]

धरणाच्या बांधकामाबाबत दिलेल्या सूचना

कोल्हापूरात पूर्वीपासून शेतकरी नदी नाल्यांवर मातीचे बांध घालून अडवलेल्या पाण्याचा वापर शेतीसाठी करत असत; पण असे कोल्हापूर पद्धतीचे बांध किंवा धरण हे तात्पुरत्या स्वरूपाचे असत. ते पक्के बांधलेले नसत. पण बहुतांश ठिकाणी अशाच पद्धतीने पाणी अडवले जात असल्याने त्याचा अडथळा रस्त्यांना होत असे. कारण असे बांधण्याच्या कामाची कोणतीही विशिष्ट पद्धत नव्हती. राज्यात योग्य पद्धतीने धरण बांधण्याचे काम दुष्काळी काळात सुरू केले होते. सरकारने याबाबत खालीलप्रमाणे काही साधारण नियमावलीही लागू केली होती–

> नदीस अथवा ओढ्यास जी धरणे बांधण्याची ती त्याच वरून गाड्या जाण्या येण्याजोगी रुंदीची व मजबूत असावीत. या विषयी सरकारचा ठराव होऊन हुकूम झाला आहे. तो पूर्णपणे अमलात राहिला पाहिजे व तो अमलात राहण्याची काळजी मामलेदार, फिरते अव्वल कारकून व भागकारकून यांनी मुख्यत्वे गावकामगार मुलकी व पोलीस पाटील आणि कुलकर्णी यांनी घेतली पाहिजे आणि जे लोक त्या हुकुमाचे हेतू बाहेर धरणे बांधीत आहेत, असे आढळून येईल तर ती एकदम बंद केली पाहिजे व हुकूमाविरुद्ध वर्तन केल्याबद्दल त्याजवर काम सुरू केले पाहिजे.
>
> असे आढळून आले आहे की, एकाहून अधिक गावचे लोक एकत्र जमून मोठे नदीस धरण बांधतात आणि त्या धरणाचे पाणी अनेक गावचे नदीमध्ये तुंबले जाऊन सार्वजनिक रस्ते नेहमीप्रमाणे वापरण्यास हरकत येते, त्याजविषयीही बंदोबस्त झाला पाहिजे. सबब असे ठरविण्यात येत आहे की, प्रत्येक गावचे हद्दीमध्ये नदीतून जाण्या–येण्याचे रस्ते असतील, त्या रस्त्याने पाण्याचे हरकती मुळे जाण्यास हरकत पडू नये अशी तजवीज धरण बांधणारांनी आपले खर्चाने प्रथम करून मग धरणे बांधली पाहिजेत आणि असे न केले तर बांधणेची धरणे एकदम गावकामगारांनी बंद करून मामलेदारास रिपोर्ट केला पाहिजे, मामलेदारांनी स्वतः जाऊन पाहून या नियमांचे उल्लंघन न होईल असा सक्त बंदोबस्त केला पाहिजे.

जे सार्वजनिक रस्ते गाड्या जाण्याचे आहेत ते नेहमीप्रमाणे यथास्थित रीतीने नदीचे पात्रातून वापरण्यास हरकत न येण्याचा बंदोबस्त अगोदर करून मग त्या खाली बांधण्याचे धरण बांधण्यास लागले पाहिजे आणि या विरुद्ध कोणी धरणे बांधीत आहेत असे गावकामगारास समजले तर त्यांनी ते काम बंद करून मामलेदाराकडे रिपोर्ट करावा व मामलेदारांनी त्याच बद्दल पुढील तजवीज करावी.

नदीस पाणी तुंबवून उन्हाळ्या दिवसात नावेचा उतार सुरू करून लोकांस उताराबद्दल हांशिल देण्यास भाग पाडणे हे तत्त्व बरोबर नाही. सबब ते अगदी बंद केले पाहिजे, समजून मामलेदारांनी याज बद्दल पूर्ण काळजी घेऊन असे न होण्याचा बंदोबस्त करावा.

ज्या ठिकाणी नदीचे दोन बाजू पैकी एक गाव करवीर इलाख्यापैकी व दुसरा गाव संस्थानपैकी अथवा जहागीरपैकी असेल, तेथे सुद्धा वर लिहिल्याप्रमाणे अंमल व्हावयाचा आहे आणि तो होता संस्थानचे अथवा जहागीरदाराचे गावचे लोक राजी न होतील तर निम्मे नदीमध्ये त्यास धरण घालूच देऊ नये व असे झाले म्हणजे सार्वजनिक रस्त्यावर पाणी तुंबणार नाही व इष्ट हेतू तडीस जाण्यास हरकत येणार नाही .

यावरून आपल्या असे लक्षात येत की, महाराजांनी लहान मोठ्या नदी–नाल्यांवरील बांध वा धरणे बांधताना कोणती पद्धत, नियम अमलात आणावेत, यासंबंधी एक निश्चित नियमावली घालून दिली होती. केवळ संस्थानच नाही तर आजूबाजूच्या जहागीर असलेल्या परिसरातील लोकांनी सामाईक असलेल्या नदीमध्ये धरणाबाबत काही अनियमितता केल्यास त्यांनाही अटकाव करण्याचे आदेशच महाराजांनी पारित करून सर्वच लोकांचे सार्वजनिक हित पाहिले होते.[६४]

१) एक तोंडी तलाव व पक्के धरण बांधणी

महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील गावांमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे आणि पेयजलासोबत सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी तलाव, धरण इ. बांधण्याचे धोरण ठेवले होते.

त्यातूनच संस्थानात लोकसहभागातून अनेक छोटे मोठे तलाव व धरणे बांधली गेली. अर्थात तलाव वा धरणे बांधताना ते भक्कम असावीत असे महाराजांचे आदेश होते. असाच एक प्रयोग म्हणजे पक्के धरण (एकतोंडी धरण) बांधणे अशा पक्क्या धरणामुळे पावसाच्या पाण्याचे व्यवस्थित संचयन करता येते, व शेताला योग्य दिशेने पाणी उपलब्ध करून देता येते. त्यामुळे महाराजांनी अशा एकतोंडी धरण बांधणीला प्राधान्य दिले होते.

भुदरगड येथील चिमणी गावातील लोकांच्या अर्ज आणि विनंतीचा विचार करून धरण बांधणीचे काम सार्वजनिक असल्याची खात्री केली. या धरणामुळे तेथील गावात पाण्याची होणारी सोय पहाता आणि त्याचा खर्च गावकरी उचलणार असल्याने त्यांच्या जमिनीवर पक्के धरण (एक तोंडी धरण) बांधण्यास मंजुरी दिली होती.[६५]

हातकणंगले या गावात असलेल्या मोठ्या ओढ्यावर पक्के धरण बांधण्याची योजना करून रुपये ८१७.११ एवढ्या रकमेची तरतूद केली होती.[६६]

पाणी कर आकारणी

दुष्काळ काळात महाराजांनी विविध ठिकाणी विहीर, तलाव, नद्या इ. दुरुस्त करणे वा नवीन बांधकाम करणे ही कामे चालू करून जास्तीत जास्त पाणी साठा निर्माण करण्याच्या कामाला गती दिली होती; परंतु उपलब्ध असलेले पाणी हे योग्य पद्धतीनेच व नियमानेच वापरले पाहिजे हा दंडकच होता. सरकारातून ज्या ठिकाणी पाणी पुरवठा केला जायचा. त्या ठिकाणी पाणी कर (हाशिल) आकारणी केली जायची.

शेतीला, पिण्यासाठी, औद्योगिक कारखान्यांसाठी इ. वेगवेगळ्या प्रकारानुसार पाणीकर घेतला जायचा. पाण्याच्या जास्त वापरावर जास्त कर घेतला जायचा. सदर करातून महसूल तर मिळतच असे, पण त्यामुळे पाणी आवश्यक तेवढेच वापरले जायचे. विविध भागातील परिस्थितीनुसार व पाणी उपलब्धेतेनुसार हा हशील आकारला जायचा व काही ठराविक कालावधीने त्यात दुरुस्ती होऊन काळानुसार अद्यावत अशी नवीन कर आकारणी केली जायची.

१) शेतीतील पिकांच्या प्रकारानुसार पाणीपट्टीचा दर

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंचयन व उपलब्ध पाण्याचा काटेकार वापर याबाबत महाराज दक्ष होते. संस्थानातील शेती क्षेत्राला बळकटी आणि शेतीक्षेत्राचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने जलव्यवस्थापन आवश्यक होते. संस्थानात बहुतांश पिके ही खरीप आणि रब्बी हंगामात घेतली जात होती. मात्र उन्हाळी हंगामात बागायती पिके घेण्यासाठी बारमाही सिंचनसुविधा आवश्यक होती, तर काही पिकांना पाण्याच्या काही पाळ्यापुरते पाणी पुरेसे होते. शेतकऱ्यांना सरकारातून शेतीच्या पिकांसाठी पाण्याची व्यवस्था करताना पिकांना आवश्यक तेवढेच पाणी देण्याचे नियोजन करणे व त्यानुसार दर आकारणी करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे हशील लागू करण्यासाठीचे जाहीरनामे प्रसिद्ध केले होते.

सन १८९७ मध्ये लागू केलेल्या जाहिरनाम्यातील नियमानुसार रंकाळा तलावाचे पाणी लोकांच्या पिकांना देताना प्रत्येक एकराचा दर ठरवून दिला होता. ते दर आणि पाणीवाटपाचे नियम पुढील जाहिरनाम्यातून दिसून येते.

जाहीरनामा

तारीख २९ नोव्हेंबर १८९७

नंबर ३५.– करवीर इलाख्यांत पाटाने पाणी देण्याचे नियम आजवर चालू आहेत, त्यात हुजुरुन नंबर ६७७, तारीख ८ नोव्हेंबर १८९७ चे आज्ञेत आल्यावरून फेरफार करून सर्वांस महशूर होण्यासाठी या जाहीरनाम्यावरून प्रसिद्ध करण्यात येते की:–

१. कोणत्या पिकास कोणत्या दराने पाणी देण्याचे याविषयी जाहीरनाम्याच्या शेवटी तक्ता उर्फ माहिती दिली आहे त्याप्रमाणे पाण्याचे हशील घेतले जाईल.

२. रंकाळे, पद्माळे व कळंबे वगैरे तलावांपैकी वेस्टवेअरवरून वाहणारे नाल्यातून जाणारे पाणी, आणि करवीर शहरातील इतर साठ्यांतील, अगर पाटझरे वगैरेचे पाणी इरिगेशनचे कामास दिले जाईल, परंतु कोणी मनुष्य बिगरपरवानगीने पाणी आपल्या जमिनीत नेईल तर त्याजकडून दराप्रमाणे हशील घेऊन शिवाय हशिलाचे दुप्पट इतका दंड घेतला जाईल, पण जे पाणी आपोआप एखाद्या जमिनीत जाईल, व त्याजपासून

त्यास खरोखर उपयोग होत नाही, असे दिसल्यास त्यास मात्र हशील घेतले जाणार नाही.

३. सोबतच्या तक्त्यातील जे पीक केले असेल, त्या पिकास त्याचे मुदतीप्रमाणेच पाणी घेतल्यास नमूद केलेले दर घेण्याचे असा नियम समजू नये. उदाहरण – उसाचे पीक बारा महिन्यांचे दाखल आहे, परंतु ते जर ११ महिन्यांत निघाले तर १२ महिन्यांचे हशील घेण्याचे, तसेच १३ महिन्यांनी निघाले तरी १२ महिन्यांचेच हशील घेण्याचे आहे. त्याचप्रमाणे भाताचे पीक ८ महिन्यांचे नमूद आहे, पण वास्तविक पाहिले तर भाताचे पीक पावसाळ्यांतील असल्यास १,२,३ वेळा पाणी द्यावे लागते, तथापि तक्त्याप्रमाणे भर आकार घेण्याचा आहे.

४. पाणी घेणाऱ्या इसमाने आपल्या हद्दीतून जाणाऱ्या पाटाचे पाणी पाट फुटून अगर अन्य रीतीने खराब न होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे, व तसे करण्यात चूक होईल तर त्या प्रत्येक वेळेचे नुकसानीबद्दल म्हणून नुकसान होईल तितका आकार व पराकाष्ठा १ आण्यापेक्षा जास्ती नाही इतका दंड दिला पाहिजे.

५. दिवसाच पाणी दिले जाईल अशाबद्दल सरकार जोखीम घेणार नाही. सरकारचे सोईप्रमाणे दिवसां अगर रात्री सवडीप्रमाणे पाणी देण्यात येईल.

६. ज्या तारखेस पाणी पाहिजे होईल त्यापूर्वी निदान ८ दिवस त्याने योग्य अधिकारी यांजकडे अर्ज केला पाहिजे.

७. कोणी इसम आपल्या जमिनीपैकी एखादे उंचवट्याचे भागावरील जमिनीतील पिकास वाजवीपेक्षा अधिक पाणी देऊन तुंबवून ठेवील व त्या पाण्याच्या ओलाव्याने सखल भागाच्या जमिनीत पीक करून घेतो असे नजरेस येईल, तर त्या दोंहो जमिनीतील पिकांबद्दल नियमाप्रमाणे हशील घेणे भाग होईल.

८. ज्या कोणत्याही पिकास वरील नियमाप्रमाणे पाणी न मिळाल्यामुळे किंवा कोणत्याही अनिवार्य कारणामुळे ते पीक मालकाच्या पदरी पडणार नाही, तर पाण्याच्या हशिलाची

सर्व किंवा काही रकम माफ करणे हुजूर मर्जीवर अवलंबून राहील, व अशा प्रसंगी लोकांचे नुकसानीबद्दल सरकार जबाबदार नाही.

९. वरील कारणावरून वगैरे पाण्याच्या हशिलाची सूट मिळण्याबद्दल इंजिनियर साहेब यांजकडे अर्ज करणे तो पाणी बंद झाल्यापासून १० दिवसांत आणि ज्या पिकाचे नुकसान झाले असेल, किंवा होण्याचा संभव असेल ते पीक जमिनीतून काढून घेण्यापूर्वी निदान १५ दिवस तरी केला पाहिजे, म्हणजे चौकशी करण्यास सोयीचे होईल.

१०. कलम २ यात निर्दिष्ट केलेली पाण्याची स्थळे त्यांजपासून २०० यार्डांच्या आत कोणी मनुष्य त्या पाण्याच्या तळापर्यंतच्या सपाटीपेक्षा अधिक खोल असा झरा वगैरे काढून त्या पाण्यावर पीक करील तर तो इसम वर लिहिल्याप्रमाणे कर देण्यास पात्र होईल. मग तो झरा पूर्वीच काढलेला असो, किंवा नवीन काढलेला असो. कर घेण्यास तो पात्र आहे असे समजावे.

११. कोणी मनुष्य कलम २ यात निर्दिष्ट केलेल्या पाण्याच्या बंधाऱ्यास अगर त्याच्या बंदिस्तपणाच्या मर्यादेस विवर पाहून अगर दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेने अपाय करील अगर तसे करण्याचा प्रयत्न करील तर त्याजबद्दलची त्याजकडून नुकसान घेण्यांत येऊन शिवाय तो पिनल कोडाप्रमाणे शिक्षेसही पात्र होईल.

सदरहू नियम तारीख १ माहे जानेवारी सन १८९८ पासून अमलांत येतील.

हुजुर आज्ञेवरून,

एम. कुवरजी

दिवाण सरकार करवीर

तक्ता–रंकाळे तलावाचे वगैरे पाणी रयत लोकांचे जमिनीस पिकास वगैरे दिल्याबद्दल प्रत्येक एकरास दर ठरला आहे त्याजबद्दल

वर्ग १ बारा महिने पाणी देणे	**वर्ग २ आठ महिने पाणी देणे**	**वर्ग ३ चार महिने पाणी देणे**	**वर्ग ४ दोन महिने पाणी देणे**	**शेरा**
दर एकरास १६ रुपये प्रमाणे	**दर एकरास ६ रुपये प्रमाणे**	**दर एकरास ४ रुपये प्रमाणे**	**दर एकरास २ रुपये प्रमाणे**	
१. ऊस २. पानमळा ३. पेरु, अंजीर, नारिंगे, आंबे, केळी वगैरे ४. फुलझाडे ५.विलायती गवत	१. उत्तम गहू २. भात ३. सातू ४.उत्तम पानमळा ५. बटाटे ६. भुयमूग ७. रताळे ८. हळद ९. मिर्च्या १०. कांदे ११. तंबाकू १२. वांगी	१. गहू बक्षी २. कापूस ३. अंबाडी ४. शाळू ५. हरभरा ६. तुरी ७. काळे तीळ ८. लसूण ९. गाजरे १०. जवस ११. काकडया १२. दोडके वगैरे	१. हलक्या साळी २. बाजरी ३. जोंधळे ४.हुलगे (कुलत्या) ५. मूग, मटकी, उडीद ६. राळे ७. राजिगरे ८. मका वगैरे	जे जमीन नांगरण्यास सुलभ नाही, ती नांगरण्यास पाणी घेतल्यास दर एकरास १ रुपयामागे आकार धरण्याचा आहे

(स्त्रोत : जाहीरनामा करवीर सरकार गॅझेट भाग १, दि . ४/१२/१८९७, पृ. १३७६)

परिस्थितीनुसार पाण्याच्या हशील आकारणीमध्ये बदल होणे आवश्यक होते. त्यामुळे पुढे सन १९०९ ला शाहू महाराजांनी हुजूर ऑफिसच्या दिवाणांकडून तपशील घेतला असता राज्यात

पीक प्रकारानुसार व वर्गानुसार द्यावयाचे पाण्याचे दर हे जुनेच असून त्यात नवीन सुधारणा करण्याची गरज लक्षात घेऊन सन १८९७ ला जो पाणी कराचा दर होता. त्यात दुरुस्ती करून नवीन दर सन जुलै, १९०९ मध्ये लागू केले. तेव्हाच्या शेतीसंबंधाने पाण्याच्या दराची कल्पना खालील तक्त्यातून येते.

तक्ता – तलावाचे वगैरे पाणी लोकांच्या जमिनीस पिकांकरिता वगैरे देण्यात येते, त्याचे हशील प्रत्येक एकरास ठरल्याबद्दल

नंबर	बारा महिने पाणी देणे		आठ महिने पाणी देणे		चार महिने पाणी देणे		दोन महिने पाणी देणे	शेरा
	वर्ग १	वर्ग २	वर्ग ३	वर्ग ४	वर्ग ५	वर्ग ६	वर्ग ७	
	एक एकरास ४०	एक एकरास ३५	एक एकरास १६	एक एकरास १५	एक एकरास ६	एक एकरास ४	एक एकरास ५	
	बागायत पिके			जिराईत पिके		रब्बीची पिके	खरीपची पिके	
१	२	३	४	५	६	७	८	९
१	ऊस	ऊस	पानमळा	हळद	उत्तम गहू	बक्षी गहू	हलक्या साळी	जे जमीन नांगरण्यास सुलभ नाही, ती नांगरण्यास पाणी घेतल्यास दर एकरास १ रुपयामागे
२			पेरू, अंजिर, नारंगी		भात	कापूस	बाजरी	
३			आंबे, केळी वगैरे		सातू	आंबाडी	जोंधळे (ज्वारी)	
४			फुलझाडे		उत्तम	शाळू	हुलगे	

					पानसाळ			आकार धरण्याचा आहे.
५			विलायती गवत		बटाटे	हरभरा	मूग, मटकी, उडीद	
६					भुईमूग	तुरी	राळे	
७					रताळी	काळे तीळ	राजगीरे	
८					मिरच्या	लसूण	मक्का वगैरे	
९					कांदे	गाजरे		
१०					तंबाकू	जवस		
११					वांगी	काकडया		
१२						दोडके वगैरे		

यावरून त्या काळी शेतात घेतल्या जाणाऱ्या पिकांचा सुद्धा तपशील समजण्यास मदत होते.[६७]

२) पाणी कर जमा करून घेण्याचा नियम

दुष्काळी संकटातून बाहेर पडण्यासाठी राज्यातील जमीन ही पाण्याखाली आली पाहिजे जेणेकरून शेतीविकासास मदत होऊन शेतकरी वर्गाला व तमाम लोकांना दुष्काळाची भिती राहणार नाही. म्हणून राज्यात ठिकठिकाणी तलाव बांधण्याचे वा नादुरुस्त असल्यास ते दुरुस्ती करून घेण्याचे काम सरकाराच्या तिजोरीतून खर्च करून करण्यात येत होते. अशावेळी जर सरकार खर्च करत असेल तर त्यातून दिल्या जाणाऱ्या पाण्याचा कर जमा करणे आणि तो वसूल करण्यासाठी महाराजांनी जो ठराव मंजूर केला, त्यानुसार अशा सरकारातून बांधलेल्या तलावांचे पाणी लोकांना दिल्यास त्यांच्याकडून आलेला कराचा पैसा हा गावच्या जमाबंदीत न

धरता स्वतंत्र कार्यरत असलेले इरिगेशन खात्यात जमा करण्यात यावा. त्यासाठीची लोकांकडून वसूली ही मात्र सार्वजनिक बांधकाम खाते किंवा रेव्हिन्यू खात्याने करावा. ही कार्यप्रणाली आखून दिली होती. [६८]

३) सरकारी पाणदरीतून पाणी नेल्यास कर आकारणी

संस्थानात प्रजेच्या पुढील भविष्याच्या दृष्टीने महाराजांनी जलविषयक कामे हाती घेतली होती परंतु, जनतेला सुद्धा पाण्याची जबाबदारी निश्चित केली होती. लोकांना शेतीसाठी मूळातच पाण्याची गरज ही असते. शेतकऱ्यांना शेतीच्या उपयोगासाठी सरकारी पाटातून पाणी घ्यायचे असेल, तर त्या प्रत्येक वेळच्या एका पाटाबद्दल एक रूपया पाणीकर व पाणी अडवून पाणी घेतले, तरी सरसकट एक रुपयाने दर आकारणीची आज्ञाच दिली होती.[६९]

४) पाणी कराचे पैसे परत देणेबाबत

संस्थानात पाणीपट्टी लागू करून जे नियम केलेले होते, त्यानुसार प्रजेला पाणी कर द्यावा लागायचा. मात्र कधी पाणी पुरवठा केला गेला नाही, तरी लोकांना न लुबाडता त्यातून सूट दिली जायची. १९०१ च्या काळात शहरातील कळंबा तलावाचे पाणी अनेक घरांना पुरविले होते. त्याबद्दल त्यावेळी कर आकारणीही केली होती; परंतु त्यातही काही दिवस लोकांना पाणी पुरवठा झाला नव्हता. तेव्हा तेवढ्याच पाण्याचे जे पैसे भरलेले होते, ते परत लोकांना देण्यासाठी सन १९०९ मध्ये एक जाहिरनामाच काढून ऑफिसमधून १/४/१९०९ ते १०/४/१९०९ या कालावधीतील पैसे घेऊन जाण्याचे आवाहन केले होते. संस्थानात दुष्काळाअभावी तेव्हा पाणी न देता आल्याने नंतर का होईना पण लोकांचे पैसे त्यांना परत मिळत असत. जनतेला कसलीही फसवणूक होऊ नये, हाच शाहू महाराजांचा दंडक होता.[७०]

५) पाण्याचा कर आगाऊ घेणेबाबत

जलनियोजनासाठी संस्थानात शाहू महाराजांनी विविध प्रयत्न सुरू केले होते, त्यात पाणी वापराबाबतचे तसेच त्याच्या कराबाबतचे नियम वेळोवेळी केलेले होते. पाटबंधारे खात्यासाठी रंकाळा तलावातून जो पाणीपुरवठा केला जायचा, त्याचा कर अगोदरच घेतला जायचा. अशाच पद्धतीने हा महत्त्वाचा नियम शहारातील इतर तलावांनाही लागू करण्याचा आदेश महाराजांनी

देऊन सर्व तलावांच्या पाणीपुरवठा करात एकसमानता येण्यासाठी नियम सुधारीत केले होते.[७१] या समान करनियमावलीमुळे लोकांमध्ये शिस्त निर्माण झाली. आगाऊ करपद्धतीमुळे आवश्यक तेवढेच पाणी वापरात येऊ लागले.

६) कळंबे तलावाच्या पाणीदरात फेरफार न करणेबाबत

सन १९०४ ला कळंबे तलावाच्या पाणी दराबाबत नियम प्रसिद्ध झालेले होते. त्यास अनुसरुन १९०८ मध्ये पब्लिक वर्क्स खात्यामार्फत एक अर्ज आला. माहे ३१ मार्च किंवा ३० सप्टेंबर १९०८ अखेर जर कोणी पाणी दर भरला नसेल आणि पुढील महिन्यात पाणी मिळण्यासाठी जर एक महिन्याचा अधिक कर भरून अर्ज केला असेल, तर त्यास काही प्रमाणत दंड माफ करण्यात येईल व अर्जावर तसे माफ केल्याबाबत लिहून सादर केले म्हणजे दंड माफ होईल, अशा आशयाचा तो प्रस्ताव होता. मात्र त्या प्रस्तावाला महाराजांनी तीव्र नापसंती दर्शवून नियमात फेरफार करण्याचा अधिकार फक्त छत्रपतींचा आहे व असे अर्ज करण्यापूर्वी प्रथम मंजूरी घ्यावी, असे स्पष्ट मत त्यांनी दिलेले होते. त्यामुळे अशा प्रकारच्या पाणी दरात कोणतीही सवलत मिळणार नाही व नियमाप्रमाणे कोणीही त्यात ढवळाढवळ करू नये अशी ताकीदच महाराजांनी अप्रत्यक्षरित्या प्रशासनाला दिली होती.[७२]

७) पाण्यावरील सहामाही पद्धतीची कर आकारणी

कोल्हापूर शहरात कळंबे तलावातून लोकांना पाणी पुरवठा होत असे व त्यावर नियमानुसार कर आकारणी ही होत असे. परंतु, ती कर आकारणी ही आगावू पाणी पुरवठा करून नंतर सहा-सहा महिन्यांच्या टप्प्याने वसूल करण्याची पद्धत होती. ही पद्धत वसुलीसाठी खूपच त्रासदायक होती. यासाठी या पाणी कराच्या वसूली पद्धतीत सुरळीतपणा व नियमितीत आणावी या हेतूने शाहू महाराजांनी पूर्वीची पद्धत सन १९०९ मध्ये बंद केली. नवीन पद्धतीनुसार ज्यांना पाणी हवे असेल त्यांनी अगोदर सहा महिने पाण्याचा हशील द्यावा. त्याचा दाखला संबंधीत ऑफिसकडे दाखवावा, त्यानंतरच त्या व्यक्तीला पाणी मिळेल अन्यथा त्याचा पाणीपुरवठा बंद होईल असा ठराव मंजूर केला. तथापि, जर एखाद्या व्यक्तीने त्या काळात पाणी वापरले नाही, तर मात्र त्याला सहा महिन्यांनंतर त्याचे पैसे परत देण्याची तजवीजही महाराजांनी केली होती.[७३]

पर्यावरण रक्षणविषयक केलेले कार्य

राजर्षी शाहू महाराज हे नेहमीच भविष्याचा वेध घेऊन धोरणे आखणारे होते. दुष्काळ संकटावर तात्पुरत्या स्वरूपात मात करून ते थांबले नाहीत, तर भविष्यात असा दुष्काळ येऊ नये यासाठी त्यांनी शेती सुधारणा आणि शेती विकासावर ही तेवढाच भर दिला आणि स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. तथापि, या शेतीचा विकास जसा त्यात सुधारणा करण्यावर अवलंबून होता त्याहीपेक्षा शेतीला कायम योग्य जलस्त्रोत मिळण्यावर अधिक अवलंबून होता. जलसंवर्धन व नवीन पाणीसाठे तयार करण्याबरोबरच त्यात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून जलस्त्रोतावर परिणाम करणाऱ्या घटकांकडेही विशेष लक्ष दिले होते. असाच एक घटक म्हणजे अवतीभवती असणारी झाडे झुडपे, जंगल यांच्या सहभागाने बनलेले सभोवतालचे पर्यावरण!

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जपवणुकीमध्ये पर्यावरण समतोल राखणे अतिशय महत्त्वाचे असते. हे काम निसर्ग आपल्या परीने व्यवस्थितरीत्या करत असतो. मात्र त्यात मानवी हस्तक्षेपामुळे बाधा येते. त्यामुळे आपल्या दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या साधनसंपत्तीचा वापर करताना निसर्गात कमीत कमी हस्तक्षेप करायला हवा.

पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढवण्यासह जलस्रोत समृद्ध करण्यात झाडे ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे त्यांची जपणूक व संवर्धन करणे हे भविष्याच्या दृष्टीने गरजेचे असते. त्यासाठी स्थानिक स्तरापासून काम करण्याची गरज लक्षात घेऊन महाराजांनी पर्यावरण रक्षणासंदर्भात अनेक ठराव मंजूर करून संस्थानातील वृक्षसंपदेचे रक्षण करण्याचे कार्य देखील केलेले आढळते.

१) रस्त्याच्या कडेची झाडे तोडल्याबद्दल दिलेली समज

पर्यावरणाचा समतोल साधावा यासाठी संस्थानात विविध ठिकाणी झाडे लावण्याबाबत महाराज नेहमीच आग्रही होते. त्यासाठी ते सरकारातून मदत करत असत. परंतु अशी सार्वजनिक वृक्षतोडीवर मात्र कडक कारवाईदेखील करण्यात येत असे. बावडे या गावी तिथल्या स्थानिक लोकांनी गावाच्या रस्त्याच्या कडेची झाडे तोडल्याचे समजले. ते प्रकरण महाराजांकडे

आल्यावर झाडे तोडण्याच्या गुन्ह्यासाठी त्यांना शिक्षा होणे व त्यांच्याकडून सदरची नुकसान भरपाई सुद्धा घेणे योग्य ठरेल, असे त्यांचे मत होते; परंतु त्या वर्षी इलाक्यात दुष्काळ व प्लेग असल्याने अगोदरच लोकांची अवस्था बिकट झाली असल्याने जगण्यासाठी त्यांनी असे काही केले असावे हे जाणून त्यांना एकदा माफ करण्याचा महाराजांनी निर्णय घेतला. परंतु जर पुन्हा अशाप्रकारे झाडांचे नुकसान केले, तर त्यांच्यावर दया न दाखवता नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, याचे त्यांनी भान ठेवावे अशी ताकीद त्यांनी त्याचवेळी दिली होती. यावरून परिस्थिती जरी हालाखीची असली तरी निसर्गाची हानी होऊ न देणे हे आपलेच कर्तव्य आहे हे या आदेशावरून त्यांनी दाखवून दिले होते.[७४]

२) जनावरांसाठी झाडांची खास योजना

वृक्षतोडीला महाराजांचा आवश्यक तेथे विरोध जरी असला, तरी जनावरांच्या पोषणाची गैरसाय होऊ नये म्हणून त्यांचेसाठी स्वतंत्रपणे व्यवस्था ही ते करत असत. जनावरांमुळे इतर भागातील झाडांचे नुकसान ही होणार नाही व त्यांचे पोषण ही चांगले होईल यासाठी काही भागातील झाडे केवळ जनावरांसाठीच असतील याची काळजी घेतलेली होती.

भुदरगड पेठ्यातील वाकीखोल, दाजीपूर वगैरे या गावांच्या भागात काही राखीव जागा घेऊन त्यात माडाच्या झाडांची लागवड केलेली होती, ही झाडे त्यांनी खास हत्तींसाठी राखून ठेवली होती. त्यामुळे ती झाडे चांगली राहण्याबाबत फॉरेस्ट ऑफिसर व भुदरगड मामलेदार व भागातील महालकर यांना बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश महाराजांनी दिले होते.[७५]

राधानगरीत सरकारी हत्ती ठेवल्यामुळे त्यांच्या खाण्यासाठी भुदरगड पेटयातील गंगापूर, सुरूपली, व वाळवे या गावांतील काळ्या गवताची कुरणे खास हत्तींसाठी खाजगीकडील म्हणून सरकारात दाखल करून घेतले.[७६]

३) जनावरांसाठी झाडे तोडू नये म्हणून ताकीद

जनावरांच्या पोषणासाठी काही वेळा राखीव भाग असला तरी सर्वसाधारण लोक आपल्या जनावरांसाठी रस्त्यावरील झाडे तोडून नेत. त्यातही विशेष करून जे फिरतीचे लोक असतात ते ज्या ठिकाणी वस्ती करतात, त्या दरम्यान ते आसपासच्या झाडांचा उपयोग प्राण्यांसाठी

करतात. कोल्हापूर गगनबावडा मिरज रस्ता जेथे आहे, तेथे असेच उंटवाल्यांनी आपला पडाव टाकला होता व ते लोक त्याच ठिकाणच्या रस्त्यावरील झाडांच्या फांद्या त्यांच्या उंट वगैरे जनावरांसाठी तोडून नेत असत त्यामुळे तेथील त्यांची वस्ती उठवावी म्हणून जेव्हा महाराजांसमोर ही बाब आली, तेव्हा उंटवाले यास असे फांद्या न तोडण्याबद्दल सक्त ताकीद द्यावी, असा महाराजांनी आदेशच दिला होता.[७७] रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांचे रक्षण केलेचे पाहिजे ही भूमिका महाराजांनी घेतली होती.

४) रस्त्यावरील छायेसाठी झाडे न तोडण्याबाबत

शहरातील कळंबे तलावाचे पाणी मुख्यत्वे संपूर्ण शहराला पुरविण्यात येत असे आणि ते ज्या पाटाने पुढे जायचे त्याच पाटात नेमके काही झाडांच्या मुळ्या येत असल्याने अडचण झाली होती. तेव्हा ही झाडेच तोडून टाकावी लागणार होती. परंतु यावर संस्थानाचे दिवाण यांनी एक अत्यंत चांगल्या उपायाची शिफारस केली, ती म्हणजे झाडे जवळच असल्याने त्यांच्या मुळ्या अशाही पाटात येणारच आहेत, तेव्हा ती तोडून टाकण्यापेक्षा त्यांना लोखंडी नळ्या घातल्या तर पाणीही घाण होणार नाही. ही अभिनव कल्पना महाराजांना खूपच आवडल्याने त्यांनी त्या कामास तात्काळ मंजुरी देऊन झाड आणि तलावाचे पाणी या दोन्ही बाबींचा समन्वय साधला.[७८]

५) झाडे लावण्यासाठी आर्थिक तरतूद

पर्यावरण चांगले रहावे म्हणून असलेल्या वृक्षांचे रक्षण करण्याबरोबरच नवीन झाडे लावण्यावरही महाराजांनी विशेष भर दिलेला होता व बहुतेकवेळा त्यासाठी आर्थिक तरतूद सरकारी तिजोरीतून केली. हे खालील काही उदाहरणे पाहिल्यावर लगेच कळून येते.

- वाडी रत्नागिरी हे एक धार्मिक स्थान कोल्हापूरात असल्याने तेथे झाडे लावण्यासाठी रुपये २०७ मंजूर केले होते.[७९]
- रजपुतवाडी या भागात तेथे असणाऱ्या माळावर खड्डे काढून झाडे लावण्याचे काम झालेले होते. त्या खर्चासाठी आलेल्या एकूण ६८७ रुपये ८ आणे व २ पैसे इतक्या रकमेस मंजूरी दिली होती.[८०]

- शाहू महाराज हे अभिवन प्रयोग करण्याला नेहमीच प्रोत्साहन देत असत. असेच एक नवीन झाड जे 'रेडेडोहात बच्चा' या नावाने ओळखले जायचे. त्यांची झाडे लावण्यासाठी त्यांनी २९७ रुपयांचे स्पेशल मदत जाहिर केली होती.[८१]

६) रस्त्याच्या बाजूच्या झाडांचे रक्षण करणे

संस्थानातील रस्त्याच्या कडेला असणारी झाडे ही संस्थानाची वृक्षसंपत्ती असल्याने त्यांचे रक्षण हे तिथल्या प्रत्येक लोकांचे कर्तव्य आहे, हे महाराजांनी वेळोवेळी नमूद केले होते. बावडी गावच्या गावकऱ्यांनाही त्यांनी अशी झाडे तोडण्यावरून सक्त ताकीद दिली होती. परंतू तरीही काही घटना घडत असल्यामुळे त्याबद्दल अधिक जबाबदरीने वागण्याच्या उद्देशाने महाराजांनी एक ठरावच पास करून आपापल्या गावाच्या हद्दीत असलेल्या झाडांचे रक्षण हे त्या गावकऱ्यांनी व संबंधीत तालुक्याच्या अधिकाऱ्यांनी लक्षपूर्वक करावे व यामध्ये काही अफरातफर झाली तर संबंधित व्यक्तीला जबाबदार ठरविण्यात येईल, अशी आज्ञाच त्यांनी दिली.[८२] सार्वजनिक जागांवरील झाडांचे रक्षण करणे ही जबाबदारी सरकारबरोबरच जनतेचीही आहे, हे स्पष्ट केले होते.

७) झाडांचे नुकसान होऊ नये म्हणून घेतलेली खबरदारी

जेथे झाडांना जपणे शक्य होते, तेथे महाराजांनी त्यांच्यासाठी उपाय करून त्यांचे रक्षण होईल असे ठराव मंजूर केलेले होते. पोरले थट्टी याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना गवत कामासाठी त्यांच्या ताब्यात बोरगावमधल्या गावची राने देण्याबाबतचा हुकूम पूर्वी दिलेला होता. त्यामुळे तेथे त्या रानांचा लिलावही झाला पण त्या ठिकाणी काही मौल्यवान झाडे लावलेली होती. शिवाय तेथे नर्सरी व वृक्षारोपणही केलेले होते. अशा वेळी या कामामुळे त्या झाडांचे नुकसान होण्याचा संभव लक्षात घेऊन छत्रपतींनी ते रान फक्त गवतापुरतेच कामगारांना देण्यात यावे आणि काम करताना त्या रानाच्या आतील झाडांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी असे सांगितले आणि नुकसान झाले तर ते त्या कामगारांकडूनच वसूल केले जाईल, असे आदेशही दिले. झाडांचे जास्त नुकसान होऊ नये म्हणून त्या रानाचा झालेला लिलावही रद्द केला होता यातून त्यांनी रयतेचे ही सोय केली व संस्थानातील मौल्यवान अशा झाडांचे नुकसान होणार नाही हे ही पाहिले.[८३]

८) झाडांना पाणी घालण्यासाठी आर्थिक मदत

झाडे लावणे किंवा त्यांची तोड होऊ न देणे या गोष्टींबरोबरच जी झाडे अगोदरच लावलेली आहेत, ती चांगली जगावी म्हणून विशेष काळजी घेणेही आवश्यक होते. त्यासाठीसुद्धा महाराजांनी आपल्या संस्थानात लावलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी योग्य व्यवस्था करून काही रक्कमही त्यावर खर्च केलेली होती. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

- एजन्सी कम्पाऊंडमध्ये काही झाडे लावली होती. त्यांना वेळेवर पाणी घालण्यासाठी १९०४ च्या वार्षिक बजेटमध्ये १ हजार रुपयांच्या तरतुदीला मंजुरीही दिलेली होती. पण पुढे तो खर्च तेवढ्यावरच न राहता १६२४ रुपये १५ आणे ७ पैसे इतका वाढला. हा जास्तीचा खर्च रुपये ६२४.१५. ४ ला महाराजांनी मंजुरी देऊन प्रसंगी वाढीव खर्च सुद्धा सहन करून झाडांची काळजी घेण्याकडे कल दाखवला.[८४]

- वाडी रत्नागिरी या ज्योतिबा देवस्थानाच्या एका भागात झाडे लावली होती. त्यांना जगवण्यासाठी पाणी घालण्याच्या कामावर १९०७ मध्ये झालेल्या ८७ रुपये एवढया खर्चास मंजूरी शाहू महाराजांनी दिली.[८५]

- पन्हाळा कच्चे वहिवाटी येथील बागांमध्ये लावलेल्या झाडांना पाणी घालण्यासाठी १३०० फ. या वर्षात ७६६ रुपये ६ आणे ३ पैसे एवढा झालेला खर्च बागेच्या उत्पन्नातून देण्यास सहमती दर्शवली होती.[८६]

- वाडी रत्नागिरी या देवस्थानाकडे नेहमीच यात्रेकरू व वाटसरू येत असतात. त्यांना झाडांच्या सावलीत बसता यावे म्हणून तेथे लावलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी रू. १५३.५.२ एवढया खर्चास सन १९१० मध्ये मान्यता दिलेली होती.[८७]

९) झाडांना पाणी घालण्यासाठी जनावरांचा उपयोग

काही सार्वजनिक जागांवरील झाडांना जगवण्यासाठी सरकारमार्फत पाणी घालण्याचे शाहू महाराजांचे आदेश होते. त्यानुसार राज्यात जेथे सरकारी हुकूमावरून झाडे लावली आहेत त्यांना पाणी देण्याची स्वतंत्र सोय केलेली होती. त्यात महत्त्वाचे म्हणजे या कामासाठी लागणारे

पशुधन खरेदी करण्यासाठीही महाराजांनी खास आर्थिक तरतूद केल्याचे दिसून येते. वाडी रत्नागिरी येथे जी झाडे लावली होती, त्यांना पाणी घालण्याच्या कामासाठी एका रेड्याची व्यवस्था केली होती. तो जेव्हा काम करेनासा झाला, तेव्हा त्याला विकून नवीन रेडा या कामासाठी घेण्यासाठी ३५ रु. खर्च केले होते.

१०) जंगल संवर्धनासाठी केलेले उपाय

कोल्हापूर संस्थानातील काही परिसर हा जंगलव्याप्त असून, तेथील वातावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जलस्त्रोत वाढीसाठी आवश्यक तेथे झाडे लावणे व ती वाढवणे याबरोबरच नैसर्गिकरीत्या लाभलेल्या या जंगलभागांचे संरक्षण, संवर्धन करून त्या क्षेत्राची वृद्धी करण्याची गरज लक्षात घेऊन महाराजांनी काही खास आदेश पारित केले होते.

- संस्थानातील पन्हाळा पेट्यामधील कोलीक, वासी, पडसाळी, गाटणे व मानवाड हा भाग म्हणजे घाट माथ्यापासून पाच मैलांच्या आतील प्रदेश. या पाच मैलाच्या आतील असलेली सर्व वस्ती उठवून त्यातील सर्व जमीन सरकार हक्कात घेऊन तो भाग राखीव जंगलात सामील करण्याबाबतचा मोठा ठराव पास केला होता. त्या ठरावातील तरतुदी पुढीलप्रमाणेः

  पन्हाळा पेट्यात खुद्द महाराजांनी भेट दिली असता, तेथील काही भागांत चांगली जंगले असल्याचे त्यांनी निरीक्षण केले होते. त्यात वाढ करून त्यातीला काही भाग राखीव जंगलात समाविष्ट करण्याचा विचार महाराजांचा होता. त्यासाठी मग तेथील आसपासची वस्ती उठवून तो भाग ताब्यात घ्यावा लागेल, अशी तिथल्या फॉरेस्ट ऑफिसरने सूचना केली होती. त्यानुसार मग तशी योजना करण्यासाठी वरील ठरावाला महाराजांनी मंजूरी दिली. संबंधीत जमीन ताब्यात घेऊन त्याचा एक ब्लॉक तयार करावा तसेच ज्या लोकांची जमीन घेतली जाईल त्या लोकांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला द्यावा, ही सूचना केली. मात्र त्या जमिनीवर सरकारने झाडे तोडण्यास मनाई केलेली होती. अशा झाडांमध्ये हिरडीसह अनेक प्रकारच्या झाडांचा समावेश असून, त्यावर मात्र सरकारचा हक्क राहील व बाकीच्या झाडांवर मूळ लोकांचा हक्क राहील, ही अट ठेवली होती. या कामासाठी महाराजांनी फॉरेस्ट ऑफिसरसोबत मोजणी कारकून,

शिपाई हुद्देदार, व गडकरी इत्यादी मदतनीसांची नेमणूक करून तेथील कामाची व्यवस्था नीट करण्याचे हुकुम दिले होते.[८८]

- मौजे नौकुडा पेटा गडहिंग्लज येथील सर्वे नंबर २०२ व जमीन नंबर २७.३० ही जागा गायरानाकडील काही कामासाठी देण्याबाबत अगोदर आज्ञा केली होती. परंतु, या जागेत प्लांटेशन केले असून, बरीच झाडे आहेत व अशी जमीन तिकडे दिल्यास जंगलाचे नुकसान होईल. ही बाब निदर्शनास आल्यावर जमीन जंगलाकडेच ठेवण्याबाबत राजांनी नंतर ठराव मंजूर केला. यामुळे झाडांचेही नुकसान झाले नाही व जंगलाचाही भाग सुरक्षित झाला होता.[८९]

- कोलिक या ठिकाणाच्या जंगलात काही भाग समाविष्ट करावयाचा होता, पण त्यामूळे तेथे असलेल्या वाशी या गावातील काही जणांची घरे जात होती. तेव्हा त्यांना त्यासाठी मोबदला म्हणून ६९४ रुपये देण्यात येऊन जागा जंगलात घेतली.[९०]

- याच कोलिक ठिकाणाच्या जंगल भागाजवळ दुसरे एक गाव पडसाळी म्हणून होते. त्या गावाची घरे ही जंगलाच्या भागात येत होती. तेव्हा त्या गावच्या लोकांना त्यांच्या घरांसाठी २०८ रुपयांचा निधी मंजूर करून त्यांना योग्य मोबदला दिला.[९१]

- जंगलातील आसपासच्या गावातील लोक त्यांच्या चरितार्थ वा अन्य कामासाठी बऱ्याचदा जंगलातून लाकडे तोडून नेत असत. तथापि, त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण नसल्यामुळे कोणीही कधीही लाकडे घेऊन जाऊ शकत होते. याला प्रतिबंध करण्यासाठी पास व्यवस्था केली. पास असेल तरच लाकडे नेऊ द्यावीत, पास नसेल तर नेऊ देऊ नये असे केल्याने तेथील जंगलाचे नुकसान होणार नाही. अशा अटी असलेला महत्त्वाचा हुकूम दि. २७/२/१९१२ ला महाराजांनी केलेला होता. [९२]

११) वणवा लागू नये यासाठीचे उपाय

जंगलांची सुरक्षितता ही तेथील जंगल अधिकारी व आसपास राहणारे लोक यांच्यावर अवलंबून असते. त्यांच्या दुर्लक्षामुळे बहुतेक वेळा जंगलाची सुरक्षितता धोक्यात येणारे प्रसंग येतात व पर्यायाने जंगलांचा भाग कमी होऊन नुकसान होते. ही एक पर्यावरणीय हानीच आहे. त्यामुळे

जंगलांचा भाग सुरक्षित ठेवण्यासाठी व वणवे लागण्यावर प्रतिबंध करण्यासाठी संबंधितांकडूनच रक्कम वसूल करावी, असे स्पष्ट आदेश छत्रपती शाहूंनी दिले होते.[९३]

जलव्यवस्थापनाचा एक भाग म्हणून झाडे, झुडपे, जंगल यांच्या अनुषंगाने काम करताना प्रसंगी कठोर कायदे करून पर्यावरण रक्षणविषयक त्यांनी केलेले कार्य आजही तेवढेच मार्गदर्शक ठरते.

राधानगरी धरण

१) राधानगरी धरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

आधुनिक दृष्टी असलेल्या राजर्षींनी संस्थानाचा राज्यकारभार हाती घेतल्यावर दुष्काळसंबंधीत आढावा घेताना संस्थानामध्ये ठिकठिकाणी स्वत: जाऊन पाहणी करून तत्कालीन सर्व परिस्थितीचा आढावा घेतला. तेव्हा त्यांना आपल्या संस्थानातील बहुतांश भागातील जनता दारिद्र्यावस्थेत खितपत पडल्याचे दिसून आले. जास्तीत जास्त शेती ही कोरडवाहू असून तीसुद्धा पारंपरिक पद्धतीने कसत असल्याचे दिसून आले. त्यातच पाण्याचा पुरवठा हा म्हणावा तसा पुरेसा नव्हता आणि अनियमीत पावसामुळे तर त्या कमतरतेत अधिकच भर पडायची. त्यामुळे विविध ठिकाणी ग्रामीण भाग दुष्काळासारख्या संकटात होरपळत होता.

तत्कालीन परिस्थितीत मानवी क्षमतेच्या पलीकडील या संकटाखाली दबल्याने इथली माणसे पूर्णतः हतबल आणि कमकुवत झाली आहेत. सिंचन सुविधेअभावी पारंपरिक पिकांऐवजी इतर अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड शक्य नाही आणि आधुनिक शेतीचे प्रयोग करण्यासाठी भांडवल उपलब्ध नाही, या दुहेरी कात्रीत इथला शेती करणारा समुदाय अडकला आहे, हे सर्व वास्तव महाराजांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले. संस्थानातच नाही, तर देशातील विविध प्रांतातील ग्रामीण भागाची अशी स्थिती होती, तरीही ब्रिटिश सरकारकडून या परिस्थितीत दिलासा मिळत नव्हता. परिणामी, अनेकांची उपासमार होऊन त्यांना आपल्या प्राणाला मुकावे लागले. कोल्हापूर संस्थानात मात्र ही परिस्थिती बदलण्यासाठी व दुष्काळाचे कायमस्वरूपी निर्दालन करण्यासाठी काही दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे, हे महाराजांनी ओळखले. तत्कालीन परिस्थितीत तग धरून राहण्यासाठी नागरिकांना तात्काळ काही मदत करणे गरजेचे आहे, हे ही त्यांनी लक्षात घेतले. दुष्काळाच्या काळात खचत असलेल्या रयतेला

पहिल्यांदा मानसिक आधार देण्याचे काम शासन वर्गाचे असते या भूमिकेतून त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. पण संस्थान कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची खूणगाठ महाराजांनी आपल्या मनाशी पक्की केली होती.

महाराज मुळातच जे जे चांगले, ते ते आत्मसात करत असत. आधुनिकतेकडे जाण्याचे व अभिनव प्रयोग करण्याकडे त्यांची दृष्टी होती. त्याचाच भाग म्हणून त्यांनी संस्थानातील पाण्याचा इरिगेशनसाठी मोठा हातभार आहे, हे ओळखून तो भागच पूर्णपणे स्वतंत्र केला. हा प्रयोग खरोखरच अभिनव आणि आधुनिकतेची गरज ओळखून अंमलात आणला होता. या स्वतंत्र पाटबंधारे खात्याद्वारे त्यांनी विविध पातळीवरील पाण्याच्या संबंधाने माहिती गोळा केली. त्यातून निघणाऱ्या जमिनीच्या उप्तन्नाचा अहवाल मागवला होता व त्या इरिगेशन विभागामार्फत काही योजना कार्यान्वित करण्याचे कामही त्या पातळीवर सुरू केलेले होते. त्याच दरम्यान जून १९०२ ते ऑगस्ट १९०२ या तीन महिन्यांच्या काळात त्यांना परदेशात जाण्याचा योग आला होता. त्या परदेश दौऱ्यात त्यांनी इंग्लंड, इटली सारख्या देशात केवळ सहलच केली नाही तर तेथे असलेले तलाव व कालवे यांचे निरीक्षण केले.

या प्रगत देशांनी केलेल्या आधुनिक सिंचनव्यवस्थेमुळे त्या प्रदेशांचा झालेला विकास, प्रदेशाची सुपीकता, तर पाहिलीच पण मर्यादीत नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही अल्प असलेल्या प्रत्येक गोष्टींचा तेथील लोकांनी विचारपूर्वक नियोजन करून वापर केला हे महाराजांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान अनुभवले. आपल्या राज्यात दुष्काळनिर्मुलनासाठी व शेतकऱ्यास सुखसमृद्धी होईल, असे मोठे धरण बांधण्याचे बळ महाराजांना तेथेच मिळाले.[१४]

परदेश दौऱ्याहून परत कोल्हापूरला आल्यानंतर त्यांनी धरणाच्या उभारणीसाठी सतत विचार सुरू ठेवला. त्यासाठी प्रथम भौगोलिक आढावा घेतला व बांधकामाच्या दृष्टीने मुंबई सरकार व तज्ज्ञ यांचेशी पत्रव्यवहार करावयास सुरुवात केली. मुंबई सरकारने सुद्धा महाराजांची तळमळ बघून स्वत:चे जागतिक किर्तीचे अभियंते विश्वेश्वरय्या यांना पाठवले होते. त्यांनी दिलेल्या अहवालातून समजते की, एवढ्या मोठ्या धरणाची योजना सुरू करून ती प्रत्यक्षात आणण्यासाठी कोल्हापूर संस्थान जरी इतरांच्या मानाने खूप श्रीमंत नसले, तरी दुष्काळाला घालवण्यासाठी केव्हातरी असे धरण बांधणे गरजेचेच होते.[१५]

मोठ्या आकाराच्या धरण बांधकाम प्रकल्पासाठी धोरणकर्त्यांकडे दुर्दम्य इच्छाशक्ती तर लागतेच पण त्यासाठी लागणारे मनुष्यबळ व सतत होणारा आर्थिक खर्च याचासुद्धा विचार करावा लागतो. पण आपण हे धरण बांधायचेच हा प्रबळ निर्धार करूनच महाराजांनी या धरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेताना काही उद्दिष्टे निश्चित केलेली होती. या धरणामुळे शेतीला पाणीपुरवठा होऊ शकतो, त्याचबरोबर येथील लागवडीखालील मोठे क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते. तसेच शेती पाण्याखाली आल्यानंतर अत्याधुनिक पद्धतीची पिके घेण्यासाठी मुभा उपलब्ध होऊ शकते. याशिवाय पाण्यासाठी नागरिकांची होणारी वणवण थांबवता येऊ शकते व मुख्य म्हणजे संस्थानातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवता येऊ शकतो. यानंतर आपोआपच औद्योगिक क्षेत्राची वाढ, वीज निर्मिती या गोष्टी ही साध्य होतील.

संस्थानात धरणाचे उभारणीचे निश्चित झाल्यानंतर महाराजांनी धरण कुठे बांधता येऊ शकेल, त्यासाठी लागणारा आर्थिक खर्च, करावी लागणारी गुंतवणूक, त्याचा तिजोरीवर येणारा ताण अशा सर्व बाबींचा तपशीलवार अभ्यास केला. धरणासाठी योग्य जागा निवडण्यासाठी संस्थानातील विविध नद्यांच्या उगमापासून ते संगमापर्यंतच्या सर्व ठिकाणांचा बारकाईने अभ्यास केला. मोठ्या नद्यांपैकी कोणत्या नदीवर बांध बांधला, तर त्याचे काय परिणाम होऊ शकतात, किती क्षेत्र पाण्याखाली जाऊ शकेल, याचाही त्यांनी तपशीलवार आढावा घेतला. त्यासाठी एखाद्या लहान नदीवर प्रयोग म्हणून ते अडवून त्याच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी १९०७ मध्ये कोल्हापूरपासून पश्चिमेकडे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या फेजिवडे गावाच्या परिसरात भोगवती नदीला बांध घालून पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग हाती घेतला.

या प्रयोगाच्या यशस्वितेतून महाराजांनी राधानगरी धरणाचे काम निश्चितच केले आणि या मोठ्या धरणासाठी त्यांनी वेगाने जागेचा शोध घेण्यास सुरुवात केली. मोठे धरण हे अत्याधुनिक पद्धतीचे असले पाहिजे, पण त्यासोबतच निवडण्यात येणारी जागा हीसुद्धा महत्त्वाची आहे, कमीतकमी खर्चात जास्तीत जास्त ओलिताखाली येणारी जमीन, अशी जागा त्यांनी दाजीपूर येथे फेजीवडे या गावाजवळ भोगावती नदीवर अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्या सल्याने निश्चित केली.

संस्थानातून सेवानिवृत्त होऊन गेलेल्या कर्नल फेरीस इंग्रज अधिकाऱ्याला राधानगरी धरणाच्या बाबतीत लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात की, ''Since you left us I build about २० tank, but my ambitious was not satisfied. So I have taker up now a big irrigation scheme, and the tank would be e biggest in India. I spend all my energy on it. Now Bapusaheb and myself are working on the site I only wish that it make prove a success.[९६]

२) राधानगरी धरणाच्या बांधकामाचा प्राथमिक टप्पा

या धरणाचे 'श्री महाराणी लक्ष्मीबाई तलाव' असे नामकरण करून सन १९०९ च्या दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर धरणाच्या बांधकामाचे उद्घाटन महाराणी लक्ष्मीबाई यांच्या हस्ते केले. धरणाच्या बांधकामासाठी वेळोवेळी आराखडा तयार करणे, धरणाचे काम किती दिवसांमध्ये पूर्ण करता येईल यासाठी वेळीच चौकट निश्चित करणे, यासाठी लागणाऱ्या आर्थिक खर्चाची तरतूद करणे, अशा विविध कामांच्या तपशीलाची माहिती महाराज करून घेत होते. या कामासाठी मि. गुप्ते व सुपरवायझर मि. मित्तल यांची नेमणूक केली होती.[९७] तलावाच्या कामाची देखरेख डायरेक्टर म्हणून शाहू महाराजांचे भाऊ बापूसाहेब महाराज यांची नेमणूक केली होती. यावरून हे काम किती महत्त्वाचे होते हे कळते.

बांधकामास चांगल्या प्रतीचे दगड आवश्यक असतात. पहिल्या वर्षांमध्ये प्रामुख्याने काही ठिकाणी दगडाच्या खाणी सुरू करण्याची योजना आखली होती. या दगडाच्या खाणीतून निघणारे चांगल्या प्रतीचे दगड राधानगरीसाठी उपलब्ध झाले. त्यानंतर या दगडाला छोटासा रेल तयार करण्याचे काम सुरू झाले. बांधकाम करायचे असेल, तर वाळू आणि सिमेंटची आवश्यकता होती. त्यासाठी महाराजांनी विविध ठिकाणी वाळूचे आणि सिमेंटचे साठे करून ठेवण्याचे आदेश दिले होते. माल वाहतुकीसाठी तात्पुरती रेल्वेची सोय केली. प्राथमिक टप्प्यामध्ये धरण बांधकामासाठी २००० मजूर कार्यरत होते. या टप्प्यावरील विविध कामांवर महाराज जातीने लक्ष देत होते.

१९०७ पासून सुरू झालेल्या धरणाचे आरंभीच्या या टप्प्यातील बरचेसे काम १९१२-१३ पर्यंत पूर्ण झाले होते. दोन हजार कामगार, इंजिनियर, स्थानिक शेतकरी सहभागाने व विविध इंग्रज अधिकारी यांच्या सल्लामसलतीतून प्राथमिक कामाचा टप्पा पूर्ण झाला होता. १९१२-१३ पर्यंत

या धरण बांधकामासाठी जवळपास ४,८६,१०७ रुपये खर्च झाले होते. धरणाचे एकूण बांधकाम ४,१०,५७७ इतके घनफूट पूर्ण झाले होते. १९०७ पासून काम करत असलेल्या कामगारांची संख्या २००० इतकी होती, ती १९१२ –१३ पर्यंत ३,१०० पर्यंत पोहोचली होती.[९८]

३) राधानगरी धरणाचा दुसरा टप्पा

राधानगरी धरणाचा दुसरा टप्पा हा धरणाच्या बांधकामासाठी एक महत्त्वाचा टप्पा होता. या कालावधीमध्ये त्या कामात प्रगती दिसू लागली होती. महाराजांनी रात्रंदिवस मेहनत घेऊन या धरणाच्या बांधकामावर लक्ष केंद्रीत केले होते. या धरणाला आवश्यक असणाऱ्या खर्चाची, आखणी, तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली होती. या कालावधीमध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामासाठी कामगार संख्येतही वाढ करून अकराशे कामगार आणखीन वाढविण्यात असल्याने १९१३–१४ दरम्यान ३१०० कामगार कार्यरत होते. कामगारांना वेतन देण्यासाठी संस्थानाच्या तिजोरीतून मोठ्या रकमेची तरतूदही करण्यात आली होती.

१९१३ –१४ मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामाचा खर्च २,०७,९६७ इतका करण्यात आला. म्हणजे आता जवळपास पूर्वीचा खर्च आणि आताचा खर्च मिळून ६,९४,०७६ रुपये इतका झाला होता. हा सर्व खर्च राज्याच्या तिजोरीतून केलेला होता. यावर्षी ९,१२,९७७ इतके घनफूट बांधकाम पूर्ण झाले होते. सुरुवातीपासून ते आत्तापर्यंत जवळपास २४,५४,५८९ इतके घनफूट बांधकाम पूर्ण करण्यात आले होते. या कामाचा वाढता आवाका बघून नामवंत अभियंता पी.बी. जगताप यांचीसुद्धा नेमणूक करण्यात आली होती. राधानगरी धरणाचे बांधकाम हे आपल्या आयुष्याचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट महाराजांनी ठेवले होते.

संस्थानातील शेतीला आधुनिकतेची जोड द्यायची असेल, तर पाण्याची व सिंचनाची सुविधा आवश्यकता आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत राधानगरी धरणाच्या खर्चात कपात करू नये, असा महाराजांनी दंडक घालून दिला होता. पुढे पुढे तर या धरणाचा खर्च वाढतच चालला होता. सन १९१६–१७ या वर्षात जवळपास २,२५,२१९ इतका खर्च करण्यात आला होता. या वर्षामध्ये जवळपास ६,००,००० इतके घनफूट काम पूर्ण केले गेले होते. संस्थानाचे १९१६–१७ मधील प्रशासकीय अहवाल पाहिले असता धरण बांधणी कामाच्या पूर्णत्वासाठी संस्थानाच्या तिजोरीतून भरीव तरतूद करण्यात आल्याचे लक्षात येते. त्या वर्षी १,८३,७४०

रुपये इतका खर्च करण्यात आला होता. परिणामतः त्या वर्षीचे बांधकाम ५,०९, ३०० इतके घनफूट वार्षिक बांधकाम झालेले होते.[९९] धरणाच्या बांधकामाचा खर्च व त्या माध्यमातून धरणाच्या बांधकामाची खोलीसुद्धा वाढल्याचे आपणाला दिसते. त्याची प्रगती खालील तक्त्यावरून निदर्शनास येते.

वर्ष	वर्षातील बांधकाम घनफूट	एकूण बांधकाम घनफूट	वर्षातील खर्च रुपयांमध्ये	एकूण खर्च रुपयांमध्ये	कामगार
१९११–१२	२,५२,७००	८,६६,४००	१२९,१७३	माहिती अनुपल्ब्ध	३१००
१९१२–१३	४,१०,५७७	१५,४१,६१२	१,४७,०६७	४,८६,१०७	३१००
१९१३–१४	९१२९७७	२४,५४,५८९	२,०७,९६८	६,९४,०७६	३१००
१९१४–१५	७,६१,०००	३२,१५,५८९	१,९९,१६७	८,९३,२४३	३१००
१९१५–१६	६,००,०००	३८,१५,५८९	२,२५,२१९	११,१८,४६२	माहिती अनुपल्ब्ध
१९१६–१७	५,०९,३००	४३,२४,९००	१,८३,७०४	१३,०२,१६६	२०६०
१९१७–१८	६१,१२८	४३,८६,०२८	३३,९६४	१३,३६,१३०	माहिती अनुपल्ब्ध

(संदर्भः १९११–१२ ते १९१७–१८ पर्यंतचे संस्थानातील वार्षिक प्रशासकीय अहवाल)[१००]

भारताच्या इतिहासामध्ये इतक्या मोठ्या धरणाचे बांधकाम हाती घेऊन ज्या प्रकारे त्याच्या परिपूर्णतेसाठी प्रयत्न चालले होते ते बघून महाराजांची प्रजेबाबतची तळमळ किती होती हेच दिसते. संस्थानातील शेतीला सिंचनाखाली आणून शेती क्षेत्रात आमुलाग्र बदल होण्यास त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. जगाच्या इतिहासामध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आधुनिक पद्धतीने शेतीचा विकास व्हावा, प्रजेची पाण्याची काळजी कायमची मिटावी यासाठी

धोरणे आखून संस्थानाची तिजोरी रिती करणारा, दूरदृष्टी आणि आधुनिक दृष्टिकोन बाळगणारा शाहू महाराजांसारखा अन्य राजा विरळाच असल्याचे दिसून येते.

४) राधानगरी धरणाच्या बांधकामाचा शेवटचा टप्पा

शाहू महाराजांच्या काळात राधानगरी धरणाचे बांधकाम पूर्णत्वास जाऊ शकले नाही. दरम्यानच्याच काळात म्हणजेच १९१४-१५ नंतर पहिल्या महायुद्धाची सुरुवात झाली होती. पहिल्या महायुद्धात ब्रिटन सक्रिय सहभागी असल्याने त्यांच्या वसाहती असलेल्या देशांनाही त्यांनी महायुद्धात ओढले. भारतावर तत्कालीन परिस्थितीत ब्रिटिशांचा अंमल असल्याने भारतीय लोकांनाही पहिल्या महायुद्धात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार इथल्या विविध साधनसामग्रीचा, मनुष्यबळाचा वापर युद्धाच्या कामासाठी केला. इतर सर्व कल्याणकारी कामावरचा निधीही त्यांनी महायुद्धाच्या सामुग्रीसाठी वळवला. कोल्हापूर संस्थानावरही याचा परिणाम झाला होता. त्यांनाही तिकडे मदत करण्यासाठी चांगल्या योजनांवरील खर्च कमी करावा लागला. साहजिकच १९१७-१८ नंतर राधानगरीवरील खर्च कमी झाल्याचे तत्कालीन दस्ताऐवजावरून दिसून येते. त्यासोबतच महायुद्धामुळे तत्कालीन परिस्थितीमध्ये संस्थानात आर्थिक टंचाई निर्माण झाली होती. त्याचाच परिणाम म्हणून घाटनदेवी धरणाचेही काम अर्धवट राहिले.

तथापि, या कार्याचा जो शुभारंभ महाराजांनी घालून दिलेला होता तो त्यांच्या हयातीत संपूर्ण पूर्ण झाला नसला तरी त्यांचे नंतर त्यांचे सुपुत्र छत्रपती राजाराम महाराजांकडे जेव्हा संस्थानाचा राज्यकारभार आला. तेव्हा शाहू महाराजांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संस्थानाची सुत्रे हाती घेत असल्याचे राजाराम महाराज नमूद करतात, ते म्हणतात की, ''आमची सर्व प्रजा संतुष्ट राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे राज्याची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी अशी आमच्या परमपूज्य कैलासवासी तीर्थरूपांप्रमाणे आमचीही उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या सर्व लहानथोर, जागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार आदी करून तमाम प्रजाजनास शुद्ध अंतकरणापासून मोठ्या राजनिष्ठेने आम्हास साहाय्य करतील असा आम्हास पूर्ण भरवसा आहे. आमच्या परमपूज्य वडिलांनी ज्याप्रमाणे अहर्निष झटून प्रजाजनाचे कल्याण केले व प्रेम

संपादिले, तोच कित्ता गिरवण्याचे आमचा दृढनिश्चय आहे. ब्रिटिश साम्राज्याशी आमचे संबंध आजतागायत चालत आल्याप्रमाणे पूर्ण सख्यत्वाचे व निष्ठेचे राहतील. आमचे पवित्र कर्तव्य करण्यास आम्हास ईश्वरी साहाय्य व्हावे. आमची कारकीर्द दीर्घकाळापर्यंत चालून प्रजाजनास सर्व प्रकारचे सुखकर व्हावे, अशी आम्ही त्या जगन्नियंत्या परमात्म्याची अनन्यभावे प्रार्थना करितो.[१०१] आणि या वचनाला जागून राजाराम महाराजांनी राजर्षींचे मोठ्या धरणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांच्या इतकेच तळमळीने पुढे भरीव काम केले.

संदर्भसूची

१) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ५०८, ६३७-३८

२) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग-१ कोल्हापूर,, दि ८/२/१९०२, पृ. २२,

३) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग-१, दि. २/८/१९०२, कोल्हापूर, पृ.१८३,

४) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ५०३-५०९

५) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५६, ठराव क्र. १४५३, दि. ३१/५/१९०६, कोल्हापूर, पृ. १३३

६) हुजूर ऑफिस, ठराव बुक-५८, ठराव क्र.- ९८९, दि. १/४/१९०६, कोल्हापूर, पृ. २०५

७) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, दि. २५/६/१८९५, कोल्हापूर, पृ.१४४

८) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग-१, दि. ६/१२/१९०४, कोल्हापूर, पृ.३५३

९) हुजूर ऑफिस, ठराव बुक-६५, ठराव क्र. ४७३, दि. ३/१२/१९०७, कोल्हापूर, पृ. १४७

१०) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग–१, दि.२५/८/१९०९, कोल्हापूर, पृ १७५

११) हुजूर ऑफिस, ठराव बुक–१००, ठराव क्र.– ९, दि. ८/६/१९१२, कोल्हापूर, पृ. ५

१२) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१, दि.१/७/१९०५, कोल्हापूर, पृ १६७

१३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग–१, दि.२६/६/१९२०, कोल्हापूर, पृ १०२

१४) हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव क्र. ९१५, दि. २९/१/१९०६, कोल्हापूर.

१५) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ६५, ठराव क्र.– क्र ८६५, दि. ११/५/१९०८, कोल्हापूर.

१६) हुजूर ऑफिस, ठराव बुक, क्र. ४४, ठराव ८३९, दि. २८/४/१९०२, कोल्हापूर.

१७) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रं. ७६, ठराव क्र. ४९५, दि. ७/११/१९०९, कोल्हापूर.

१८) हुजूर ऑफिस, ठराव बुक नं ५८, ठराव ८६९, दि. १७/२/१९०६, कोल्हापूर.

१९) हुजूर ऑफिस, ठराव बुक ८९, कमेटी ठराव क्र. ९६३, दि. १९/४/१९१२, कोल्हापूर, पृ. ५२९.

२०) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ८२, ठराव क्र. ७३, दि.२७/७/१९१०, कोल्हापूर.

२१) हुजूर ऑफिस, ठराव बुक–३५, ठराव क्र.– ७२६, दि. ९/२/१९००, कोल्हापूर, पृ. १२५

२२) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ७१, ठराव क्र. २६४ दि. १२/९/१९०८, कोल्हापूर.

२३) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ६८, ठराव १०५३, दि. १७/३/१९०९, कोल्हापूर.

२४) हुजूर ऑफिस, ठराव क्र. ४०७, दिनांक २९/९/१९०९, कोल्हापूर.

२५) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ९८, ठराव क्रं. १५२, दि. १९/७/१९१२, कोल्हापूर.

२६) हुजूर ऑफिस ठराव बुक क्र. ८३, ठराव क्र. ११३३, दि. १२/५/१९११, कोल्हापूर.

२७) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १८,

२८) कित्ता, पृ. १२८

२९) हुजूर ऑफिस ठराव बुक क्र. ६८, ठराव ९२२, दि. २१/२/१९०९, कोल्हापूर.

३०) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव, (संपा.), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ६३

३१) हुजूर ऑफिस ठराव बुक ६७, दि. ५/७/१९०८, ठराव क्र. १३५, पान ६४, कोल्हापूर.

३२) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ८९, ठराव क्र. ९६५, दि. १९/४/१९१२, कोल्हापूर, पृ ५३०

३३) हुजूर ऑफिस, मुलकी खाते ठराव क्र. ५२७, दि. १५/१/१९१७, कोल्हापूर.

३४) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१ , दि. ११/९/१९२०, पृ.. १५१

३५) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ६५, ठराव क्र. ८५७, दि. ११/५/१९०८, कोल्हापूर.

३६) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ६६, ठराव क्र. ७३९, दि. १०/२/१९०८, कोल्हापूर.

३७) हुजूर ऑफिस, म्युनिसिपल कमेटी ठराव क्र.–९२ , दि. ६/७/१९०५, कोल्हापूर.

३८) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ९४, ठराव क्र. १२१८, दि. ३०/४/१९१२, कोल्हापूर.

३९) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ९४, ठराव क्र. १३५७, दि. ३०/५/१९१२, कोल्हापूर.

४०) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ७६, ठराव क्र. ५२, दि. ५/६/१९०९, कोल्हापूर.

४१) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ७६, ठराव क्र. ३०८, दि. १३/८/१९०९, कोल्हापूर.

४२) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ७७, ठराव क्र. ६९९, दि. १/१/१९१०, कोल्हापूर.

४३) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ७७, ठराव क्र. ९१०, दि. २४/२/१९१०, कोल्हापूर.

४४) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ८२, ठराव क्र. ५३०, दि. २७/१२/१९१०, कोल्हापूर.

४५) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ३९, ठराव क्र. ८४८, दि. ३१/१/१९०१, कोल्हापूर.

४६) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ४०, ठराव क्र. १०२८, दि. ३०/३/१९०१, कोल्हापूर.

४७) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ६८, ठराव क्र. ११४८, दि. १२/४/१९०९, कोल्हापूर.

४८) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ७१, ठराव क्र. ३७९ दि. ५/११/१९०८, कोल्हापूर.

४९) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ४७, ठराव क्र. ८१२, दि. १७/४/१९०३, कोल्हापूर.

५०) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१ , दि. १/३/१९१९, कोल्हापूर. पृ.. २६

५१) हुजूर ऑफिस, ठराव बुक–५८, ठराव क्र.– ८११, दि. ६/२/१९०६, कोल्हापूर, पृ. १३८

५२) हुजूर ऑफिस, ठराव बुक–५८, ठराव क्र.– ८५७, दि. १२/६/१९०६, कोल्हापूर, पृ. १५३

५३) हुजूर ऑफिस, ठराव बुक–८२, ठराव क्र.– ४४५, दि. १०/११/१९१०, कोल्हापूर, पृ. १५०

५४) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ९८, ठराव क्र. ६७, दि. १/७/१९१२ , कोल्हापूर.

५५) हुजूर ऑफिस, ठराव बुक–७१, ठराव क्र.– १९१, दि. २२/०८/१९०८, कोल्हापूर.

५६) हुजूर ऑफिस, ठराव बुक–९८, ठराव क्र.– ७३, दि. १/७/१९१२, कोल्हापूर.

५७) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. ७३

५८) हुजूर ऑफिस, ठराव बुक–९४, ठराव नं.१३२५, दि. २४/५/१९१२, कोल्हापूर.

५९) हुजूर ऑफिस, ठराव नं. ४३७, दि. ४/११/१९०८, कोल्हापूर.

६०) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. ७८

६१) हुजूर ऑफिस, ठराव नं. ८१८ ते ८२०, दि. २६/६/१९११, कोल्हापूर.

६२) हुजूर ऑफिस, ठराव नं. ८५३, दि. १६/३/१९१२, कोल्हापूर.

६३) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रं ६७, ठराव क्र. १३६दि. ४/७/१९०८, कोल्हापूर, पृ क्र. ६४.

६४) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१ , दि. १९/४/१९१३, कोल्हापूर, पृ.. ९०

६५) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १६६,

६६) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ७७, ठराव क्र. ११०८ दि. १९/५/१९१०, कोल्हापूर.

६७) हुजूर ऑफिस, करवीर सरकार गॅझेट, भाग–१, दि. १०/७/१९०९, कोल्हापूर, पृ. १३४

६८) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग–१, दि. ३/११/१९०६, कोल्हापूर, पृ. २४५

६९) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग–१, दि. १०/६/१९१६, कोल्हापूर, पृ. १६१

७०) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १ , दि. २७/२/१९०९, कोल्हापूर, पृ. ३८

७१) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१ , दि. २९/५/१९०९, कोल्हापूर, पृ १०९

७२) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. २४

७३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१ , दि. १९/१/१९०१, कोल्हापूर, पृ १०

७४) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ३५, ठराव क्र.–७९०, ,दि. २८/२/१९००, कोल्हापूर, पृ.–१७८.

७५) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ६६, ठराव क्र.–७५७, , दिनांक २६/२/१९०८, कोल्हापूर, पृ.–१६,

७६) हुजूर ऑफिस, ठराव बुक– ६७, ठराव क्र. ६८, दि. २०/६/१९०८, कोल्हापूर.

७७) हुजूर ऑफीस, ठराव बुक ७१, ठराव क्र. ६७०, दिनांक ४/१२/१९०८, कोल्हापूर, पृ. २१९.

७८) हुजूर ऑफीस, ठराव बुक– १०२, ठराव क्र. ६६८, दिनांक ५/२/१९१३, कोल्हापूर, पृ.–३०२.

७९) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ४९, ठराव क्र.१०८३, दिनांक २७/५/१९०४, कोल्हापूर, पृ.–२४६.

८०) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ७१, ठराव क्र. ४५९, दिनांक ५/११/१९०८, कोल्हापूर, पृ.–१४८.

८१) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ९२, ठराव क्र.१२४, दिनांक २७/६/१९११, कोल्हापूर, पृ.–४६.

८२) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ५०–अ, ठराव क्र. ४६१, दिनांक २७/१०/१९०३, कोल्हापूर, पृ.–३१.

८३) हुजूर ऑफीस, ठराव बुक ६७, ठराव क्र. ३२०, दिनांक २५/९/१९०८, कोल्हापूर, पृ. १४२

८४) हुजूर ऑफीस, ठराव बुक ५०–अ, ठराव क्र. ११३३, दिनांक ६/६/१९०४, कोल्हापूर, पृ. २७१.

८५) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ६३, ठराव क्र. ५२९, दिनांक ३/१२/१९०७, कोल्हापूर, पृ.–२१५.

८६) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ९८, ठराव क्र. २९३, दिनांक ७/९/१९१२, कोल्हापूर, पृ.–१३६.

८७) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्र. ८१, ठराव क्र. ४९३, दि. १६/१२/१९१०, कोल्हापूर,

८८) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ८४, ठराव क्र. ७२६, दिनांक १३/५/१९११, कोल्हापूर, पृ. –३१३.

८९) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ८४, ठराव क्र. ९१५, दिनांक २६/५/१९११, कोल्हापूर, पृ.– ४२९,

९०) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ८८, ठराव क्र. ५६३, दिनांक २२/११/१९११, कोल्हापूर, पृ.– ३४८.

९१) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ८८, ठराव क्र. ५६४, दिनांक २२/११/१९११, कोल्हापूर, पृ.– ३४८.

९२) हुजूर ऑफीस, ठराव बुक– ८८, ठराव क्र. ८०९, दिनांक २७/२/१९१२, कोल्हापूर,पृ.– ४५४.

९३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट भाग–१, दि. ६/१२/१९१९, कोल्हापूर, पृ. – २०१

९४) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, , ठोकळ प्रकाशन, पुणे,१९८४, पृ. – ६३७

९५) कित्ता, पृ.– ६३७

९६) पवार जयसिंगराव (संपा), , राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००७, पृ. –२०२

९७) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ७१ ठराव क्र. २८३, कोल्हापूर, दि. १०/१०/१९०८.

९८) Report On The General Administration Of The Kolhapur-1912-13, Kolhapur.

९९) Report On The General Administration Of The Kolhapur-1915-16, Kolhapur

१००) कुलकर्णी मीना, कुलकर्णी. ब. शि, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ५९

१०१) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग–१, दि. १३/५/१९२२, कोल्हापूर, पृ. ३५–३६

प्रकरण पाचवे

शेती विकासाची आधुनिक धोरणे व नवीन प्रयोग

प्रस्तावना

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती

शिक्षणाचे महत्त्व

जातिभेद उच्चाटनाची गरज

शेती सुधारणा – उपाययोजना

१) शेतजमिनीचे तुकडे न करण्याचे आवाहन

२) शेतकरी असण्याचा अभिमान

३) कृषी उत्पादनवाढीस चालना

४) शेती सुधारणा या विशेष खात्याची निर्मिती

५) शेती सुधारणेसाठी तगाई

६) शेतकऱ्यांना सशर्त कर्जाची सुविधा

७) शेती नुकसानाबद्दल भरपाई

८) शेतीचे नुकसान होऊ नये यासाठी विशेष बंदूक परवाना

सुधारित शेती पद्धतीच्या प्रसारास चालना

१) किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना

२) शेती उपयोगी आधुनिक म्युझियम

३) शेती उपयोगी जिऑलॉजीकल म्युझियम

४) शेतकी अधिकाऱ्याची नेमणूक

५) आदर्श शेतीचे प्रयोग

६) आधुनिक खतांचा वापर

शेतकी शिक्षणास चालना

१) शाळांसाठी शेतकी सुधारणा पुस्तक खरेदीस मंजुरी

२) शेतकी सुधारणा माहितीच्या प्रचारास मंजुरी

३) शेतकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यास मदत

४) शेतकऱ्याच्या मुलास शिक्षण देऊनही शेतकामात व घरकामास प्राधान्य देण्यास मंजुरी

५) विद्यार्थ्यांना शेतकी शिक्षण मिळण्याकरिता आर्यसमाज संस्थेला जमीन प्रदान

शेतकी प्रदर्शन

१) शेतकी प्रदर्शनाचे अंदाजपत्रकास पूर्वमंजूरी

२) यात्रेतील शेतकी प्रदर्शन

३) उत्तम जनावरांचे प्रदर्शन

४) विज्ञानाधारीत प्रदर्शने

५) शेतीपूरक जंगलाधारीत वस्तूंचे प्रदर्शन

नवीन लागवडीचे प्रयोग

१) पन्हाळा येथील सरकारी बागांमधील विविध लागवड

२) चहा लागवड

अ) पंजाब येथून चहाचे बी मागविणे

आ) चहा लागवडीवर होणाऱ्या खर्चास मंजुरी

इ) विलायती चहाची लागवड

ई) राधानगरी भागातील चहा लागवड

उ) चहा लागवड करणाऱ्यास बक्षीस

ऊ) चहा लागवडीसाठी जनावरे खरेदी खर्चास मंजुरी

ऋ) चहा विक्री दर

३) वेलदोडा लागवड

४) जायफळ लागवड

५) रबर लागवड

६) कॉफी लागवड

७) आंबा लागवड

८) बाळंत लिंबाची झाडांची लागवड

९) नवीन पद्धतीच्या भाताची लागवड

१०) रेडेडोहात बचाची झाडे लागवड

११) तुतीची लागवड

१२) नवीन पद्धतीच्या लागवडींसाठी संपादन केलेल्या जमिनीचा मोबदला

१३) नवीन लागवडीसाठी जमीन इनाम देण्याबाबत

शेती उपयुक्त तंत्रज्ञानाचे शिक्षण व प्रोत्साहन

शेती संशोधन व संवर्धन

१) कात्यायनी येथे पार्क उभारणी (बोटॅनिकल गार्डन)

२) रोपवाटिका / नर्सरी गार्डन

शेतीपूरक व्यवसायास चालना

उद्योग–व्यवसायांना चालना

१) कोल्हापूर येथील पहिली सूत गिरणी (शाहू छत्रपती मिल)

- कापूस खरेदीस मदत व शाहू मिल व्यवस्थापनावर देखरेख

२) रेशीम कारखाना

अ) रेशीम कारखान्याकडे जपानी व्यक्तीची नेमणूक

ब) सरकारी ताबा

क) रेशीम किड्यांची माहिती व आयात

३) जिनींग फॅक्टरीस परवानगी

४) विद्युत कारखाना उभारणीस परवानगी

५) खाणकाम करण्यास किर्लोस्कर यांना मंजुरी

६) सर राशबिहारी घोष मिल्सच्या मोफत जागा व इतर व्यवस्था करणारा हुकूम

७) मोटार सर्विस कारखाना काढण्यास मंजुरी

८) आर्यन फाऊंड्री –आधुनिक यंत्रांचा कारखाना

९) तिजोरी तयार करण्याच्या कारखान्याला परवानगी व उत्तेजनार्थ बक्षीस

१०) सूत रंगविण्याच्या गिरणीस मदत

११) सायकल कंपनीस परवानगी

१२) चांदीचे बटण निर्मिती कारखान्याला राजाश्रय

१३) कापूस पिंजण्याचा कारखाना

१४) मातीचा रंग तयार करण्याचा कारखाना

१५) तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना

१६) साखरेचा कारखाना

१७) गहू दळण्याचे यंत्र

१८) गहू दळण्याची चक्की

१९) अत्तराचा कारखाना

२०) यंत्रमाग कारखाना (लूम फॅक्टरी)

२१) भाताचे पोहे करण्याचे नवीन यंत्रास परवानगी

२२) चुन्याचा कारखाना

२३) तेलाची गिरणी

२४) औषधी कारखाना

व्यापाराला चालना

१) व्यापारासाठी वाहतुकीची व्यवस्था

२) व्यापार वाढीसाठी मुंबई येथे जाण्यास परवानगी

३) व्यापार माहितीसाठी रेल्वे स्टेशनवर विशेष माणसाची नेमणूक

४) व्यापारास प्रोत्साहनपर आर्थिक मदत – व्हिवर्स असोसिएशन

५) व्यापारोपयोगी जागेच्या भाडे वसुलीबाबत निर्णय

६) हळद व्यापारासाठी सोय

७) दुकान बांधण्यासाठी रु. ३,००० ची मदत

८) श्री युवराज महाराज यांना व्यापार करण्यासाठी पाऊण लाख रुपये बक्षीस

९) व्यापारासाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यापारास मानसन्मान

१०) गुळाचा बाजारासंबंधी ठराव

११) व्यापारासाठी सरकारी शेरी जमीन मोफत देणेबाबत

१२) शाहूपुरी वसाहत

१३) राधानगरी बाजारपेठ

१४) जयसिंगपूर वसाहत

सहकारास चालना

- सहकार कायदा

प्रकरण पाचवे

शेती विकासाची आधुनिक धोरणे आणि नवीन प्रयोग

प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या राजवटीत पडलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रामुख्याने शेतकरी या वर्गाला केंद्रस्थानी ठेवून धोरणे आखली होती. पाण्याशिवाय शेती करणे अशक्यच ही प्राथमिक अट लक्षात घेऊन त्यांनी जलनियोजनाचे विविध उपक्रम राबवून राज्याला जलस्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु केली होती. ब्रिटिश राजवटीच्या काळातील इतर संस्थानांच्या तुलनेत कोल्हापूर हे आर्थिकदृष्ट्या फार श्रीमंत वर्गात मोडणारे नव्हते. संस्थानात जनजीवन भारतातील इतर भागांप्रमाणेच शेती आधारित असल्याने अर्थकारण हे शेतीभोवती फिरणारे होते; परंतु कृषीप्रधान राज्याचा विकास करायचा असेल, तर तो राज्याच्या पोशिंद्यावर म्हणजेच शेतकरी वर्गावर प्राधान्याने अवलंबून असतो. शाहू महाराजांनी याच धर्तीवर शेतीचा विकास घडविण्यावर भर दिला.

शेतीला आवश्यक पाण्याची सक्षम जोड देऊन छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानात शेतीचा विकास करण्यासाठी राबविलेली विविध धोरणे, शेती सुधारणेसाठी आवश्यक त्या केलेल्या उपाययोजना, शेतीत केलेले नवीन पद्धतीचे प्रयोग, शेती संशोधनाचे प्रयत्न, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, व्यापार, उद्योग व्यवसाय वाढीसाठी केलेले विविध प्रयत्न, त्यासाठीचे आर्थिक नियोजन व सहकाराच्या माध्यमातून पतपुरवठा या सर्वांचा अभ्यास या प्रकरणातून करण्यात येणार आहे.

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात भारतातील ऐंशी टक्के लोकजीवन शेती व्यवसायावर अवलंबून होते. कोल्हापूर संस्थानही कृषी जीवनावर आधारित होते. संस्थानातील शेती ही प्रामुख्याने नैसर्गिक पावसावर अवलंबून होती. भौगोलिक प्रतिकूल परिस्थिती व पावसाचा अनियमितपणा, जुन्या पारंपरिक पद्धतीने केली जाणारी शेती, बदलत्या हवामानाचे बदल या

सर्वांचा परिणाम शेती व्यवसायावर होऊन त्यामानाने शेतीतून मिळणारे उत्पन्न अल्प प्रमाणात होते. शेतकरी वर्ग हा फारसा सधन नव्हता. दुष्काळाच्या संकटात संस्थानाची पाहणी करताना शेतकरी व शेती व्यवसाय यांची स्थिती बघून शेतकऱ्यांचा विकास घडविणे हा एकमात्र उपाय त्यांना दिसत होता. परंतु, त्यामधील पुढील अडथळे ते जाणून होते.[१]

१) शेतकऱ्यांचे अज्ञान व दारिद्र्य

२) व्यावसायिक कौशल्याचा अभाव

३) भांडवलाची कमतरता

४) शेतीचे लहान आकाराचे तुकडे

५) शेतीमाल विक्रीसाठी योग्य व्यवस्थेचा अभाव.

महाराजांनी शेतकऱ्यांचे अज्ञान हे कारण अचूक हेरले होते. सामान्य शेतकरी वर्ग व बहुजन समाज यांना शिक्षणाची दारे बंद होती. त्याकाळी शिक्षण व्यवस्था ही भारतात विशिष्ट उच्च समुदायापुरती मर्यादित होती. शिक्षणाच्या अभावामुळे येथील लोक अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्थेच्या चौकटीमध्ये अडकलेले होते. शेतकरी हा त्या अर्थाने मानसिक गुलाम झालेला होता. शेतीतून मिळणारे उत्पन्न हे उदरनिर्वाह चालविण्यापुरते असून, त्यातून म्हणावे तसा आर्थिक फायदा होत नव्हता. परिणामी आर्थिक गरज भागविण्यासाठी सावकारांकडून कर्ज घेतले जायचे. त्यातच समाजातील रितीरिवाज हे कर्मकांडाला जास्त प्राधान्य देणारे असल्याने सण, समारंभ, लग्नकार्य, धार्मिक विधी इ. बाबींवर शेतकऱ्यांचा जास्त पैसा खर्च होत होता. अंधश्रद्धेतून निर्माण झालेली हतबलता व पैशांची चणचण या सर्वांचा परिणाम म्हणजे मानसिक दौर्बल्याबरोबरच आर्थिक दारिद्र्यावस्था अशा विचित्र परिस्थितीत तो अडकून होता व अज्ञानामुळे तो बाहेर ही पडू शकत नव्हता. यासाठी त्यांना आजूबाजूच्या परिस्थितीचे भान येणे आवश्यक होते आणि याचसाठी प्रथम शिक्षणाची गरज होती.

कोल्हापूर संस्थानातला शेतकरी वर्ग हा पारंपारिक पद्धतीने शेती करत होता. त्यातही ज्या पिकांची लागवड केली जात होती, ती सर्व पारंपरिक, भरपूर उत्पादन न देणारी होती. शेतीत कोणतेही नवीन प्रयोग केले जात नव्हते. शेतीतून अधिक उत्पन्न घ्यायचे असेल तर

व्यावसायिक कौशल्याची गरज असते, पण त्याचा मोठा अभाव होता. शेतीमध्ये काही वेगळे करण्याची प्रवृत्तीही नव्हती. साहजिकच शेती क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न हे एका मर्यादेपलीकडे जात नव्हते. त्यासाठी त्यांना प्रथम कौशल्याधारीत व्यवसाय व नवीन कृषी तंत्रज्ञानाची ओळख करून देणे महत्त्वाचे आहे, हे राजर्षींना कळले होते.

पारंपरिक शेतीच्या मशागतीच्या पद्धती यासुद्धा तेवढ्याच पूर्वापार चालत आलेल्या होत्या. शेतीला वापरण्यात येणारे अवजारे हीदेखील जुन्या वळणाचीच होती, त्यात आधुनिकतेचा लवलेश ही नव्हता. साहजिकच शेती व्यवसाय हा नेहमीच आर्थिक गर्तेत सापडलेला असायचा. त्यातून सावरण्यासाठी सावकाराकडून तो म्हणेल त्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागत होते. या कर्जबाजारीपणामुळेही शेतीत म्हणावी तशी गुंतवणूक होत नसे. किंबहुना दुष्काळामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पूर्णतः खालावली होती. साहजिकच दुष्काळी परिस्थितीत शेतीमध्ये जादा गुंतवणूक करण्याची शेतकऱ्यांची मानसिकता राहिलेली नव्हती. कारण शेतीसाठी कर्जपुरवठा करणारा सावकार वर्ग हा शेतकऱ्यांकडून कर्जापोटी भरमसाठ व्याजदराची आकरणी करून शेतकऱ्यांची लूट करत होता. काही शेतकरी हे कर्जामागून कर्ज काढत असल्याने पिढ्यान्पिढ्या कर्जात बुडालेले होते. कधीकधी त्यांच्या जमिनीसुद्धा गहाण पडलेल्या असत. जर हे कर्ज फिटले नाही, तर प्रसंगी त्यांना आपले उदरनिर्वाहाचे एकुलते एक साधन असलेले शेत ही विकावे लागे व गरीबीत जीवन कंठावे लागे. यावर शेतकऱ्यांना जर माफक किंमतीत कर्ज मिळण्याची सोय झाली, तर नक्कीच शेतीत गुंतवणूक वाढेल व शेतीत बदल होऊन शेती आधुनिकतेकडे जायला मदत होईल, हे शाहू महाराजांनी ओळखले होते.

शेतजमिनी ही स्थावर मालमत्ता असल्याने वारसा हक्काने त्यांचे विभाजन होत होते. ही पूर्वापार चालत आलेली एक पद्धत असल्याने त्यामुळे एका शेतीचे अनेक वाटे तयार होऊन ती मोठी शेती वारसांनुसार छोट्या-छोट्या तुकड्यांमध्ये विभागली जात होती. बऱ्याचवेळा इनाम दिलेला एखादा जमिनीचा छोटा तुकडा सन्मानाची खूण असल्याने ती विकली जात नसे. साहजिकच अशा शेतजमिनीच्या मर्यादेमुळे वा विभाजनांमुळे शेतीत उत्पादन घेण्यासाठी लहान क्षेत्र मिळत असे व जमिनीची उत्पादकता कमी होत असे. शिवाय त्याच लहान शेतीवर संपूर्ण कुटुंबातील सदस्यांची उपजीविका अवलंबून असल्याने मिळेल, त्या उत्पन्नातून शेतकरी व त्याचे कुटुंब

गुजराण करत होते. या सर्व कारणामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत वाढ न होता तशीच बेताची राहत असे. शेतीतून चांगल्या प्रतीचे उत्पन्न काढायचे असेल, तर असे तुकडे न करता शेतमालासाठी मोठे शेतीचे क्षेत्र उपलब्ध करून देणे तेवढेच आवश्यक होते. त्याचबरोबरीने तिच्यावर जास्त असलेले अवलंबित्व कमी करून इतर रोजगारांच्या संधी निर्माण होणे तेवढेच गरजेचे होते.

शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करून शेतीमध्ये उत्पन्न घेतल्यानंतर त्या शेतमालाला जर योग्य बाजारपेठ उपलब्ध नसेल, तर त्याच्या मेहनतीला कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. आलेल्या शेतीमालाला चांगला बाजारभाव मिळणे तेवढेच महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या बाजारपेठा जर उपलब्ध असतील, तर शेतकरी त्याच्या मालाला चांगला भाव मिळवू शकतो; परंतु त्यावेळी संस्थानात मात्र अशा बाजारपेठांचा अभाव होता, परिणामी येथे पिकणाऱ्या उत्कृष्ट मालालासुद्धा बऱ्याचदा कमी भावात विकावे लागे. याचा परिणाम म्हणून असा शेतकरी पैशाअभावी आपल्या शेतात नवीन पिके घेण्याचे वा शेतीत नवीन प्रयोग करण्याचे धाडस करु शकत नव्हता. तो त्यामुळे पारंपरिक पिकांवरच अवलंबून होता.

शिक्षणाचे महत्त्व

कोणतेही अज्ञान हे ज्ञानानेच दूर करता येते, यावर शाहू महाराजांचा ठाम विश्वास होता. म्हणून त्यांनी आपल्या जीवन कार्यात अनेक लोकोपयोगी कार्यात शिक्षणाच्या प्रसारावर अधिक भर दिल्याचे दिसून येते. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना महाराज एके ठिकाणी म्हणतात, ''शेतकी विषयात जरी आमच्यातील बहुतेक लोक गुंतले आहेत; तथापि त्यांनासुद्धा शिक्षणाची जरुरी आहे. शिक्षणाची जरूरी नाही अशी कोणतीही चळवळ नाही.''[२]

संस्थानातील बहुसंख्य नागरिक हे ही शेतकरी वर्गातील असून, ते अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीपाती यामध्ये गुरफटलेले आहेत, त्यांच्यापर्यंत प्रत्यक्ष शिक्षणाचा वाराही लागलेला नाही. त्यामुळे त्यांचे जीवन असेच अंधारात राहणार व पर्यायाने त्यांची प्रगती होणे शक्य नाही, हे राजर्षींनी अनुभवले होते. संस्थानातील बहुसंख्य वर्ग हा शेतकरी व कष्टकरी बहुजन समाज होता. शिक्षित झालेला शेतकरी वर्ग बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या विचारांच्या कक्षा विस्तारेल आणि तो आपल्या व्यवसायातही काळानरुप बदल करू शकेल. शिक्षणाने येणारे

शहाणपण हेच त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढू शकते याची जाण छत्रपतींना होती. त्या जाणिवेतूनच महाराजांनी प्रथम राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा नियम केला. शिक्षणासाठी पैसा खर्च करण्याची ऐपत नसलेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी मोफत शिक्षण देण्याचाही निर्णय घेतला. त्यातून जो समाजबदल घडत होता, तो महाराजांना अपेक्षीत होता. पारंपरिक जातव्यवस्थेमुळे इथला शेतकरी गुलामगिरीत लोटला आहे. त्याचा उद्धार शिक्षणानेच होणे अपेक्षित होते. आपण कोण आहोत, आपली स्थिती काय आहे आणि पुढे आपली स्थिती काय होईल, याचे भान शेतकऱ्यांना या शिक्षणामुळेच मिळणार होते.

सतरावी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, खामगाव याठिकाणी केलेल्या त्यांच्या भाषणात शिक्षणाचा दृष्टिकोन समजतो. ते म्हणतात, ''शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो... हल्लीच्या स्थितीत आमचे ध्येय साध्य करण्यासाठी जे कर्तव्य आम्हास करावयाचे, ते आमचा समाज सुशिक्षित करणे व त्यांची मने तयार करणे हे होय. या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा हा फक्त एकच मार्ग आहे, म्हणूनच प्रत्येक समाजाने समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरिता झटणे अगत्याचे आहे. निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीपूर्वक अनुसरत आहे.''[३]

संस्थानाच्या प्रगतीचा मूलाधार तेथील अर्थकारण असतो आणि संस्थानाच्या अर्थकारणातील मूळ घटक शेतकरी होता. त्यामुळे त्यांना शिक्षणातून पुस्तकी ज्ञानासह जीवनाचे ज्ञान मिळण्यासाठी, अर्थाजनात बदल घडविण्यासाठी गरजेचे असलेले ज्ञान मिळावे, अशी तळमळ महाराजांना होती.

जातिभेद उच्चाटनाची गरज

जातिभेद माणसामाणसांमध्ये फूट पाडणारी एक महत्त्वाची संस्था आहे. जातिव्यवस्थेने माणसामाणसांत द्वेष, मत्सर निर्माण केले. परिणामी, माणसाची अवनती घडवण्यात जातीव्यवस्थेचा मोठा वाटा राहिला आहे. त्यामुळे मानवजातीच्या प्रगतीसाठी जात व्यवस्थेचे उच्चाटन झाले पाहिजे, अशी शाहू महाराजांची धारणा होती. त्याविषयी ते म्हणतात, ''आता आपले हिंदुस्थानातील स्थिती पाहून गेल्यास इथे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा

आहे. मी ही त्यापैकीच एक आहे, कारखान्यात मजुरी करणारे आपण सर्व शेतकरी आहोत, तेव्हा सर्वजण एकत्र येऊन विचार करणे सोयीचे आहे. मजूर व इतर मागासलेल्या वर्ग यांच्या हिताचे संरक्षण करणे या हिंदुस्थान देशात जरुरीचे आहे. येथे सुशिक्षित व मागासलेल्या यांच्यातील प्रश्न अगदी अलीकडचा आहे. जातिभेदांमुळे हिंदू समाजाचे अत्यंत नुकसान झाले आहे, असे माझे ठाम मत आहे.''[४] देशाला पुढे घेऊन जायचे असेल, तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांनी जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था या विरोधात लढले पाहिजे. येथील समाजातून जात व्यवस्था हद्दपार झाल्याशिवाय शेतकरी प्रगती करू शकणार नाही. कारण जात व्यवस्था ही जुनाट आणि परंपरावादी मानसिकता बनवते, त्यामुळे जातीव्यवस्थेआधारे होणारे सर्व व्यवहार हे मानवी समाजाचे अवनती करणारेच असतात. म्हणून समाजातून तिचे उच्चाटन झाले पाहिजे, अशी महाराजांची धारणा होती.

शेती सुधारणा – उपाययोजना

संस्थानातर्गत केलेल्या पाहणी दौऱ्यादरम्यान महाराजांना इथल्या शेतकऱ्यांची अवस्था जवळून बघता आली. महाराजांच्या पूर्वकाळात संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे ही ब्रिटिश प्रतिनिधींच्या हातात होती. स्वतंत्रपणे राज्यकारभार चालवणारे छत्रपती नसल्याने राज्यात बहुतेक क्षेत्रात सुव्यवस्थेचा अभाव होता. शेतकरी लोकांचे अज्ञान, कर्जबाजारीपणा, भांडवलाची कमतरता, पारंपरिक शेती, नवीन तंत्रज्ञानाचा शेतीत असणारा अभाव, उत्पादित शेतमालाला योग्य भाव न मिळणे, बाजारपेठेचा अभाव इत्यादी सर्व गोष्टींमुळे शेती व्यवसायावर व पर्यायाने इतर उद्योगधंद्यावर एक प्रकारे मरगळच आलेली होती.

कृषीप्रधान व्यवस्थेत राज्याचा विकास हा शेती विकासावर अवलंबून असतो. सन १९०२ केलेल्या युरोपीय देशांच्या दौऱ्यामध्ये महाराजांनी तेथील आधुनिक शेती कार्यपद्धती, तंत्रज्ञानाच्या वापराने झालेले जास्त शेती उत्पादन, जलसिंचनाचे जाळ्यांमुळे झालेला प्रदेशाचा विकास आदी विविध बाबींचे निरीक्षण केले होते. त्यामुळे महाराजांनी आपल्या संस्थानाच्या प्रगतीसाठी मुख्यत्वे शेती सुधारणांवर भर दिला.

१) शेत जमिनीचे तुकडे न करण्याचे आवाहन

शेती उत्पादनातून चांगला आर्थिक फायदा हवा असेल, तर शेतीमालाची उत्पादकता आणि त्या शेतमालापासूनच निघणारे उत्पन्न हे मुबलक हवे. त्यासाठी लागवडीखालील क्षेत्रही जास्त असायला हवे. वास्तवात मात्र संस्थानातील बहुतांश शेतकऱ्यांकडे जमिनीचे लहान – लहान तुकडे होते, ज्यावर उत्पादित होणाऱ्या शेतमालातून अख्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. साहजिक शेती क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न हे खूपसे किफायतशीर असे नव्हते. अन्नधान्याची व पैशांची कमतरता यामुळे कुटुंबाची उपासमार होत असे. याचा सखोल अभ्यास करून संस्थानातील शेतकऱ्यांना महाराजांनी सामूहिक शेती करण्याचे आवाहन केले. ज्यातून तुकडीकरण झालेली शेती एकत्र करून त्यावर अधिक उत्पादित होणाऱ्या शेतमालाची लागवड केली, तर अधिक उत्पन्न मिळू शकते, शिवाय यामुळे शेतीमध्ये सुधारणाही करणे सहज शक्य होऊन विविध प्रकारची लागवड करता येऊन त्यातून अर्थाजन चांगले होऊ शकते. त्यांनी १९१३ ला या दृष्टीने संस्थानातील परंपरागत महार वतने बंद करण्याचा निर्णय घेतला होता, जेणेकरून शेतीवर अवलंबून असलेली जास्तीची लोकसंख्या कमी होऊन शेतीची उत्पादकता वाढेल आणि इतर लोकसंख्या पर्यायी रोजगाराकडे वळून आधुनिक रोजगारांच्या माध्यमातून उत्तम उपजीविका करू शकतील.

१९२० साली माणगाव येथे झालेल्या अस्पृश्य परिषदेत महाराज या वतनांसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, ''मी सर्व बलुतेदार व महार वगैरे वतनदार यांना अशी विनंती केली की, अशी लहान–लहान वतने व बलुते यांच्या मागे तुम्ही लागू नका. ती सोडून द्या व विशेष करून महार लोकांना मी अशी विनंती करतो की, तुम्ही साधारणतः मानसी दहा एकर जमीन वाट्याला येईल, असे तुमच्या मालकीची तुकडे करा व हे उत्पन्न तुमच्यातील जे वरिष्ठ असेल, त्यांच्याकडे जसे पाटील, सनदी, शिलेदार यांच्याकडे चालते तसे चालवा. बाकीच्या लोकांना गावात अगर बाहेरगावी कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल आणि सर्वांना जे अर्धपोटी राहण्यास भाग पडते तेही वाचेल.''[५] शाहू महाराजांनी नेहमीच सहकार्याने शेती करण्यावर भर दिला होता. संस्थानामध्ये शेतीचे लहान लहान तुकडे एकत्र करुन त्या त्या गावच्या पाटलांसारख्या वरिष्ठ व्यक्तीच्या नियंत्रणाखाली एकत्र झालेल्या मोठ्या शेतीक्षेत्रावर

शेती करण्यास प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे गावातील पडीक जमिनीसुद्धा लागवडीखाली येण्यास मदतच झाली होती.

२) शेतकरी असण्याचा अभिमान

भारतामध्ये शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठा नव्हती. शेतकरी म्हणजे कायमस्वरूपी दुय्यम प्रतीचे जीवन जगणारा व्यक्ती होता. जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था यामुळे शारीरिक कामे ही नेहमीच दुय्यम व कमी प्रतिष्ठेची मानली जात होती. त्यामुळे बहुजन समाजातही शेतकरी असणे म्हणजे अपमानास्पद जीवन जगणे ही भावना वाढीस लागली होती. ती दूर करण्याच्या हेतूने महाराजांनी शेतकऱ्यांना एके ठिकाणी खूप चांगला उपदेश केला. ते म्हणतात, ''मी कोल्हापूरच्या राजपदावर असतानाही शिपाई, शेतकरी किंवा मजूर म्हणून घेण्यात अभिमान वाटतो. माझी जन्मदात्री आई मुधोळकर घोरपडे घराण्यातील, दत्तक आई शिर्के घराण्यातली. दत्तक वडील भोसले कुळातील हे सर्व शेतकरी वर्गातीलच होते. हलक्या दर्जाचे व असुशिक्षित लोकांशी सहवास ठेवणे बरे नाही, अशी पुष्कळ जणांची समजूत आहे. मलाही त्याचा उपदेश होत असे, परंतु ज्या शेतकरी वर्गात माझे कुळ वाढले, त्याच्याविषयी प्रेम आणि अगत्य हे जन्मसिद्ध असल्याने अशा शिकवणुकीचा माझ्यावर परिणाम होणार नाही. माझी हाडामासांत शिपाईगिरी, शेतकरी यांचे रक्त खेळते आहे. म्हणून मला आपल्यात मिसळण्यात आनंद वाटतो.''[६]

शेतकऱ्याला प्रतिष्ठा मिळावी, त्यांचा योग्य तो सन्मान व्हावा, याकरिता महाराजांनी जाहीरपणे लोकांना सांगितले होते की, आपल्या पूर्वजांबद्दल व आपल्या कष्टाबद्दल किंवा व्यवसायाबद्दल कोणत्याही प्रकारची लाज व न्यूनगंड बाळगता कामा नये. शेतकरी असूद्यात किंवा शारीरिक श्रम करणारे असू द्या, सर्वांना समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. समान प्रतिष्ठासोबतच शेतकरी असल्याचा एक सकारात्मक अभिमानसुद्धा असला पाहिजे. शेतकरी असणे किंवा कामगार असणे हे एका पातळीवर सन्मानाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. कारण शारीरिक श्रम करून आपण आपली उपजीविका व आपल्या कुटुंबाची पर्यायाने समाजाची आणि देशाची गरज भागवत असतो. म्हणून महाराज स्पष्टपणे म्हणाले होते की, बौद्धिक कामे ही अत्यंत उच्च दर्जाची असतात आणि म्हणून बौद्धिक कामाला मोठी प्रतिष्ठा नेहमी दिली जाते. पण यामागे

खऱ्या अर्थाने जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था जबाबदार आहे. बौद्धिक कामासोबतच शारीरिक कामे ही अतिशय महत्त्वपूर्ण असतात. म्हणून शारीरिक काम करणारे शेतकरी असो किंवा कामगार असो सर्वांना सन्मान मिळायला हवा, असे शाहू महाराजांचे मत होते.

शेतीव्यवसायाचा आदर करुन सकारात्मक विचार रुजविल्याशिवाय शेती विकास होणे कठीण आहे हे ओळखून आपल्या शेतकारी बांधवांमध्ये शेती व्यवसायाच्या पूर्वापार चालत आलेल्या पवित्रतेद्दल ते म्हणतात, ''ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते, ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानत नाही. मी माझ्या युवराजाला कृषिविद्या शिकण्याकरिता विलायतेला व अलाहाबादला कृषी स्कूलमध्ये पाठविले होते. आपल्याला माहित आहेच की, कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख होऊन सर्व जातीला ही सुख मिळते.''[७]

३) कृषी उत्पादनवाढीस चालना

शेतीकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनामुळे देशासह संस्थानातील कृषी हा तोट्यात जाणारा व्यवसाय ठरला होता. संथानात देखील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याने अवास्तव ताण पडत होता. पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीमध्ये रात्रंदिवस काम करूनही त्यातून मिळणारे उत्पन्न अतिशय तोकडे होते. सोबत शेती कसण्यासाठी लागणारी अवजारे हीसुद्धा पारंपरिक असल्याने शेती व्यवसायाला गती मिळण्यास अडचण येत होती, हे शाहू महाराजांनी ओळखले. शेतीत उत्पादनवाढ होण्यासाठी ते एके ठिकाणी म्हणतात, ''देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे, त्यांनी प्रथमतः आपल्या शेतीच्या सुधारणेकडे आवश्यक लक्ष दिले पाहिजे. इतर देशांच्या मानाने आमच्या शेतकीचे उत्पन्न सरासरी पुष्कळच कमी आहे. ते वाढविण्यास पुष्कळच जागा आहे. शेतीच्या उद्योगात जितक्या अधिक लोकांना काम मिळेल, तितके चांगले यापेक्षा जास्त असलेली लोकसंख्या मजुरदारांच्या धंद्यात जावी.''[८] शेतीतील उत्पादन वाढवून त्यातील रोजगार क्षमता आणि रोजगाराचा मोबदलाही अधिक मिळाला पाहिजे अशी महाराजांची धारणा होती. शेती कसण्याचा आधुनिक दृष्टिकोन शेतकऱ्यांनी स्वीकारायला हवा. शेतीमध्ये नवीन प्रयोग करायला हवेत. त्यातूनच कृषी उत्पादनात मोठी वाढ करता येईल, असा शाहू महाराजांचा होरा होता. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी समुदायाव्यतिरिक्त इतर

वर्ग हा अन्य व्यवसायांत उतरला पाहिजे, शेतीवरील अवलंबन कमी करून इतर रोजगार संधी शोधली पाहिजे, असा शाहू महाराजांचा विचार होता. त्यामुळे त्यांनी शेतीवरील भार कमी करण्यासाठी आणि नागरिकांना इतर शेतीपूरक आधुनिक रोजगार व्यवसायात आणण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

४) शेती सुधारणा या विशेष खात्याची निर्मिती

आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी महाराजांनी पुढाकार घेतलेला होता. शेतजमिनीचा कस सुधारून त्यातून जास्त उत्पादन कसे घेता येईल, यावर त्यांनी भर दिला होता. जमिनीचा पोत सुधारणे व त्यातून अधिकाधिक उत्तम प्रतीचा शेतमाल कसा येईल, या दृष्टीने सरकारी तसेच स्वत:च्या शेरी जमिनीत शेतीत विविध पद्धतीने लागवड करून प्रयोग केले जायचे. चांगले उत्पादन मिळू शकणाऱ्या पिकांची लागवड करून, ते क्षेत्र लावणी लिलावाने देण्याचा प्रयोग संस्थानात केला जायाचा. याचबरोबर अन्य ठिकाणच्या ही शेती सुधारणांच्या नवीन उपक्रमांची माहिती घेतली जायची. कागल जहागिरीत शेतीचा कस वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या एका चांगल्या उपक्रमाची माहिती महाराजांना समजली, तेव्हा त्याच धर्तीवर किंवा थोड्याफार फरकाने संस्थानातसुदधा असे धोरण राबवावे, म्हणून त्यांनी करवीर पेट्यात असा प्रयोग प्रथम राबविला. त्यावेळी सन १९१६ ला शेती सुधारणा हे स्वतंत्र खाते तयार केले व अशा उपक्रमाला येणाऱ्या खर्चाला विशेष मंजुरी दिली. तसेच करवीर पेट्याचे मामलेदार श्री. मराठे व शेरी कामगार श्री. गोपाळ विष्णू पारगावकर यांची त्या कामासाठी स्वतंत्र नेमणूक केली होती. शेती सुधाणासाठी कागल जहागिरीने काही उपक्रम केला होता. त्यांनी कोणकोणते उपाय व तरतूदी केल्या आहेत, याची माहिती घेऊन आपल्या राज्यात तसे प्रयोग करण्यास व त्यासाठी योग्य ते नियम ठरविण्याच्या सूचना ही दिल्या होत्या. त्यात संस्थानातील शेरी जमीन, कुरणे सोडून काही भाग हा २० ते ३० वर्षे कालावधीसाठी लावणी लिलाव करून त्या जमिनीचा कस/ पोत सुधारण्यासाठी प्राधान्याने लक्ष देण्याबाबत विशेष सूचना दिली होती.[९]

५) शेती सुधारणेसाठी तगाई

शेतीच्या पारंपरिक पद्धतीतून लोकांनी बाहेर पडून आधुनिक अवजारे, तंत्रज्ञानाचा व पद्धतींचा वापर करून शेती व्यवसाय करावा, यासाठी महाराज नेहमीच आग्रही होते. परंतु भांडवलाची

कमतरता हा सर्वांत मोठा अडथळा होता. त्यामुळे ज्या गरीब शेतकऱ्यांकडे पैसे नसतील, पण त्यांना आपल्या शेतात सुधारणा करण्याची इच्छा असेल, अशा शेतकऱ्यांना सरकारकडून तगाई दिली जात असे. तगाईद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पात ठराविक रकमेची तरतूददेखील केली जात होती. याच आधारावर रुकडी येथे राहणारे एक शेतकरी कादर बापू भाई मुजावर यांनी त्यांच्या शेतीत सुधारणा करण्याकरिता १,२०० रुपये तगाईची विनंती केली होती. सदर वर्षीच्या बजेटमध्ये रक्कम उपलब्ध नसूनही त्यांना तेवढ्या रकमेची तगाई मंजूर करताना तगाईसाठी दरवर्षी ठराविक रक्कम खर्च होणे जरुरीचे असून, त्याची पूर्व तरतूद असलीच पाहिजे, अशी आज्ञाच महाराजांनी प्रशासनाला दिली होती. या एका उदाहरणावरून स्पष्ट होते की, महाराजांनी शेती क्षेत्रात सुधारणांसाठी तगाईसारख्या खर्चाची तरतूद कायमच केलेली होती.[१०]

सन १८९७– ९८ च्या प्रशासकीय नोंदीवरून शेतकऱ्यांना ३६ हजार २०१ एवढी रक्कम तगाई स्वरूपात कर्ज दिले गेले होते, तर १९०६ –०७ च्या प्रशासकीय नोंदीनुसार १२, ५०० एवढी रक्कम शेतकऱ्यांच्या तगाईवर खर्च केल्याची नोंद आढळते.

६) शेतकऱ्यांना सशर्त कर्जाची सुविधा

राज्यातील शेती ही पूर्णतः पर्जन्याधारित होती. निसर्गाच्या बदलाचे विपरीत परिणाम येथील शेतीवर होत असल्याने शेतीतून चांगले अर्थाजन होण्याची क्षमताच येथील शेती व्यवसायात फारशी नव्हती. बहुतांश जनसमुदाय अशिक्षित असल्याने अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांडातही तो अडकलेला होता. शेती व्यवसायात अधिक गुंतवणूक करून त्यातून अधिक उत्पन्न मिळविण्याचे भान त्यांना नव्हते. किंबहुना आतबट्ट्यातील शेती व्यवसायामुळे त्यात अधिक गुंतवणूक करण्याची त्याची क्षमताच राहिलेली नव्हती. साहजिकच आधुनिक शेतीबाबत त्यांच्यात जागृती घडवून आणून शेतीसाठी अर्थसाहाय्य देण्याचे महाराजांनी धोरण स्वीकारले.

करवीर तालुक्यात १७ हजार रुपये, पन्हाळ पेटांमध्ये ३३ हजार रुपये, आळते पेट्यात २ हजार रुपये, शिरोळमध्ये ३० हजार रुपये, रायबागमध्ये १० हजार रुपये, गडहिंग्लजमध्ये २ हजार रुपये, कटकोळमध्ये २ हजार रुपये, भुदरगडमध्ये २८ हजार रुपये असे एकंदर १ लाख २४ हजार रुपये कर्ज स्वरूपात शेतकऱ्यांना दिले असल्याची तरतूद आपल्याला त्यांच्या

कारभारविषयीच्या कागदपत्रात आढळून येते. सन १८९६-९७ मधील प्रशासकीय नोंदीनुसार, ४६,०७४ एवढे शेतकी कर्ज दिल्याची नोंद आढळते. तर सन १९०६-०७च्या नोंदीनुसार संस्थानातील इतर निधीमधून २६ हजार ८६८ एवढी रक्कम कर्ज स्वरूपात देण्यात आले होती. कर्ज उपलब्धीमुळे आणि ते परत करण्याचे असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये गुंतवणूक करण्यास चालना मिळाली. परिणामी शेती उत्पादनातही वाढ झाली. यामुळे संस्थानाच्या आर्थिक उलाढालीत शेतीचा सहभाग वाढत होता.[११]

७) शेती नुकसानाबद्दल भरपाई

शेतकरी वर्गाची अवस्था त्याकाळी यथातथाच असायची. शेतातील उत्पादनवाढीसाठी जशी सरकारकडून मदत केली जायची, तशाच प्रकारे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होऊ नये, यासाठी महाराज जातीने काळजी घेत असत.

संस्थानातील करवीर या पेट्यातील 'केर्ले' या गावी सरकारी इंजिनीयर खात्याकडून रस्ता दुरुस्तीचे काम सुरू असताना त्या खात्यातील मुकादमपदाच्या कर्मचाऱ्याने मनमानीपणाने रस्त्याजवळ असलेल्या सकू कोम बाबाजी मान्या या गरीब शेतकरी महिलेच्या शेतातील माती काढून ती त्या रस्त्यावर टाकली. सरकारी कामासाठी अशा मनमानीपणाने कोणाच्या खाजगी मालकीच्या शेतातील माती काढून नेणे हे गैरवर्तन होते. शिवाय त्यामुळे तिच्या शेताचे नुकसानच झाल्याची गोष्ट महाराजांच्या निदर्शनास येताच माती उखडण्याने खरोखरच तिच्या शेतीचे नुकसान झाले आहे, हे कळून त्यांनी झालेल्या नुकसानाची भरपाई रक्कम २५ रुपये तिला तातडीने मंजूर करून दिलासा दिला.

याच गावात रस्ता दुरुस्तीचे काम चालू असताना एक तलाव फुटल्याने त्यातील पाणी आजूबाजूच्या शेतांमध्ये शिरले व लोकांच्या पिकांचे फारच नुकसान झाले होते त्यावेळी ही त्यांना नुकसान भरपाई म्हणून ३२५ रुपये तात्काळ मदत सरकारातून दिली होती.[१२]

८) शेतीचे नुकसान होऊ नये यासाठी विशेष बंदुक परवाना

पेरणीपूर्व लागवडीपासून ते काढणीपर्यंतच्या कामादरम्यान शेतकऱ्यांना अनेक नैसर्गिक आणि कृत्रिम अडचणींना सामोरे जावे लागते. काहीवेळा वन्य व इतर प्राण्यांमुळे शेतीचे अतोनात

नुकसान होत होते. जंगल भागाला लागून असणाऱ्या आजूबाजूच्या गावांना जंगलातील प्राण्यांच्या त्रासाला वारंवार तोंड द्यावे लागत होते. जंगलातून जंगली डुकरे येऊन शेतातील पिकांची नासधूस करतात आणि मग शेतकरी अशा वेळी काहीच करू शकत नव्हते. शिवाय ही परिस्थिती हाताळणे एकट्यादुकट्या शेतकऱ्याला जमणार नव्हते. यासाठी शाहू महाराजांनी बंदुकीचा वापर करण्यास विशेष परवानगी दिली होती.

गाव कामगारांना लोकांच्या मदतीने अशी जंगली डुकरे मारण्यासाठी सरकारातून बंदूक दिल्या होत्या. त्यांचा वापर योग्य पद्धतीने करण्याची जबाबदारी गावाच्या पाटील यांच्यावर देऊन केवळ पिकांचे नुकसान करणाऱ्या डुकरांना मारण्यासाठीच ही बंदूक वापरावी व मारलेल्या डुकरांचा हिशोब ठेवावा, असे आदेश दिले. अशा प्रकारच्या आदेशातून महाराजांनी जंगली प्राण्यांपासून शेतातील पिकांच्या संरक्षणाचे प्रयत्न केले होते.[१३]

सुधारीत शेती पद्धतीस चालना

संस्थानातील शेती प्रामुख्याने पारंपरिक पिकांचे उत्पादन घेऊन पारंपरिक साधनांचा वापर करून केली जात होती. सुधारीत पद्धतीने शेती नसल्याने अर्थातच शेती उत्पन्न कमी स्वरूपाचे होते. शेती व्यवसायाचे एकूणच मागास रूप बघून शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे, हे महाराजांनी ओळखले होते. परदेशातील भौतिक प्रगती, तेथला शेती विकास, त्यांचा आधुनिक शेतीचा दृष्टीकोन यामुळे महाराज प्रभावी झाले होते. आपल्या संस्थानातील शेतीचा कायापालट करण्यासाठी शेतकऱ्यांमधील पारंपरिक मानसिकता बदलण्याची गरज होती व त्यासाठी नियोजनबद्ध कार्यप्रणाली सरकार पातळीवर राबविणे तितकेच महत्त्वाचे होते.

१) किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना

१९११ मध्ये सातवा एडवर्ड बादशहा याचे निधन झाले. त्याला श्रद्धांजली वाहण्याच्या हेतूने कोल्हापूर येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेला छत्रपती शाहू महाराज यांच्यासह संस्थानातील विविध ब्रिटिश अधिकारी व छत्रपतींचे अधिकारी एकत्र आले होते. दरम्यान, एडवर्ड बादशहाच्या स्मरणार्थ एखादी संस्था उभी राहावी, त्यासाठी निधी गोळा केला

जावा, अशी कल्पना समोर आली. त्यानुसार महाराजांनी ५००० रुपयाची निधीत भर घातली आणि एडवर्ड बादशहाच्या नावाने ३४ हजार २४१ रुपयाची रक्कम जमा झाली. ती रक्कम ६ टक्के व्याजदरावर संस्थानाच्या तिजोरीत ठेव स्वरूपात ठेवण्यात आली. व्याजावर मिळणाऱ्या रकमेतून १९१२ मध्ये किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल संस्था स्थापन करण्यात आली. त्या संस्थेला महाराजांनी प्रतिवर्षी १ हजारांची ग्रँट दिली. या संस्थेचे अध्यक्ष खुद्द शाहू महाराज हे होते, तर संस्थेचा कारभार पाहण्यासाठी श्री. जगताप यांची नेमणूक करण्यात आली होती. संस्थेतील डेमॉन्स्ट्रेटर गावांगावांना भेट देऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करत असत.

संस्थेच्या माध्यमातून सुधारित अवजारांचे म्युझियम उघडण्यात आले. ज्यातून शेतकऱ्यांना सुधारित अवजारांचे प्रयोग करण्यासाठी ती दिली जात असत. तसेच शेतकऱ्यांना मोफत रासायनिक खते दिली जात असत. ही शेतकी संस्था म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञान, रासायनिक खते व बी–बियाणे यांचे प्रयोगशाळा म्हणूनदेखील काम करत होती.

पुढील काळात संस्थानातील शेती व इतर क्षेत्राची भरभराट घडवून आणण्यामध्ये संस्थेने महत्त्वाचे योगदान दिले. संस्थेला प्रथम शेतीची सुधारित अवजारे, खते, उसाचा रस उकळण्याकरिता सुधारित सिंगल व व डबल फर्नेस, वेगवेगळ्या प्रकारची निवडक बी–बियाणे या बाबतीत सुधारणा घडवून आणायची होती. त्यासाठी काही सुधारित अवजारे संस्थेने विकत घेतली होती. ती अगदी अल्पदराने शेतकऱ्यांना ती अवजारे भाड्याने देण्याची सोय केली होती. सन १९१४–१५च्या प्रशासकीय अहवालात नमूद केल्यानुसार त्यावर्षी १, ३४२ रुपये एवढा खर्च सरकारमार्फत या संस्थेवर केल्याचे आढळून येते.

पुढील काळात संस्थानातील शेतकऱ्यांनी या इन्स्टिट्यूशनमधून संशोधित झालेल्या आधुनिक शेतीसंबंधीत बी–बियाणे, खते, अवजाराचे प्रत्यक्ष वापर करणे सुरू केल्याचे दिसून येते. त्यामुळे नंतरसुद्धा ही संस्था संस्थानातील शेतीची प्रयोगशाळा म्हणून कार्यरत राहिल्याचे दिसते. सन १९१४ साली संस्थेला त्यांच्या वाढत्या कार्यक्षेत्राची व्याप्ती बघून खासबागेजवळील सोनतळी येथील पूर्व बाजूस दक्षिण–उत्तर १७५ फूट व पूर्व–पश्चिम २५० फूट एवढी जागा कायम देण्यात आली.[१४]

२) शेती उपयोगी आधुनिक म्युझियम

सुधारीत शेती करायची, तर प्रथम पारंपरिक पद्धतीची अवजारेऐवजी नवीन पद्धतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत असलेल्या अवजारांचा वापर वाढविणे महत्त्वाचे होते. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून शेती सुधारीत अवजारांचे एक म्युझियम उभारण्यात आले होते. कोल्हापूर शहरातील सोमवार पागेमध्ये या म्युझियमला जागा देण्याची सोय करण्यासाठी ९०० रु. खर्च केलाचा दाखला ही मिळतो.[१५]

सुधारीत साधनांची पाहणी, त्यांचे प्रशिक्षण व त्याचा प्रत्यक्षात वापर याचे प्रात्याक्षिक या ठिकाणी शेतकऱ्यांना दाखविण्यात येत असे. यामुळे अवजारांच्या वापरासंदर्भात, लोकशिक्षण घडवून आणण्यास या म्युझियमकडून मोलाची भूमिका अदा केली गेली. मशागतीचे मशीन, मळणी यंत्राची मशीन यासारख्या मशीनचा वापर करून शेतीमध्ये प्रगती करता येते, हा आत्मविश्वास शेतकऱ्यांना येण्यास सुरुवात झाली. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती केल्यामुळे वेळेची आणि पैशाची मोठी बचत होते, हे पटवून देण्यात या म्युझियमचा मोठा वाटा होता. सदर म्युझियम लोकांना पहाण्यास सहज उपलब्ध व्हावे, यासाठी विशिष्ट असा वेळ आणि कालावधी निश्चित केला जात असे. त्या कालावधीत म्युझियम सार्वजनिकरीत्या उघडे करून दाखवून विविध तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो. कोणते तंत्रज्ञान कोणत्या क्षेत्रांमध्ये वापर केले जाते, याबद्दलची माहिती दिली जात होती. त्यामुळे आधुनिक शेतीविषयी जाणून घेण्यासाठी अनेक शेतकरी या म्युझियमला पाहण्यासाठी येत होते.

अनेक शेतकऱ्यांनी या म्युझियममधील तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये वापर करण्यासाठी पुढाकार घेतल्याचेही दिसते. एवढेच नव्हे तर या संस्थेच्या माध्यमातून शेतीसाठी असणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना विकत घेणे परवडत नसेल,तर ते भाड्याने देण्याची सोयही करण्यात आली होती. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना सुद्धा अशा सुधारित साधनांचा भाडेतत्वावर वापर करता येत होता.

सदर म्युझीयममध्ये काही प्रयोग केले जात असत. अशावेळी त्यांना लागणारे साहित्याचे काम झाल्यावर त्यांची विक्री सुद्धा होत असे. संशोधकीय कामासाठी आणलेल्या कातडीचा वापर होत नसल्याने तिचा लिलाव केल्याचा दाखला मिळतो. अशा म्युझियममुळे लोकांमध्ये

शेतीसाठीच्या तंत्रज्ञानाबाबत जनजागृती निर्माण होण्यात खूपच मदत झाली, हे वास्तव नाकारता येत नाही.[१६]

३) शेती उपयोगी जिऑलॉजीकल म्युझियम

शेती विकास हा जसा शेती सुधारणा, आधुनिक शेती पद्धती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर यावर अवलंबून असतो, तसा तो जमिनीच्या बदलांवरही बदलत असतो. शाहू महाराजांनी शेतकी संस्थेच्या जोडीने जसे शेतकी संग्रहालय तयार केले होते, तसेच एक भूशास्त्रीय बाबींचा अभ्यास करणारे जिऑलॉजिकल म्युझियमही उभारलेले होते. या म्युझीयमच्या माध्यमातून इतर भूशास्त्रीय अभ्यासाबरोबरच भूगर्भीय परिवर्तनामुळे शेत जमिनींमध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे, हवामानानुसार होणाऱ्या परिणामांचे निरीक्षण करणे, जमिनीचा कस-पोत अभ्यासून त्यानुसार पिकांची लागवड करणे, पद्धती बदलणे, साधनांचा वापर कमी जास्त करणे इत्यादी अनेक बाबींसाठी या म्युझियमचा उपयोग होत होता. म्युझियममधील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार अनेक शेतकरी आपल्या शेतात योग्य ते बदल करू शकत होते. जेव्हा १९२० च्या सुमारास हे संग्रहालय संस्थानातील विद्यापीठाशी जोडण्यात आले, तेव्हा विद्यापीठाचे अधीक्षक श्री. तोफखाने यांना या म्युझियमचा उपयोग लोकांना करू द्यावा आणि त्यासाठी लागणारी योग्य ती व्यवस्था ही त्यांनीच करावी, असे स्पष्ट आदेशच महाराजांनी दिले होते.[१७]

४) शेतकी अधिकाऱ्याची नेमणूक

संस्थानातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीपद्धती आत्मसात होऊन त्यांचा वापर वाढण्यासाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष त्यांच्या शेतात जाऊन माहिती देणे, प्रात्याक्षिके करून दाखविणे, तसेच त्यांच्या शंका निरसन करणे या गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या होत्या. दूरवरच्या खेड्यातील शेतकरी वर्गाला जोडण्यासाठी त्यांच्यापर्यंत आधुनिक शेतीज्ञान पोहोचण्यासाठी सक्षम अशा माध्यमाची गरज होती. गावाच्या पातळीवर आधुनिक शेती पद्धतीबद्दल अद्यावत माहिती पोहोचावी, यासाठी महाराजांनी शेतकी अधिकाऱ्याची नेमणूक केली. हा शेतकी अधिकारी गावागावांतील शेतकऱ्यांशी संवाद साधून आधुनिक शेतीसंदर्भातील माहिती देईल, आधुनिक शेतीबद्दलच्या शेतकऱ्यांच्या समस्यांचे निरसन करेल, आधुनिक शेतीमुळे शेतकऱ्यांना होणारे लाभ, कमी श्रमात जास्त उत्पादन यासंदर्भात तपशीलवार माहिती देईल, अशा स्वरूपाची

जबाबदारी आणि शेतकरी लोकांच्या समस्या जाणून त्या सरकारापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यावर निश्चित करण्यात आली असल्याने संस्थानात आधुनिक शेतीबद्दलचा सकारात्मक लोकमानस तयार व्हायला मोठी मदत झालेली होती.

वेतनावर असलेला हा शेतकी अधिकारी गावागावांना भेटी देऊन शेती संदर्भातील हवामान अंदाज, पीक पद्धती, हंगामानुसार लागवड, जमिनीच्या प्रकारानुसार पीक लागवड, व पीक संरक्षणाच्या उपाययोजना इ. बाबत आवश्यक ते मार्गदर्शन करत असे. शेतीची आधुनिक संसाधने शेतकऱ्याला उपलब्ध होण्यासाठी सरकारकडून जे अर्थसाहाय्य दिले जात होते. ते या अधिकाऱ्यामार्फत राज्यातल्या अनेक शेतकरी वर्गापर्यंत पोहोचण्यास मदतच होत होती. सरकार व शेतकरी यांच्यामधला दुवा म्हणून सामान्य शेतकऱ्याच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या शेतकी अधिकाऱ्यांनी संस्थानातील कृषी क्षेत्राच्या विकासात मोलाचा हातभार लावल्याचे दिसून येत होते.[१८]

५) आदर्श शेतीचे प्रयोग

आधुनिक पद्धतीची शेती करायची असेल, तर प्रथम शेतकरी वर्गाचे मानसिक परिवर्तन होणे महत्त्वाचे ठरते. शेती व्यवसायाला एका विशिष्ट अशा चौकटीत बांधून न ठेवता त्यात विविध प्रयोग करून त्याची उत्पादकता वाढवली पाहिजे, यासाठी शेती मशागतीपासून ते उत्पादित धान्य वितरीत करण्याच्या एका प्रक्रियेपर्यंत सर्वच बाबींमध्ये उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. आवश्यक ती खते, बी–बियाणे, अवजारे व पीक पद्धती, पिकांचे प्रकार या सर्वांचा ताळमेळ जर घातला, तर नक्कीच शेती व्यवसाय बहरून येईल, असे महाराजांना वाटत होते. त्यादृष्टीने त्यांनी शेती सुधारणा करण्याबरोबरच आदर्श शेतीचे नमुने शेतकऱ्यांसमोर ठेवले होते. एका आदर्श शेतीसाठी काय असावे, काय नसावे याबरोबरीने शेतीत अन्य जोड उत्पादन कसे घ्यावे, त्यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरावे, कोणती साधने वापरावीत, यासाठीचा कच्चा माल कोठून प्राप्त करावा इत्यादी बाबी प्रत्यक्षात पाहून समजणे व त्यांची उपयुक्तता जाणणे हे या आधुनिक पद्धतीच्या शेती नमुन्यातून साध्य झाले होते. शेतकरी लोकांना प्रात्यक्षिक बघायला मिळाल्याने त्यांच्या शंका निरसन ही तिथल्या तिथेच होत असल्याने त्यांच्यात नवी उमेद जागली होती.

शाहू महाराजांनी नवविविध पद्धती शेतकऱ्यांसमोर आणण्यासाठी अशा आदर्श शेतींचे प्रयोग संस्थानात ठिकठिकाणी दाखविण्याची व्यवस्था केली होती.[१९]

- रेशीमसारखा अभिनव प्रयोग संस्थानात राबविण्याच्या दृष्टीने महाराजांनी पुढाकार घेतला होता व त्याचे कारखानेही चालू केले होते. दुष्काळग्रस्त संकटात जेव्हा शेतीतून पुरेसे उत्पादन होत नाही, त्यावेळी अशा उपक्रमातून शेतकरी चांगले अर्थाजन करू शकतो, हे जाणून रेशीम व्यवसायापासून कसा फायदा होतो, हे प्रत्यक्ष लोकांना समजण्यासाठी वाडी रत्नागीरी येथील काही जमीन ताब्यात घेऊन त्यात रेशीम शेतीचे सादरीकरण प्रयोग केले जात होते.
- कोल्हापुरातील करवीर शहरातसुद्धा वळीवडे येथे बाळंतलिंबू या प्रकारच्या नवीन प्रजातीच्या लिंबू प्रकारातील झाडे कशी लावतात व त्याचे उत्पादन कसे होते, हे लोकांना समजावे यासाठी एक स्वतंत्र बंगला बांधून तसे प्रयोग सादर करण्याची व्यवस्थाच करण्यात आली होती.
- आधुनिक पद्धतीच्या शेती सुधारणा व शेती उत्पादनासारख्या क्षेत्रात सातत्याने नवीन प्रयोग करून विविध निरीक्षणे करून शेती उपयोगी निष्कर्ष काढण्याचे काम शेतकी संस्थेमार्फत करण्यात येत असे. त्याचाच एक भाग आदर्श शेती प्रयोग होता. शेतकऱ्यांना नवीन प्रकारच्या शेतीची माहिती सातत्याने या माध्यमातून मिळत राहावी, यासाठी सोनतळी व रजपूतवाडी येथील काही जमीन शेतकी संबंधाने प्रयोग करणे व लोकांना दाखविणे या कामासाठीच घेतली गेली आणि शेतकी संस्थेचे मार्गदर्शक श्री. जगताप यांच्या ताब्यात देण्यात आली होती. त्यांना लोकांना मार्गदर्शन करण्याची स्पष्ट आज्ञाच महाराजांना दिली होती.

६) आधुनिक खतांचा वापर

शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी मातीतील घटकांचा विचार करून आधुनिक प्रकारची खते, जास्त उत्पन्न देणाऱ्या रासायनिक खताचा वापर व त्याआधारावर बी–बियाणांचा वापर करणे गरजेचे होते. सरकार पातळीवरून व शेतकी संस्थेमार्फतही अशा आधुनिक जास्त उत्पादन देणाऱ्या खतांचे ज्ञान व माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न संस्थानात

करण्यात येत असत. कधी म्युझीयम तर कधी प्रदर्शनामधे तर कधी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून त्यांच्या वापराचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत नेण्याचे उपाय सुरु होते. शेतकऱ्यांना परवडतील अशा अल्प दरात व सहज उपलब्ध होतील यासाठी संस्थानातच आधुनिक व रासायनिक खतनिर्मितीला ही चालनाही देण्यात आली होती.

मृत जनावरांच्या हाडापासून उत्तम खत तयार होते व ते शेतीच्या कामांसाठी, मौल्यवान अशा फळझाडांसाठी अतिशय उपयुक्त असते. त्या खताचा उपयोग केल्यास शेतीच्या कामाला आणि चांगल्या जातीच्या फळझाडाला अधिक चांगल्या प्रतीची फळे येतील व पर्यायाने शेतकरी लोक व सरकार या दोहोंना फायदेशीर ठरेल, ही बाब महाराजांच्या नजरेत आली होती; परंतु संस्थानातील काही लोक हे थोड्याशा फायदयासाठी मेलेल्या जनावरांच्या हाडांची विक्री बाहेरच्या प्रांतात करत होते. हे थांबविण्यासाठी संस्थानात मेलेल्या जनावरांच्या हाडांची परप्रांतातील विक्रीस प्रतिबंध करून आपल्याच संस्थानात त्याचा उत्तम वापर करण्यासाठी नियमावलीच तयार करण्याचा आदेश महाराजांनी दिला व अशा हाडांचा वापर चांगल्या खतनिर्मितीसाठी करण्याला चालना दिली.[२०]

या व्यतिरिक्त विविध रासायनिक खतांचा वापर करण्यावरही भर देऊन उसासारख्या पिकाचे उत्पादन वाढीस चालना दिली होती. याचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात वाढत्या ऊस उत्पादनापासून गुळनिर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळून गूळ उत्पादन संस्था कोल्हापूरात वाढीस लागल्या. तत्कालीन स्थितीत सर्वाधिक गूळ उत्पादन घेणारे संस्थान म्हणून कोल्हापूर हे प्रसिद्धीस आले.

शेतकी शिक्षणाला चालना

कृषीप्रधान असलेल्या कोल्हापूरच्या विकासासाठी शेतीक्षेत्रात बऱ्याच सुधारणा घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक पातळींवर प्रयत्न केले होते. शेतीत सुधारणांच्या जोडीने संस्थानात शेतकी संस्था, कृषी संशोधन संस्था देखिल उभारणे आवश्यक होते. गावागावातून शेती प्रश्नांचे अभ्यासक निर्माण होणे गरजेचे आहे, हे महाराजांना लक्षात आलेले होते. परदेशातील शेती विकास पाहून भारतात परतलेल्या महाराजांनी संस्थानात संशोधित शेती पद्धतीचा वापर करून आधुनिक शेतीचे प्रयोग करण्याचे निश्चित केले. शिक्षणासारख्या क्षेत्राचा

शेतीच्या विकासासाठी आपणाला कशा पद्धतीने वापर करून घेता येईल, यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या भाषणात त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, ''हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झाली आहे की, ज्याला त्यात यश मिळवायचे आहे त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत.''[२१] याच दृष्टिकोनातून महाराजांनी शेतकी शिक्षणासाठी अनेक प्रयत्न केल्याचे दिसून येते.

१) शाळांसाठी शेतकी सुधारणा पुस्तक खरेदीस मंजुरी

शिक्षणाच्या माध्यमातून वंचित राहिलेल्या घटकांचा विकास करणे या उद्देशाने शाहू महाराजांनी राज्यात प्राथिमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते. शेतकऱ्यांना हक्काची जाण येऊ लागली होती. शेतकरी वर्गातील मुले ही शिकू लागल्याने बाहेरच्या जगातल्या शेती प्रगतीच्या वाटा त्यांना समजणे शक्य होऊ लागले होते.

शेती व्यवसायातील कौशल्य आत्मसात करणे, जुन्या ऐवजी नवीन तंत्रावर आधरीत अवजारे वापरणे, पारंपारिक पिकांसोबत नवीन लागवड पद्धतीचा वापर करणे, आधुनिक पद्धतीच्या बी–बियाणांचा व रासायनिक खतांचा वापर करणे या सारख्या बाबींची सविस्तर माहिती लोकांपर्यंत पोहोचणे तेवढेच आवश्यक होते. महाराजांच्या या विचार कल्पनेला धरुन बारामती येथे राहणाऱ्या महादेव नारायण देवधर, यांनी शेती सुधारणा नावाचे पुस्तक तयार केले होते. शेती शिक्षणाच्या माध्यमातून शेती साक्षरता व सक्षमता तयार होण्याची आवश्यकता होती. आजचा विद्यार्थी उदयाचा आधुनिक शेतकरी व्हावा तसेच त्याचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होऊन त्यांना शाळेपासूनच शेतीची गोडी लागावी या हेतूने व विद्यार्थ्यांना शलेय शिक्षणाबरोबरच शेती शिक्षण ही मिळावे म्हणून शाहू महाराजांनी सदर १०० पुस्तके खरेदीस मंजूरी देऊन शाळेतील लायब्ररीना देण्याचे आदेश दिले होते.[२२]

२) शेतकी सुधारणा माहितीच्या प्रचारास मंजुरी

आपल्या प्रजेने शास्त्राय पद्धतीने शेती करावी, पीक उत्पादनात विविध प्रयोग करावेत, शेतीत विविधता आणून नवीन क्षेत्रे निर्माण करावीत, यासाठी जनजागृती करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या

माध्यमातून महाराजांनी सुरू केले होते. त्याचाच भाग म्हणून लोकसंवाद साधणे महत्त्वाचे होते. शेती सुधारणा या फक्त करवीर प्रदेशापुरताच न राहता राज्याच्या कानाकोपऱ्यातील अन्य भागातही त्यांची माहिती लोकांना व्हावी व त्यांनी शेतात सुधारणा करावी असा महाराजांचा प्रयत्न असे.

महाराजांच्या या प्रयत्नाला प्रतिसाद म्हणून संस्थानामधील एक निवृत्त व्यक्ती रामचंद्र बाबाचार्य पंडित यांनी कराड भागातील शेतकऱ्यांना शेतकी सुधारणा समजावून सांगण्याची इच्छा व्यक्त करून परवानगी मागितली असता शाहू महाराजांचे सुपुत्र राजाराम छत्रपती यांनी त्यांना दिलेल्या अधिकारात आपल्या वडीलांप्रमाणेच या चांगल्या कामास लगेच मंजूरी दिली होती.[२३]

३) शेतकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यास मदत

कृषीआधारीत असलेल्या कोल्हापूरच्या विकासासाठी शेती क्षेत्रात बऱ्याच सुधारणा करणे आवश्यक आहे, त्यासाठी संस्थानात शेतीआधारीत संशोधन संस्था उभ्या राहण्याबरोबरच शेती शिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे, हे महाराजांच्या लक्षात आले होते. कारण महाराजांनी युरोप देशांच्या दौऱ्यांमध्ये या देशांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये मोठी मजल मारली आहे आणि त्यात तेथील कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षण देणाऱ्या संस्थांचे मोठे योगदान आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे संस्थानाच्या कृषी विकासात येथे कृषी शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्यास आणि विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन कृषी शिक्षण आणि संशोधन करण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. या धोरणातून महाराजांनी संस्थानातील रामचंद्र धोंडो शेळके यांना कृषी क्षेत्राच्या अभ्यासासाठी अमेरिका येथे जाण्यास पंधराशे रुपये बिनव्याजी कर्ज तात्काळ मंजूर केले. ही रक्कम फेडण्यासाठी सहा वर्षांची पुरेशी मुदत ही त्यांना देऊन सहकार्य केले.[२४]

४) शेतकऱ्याच्या मुलास शिक्षण देऊनही शेतकामात व घर कामास प्राधान्य देण्यास मंजुरी

संस्थानात प्राथमिक शिक्षणामुळे लोकांमध्ये नवीन प्रयोग, नवीन गोष्टी स्वीकारण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. परंतू, संस्थान हे मुख्यत्वे कृषी आधारीत होते. बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून होते. त्यांचे संपूर्ण कुटुंबच शेती व्यवसायात गुंतलेले असायचे. शेतातील कापणी, पेरणी, मळणी, अशा कामांसाठी बाहेरून मजूर आणण्याचा प्रघात त्यावेळी नव्हता. घरातील

मुलांसह सर्वच सदस्य शेतात काम करण्यास जात असत, तेव्हा त्यांचा उदरनिर्वाह होत असे. पण महाराजांच्या मोफत असले तरी सक्तीच्या शिक्षणामुळे खेडेगावांमध्ये मुलांचा वेळ शाळेतच जाऊ लागला व त्यांना शेतात काम करण्यास सवड मिळत नव्हती. साहजिकच शेतीकामाची अडचण होऊ लागली. महाराजांना ही बाब समजल्यावर त्यांनी ती परिस्थिती मान्य करून शेतकरी वर्गाचे व पर्यायाने सरकारचे नुकसान होऊ नये, यासाठी पुण्यातल्या काही शाळांप्रमाणे शेतकरी मुलांसाठी एक किंवा दोन तास शाळा ठेवून बाकीचा वेळ त्यांना शेतकाम किंवा घरकाम करण्यास मिळेल, अशी व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. यामुळे शेतकरी मुलांना शिक्षण तर मिळालेच पण शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला होता.[२५]

५) विद्यार्थ्यांना शेतकी शिक्षण मिळण्याकरता आर्यसमाज संस्थेला जमीन प्रदान

शाहू महाराज हे आधुनिक पद्धतीने शेती क्षेत्रातील विकास कामासाठी विविध उपाययोजना राबवित असत. कोल्हापूरातील आधुनिक विचारसरणीचा आर्य समाज नेहमीच समाजोपयोगी काम करत असे. महाराजांचा शेती विकासावर भर असल्याने शेतकी शिक्षणाचे महत्त्व जास्त होते. संस्थानातील मुलांना लहानपणापासूनच शेतकी शिक्षण मिळावे, असे त्यांना वाटायचे. त्यादृष्टीने आर्य समाजाने यात योगदान देण्यासाठी गुरुकुल उभारण्याचा मानस व्यक्त केला होता. या समाजातर्फे विद्यार्थ्यांना शेतकी शिक्षण व गुरांची जोपासना करण्याचे शिक्षण देण्याबरोबरच लहान बाळांना गाई-म्हशीचे दूध मिळण्याची व्यवस्था करण्यासाठी करळ गावातील काही जमिनी गुरुकुल उभारण्यासाठी दिल्या होत्या, त्यातून ते शेतकी शिक्षण व गुरांची जोपासना यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देणार होते. परंतु दिलेल्या जमिनी या शहरापासून दूर असल्याने तेथे गुरुकूल उभे राहू शकले नाही. त्यामुळे हे गुरूकुल उभारण्यासाठी शहरापासून जवळ असतील अशा मॉडेल फार्म जमीन, गंजीचा माळ, व पद्माळे थटी या भागाजवळील जमिनी संस्थेला देण्यात आल्या. आर्य समाजाचे शिक्षणाचे ध्येय उच्च राहून उत्तम नागरिक सदर समाजात निपजतील, अशी इच्छा असल्याने सदरप्रमाणे तजवीज करण्यात आली आहे, असे स्पष्टपणे महाराजांनी त्यांना गुरुकुलासाठी नव्याने जमीन देताना सांगितले होते.[२६]

शेतकी प्रदर्शन

ग्रामजीवनात जत्रा-यात्रा, लोकपरंपरा यांना खूप महत्त्वाचे स्थान असते. एखाद्या गावातील महत्त्वाच्या सणासुदीला किंवा गावदेव/देवतांचे उत्सव साजरा करण्यासाठी अनेक भागात यात्रा-जत्रा भरविल्या जातात. अशा जत्रांमध्ये आजूबाजूच्या गावातील अनेक लोक कुटुंबासह येत असतात. या निमित्ताने विविध भागांतील लोक एकत्र येऊन सांस्कृतिक उत्सव साजरे करत असतात. त्यातून लोकांची सांस्कृतिक गरज भागवली जात असते. गाणी, भारुड, किंवा तमाशा या माध्यमातून लोकांना यात्रा ही एक अत्यंत जिव्हाळ्याचा उत्सव वाटत असते. त्याचबरोबर लागणाऱ्या वस्तू, सेवांसह उत्पादित मालाची खरेदी-विक्री आपसात होत असते. यात्रांमध्ये लोकांना आपल्या घरासाठी व उपजीविकेसाठी लागणाऱ्या साधनांची खरेदी करता येते तसेच इतर व्यवहारसुद्धा या यात्रेच्या माध्यमातून केले जातात.

यात्रांमध्ये लोकसंपर्क मोठा असल्याने मनोरंजनाबरोबरच आर्थिक उलाढाल ही मोठ्या प्रमाणात होत असते. अनेक खेळांचे, वस्तूंच्या स्टॉलचे प्रदर्शन लावलेले असते. उत्सुक गावकरी तेथे येऊन ते प्रत्यक्ष बघून खरेदी करतात. अशा माध्यमाचा उपयोग लोकांमध्ये आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या लोकशिक्षणाचे व्यासपीठ म्हणून उत्तम होऊ शकतो हे महाराजांनी पाहिले होते. अशा जत्रांमध्ये होणारी गर्दी लक्षात घेऊन एकाचवेळी अनेकांना शेतकी ज्ञान देता येईल हे महाराजांनी लक्षात घेतले होते. शेती सुधारणांबद्दल माहिती, आधुनिक अवजारे, नवीन यंत्रे, माहितीपत्रके, अन्नधान्याच्या नवीन जाती, उत्तम प्रतीच्या वस्तू इ. माहितीचे शिक्षण तेथे देण्याबरोबरच शेती व्यवसायाला लागणाऱ्या उत्तम प्रतीच्या जनावरांची देवाणघेवाण होऊन शेतीसुधारणेला व पर्यायाने आर्थिक हातभार लावण्याला चालनाच मिळेल, हा उद्देश ठेऊन संस्थानात अशा प्रकारच्या जत्रांमध्ये शेतकी प्रदर्शने भरविण्यात येऊ लागली. त्यातून शेती साधनांची खरेदी -विक्री करण्यासाठी प्रोत्साहन दिले. साहजिकच अशा प्रदर्शनात नागरिकही उत्साहाने सहभागी होत होते.

१) शेतकी प्रदर्शनाचे अंदाजपत्रकास पूर्वमंजूरी

संस्थानात दरवर्षी भरणाऱ्या विविध ठिकाणाच्या प्रदर्शनाचा उपयोग शेती उपयोगी ज्ञान देण्यासाठी व लोकांना त्यात रुची निर्माण होऊन आधुनिक पद्धतीचा प्रत्यक्षात शेतीत वापर

वाढण्यासाठी नेहमीच केला जात असे. कोल्हापूरमध्ये श्री महलक्ष्मी रथोत्सव व श्री केदारलिंग यात्रा या मोठ्या यात्रा चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या सुमारास होत असत. त्यात विविध ठिकाणाच्या प्रांतातून येणाऱ्या लोकांना शेती विकासासाठी व शेती जागृतीसाठी विविध प्रकारचे शेतकी गोष्टींचे प्रदर्शन संस्थानाकडून भरविले जायचे. अर्थातच त्याची पूर्वतयारी व त्यात ठेवल्या जाणाऱ्या शेती संदर्भाने उपयुक्त अशा वस्तुंचा विचार करून किती खर्च अपेक्षित आहे, तेवढ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना साधारण ५–६ महिने अगोदरच दिलेल्या असायच्या व त्यानुसार पूर्वमंजुरी घेऊनच प्रदर्शनाची तयारी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना शाहू महाराजांना दिलेले असायचे. अशा पद्धतीने सरकारमार्फत भरवण्यात येणाऱ्या शेती प्रदर्शनासाठी ठराविक रकमेची तरतूद दरवर्षीच करण्याचा प्रघात होता, हे तत्कालीन कागदपत्रांच्या नोंदीवरून दिसून येते.[२७]

२) यात्रेतील शेतकी प्रदर्शन

यात्रांमध्ये शेतकी प्रदर्शनाकडे अधिकाधिक लोकांनी हजेरी लावावी म्हणजे त्यांना आपोआपच शेतीसंबंधीत गोष्टींच्या नवीन पद्धती बघता येतील, यासाठी संस्थानाकडून खास प्रयत्न केले जायचे . त्यासाठी कुस्त्यांचे खेळ लावले जात होते. चांगल्या जनावरांना बक्षीस दिले जायचे, तसेच विज्ञानाविषयीचे कुतूहल वाढविण्यासाठी विविध विज्ञानाधारित बाबींचे प्रदर्शनही यांत्रामध्ये भरले जायचे. यात्रांमध्ये लावल्या जायच्या. सन १९१३ च्या चैत्र पौर्णिमेला भरणाऱ्या यात्रेच्या वेळी सरकारकडून भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनातील खालील तरतुदी पाहिल्यास शाहू महाराजांनी त्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश केला होता, याचा अंदाज लगेच येईल.

> चैत्र शु।। पौर्णिमेच्या सुमारास कोल्हापूर शहरात श्री करवीर निवासणीचा रथोत्साह व श्री केदारलिंग वाडी रत्नागिरी येथील यात्रा या संबंधाने निरनिराळ्या प्रांतातून हजारो लोक जमतात. सबब त्यावेळी पूर्वी चिंचली येथे श्री मायाक्काचे यात्राचे वेळी शेतकीचे प्रदर्शन ज्या प्रमाणे होत होते त्या प्रमाणेच येथे ही सदर प्रमाणेच प्रदर्शन वगैरे करुन लोक शिक्षणास मदत व्हावी व त्या बरोबरच लोकांस करमणुकीचेही साधन व्हावे या हेतुने खाली लिहिलेप्रमाणे तजवीज करण्याचे ठरविले आहे.[२८]

- शेतकी व त्या संबंधाने हर येक जिन्नस व नांगर वर्गरे आऊंते आणि शेतकीची जनावरे आणि घोडे, म्हैसी, गाई, कुत्रे व लढाऊ बकरी यांचे प्रदर्शन.

- राजाराम कॉलेजात पुर्वी सायन्टीफिक कनव्हरसेशन करीत असत त्याप्रमाणे प्रदर्शन, असी दोन प्रदर्शने करण्यात यावयाची आहेत.

- पहिल्या प्रदर्शनासंबंधी व्यवस्थापक कमेटिचे प्रेसिडेंट मे. पिराजी राव बापूसाहेब घाटगे, सी. आय. ई. सी. एस आय. यास नेमण्यात आले आहेत. त्यांनी तलाव कामगिरीकडे असलेल्या त्यांच्या हाताखालील मंडळीच्या मदतीने प्रदर्शनाची सर्व व्यवस्था करणेची आहे. सदर कमेटीचे एक सेक्रेटरी मे. नानासाहेब मुळीक यांस नेमिले आहेत. पनाळा, करवीर, आळते आणि शिरोळ येथील मामलेदारानी प्रेसिडेंट यांजकडून सूचना येईल त्या प्रकारची मदत करावयाची आहे.

- दुसरे प्रदर्शनाची व्यवस्था मे. डार्बीसाहेब प्रिन्सीपाल यानी आपले हाताखालील प्रोफ़ेसर व मास्तर विद्यार्थी वगैरे मंडळींच्या मदतीने करणेची आहे.

- दोन्ही प्रदर्शनाची वेळ चैत्र शु।। पौर्णिमेच्या आदले दिवसापासोन एकंदर (६) सहा दिवस करणेची आहे.

- या प्रदर्शनाबद्दल व त्यावेळीच होणारे हजरत, पीर, बाबू जमाल वगैरेचे उरूसाबद्दल कुस्त्या, दांडपट्टा, साठमारी इत्यादी खेळ व्हावयाचे. त्यासंबंधी सर्व... कचेऱ्या व शाळांस सुटी (३) तीन दिवस देण्याबद्दल पूर्वी हुकूम दिला आहे.

- दोन्ही प्रदर्शनास तिकिटे लावण्याची आहेत व त्या तिकीटाचे उत्पन्न त्या त्या प्रदर्शनाचे कामाकडेच खर्च करावयाचे आहेत. शिलक उरेल ती ती त्या त्या प्रदर्शन फंडाबद्दल म्हणून वेगळी ठेवणेची आहे.

- पहिल्या म्हणजे शेतकीच्या प्रदर्शनाचे खर्चाकरीता (१५००) पंधराशेहे रुपये व जनावरास बक्षीसे देणेकरिता (१०००) एक हजार मिळून २५०० रुपये व शास्त्रीय

प्रदर्शनाकरिता (१५००) पंधराशेहे आणि कुस्त्या खेळ वगैरे इतर बाबींकरिता (५००) मिळून एकंदर (४५००) चार हजार पाचशेहे रुपये या कामास सरकारी मदत मिळेल.

शेतकी प्रदर्शन वगैरे करिता जागा रावणेश्वर ते पेटाळे पर्यंतची सर्व सरकारी जागा आणि शास्त्रीय प्रदर्शनास हायस्कूलची इमारत व मागील मोकळी जागा पूर्वी देण्यात येत असे ती ठरविली आहे. या प्रमाणे तजवीज येत्या चैत्रमासी होणेची आहे. त्या बद्दल दोन्ही प्रदर्शने व कुस्त्या वगैरेची व्यवस्था उत्तम प्रकारची व्हावी याबद्दल ज्यांनी त्यांनी आतापासुन आपआपले कामाचे तयारीस लागावे. व्यवस्थेबद्दलचे तपशील ज्या त्या कमिटीने ठरवावे विशेष हुकूमाची जरुर लागल्यास समक्ष विचारण्यात यावे.

या तरतुदींवरून महाराजांनी लोकशिक्षणासाठी अशा प्रदर्शनाचे किती काटकोरपणे नियोजन केले होते हे समजते. सदर यात्रेत गुरांच्या बाजारात प्रथम आलेल्या जनावरांवर सरकारतर्फे दि. २६/१०/१९०४ रोजी एकूण रुपये १२१ रकमेचे बक्षीस म्हणून दिले होते.

३) उत्तम जनावरांचे प्रदर्शन

शेतकी प्रदर्शनाबरोबरच शेतकरी लोकांना शेती उपयोगी जनावरे ही देखिल तेवढीच महत्त्वाची असतात. शेतीला व शेती पूरक व्यवसायाला उपयुक्त उत्तम गाई, बैल, रेडे, इ. जनावरांचा बाजार ही त्यावेळी भरविला जायचा. सरकारकडूनही जनावरांचे प्रदर्शन व्हायचे. त्यात शेतकऱ्याला उत्तम जातीच्या पैदासची जनावरे बघण्याची ती खरेदी–विक्री करण्याची संधी या माध्यमातून मिळत असे. शेती उपयुक्त जनावरांचे उत्तम असणे शेतीला फायदेशीर ठरते हे जाणून महाराजांनी बक्षीसे लावून अशा प्रयोगांना दिलेले प्रोत्साहन हे सन १९०६ च्या प्रदर्शनासाठी काढलेल्या जाहिरनाम्यातील काही तरतूदींवरुन सहज समजणे शक्य होईल.[२९]

- बक्षिसे देणेचा हेतू जमीनदार व शेतकरी यांनी गुरांची जोपासना चांगली ठेवून चांगल्या प्रतीची गुरे तयार करण्यास त्यास उत्तेजन मिळावे असा आहे
- शेतकरी लोकांनी खरोखर शेतकरी असल्याबद्दल गाव कामगाराचे सर्टिफिकेट आणले पाहिजे, गाईस लागण्यासारखा बैल आहे, असे बैलाबद्दल सर्टिफिकेट पाहिजे.

- असे बक्षीस धंदेवाईक गुरे चालणारे लोकांसही देण्यात येईल.
- शेतकरी व जमिनदार लोकांचा सर्वात उत्तम ठरेल तो बैल व गाय याबद्दल एक एक पदक बक्षीस देण्यात येईल.
- एखादे वर्गातील गुरे बक्षीस देण्यासारखे दिसून येणार नाही तर त्या वर्गातील बक्षिसाची रक्कम राखून ठेवली जाईल व ती दुसऱ्या वर्गातील गुरांस जास्ती बक्षीस म्हणून देण्यात येईल.
- कोणतेही वर्गात ३ पेक्षा जास्त गुरे आली नाही, तर एकापेक्षा जास्त बक्षीस दिले जाणार नाही व १० पेक्षा जास्त न येतील तर २ बक्षिसांपेक्षा जास्त दिली जाणार नाहीत.
- प्रदर्शनास गुरे आणण्याची ज्याची इच्छा असल्यास त्याने कोणत्या प्रकारची गुरे आणायचे आहेत, ते लिहून तिकीटाबद्दल कमिटीचे सेक्रेटरी यांजकडे अर्ज करावा. प्रदर्शनास योग्य असलेल्या जनावरांना फक्त परवानगी दिली जाईल.
- प्रत्येक जनावराचे वेगळे तिकीट घेतले पाहिजे आणि ते जनावर प्रदर्शनाचे ठरल्यावेळी हजर केले पाहिजे.
- सदर जत्रेत लहान प्रमाणावर शेतकी प्रदर्शनही भरवण्यात येईल.

संस्थानात वेगवेगळ्या ठिकाणी अशा प्रकारचे गुरांचे बाजार भरविण्यात येऊन बक्षीस दिले जायचे. नरसोबाच्या वाडी यात्रेमध्ये १९०५ ला गुरांच्या प्रदर्शनसाठी व त्याची जाहिरात करण्यासाठी एकूण रु. १०० सरकारातून मंजूर केले होते. या निवड झालेल्या उत्तम जनावरांसाठीची बक्षीस योजना मात्र शाहू महाराजांनी दुसऱ्या गुरांच्या बाजारात म्हणजे वाडी नरसिंह येथे गुरुद्वादशीला होणाऱ्या यात्रेच्यावेळी जाहिर केली होती व तेथेही अशा प्रकारचा बाजार भरविण्याला मंजूरी दिली होती.

एप्रिल, १९०४ मध्ये ज्योतिबा डोंगर यात्रेत भरणाऱ्या गुरांच्या प्रदर्शनासाठी शाहू महाराजांनी सरकारतर्फे लोकांना जनावरे खरेदीसाठी एकूण ३००० रु एवढी मोठी रक्कम दिल्याची नोंद तत्कालीन कागदपत्रांमध्ये आढळते.

केवळ लोकांनी जनावरे वा गुरे प्रदर्शनाच्या ठिकाणी आणावीत असे न करता प्रत्यक्ष सरकारकडून सुद्धा गुरांच्या चांगल्या जाती बाहेरून विकत आणून यात्रेमध्ये प्रदर्शनात ठेवल्या जात होत्या. ऑगस्ट, १९०४ मध्ये वाडी रत्नागिरी येथे भरलेल्या गुरांच्या प्रदर्शनास चांगली जनावरे गाय बैल इ. आणण्यासाठी छत्रपतींनी आपल्या खात्यातील एका कारकूनास ४.१ रूपये खर्च करून पाठविले होते. सन १९०५ च्या रायबागमध्ये जनावरांचे प्रदर्शन भरविण्यास मंजूरी शाहू महाराजांनी दिली होती त्यावेळी तेथे प्रदर्शनासाठी आणलेल्या जनावरांच्या पाणी व वैरणासाठीची चोख व्यववस्था करण्यावर रू. २०० आगावू देऊन त्यांची काळजी घेतली जाईल हे पाहिले होते.[३०]

४) विज्ञानाधारीत प्रदर्शने

शेती विकासासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे, असे शाहू महाराजांना वाटत होते. त्यामुळे युरोपीय देशाच्या धर्तीवरच संस्थानात विज्ञान प्रदर्शने सुद्धा भरविण्यात येत होते. त्यात सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजूर यांना सहभागी करून घेण्याचा प्राधान्याने प्रयत्न होत असे. संस्थानात त्या काळात सुरू झालेल्या विविध शिक्षण संस्था आणि महाविद्यालय यांच्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. शेतीसाठी उपयोगी असलेल्या हवामानाचा अंदाजही विज्ञानाच्या साहाय्याने घेता येऊ शकतो, हे या प्रदर्शनातूनच शेतकऱ्यांपर्यंत पोहचले जाऊन त्यांच्यात उत्सुकता निर्माण झाली होती. विज्ञानाचा पाया पक्का होण्यासाठी अदयावत ज्ञानाची गरज ओळखून इतर ठिकाणांहून ही माहिती व शिक्षण घेण्यास प्राधान्य दिले होते. विज्ञानाधारीत वेगवेगळ्या विषयाचे ज्ञान संपादन करण्यासाठी विविध ठिकाणांहून माहिती मिळवली जायचे. अशाच प्रकारे बॅक्टैरीयॉलॉजीची माहिती घेण्यासाठी १०० रुपये आगावू देऊन डॉ. हिंदुराव घाटगे यांना मुंबईहून माहिती आणण्यासाठी पाठविले होते.[३१]

विज्ञान प्रदर्शनांतून विविध यंत्रसहाय्याने केलेले हस्तकलेचे नमुने, यंत्रे अशा प्रदर्शानातून मांडले गेल्याने कुतुहल निर्माण होऊन त्याचा वापर करण्याकडे लोकांचा कल तयार होत होता. कोल्हापूर संस्थानांमध्ये जैन परिषदेने १९०९ मध्ये शेतीविषयक प्रदर्शनात शेतीविषयक उत्पादनांबरोबरच विज्ञानाधारीत यंत्रे, अवजारे, स्थानिक कामगारांनी बनवलेली हातमागाचे कापडाचे नमुने, यंत्रावर तयार झालेले विणकाम, लेस यांचे नमुने हेही प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

५) शेतीपूरक जंगलाधारीत वस्तूंचे प्रदर्शन

आपल्या राज्यातील पारंपारिक कला, शेतकी संबंधाने साधने, अन्नाचे नमुने या वस्तूंबरोबरच नैसर्गिक जंगलसंपत्तीचा वापर वाढावा व त्यातून पूरक व्यवसाय निर्माण होऊन त्यांना व्यासपीठ मिळावा या हेतूने या प्रदर्शनांचा वापर महाराजांनी केलेला होता. जंगलाधारीत वस्तूंना चालना मिळावी म्हणून सन १९१४ ला भरणाऱ्या एका यात्रेत लाकडापासून तयार केलेले काही वस्तूंचे नमुने व जंगलसंबंधीत उत्पादनाच्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्याच्या विशेष सूचना दिल्या होत्या. अशा प्रदर्शनाच्या माध्यमातूनन राज्यातील जंगलसंपत्तीला हक्काची बाजारपेठ मिळत होती. [३२]

नवीन लागवडीचे प्रयोग

शेताच्या अर्थकारणात आमूलाग्र बदल घडवायचा असेल, तर त्यासाठी चहुबाजूनी प्रयत्न करावे लागतात. पारंपारीक पिकांबरोबरच काही नवपिकांच्या लागवडीचे प्रयोगही आवश्यक ठरतात, किंबहूना अशी प्रयोगशीलता प्रत्येक शेतकऱ्याने करावी, जेणेकरून त्यांना नवीन बाजारपेठ उपलब्ध होऊन फायदा होईल असे महाराजांना तळमळीने वाटत होते. कोणतेही नवीन प्रयोग जनमानसात रुजवायचे असतील तर त्यासाठी प्रथम शासकीय पातळीवर प्रयत्न करावे लागतात. त्या प्रयोगाची उपयुक्तता सिद्ध झाली आणि त्यातून मिळणाऱ्या आर्थिक फायदयाचा विश्वास आला, तर ते नंतर सर्वसामान्यांकडून सहजपणे स्वीकारले जातात व प्रत्यक्ष व्यवहारात अंमलात आणले जातात.

छत्रपतींनी प्रथम सरकारमार्फत चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, जायफळ, बाळंत लिंबू, तुती अशा नवीन पिकांच्या लागवडीचे प्रयोग सुरू केले होते. त्यात प्रामुख्याने चहा लागवडीचे प्रयोग

मोठ्या प्रमाणात केले गेले. देश-परदेशातूनही नवीन पद्धतीच्या पिकांची-झाडांची माहिती गोळा केली. संस्थानातील विविध ठिकाणाच्या भौगोलिक रचनेचा व आजूबाजूच्या वातावरणाचा अभ्यास करून कोणत्या पिकाला कोणत्या ठिकाणी पोषक वातावरण मिळेल, याचीही विविध ठिकाणी पहाणी करून निरिक्षण केले होते. उदा. चहा-कॉफी झाडे लावण्यासाठी त्यांनी मुख्यत्वे संस्थानाच्या उंच डोगराळ भागांच्या उतारावरील जमिनींचा वापर केला होता. तर तुतीच्या झाडांसाठी पुरेसे तेवढे पाणी मिळेल, अशी जमिनीची व्यवस्था बघून लागवड केली होती.

१) पन्हाळा येथील सरकारी बागांमधील विविध लागवड

संस्थानात प्रयोगशीलतेच्या माध्यमातून शेती व्यवसायाला उपयुक्त अशी नवीन पिकांची लागवड करण्यासाठी पन्हाळा येथील सरकारी बागांमध्ये असा उपक्रम राबविण्यात येत होता. पन्हाळा येथे असलेल्या काही सरकारी बागांमध्ये वेगवेगळी झाडे त्यांना वाढीस योग्य अशा जागेत लावण्यासाठी शाहू महाराजांनी आदेश देताना संध्याबाग, तीन दरवाजा बाग, सजे कोटी, लिंग बाग व सोमाळे बाग या एकूण ५ बागांमध्ये केळी, बुंद, वेलदोडे या झाडांची लागवड करायची असल्याने त्यांच्यासाठी लागणारी तेवढी जागा सोडून बाकीच्या जागेत तुतीच्या झाडांची लागवड करण्यास सांगीतले होते. याच भागातील दुसऱ्या असवाल डोंग नावाच्या बागेत चहाची लागवड आगोदरच केलेली होती आणि तेथल्याच माणिक बागेमध्ये तुतीच्या लागवडीचा विचार होता पण त्या ठिकाणी पावसामुळे साठलेल्या जास्त पाण्यामुळे ती लागवड रद्द करण्याचा निर्णय घेतला. महाराजांनी किती बारीक सारीक बाबींचा विचार करत व वातावरणाचा रोख बघत या वेगळ्या पद्धतीच्या झाडांची व्यवस्था केली होती हे कळते.[३३]

सरकारी बागांमधून पारंपरिक पिकांसोबत नवीन पद्धतीच्या चांगल्या उत्पन्नाच्या झाडांची लागवड करून राज्यातील लोकांना ती जमीन लागवडीसह लावणी लिलावाने ही देण्यात येत असे. पन्हाळा येथील बांगामध्ये केलेल्या बुंद, वेलदोडे व केळी या उत्पन्नाची झाडे ५ वर्षाकरीता लावणी लिलावाने देण्यासाठी सन १८९६ ला दिलेली नोटीस खालीलप्रमाणे होती.[३४]

		सर्वे नंबर	एकर	आकार
१)	सोमाळे तळ्यावरील बाग	४७	२.१३	७
२)	लिंग बाग	१९	३.४	७
३)	माणिक बाग	३५	१.३७	२
४)	तीन दरवाजा बाग	७०	३.२५	४

२) चहा लागवड

परदेशातल्या आणि उत्तर भारतात होणाऱ्या चहा लागवडीतून मिळणारा फायदा बघून महाराजांनी आपल्या संस्थानातही चहा लागवड करण्याचा एक अभिनव प्रयोग केला होता. त्यासाठी सरकारी जागेतून लागवड करुन लोकांनाही चहा लागवडीसाठी प्रोत्साहित केले. बाहेरून चहा बीज मागविण्यापासून त्यांची वाढ व अन्य बाबींवर वेळोवेळी खर्च केलेला आढळतो. चहा लागवड संस्थानातील पीक नसूनही त्यांनी हा प्रयोग यशस्वी करून दाखविला होता.

अ) पंजाब येथून चहाचे बी मागविणे

आधुनिक पीक असलेली चहा लागवड हा प्रयोग प्रथमच संस्थानात होत असल्याने येथील जनतेला चहा पिकाची फारशी माहिती असण्याचा प्रश्नच नव्हता. महाराजांनी त्यासाठी लागणाऱ्या प्रत्येक बाबींची पूर्तता जातीने लक्ष देऊन केली. चहा मुळातच संस्थानात होणारे पीक नव्हते. त्यामुळे सुरुवातीला रोपणासाठी त्याचे बी हे बाहेरूनच मागवावे लागत होते. पंजाब येथे ही लागवड होत असल्याने तेथून बऱ्याचवेळा चहाचे बी मागविल्याची नोंद मिळते.[३५]

- सन १९०९ ला रु. ३०० आगावू खर्च करून चहा बी मागवून आणि ते बी पन्हाळा व भुदरगड या ठिकाणाच्या सरकारी क्षेत्रात लागवडीसाठी पाठविले होते.

- सन १९१० ला चहाचे बीज आणण्यासाठी संस्थानाचे फॉरेस्ट ऑफिसर श्री. वासीकर व चहा लागवड कामासाठी ठेवलेल्या पंजाबी माणसाला ७०० रु. आगावू खर्च करुन बी आणण्यासाठी पंजाबला पाठविले होते.

- पंजाबाहून चहा बीज आणण्यासाठी सन १९१३ ला ४८१.११ एवढा खर्च करण्यास विशेष मंजूरी दिलेली होती.

आ) चहा लागवडीवर होणाऱ्या खर्चास मंजूरी

मुख्यत्वे पन्हाळा या थंड भागात चहा लागवडीसाठी चांगले वातावरण असल्याने तेथे दरवर्षी चहाची लागवड केली जायची. त्यासाठी विशेष खर्चाची तरतूदही होत असे.[३६]

- सन १९११ मध्ये पन्हाळामधील अस्वन बागेतील चहाच्या लागवडीचे व त्याच्या अनुषंगाने येणारे इतरही कामे पूर्ण करून घेतले होते, त्यावर झालेला खर्च रु.१६९५.२.३ रकमेस सरकारमार्फत विशेष मंजूरी दिली होती.

- जिऊर येथील अस्वन बागेत चहाच्या लागवडीवर एकूण १४९५.२.३ रुपये खर्च झाला होता. त्या खर्चास १९१३ च्या अंदाजपत्रकात मंजूरी देण्यात आली होती.

- पन्हाळा येथील जिऊरच्या अस्वल डोंग बागेत सन १९१४ ला रु. ६४६.९.४ एवढया खर्चाची चहा लागवड केली, त्याला त्वरीत मंजूरी दिली गेली.

- सन १९०४ ला एकूण ५ खंडी एवढे चहाचे बी खरेदी केले होते. ते बी बाहेरून आणण्यासाठी खर्च रु. ५६० मंजूर केला होता.

- बागलवाडी, पन्हाळा, बाजार भोगाव या तीन ठिकाणी चहा बी लागवड करण्याला रु. ७०० तरतूद करण्यात आली होती.

- बागलवाडी येथे चहा लागवड नवीन जागेत करून बघण्यासाठी तेथील गुरव धनगराची जमीन घेतली, त्याबदल्यात त्याला दरमहा धान्य देण्याची सूचना केली होती.

- बागलवाडी येथे चहा लागवडी साठी नेमलेल्या २ पंजाबी लोकांची मुदत डिसें.१९०६ ला संपत होती. परंतु सदर कामासाठी संस्थांनाकडून नेमलेल्या लोकांना पुरेशी माहितीगार न न झाल्याने त्यांना अजून २ वर्ष मुदतवाढ देण्याचा महाराजांनी निर्णय घेतला होता.

- बागलवाडी येथे करण्यात आलेल्या चहा रोपणावर सन १९१४ ला ६२४.१२.१० रु. झालेला खर्च मंजूर केला होता.

- दि.१९/९/१९०५ रोजी पन्हाळा पेट्यातील चहा लागवडीसाठी २०० रू खर्चास मान्यता दिली होती.

- चहाकामासाठी नेमलेल्या पंजाबी माणसाकडे महाराजांनी १९०५ मध्ये चहा बीज खरेदीसाठी ५२७ रु. दिले असल्याची नोंद आढळते.

- सन १९०५ मध्ये संस्थानात चहा–कॉफी या दोन आधुनिक पिकांची लागवड एकदम करण्यात आली होती. त्यासाठी रुपये १००० खर्च करण्यात आले होते.

इ) विलायती चहाची लागवड

- काही वेळा परदेशातून प्रयोगासाठी चहा बीज आणलेले होते, असे विलायती चहाची लागवड शाहू महाराजांनी नांदगाव या गावात केली होती, परंतु तेथे त्या पिकांना रानटी जनावरांपासून उपद्रव होत असल्याने त्याचा प्रतिबंध करण्यासाठी लागणारे दारू सामान व इतर बाबीं खरेदी करण्यास रु. १७ मंजूर केले होते.[३७]

- पन्हाळा येथे असलेल्या नांदगावात सन १९०६ ला जी विलायती चहा झाडांची लागवड केली होती, त्याच्या रक्षणासाठी व जोपासना करण्यासाठी माळी व इतर लोकांची नेमणूक केली होती. पिकांच्या देखभालीकरिता त्यांनी त्याच ठिकाणी राहावे असा आदेश शाहू महाराजांचा होता. त्यासाठी त्याच ठिकाणी त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी १०० रुपयांची विशेष तरतूद केली होती.[३८]

ई) राधानगरी भागातील चहा लागवड

राधानगरी या भागातसुद्धा वेळोवेळी चहाची लागवड केलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यास मंजूरी दिल्याचे आढळून येते.[३९]

- राधानगरी येथे चहा बाग उभारण्याचा आदेश १९११ मध्ये महाराजांनी दिला होता. त्यासाठी त्यांनी १००० रु. आगावू दिले होते. तसेच सदर लागवडीचा खर्च नंतरही पुढे चालू ठेवण्याबाबतची सूचना त्याचवर्षी महाराजांनी केली होती.

- सन १९१२ साली राधानगरी येथे चहा लागवड करण्याचा मोठा प्रयोग केला होता. त्यावेळी नवीन चहा लागवडीसाठी १ लाख चहाची झाडे लावण्यात आली. त्या कामासाठी लागणाऱ्या खर्चापैकी २००० रुपये आगावू रक्कम मंजूर करून मोठ्या संख्येने चहा झाडांचे रोपण केले गेले.

- राधानगरी या परिसरात सन १९१६ साली चहा लागवडीचा उपक्रम शाहू महाराजांच्या आज्ञेवरून सुरू झालेला होता. या कामासाठी व त्यातून उत्पन्न वगैरे निघून येईपर्यंत २ वर्ष कालावधीसाठी एकूण ३००० रुपये रकमेची आगावू तरतूद केली होती व दोन वर्षानंतर त्या लागवडीवर झालेला खर्च व उत्पन्न यांचा ताळमेळ महाराजांना सादर करायचा होता, परंतु त्या दोन वर्षांत साधारण काम पूर्ण होत आले असले, तरी लगेचच त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज येणार नाही, असे बघून महाराजांनी पुढे आणखी २ वर्षे त्यावर खर्च करण्याची मंजुरी देऊन सुरू केलेल्या नवीन प्रयोगांना यशस्वी करण्यासाठी पुरेसा वेळ व आवश्यक तेवढा खर्च ही केलेला दिसून येतो.

- महाराजांनी लखाराम टी प्लॅन्टर या माणसाला चहा लागवडीसाठी नेमण्यात आले होते. सन १९०९ मध्ये त्याला चहाचे बी विकत आणण्यासाठी महाराजांनी एकूण १०१२.११.६ रु. दिले होते.

उ) चहा लागवड करणाऱ्यास बक्षीस

चहाच्या लागवडीच्या कामासाठी विशेष माहितीगार व्यक्ती असणे क्रमप्राप्त होते. महाराजांनी संस्थानात चहा लागवडीचे प्रयोग यशस्वी होण्यासाठी स्वतंत्रपणे काही माहितीगार माणसांची नेमणूक केली होती. त्यापैकी २ पंजाबी माणसांना त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल प्रत्येकी १०० रुपये बक्षीस रूपात देऊन महाराजांनी त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन दिले होते.[४०]

ऊ) चहा लागवडीसाठी जनावरे खरेदी खर्चास मंजुरी

राज्यातील विविध ठिकाणी ज्या आधुनिक पिकांच्या लागवडीचा उपक्रम सुरू केला होता, त्यात मुख्य चहाच्या पिकाची लागवड जास्त होती. चहा हे थंड हवेच्या ठिकाणी होणारे पीक असल्याने संस्थानातील पन्हाळासारख्या उंचावरील, थंड हवेच्या डोंगराळ भागात त्याची लागवड केलेली होती. डोंगराळ भाग व उंच ठिकाण यामुळे तेथे जाणे–येणे, लागवड करताना सोईचे व्हावे तसेच इतर मशागतीसाठीसुद्धा उपयोगाचे व्हावे, म्हणून जनावरांचा उपयोग करत असत. पन्हाळामधील अस्वल डोंग बागेत चहाची झाडे लावण्यासाठी सरकारातून २ रेडे, २ बैल घेण्यासाठी एकूण १८०० रुपये मंजूर करून चार जनावरे घेण्याची तरतूदसुद्धा करण्यात आली होती.[४१]

ऋ) चहा विक्री दर

चहा लागवड प्रयोग यशस्वी होत असताना पन्हाळा येथून तयार होणाऱ्या चहाची विक्री दरपौंडास ०.८ प्रमाणे करावी असा दर महाराजांनी ठरवून दिला होता.[४२]

३) वेलदोडा लागवड

चहा बरोबरच वेलदोडा या नवीन पद्धतीच्या पीक लागवडीवर भर देऊन पिकाच्या लागवडीसाठी लागणाऱ्या खर्चासाठी भरीव तरतूद केल्याचे दिसते. अशा वेगळ्या पिकांमुळे बाजारपेठेत नवी संधी निर्माण करण्याचा हा प्रयत्न होता.[४३]

- पन्हाळा येथील सरकारी तबक बागेच्या जागेत वेलदाड्याची लागवड कलेली होती, त्या झाडांना पाण्याच्या सोयीसाठी हौद दुरुस्त करणे, पाट व मोटवण यांची सोय करणे यासाठी रुपये १४८ या खर्चास सन १९११ ला विशेष मंजुरी दिली होती.
- पन्हाळा जगदाळ बागेत सन १९१३ ला केलेल्या वेलदोडा लागवडीसाठी रु. २०५ या खर्चास विशेष मंजूरी प्रदान केली. या बागेतील काही वेलदोड्यांची विक्री दुसऱ्या वर्षी दरशेरी रु. ६.४ नुसार केलेली आढळते.
- आंबवडे–जगदाळ बागेत व पाताळनगरीतील बागेत एकत्रितपणे वेलदोडा व केळी लावण्यासाठी ६२१ रु. चे अंदाजपत्रक मंजूर केले
- वेलदोड्याच्या लागवडीकरिता वागजाई देवस्थानच्या जवळची जमीन घेण्यात आली. या जमिनीवर केवळ वेलदोड्याचेच पीक घ्यावे अशी आज्ञा महाराजांनी दिली. ती जमीन लागवडीयोग्य होण्यासाठी त्यातील गवतरान काढण्याच्या कामासाठी रू. ६६४ एवढी रक्कम दिली होती.

४) जायफळ लागवड

पन्हाळा या भागात आधुनिक पद्धतीचे पीक उत्पादन घेतले जायचे. सन १९०८ मध्ये तेथील तबला व जगदाळ बाग या सरकारी बागांमध्ये ३०० जायफळांची रोपे लागवड केली होती. [४४]

५) रबर लागवड

रबर या नवीन पिकासाठी पाण्याची सोय बघून एक प्रयोगात्मक लागवड करण्यासाठी वळवडे गावातील एका झऱ्याच्या बाजूला सरकारी जमिनीवर रबर रोपांची बाग करण्यास ४०० रू. पर्यंत खर्च करण्यास मंजुरी दिली होती.[४५]

६) कॉफी लागवड

दक्षिण भारतातील यशस्वी कॉफी लागवडीचे प्रात्यक्षिक पाहून महाराजांनी संस्थाना कॉफी लागवड करण्याचा निर्णय घेतला. कॉफी लागवडीसाठी संस्थानातील डोंगराळ भाग हा अनुकूल असल्याने येथील जमिनी कॉफी लागवडीसाठी आणायचे ठरवले. सुरुवातील पन्हाळा पेट्यात

पेंडखले या गावात डोंगर उतारावर २००० कॉफीची रोपे लावण्यात आली. तशाच पद्धतीने भुदरगड पेट्यातही कॉफी लागवड करण्यात आली.

बागलवाड येथील सरकारी जमिनीवर प्रयोग म्हणून कॉफी लागवड करण्याची परवानगी दिली होती. या लागवडीमध्ये कॉफीसाठी लागणारे पपलिंग व पिलिंग अशी २ यंत्र खरेदी केली, त्याचे रु. २५४.२ व त्या यंत्रांच्या स्टँडसाठी रु. ९.१२ मिळून रु. २६३.१४ खर्च मंजूर केला होता.[४६]

७) आंबा लागवड

कोल्हापूर संस्थानातील नवीन पद्धतीच्या आंब्याची कलमे लावण्याचे महाराजांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी दाजी बंगलाजवळी १२ बिघे जागेत आंब्याची बाटे लावून तेथे आमराई करण्यास परवानगी दिली होती.[४७]

८) बाळंत लिंबाच्या झाडाची लागवड

बाळंत लिंब हा लिंबाच्या जातींमधील एक नवीन जात होती. त्यामुळे बाळंत लिंबाचे उत्पादन संस्थानात व्हावे यासाठी महाराजांनी जुना राजवाडा परिसरात जागेची उपलब्धता करून दिली. त्याचबरोबर या लिंबाच्या बागेच्या लागवडीच्या खर्चासाठी म्हणून १९१५ साली महाराजांनी. ३५.८.४ रुपयाच्या निधीला मंजूरी दिली होती.[४८] शिवाय या लिबांच्या झाडांना वेळेचेवेळी पाणी मिळण्यासाठी आवश्यक खर्चाची तरतूदही महाराजांनी केली होती.

९) नवीन पद्धतीच्या भाताची लागवड

नवीन प्रयोग करण्याच्या महाराजांच्या शैलीमुळे त्यांनी पंजाबमधील विशेष प्रकारचा २ मण पंजाबी भात पंजाबहून मागवून बागलवाडी या भागात पेरणी करण्याला रु. २५ मंजूर केले होते.[४९]

१०) रेडडोहात बद्धाची झाडे लागवड

ही एक नवीन प्रजातीचे झाड असल्याने त्याची झाडे लावण्यासाठी एकूण ३८७ रू. खर्च केले होते. आणि या झाडांची जोपासना करून त्यांना पाणी घालण्यासाठी येणाऱ्या रुपये १३३.७.६ रकमेला मंजूर करून अशा नवीन वृक्षलागवडीस महाराजांनी प्रोत्साहन दिले होते.[५०]

११) तुतीची लागवड

तुतीच्या झाडांची लागवड ही आधुनिक पीक पद्धतीत नवीन अर्थाजनाचे एक साधन होते. रेशीम किड्यांच्या पोषणासाठी तुतीची लागवड केली जाते. रेशीम शेती ही आधुनिक पद्धतीची अर्थाजनाची खात्रीशीर मार्ग असल्याची शेती होती. महाराजांनी त्याबाबत पुढाकार घेतलेला होता. रेशीम कारखाना संस्थानात सुरू करून त्याला पूरक व आवश्यक तुतीच्या झाड लागवडीला प्राधान्य दिले होते. अन्य लागवडीप्रमाणे तुतीच्या लागवडीवर खर्चाची, जागेची तरतूद वेळोवेळी केलेली होती हे काही तपशीलावरून कळून येते.[५१]

- भुदरगड भागातील फराळे गावातील सरकारी जमिनीवर तुतीची लागवड करण्याला प्राधान्य दिले गेले. याच पेट्यातील वळीववडे गावात रेशीम कारखाना काढण्यापासून तुतीची लागवड करण्यासाठी रु. ५००० ही मंजूर करुन स्वतंत्र बंगलाच या कामासाठी उपलब्ध करून दिला होता.
- वाडी रत्नागिरी येथे स्थापन केलेल्या रेशीम कारखान्यासाठी त्याच बाजूच्या परिसरात सन १९०९ ला तुतीची लागवड करण्यासाठी देवाच्या उत्पन्नातून ३०० रु आगावू दिले होते.
- वाडी रत्नागीरी येथे जेव्हा तुतीची झाडे लावण्याचे निश्चित केले, तेव्हा त्या कामासाठी काही लोकांची जमीन घेतली होती, त्याबदल्यात त्यांना योग्य तो मोबदलाही दिला होता.
- सुरुवातीला तुतीच्या झाडांची लागवड ही सार्वजनिक सरकारी काम म्हणून करण्यात येत असे. ज्योतिबा डोंगरावरील वाडी रत्नागिरी येथे रेशीम कारखानाच असल्यामुळे तेथे ही लागवड करण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या तळयाजवळची जमीन बघून १८.३८ एवढी जागा या तुतीची झाडे लावण्यासाठी मोबदला देऊन घेतली. पुढे त्याच जागेजवळ अधिकची जागा घेऊन तिथे तुतीची लागवडीखालील क्षेत्रात वाढ करावी, असा आदेश महाराजांनी दिला होता.
- **शेतकरी भागीदार –** महाराजांनी तुतीच्या लागवडीसाठी शहरातील गायमुख तलावाजवळची जागा ताब्यात घेण्याची आज्ञा केली. येथे तुतीशिवाय अन्य कोणतीही पीक घेण्यात येऊ नये, अशी त्यांची सक्त सूचना होती. त्याचबरोबर तुतीसाठी आपली शेती देणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पन्नात भागीदार करून घेण्यात यावे, असा आदेशही त्यांनी दिला होता.

१२) नवीन पद्धतीच्या पीक लागवडींसाठी संपादित जमिनीचा मोबदला

शेती व्यवसायासंदर्भातील विकासकामासाठी काही नवीन पद्धतीच्या पिकांची लागवड हे एक चांगले धोरण छत्रपतींनी राबविले होते. तथापि, काहीवेळा असे प्रयोग पहिल्या टप्यावर सरकारलाच करावे लागतात. संस्थानात ही अशा नवीन पिकांच्या लागवडीसाठी सरकारामार्फत काम सुरू केले होते. त्यासाठी त्यांना आवश्यक अशा जमिनी लोकांकडून घेण्याचे प्रसंग येत असत. हे काम जरी सार्वजनीक असले तरी लोकांचे हित लक्षात घेऊन त्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला महाराजांनी नेहमीच दिलेला होता.[५२]

- ज्योतिबा डोंगराजवळ वाडी रत्नागीरी या भागातील तळयाजवळची जमीन ही तुतुची झाडे लावण्यासाठी फार उपयुक्त अशी होती. झाडांना वाढीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता ही तेथे असल्याने ४८.१४ रक्कमेची एकूण १८.३८ एवढी जमीन तिथल्या लोकांकडून घेऊन त्यांना सरकारामार्फत त्याबदल्यात देवस्थानापैकी असलेल्या जमिनी मोबदला म्हणून देण्याची व्यवस्था शाहू महाराजांच्या आज्ञेने केली गेली.
- राधानगरी येथील मुबलक जागेमध्ये सन १९१८ ला चहा पीक लागवडीच्या बागा तयार करण्यासाठी सरकारातून १६५ रूपये विशेष भरपाई देऊन तिथल्या स्थानिक लोकांच्या जमिनी या बागांच्या कामासाठी घेतलेल्या होत्या.
- राधानगरी याच ठिकाणी सन १९२० ला चहा लागवडीसाठी जयराम सोनार या व्यक्तीची २ रु. किंमतीची १.३९ एकर व आणखी एक १०.८ आकाराची जमीन घेतली होती.

१३) आधुनिक पीक लागवडीसाठी जमीन इनाम देण्याबाबत

आधुनिक पीक पद्धतीच्या लागवडी या सुरुवातीला सरकारमार्फत होत होत्या, पण संस्थानातील लोकांनीही त्याचे अनुकरण करावे व अशी लागवड त्यांच्या शेतात करण्यावर भर द्यावा, अशी महाराजांची इच्छा होती. बऱ्याचदा सरकारने या कामासाठी लोकांच्या जमिनी ताब्यात घेतल्या होत्या, पण काहीवेळा अशा प्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराजांनी काही जमीन इनाम म्हणून दिल्याचे ही विशेष उदाहरण आहे.

मुधोळ संस्थानाचे श्रीमंत मालोजीराव नानासाहेब घोरपडे राजे यांनी महाराजांच्या आधुनिक पीक लागवडीच्या प्रयोगशीलतेचे यश बघून अशाच नवीन पद्धतीच्या पिकाची लागवड करण्याची इच्छा व्यक्त केली व त्यासाठी कोल्हापूर शहराजवळच कोठे तरी चांगली जमीन मिळावी, अशी मागणी केली होती, तेव्हा महाराजांनी त्यांची ही इच्छा पूर्ण करताना करवीर पेट्यातील वडगणे या गावाच्या हद्दीतील श्रीमत शिवाजी महाराज यांच्या नावे असलेल्या जमिनीपैकी एकूण ५ ठिकाणाच्या ३२६ या एकूण आकाराप्रमाणे असणारी ५७.२७ एवढी जमिनी वंशपरंपरेच्या कराराने जात इनाम म्हणून दिल्या होत्या.[५३]

छत्रपती शाहू महाराजांनी आधुनिक पीक लागवडीला दिलेले प्रोत्साहन निश्चितच फायदेशीर ठरल्याचे दिसून येते. जंगल हद्द ठरवण्यासाठी कोरफडीच्या लागवडीचा उपयोग केला. गंजन या गवतापासून राळ तरयार करण्यासाठी अगदी खानदेशातून तज्ज्ञ आणले होते. याशिवाय बुंद, रबर, ताग, कंबोडियन कापूस, बेळगावी बटाटे, टॉपिओका, अशा आधुनिक पीक लागवडीला प्रोत्साहन दिले.

शेती उपयुक्त तंत्रज्ञानाचे शिक्षण व प्रोत्साहन

शेतीतील विकास हा बदलत्या नवीन तंत्रज्ञानावर आधारित असून त्यायोगाने शेती व शेती पूरक व्यवसायाच्या उत्पादनावर चांगला परिणाम होऊन परिणामी बाजारपेठेत चांगला हमीभाव मिळणे शक्य होते, हे छत्रपतींनी परदेश वारीत जाणलेच होते. शेतकऱ्यांच्या कष्टाला सुसह्य करून शेतकामाचा वेळ वाचविणाऱ्या व तरीही उत्तम फायदा देणाऱ्या आधुनिक यंत्राचा वापर गरजेचा होता. महाराजांनी शेतकऱ्यांना शेतात लाकडी नांगराऐवजी लोखंडी नांगर व ट्रॅक्टर वापरण्याचे प्रबोधनही केले होते.

आधुनिक तंत्रज्ञानाबाबत आपले विचार मांडताना महाराज एका भाषणात म्हणतात की, ''शेतकी सुधारणेला, सुधारलेल्या औताची फार जरुरी आहे. आपले लक्ष तिकडे आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आपल्यासारख्या कुशल लोकांनी या बाजूस विशेष लक्ष दिल्यास ही उणीव भरून येणार आहे. नांगर व विहिरीचे पाणी काढण्याची मोट याची सुधारणा ही आमच्या प्रत्येक शेतकऱ्याचे हित करणारी आहे. त्या दृष्टीने आपल्या प्रयत्नांचे अभिनंदन करतो .आपले प्रयत्न यशस्वी होण्यासाठी मजकडून योग्य ती मदत अवश्य मिळेल, याविषयी शंका नको.''

नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांचे महत्त्व लक्षात घेऊन सरकारबरोबर लोकांनीही अशी यंत्रे तयार करण्याला छत्रपती महाराजांनी प्रसंगी प्रोत्साहन दिले होते.

ऊसाच्या गाळणीकामाच्यावेळी जे घाणे वापरले जायचे, त्यात बऱ्याचदा मजुरांचे हात त्या घाण्यात जाऊन त्यांच्या बोटांना इजा व्हायची वा ते निकामी व्हायचे. हे प्रकार बहुतेक वेळा घडत असे. यावर उपाय करण्याच्या दृष्टीने महाराजांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत यंत्राची गरज होती. त्यासाठी त्यांनी लोकांनीच यावर युक्ती शोधून काढावी, म्हणून एक जाहिरनामाच प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी घाण्यामध्ये हात सापडणार नाही आणि सापडलाच तर त्यास इजा होणार नाही अशी युक्ती तारिख १ जानेवारी, १८९६ च्या आत कोणी शोधून काढल्यास ज्याची युक्ती सोपी, थोडक्या खर्चात होणारी व पसंत अशी ठरेल त्यास चांगले बक्षीस देण्यात येईल असे प्रोत्साहनपर आवाहन केले होते.[५४]

याला अर्थातच चांगला प्रतिसाद मिळून काही लोकांनी नमूने तयार केले, त्यापैकी काही नमुने प्रत्येक मामलेदारांकडे पाठवून प्रजेच्या माहितीसाठी दि. २८/१/१८९९ ला आणखी एक जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यात त्यांनी नव्या युक्तीने तयार केलेल्या घाण्याचे नमुने सर्व लोकांस पाहण्यास सुलभ पडावे म्हणून सर्व पेट्याचे मामलेदार व महालकरी यांच्याकडे एक एक नमुना तयार करून पाठविण्यात आलेला आहे, तो सर्वांस पाहण्यास मिळेल, या प्रमाणेच लोकांनी आपापले घाण्यांमध्ये सोयी केल्याखेरीज अपाय होण्याचे चुकणार नाहीत. यासाठी शेतकरी लोकांनी ही युक्ती पाहून त्याप्रमाणे आपापले घाण्यात सुधारणा करण्याची व्यवस्था करावी व तसे करण्यास मामलेदार लोकांनी लोकांची मने वळवावी, असे जाहीर करून सार्वजनिक सोयीसाठी सदर प्रमाणे तजवीज करण्यात आली आहे त्यांचे लोकांनी अनुकरण करावे अशी सरकारची इच्छा आहे तसे न झाल्यास त्याच बद्दल सरकारास योग्य तो विचार करणे जरूर पडेल. अशी सूचना देऊन लोकांच्या भल्यासाठी नेहमीच तत्परता दाखविली होती.[५५]

आधुनिक पद्धतीच्या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी शाहू महाराजांनी लोकांना आवाहन करून त्यांना आर्थिक मदतसुद्धा केलेली आढळते. त्याकाळी मेलेल्या गुरांची कातडी काढणे व त्यापासून चामडे तयार करण्याच्या पारंपरिक व्यवसाय होता. या कामात फार श्रम पडून वेळ जात असे. आधुनिक तंत्राच्या मदतीने हा व्यवसाय अधिक चांगला करण्याच्या हेतूने

संस्थानातील श्रीपती लक्ष्मण शिंदे याला व्यक्तीला मद्रास येथील स्कूल ऑफ आर्टस या तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या संस्थेत २५.४ रु मदत देऊन कातडी कमावण्याच्या माहितीकरिता पाठविण्यात आले होते.

याच श्रीपती लक्ष्मण शिंदे यांनी आधुनिक पद्धतीवर आधारित क्रोम लेदर टॅनींगचा कारखाना संस्थानात काढावा या इच्छेने महाराजांनी शिंदे यांना मुंबई येथील स्कूल ऑफ आर्टचा कारखाना पाहून आवश्यक ती माहिती घेऊन येण्याची सूचनाही केली होती.[५६]

शेती संशोधन व संवर्धन

संस्थानात विविध रोपांचे जतन व संवर्धन होण्यासाठी, त्यांचा अभ्यास व्हावा आणि त्यांची माहिती लोकांना मिळावी या उद्देशाने महाराजांनी विविध नर्सरी, पार्क, बाग उभारले होते. काही ठिकाणी अनेक प्रकारची झाडे एकत्रित लागवड करून त्यांचा सामूहिक अभ्यास केला जात असे, तर काही ठिकाणी विशेष एकाच प्रकारच्या झाडांची लागवड करून त्यांचा अभ्यास केला जात असे. तसेच काही जागांमध्ये संशोधनाधारित विविध पारंपारिक वा नवीन पद्धतीच्या पिकांची रोपे तयार करून त्यांची जोपासना करून ती शेतकरी वर्गाला सहज उपलब्ध होतील, अशा पद्धतीने कलमी, अस्सल जातीची रोपे लावली जात.

शेती विकासाच्या टप्प्यावर विविध झाडांची माहिती, त्यांची वाढ, त्यांना येणारा खर्च व त्यातून मिळणारे उत्पन्न, त्यातून होणारा आर्थिक फायदा या सर्व गोष्टींचा अभ्यास हा एकाच ठिकाणी करता येत होता. आदर्श शेतीचे प्रयोग जसे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी लाभदायक होते, तसेच नवीन पद्धतीच्या रोपांची लागवड करून त्यांचे गुणधर्म तपासण्यासाठी त्याच्यावर काही ठराविक काळात संशोधन करणे व त्यासाठी त्यांचे योग्य संवर्धन करणे हे काम या नर्सरी, बाग किंवा पार्कमधून चालायचे. यातून निघणारे निष्कर्ष सहाजिकच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात लागवडीसाठी व उत्पादनासाठी मागादर्शक ठरत होते.

१) कात्यायनी येथे पार्क उभारणी (बोटॅनिकल गार्डन)

शाहू महाराजांनी काही विशिष्ट औषधी झाडाची लागवड करण्याच्या हेतूने दिनांक ४/५/१९०५ रोजी कात्यायनी पार्क या भागात औषधी झाडे लावून एक नर्सरी तयार करण्याची योजना

आखली होती. प्रामुख्याने ही नर्सरी औषधी वनस्पतींची असल्याने त्याला 'बोटॅनिकल गार्डन' नाव देण्याची शिफारस खुद्द शाहू महाराजांनीच केली होती. या कामासाठी रुपये ६००० मंजूर करून अशा प्रकारचे गार्डन इतर प्रांतात दुसरीकडे कोठे असल्यास त्याबाबत अधिक माहिती मिळण्यासाठी असिस्टंट पदावरील श्री. भोसले या व्यक्तीला प्रत्यक्ष त्या त्या भागात जाऊन तेथून अधिक माहिती आणण्याची जबाबदारी दिली होती.[५७]

सदर गार्डन कात्यायनी भागात असल्याने नंतरच्या काळात हे गार्डन 'कात्यायनी पार्क' या नावाने ओळखले जाऊ लागले. याचे कामकाज हे श्रीमंत चिफ ऑफ कागल यांच्या देखरेखीखाली चालू करून पार्कसाठी आवश्यक त्या जमिनी लोकांकडून संपादन करून त्यांना सरकारच्या कुरणांपैकी असलेल्या जमिनी देण्याची व्यवस्थाही केली होती. सदर पार्कच्या कामावर जुलै १९०५ ला ७०० रुपये खर्च झाला होता. या पार्कसाठी जमिनी अधिग्रहीत करण्याच्यावेळी जुने वाळिंगे भागात असलेल्या इस्पूर्ली व दिंडनेर्ली या गावांतील ३४६.२५ एवढी जमीन या कात्यायनी पार्कसाठी घेतली.

दत्ताजी बाळासाहेब घाटगे, कागल ज्युनियर यांचीही ५५ आकार असलेली जमीन कात्यायनी पार्कसाठी घेतल्याचे दिसून येते यावरुन हा प्रकल्प किती महत्त्वाचा होता हे समजते. कात्यायनी पार्कच्या संकल्पनेनुसार तेथेच पाण्याची तरतूद करण्याच्या उद्देशने ४४७.६.४ रूपये विशेष खर्च मंजूर करून एक लहान तलाव काढण्यात आला. कात्यायनी पार्क उपयुक्ततेमुळे पुढील २–३ वर्षांमध्ये कात्यायनी पार्क परिसरातील केशवराव जाधव, हवालदार यांच्या मालकीची ८६१०.६ एवढी जमीन १० रु. आकाराने घेऊन पार्कच्या विस्तारीकरणासाठी ती जमीन उपयोगात आणली. जाधव, हवालदार यांना त्यांच्या जमिनीच्या बदल्यात वडगणे या गावी दुसरी जमीन देण्यात आली.

अशा प्रकारचे पार्क वा गार्डन दुसऱ्या भागांतही तयार करण्याच्या योजनांतर्गत रेदाळ, यळगुड, सांगाव, पट्टणकोडोली, तळंदगे, हुपरी व करवीर पेठेतील हलसवडे या गावाच्या आसपासच्या रानातील सरकार मालकीच्या जमिनी आणल्या गेल्या. . शिवाय सदर पार्कसाठी निश्चित केलेल्या जागेत ज्या इतर लोकांच्या जमिनी येतील त्याही घेऊन त्यांना त्याचा मोबदला देऊन

त्या भागात पार्क तयार करण्याचे शाहू महाराजांचे आदेश होते. यामुळे अशा आधुनिक प्रयोगातून रयतेला शेतीसुधारण्यास मदतच झाली.[५८]

२) रोपवाटीका /नर्सरी गार्डन

रोपवाटिका किंवा नर्सरी गार्डन अथवा बाग यामध्ये वेगवेळ्या झाडांची लागवड करून त्यांची जोपासना करण्याचे कामाला शाहू महाराजांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. रोपवाटिकांमध्ये शक्यतो विविध प्रकारची रोपे लावून किंवा एकाच प्रकारची रोपे लावून त्यांची जोपासना करून योग्य वाढीची काळजी घेतली जाते. त्यात जातीवंत रोप, कलमी रोप, फळझाडे, फुलझाडे वा अन्य पिकांची रोपे तयार केली जातात. अशी रोपे ही शेतकऱ्यांना घाऊक स्वरुपात विकण्यासाठी तयार केलेली असतात. अशी रोपे सहज उपलब्ध झाल्याने शेतकऱ्याला मोसमाप्रमाणे अंदाज घेऊन पिकांची लागवड करणे शक्य होते. तसेच लोकांना एकाच ठिकाणी अनेक झाडांची माहिती यामुळे मिळू शकते. महाराजांनी अशा रोपवाटिका शेतकी संस्थेच्या जागेत आणि अन्य ठिकाणीदेखील तयार केल्या होत्या.[५९]

- चहाचे पीक संस्थानात नवीन असल्याने त्याचे बी हे पंजाबसारख्या परप्रांतातून मागवले जायचे; परंतु आपल्याच संस्थानात चहा रोपांना विकसित करण्यासाठी नर्सरीचा आधार घेतला गेला. लागवडीसाठी तयार रोपे देण्याच्या या प्रयोगासाठी पन्हाळा येथील पोर्ले गावात एक नर्सरी उभी केली. सदर जागेत एकूण १२५ रूपये खर्च करून चहाची ५०० रोपे लावण्यात आली होती.

- कोल्हापूर शहरातही ब्रम्हपुरीजवळच्या भागात लोकांच्या सोयीसाठी विविध रोपांची उपलब्धता व्हावी, म्हणून नर्सरी गार्डन बांधण्याची महाराजांनी आज्ञाच देऊन नर्सरी तयार केली.

- पन्हाळा येथील बोरगावमधील काही लोकांच्या जमिन घेण्यात आल्या. त्यांना रु. २४० एवढा मोबदला सरकारकडून देऊन त्या जमिनींचा वापर नर्सरी प्रयोगासाठी केला होता.

- कोल्हापूर शहरातील टाऊन हॉल येथे महाराजांच्या आज्ञेवरून नवीन प्लाँट हाऊस बांधण्याचे काम चालू केले होते. या कामावर १९०७ मध्ये २०१ रुपये खर्च करण्यात आले होते.

- भुदरगड भागातील एक रोपवाटिका रुपये ३५५.१०.८ खर्चून तयार करण्यात आली होती.

शेतीपूरक व्यवसायास चालना

शेती पूर्णत: पावसावर अवलंबून असल्याने कधी दुष्काळ तर कधी पावसाचा लहरीपणा यामुळे शेतीतील पीक उत्पादन एका मर्यादेपर्यंत शेतकरी घेत होते. उदरनिर्वाहासाठी बहुतेक लोक दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुपालन अशा पारंपरिक पूरक व्यवसायावर अवलंबून होते. शाहू महाराजांनी शेती सुधारण्याबरोबरच या पूरक व्यवसायातही नावीन्यपूर्ण उद्योगाधारित व्यवसाय करण्याला चालना दिली होती. अशा व्यवसायांसाठी सरकारकडून खास आर्थिक तरतूद केल्याने शेतमजूरासह इतर लहान-मोठ्या व्यावसायिकांना रोजगाराची चांगली संधी मिळाली.

अशा व्यवसायापैकी मधुमक्षीका पालन हा जोडव्यवयाय केवळ महाराजांच्या स्वयंप्रशिक्षणाने यशस्वी झालेला उद्योग होता. परदेशप्रवासात इटलीमध्ये याची त्यांना प्रेरणा मिळाली होती. संस्थानातील सहयाद्री भाग यासाठी उत्तम होता. या व्यवसायाचे शास्त्रीय प्रशिक्षण कोल्हापूरात व आजूबाजूच्या प्रांतांमध्येही उपलब्ध झाले नाही. कलकत्त्यातील डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर यामधूनही विशेष माहिती न मिळाल्याने त्यांनी स्वत: अनुभवाच्या आधारे इथल्या लोकांना प्रशिक्षित करुन उत्तमपणे हा व्यवसाय चालू ठेवला व अर्थाजनाची नवी वाट स्वत:च शोधून काढली.

या जोडीने संस्थानाला लाभलेल्या जंगलसंपत्तीचा वापर व्यवसायासाठी करताना लाकडांधारीत उद्योगास महाराजांच्या काळात चालना दिली गेली. वनौषधींपासून तेले बनविणे हा उपक्रम ही यशस्वी केला होता. कोल्हापुरात तयार झालेली सुगंधी तेले ही त्यावेळी विशेष लोकप्रिय ठरली होती. लाकडांपासून लोणारी कोळसा, डांबर इत्यादी उत्पादन सुरू केले होते. अशा उपक्रमांमधून आर्थिक फायदयाची नवीन क्षेत्रे कोल्हापूरात तयार होण्याचे श्रेय केवळ महाराजांच्या आधुनिक प्रयोग कृतीशीलतेलाच जाते. [६०]

उद्योगव्यवसायांना चालना

छत्रपती शाहू महाराजांच्या राजवटीपूर्वी संस्थानात उद्योगधंदे फारसे नव्हतेच. मुंबई परिसरात बहुतेक उद्योगधंदे एकवटलेले होते. आपल्या राज्याची आर्थिक प्रगती साधायची असेल, तर मूळ शेतीत आधुनिकता आाणून तिचा विकास करणे, हे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच संस्थानात व्यापार-उद्योगांना पोषक वातावरण तयार करण्याचे महत्त्व महाराजांनी ओळखले होते. शेती-व्यापार-उद्योग हे एकमेकांस पूरक असून त्यांची साखळी तयार झाली, तर संस्थानाच्या आर्थिक प्रगतीची वाटचाल सुरू होईल, यासाठी आधुनिक पद्धतीच्या तंत्रज्ञानावर आधारित नवविविध कारखाने निर्मिती ही संस्थानात व्हावी, म्हणून अनेक स्तरावर प्रयत्न करून त्यांची वाढ होण्यासाठी वेळोवेळी सहकार्य ही केले. शेतमाल उत्पन्नासाठी व इतर स्थानिक व्यवसायासाठी कारखाने, उद्योग महत्त्वाचे होतेच, शिवाय त्यातून येथल्या लोकांना रोजगाराची चांगली संधी उपलब्ध होणार होती. महाराजांनी आपल्या संस्थानात उद्योगधंदे वाढीसाठी अनुकुलता आणण्याचे सातत्य नेहमीच ठेवले होते. राज्यात प्रशिक्षित कामगार तयार होण्यासाठी तंत्रज्ञानाधारित 'राजाराम इंडस्ट्रियल स्कूल'ची ही निर्मिती केली होती.

'श्री राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल'ने आयोजित केलेल्या कृषी-औद्योगिक प्रदर्शनाच्या भाषणात उद्योगाबाबत आपले मत स्पष्टपणे मांडले. ते म्हणतात, ''देशाची उन्नती उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून असते, हे तत्त्व सर्वमान्य आहे. अशा प्रकारे उद्योगास उत्तेजन मिळावे, या विषयी मला मोठी आवड असून, त्या दिशेने माझे प्रयत्न आपणास माहित आहेतच. लोकांनी एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने, कुशलता, अक्कल, पैसा मिळवला पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करत असे. येणारा नफा पाहता कुटुंबातील माणसांना उपयोगी पडे. मात्र आता कुटुंबाची व्याख्या विस्तृत केली पाहिजे. १०, २०, ५० कुटुंबीय उद्योग धंद्याकरिता एकत्र आली पाहिजेत. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे, होणारा नफा वाटून मिळाला पाहिजे, यासाठी आपण एकमेकास सहकार्य करण्यास शिका. आपली सहकारी पतपेढी काढा. आपल्या शाळांप्रमाणेच आपल्या उद्योगांची व कारखान्यांची भरभराट व्हावी, असे मी इच्छितो. या कामी सवलत व उत्तेजन देण्यास मी केव्हाही माघार घेणार नाही, याची आपण खात्री बाळगा.''[६१]

आपल्या वचनाला जागून शाहू छत्रपतींनी अक्षरश: अनेक नवनवीन उद्योगांना कोल्हापूरात संधी दिली व स्थैर्य दिले.

१) कोल्हापूर येथील पहिली सूत गिरणी (शाहू छत्रपती मिल)

शेतकरी वर्गाला भेडसावणारा पहिला प्रश्न असतो तो म्हणजे उत्पादन झालेल्या कोणत्याही शेतमालाला मागणी हवी आणि त्यानुसार योग्य तो भाव मिळायला हवा. शेतीमालावर आधारीत एखादा मोठा उद्योग जर संस्थानातच निर्माण झाला तर शेतकऱ्याला त्याच्या मालाला स्थानिक पातळीवरच मागणी मिळून रास्त भाव ही तात्काळ मिळेल यासाठी शाहू महाराजांचे प्रयत्न चालू असतानाच श्री. खंडेराव आपाजीराव गायकवाड यांनी कोल्हापूर संस्थानात सूत व कापड गिरणी काढण्याची परवानगी मागितली होती. यापूर्वी उद्योगाचे अपुरे ज्ञान व कौशल्य अभावामुळे मोठ्या स्वरूपाचा असा उद्योग संस्थानात उभा राहिलेला नव्हता. या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची शेतमालावर आधारित सूत व कापड गिरणी राज्यात होणे हा भव्य असा प्रयोग ठरणार होता. शेतकऱ्यांना यामुळे स्थानिक पातळीवरच आर्थिक फायदा करून घेण्याची संधी मिळणार होती.

संस्थानात पहिलीच कापड गिरणी पर्यायाने पहिलाच उद्योग उभा राहणार होता. तेव्हा या गिरणीच्या प्रस्तावाला शाहू महाराजांनी अनेक सवलती व सहकार्य केले. गिरणी उभारण्यासाठी लागणारी जागा, त्यासाठी पाण्याची व्यवस्था, वाहतूक व्यवस्था यासाठी त्यांनी सहकार्य केलेच; परंतु त्या कंपनीला वाढीसाठी वाव मिळावा, म्हणून पुढची ३० वर्षे त्या परिसरात अशी कापड गिरणी अभी राहणार नाही, याची हमी दिली होती. अशी गिरणी राज्यातील पहिलाच सामायिक भांडवल उभारून होणारा उद्योग असल्याने प्रत्येक बाबींचा विचार करुन ज्या अटी–शर्तींआधारे छत्रपतींनी दिनांक १८ ऑक्टोबर, १९०५ ला परवागनी दिली. त्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे दिसून येतात.[६२]

१. या कंपनीस 'श्री म. छ. सा. स. करवीर यांच्या आश्रयाखाली' असे लिहिण्याची परवानगी दिली होती, त्यामुळे ही गिरणी राजाश्रयाखाली चालू झाल्याचे कळते.
२. सदर कंपनीला महाराजांच्या नावावरून 'शाहू छत्रपती मिल' असे नाव देण्यास मंजुरी दिली होती.

३. कोटीतीर्थाजवळील अगर मे. बाळासो कागलकर यांचे बंगलाजवळील जी जमीन सदर कंपनीस पसंत होईल, ती २५ एकरपर्यंत देण्यास नड नाही, परंतु कंपनीस ती जमीन घ्यावयाची ती सरकारी पडीक असल्यास मुफ्त स्वरूपात देण्यात येईल आणि नियमाप्रमाणे तिचा वार्षिक सारा वगैरे कंपनीकडून सरकारात द्यावा लागेल. मात्र सदर २५ एकर जमिनीप्रमाणे जितकी जमीन इतर लोकांकडून घ्यावी लागेल, तर तिच्याबद्दल योग्य असा मोबदला सदर कंपनीला द्यावा लागेल.

४. कोटीतीर्थाजवळील जागा पसंत झाल्यास सदर गिरणीकडे वगैरे लागणारे पाणी कोटीतीर्थ तलावातून कंपनीने आपल्या खर्चाने घेण्यास नड नाही. मात्र सदर गिरणीने त्यातून तीन इंची नळीने पाणी घेतल्यास त्याचा आकार दरमहा ३६ रुपयेप्रमाणे कंपनीला द्यावा लागेल आणि अशा रीतीने कंपनीने घेतलेले पाणी त्यांनी दुसऱ्या कोणास देण्याचा अगर त्याचबद्दलचा आकार कंपनीने घेण्याचा अधिकार कंपनीला असणार नाही. अ. मे. बाळासाहेब कागलकर यांचे बंगलासमोरील माळावर गिरणी उभी केल्यास तिकडे तीन इंची नळीने पाणी देण्यास अंदाजे ५,०००रुपये खर्च लागेल आणि त्याचा आकार दरमहा ३६ रुपये होईल. म्हणून नळीचा खर्च व पाण्याचा आकार सदर कंपनीला द्यावा लागेल.

५. ही गिरणी स्थापन झाल्यापासून तीस वर्षेपर्यंत कोल्हापूर स्टेटमध्ये या प्रकारची दुसरी मिल उभारण्यास दुसऱ्या कोणास परवानगी मिळणर नाही, परंतु हल्ली व्यापारी दृष्टीने लोकात अधिक चळवळ असल्याने यापेक्षा अधिक मदत देणे इष्ट होणार नाही.

६. मिलसंबंधी मशिनरी व माल वगैरे आणणे अगर गिरणीतून तयार झालेला माल दुसरीकडे रवाना करावयाचा असेल, तर त्यावेळी कोणत्याही प्रकारचा जकात मालावर घेऊ नये ही मागणी मान्य होण्यासारखी नाही, पण गावात माल आणायचा असेल, तर नियमाप्रमाणे कमेटीने ठरविल्यानुसार टोल वसूली द्यावी लागेल.

७. सदर मिलमध्ये ५० हजार रुपयांपर्यंत तूर्त शेअर्स घालण्यात येत आहेत. यापेक्षा अधिक रकमेची आवश्यकता वाटल्यास त्या त्या वेळेच्या परिस्थितीस अनुसरून विचार करण्यात येईल.

८. मिलच्या हद्दीत रेल्वेचा फाटा जर आणायचा असेल, तर त्यासाठी जमीन लागेल तर त्यासाठीच्या खर्चाचा विचार कलम तीन यात लिहिल्याप्रमाणे नियमानुसार होईल.

९. खंडेराव आप्पाजीराव गायकवाड हे सरकारी नोकर असल्याने त्यांनी हे काम करण्यास परवानगी मागणे जरुरीचे आहे, तरी त्यांना हे काम खाजगी रीतीने करण्यास परवानगी आहे.

१०. सदर मिलकरिता जी जमीन घेण्यात येईल, त्यावर उभारण्यात येणाऱ्या इमारतीचे भाडे वेगळे घेण्याची जरुरी नाही कारण कलम तीनमध्ये लिहिल्याप्रमाणे जमिनीचा सारा येणारच आहे.

दिनांक २७/९/१९०६ ला ही कंपनी महाराजांनी स्वहस्ते सुरू केली होती. या गिरणीला आपले स्वत:चे नाव व राजाश्रय दिला होता. संस्थानात श्री. खंडेराव गायकवाड हे या कंपनीचे सुरवातीचे कार्यवाहक व व्यवस्थापकसुद्धा होते. संयुक्त भांडवलावर एक वर्ष व पुढे भागधारकांच्या माध्यमातून आणि नंतर दरबारामार्फत ही मिल चालू राहिली. वेळोवेळी दरबारातून आर्थिक मदत व योग्य व्यवस्थापनामुळे कोल्हापूरच्या उद्योगक्षेत्रात या मिलचे महत्त्व नंतरही राहिले.

- **कापूस खरेदीस मदत व शाहू मिल व्यवस्थापनावर देखरेख**

शाहू मिलसाठी लागणाऱ्या कापूस खरेदीसाठी सन १९१८ ला २ लाख रुपयांची मदत मंजूर केली होती. शाहू मिलच्या व्यवस्थापनासंबंधीत कामांची माहिती घेताना श्री. शिरगावकर यांनी सर्वसाधारण कामांवर देखरेख ठेवून वस्तूस्थितीचा अहवाल दर महिन्यास शाहू महाराजांना कळवण्याची सूचना केली होती. मिलचे व्यवहार योग्य पद्धतीने चालण्यासाठी महाराज स्वत: त्यात लक्ष देत असत.

मिलच्या प्राथमिक अवस्थेत तिच्या वाढीसाठी शाहू महाराजांकडून वेळोवेळी आर्थिक मदत दिली गेली होती. सन ११/५/१९०८ ला २५,००० रु. शेअर्स घेऊन भांडवल उपलब्धी केली त्यानंतर या कंपनीच्या वैधतेबाबतचा कायदा पास करण्यास विशेष परवानगी दिली होती. बाल्यावस्थेतील या सूत गिरणीला बिनव्याजी ६०,००० रुपयांचे कर्ज मंजूर केले आणि कंपनीला हे कर्ज सहा महिन्यात न आल्यास दरसाल दरशेकडा ६ टक्केप्रमाणे व्याज वसूलीची ताकीद ही दिली होती.[६३]

३) रेशीम कारखाना

रेशीम उद्योग हा एक अभिवन प्रयोग संस्थानात राबविला जात होता. दुष्काळात शेतीतील उत्पन्न शून्यावर येते. उत्पन्नाभवी हतबल न होता नवीन पद्धतीचा हा पर्यायी शेतीपूरक व्यवसाय होता. रेशमी किड्यांपासून तयार होणाऱ्या कापडाला त्याकाळी चांगलीच मागणी होती. शाहु महाराजांनी कोल्हापूरात रेशीम कारखाना काढण्यासाठी कोल्हापूर शहरातील गायमुख तलावाजवळ जागाही दिली होती. पुढे या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी कोल्हापूरातच उंबरठ्याच्या पाराजवळच्या धर्मशाळेची आवश्यक तेवढी जमीन देण्याची आज्ञा करून या उद्योगाच्या वाढीला वाव दिला.[६४]

अ) रेशीम कारखान्याकडे जपानी व्यक्तीची नेमणूक

रेशीम कारखान्याच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीची पूरक शेती व्हावी, यासाठी रेशीम उद्योगाबाबत विशेष धोरण शाहू महाराजांनी आखले होते. हा व्यवसाय चीन–जपान सारख्या देशात भरभराटीला आलेला होता. भारतात फारच तुरळक ठिकाणी हे काम केले जायचे. परंतु आपल्या शेतकरी वर्गाला याविषयाची सर्वोत्तम माहिती व ज्ञान मिळावे, या हेतूने जपानमधील एका जपानी माणसाचीच या कारखान्याच्या कामासाठी नेमणूक केली होती. त्याच्या देखरेखीखाली वाडी रत्नागिरी येथील रेशीम कारखान्याचे काम चालू केले. त्याचबरोबरीने चहा लागवड वा इतर फळांची लागवड ही त्यांच्याच निगराणीखाली करावी, अशी महाराजांनी आज्ञा दिली होती. या जपानी माणसास दरमहा २५ रुपये व कारखान्यातील उत्पन्नाचा खर्च वजा जाऊन तिसरा हिस्सा किंमत देण्याचे अटीवर सुरुवातीची दोन वर्षे नेमणूक होती. संस्थानाच्या ॲग्रीकल्चर डिपार्टमेंटमधील श्री. शाळीग्राम या तज्ज्ञास कामाच्या अनुषंगाने जपानी भाषा शिकण्यासाठी दर आठवड्यास किंवा आवश्यकतेनुसार तेथे जाण्याची सूचना केली होती. कामांचा दर्जा टिकून राहण्यासाठी तज्ज्ञ माणसांची मदत घेणे, त्यासाठी हवी ती किंमत मोजण्याची तयारी असणे हा गुण महाराजांचा यातून दिसून येतो.[६५]

ब) सरकारी ताबा

ज्योतिबा डोंगराजवळील रेशीम कारखाना पूर्वी बंगाली लोकांच्या मालकीचा होता. सरकारी धोरणानुसार दि. १२/४/१९०९ मध्ये तो कारखाना संस्थानाच्या ताब्यात आला. पुढे त्यासाठीचा रु. १०५० खर्च ही मंजूर केला होता.[६६]

क) रेशीम किड्याची माहिती व आयात

रेशीम कारखाना संस्थानाच्या ताब्यात आल्यानंतर रेशीम उद्योगाना महाराजांनी चालना दिली. या उद्योगासाठी लागणाऱ्या रेशीम किड्यांविषयी माहिती आणण्यासाठी मार्च १९०७ मध्ये संस्थानातील एका फॉरेस्ट ऑफिसरला विशेष प्रवास भत्ता देऊन बेळगावला पाठविले होते. यानंतर पुन्हा दोन महिन्यांनी श्री. कोलते या कारकुनास या रेशीम किड्यांची माहिती आणण्यासाठी सोनगड येथे पाठविले होते. रेशीम किड्यांची बीजे आणण्यासाठी कारखान्याचे इंजिनियर यांना प्रत्यक्ष बंगलोर येथे रू. १५० आगावू देऊन पाठविले होते. वळीवडे या भागातील एक धर्मशाळाच हे रेशीम किडे ठेवण्यासाठी ताब्यात घेतली होती.[६७]

४) जिनिंग फॅक्टरीस परवानगी

कोल्हापूरात शाहू मिलची उभारणी झालेलीच होती, त्याचबरोबर अशा प्रकारच्या गिरण्या संस्थानात विविध ठिकाणी महाराजांच्या परवानगीने सुरू होत्या. लक्ष्मण बाळकृष्ण कोरेगावकर या व्यक्तीस गडहिंग्लज या दुसऱ्या भागात गिजवणेजवळच्या ओढ्याजवळची २ एकर जमीन सूत गिरणी काढायला दिली. शिवाय त्यांच्या स्थैर्यासाठी पुढची १० वर्षे त्या गडहिंग्लज भागात अशी जिनींग फॅक्टरी काढली जाणार नाही, अशीही तरतूद केलेली होती. त्यानंतरही शिरोळ, इचलकरंजी, चिंचली इ. ठिकाणी अशा सूत गिरण्या महाराजांनी घेतलेल्या पुढाकारातून उभ्या राहिल्या होत्या.[६८]

५) विद्युत कारखाना उभारणीस परवानगी

त्याकाळी औद्योगिकीकरणामुळे नवनवीन उद्योगधंदे सुरू होत होते. मुंबईसारख्या ठिकाणी तर वीजेवरच्या दिव्यांची सोय झालेली होती. कोल्हापूरात ही तशाच प्रकारचे दिवे तयार करावेत, या हेतूने कोल्हापूरातील महादेव विठ्ठल तांदळे व शिवराम बळवंत उपळावीकर ब्रदर्स आणि कंपनी या कंपनीने शहरातील मार्केट ते जुना राजवाडा तसेच श्री महालक्ष्मीचे देऊळ या

परिसरात हे विजेचे दिवे भाडेतत्त्वावर लावण्यासाठी त्यांना विद्युत कारखाना उभारणी करायची होती. त्यासाठी त्यांच्याकडून महाराजांकडे जागेची मागणी करताच महाराजांनी जागा तर दिली; पण २५ वर्षांपर्यंत त्या परिसरात त्यांच्याशिवाय दुसरा विजेच्या दिव्यांचा कारखाना उभा राहणार नाही, हे आश्वासन देऊन उद्योगवाढीस वाव दिला.[६९]

कोल्हापुरात विजेच्या दिव्याचा वाढता वापर बघून बरेच लोक या उद्योगाकडे वळत होते. दि. ९ एप्रिल १९१३ चा ठराव क्र. ९०६ मंजूर करून श्रीराम बळवंत सरवटे या तरूणालाही विजेच्या दिव्यांचा कारखाना गावात सुरू करण्याची मान्यता शाहू महाराजांनी दिल्याने त्यानेही कृतज्ञता म्हणून कारखाना भागातील रस्त्यावर दर खांबास एक दिवा असा स्वत:च्या खर्चाने लावला होता.

६) खाणकाम करण्यास किर्लोस्कर यांना मंजुरी

कोल्हापूरात असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर हा नावीन्यपूर्ण व कल्पकतेने करण्यास महाराज नेहमी उत्सुक असत. संस्थानात बहुतेक भागात लोखंड मिळत होते. त्यावेळी मुंबईमधील यंत्रासाठी नावाजलेली किर्लोस्कर कंपनी लोखंड गाळण्याच्या कामासाठी दगडी कोळशाऐवजी लाकडी कोळसा वापरून लोखंड गाळण्याचे कामावर प्रयोग करत होती. त्यासाठी कोल्हापूरात लोखंडाची त्यांना आवश्यकता होती.

त्याबाबतची परवानगी देऊन अशा वेगळ्या उद्योगालाही संस्थानात यश मिळाले. तर त्यातून सरकारच्या तिजोरीत भर पडून नवीन महसूल मिळण्याची शक्यता लक्षात घेऊन दूरदृष्टीने महाराजांनी त्यांना त्वरीत मंजूरी दिली. संस्थानाबाहेरील उदयोजकांनाही त्यांनी अशी मदत केली आहे.[७०]

७) सर राशबिहारी घोष मिल्सच्या मोफत जागा व इतर व्यवस्था करणारा हुकूम

उद्योगवाढीचे वातावरण कोल्हापूरात असल्याने अनेक मोठ्या कंपन्या, मिल तेथे येण्यास उत्सुक असत. कोल्हापुरात कापड गिरणी सुरू करण्यासाठी महाराजांकडे धी. सर राशबिहारी घोष मिल्स आणि कंपनी नावाच्या कंपनीकडून मदत मागीतली होती. विविध स्पर्धात्मक

कंपन्यांमुळे संस्थानालाच आर्थिक फायदा होणार, हे लक्षात घेऊन महाराजांनी त्यांना कोल्हापूर येथे खालीलप्रमाणे सशर्त परवानगी दिली होती.[७१]

- धी. सर राशबिहारी घोष मिल्स आणि कंपनीला कोल्हापुरास स्टेशनजवळ कोठेतरी वीस (२०) एकर जागा गिरणी करिता फुकट देण्यात यावी. (सदरची जागा खुद इकडून दाखविण्यात येईल.) जागा स्टेट मिल्सला संपर्क न होईल अशी असावी.

- सदरच्या जाग्या नजीक पाणी असल्यास व ते गिरणीस देण्यासारखे असेल तर फुकट देणेत यावे किंवा गिरणीच्या उपयोगाकरिता तलाव बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

- कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस मुंबई आणि कोल्हापूर या दोन्ही ठिकाणी असावी.

- पंचवीस वर्षांपर्यंत कंपनीकडून कोणत्याही प्रकारचा कर दरबाराने घेणेचा नाही.

- इमारती करिता माती, दगड वगैरे फुकट देण्यात यावी. लाकडू मात्र जंगलखात्याच्या नियमाप्रमाणे देण्यात यावे.

महाराजांनी गिरणीचे महत्त्व लक्षात घेऊन बऱ्याच गोष्टी मोफत वा अल्प सवलतीने देण्याची व्यवस्था केलेली होती.

८) मोटार सर्विस कारखाना काढण्यास मंजुरी

कोल्हापूरात प्रथम मोटार ट्रान्सपोर्ट कंपनीही शाहू महाराजांच्या काळातच उभारलेली होती. त्यानंतर त्यावर आधारित मोटार कंपन्याची मोटार सर्विस देण्याच्या काही कंपन्या येथे चालू झाल्या होत्या, परंतु बाकीच्या परिसरात ही मोटार सर्विस सेवा मिळण्यासाठी एका मोटर सर्विस कंपनीला कोल्हापुरातील मंडईजवळ खंदकात अंदाजे २०० गुणिले २५ फूट जागा किंवा त्यांना जेथे पसंत पडेल, जेथे जागा देण्याचे मंजूर करून कारखाना उभारण्यास दि. २ जुलै १९१३ च्या ठरावाद्वारे परवानगी दिली होती.

९) आर्यन फाऊंड्री – आधुनिक यंत्रांचा कारखाना

दत्तो बाबाजी करजगार या उद्योजकाला आर्यन फाउंड्री काढून त्यात ऊस गाळण्याचे लोखंडी चरक व एका बैलावर दोन मोटा लावून चालविण्याचे नवीन यंत्र तयार करण्याचे कारखान्यास परवानगी दिली. दरम्यान त्या भागात अशा प्रकारचा दुसरा कारखाना होणार नाही, हे आश्वासन दिले. त्यांना दहा वर्षांची मोनोपोली ठेवण्यास मंजूरी दिली होती. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत हा कारखाना शेतकरी व अन्य व्यवसायिकांना उपयोगाचा ठरला होता.[७२]

१०) तिजोरी तयार करण्याच्या कारखान्यास परवानगी व उत्तेजनार्थ बक्षीस

शाहू महाराज हे आधुनिक नावीन्यपूर्ण प्रयोगांना नेहमीच वाखाणत असत. संस्थानातील हरी सुभाना सुतार व जिना पापा गड्डी यांनी गडहिंग्लज येथे महाराजांच्या परवानगीने तिजोरी तयार करण्याचा कारखाना काढला होता. त्या कारखान्यात तयार झालेली तिजोरी जेव्हा दरबारात दाखविली गेली, तेव्हा त्यांचा तो उपक्रम शाहू महाराजांना एकदम पसंत पडला होता व अशा उत्तम प्रकारे काम करणाऱ्या या हुशार व्यक्तीला उत्तेजन देण्यासाठी बक्षीस म्हणून रु. २५ तत्काळ दिले होते.

११) सूत रंगविण्याच्या गिरणीस मदत

रायबाग येथे कापड गिरणीचा व्यवसाय शाहू महाराजांच्याच पुढाकाराने पुनश्च नावारुपास आलेला होता. तिथल्या एका सूत गिरणीला सूत रंगवण्याकरीता पाण्याची आवश्यकता होती. तेव्हा त्यांच्या व्यवसायाची गरज लक्षात घेऊन महाराजांनी रायबागमधील नरसिंह देवळानजीक असलेली विहिर तातडीने रु. ५० खर्चून दुरुस्त केली व त्या विहिरीचे पाणी वापरण्यास विशेष मंजूरी दिली.[७३]

१२) सायकल कंपनीस परवानगी

नॅशनल कमशील कंपनी यांनी कोल्हापूरात धी इंडिया सायकल आणि मोटार कंपनी लि. या नावाची कंपनी काढण्याची परवानगी मागीतली होती. हा कारखाना प्रथमच कोल्हापूरात येणार होता व त्याचा सर्वसामान्य लोकांनाही उपयोग होणार होता. शाहू महाराजांनी अशा नवीन कंपनीला उत्तेजन म्हणून त्यांची रजिस्टर फी माफ करून सहकार्य केले.[७४]

१३) चांदीचे बटन निर्मिती कारखान्यास राजाश्रय

चांदीचा वापर करून बटणे बनविण्याचा कारखाना मालवण भागात गणेश महादेव जामसांडेकर व मोरश्वर बाळकृष्ण हळदणकर यांनी काढला होता. अश नवीन उपक्रमाला कारखान्याच्या मालकांनी विनंती केल्यावरून सदर कारखाना संस्थानात नसला तरी त्याला कोल्हापूर सरकारच्या आश्रयाखाली काढण्यास व बटणावर सरकारचा फोटो छापण्यास मंजुरी दिली होती. तसेच त्यांना उत्तेजन म्हणून त्या कारखान्यात तयार होणाऱ्या चांदीच्या वस्तूंपैकी चांदीचे पेन चांगले असल्यास ते खरेदी करण्याचीसुद्धा संमती दिली.[७५]

हुपरी येथील कृष्णाजी पोतदार या चांदीचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यास महाराजांनी सवलती व साहाय्य देऊन त्यांना कोल्हापुरात आणले होते. संस्थानात चांदीचा व्यवसाय वाढवण्यासाठी महाराजांनी असे अनेक प्रयत्न केल्याचे दिसून येते. किंबहुना आज कोल्हापुरात आज या उद्योगात जी भरभराट दिसून येते, त्याची बीजे शाहू महाराजांनी चांदी व्यावसायिकांना तत्कालीन परिस्थितीत दिलेल्या पाठबळामध्ये दडलेली दिसून येतात.

१४) कापूस पिंजण्याचा कारखाना

संस्थानातील एक नामवंत उद्योजक श्री. सुर्याजी लक्ष्मण बांदीवडेकर यांना कोल्हापूरात शिरोळ रोड भागात कापूस पिंजण्याचा कारखाना काढण्याची मंजुरी दिली. त्यांच्या या जिनिंग फॅक्टरीकरिता इमारत बांधण्यासाठी उदगाव शिरोळ गावांमधल्या दगड खाणीतून लागतील तेवढे दगड मोफत देण्याची तजवीज ही केली.[७६]

१५) मातीपासून रंग तयार करण्याचा कारखाना

करवीर शहरातील एक गृहस्थ श्री. दत्तो तुकाराम शाळीग्राम यांना पन्हाळा पेट्यात मातीपासून रंग तयार करण्याच्या कारखाना (धी पिगमेंट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी) सुरू करण्यासाठी परवानगी हवी होती. हा प्रयोग विशेष असल्याने महाराजांनी सदर कारखान्यास एक विशेष बाब (स्पेशल केस) समजण्यात यावी, असे नमूद करून त्या कारखान्याला मान्यता दिली.[७७]

१६) तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना

महाराजांच्या पुढाकाराने रायबाग हा भाग उद्योग व्यवसायासाठी उदयास येत होता. त्या रायबागमध्ये तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी श्री. दयाराम गणेश पोवार यांना २०० रूपये बिनव्याजी दिले होते.[७८]

१७) साखरेचा कारखाना

कोल्हापूर संस्थानात गुळ उत्पादन चांगले होत होते. त्याचबरोबर संस्थानातील ऊस उत्पादनावर आधारीत साखर कारखान्याची निर्मिती देखिल संस्थानात होण्यासाठी महाराजांचे प्रयत्न असल्याने त्यांनी अशा उदयोगाला नेहमीच सहकार्य केले होते. साखरेच्या कारखान्याला आवश्यक असे सेंट्रिफ्युगल मशीन खरेदी व वाहतूक किरकोळ खर्चासाठी म्हणून महाराजांनी ७०० रुपयांची मदत मंजूर केल्याचा दाखला त्यांच्या ठरावामधून मिळतो.[७९]

१८) गहू दळण्याचे यंत्र

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने निर्माण होणारी यंत्रे ही काळाची गरज आहे. तसेच अशी आधुनिक यंत्रे ही कामातील कष्ट दूर करून वेळ व श्रम वाचवितात याची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यामुळे कोल्हापुरात गहू दळणयंत्र सुरू करण्याचा प्रस्ताव एका उद्योजकाकडून आल्यानंतर त्याला त्यांनी तात्काळ मंजुरी दिली.

हे यंत्र विकत आणण्यासह ते कार्यान्वित करण्यासाठी येणाऱ्या खर्चापोटी महाराजांनी २ हजार ४४८ रुपयांच्या खर्चाची तजवीज केली होती. त्याचबरोबर त्यांनी या यंत्रासाठी लागणारे शेड उभारण्यासाठीची भरीव तरतूद केली होती. [८०]

१९) गहू दळण्याची चक्की

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून गहू दळण्याची चक्की सुद्धा त्यावेळी तयार झाली होती. अशी चक्की संस्थानात सुरू होण्यासाठी महाराजांनी त्यावेळी १५० रुपयांच्या खर्चास मान्यता दिली.[८१]

२०) अत्तराचा कारखाना

श्री. गुंडो कृष्ण काडापुरकर, करवीर यांनी सरकारकडे अत्तराचा कारखाना काढण्याची परवानगी मागितली. ती मंजुरी देण्यासह महाराजांनी कारखान्यासाठी लागणारी आवश्यक ती साधने संस्थानातून वापरण्याची परवानगीही दिली.[८२]

२१) यंत्रमाग कारखाना (लूम फॅक्टरी)

कोल्हापुरातील रायबाग हे ठिकाण कापड निर्मितीत अव्वल बनले होते. तेथे कापड व्यवसायाच्या अनेक संधी, बाजारपेठा तयार होऊन ते ठिकाण कापड उद्योगाला पूरक ठरत होते. तेथे यंत्रमाग कारखाना काढण्यासाठी व त्याला लागणाऱ्या जागेची सोय करण्यासाठी महाराजांनी एकूण ३०९ रुपयाचे अंदाजपत्रक मंजूर केले होते.[८३]

२२) भाताचे पोहे करण्याच्या नवीन यंत्रास परवानगी

करवीर येथील श्री. दत्तो बाबजी करजगार यांनी नेहमीच विविध नावीन्यपूर्ण यंत्रे तयार केलेली होती. त्यांच्या अशा प्रयोगांना शाहू महाराजांनी नेहमीच उत्तेजन व सहकार्य दिले होते. त्यांनी भाताचे पोहे करण्याचे नवीन यंत्र तयार केल्याने या आधुनिक यंत्रासंबंधाने त्याचे १४ वर्षे मुदतीचे पेटंट त्यांना दिले होते.[८४]

२३) चुन्याचा कारखाना

कोल्हापूर येथील करवीर भागात धर्मा जोशीराव यांच्या ताब्यातील ३.१५ एवढी जमीन ६ महिन्याच्या आत जर काम सुरू झाले नाही तर जमीन काढून घेण्यात येईल या अटीवर मुंबई येथील मि. पिरोसा नसखानजी मेथा यांना चुन्याच्या कारखान्यासाठी मोफत दिली होती.[८५]

२४) तेलाची गिरणी

कोल्हापूरात पहिली तेलाची गिरणी ही शिरगावकर यांनी चालू करून नवीन फायद्याचा उद्योगाचा शुभारंभ केला होता. १९१२–१३ च्या प्रशासकीय नोंदीनुसार एक लाख रुपये भांडवल उभारून शिरगावकर यांनी तेलगिरणी उभारली होती. तसेच या गिरणीसाठी लागणारे मशीन्स, इमारत या कामावर ७५ हजार रुपये खर्च झाल्याची नोंद आहे.

ही गिरणी सुद्धा वेगळा उपक्रम असल्याने शाहू महाराजांनी यालाही बऱ्याच सवलती देऊन कोल्हापूरच्या उद्योगात भर टाकली. कोल्हापूरात १० तेलगिरण्या व १ गडहिंग्लज येथे अशा एकूण ११ तेलगिरण्या महाराजांनी दिलेल्या सहकार्य व सवलतींमुळे स्थापन होऊ शकल्या.[८६]

२५) औषधी कारखाना

कोल्हापूरमध्ये राहणारे चिंतो वामन ऊर्फ बाबा गुणे वैद्य यांनी औषधी कारखाना सुरू करण्याची परवानगी मागितली. विशेष बाब या कारणाखाली महाराजांनी या कारखान्याला राजाश्रय दिला. त्यानुसार 'श्री शाहू छत्रपती औषधीचा कारखाना' हे नाव लावण्यास आणि हा कारखाना त्यांचा मुलग यशवंतराव गुणे यांच्या देखरेखीखाली चालविण्यास परवानगी देऊन वैद्यकीय क्षेत्राला ही आपलेसे केले.[८७]

मुंबईसारख्या ठिकाणाचा अपवाद वगळता उद्योगधंद्यांसाठी इतरत्र कोठे फारसा वाव नसताना शाहू महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने आपल्या संस्थानात मात्र उद्योगजगताचे स्वागतच केले होते. त्यांच्या आधुनिक विचारसरणीमुळेच विविध नावीन्यपूर्ण असे उद्योगधंदे त्या काळात कोल्हापूरात उभे राहिले. कोल्हापरच्या औद्योगिक प्रगतीत त्यावेळेच्या या प्रयत्नांचा वाटा फार मोठा आहे.

व्यापारास चालना

शेतीविकासाबरोबर उद्योगधंदे व व्यापार वाढीस लागले, तरच एक प्रकारची सुसूत्रता येऊन राज्याचा अर्थविकास होण्यास मदत होतो. शेती उत्पादन व उद्योगधंद्यातील उत्पादन यांच्यासाठी बाजारपेठा असणे तेवढेच महत्त्वाचे असते. किंबहुना व्यापार उद्योग व शेती हे परस्परांना पूरकच आहेत. त्यावेळी संस्थानात मोठ्या बाजारपेठांची उपलब्धता नव्हती. कोकणातील राजापूर हे जवळचे मोठे बाजारपेठेचे केंद्र होते. कर्नाटक परिसरातील निपाणीसारख्या भागातील व्यापाऱ्यांबरोबर कोल्हापूरचा व्यापार-उदीम चालत होता. शाहू महाराजांनी बाजारपेठेचा कोल्हापूरमधील अभाव बघून येथेच प्रमुख बाजारपेठ स्थापन करण्याचा विचार केला. येथील लोकांना व्यापाराकडे वळविण्याचा प्रयत्न केला होता. स्वत:चे सुपुत्रांना त्यांनी व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले होते.

सन १९१७ ला खामगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात व्यापारसंबंधाने आपले विचार प्रकट करताना ते म्हणतात की, ''आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे, ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार–धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. हल्ली आम्ही व्यापार व उदीम यात पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्ससंबंधीची चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच झाला आहे. येथे धर्म म्हणजे बुद्धियुक्त स्वहित साधणे, असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळे मी माझ्या दोघा मुलांना व आप्तांना व्यापारात घातले आहे आणि मला सांगण्यास समाधान वाटते की, त्यांनी तो धंदा मोठ्या आनंदाने स्वीकारला आहे. एवढेच नाही तर त्यात ते चांगल्या रीतीने पुढे येत आहेत.''[८८]

१) व्यापारासाठी वाहतुकीची व्यवस्था

साधारणत: उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीसाठी त्यांना पोषक वातावरण असणे महत्त्वाचे ठरते. दळणवळण, वाहतूक व्यवस्था आदी सोई असणे व्यापारासाठी प्राथमिक गरज होती. शाहू महाराजांच्या राज्यकारभारापूर्वी कोल्हापूरचा राज्यकारभार हा ब्रिटिशांच्या राजप्रतिनिधींच्या हातात असल्याने त्यांच्या सुधारणा धोरणानुसार या राज्यातही त्यांनी वाहतूक सुधारणेंतर्गत १८९१–९२ मध्ये मिरज–कोल्हापूर रेल्वेमार्ग सुरू केला होता, तसेच नंतर ही दुष्काळ काळात रस्ते, पूल इत्यादी पायाभूत सुविधांबरोबरच पुढे कोल्हापूर–सांगली, कोल्हापूर–मिरज, कोल्हापूर–राधानगरी, कोल्हापूर, पन्हाळा येथे रस्त्यांची कामे होऊन वाहतुकीची सोय झालेली होती. या दळणवळण सोयींमुळे कोल्हापुरातील व्यापार वाढण्यास मोठी मदत झाली.

२) व्यापार वाढीसाठी मुंबई येथे जाण्यास परवानगी

संस्थानातील आर्थिक प्रगतीसाठी व्यापाराचा वाटा जास्त असतो. उत्तम चालणारा व्यापार ही संस्थानाच्या प्रगतीची खूण आहे, हे पाहून शाहू महाराजांनी अनेक व्यापाऱ्यांना सवलती देऊन पोषक वातावरणनिर्मिती केली व व्यापार वाढीला चालना दिली होती. तथापि, त्यात सातत्याने वाढ होणे हे गरजेचे असते, त्यासाठी इतर प्रांतातील बाजारपेठांची माहिती ते घेत असत.

मुंबईसारख्या त्यावेळी प्रगत असलेल्या शहरातील व्यापार कसा चालतो, तेथे कोणत्या योजना आहेत, हे जाणून घेण्यासाठी त्यांनी आपल्या एका अधिकाऱ्याला मुंबईला पाठविले होते. तेथील अद्ययावत माहितीचा उपयोग कोल्हापुरातील व्यापार वाढीसाठी करता येईल, याची महाराजांना जाणीव होती. [८९]

३) व्यापार माहितीसाठी रेल्वे स्टेशनवर विशेष माणसाची नेमणूक

आपल्या संस्थानाचा व्यापार उदीम वाढवावा यासाठी सातत्याने प्रयत्न महाराजांनी केलेले दिसून येतात. रेल्वे हे व्यापारासाठी महत्त्वाचे दळणवळणाचे साधन होते. रेल्वेने होणारी मालवाहतूक, व्यापारी यामुळे रेल्वे स्टेशन महत्त्वाचे होते. व्यापार संबंधाने आयातनिर्यातीची अधिक माहिती मिळण्यासाठी कोल्हापूर रेल्वे स्टेशनवरसुद्धा महाराजांनी श्री दत्तो मल्हार निकम या सुशिक्षीत माणसाला सहा महिन्यांसाठी दरमहा १२ रु प्रमाणे पगारावर नेमले होते.[९०]

४) व्यापारास प्रोत्साहनपर आर्थिक मदत – व्हिवर्स असोसिएशन

कोल्हापुरात काही भाग हा तेथील लोकसमुदायांकडून परंपरेने सुरू असलेल्या व्यवसायाबद्दल प्रसिद्ध होता. रायबाग हा परिसर तिथल्या विणकर लोकांमुळे कापड व्यवसायात प्रसिद्ध झालेले होते. परंतु काही कारणास्तव तिथल्या लिंगायत व मुसलमान लोकांनी स्थलांतर केल्याने तो व्यवसाय थंडावला होता. ही परिस्थिती सुधारण्यासाठी महाराजांनी विणकर लोकांना काही सवलती व आर्थिक मदत देऊन पुन्हा रायबागमध्ये येण्यास भाग पाडले. त्यांच्या पुर्नवसनासाठी त्यांना सुरुवातीला एकूण ३००० रूपये व रहावयास जागा दिली. कापड व्यवसायाला उर्जितावस्था येण्यासाठी २ व्हिवर्स असोसिएशन स्थापन केल्या. त्यांना दिलेल्या विशेष सवलती पुढीलप्रमाणे–

- रायबाग येथे व्यापारासाठी जे कोष्टी लोक आले आहेत, त्यांना भांडवलाची गरज असल्याने लिंगायत कोष्टी लोकांना २००० रुपये व पेंढार कोष्टी लोकांना १००० रुपये असे पाच वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज दिले होते. जेणेकरून व्यापारात त्याचा जम बसणे शक्य होणार होते.

- लिंगायत कोष्टी लोकांनी स्थापन केलेल्या विणकरसंबंधीत संस्थेस 'श्री शाहू व्हीवर्स असोसिएशन' असे नाव दिले.

- पेंढार कोष्टी लोकांनी विणकरसंबंधीने स्थापन केलेल्या संस्थेस 'श्री राजाराम व्हीवर्स असोसिएशन' असे नाव देण्याच्या मागणीला महाराजांनी संमती दिली.

- सुरुवातीला या दोन्ही विणकर संस्था नवीन असल्याने त्यांना रजिस्ट्रेशन फी माफ करण्यात आली होती व जेव्हा त्यांची स्थिती चांगली होईल तेव्हा त्यांनी ते करून घ्यावे अशी तरतूद केली.

- सरकारकडून सुरुवातीच्या काळात या संस्थांमध्ये प्रेसिडेन्स म्हणून चिटणीस हुद्यावरील रावसाहेब नाईकवाड व व्हाईस प्रेसिडेंट म्हणून गुरुनाथराव माहालकारी या अधिकाऱ्यांना नेमलेले होते.

- एवढेच नव्हे तर विणकाम करणाऱ्या लिंगायत लोकांना काही घरे बांधण्यासाठी व त्यांच्याच प्रमाणे विणकाम करणाऱ्या अन्य मुसलमान लोकांनाही जमिनी देण्याचे आदेश दिले. या विणकर लोकांना व्यापारासाठी वेळोवेळी भरीव आर्थिक मदत केलेली होती. व्यापारवाढीसाठी भांडवल म्हणून संस्था स्थापनेनंतरच्या केवळ ४-५ महिन्यांतच माहे जानेवारी, १९०९ ला दरबारातर्फे रुपये १००० एवढ्या विशेष आर्थिक मदतीला पुन्हा मंजूरी देण्यात आली. त्याचबरोबर येथे नव्याने व्यवसायासाठी आलेल्या कोष्टी लोकांची २० व मुसलमान लोकांची २० अशी एकूण ४० कुटुंबाना प्रत्येकी १५० रुपये प्रमाणे एकूण ६००० रूपयांची तरतूद ही महाराजांनी करुन त्यांच्या व्यवसायासह त्यांच्या राहण्याची तरतूद केली. यातून संस्थानाअंतर्गत होत असलेल्या विविध व्यवसायाच्या भरभराटीचे स्वागतच करण्यात आले.[९१]

राज्यातल्या या दोन्ही विणकर संस्थांमुळे पुढे रायबाग हे धोतर-लुगडी इत्यादी कापड व्यवसायाची बाजारपेठ म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाऊ लागले, हे शाहू महाराजांच्या प्रयत्नाचे यश होते.

५) व्यापारोपयोगी जागेच्या भाड्वसुलीबाबत निर्णय

छत्रपतींनी संस्थानातील व्यापार उदिमासाठी व्यापारांना वेळोवेळी सवलती, जागा दिलेल्या दिसून येतात. सन १९१५ ला शाहूपुरीत कापड गिरणी काढण्यासाठी दिलेल्या जागेच्या भाड्यासंबंधाने वाद महाराजांसमोर आला होता. त्यात गिरणीला दिलेली जागा ही जागा व्यापारासाठी असल्याने नियमाप्रमाणे १०० फुटास १ रु. प्रमाणे भाडे आकारणीचा हुकूम असतानाही पूर्वी हा दर कमी असून, नवीन दर तेव्हापासून न लागू करण्यासाठीच्या अर्जावर शाहू महाराजांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. पूर्वी तो दर होता याला काहीही आधार नाही असे सांगून पुनश्च हुकूम झाल्यापासून नियमाप्रमाणे भाडे वसूल करण्याची आज्ञाच देऊन व्यापारासंबंधाने सवलतींबरोबरच काही प्रसंगात योग्य शहानिशा करूनच निर्णय घेण्याचा महाराजांचा कल असायचा.[९२]

६) हळद व्यापारासाठी सोय

संस्थानाची शाहूपुरी ही महत्त्वाची बाजारपेठ बनत चालली होती. व्यापारोपयोगी अनेक व्यवस्था इथे उपलब्ध होण्यावर भर दिला होता. शाहूपुरीत येणारी हळद टिकवून साठवून ठेवण्याची गरज होती. त्यासाठी खोलखंडोबा देवळाच्या आसपास जागा देऊन पांढऱ्या मातीची पेवे तयार करून घेतली आणि व्यापारांसाठी हळद साठवणूकीची व्यवस्थाही केली होती.[९३]

७) दुकान बांधण्यासाठी रु. ३,००० ची मदत

शाहूपुरी बाजारपेठ ही भरभराटीला आणण्यासाठी व तेथे अनेकविध व्यवसाय उभे राहण्यासाठी महाराजांनी विविध सवलती देण्याबरोबरच सढळ हस्ते दरबारातून आर्थिक मदतही केल्याचे दिसून येते. शाहूपुरी पेठेत खुद्द महाराजांनी आज्ञा दिल्यावरून व्यापारी राजश्री बळवंत जोतिबा गोरे, रा. शाहुपूरी यांनी नवीन दुकान बांधण्याचे काम सुरू केले.

या बांधकामासाठी त्यांना बाळेघोल जंगल किंवा जे आवडेल तेथून लाकूड फुकट घेण्याची तसेच तुळ्या, खांब, वासे वगैरे अशा कामासाठी सागवानी लाकूड देण्याची परवानगी देताना रु. ३००० पर्यंतची मोठी रक्कम मंजूर करुन त्यांना शाहूपुरी बाजारपेठेत व्यवसायासाठी कार्यरत केले.[९४]

८) श्री युवराज महाराज यांना व्यापार करण्यासाठी पाऊण लाख रुपये बक्षीस

महाराजांचा व्यापाराबाबतचा दृष्टीकोन त्यांनी आपल्या एका भाषणात व्यक्त केला होता. त्यात त्यांनी लोकांना व्यापारात येण्याचे आवाहन करून आपल्या मुलांनाही व्यापारात आणण्याचा विचार बोलून दाखविला होता. व्यापार-उद्योगात मराठी जनता कमी पडते, हे बघून संस्थानातील लोकांनी शेती व्यवसायावरच जास्त बोजा होईल, असे न पहाता व्यापार धंद्याकडे वळावे, म्हणून आर्थिक सहाय्याबरोबरच इतर सवलतीसुद्धा सरकारातून व्यापारासाठी दिल्या होत्या. व्यापारचे धोरण हे त्यांनी स्वत:च्या घरात सुद्धा लागू केले होते.

महाराजांचे सुपुत्र श्री युवराज महाराज यांना हुंड्याबद्दल एक लाख रुपये आलेले होते. त्याची जबाबदारी ही चि. बापूसाहेब कागलकर यांजकडे होती. श्री. युवराज महाराज यांना त्या हुंड्यामधील रु. २५,००० एवढी रक्कम ही व्यापाराच्या कामासंबंधानेच दिली गेली होती आणि त्यानंतरदेखील उर्वरित पाऊण लाख रुपये ही केवळ व्यापाराकरिता बक्षीस म्हणून देण्यात आल्याचा ठरावच महाराजांनी मंजूर करून युवराजांनाही व्यापार-उदिमासाठी प्रोत्साहन दिले होते. आरबीएन ॲन्ड कंपनी ही युवराज राजाराम महाराजांसाठी तर एसएबी ही कंपनी द्वितीय पुत्र शिवाजी महाराजांसाठी काढण्यात आली होती.[९५]

९) व्यापारासाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यापाराचा मानसन्मान

शाहू महाराजांपूर्वी संस्थानात व्यापार तसा दुर्लक्षित होता. महाराजांनी ही परिस्थिती बदलली. छोट्याशा संस्थानात शाहूपुरी, जयसिंगपुरी, राधानगरीसारख्या बाजारपेठा व वसाहती निर्माण करून व्यापाराचे जाळेच तयार केले होते. हे करत असताना त्यांनी व्यापाऱ्यांना कोल्हापुरात येऊन व्यापार करण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद ही चांगला मिळाला होता. केवळ एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर ज्या व्यापारांनी प्रतिकूल परिस्थितीत ही कोल्हापुरातील व्यापारास हातभार लावला, त्याची जाण ठेऊन त्यांना नेहमीच सहकार्य करून त्यांच्या कार्याची पावती दिली होती. दि. २६ मार्च १९११ च्या ठरावाद्वारे परशुराम राम रतन मारवाडी यांचे कोल्हापूरातील व्यापार संबंधाचे योगदान बघून त्यांना 'नगर शेठ' हा किताब देण्यास व 'श्रीमंत महाराज छत्रपती साहेब यांचा व्यापारी' असे लिहिलेले एक सुवर्णपदक देण्यास महाराजांनी मान्यता दिली होती.

१०) गुळाच्या बाजारासंबंधी ठराव

संस्थानात शाहू महाराजांच्या पुढाकाराने उद्योग व्यापारात वाढ होऊ लागली होती. त्यावेळी ऊस लागवड मोठया प्रमाणात होत होती. त्यातूनच गुळाचे महत्त्व वाढत गेले. कोल्हापुरातील गूळ सर्वत्र प्रसिद्ध होता. कोल्हापूर गुळाच्या बाजारपेठेसाठी स्वतंत्रपणे ओळखले जाऊ लागले. संस्थानाच्या आर्थिक उलाढालीत गुळाचा मोठा हातभार होता. या गुळाच्या बाजारासंबंधाने कोल्हापूर म्युन्सिपल कमिटीच्या वतीने रेल्वे स्टेशनवर नाके बसवून जकात वसूल करण्याचा प्रश्न ऐरणीवर आला, तेव्हा शाहू महाराजांनी त्या अर्जावर जो ठराव मंजूर केला. तो त्याच्याच शब्दात पहाणे योग्य ठरेल.

गुळाचा व्यापार स्टेशनवर पुढे होणार, म्हणून समजते. तसे झाल्यास म्युनिसिपल कमेटीचे नुकसान होणार सबब स्टेशनवर नाके ठेऊन टोल दस्तुरी करवीर कमेटीचे मक्तेदास घेणेस परवानगी व्हावी, म्हणून चालले कामी हुजुरास दिवाण यांनी सुनावणी केल्यात आज्ञा झाली की, १. म्युनिसीपालिटीने भाषा वापरली ती बरोबर नाही, परंतु ते सरकारी नोकर नसल्याने त्यास पद्धत माहित नसावी. पद्धतशीर लिहिणेबद्दल प्रेसिडेंट यांनी सुचविले पाहिजे होते, पुढे तजवीज राहावी. २. स्टेशनवर बाजार भरणेबद्दल सक्ती केलेली नसून, हल्ली गावात बाजार भरत आहे, तसा कारण न पडल्यास पुढे भरणेचा आहे. ३. स्टेशनची हद्द मुन्सिपल हद्दीबाहेर असून तेथे व्यापार होतो, तेथे जकात बसवावी, असे कमिटी म्हणते, परंतु तेथे बहुदा परके ठिकाणाचे मालाचा व्यापार होतो. सबब जकात बसविणे किंवा ती हद्द कमेटीकडे देणे सध्या वाजवी नाही.[९६] अशा प्रकारे गुळाच्या बाजारासंबंधीचा ठराव मंजूर करून नियमांची स्पष्टता महाराजांनी केली होती.

११) व्यापारासाठी सरकारी शेरी जमीन मोफत देणेबाबत

मलकापूर येथील व्यापारी लोकांनी चनवाड येथील सरकारी जमिनीची मागणी बाजार निर्माण करिता मागितलेली होती. त्यावर दि. २७ ऑक्टोबर १८९९ च्या ठरावाद्वारे शाहू महाराजांनी त्यांची मागणी मंजूर करून ते मागतील, त्या सरकारी जमिनी त्यांना बाजाराकरिता द्याव्यात, अशी आज्ञा देऊन त्याचा कर एक वर्षापर्यत माफ केला व तसे लिलावदार यांना कळविण्याच्या सूचना दिल्या. तेथील जागा ही व्यापारी वर्गाला बाजारासाठी मोफत दिल्याने सदर जागेचे भाडे

न घेता जागेचा बंदोबस्त मात्र योग्य तो करावा, असे सांगून व्यापारास आवश्यक ती मदत दिली.

१२) शाहूपुरी वसाहत

संस्थानात रेल्वेचे जाळे हे व्यापाराच्या दृष्टीने फायदेशीर ठरत होते. कोल्हापुरात रेल्वेस्टेशन परिसरात व्यापारासाठी पेठ वसविण्याची जबाबदारी श्री. विचारे, अभियंता व श्री. भास्करराव जाधव यांच्यावर सोपवली. सन १८९५ मध्ये अशा रीतीने शाहूपुरी वसाहत जन्माला आली. या वसाहतीसाठी व येथील व्यापारासाठी अनेक व्यापाऱ्यांना सवलती, कर्जे व अन्य प्रकारची मदत करून त्यांना तेथे स्थायिक होण्यास सहकार्य केले. यात विशेष करून त्यांनी कागल येथे निपाणी भागातील व्यापारांसोबत संवाद साधून त्यांनाही सवलती देऊन शाहूपुरीत आणण्याचे महत्त्वाचे काम केले. पेठेच्या वाढीसाठी तेथे रस्ते, इमारती बांधून व्यवसायोपयोगी दुकाने, गोदामे बांधली. व्यापार दळणवळणाच्या सोईसाठी रेल्वेबरोबरच सार्वजनिक रस्ते बांधले, पोस्ट व तार खाते सुरू करून आधुनिकता आणली. शाहूपुरीत व्यापारांच्या सोईसाठी सन १९०५ ला संस्थानाचे दिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली बँक स्थापन करण्यात आली होती.

महाराजांच्या या भूमिकेमुळे शाहूपुरी हे व्यापारी केंद्र म्हणून विस्तारित होण्यास मदत झाली. सन १९०१–०२ च्या सुमारास वेंगुर्ले येथील व्यापारी इथे येऊन गूळ, भुईमूग व इतर धान्यांचा व्यापार करू लागले. शाहूपुरीत व्यापार वाढण्यासाठी बाजारपेठेत येणाऱ्या लोकांबरोबर बोलून त्यांच्या संपर्कात राहून लागेल ती मदत देण्याविषयी ठराव मंजूर करून महाराजांनी स्पष्ट सूचना दिलेली होती.

शंकरप्पा नागप्पा बुटाळे या व्यापाऱ्याला गुळाचा व्यापारासाठी शाहूपुरीत स्वतंत्र जागा दिली होती. शाहूपुरी पेठ ही १९२१ पर्यंत गूळ व साखरेची निर्यात करणारे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयाला आले होते. कोल्हापुरातील निपाणी, दडी, चिपळूण, राजापूर, सांगली–मिरज जामखंडी येथील व्यापारीसुद्धा कोल्हापूरशी जोडले गेले. व्यापारामध्ये विणलेले कापड, रेशमाचे कापड, ब्लांकेट्स, गालीचे, कच्चा सामान, साखर, गूळ, भुईमूग याचा समावेश व्यापारामध्ये होता.[९७]

१३) राधानगरी बाजारपेठ

महाराजांनी संस्थानातील मोठे धरण असणाऱ्या श्री महालक्ष्मी तलावाची उभारणी भोगावती नदीवर केली होती. तिच्या पायथ्याशीच भुदरगड भागातील वळीवडे या गावी धरणाच्या खालच्या बाजूला एक नवीन पेठ बसवून त्या पेठेस आणि त्या वळीवडे गावास आपल्या कन्येच्या नावाने राधानगरी हे नाव दिले होते. सदर बाजारपेठ व तेथील श्री महालक्ष्मी तलाव हा सुद्धा पुढे राधानगरीच्या नावानेच ओळखला जाऊ लागला. राधानगरी वसाहत व बाजारपेठ पुढे चांगलीच नावारुपाला आली होती. विविध भागातील लोकांना व व्यापारांना तेथे स्थायिक होण्यासाठी सवलती व अन्य मदत देण्याचे आश्वासन महाराजांनी दिले होते. त्यामुळे तेथे उत्तम बाजारपेठ व वसाहत उभी राहण्यास मदत झाली.

राधानगरीचा भाग तसा डोंगराळ भाग असल्याने तिथल्या लोकांना तिथेच बाजारपेठेची व्यवस्था व्हावी यासाठी सुरुवातीला व्यापारांना तेथे व्यापार करण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सरकारातून व्याजाने ४००० रुपये मंजूर केले होते. त्या रकमेतून ज्या ज्या व्यापाराला जेवढी रक्कम मदत म्हणून हवी असेल तेवढी त्यातून देण्याची तरतूद केली व या सर्वांचा हिशोब योग्य पद्धतीने लिहिण्याची खबरदारी घेतली गेली. ही सरकारी योजना जास्तीत जास्त गरजू व्यापारी लोकांपर्यंत पोहचेल याची दक्षता महाराजांनी घेतली होती. काही गरीब व्यापाऱ्यांनाही याठिकाणी सवलत देण्याचे धोरण होते. कासारवाडीमधील पडळी या गावाच्या बांगड्यांचा धंदा करणाऱ्या कासार लोकांना वेट माफी देऊन त्यांच्यावर ते देण्याची अजिबात जबरदस्ती करू नये असे आदेश महाराजांनी प्रशासनाला दिले होते.[१८]

१४) जयसिंगपूर वसाहत

कोल्हापूरचा राजकारभार हाती घेतल्यानंतर दुष्काळकाळातून लोकांना बाहेर काढण्याबरोबरच संस्थानातील आर्थिक प्रगती होण्यासाठी शेतीविकास, व्यापार-उद्योग या बाबींना अनुकूल धोरणे राबविली. वेगवेगळ्या मोक्याच्या जागांमध्ये वसाहती स्थापून नंतर तेथे व्यापार-उद्योगवृद्धीला चालना देण्याचे काम सुरू केले होते. शिरोळ येथील स्टेशनजवळ मोठी वसाहत स्थापन करण्याचे महाराजांनी निश्चित करुन जागेची पहाणी केली होती. नंतर लगेचच गावकऱ्यांच्या मदतीने ती जागा साफसफाई करून वसाहतीयोग्य केली गेली. त्यानंतर माहे जून

१९१६ मध्ये वसाहती स्थापनेला मंजूरी देताना आपल्या जनक वडिलांचे नाव त्यास देऊन जयसिंगपूर वसाहत असे नामकरण केले. वसाहतीच्या स्थापनेसाठी जो ठराव महाराजांनी मंजूर केला, त्यातील तपशील बघता वसाहतीच्या नियोजनाची कल्पना येते.

शिरोळरोड स्टेशन नजीक दक्षिण अंगास जो माळ आहे, त्या ठिकाणी जयसिंगपूर नावाची वसाहत करण्याच्या कामाची व्यवस्था खाली लिहिल्याप्रमाणे व्हावी–

१. सदरहू वसाहतीचे काम मि. विठ्ठल सखाराम कुंभोजकर वकील यांनी करावे, ते ऑनररी करणेचे आहे. त्यांना जयसिंगपूर वसाहत कामगार असा हुद्दा द्यावा.

२. त्यांचे ऑफिस शिरोळ मुनसफ कोर्टात एका कोठडीत ठेवावे.

३. हे ऑफिस रावसाहेब मराठे एक्स्टेंशन् ऑफिसर यांचे देखरेखीखाली असावे व जयसिंगपूर वसाहतीची जी कामे त्यांच्याकडे येतील, त्याजबद्दल हुजूर मंजूरी वगैरे घेऊन त्यांनी पूर्तता करावी.

४. ब्लॉक पाडणे, सडका करणे वगैरे कामाकरिता एक मेस्त्री इंजिनियर खात्याकडील या ऑफिसकडे नेमावा व त्याने जरूर लागेल तेव्हा मदत करण्याची आहे.

५. या ऑफिसास लागणारी मदत मामलेदार पेटा हातकणंगले यांनी करण्याची आहे.

६. वसाहत होण्याकरिता मि. दत्तात्रय बाळाजी अडके, रामभाऊ पटवर्धन, हरी लक्ष्मण कणेरकर, यांनी लोकांस माहिती वसाहतीकरिता देण्याची तजवीज करावी व तात्या पाटील चिपरीकर याने ही वरीलप्रमाणे तजवीज करावी.

७. मि. कुंभोजकर यांना या कामाकरिता आठवड्यांतून एक दोन वेळा यावे लागेल करिता त्यांची वकिलांची कामे त्यांचे सोईप्रमाणे घालण्याविषयी हुकूम देण्यात यावे

जयसिंगपूर वसाहत निर्माण करताना जागा ताब्यात घेणे वा इतर बांधकाम करणे इ. गोष्टींसाठी श्री. कुंभोजकर यांना वसाहतीसंबंधीत कामांचे काही विशेष अधिकार देऊन काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकडे लक्ष दिले. नव्याने निर्माण होणाऱ्या जयसिंगपूर या वसाहतीसाठी अनेक लोकांना तेथे स्थायिक होण्यासाठी सहकार्य केले जात होते. दुकाने, रस्ते, तार, पोस्ट इ.

सुविधा येथे ही करून व्यापारास पोषक वातावरण तयार केले. त्यामुळे व्यापारात वाढ झाली. गरजू लोकांना जयसिंगपूर येथे सवलती दिल्या गेल्या. निमशिरगावकर येथे राहणारी एक गरजू व्यक्ती भाऊ सुभाना या गरीब व्यक्तीला घर बांधण्यासाठी पुरेसा पैसा नसल्याने जयसिंगपूर येथील वसाहतीत जागा मोफत दिली होती.[९९]

शाहू महाराजांनी व्यापारवाढीसाठी याठिकाणीही अनेक सवलती व मदत केल्यामुळे जयसिंगपूर ही बाजारपेठ देखिल पुढे नावारुपाला आलेली दिसून येते.

सहकारास चालना

शेती–व्यापार–उद्योग यांना नवचेतना देण्याचे काम महाराजांच्या काळात झाले. राज्यातील गरीब शेतकरी, मजूर व कामगार वर्ग यांच्या अडी–अडचणी, त्यांची हलाखीची परिस्थिती बघून वित्तीय क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे, हे महाराजांनी ओळखले होते. 'विना सहकार नाही उद्धार' हे सहकाराचे ब्रीदवाक्य त्यांच्या धोरणात तंतोतंत आढळते. आपल्या राज्यात अनेक गोष्टीं नेहमीच सहकाराच्या माध्यमातून करुन समाजाला एकत्रित करण्यासाठी प्रयत्न राजर्षींनी केले होते. त्यांचे सहकाराचे तत्त्व व त्याबद्दलची विचारधारा त्यांनी एका भाषणात नोंदविलेल्या मतांवरून दिसून येते. ते म्हणतात, ''आपण असुशिक्षित व अडाणी आहात. आपणाला सुव्यवस्थित रीतीने काम करण्याची सवय लागणे जरुर आहे. त्यासाठी आपल्याला पहिल्या शाळा म्हणजे चाळीचाळीतील किंवा कारखान्या–कारखान्यातील सहकारी पतपेढया ह्या होण्यास योग्य आहेत. त्या दिशेनेहि आपण प्रयत्न करावेत. आपणापैकी बरेच लोक गिरणीत कापड विणण्याचे काम करितात. आपल्याच धंद्यातील लोकांनी सुमारे ६० वर्षांपूर्वी राचडेल येथे सहकारी तत्व शोधून काढून दुकान सुरु केले. त्याचा परिणाम इंग्लडच्या व जगाच्या प्रगतीवर झाला आहे, हे आपण विसरता कामा नये. अशा सर्वोपयोगी तत्त्वाचा अवलंब आपण करून त्याची वाढ केली म्हणजे आपणास आपले हक्क मिळविण्यास सामर्थ्य येणार आहे.''[१००]

खालसा प्रांतात सन १९१२ ला सहकार कायदा लागू झाला होता. तशाच धर्तीवर संस्थानातही महाराजांनी त्याची अंमलबजावणी केली. त्या कायद्याचे महत्त्व जाणून त्यात संस्थानातील स्थितीनरुप बदल करून कोल्हापूरमध्ये १९१३ ला हा कायदा लोकांसाठी जाहीरनामा काढून प्रसिद्ध करुन लागू केला. श्री. भास्करराव जाधव यांनी सुरवातीला नगरपालिकेतील

कर्मचाऱ्यांसाठी 'दि कोल्हापूर को ऑपरेटीव्ह सोसायटी लि.' ही संस्था निर्माण केली. संकटकाळात आर्थिक मदत म्हणून या संस्थेचा आधार लोकांना होता. सुरवातीला रुपये एक हजार भांडवल नगरपालिकेने दिले होते. ही सोसायटी पुढे विस्तारून 'अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक' झालेली होती.[१०१] या संस्थेमुळे कोल्हापूरात मात्र सहकार चळवळच सुरू होऊन बहुतेक क्षेत्रात सहकार तत्व सुरू झाले. सहकारी तत्वावर चालणाऱ्या अनेक संस्थांची स्थापना झाली. दूध सहकारी संस्था, सहकारी सूतगिरण्या ही त्यांची यशस्वी उदाहरणे पहायला मिळतात. सहकाराच्या तत्त्वाआधारे लोकांना एकत्र येण्याचे व व्यासपीठ मिळण्याचे फायदे कळू लागले. शेतीक्षेत्रात शेतकऱ्यांना बचत होणे व प्रसंगी कर्जे देण्यासाठी त्यातूनच पुढे पतपुरवठा संस्था गावोगावी उभ्या राहिल्याने यामाध्यमातून स्वस्त दरामध्ये शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला कर्ज उपलब्ध होऊ लागले. लोकांना व्यवसाय करण्यासाठी पतपेढयांनी कर्ज उपलब्ध केल्यामुळे विविध व्यवसायाच्या क्षेत्रांमध्ये सुद्धा प्रगती झाली. को-ऑपरेटिव्ह संस्थांनी लावलेल्या हातभारामुळे औद्योगिकरणाला चालना मिळाल्याचे दिसते.

१९१७-१८ मध्ये संस्थानामधील सहकारी पतपेढ्यांचा विचार करता जवळपास ७७७ सभासद होते तर याच कालावधीमध्ये सहकारी संस्थेचे खेळते भांडवल १,०३,३४८ इतके होते. पुढे दोनच वर्षांतील आकडे पाहिले, तर सन १९१९-२० मध्ये एकूण सहकारी सभासद संख्या १२७५ पर्यंत गेली होती आणि पतपेढ्यांमधील एकूण खेळते भांडवल ३,७९,९४१ इतक्यावर गेल्याचे आपणाला तत्कालीन दस्तऐवजांच्या नोंदींवरून दिसते.[१०२]

महाराजांनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या पतपुरवठ्या आधारे विविध क्षेत्रातील विकासाची पायाभरणी झाली. त्यात पुढे प्रगती होऊन कोल्हापूरमधील सहकारी संस्था लोकांच्या जीवनाचा अविभाज्य घटक तर बनल्याच, पण सहकार क्षेत्रातील कोल्हापूरचे स्थान नेहमीच अग्रेसर राहिले.

- **सहकार कायदा**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सहकार क्षेत्राच्या वाढीसाठी परिस्थितीनरुप योग्य बदलांसह सहकार कायदा केला. त्यानंतर तो सन १९१३ ला करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला गेला.

NOTIFICATION[103]

Legislative Department

Kolhapur 28th May 1913

No:-6 In supersession of Notification No.4, dated 4th July 1912, published at Page 155, Part I of the Kolhapur State Gazette dated 13th July 1912, in so far as it relates to the Kolhapur State, Proper, His Highness the Chhatrapati Maharaja Saheb has been pleased to sanction the introduction, mutatis mutandis, into the State Proper, of Act II of 1912 (The Cooperative Societies Act, 1912) together with rules and orders already passed to be hereafter passed there under, from the 1st June 1913,

By order of His Highness the Chhatrapati Maharaja Saheb of Kolhapur,

R. V. SABNIS,

Diwan of Kolhapur

सरकारी कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतपेढीस उत्तेजन : शाहू महाराजांनी सहकाराचे महत्त्व लक्षात घेऊन सरकारी नोकरांच्या सहकारी पतपेढीस उत्तेजन व त्यात अनेक कर्मचाऱ्यांनी सभासद व्हावे म्हणून काही सवलती जाहिर केल्या होत्या. जे कर्मचारी स्वखुशीने सभासद होतील, त्यांची मासीक वर्गणी ही कार्यालयप्रमुखाने त्यांच्या पगारातूनच कापून पतपेढीकडे वर्ग करावी. तसेच सभासदांना कर्जे पुरविणे वा मासिक हफ्ता घेणे या गोष्टीही त्या कार्यालयाने कराव्यात, असे त्यावेळी आदेश काढले होते. महाराजांनी आपल्या कर्मचारी वर्गालाही या माध्यमातून बचतीची सवय लावली होती.

सरकारी सहकारी सोसायटीसाठी अधिकाऱ्याची नेमणूक : सरकारी सहकारी सोसायटीत त्यांच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी श्री. राजाराम नारायण राजाज्ञे या अधिकाऱ्याची ऑनररी ऑर्गनायझर म्हणून नेमणूक केली. त्यांना या कामासाठी खालसा प्रांताप्रमाणेच कामकाजभत्ता लागू केला होता.[१०४]

सहकारी संस्थांमधील सरकारी हस्तक्षेप टाळण्याचा नियम : सहकारी संस्थामध्ये सरकारी अधिकारी यांच्या नियुक्तीमुळे काही गैरव्यवहाराची प्रकरणे महाराजांसमोर आली. तेव्हा अशा

प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी महाराजांनी सहकारी संस्थामधील सरकारी हस्तक्षेप टाळण्यासाठी नियम केलेला आढळतो. सरकारातील काही अधिकारी व कर्मचारी हे काही सहकारी संस्थांमध्ये उच्चपदावर काम करत असल्याने त्यांच्या कलाने तेथे कामकाज चालायचे. परंतु यामुळे या संस्थेचा मूळ उद्देश हरविला जातो, हे महाराजांना एका रॉकेल तेलाच्या को–ऑपरेटिव्ह स्टोअरमुळे लक्षात आले होते. एक सरकारी अधिकारी मि. जाधव हे तेथे प्रेसिडेंट होते. त्यांच्या इच्छेमुळे एका मंडळाला रॉकेल पुरविण्यात आलेले नव्हते. एका सरकारी व्यक्तीच्या हस्तक्षेपामुळे हे झाल्याने त्यावर कडक प्रतिबंध करण्यासाठी शाहू महाराजांनी यापुढे कोणत्याही सरकारी अंमलदारांनी कोणतेही संस्थेचे प्रेसिडेंट, सेक्रेटरी, मॅनेजिंग कमिटीचे मेंबर वगैरे प्रकरणाचा संबंध ठेवणे इष्ट वाटत नाही. सबब कोणत्याही अंमलदारांनी तसा संबंध ठेवू नये. असा एक जाहिरनामाच काढून सहकारी संस्थांतील गैरप्रकाराला आळा घातला.[१०५]

शाहू महाराजांनी दिलेल्या पाठबळामुळे कोल्हापूर राज्यात अनेक क्षेत्रातील सहकारी तत्त्वावरील संस्थांची पायाभरणी झाल्याने महाराजांना सहकारी चळवळीचे जनक म्हटले जाते. शाहू छत्रपतींच्या कार्यकाळात शेती विकासाच्या दृष्टीने केलेल्या कार्यामुळे संस्थानात जी आर्थिक स्थिरता येत गेली त्यातून पुढे उद्योग–सहकार व व्यापार यांचाही विकास होत गेला.

संदर्भसूची

१) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि. श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. २५

२) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. ८२०

३) कित्ता, पृ. ८१८–८१९

४) कित्ता, पृ.. ८२२

५) कित्ता, पृ. ८४३

६) कित्ता, पृ. ८२७

७) कित्ता, पृ. ८३८

८) कित्ता, पृ. ८७६

९) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि.११/३/१९१६, कोल्हापूर, पृ. ७४,

१०) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.११५,

११) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब.शि. श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. १६६

१२) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ.३५,

१३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट,भाग १, दि. ३१/८/१९१८, कोल्हापूर पृ. १२८.

१४) हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ११५, ठराव नं. ३५६, दिनांक १५/१०/१९१४, कोल्हापूर.

१५) हुजूर ऑफिस, ठराव बुक ७७, ठराव नं. ७३६, दि. १३/१/१९१०, कोल्हापूर.

१६) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ३५ आणि हुजूर ऑफिस बुक क्र. ५८, ठराव नं.७०६, दि. २/१/१९०६.

१७) पाटील शामराव (संक.) देसाई संजीव (संपा.) जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ७६

१८) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅजेट, भाग–१, दि. २०/०१/१९००, कोल्हापूर, पृ. १८,

१९) हूजूर ऑफिस, ठराव नं. अनुक्रमे –९८६, १३१, ५०९ अनुक्रमे दि. ३/६/१९०७ दि. ४/७/१९१० दि. २०/१२/१९१५, कोल्हापूर

२०) हुजूर ऑफिस, खाते, ठराव क्र. १७७, दि. ७/९/१९१७, कोल्हापूर

२१) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. ८२०

२२) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ८४

२३) पाटील शामराव (संक.) देसाई संजीव (संपा.) जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. १६१

२४) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ९२

२५) पाटील शामराव (संक.) देसाई संजीव (संपा.) जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ५१

२६) कित्ता, पृ. ४८,

२७) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ७२,

२८) कित्ता, पृ.८५,

२९) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट,भाग १, कोल्हापूर, दि. २४/११/१९०६, पान नं २६२,

३०) हुजूर ऑफिस, ठराव नं. ९६५, ३८५,१२३९ अनुक्रमे दि. २१/४/१९०४ दि. २२/८/१९०४ दि. २०/५/१९०५, कोल्हापूर

३१) हुजूर ऑफिस, ठराव बुक १०७, ठराव नं. ७०३, दि. २१/२/१९१४, कोल्हापूर

३२) हुजूर ऑफिस, ठराव बुक १०७, ठराव नं. ७०१, दि. २१/२/१९१४, कोल्हापूर

३३) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.५४.

३४) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट,भाग – १, दि. ३१/१/१८९६, कोल्हापूर, पान ३

३५) हूजूर ऑफिस, ठराव क्र. अनुक्रमे ०१,१८९,१३९, दि. १३/४/१९०९ दि. १/८/१९१०, दि. २१/८/१९१३, कोल्हापूर

३६) हूजूर ऑफिस, ठराव बुक, १०२, १०८, ५३, ५३, ५५, ६०, १०९, ५८, ५७, ५७, दि. २८/१०/१९११, दि. ३१/०३/१९१३, दि. १३/३/१९१४, दि. ५/११/१९०४ दि. ७/२/१९०५, दि. २३/३/१९०६, दि. १०/४/१९०७ दि. २/७/१९१४दि.

१९/९/१९०५, दि. २१/१०/१९०५ दि. १६/३/१९०५ , कोल्हापूर नुसार संदर्भ घेण्यात आले आहे.

३७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६०, ठराव नं. ४८५, दि. २८/११/१९०६ , कोल्हापूर

३८) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६२, ठराव नं. १३५, दि. १४/७/१९०६ , कोल्हापूर

३९) हूजूर ऑफिस, ठराव क्रमांक ८७२, ३७८, ४७९, ८४९ अनुक्रमे दि. २६/३/१९११, दि.१/१०/१९१२, दि. १४/१०/१९१६ दि. १२/४/१९०९ , कोल्हापूर

४०) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५४, ठराव नं. ५६, दि. २२/६/१९०५ , कोल्हापूर

४१) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.६४,

४२) हुजूर ऑफिस, ठराव बुक ११८, ठराव नं. ७४३, दि. १/५/१९१६ , कोल्हापूर

४३) हुजूर ऑफिस, ठराव क्र. ५३८, ८९५, ११५, ८२० अनुक्रमे, दि. ६/१०/१९११, दि. ३१/३/१९१३, दि. ९/७/१९०४, दि. २/२/१९१२ , कोल्हापूर

४४) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६७, ठराव नं. २२१, दि. २९/८/१९०८ , कोल्हापूर

४५) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६०, ठराव नं. ९८५, दि. ३/६/१९०७ , कोल्हापूर

४६) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५१, ५३ ठराव नं. ४६२, ५०७ अनुक्रमे दि. १६/९/१९०४, दि. २८/११/१९०४ , कोल्हापूर

४७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६२, ठराव नं. २७१, दि. ८/१०/१९०६ , कोल्हापूर

४८) हुजूर ऑफिस, ठराव बुक १२५, ठराव नं. ५७९, दि. १८/१२/१९१५ , कोल्हापूर

४९) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५१, ठराव नं. १२४०, दि. २०/५/१९०५ , कोल्हापूर

५०) हुजूर ऑफिस, ठराव बुक अनुक्रमे १०९, ११२ ठराव नं. २९९, ७४७, दि. ६/८/१९१४, दि. २९/१/१९१५ , कोल्हापूर

५१) हूजूर ऑफिस, ठराव क्रमांक, अनुक्रमे –१५०,२३१,१५९,५८५,६३०,७४४ , अनुक्रमे दिनांक १६/७/१९०९ दि. २८/७/१९०९, दि. २३/५/१९०७ दि. १६/१२/१९०७दि. १६/१/१९०८, दि. १०/२/१९०८ , कोल्हापूर

५२) हूजूर ऑफिस, ठराव क्रमांक ५८५, २९२, ४१८ अनुक्रमे दि. १६/१२/१९०७ दि. १२/११/१९१८ दि. ३१/१०/१९२० , कोल्हापूर

५३) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ८७,

५४) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. १/६/१८९५, कोल्हापूर, पृ.१२४

५५) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. २२

५६) हुजूर ऑफिस, ठराव बुक ८२, ठराव नं. ७२२, दि. २७/१२/१९१० , कोल्हापूर

५७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५७, ठराव क्र. १०७७, दि. ४/५/१९०५, पृ क्र. ८५ , कोल्हापूर

५८) हुजूर ऑफिस, ठराव नं. अनुक्रमे १०४५,१०७,३२९,३९४,२६९,२०७,४८१ अनुक्रमे दि. १८/३/१९०५ दि. ३१/७/१९०५ दि. १६/१०/१९०६, दि. २६/१०/१९०६ दि. २४/८/१९०७ दि. २५/२/१९१० दि. २३/१२/१९१२ , कोल्हापूर

५९) हुजूर ऑफिस, ठराव नं. अनुक्रमे ६१३, ४८५, ६५, ८२०, ५८० अनुक्रमे दि. ३१/१०/१९०५ दि. ५/१२/१९१० दि. २३/६/१९०६ दि. ५/४/१९०७ दि. ७/१२/१९०९, कोल्हापूर.

६०) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. २०६

६१) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. ८७७

६२) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.३०,

६३) हुजूर ऑफिस, अनुक्रमे ठराव नं. ५४८, ८६५,३७,१२२ अनुक्रमे दि. दि. २०/३/१९१८ दि. ११/५/१९०८ दि. २५/६/१९०८, दि. १६/७/१९०८ , कोल्हापूर

६४) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.६५ दि. १३/४/१९०९

६५) हुजूर ऑफिस, दिनांक ११/८/ १९०९ ठराव क्रमांक २५१ , कोल्हापूर

६६) हुजूर ऑफिस, ठराव बुक अनुक्रमे ७३, ७६, ठराव नं. ९३५, १४३ दि. १२/४/१९०९, ७/७/१९०९ , कोल्हापूर

६७) हूजूर ऑफिस, ठराव बु. ६५, ठराव न. अनुक्रमे २४७, ३९६, ५९७ दि. २०/८/१९०७ दि. १/११/१९०७ दि. २१/१/१९०८ , कोल्हापूर

६८) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.६७

६९) कित्ता, पृ. ७९,

७०) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव, (संपा.), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. १६

७१) कित्ता, पृ. ९५

७२) हुजूर ऑफिस, ठराव बुक १०६, ठराव नं. १०३, दि. ३१/७/१९१३ , कोल्हापूर

७३) हुजूर ऑफिस, ठराव बुक७२, ठराव नं. ६२३, दि. ५/२/१९०९ , कोल्हापूर

७४) हुजूर ऑफिस, ठराव बुक ८१, ठराव नं. ४०१, दि. २२/९/१९१० , कोल्हापूर

७५) हुजूर ऑफिस, ठराव बुक ८२, ठराव नं. १५८, दि. ३०/७/१९१० , कोल्हापूर

७६) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५१, ठराव नं. ६१५, दि. २८/११/१९०४ , कोल्हापूर

७७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५४, ठराव नं. ४४७, दि. २०/९/१९०५ , कोल्हापूर

७८) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६२, ठराव नं. ४३०, दि. २०/११/१९१० , कोल्हापूर

७९) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६२, ठराव नं. ७६१, दि. ११/३/१९०७ , कोल्हापूर

८०) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६२, ठराव नं. ७८६, दि. २१/३/१९०७ , कोल्हापूर

८१) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६५, ठराव नं. ४९१, दि. ४/१२/१९०७ , कोल्हापूर

८२) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६३, ठराव नं. ६४३, दि. १६/१/१९०८ , कोल्हापूर

८३) हुजूर ऑफिस, ठराव बुक ६५, ठराव नं. ४९, दि. ८/७/१९०७ , कोल्हापूर

८४) हुजूर ऑफिस, ठराव बुक ११२, ठराव नं. ५८७, दि. २१/११/१९१४ , कोल्हापूर

८५) हुजूर ऑफिस, ठराव बुक १२१, ठराव नं. ८१९, दि. १५/५/१९१६ , कोल्हापूर

८६) हुजूर ऑफिस, कोल्हापूरचे प्रशासकीय अहवाल सन १९१२–१३, पृ.३६ , कोल्हापूर

८७) हुजूर ऑफिस, ठराव बुक ११२, ठराव नं. ८२६, दि. २५/२/१९१५ , कोल्हापूर

८८) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. ८२०

८९) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १७,

९०) हुजूर ऑफिस, ठराव बुक ५० अ , ठराव नं. ५७२, दि. ९/१२/१९०३ , कोल्हापूर

९१) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. ५६, ५८

९२) कित्ता, पृ.१०६

९३) हुजूर ऑफिस, ठराव बुक १०९, ठराव नं. ४४, दि. २७/६/१९१४ , कोल्हापूर

९४) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १२४,

९५) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव, (संपा.), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.) राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ११

९६) हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव क्र. १३३ दिनांक १७/ ७/ १९०१ , कोल्हापूर

९७) हूजूर ऑफिस, ठराव बुक क्र. अनुक्रमे ५३, ५१, ५८ ठराव नं. ६२६, १२२६, ४५२ अनुक्रमे दि. ९/१/१९०५ दि. १०/५/१९०५ दि. १०/१०/१९०५ , कोल्हापूर

९८) हुजूर ऑफिस, ठराव क्रमांक ७५४, दिनांक २४/२/१९०८ , जनरल ठराव बुक क्र. ३९९, दि. २३/९/१९०९, ठराव बुक ७५, ठराव नं. १०७८, दि. ४/६/१९१० , कोल्हापूर

९९) पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८ पृ. १२१, १४३.

१००) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ४१–४३

१०१) सूर्यवंशी कृ. गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.५१२

१०२) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ४२

१०३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भा. १, दि. ३१ मे १९१३, कोल्हापूर

१०४) हुजूर ऑफिस, मुलकी ठराव क्र. १४३, दि. २७-८-१९१८, कोल्हापूर

१०५) पाटील शामराव (संक.) देसाई संजीव (संपा.) जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग-२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ४४

प्रकरण सहावे

समारोप (सारांश आणि निष्कर्ष)

प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराजांचे वैचारिक योगदान

१) जातीनिर्मूलनाचे प्रणेते

२) स्त्रीमुक्तीचे पुरस्कर्ते

३) शिक्षणाचे पुरस्कर्ते

४) हरित क्रांतीचे जनक

दुष्काळ निवारणार्थ केलेल्या कामाची फलनिष्पत्ती

शेतीसाठीच्या जलव्यवस्थापनाची फलनिष्पत्ती

शेती क्षेत्रातील फलनिष्पत्ती

उद्योग–व्यापार क्षेत्रातील फलनिष्पत्ती

सहकार क्षेत्रातील फलनिष्पत्ती

छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची निधनानंतर घेतलेली दखल

प्रकरण सहावे

समारोप (सारांश आणि निष्कर्ष)

प्रस्तावना

कोल्हापूरचे छत्रपती म्हणून राजर्षींनी तत्कालीन गर्व्हनर लॉर्ड हॅरिश यांच्या उपस्थितीत दि. २ एप्रिल १८९४ रोजी पदग्रहण केले. त्याप्रसंगी लोककल्याणकारी राज्य करण्याचे, राज्यकारभार हा प्रजाहितासाठी करण्याचे जे वचन दिले होते, त्या वचनासाठी ते आजन्म कार्यरत राहिले.

छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ शेतीविकासासाठी केलेले जलव्यवस्थापन हे त्यांनी केलेल्या अनेक कार्यांपैकी तेवढेच वेगळेपण दर्शविणारे आणि संस्थानाच्या विकासात मूळ भूमिका निभावणारे असेच कार्य आहे.

हिंदवी स्वराज्याचे छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या स्वराज्याचा विस्तार करताना अनेक गड–किल्ले बांधले होते. ते बांधताना त्यांनी प्रथम पाण्याला महत्त्व दिले होते. पाणी म्हणजेच जीवन मानून जलसंवर्धन केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या एका आज्ञापत्रामध्ये पाण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे आज्ञा दिलेली होती. (शिवनीती : रामचंद्रपंत अमात्य)

'गडावर आधीं उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाहीं आणि ते स्थळ आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधीं खडक फोडून तळीं, टांकीं पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशीं मजबूत बांधावीं. गडावर झराही आहे. जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकियावरीच निश्चिंती न मानावी, किं निमित्य की, झुंजामध्ये भांडियांचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हा संकट पडतें, या करिता तसे जागीं जखिरियारीयाचें पाणी म्हणून दोन चार टाकीं तळीं बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन करावें.'

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या आज्ञापत्रावरून त्यांनी किल्ले बांधताना प्रथमत: पाणी असेल तर किल्ला बांधावयास सांगीतले आहे आणि तशीच आवश्यकता असेल, तर पाण्याची व्यवस्था

कशी असावी याबाबत काही नियमच घालून दिले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच छत्रपती शाहूमहाराजांनी पाण्याचे महत्त्व ओळखले होते. दुष्काळ निवारणासाठी काम करताना तर याची प्रचिती त्यांना तीव्रतेने आली होती. लोकांना जगवायला एकवेळ अन्नधान्य बाहेरून मागविता येऊ शकते पण पाण्यासाठी मात्र राज्यातच व्यवस्था असणे आवश्यक आहे हे त्यांनी ठरवून त्यासाठी काम केले. त्याकाळात आजच्या सारख्या आधुनिक व प्रगत सोयी-सुविधा नसतानाही शाहू महाराजांनी या मूलभूत गरज असलेल्या पाण्याच्या संवर्धनाचे काम केले ते आजही दिशादर्शक आहे.

कोल्हापूर संस्थानातील शेतीवर अवलंबून असलेले जीवन व अर्थकारण याला जर उर्जितावस्था आणावयाची असेल, तर सरकारी पातळीवर सवलती, आर्थिक मदत करून राज्यातील पारंपारिक शेतीमध्ये बदलत्या बाजारपेठेला साजेसे आधुनिक बदल करून त्यात सुधारणा करून शेती व्यवसायाला उन्नतीकडे नेले जाऊ शकते, याची जाण महाराजांना होती. तथापि, मानवाबरोबरच शेतीजीवनासाठी सुद्धा पाण्याची मूलभूत गरज असते. पाण्याशिवाय शेती अशक्यच! यामुळेच शाहू महाराजांनी शेतीविकासाच्या माध्यमातून संस्थानाचा विकास पुढे नेताना पाणी या घटकाला केंद्रस्थानी ठेवून त्यायोगे प्राधान्याने भरीव काम केलेले आढळते आणि हेच त्यांच्या कार्याचे वेगळेपण आहे.

संस्थानाला जलस्वयंपूर्ण करतेवेळीही लोकहिताचाच विचार करून धोरणांची अंमलबजावणी महाराजांनी केलेली होती. राधानगरी धरणासारख्या मोठ्या जलक्षमतेच्या प्रकल्पामुळे कोल्हापूरात हरितक्रांती झाली. आजही कृषीक्षेत्रात कोल्हापूर अग्रेसर आहे. तथापि, यामागे केवळ एक मोठे धरणच नाही, तर याच सोबतीने महाराजांनी संस्थानातील गावागावांत, विहीर, झरे, तलाव, नदी यांच्या माध्यमातून जे जल संवर्धन व व्यवस्थापन केले, त्याचे योगदान ही तेवढेच मोठे आहे.

शेती क्षेत्रासाठी धरणासारखा जलस्रोत अतिशय उपयुक्त ठरतो. शेती क्षेत्राच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत आमुलाग्र बदल घडवून आणायचा असेल, तर सिंचनसुविधा आणि पाण्याची उपलब्धता असणे अतिशय आवश्यक असते. पावसावर आधारित शेतीमध्ये या बाबी बऱ्याचदा अशक्य ठरतात. साहजिकच पावसाळा वगळता इतर काळात पाण्याची उपलब्धता नसलेल्या

शेतीला खरीप–रबी हंगामाशिवाय दुसरी पिके घेणे अशक्य असते. अशा काळात धरणासारख्या जलस्रोतातून शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ शकले, तर शेती क्षेत्राची उत्पादकता आणि उत्पन्न यात मोठी वाढ घडवून आणण्यासह दुष्काळातून कायमस्वरूपी मुक्तता घडवून आणता येते. याची जाणीव महाराजांना होती. त्यामुळे महाराजांनी राधानगरी धरणाची निर्मिती करण्याचा संकल्प केला.

राधानगरी धरणातून पाण्याचा विसर्ग करून नदीमध्ये ते पाणी प्रवाहित करून नदीकाठच्या परिसराला फक्त शेतीसाठीच नाही तर पिण्यासाठी सुद्धा उपयोग व्हावा व प्रजेला मुबलक प्रमाणात पाणी मिळावे अशी त्यांनी योजना केलेली होती.

नदीपात्रातील पाण्यामुळे नदीकाठचा भूप्रदेश समृद्ध असतोच मात्र नदीचे पाणी पोहोचू शकणार नाही, अशा भागाला जलसमृद्ध करण्यासाठी महाराजांनी तेथील आड, विहिरी, झरे, ओढे, तलाव आदी जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केले. त्यातील गाळ काढणे, त्यांची डागडुजी करणे, भूजल पातळी ओळखून नव्याने जलस्रोत निर्माण करणे, जलस्रोतांची स्वच्छता राखणे असे अनेक कार्य त्यांनी हाती घेतले होते. दुष्काळी परिस्थितीत जलस्रोत पुनरुज्जीवनाच्या कामांतून लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. याच कामांच्या माध्यमातून पुढे येणाऱ्या दुष्काळावर मात करण्याची क्षमता त्यांना प्राप्त करून दिली.

छत्रपती शाहू महाराजांनी राजपदाचा उपयोग प्रजेच्या सुखासाठी केला. सत्तेवर आल्यानंतर दुष्काळ परिस्थितीवर मात करताना प्रथमपासूनच जल केंद्रीत काम केली. यामुळे झालेला शेतीविकास व त्याचे फलित म्हणजे कोल्हापूरचा भाग हा आजही हरित आहे, याचे श्रेय शाहू महाराजांनी केलेल्या जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाच्या कार्यालाच जाते, यात शंकाच नाही.

छत्रपती शाहू महाराजांचे वैचारिक योगदान

एकोणिसाव्या शतकापासून देशभरात सुधारणावादी वारे वाहू लागले होते. यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये नवीन सुधारणा होऊ लागल्या होत्या. सामाजिक, राजकीय क्षेत्रात परिवर्तन घडून येत होते. अनेक विचारवंतांनी व समाजसुधारकांनी आपापल्या परीने समाजात जागृती निर्माण

करण्याचे कार्य सुरू ठेवले होते. यात छत्रपती शाहू महाराज अग्रस्थानी होते, हे खरोखर वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराजांनी प्रतिकूल परिस्थितीतही अनेक विधायक कामे केली. आपल्या सुधारणावादी विचारांना योग्य कृतीची जोड दिली आणि आपल्या राज्याला उत्थानाकडे नेण्यासाठी कायम प्रयत्नरत राहिले. साहजिकच या कामावंर त्यांच्या वैचारिक जडणघडणीचा मोठा प्रभाव राहिलेला आहे. त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेतून त्यांच्याकडून अनेक लोकहीतउपयोगी कामे घडल्याचे दिसून येते. त्यांच्या वैचारिक योगदानाचे महत्त्व जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते

१) जातीनिर्मूलनाचे प्रणेते

राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी राज्याची समाजव्यवस्था आधुनिक काळाला साजेशी करण्यावर भर दिला. महाराजांनी पहिला हल्ला इथल्या जातीव्यवस्थेवर चढविला. पूर्वापार चालत आलेल्या बहुजन वर्गाचे होणारे शोषण बघून त्यांच्या उन्नतीसाठी हरत-हेने प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षणाची सक्ती करून वंचितांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जागृती घडवून आणली आणि आपल्या राज्यात अभूतपूर्व असा पन्नास टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला. महार वतने बंद करण्यासह दलित समूहास स्वाभिमानाची शिकवण दिली, तर दुसरीकडे कुलकर्णी वतने नष्ट करून सर्वसामान्याच्या पिळवणुकीवर आधरित रचना नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

जातपात न मानण्यासाठी १२ जुलै १९१९ मध्ये आंतरजातीय कायदा करून कृतीतून त्यांनी आंतरजातीय विवाह घडवून आणला. प्रत्यक्षात आपल्या चुलत भगिनी चन्द्रप्रभा बाई यांचा विवाह धनगर समाजातील इंदूरच्या तुकोजीराव होळकर यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी निश्चित केला व त्यासोबतच कोल्हापूर आणि इंदूर या संस्थानातील जवळपास शंभर मराठा–धनगर आंतरजातीय विवाह घडवून आणले. जातव्यवस्थेच्या श्रेणीमुळे जे व्यवसाय त्या जातीपुरताच मर्यादित राहिले होते, त्यांना समानतेच्या मार्गावर आणण्याचे काम राजर्षींनी केले.

जातपात ही भारताच्या व आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा अडसर आहे हे ओळखून महाराजांनी जातीव्यवस्थेला विरोध केला, म्हणून हंटरकार खंडेराव गोपाळ बागल हे महाराजांसदर्भात लिहितात, ''मागासलेल्या सर्व जातीत नवीन चेतना उत्पन्न करणे हे पहिले

काम होते आणि त्यासाठी महाराजांनी करवीर येथे सर्व जातीची बोर्डिंग उघडून शिक्षणाला सुरुवात केली. मागासलेल्या सर्व जातीत अस्पृश्यांइतके हाल दुसऱ्या कोणाचे झाले नाहीत. सामाजिक–धार्मिक औद्योगिक सर्वच बाबतीत त्याचे हाल कुत्रेही खात नाहीत. स्वर्गाची कल्पना कोठे असेल ती असो. परंतु नरकाचा प्रत्यक्ष अनुभव मात्र महारवाड्यात आणि मांगा–महारांचे घरी आज बिनचूक येत आहे. या अत्यंत नाजूक आणि कठीण परंतु अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाला महाराजांनी आस्थेने हात घातला. सर्व बाजूंनी सुधारणा करण्याचा यज्ञ त्यांनी हाती धारण केला.''

२) स्त्रीमुक्तीचे पुरस्कर्ते

त्या काळात जातीव्यवस्थेसारखीच जाचक व्यवस्था ही स्त्रीयांच्या बाबतीत ही होती. त्यांची अवस्था तर गुलामासारखी असायची. शाहू महाराजांनी त्या अबोल यातना बघून स्त्रीजातीला ही वाईट रुढींपासून मुक्तता देण्याचे व त्यांना सन्मानाने जगण्यासाठीचे आवश्यक ते प्रयत्न केले व कायदे केले. सन १९१७ ला संस्थानात विधवांच्या पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता दिली. मुलींसाठी अनेक शाळा चालू केल्या. बालविवाहासारखी प्रथा टाळण्यासाठी महाराजांनी मुलींच्या लग्नाचे किमान वय हे १२ असावे ही कायदेशीर तरतूद केली. कौटुंबिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी व स्त्री–पुरुष समान वागणूक या न्यायाने घटस्फोटाचे नियम संस्थानात लागू केले. देवदासीसाारखी कुप्रथा बंदी कायदा करून अनेक पिडीतांची शोषणातून मुक्तता केली. वारसा हक्क कायदा करून मुलींना संपत्तीत वाटा देण्याचा कायदा त्यावेळी त्यांनी केला होता. त्यामुळेच ते स्त्री मुक्तीचे पुरस्कर्ते होते.

३) शिक्षणाचे पुरस्कर्ते

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे जाणूनच महाराजांनी आपल्या कारकीर्दीत शिक्षणाचे महान कार्य केलेले आहे. कोणत्याही क्षेत्रात मग ते शेतीचे क्षेत्र का असेना त्यालाही शिक्षणाची गरज आहे, असे त्यांचे ठाम मत होते. सर्वप्रथम येथील जनता सुशिक्षीत व्हावे तसेच त्यांच्या अधिकाराची जाणीव व्हावी आणि त्यातून त्यांनी जीवनमान उंचवावे या विचारांनी महाराजांनी संस्थानात मोफत सक्तीचे शिक्षण कायदा सन १९१६ ला राबवून गाव तेथे शाळांच्या माध्यमातून हे धोरण वाढविण्याचे काम कायम केले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी विविध जातींचे

वसतीगृहे उभारली. शैक्षणिक शिष्यवृत्ती चालू केल्या. बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी विविध सवलती व मदत केली. त्यांच्या प्रोत्साहनाने जे शिक्षण जाळे तयार झाले, त्याची आकडेवारीवरुन कल्पना येते.

१९२२च्या त्यावेळच्या नोंदीवरून प्राथमिक शाळा या एकूण ५२८ इतक्या होत्या. त्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही १९२२-२३ मध्ये २६, ६४८ ते ३१,२७३ इतकी होती. वर्षभरात अनुदानित शाळांची संख्या ही ३८ वरून ६० वर गेल्याचे दिसून येते. अनुदानित शाळांमध्ये उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३,१७४-३,७८८ पर्यंत उपस्थिती होती. दैनंदिन उपस्थितीचा विचार केला तर एकूण १,९३० ते २,९३० एवढी उपस्थिती यादरम्यान होती. शालेय शिक्षणातील मुलींचे प्रमाण याच काळात वाढले. १९२२-२३ मध्ये मुलींच्या शाळांची संख्या ३३ वरून ३५ वर गेली होती. मुलींच्या शाळेमध्ये एकूण १,९१८-२,०३८ इतक्या प्रमाणात प्रवेश घेतला गेला होता.

महाराजांनी शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक शुल्कात सवलती देऊन त्यांनाही मदत केली. स्वत:च्या वाढदिवसाप्रसंगी प्राथमिक शाळेतील मुलांसाठी काही रक्कम मंजूर करत असत. परिक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा मास्तर व कारकून नोकरी देण्याचे आश्वासनही दिले. या सर्वामुळे शिक्षणास चालना मिळून लोकांमध्ये नवचेतना आली .

४) हरित क्रांतीचे जनक

भारतामध्ये हरित क्रांतीची सुरुवात १९७० नंतर झाल्याचे अनेक विचारवंत आणि अभ्यासकांनी नमूद केले आहे. हरित क्रांतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त कृषी उत्पादनात वाढ घडविणे ही बाब केंद्रस्थानी होती. साहजिकच या हरित क्रांतीचा देशभरातील शेतकरी वर्गाला फायदा झाला. विशेषतः उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आदी राज्यांत हरित क्रांतीची सुरुवात होऊन गहू, तांदूळ, कापूस यांसारख्या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात मोठी वाढ झाली. आज ही राज्ये पीक उत्पादनात अग्रेसर असून, शेतीपूरक व्यवसायामध्येही तिथे क्रांती घडून आली आहे.

आपल्या आधुनिक विचारसरणीमुळे कोल्हापूर संस्थान मात्र खरोखरच काळाच्या पुढे राहील

याची काळजी शाहू महाराज नेहमीच घेत होते. शेतीक्षेत्रात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी महाराजांनी आपल्या संस्थानात अविरत प्रयत्न केले आणि त्यांना सहाय्यभूत अनेक गोष्टींचा पाठपुरावा केला. जलनियोजनाचा ध्यास घेतला. प्रतिकूल अशा अवस्थेवर मात करून कार्ये केली. इतर प्रांतांमध्ये अशा कार्यांची वानवा होती, तेव्हा कोल्हापुरात मात्र हरित क्रांतीची सुरुवात झालेली होती आणि यामुळे आपसूकच हरित क्रांतीचे जनकत्वही त्यांनाच जाते.

देशविदेशात शेती तंत्रज्ञानात जे बदल झाले होते, त्याचा अभ्यास करून त्यांचा वापर संस्थानातील शेती विकासाला चालना देण्यासाठी महाराजांनी केला होता. म्हणून ज्येष्ठ इतिहासकार जयसिंगराव पवार यांनी नमूद केल्यानुसार, महाराजांच्या काळापासून शेती क्षेत्रात झालेल्या विकासामुळे आज घडीला कोल्हापूर जिल्हा हा शेती, शेतीपूरक व्यवसाय आणि सहकार या तिन्ही क्षेत्रात राज्यात अग्रेसर आहे. त्याची मूळ पायभरणी ही महाराजांच्या कामामुळेच झाली. त्यांच्या प्रयत्नातूनच तत्कालीन परिस्थितीत पहिली हरित क्रांती घडून आली. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळातील पहिल्या हरितक्रांतीचे नेतृत्व हे महाराजांची दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी पुरोगामी धोरणाकडे जाते.

दुष्काळ निवारणार्थ केलेल्या कामाची फलनिष्पत्ती

एकोणिसाव्या शतकामध्ये भारतात बहुतेक वेळा बहुतांश सर्वच ठिकाणी दुष्काळाची छाया पसरलेली आढळते. कोल्हापूर संस्थानदेखील याला अपवाद नव्हते. प्रतिकूल परिस्थितीतही शाहू महाराजांनी त्यावर मात केली. प्रत्यक्ष फिरून, बघून आणि प्रजेशी बोलून त्यांनी तातडीने काही पावले उचलली. प्रशासनाला गतीमान करून स्वतंत्र यंत्रणेद्वारे लोकांना अन्न–वस्त्र–निवारा, पाण्याची सोय होईल, ही व्यवस्था केली. लोकांना दिलेल्या रोजगाराच्या संधीतून संस्थानातील पायाभूत सुविधांमधेही वाढ केली. शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीचा हात देण्यापासून ते सावकारांवर वचक ठेवण्यापर्यंत अनेक कामे मार्गी लावली. दुष्काळाच्या सोबतीला आलेल्या प्लेग–कॉलरा यांसारख्या रोगांवरही नियंत्रण ठेवले. केवळ माणूसच नाही तर जनावरांनाही जगवले.

दुष्काळ निवारणासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च (१८९६–९८)

अ.क्र.	कामाचा तपशील	झालेला खर्च (रुपये)
१	नवीन रस्ते बांधणी	१,३७,३९३
२	तलावांची दुरुस्ती	७७,१९२
३	रस्त्यांची किरकोळ दुरुस्ती	१,३०,३९०
४	दुष्काळसंबंधीत इतर पायाभूत कामांच्या बाबी	३०,७३९
५	दुष्काळ निवारण कामे	४१४२३७
६	धान्य मोबदला	४१८७१
७	गोरगरीबांसाठीचा निवारा	२९९०८
८	दुष्काळ निवारणावरील प्रशासनाच्या बाबी	२०१६१
९	गरीबांच्या आश्रमावरील अन्नधान्यांचा प्रश्न	३३९२
१०	इतर साधसामुग्री	३३७९०

(संदर्भ : Administrative Report year 1896-1898)

तत्कालीन दुष्काळग्रस्त काळात विविध कामांवर केलेल्या खर्चाचा तपशील पाहता शाहू महाराजांनी योग्य नियोजनाद्वारे दुष्काळाला समर्थपणे तोंड दिल्याचे दिसते. कमी वयातही त्यांनी दूरदृष्टी ठेवून दुष्काळ निवारणार्थ केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. सन १८९७–९८ या वर्षातील 'पॉलिटिकल एजंट' जक्शन यांनीदेखील शााहू महाराजांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की, ''आपल्या संस्थानात दुष्काळ कामाची तरतूद करण्याकडे आपण जे लक्ष पुरवित आहात व आपले प्रयत्न यशस्वी झाले आहेत, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करणे अत्यंत जरुरी आहे.'' इतर प्रांतात दुष्काळाचे रूप भयंकर असताना कोल्हापूर संस्थानात भूकबळी गेला नव्हता, या यशातच सर्वकाही आले.

शेतीसाठीच्या जलव्यवस्थापनाची फलनिष्पत्ती

कोल्हापूर संस्थानात भारतातील इतर प्रांतांप्रमाणेच शेती ही निसर्गाच्या पावसावरच मुख्यत्वे केली जायची. वातावरणानुसार जर पावसाचे प्रमाण कमी–अधिक झाले तर त्याचा शेतीउत्पन्नावर लगेचच परिणाम झालेला दिसून येत होता. शाहू महाराजांच्या काळात पडलेल्या दुष्काळी रूपाने आपल्या राज्यातील जलअवस्था व शेतीअवस्था त्यांच्या समोर आली होती.

महाराजांच्या सूक्ष्म निरीक्षणाच्या सवयीने त्यांनी बाहेरील देशांमधील प्रगती बघितली होती. मर्यादीत पाण्याचा योग्य प्रकारे वापर करून त्यांनी अन्नधान्याबाबत जी स्वयंपूर्तता प्राप्त केली होती, त्यामुळे त्यांच्या देशात सुबत्ता येऊन इतरही क्षेत्रात आधुनिकीकरण व्हायला मदत झाली होती. शाहू महाराजांना तिथे आपल्या संस्थानाच्या भविष्यातील प्रगतीसाठीची वाट मिळाली.

दुष्काळ रूपात संधी शोधून त्यांनी तातडीने प्रथम पाण्याच्या संदर्भाने जे काही निर्णय घेतले, त्यातून पुढे राज्यात हरितक्रांतीला मदत तर झालीच, पण हे राज्य जलस्वयंपूर्ण होत गेले. त्यावेळच्या इतर संस्थानांपेक्षा कोल्हापूरचे हेच वेगळेपण उठून दिसत होते.

कोल्हापूर संस्थानात दीर्घकालीन कामांमधून राधानगरीसारखे मोठे धरण प्रकल्प जरी राबविले, तरी राज्याच्या कानाकोपऱ्यातील भागांमध्ये पाण्याची व्यवस्था बळकट होईल, असे निर्णय घेतले. एवढेच नाही तर पाण्याची निगा राखण्याचे व पाण्याचा अनावश्यक अपव्यय होणार नाही, यासाठी कडक कायदे ही केले.

पर्यावरण व पाऊस यांचे नाते बघता त्याचे रक्षण व वाढ यावर महाराजांनी लक्ष केंद्रीत करुन संवर्धनाचे आदेशही दिले होते. या सर्वांचा परिणाम संस्थानातील अनेक ठिकाणी पाण्याच्या पातळीत वाढ होण्यावर झाला. तत्कालीन कागदपत्रांच्या नोंदीवरुन हे सहज समजते.

१) शाहू महाराजांच्या काळातील विहिरींचा तपशील व त्यात होत गेलेली वाढ

अ. क्र.	वर्ष	पक्क्या विहिरी	कच्च्या विहिरी
१	१९०६–०७	५४८४	८३९
२	१९०७–०८	५५६३	७७७
३	१९०८–०९	११,२१५	८७६
४	१९०९–१०	११०५२	८७८
५	१९१०–११	१०,६६८	९६२
६	१९११–१२	१०,६६९	९६५
७	१९१२–१३	११,००६	१३८७
८	१९१३–१४	१०,८९५	१३०९
९	१९१४–१५	१०,८४७	१३३२
१०	१९१५–१६	११,००५	९७५

११	१९१६–१७	११,००५	१०४०
१२	१९१७–१८	१०,६३६	९९०
१३	१९१८–१९	१०,८१८	९८४
१४	१९१९–२०	१०,८९६	१०२७
१५	१९२०–२१	१०,८६८	११२२
१६	१९२१–२२	१०,९३०	११२७

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानाचे प्रशासकीय अहवाल (१९०६–१९२२)

महाराजांनी दुष्काळ निवारणासाठी पाणी उपलब्धेतेसाठीच्या योजना सुरू केल्या. त्यात अनेक विहिरी दुरुस्त करून घेणे किंवा नव्याने बांधणे यांचा समावेश होता. अशा पक्क्या विहिरी व कच्च्या विहिरी यांचे प्रमाण सन १९२१–२२ मध्ये वाढलेलेच दिसते. पर्यायाने पाण्याचे साठे वाढलेले होते. संस्थानात विहिरीद्वारे ओलिताखाली आलेले क्षेत्र हे सर्वाधिक असल्याच्या नोंदी सन १९१४–१५ च्या प्रशासकीय अहवालातून दिसून येतात.

२) शाहू महाराजांच्या काळातील पावसाची सरासरी

सन १८९५–९६

ठिकाण	१९९५–९६ मध्ये पडलेल्या पावसाचे प्रमाण		मागील पाच वर्षामध्ये पडलेल्या पावसाची सरासरी	
	इंच	सें.मी	इंच	सें.मी.
करवीर	५४	८३	४४	६३
पन्हाळा	६८	२५	६७	६३
अळता	४१	०२	३६	०१
शिरोळ	२६	३९	२८	६३
रायबाग	२९	८१	२६	८२
गडहिंग्लज	३८	२८	३९	५५
कटकोळ	२०	६८	२०	७४
भूदरगड	६५	१२	७३	२२
विशालगड	७१	२०	७६	००
बावडा	२०८	५०	२४१	९०
कागल	४४	१६	८८	७२
इचलकरंजी	४१	६९	३२	८४

आजरा	७१	३७	८२	४१

(संदर्भ : Administrative Report year १८९५-१८९६)

सन १८९८-९९

ठिकाण	१८९८-९९ मध्ये पडलेल्या पावसाचे प्रमाण		मागील पाच वर्षामध्ये पडलेल्या पावसाची सरासरी	
	इंच	सें.मी	इंच	सें.मी.
करवीर	४९	९६	४५	१७
पन्हाळा	६७	२५	६८	९६
अळता	३३	९१	३१	१६
शिरोळ	१९	८५	२६	३८
गडहिंग्लज	५१	०१	८८	८७
भूदरगड	८१	२६	७०	९८
रायबाग	२६	४९	२७	२१
कटकोळ	२०	९९	२४	७७
विशालगड	४२	९७	४०	८१
बावडा	२७४	७९	२६०	५०
कागल	४२	९७	४०	८४
इचलकरंजी	२२	९६	३३	५५
आजरा	८२	८३	८६	०१

(संदर्भ : Administrative Report year 1898-1899)

शाहू महाराजांनी ज्यावेळी राजकारभार पहाण्यास सुरुवात केली त्याकाळी शेती व्यवसाय हे बहुतांश पावसाच्या पाण्यावर अवलंबून होता. वरील दोन्ही तक्यांमधील तपशील पहाता संबंधीत प्रशासकीय अहवालात नमूद नोंदीनुसार – त्या वेळेच्या मागील ५ वर्षांच्या सरासरी घट असण्याच्या तुलनेत रियासतीतील उपविभागांमध्ये घट दिसून येत नाही.

३) शाहू महाराजांच्या शेवटच्या कारकीर्दीतील पावसाची वार्षिक सरासरी

सन १९२०–२१

ठिकाण	१९२०–२१ मधील पावसाची सरासरी												
	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टे.	ऑक्टो.	नोव्हे.	डिसे.	जाने.	फेब्रु.	मार्च	एकूण
कोल्हापूर	१.८६	...	५.५५	१२.९४	६.४४	२.२७	५.३९	२.८१	...	...	...	...	३७.२६
पन्हाळा	०.८५	...	७.९५	१६.९४	१५.४	३.७५	३.८०	०.५४	...	...	...	...	४३.८४
चिंचवड	...	...	८.२	१७.४५	१.७१	४.५९	४.५२	...	...	...	...	...	३६.२९
हातकणंगले	...	०.२२	२.३७	८.४	६.७	२.२९	५.९	१.५५	...	...	...	...	२५.६३
शिरोळ	...	...	...	३.५६	२.३	०.८०	४.४	२.०	...	...	...	...	१२.४३
वडगांव	...	...	२.५६	१४.७८	४.२७	१.५६	५.९२	१.६	...	...	...	...	३०.१५
रायबाग	०.४०	०.६	२.१८	३.६७	१.१	१.४	८.२५	५.१५	...	०.५१	...	...	२२.३१
गडहिंग्लज	४.२	...	७.८९	८.१	६.१६	१.७७	५.६६	६.७	...	०.२९	०.३५	...	३९.२२
कटकोळ	०.११	०.३१	०.८०	२.५५	०.२८	०.११	५.३७	८.४७	...	०.२९	...	...	१८.१९
गारगोटी	०.१५	.	१२.२१	२१.९	१४.८३	४.७१	४.६५	५.४४	...	०.२९	...	...	६४.७
मलकापूर	०.२८	...	१२.९५	१८.६७	१७.७७	६.९९	७.५८	१.५०	...	...	...	...	६५.७२
बावडा	...	...	३०.३२	५५.१३	५८.८८	२५.८४	१४.१०	३.५७	...	...	...	...	१८७.८४
कागल	१.४२	...	४.९७	६.९२	६.५१	१.७२	४.१६	२.२०	...	०.२८	...	...	२८.१८
कापशी	२.३८	...	१०.३८	११.४७	७.८१	२.५४	४.३१	४.२७	...	०.२७	०.१५	...	४४.०१
इचलकरंजी	०.१३	०.३	२.४४	६.८९	३.३९	१.६०	५.५९	२.१६	...	...	...	...	२२.३२

आजरा	१.७२	...	१८.५९	२४.४	२३.३३	७.०१	१.६१	४.५०	...	...	...	...	८१.००

(संदर्भ : Administrative Report year 1920-21)

वरील तपशीलामध्ये पावसाचे प्रमाण व लागवडीचा संबंध नमूद आहे. त्यावेळीच्या प्रशासकीय अहवालातील नोंदीनुसार :

- जून ते ऑगस्ट दरम्यान खरीप पिकांची पेरणी पूर्ण झाली आणि पन्हाळा येथे संपूर्ण हंगामात पाऊस चांगला झाल्याने पिके चांगली मिळाली. तसेच भुदरगड पेट्यात जवळपास सर्वच पिके घेण्यात आली.

- रब्बी पिकांची लागवड सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये झाली. पन्हाळ्यात हरभरा व भुईमूग वगळता सर्व पिके उत्तम झाली. भुदरगडमधील सर्व पिके चांगल्या स्थितीत होती. विशाळगडमध्ये ऑक्टोबरात पिकांना मध्यम चांगली वाढ होती आणि नोव्हेंबर महिन्यात पाऊस नसल्याने पीक विशिष्ट मर्यादेत आले.

- बहुतेक सर्व उपविभागांमध्ये जून महिन्यात पावसाला सुरुवात झाली. करवीर, शिरोळ व रायबागमध्ये जून ते ऑक्टोबर महिन्यात चांगला पाऊस पडला व सर्व पिके चांगली आली. आळता पेट्यात पाऊस पुरेसा होता. गडहिंग्लज व कटकोळ पेट्यात जून ते ऑगस्टमध्ये पाऊस अनुकूल होता पण करवीर पेट्यात नोव्हेबरला ही पाऊस पडल्याने बाजरीचे नुकसान झाले. कागलमध्ये जुलैच्या मध्यात सर्व पिके चांगली झाली.

४) ओलिताखाली आलेल्या जमिनीचे क्षेत्र

जलजाळे निर्माण होत असल्याने संस्थानातील ओलिताखालील क्षेत्रात वाढ होण्यास मदतच झाली आहे. यातील विहीरी, नद्या व तलावांचा विचार करता त्यातून किती एकर जमिनीला पाणी मिळाले, याची नोंद मिळते.

- सन १९१५-१६ च्या प्रशासकीय अहवालाच्या नोंदीनुसार, ३९,८४५ एकर क्षेत्र विहिरींद्वारे, ३९,७८३ एकर क्षेत्र नद्यांतील पाण्याद्वारे तर २३२ एकर क्षेत्र तलावांमुळे ओलिताखाली आले.

- सन १९१६–१७ च्या प्रशासकीय अहवालाच्या नोंदीनुसार, २१ हजार ४३१ एकर क्षेत्र विहिरींद्वारे, ३४,२७० एकर क्षेत्र नद्यांतील पाण्याद्वारे, तर १४२ एकर क्षेत्र तलावांमुळे ओलिताखाली आले.

- सन १९१९–२० च्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे २१,०२१ एकर क्षेत्र विहिरीच्या माध्यमातून, ८,९३३ एकर क्षेत्र नद्यांपासून तर २४१ एकर क्षेत्र तलावांतून पाणी मिळाल्याने ओलिताखाली आलेले होते.

- पुढील काळातील सर्वसाधारणपणे सन १९२०–२६ या काळातील नोंदी बघता १७ हजार २८४ एकर क्षेत्र हे विहिरींमुळे ओलिताखाली आले, तर ५,८६३ एकर नदीद्वारे आणि १७२ एकर क्षेत्र तलावांच्याद्वारे पाणी मिळाल्याने ओलीताखाली आलेले होते.

- **रंकाळा तलावाच्या पाण्याचा तपशील** – सन १९१४–१५ मध्ये १२५ एकर क्षेत्र ओलिताखाली आले, या पाणी पुरवठ्यातून २,९६९ रुपये इतका रेव्हेन्यू मिळाला आणि त्याच्या दुरुस्तीवरील खर्च २०८ रुपये इतका झालेला होता. तसेच सन १९१६–१७ च्या प्रशासकीय नोंदीचा तपशील पाहता या तलावातून १०८ एकर क्षेत्र ओलिताखाली आले. या पाणी पुरवठ्यातून ८,२०१ रुपये इतका रेव्हेन्यू मिळाला आणि त्याच्या दुरुस्तीवरील खर्च ५४६ रुपये इतका झालेला होता.

शेती क्षेत्रातील फलनिष्पत्ती

शाहू महाराजांना आपल्या संस्थानातील शेतकरी जीवनाची व त्याआधारीत शेतीअर्थव्यवस्थेची जाणीव झालेली होती. जवळपास सर्व लोकांचे जीवन शेतीवर असल्याने त्यांना दुष्काळी संकटातून कायम मुक्ती देण्यासाठी पाणी व्यवस्थेबरोबरच शेतीविकासाकडे लक्ष दिले. बदलत्या काळानुसार शेती क्षेत्रात आधुनिक बदल होण्यासाठी शेतीच्या सुधारणांना चालना दिली. शेतकी शिक्षणापासून त्याचा प्रसार व माहिती होण्यासाठी प्रदर्शने, शेतकी संस्था, म्युझीयम, रोपवाटीका इ. चा आधार घेतला. सरकारी तिजोरीतून शेतकऱ्यांना कर्जाची सोय तर केलीच पण त्याचबरोबर नवीन तंत्रज्ञानावरील साधनांचा अवलंब, नवीन पीक पद्धती या माध्यमातून

काळाला साजेशे शेतीत बदल केले. याचा परिणाम अर्थातच शेतीच्या विकासासह संस्थानाच्या अर्थकारणातही चांगले परिणाम घडून आल्याचे दिसते.

१) पन्हाळा व भुदरगड या भागात केलेली चहा लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१९०९-१०	६	१७१	६४
२	१९१२-१३	७	२७९	१०५
३	१९१६-१७	११	३३३	१६६
४	१९१८-१९	११	७६८	३८४
५	१९१९-२०	११	२४०	१२०
६	१९२०-२१	११	१७६	८८
७	१९२१-२२	११	५५२	२७६

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय अहवाल सन १९०९-१९२२)

साधारणपणे सन १९१६ पासून पुढे ११ एकर जमिनीवरच चहा लागवड सुरू होती, परंतु, त्यातून मिळणारे उत्पन्न व नफा चांगला होता, असे दिसते.

२) संस्थानातील कॉफी लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१८९५ -९६	१५	४७६	२८८
२	१८९७-९८	१५	५७३	२७६
३	१९००-०१	१५	६६०	२३८
४	१९११-१२	४	१२०	४५
५	१९१५-१६	४	५४३	२०४
६	१९१८-१९	४	३८४	१४४
७	१९२०-२१	४	२१०	७९
८	१९२१-२२	४	५०	१९

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय अहवाल सन १८९५-१९२२)

वरील कॉफी लागवडीचा तपशील पाहता सुरुवातीपासून चांगले उत्पन्न मिळत होते, त्यानंतरच्या काळात चार एकर एवढया कमी लागवड क्षेत्रातूनही उत्पन्न उत्तम मिळाल्याचे दिसून येते.

३) पन्हाळा व भुदरगड येथील वेलदोडा लागवड

अ.क्र.	वर्ष	एकर	उत्पादन (पौंड)	उत्पन्न (रु)
१	१८९५-९६	१	२०	४५
२	१८९९-१९००	१	३६	१७१
३	१९०१-०२	१	१०	२६
४	१९१२-१३	१	८०	२००
५	१९१४-१५	१	६८	२१२
६	१९१६-१७	१	८३	२६०
७	१९१७-१८	१	२७५	५१७

(संदर्भ : कोल्हापूर संस्थानाचे प्रशासकीय अहवाल सन १८९५-१९१८)

वेलदोड्याची लागवड ही एक एकरात कायम ठेवलेली असूनही त्यातील उत्पन्न वाढलेले होते. शिवाय या पिकाला भाव देखिल चांगला व वाढता मिळत असल्याचे दिसून येते.

४) कोल्हापूर व प्रांतातील संरजामशाही भागात लागवडीखालील क्षेत्र

सन १८९५-९६

राज्य	एकूण क्षेत्र (एकरमध्ये)	लागवडीखालील क्षेत्र (एकरमध्ये)
कोल्हापूर स्टेट	१०,८३,७२३	९,८८,३३८
विशालगड	५९,९५२	३३,९३८
बावडा	८८,२३४	८८,२३४
कापशी	१८,२३०	१८,१६२
कागल(सिनिअर)	६४,१०८	६२,१२९
कागल (ज्युनिअर)	१०,०६७	१०,०६१
इचलकरंजी	१,०४,५१०	९४,००४
एकूण	१४,२८,८२७	१२,९४,८७०

(संदर्भ : Administrative Report year 1895-1896)

सन १८९८-९९

राज्य	एकूण क्षेत्र (एकरमध्ये)	लागवडीखालील क्षेत्र (एकरमध्ये)
कोल्हापूर स्टेट	१०,८२,९००	९,८४,०२५
विशालगड	५९,९६४	३०,५२९
बावडा	८८,२३४	८८,२३४
कापशी	१८,२३६	१८,१६८
कागल(सिनिअर)	६४,४३०	६२,४५३
कागल (ज्युनिअर)	१०,०९९	१०,०९९
इचलकरंजी	१,०५,०४८	९८,११८
एकूण	१४,२८,९०८	१२,८६,६२९

(संदर्भ : Administrative Report year 1898-1899)

वरील दोन्ही वर्षांच्या तपशीलाबाबत त्या वर्षीच्या अहवालात नमूद आहे की,कोल्हापूर संस्थानात लागवड क्षेत्राखालील आलेली जमिनीत घट ही जास्त जमीन लागवडीखाली न घेतल्यामुळे आहे. ही बाब केंद्रस्थानी ठेवून बावडा आणि कागल (ज्युनियर व सिनीयर) व कापशी क्षेत्रात मात्र लागवडीखालील क्षेत्रात १,९९४ एकर इतकी वाढ झाल्याची नोंद दिलेली आहे.

संपूर्ण संस्थानाचा विचार करता सन १८९७-९८ मध्ये १४,२८,२६३ एकर शेती क्षेत्र होते. त्यापैकी १२,८८,५६३ एकर क्षेत्र प्रत्यक्ष लागवडीखाली होते. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर सस्थानात केलेल्या विविध शेती क्षेत्राच्या उपाययोजनांमुळे सन १९१९ -२० पर्यंत शेतीक्षेत्राखाली क्षेत्र १७,३४,२९९ एकरापर्यंत पोहोचले. त्यापैकी प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र १४,३१,१७९ एकर इतके होते, हे आपल्याला १८९७-१९२० या वार्षिक प्रशासकीय अहवालातून दिसून येते.

५) खरीप व रब्बी पिकांच्या उत्पन्नाची नोंद

सन १८९५–९६

ठिकाण	खरीप					रब्बी						
	तांदूळ	नागली	बाजरी	ज्वारी	राळ	गहू	तंबाखू	तूर	शाळू	चणा	भूईमूग	शेंगदाणे
करवीर	१२	१२	६	१२	२	४	२	१४	१०	६	८	८
पन्हाळा	१०	८	८	१२	८	६	८	८	१२	८	४	१२
आळता	..	१०	८	८	६	१२	..	१२	६	६	४	४
शिरोळ	६	८	१२	१०	६	८	..	१२	५	८	४	४
रायबाग	..	४	१२	१२	८	८	१	१०	४	८	...	...
गडहिंग्लज	८	१२	१२	१४	१०	८	१०	८	८	१०	६	११
कटकोळ	..	..	४	६	८	६	...	..	...	६	...	..
भूदरगड	१०	९	..	१०	४	६	४	१०	८	८	...	८
विशालगड	१०	८	६	१०	४	४	४	८	६	३	८	२
बावडा	६	११	..	..	..	..	...	८	...	..	...	८
कागल	१४	१४	१०	१०	१४	१०	१२	१२	८	१०	...	१२
इचलकरंजी	११	११	८	९	८	१२	९	९	११	१०	१०	८

(संदर्भ : Administrative Report year 1895-1896)

सन – १९२१–२२

ठिकाण	खरीप								रब्बी				
	ज्वारी	बाजरी	पेडी	रागी	वरई	तूर	उडीद	कपाशी	शाळू	गहू	चणा डाळ	तंबाखू	भूई मूग
करवीर	५०	२५	२५	२५	६	२५	१२	२५	६	२५	२५	२५	२५
हातकणंगले	६३	२५	१२	२५	..	३०	२५	३०	५५	२५	३०	४२	...
	२५	..	७५	६०	५०	२५	१२	..	५०	५०	२५	...	५०
गडहिंग्लज	७५	२५	५०	३६	३६	७३	२५	५०	५०	३६	५०	५०	६२
भूदरगड	२५	..	५०	२५	६	१२	१२	..	६	...	१२	१२	६
रायबाग	५०	५०	...	..	..	३०	५०	..	७५	७५	७५	७५	७५
कटकोळ	२५	२५	...	..	..	६	१२	१२	२५	२५	१२	...	...
चनवाड	१२	..	५०	६५	१२	२५	५	..	१२	१२	२५	३६	५०
राधानगरी	२५	..	५०	२५	६	१२	१२	..	..	..	१२	...	१२
विशालगड	२५	..	५०	३६	..	१२	...	..	२५	२५	२५	५०	१३
बावडा	..	..	३०	२५	३६	...	...	...	७५	७५	...	७५	...
कागल	७५	६०	७५	५०	..	८८	३६	७५	६०	६०	७५	५०	६०
इचलकरंजी	८८	६०	७५	७५	..	५०	...	...			...		५०

(संदर्भ : Administrative Report year 1921-1922)

वरील तक्त्याचा तुलनात्मक विचार करता ज्वारी, बाजरी, गहू, तूर अशा बहुतेक सर्व पारंपरिक पिकांमध्ये, तर तंबाखूसारख्या नगदी पिकांमध्ये वाढ झालेली आहे. शेतीतील आधुनिक पद्धती आणि पाण्याचे योग्य नियोजनामुळे संस्थानातील शेतपिकांचे उत्पन्न वाढीस लागले होते.

उद्योग–व्यापार क्षेत्रातील फलनिष्पत्ती

शाहू महाराजांनी दुष्काळीकाळात संधी शोधली आणि त्याचे निर्मूलन करता करता राज्यातील शेतीचा विकास करण्यासाठी जलव्यवस्थापन केले आणि त्या योगाने शेतीस्वयंपूर्णतेला चालना दिली. अर्थातच यासाठी शेतीचा आधुनिक दृष्टीकोन ठेवला. शेतीपूरक व्यवसाय व वेगवेगळे आधुनिक उद्योग वाढवले. उत्पादीत मालाच्या वितरणासाठी बाजारपेठांच्या निर्मितीसह त्यांचे विस्तारीकरणासाठी सातत्य ठेवले. याचे परिणामस्वरुप संस्थानातील शेतीव्यवसाय व इतर व्यवसाय भरभराटीला आले. महाराजांच्या धोरणांमुळे योग्य वातावरण मिळून विविध उद्योगांची वाढ होत गेली. त्यांचा चांगला परिणाम होऊन संस्थानाची अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत झाली.

सन १८९६ ते ९८ च्या प्रशासकीय नोंदीवरून संस्थानातील तूर, कापूस, गूळ, तांदूळ, ज्वारी, हरभरा, गहू, नागली, मिरची, शेंगदाणे, हळद इत्यादी उत्पादन निर्यात होत होते. हा माल बेळगाव, दड्डी, राजापूर, चिपळूण, मिरज, जामखंडी, पुणे, बॉम्बे, सांगली इत्यादी देशाअंतर्गत बाजारपेठेतही दाखल होत होता. सन १८९५ मधील एकूण निर्यात ६ लाख होती, ती १९२१ मध्ये तीस लाखांपर्यंत पोहोचल्याची नोंद वार्षिक प्रशासकीय अहवालात आहे.

सन १९१३–१४ च्या नोंदीवरून उस लागवड १५,४४० होती, तर सन १९१४–१५ ला ती १६,९८० पर्यंत पोहोचली. ही वाढ प्रामुख्याने शेतीला कृत्रिम पाणीपुरवठा केल्याने झाली असून, त्यामध्ये विहिरीतील पाणीसाठा वाढल्याने ही वाढ झाल्याची नोंद वार्षिक प्रशासकीय अहवालात नमूद केली आहे.

संस्थानात रेशीम कारखाना, मोटर कारखाना, सूतगिरणी, विद्युत कारखाना, कागद कंपनी इत्यादी उद्योग महाराजांच्या प्रोत्साहनातून पुढे आले. मधव्यवसाय तर त्यांच्याच स्वयंप्रयत्नांचे

फळ होते. सन १९१२-१३ मधील कागदपत्रांच्या नोंदीवरून सहा जिनिंग फॅक्टरी वर्षभरात चार महिने काम करतात, याचा उल्लेख आहे. तर त्याच वर्षी एकूण पाच ग्राइंडिंग मशिन कार्यरत असल्याचे नोंद आढळते. त्यापैकी चार शहरात आणि एक शाहुपूरीत होती. ज्वारी, बाजरी गहू ही मुख्य पिके त्यात दळली जात होती. या सर्व मशिन्स सुस्थितीत चालत असल्याची माहितीही त्यातून मिळते. संस्थानाच्या प्रशासकीय अहवालाच्या सन १९२१च्या प्रशासकीय नोंदीवरून ग्राइंडिंग मिल येथे ६५ पुरुष कार्यरत असून, यांनी संपूर्ण वर्षभरात काम करून एकूण १,२५,००० इतका माल उत्पादित केल्याची नोंद आहे. महाराजांनी रंगकामाकडे उत्तेजन दिल्याने इचलकरंजी येथील व्यंकटेश रंगतंतू कारखान्यामधून सन १९१०-११ मध्ये कार्यरत असलेल्या ४० कामगारांनी वर्षभरात ४०, ००० रुपयांचे काम केले आणि वार्षिक नफा अंदाजे ३,००० पर्यंत गेला होता. तर सन १९१६-१७ मध्ये ४० कामगार कार्यरत असून, ४,००० पर्यंत नफा होता. त्याचबरोबर १९१८-१९ ला रंगतंतू कारखान्यातून १ लाख रुपये किमतीचे काम केल्याची नोंद वार्षिक प्रशासकीय अहवालातून मिळते.

सन १९१२-१३ च्या कागदपत्रांवरून कोल्हापूरात शाहूपुरीत दहा व गडहिंग्लज मध्ये एक मिळून अकरा तेलगिरण्या होत्या. लाकूड शुद्धीकरण कारखाना, राधानगरी येथे काढल्याची नोंद १९१९-२०च्या प्रशासकीय अहवालातून मिळते. त्यातून लाकूड, कोळसा, डांबर हे पदार्थ वेगळे करण्याचा प्रयोग होत असत.

कोल्हापुरात गुळाची बाजारपेठ तयार होण्याला महाराजांचे प्रयत्न कारणीभूत होते. १९१४-१५ च्या प्रशासकीय अहवालातून त्यावर्षी १, ००,२८० मण गूळ निर्यात झाल्याची नोंद मिळते. तर सन १९२० च्या प्रशासकीय नोंदीवरून गूळ व साखर निर्यात ही ४,७०,२२४ मण होती. त्याचे एकूण मूल्य ३ लाख होते. आजही शुगर मिल्स यासाठी कोल्हापूर ओळखले जाते.

१ मे, १९४६ रोजी कोल्हापूर राज्याच्या विकास मंत्रालय या विभागाद्वारे नवनियुक्त सांख्यिकी संचालक, कोल्हापूर राज्य यांचे माहितीसाठी राज्यातील त्यावेळेच्या उद्योगांची यादी खालीलप्रमाणे प्रसिद्ध केली होती. नंतरच्या काळात कोल्हापूर संस्थान जे भरभराटीस आलेले होते, त्या भरभराटीमध्ये औद्योगिकीकरणाचे बीज महाराजांनी दिलेल्या औद्योगिक योगदानात दडल्याचे दिसते.

SCHEDULE-I

List of Industries

1. Wheat flour
2. Rice milling
3. Biscuit making (including bakeries and confectioneries).
4. Fruit and vegetable processing,
5. Sugar
6. Distilleries and breweries including power alcohol manufacturing)
7. Starch
8. Vegetable oils-oil-seed crushing, and extraction and processing of vegitable oil
9. Paints and varnishes.
10. Soap
11. Tanning
12. Cement
13. Glass and glassware
14. Ceramics
15. Plywood and tea chests.
16. Paper and paper board (including strawboard)
17. Matches.
18. Cotton textiles spinning and Weaving
19. Woollen textiles.
20. Jute textile
21. Chemicals, including drugs and pharmaceuticals
22. Aluminium, copper and brass
23. Iron and steel-melting, rolling and re-rolling
24. Bicycles
25. Sewing machines
26. Producer gas plants
27. Electric lamps
28. Electric fans
29. General Engineering and Electrical Engineering (excluding generation and transformation of electrical energy)

(**संदर्भ** : Kolhapur State, Development Ministry file, 1946, Page No. 129)

एकूणच, छत्रपती शाहू महाराजांनी घेतलेल्या विविध निर्णय आणि धोरणांचा उद्योग, व्यवसाय क्षेत्रावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते.

सहकार क्षेत्राची फलनिष्पत्ती

शेतीच्या विकासासाठी सहकारासारखे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे, हे शाहू महाराजांनी ओळखून त्यादृष्टीने पावले उचलली होती. सहकारी कायद्यान्वये योग्य नियम लागू करून राज्यात सहकाराचे जाळे विणावयास सुरुवात केली. सहकारी संस्था व पतपेढी संस्था यांच्या माध्यमातून शेतकरी वर्गाला भांडवलाची उपलब्धी होत गेली. याच बरोबरीने व्यापारसुद्धा वाढत गेला आणि रोजगाराची नवी संधी मिळू लागली. उद्योगांना याच सहकारातून वित्तीय पाठबळ मिळाले. कोल्हापूरात सहकारतत्वाचे महत्व वाढवून महाराजांनी एकप्रकारे त्याचे महत्वच अधोरेखित केले होते.

संस्थानात महाराजांच्या पुढाकाराने शेतीला अर्थपुरवठा करणाऱ्या पतसंस्था निर्माण होत गेल्या. सन १९१८–१९ मध्ये या शेतीसंबंधीत पतसंस्थांची संख्या एकूण १९ होती. सन १९१९–२० मध्ये ही वाढून २२ झाली. सन १९२०–२१ या काळात अशा पतसंस्थांची संख्या एकूण २५ झाल्याची नोंद तत्कालीन कागदपत्रांतून दिसून येते.

ज्याप्रमाणे शेतीसंबंधीत वित्तीय पुरवठा करणाऱ्या पतसंस्था राज्यात होत्या, त्याचप्रमाणे बिगर शेतीसंबंधीत असलेल्या पतसंस्थाही उदयास आल्या होत्या. या प्रामुख्याने व्यवसायाला चालना देणाऱ्या होत्या. अशा शेतीसंबंधीत नसलेल्या पतसंस्था सन १९१८–१९ मध्ये एकूण ६ संख्येत होत्या तर सन १९१९–२० मध्ये त्यात वाढ न होता पुढील वर्षात सन १९२०–२१ मध्ये एकूण ९ संस्थांची निर्मिती झालेली त्या वेळच्या कागदपत्रांतील नोंदीवरुन दिसते.

यावरून संस्थानात महाराजांनी नागरिकांमध्ये सहकाराचे तत्त्व रुजवून एकमेकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात मोलाचे योगदान दिले असल्याचे दिसून येते.

शाहू महाराजांचे वयाच्या अठ्ठेचाळीसाच्या वर्षी दि. ६ मे, १९२२ रोजी मुंबई येथे निधन झाले. करवीर छत्रपती म्हणून अधिकार ग्रहण केल्यापासून त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत केवळ लोककल्याणासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले. छत्रपती शाहू महाराज हे ब्रिटीशांच्या राजवटीतील एक संस्थानिक असल्याने महाराजांनी राबविलेल्या अनेक धोरणांना स्वाभाविकच मर्यादा येत होत्या, पण त्या पलीकडे जाऊन त्यांनी केलेले कार्य दूरगामी परिणाम घडवून आणणारे राहिले.

छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची निधनानंतर घेतलेली दखल

छत्रपती शाहू महाराजांच्या निधनावर अनेक स्तरावरून त्यांच्याबद्दलच्या भावना प्रकट केल्या गेल्या. त्यातील मोजक्याच प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे :

१) पंचाल, विश्व ब्राम्हण समाज, जिल्हा सातारा, दिनांक १८ मे, १९२२

श्रीमंत करवीर सरकार छत्रपती राजाराम महाराज यांचे शेवेशी, पंचाल, विश्वब्राम्हण समाज जिल्हा सातारा यांचे तर्फे

आपले परमपूज्य वडील कै. श्री छत्रपती शाहूमहाराज यांना अकाली निधनावस्था प्राप्त झाल्यामुळे या समाजास अत्यंत दु:ख होत आहे. हे आमचे मायबाप असल्यामुळे आमच्या समाजाच्या दु:खांची जाणीव यांना पूर्ण होती. ती दु:खे नाहीशी करण्याकरिता त्यांनी अत्यंत श्रम घेतले आहेत. ते पट्टीचे राजकारणी, मुत्सद्दी, खंबीर समाजसुधारक, धैर्यवान क्रांतिकारक, सक्रिय अस्पृश्योधारक असे असल्यामुळे त्यांच्या मृत्यूने एक दैदिप्यमान ताराच अस्तास गेला आहे असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. असो जगरहाटीकडे लक्ष देऊन दु:ख सहन कराल, अशी आशा आहे. ईश्वर कै. छत्रपती श्री शाहू महाराज यांचे आत्म्यास शांति देवो.

२) मराठा ज्ञात मंडळ, कराची, दिनांक १४ मे, १९२२

(रविवार तारीख १४ मे १९२२ रोजी भरलेली जाहीर दुखवट्याची सभा) ठराव –

ज्यांनी आपल्या अव्याहत परिश्रमाने जनसेवेची अत्युत्तम कामगिरी बजावून महाराष्ट्रात नवीन चैतन्य व तेज उत्पन्न केले, ज्यांनी बहुजन समाज अंध:कारात खितपत पडला असता त्यांना

मानसिक दास्यातून सोडवून दीनदुबळ्या अस्पृश्य बंधूंच्या माणुसकीचा जोराने पुरस्कार केला, ते ब्राम्हणेतरांचे स्वयंसिद्ध पुढारी होते व त्यांनी सनातन प्रजेच्या उज्वलतेसाठी व लोकजागृतीसाठी आपल्या राज्यपदाची किंवा जीवाचीही पर्वा न करता राज्यारोहण दिवसापासून परलोक गमनापर्यंत एकसारखी लोकोत्तर जनसेवा केली अशा आमच्या परमपूज्य व परमप्रिय श्रीम्नछत्रपती क्षत्रिय कुलावंतस श्री शाहू महाराज सरकार कोल्हापूर यांच्या अकाली निधन वार्तेने सारा महाराष्ट्र शोकमय झाला असता अशा प्रसंगी त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास ईश्वर चिरशांती देवो अशी आजची सभा अत्यंत दुःखापिडीत हृदयाने व अनन्य भावाने ईश्वराजवळ प्रार्थना करीत आहे

२. जनन मरण हे जड देहाला स्वाभाविक असले तरी, महाराजांच्या अकाली निधनाने राजकुटुंबास अत्यंत दुःख होणे सहाजिक आहे. करिता राजमाता श्रीमती लक्ष्मीबाई राणीसाहेब, अक्काबाईसाहेब महाराज व श्रीमंत राजाराम छत्रपती महाराज यांच्या विरहजन्य भयंकर दुःखात आजची सभा मनःपूर्वक वाटेकरी होत आहे.

३) व्हिक्टोरिया मराठा स्टुडंट्स इन्स्टिट्यूटचे मेंबर्स व मराठा बोर्डिंगमधील विद्यार्थी यांनी घेतलेल्या सभेमधील ठराव, कोल्हापूर

इन्स्टिट्यूशनचे मेंबर्स व मराठा बोर्डिंगमधील विद्यार्थी यांनी ही सभा एकमताने असा ठराव पास करते की, आमचे परमपूज्य क्षत्रिय कुलावंतस राजश्री श्रीमन्महाराज श्री शाहू छत्रपती सरकार करवीर हे मुंबई मुक्कामी तारीख ६/५/१९२२ इ. रोजी सकाळी सहा वाजता कैलासवासी झाले. या त्यांच्या अकालीक व अनपेक्षित निधनाने ही सभा दुःख सागरात बुडाली आहे. श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज, तीर्थस्वरूप आईसाहेब महाराज, श्री. सकल सौभाग्यवती अक्कासाहेब महाराज, श्रीमंत बापूसाहेब महाराज व राजघराण्यातील इतर मंडळी यांच्यावर हा जो भयंकर आपत्तीचा प्रसंग गुदरला आहे, त्यामध्ये ही सभा सहभागी आहे. परमेश्वर कैलासवासी श्रीमन्महाराज शाहू छत्रपती यांच्या आत्म्यास शांती देवो व राजघराण्यातील मंडळीना वरील आपत्ती सहन करण्याचे धैर्य देवो!

४) मुसलमान समाजातर्फे घेण्यात आलेल्या सभेतील दु:ख प्रदर्शनाचा ठराव,

(दिनांक – १३ मे, १९२२)

श्रीमन्महाराज राजाराम छत्रपति साहेब सरकार करवीर स्वामीचे सेवेसी विज्ञापना ऐसाजे :–

तारीख १३ माहे मे सन १९२२ इसवी रोजी सायंकाळी पाच वाजता महामेडन बोर्डिंगचे पटांगणांत सर्व मुसलमान समाजातर्फे सभा भरून खालील दु:ख प्रदर्शनार्थ ठराव पास करणेंत आला तो:–

''आमचे परमप्रिय, परमपूज्य, प्रजावत्सल स्वामी कैलासवासी श्री शाहू छत्रपती महाराज साहेब यांचे अकाली निधनानें, आम्हा समस्त मुसलमान प्रजेस परमावधिंचे दु:ख झालें आहे व महाराज, आपणावर व श्रीमन्मातोश्री राणीसाहेब महाराज, श्रीमंत अक्कासाहेब महाराज व श्रीमंत बापूसाहेब महाराज आदी राजघराण्यावर अत्यंत दु:खाचा प्रसंग ओढवला आहे यास धैर्यानें तोंड देऊन प्रसंग निभावून नेण्यास परमेश्वर आपणास सामर्थ्य देवो अशी आमची अनन्य भावें प्रार्थना आहे.''

तसेच महाराज, या दु:खाचे वांटेकरी आम्ही सर्व मुसलमान प्रजाजन आहों, हे ध्यानीं आणून अंशत: स्वामीचे चित्तास समाधान होईल अशी आशा आहे. सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना. तारीख १३ माहे मे सन १९२२ इ.

प्रेसिडेंट

५) 'डिप्रेस्ड् क्लास'कडून आयोजित केलेली श्रद्धांजली सभा (१८ मे १९२२)

CONDOLENCE MEETING.

To

His Highness The Yuvaraja saheb of Kolhapur,

His Highness,

A public meeting of the depressed classes numbering over 4000 residents of Improvement Trust Chawl, known as MAHAR COLONEY clarke Road, Byculla

Bombay was 11th held infront under the Presidency of Mr. R. S. Nekaljay of Poona when the following Resolution was unanimously pass.

Among the speakers, Messeres Davne, Shivtarkar, Maruti Sambhaji Gaekwar, Nirmal Gangavane, Laxumanrao Chavan (Jehagirdar) and others who narrated in brief the whole career of His Highness.

"This Public Meeting of the untouchable classes expresses its deep regret at the untimely death of His Highness Shree Chhatrapati Shahu Manaraj of Kolhapur. In His Highness death the Depressed Classes have lost a sincere friend whose work for their upliftment ranks first among all the efforts made by individuals and association in this direction. Had he lived a few years more he would have won wonders in elevating this unfortunate class of people."

"This meeting assures His Highness Rajaram Saheb and the Royal Family of Kolhapur that the Depressed Classes share in their grievances and sorrow on account of the death of His Highness Shree Shahu Chhatrapati Maharaj."

Address:

R.S. Nokaljoy C/o Sub Postmaster President of the Meeting

Malabar Hill, Bombay.

Dated -12th May 1922.

संदर्भग्रंथ सूची

अ) प्राथमिक साधने (अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे)

(१) मराठी संदर्भ

१) कोल्हापूर स्टेट सर्वे रिपोर्ट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

२) बॉम्बे गव्हर्न्मेंट गॅझेट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

३) हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर (१८८९ ते १९२२)

४) हुजूर ऑफिस, करविर सरकारचे ठराव बुक, कोल्हापूर (१८८९ ते १९२२)

(२) इंग्रजी संदर्भ

1) Census of India, 1911, Volume 1.
2) Development Ministry File, Kolhapur State, 1946
3) Graham D. C., A Statistical Reports of the Kolhapur State, 1854,
4) Maharashtra state gazetteers History - part 3, H.M. Sinha
5) Report of Commissioner Famine in Bengal, Bihar and Orissa 1867, Part - 3
6) Report on the General Administration of the Kolhapur-1889-1922
7) Report of the Indian famine commission-Part 1, George Edward Eyre and William Spottwoode, London, 1880

ब) दुय्यम साधने

(१) मराठी संदर्भ

१) कीर धनंजय, राजर्षी छत्रपती शाहू : एक समाजक्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९.

२) कीर धनंजय, शाहू महाराजांचे सल्लागार लेख, साळुंके पी. बी. (संपा.) राजश्री शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, १९७६

३) कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५.

४) खोबरेकर गो.वि., महाराष्ट्रातील स्वतंत्र लढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९४

५) गर्गे सदाशिव मार्तंड, करवीर रियासत (करवीर छत्रपती घराण्याचा : १७१०–१९४९), तिसरी आवृत्ती, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, २००३.

६) गर्गे सदाशिव मार्तंड, करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, १९८०

७) घुगे. व्ही. बी., शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, द कोल्हापूर राईटर सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर, १९७६,

८) जाधव रायभान (संपा.), छ. शाहू – कारभार यंत्रणा, सरकरी नोकरवर्ग व शिस्त : काल विचार आणि कार्य, राजर्षी शाहूग्रंथमाला प्रकाशन, कोल्हापूर, १९७५

९) जाधव ब. भा. (संपा.), राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, दुसरी आवृत्ती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००१.

१०) तावरे स्नेहल, इंगवले शोभा, (संपा), जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, भाग– १, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१९

११) देसाई दत्ता, पाणी दुष्काळ आणि विकास, भोळे भा. ल., बेडकिहाळ किशोर (संपा.) शतकांतराच्या वळणावर, आंबेडकर अकादमी, सातारा, २००६.

१२) पवार जयसिंगराव (संपा), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७.

१३) पवार जयसिंगराव (संपा), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००१.

१४) पाटील शामराव (संक.) धाटावकर भास्कर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश : भाग–१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८

१५) पाटील शामराव (संक.), देसाई संजीव (संपा), जामखेडकर अ. प्र. (प्रधान संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश : भाग-२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९.

१६) पाटील प. सी., महात्मा जोतिराव फुले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९०.

१७) फाटक न.र., खोबरेकर वि.गो. (संपा), भारतीय इतिहास आणि संस्कृती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जन्मशताब्दी समारोह विशेषांक, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९७५.

१८) भोसले एस. एस., (संपा), क्रांतीसुक्त राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१

१९) भिडे ध. ल., देशपांडे पु. रं., कोल्हापूर दर्शन, कोल्हापुरचा इतिहास, गर्गे स., (संपा)., दिक्षित इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस पुणे, १९७१

२०) सांगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव, एक्सप्रेस पब्लिकेशन हाऊस, कोल्हापूर, २००१

२१) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४.

२२) सूर्यवंशी गणपतराव, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन, इचलकरंजी, १९७८

२३) हातेकर नीरज आणि पडवळ राजन,(संपा.), दोन जुने अभिजात अर्थशास्त्रीय निबंध, लोकवाङ्:मय गृह, मुंबई, २०१३

(२) इंग्रजी संदर्भ:-

1) Bhosale S. S, Chavan S.R. and Bandivadekar P.M. (Ed.), A Royal Philosopher Speaks : Lecture deliverd by Rajarshi His Highness of Shahu Chhatrapati of Kolhapur in Cronological Order, Kolhapur Jilha Parishad Publication, Kolhapur, 1975.

2) Charles Blair, Indian Femine, Agricole Reprints Corporation, New Delhi, 1986

3) Datt Romesh, Open Letter to Lord Curzon on Famines and Land Assessments in India, Kegan Paul Trench Trubner and Company, London, 1900.
4) Desai R., Social Background of Indian Nationalism, Popular Prakashan, Bombay, 2011.
5) Gauge V. B, Chhatrapati Shahu's Socialist Economic Policies, (1894 to 1922), The Kolhapur Writers Co-operative Society Ltd. .1975
6) Ghosh Ambika, Emerging Capitalism in Indian Agriculture, Peoples Publishing House, New Delhi, 1988.
7) Hunter W.W. Life of The Earl Of Mayq: Smith, Elder, Co., London, Since 1875.
8) Habib Irfan, Indian Economy 1858 to 1914, Aligarh Historians Society, Tulika Books, New Delhi, 2006,
9) Habib Irfan, Indian Economy under early British rule (1757-1857), Aligarh historians Society, Tulika Books, New Delhi
10) Keer Dhananjay, A Shahu Chhatrapati - A Royal Revolutionary, Popular Prakashan, Bombay,1976
11) Latthe, A. B. Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur - Volume I, Volume II, Time Press, Bombay, 1924
12) Malgonkar Manohar, Chhatrapati's of Kolhapur, Popular Prakashan Bombay, 1971
13) Nalawade M.D. A Shahu Chhatrapati of Kolhapur: A Social Revolutionary (1874-1922), Ph.D. Thesis (unpublished), Shivaji University, Kolhapur, Dec. 1978
14) Orissa Famine of 1866: Demographic and Economic Consequences Bidyut Mohanty, Economic, and Political Weekly, Vol. 28, No. 1/2, 1993
15) Sabnis R. V., Notes on Kolhapur, The Times Press, Bombay, 1928
16) Sangave Vilas, Khane B. D. - Rajarshi Shahu Chattrapati Papers,Vol. II to vol. IV, Shahu Research Institute, Shivaji University, Kolhapur, 1983,1985 and 1988.
17) Sen Amartya, Poverty & Famines, An Essay on Entitlement and Deprivation, Oxford University Press, New York, U. N., 1981
18) S. Amirajan, Malthusian Population Theory and Indian Famine Policy in the Nineteenth Century, Population Studies, Vol.30, No.1,1976.

19) Singh Tapeshwar, Drought Disaster and Agriculture Development in India, People's Publishing House, New Delhi, 1995,
20) Tyagi Isha, Influence of print technology in building national consciousness in colonial south India, International Journal of Advanced Education and Research, Volume 2
21) Venkatanaryanan S., Tracing the genealogy of Elementary Education Policy in India till Independence, Sage publication, 2013

(क) वृत्तपत्र आणि नियतकालिके

१) केसरी, पुणे
२) टाइम्स ऑफ इंडिया, मुंबई
३) दैनिक सकाळ, पुणे
४) ज्ञानप्रकाश, पुणे

(ड) संकेतस्थळे

1) www.thenewhumanitarian.org
2) www.oxfordbibliographies.com
3) www.vishwakosh.marathi.gov.in

परिशिष्टे

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीतील निवडक ऐतिहासिक दस्ताऐवज/छायाचित्रे

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज

२. दुष्काळ परिस्थितीत श्री. शंकर सिताराम गुप्ते यांची इरिगेशन ऑफिसर म्हणून नेमणूक केल्याबाबत राजर्षी शाहू महाराजांनी काढलेला जाहिरनामा

३. दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी काढलेला जाहिरनामा

४. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ दिलेले आदेश

५. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी पन्हाळ्यावर लागवड केलेला चहाचा मळा व कोल्हापूरात व्यापारी लोकांच्या सोईसाठी उभारलेली शाहुपूरी व्यापारी पेठ

६. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूरातील शेतीच्या तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी राधानगरी येथे श्री. लक्ष्मी तलावाची उभारणी केली तसेच कळंबा तलावाची व पाटाची दुरूस्ती केली.

७. प्रशासन गतीमान होण्यासाठी महाराजांनी काढलेले जाहीरनामे

८. साथीच्या आजारासंबंधी महाराजांनी तयार केलेले नियम

९. कॉलरा (महामारी), प्लेग संबंधी शाहू महाराजांनी काढलेले जाहीरनामे

१०. सक्तिच्या शिक्षणाचा अभ्यासक्रमाबाबत केलेला ठराव.

११. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कला व क्रिडा क्षेत्रात केलेले योगदान

१२. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शाहूमिलची कोनशिला बसविली त्यावेळी त्यांनी कोल्हापूरच्या जनतेला उद्देशून केलेले भाषण

१३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी पर्यावरण रक्षण विषयक केलेले कार्य

१४. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ दिलेले आदेश

१५. राजर्षी शाहू महाराजांनी पिण्याची पाण्याची सोय करण्यासंदर्भात दिलेले आदेश

१६. श्री. महाराणी लक्ष्मीबाई तलाव राधानगरी यामध्ये जाणाऱ्या घरांबदद्दल लोकांना योग्य किंमत देऊन घरे सरकारात घेणे बाबत काढलेला आदेश

१७. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शेती सुधारणा संदर्भात प्रसिध्द केलेले जाहीनामे

१८. राजर्षी छत्रपती शाहू महराज यांनी शेती सुधारणा संदर्भात प्रसिध्द केलेले जाहीनामे

१९. शाहू कालीन अन्नछत्र

२०. रोजगार निर्मितीसाठी शाहू महाराजांनी उभारलेली कोल्हापूरातील श्री शाहू स्पिनींग आणि व्हिविंग मिल

२१. मुरगुड येथील तलावाचे उद्घाटन प्रसंगाचे शाहू महाराजांचे छायाचित्र

२२. राधानगरी धरण

२३. राजर्षी छत्रपती शाहूकालीन कारवीर संस्थानचा नकाशा

२४. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विविध राजमुद्रा



राजर्षी छत्रपती शाहू महाराज

जाहिरनामा नंबर ४८.

तारीख ३ फेब्रुवारी १९०२.

करवीर इलाख्यांत दुष्काळचा प्रतिबंध करण्यासाठीं इरिगेशनचें काम चालू करणेबद्दल मि० शंकर सिताराम गुप्ते यांस इरिगेशन ऑफिसर नेमण्यांत आल्याबद्दल वगैरे हुनुरून नंबर १०४, तारीख २३ जानेवारी सन १९०२ चे आर्डेत आहे तें खालीं लिहिलेप्रमाणेः—

दुष्काळचा प्रतिबंध करण्यास पाट बांधाऱ्याच्या कामाचा (इरिगेशनचा) फार उपयोग होतो, असें नजरेस आल्यावरून मोठमोठ्या तळ्यांचीं कामें सुरू करण्यांत आलीं आहेत. ह्या तळ्यांचा व संस्थानांतील इतर तळ्यांचा व विहिरींचा इरिगेशनचे कामीं जास्त उपयोग व्हावा, या हेतूनें त्याकामीं प० वर्क्स खात्यांत इरिगेशन डिव्हिजन निराळी करण्यांत येऊन त्यांनवर मि० शंकर सिताराम गुप्ते यांस इरिगेशन ऑफिसर नेमण्यांत आलें आहे, त्यांनी प्रथमतः खालीं लिहिलेले माहितीचा रिपोर्ट सत्वर करणेचाः—

संस्थानांत इरिगेशन होणेचे तळाव कोठें आहेत, त्यांस पाण्याचा पुरवठा कोठून होतो, वर्षभर प्रत्येक तिमाही किती पाणी येतें, किती पाण्याचा उपयोग करितां येईल, ताल बांधून पाणी आस्यास गाळ कोणत्या जातीचा येईल, त्यापासून शेतीस फायदा अगर गैर फायदा होईल वगैरे गोष्टींबद्दल माहिती खुलासेवार घेणची.

असलेल्या तळावाचे पाण्याचा इरिगेशनचे कामीं उपयोग होईल कीं नाही, होत असल्यास अदमासें किती एकर जमीन भिजेल व त्यास खर्च काय येईल. ज्या तळावाचे इरिगेशनपासून सरकारास थोडें उत्पन्न येऊन रयतेस फायदा होकर मिळणेजोगा असेल, अशा तळावांबद्दल इरिगेशन प्रॉजेक्ट होकर तयार करून पूर्ण हकीकतीचा वेगळा रिपोर्ट करावा.

संस्थानांत असलेले तळाव सरकारी व खासगी विहिरीवर किती एकर जमीन भिजते, याचा प्रत्येक तालुक्याचा गांववार निराळा तक्ता तयार करणेचा. या तक्त्यांत विहिरीचें पाणी किती मोटांस किती दिवस पुरतें व त्यावर कोणते जातीची किती एकर पिकें दरसाल होतात व विहिर सुधारण्याजोगी आहे कीं कसें, ही माहिती असावी. तलावांचीही याप्रमाणेंच माहिती देऊन निराळा तक्ता करणेचा. तक्त्याचा नमुना आपल्याकडून जावा व त्याची एक प्रत हुनूर पाठवावी.

या डिव्हिजनकडे एक ड्राफ्समन पगार २०, एक मेस्त्री पगार १५ व एक कारकून पगार १२ याप्रमाणें व सव्हेंस लागणारे सामानाकरितां तूर्त (६००) रुपयेची ग्रॉट मंजूर केली आहे. सदरहूसंबंधी मि० गुप्ते व रावसाहेब विचारे यांचा अभिप्राय मागऊन तो आपले अभिप्रायासह हुनूर पाठवावा.

सदर इरिगेशन ऑफिसर यांस प्रत्येक तालुक्यांतील रेव्हिन्यु ऑफिसर यांनकडून लागेल ती माहिती व जरूर लागल्यास योग्य ती मदत ताबडतोब देण्यांत यावी. म्हणून वगैरे आर्डेत आलें आहे.

R. V. SABNIS,
दिवाण, सरकार करवीर.



दुष्काळ परिस्थितीत श्री. शंकर सिताराम गुप्ते यांची इरिगेशन ऑफिसर म्हणून नेमणूक केल्याबाबत राजर्षी शाहू महाराजांनी काढलेला जाहीरनामा

नेमणुका वगैरे.

जनरल खातें.

तारीख १९ जानेवारी १९००.

नंबर ५१.—चालू साली पाऊस पडावा तसा न पडल्यामुळें करवीर इलाख्यांत बरीच महागाई झाली आहे. लोकांची व गुरांची चांगल्या प्रकारें व्यवस्था व्हावी, असें श्रीमन्महाराज छत्रपति साहेब सरकार करवीर यांना वाटल्यावरून, त्यांचे हुनरून इंग्रजी नंबर २७, तारीख १८ मोहे जानेवारी सन १९००चे आज्ञेत आहेत, मे० रावबहादूर रघुनाथ व्यंकाजी सबनीस, दिवाण सरकार करवीर यांना कॅमिन कमिशनर नेमण्यांत आलें आहे. रावसाहेब भास्कर विठोजी जाधव, यांस असिस्टंट कॅमिन कमिशनर नेमिलें आहे. तसेंच पेठा शिरोळ व रायबाग महाल येथील व्यवस्था पाहण्यासाठी रा० रा० नारायण शिवराम बापट, मुनसफ कोर्ट करवीर, यांस दुष्काळ कामगार नेमिलें आहे, असें आहे. त्यांणीं कॅमिन कमिशनर यांचे हुकूमावरून योग्य ती तजवीज करण्याची आहे.

सरकारी जाहिराती वगैरे.

आवश्यक आहे.

तारीख १८ जुलै १९००.

[illegible] सालीं दुष्काळ व ह्मैस प्रसंगीं वर्ग चार सारु असल्याने, हल्लींहि सोसायट्यांना सारुवर राखवा करण्याबद्दलची आहे व ही किती वर्षांत ह्मैस होण्यासारखी, यासाठीं सरकार केसेस सोडण्याकरितां एक कमिटी दुष्काळग्रस्त ठेवण्यांत आली आहे व तिनें सारु तारीख १० सिप्टेंबरपर्यंत चालू केले आहे. सदर कमिटीनें सारु दुरुस्तीचे कामाबद्दलची स्थानिक तिजोरीतूनच जाणारी लिहिलेली मजूरी दुरुस्त होत असल्यामुळें सदर कामावर १२० पेक्षां जास्त मजूर १२० तारीख १८ जुलै १९०० पासून लावूं नये. [illegible] ह्मैस दुरुस्त करण्याचे कामावर मजूर ठेवण्याचे असल्यास त्यांनीं खालील ठिकाणीं जावें.

१. रावसाहेब भास्कर विठोबा जाधव, कोल्हापूर.

२. रा० रा० आबाजी नारायण दुरुस्करकर, वेरळ.

३. रा० रा० लक्ष्मण गोपाळ गोखले, वेरळ.

४. करवीर इलाख्यांतील सर्व अधिकाऱ्यांनीं, कमिटी सारुचे जे मजूरी लावणे दुरुस्तीचे दिली असेल ते मजूरांना ते कामावर ठेवण्याविषयी सांगावें.

५. काम करीत असतां मजूर ह्मैस हे पडले असतील असे. या संबंधाने कमिटीस खात्री करितां यावी म्हणून मजूरांनी आपले नांव व पत्ता व मजूरी लिहिली पाहिजे.

६ ह्मैसेसाठीं लावले. तसा दुरुस्त मजूरांनाही सर्व अधिकारी वगैरेंनी देण्याबद्दलची आहे.

B. V. JADHAV,
दिवाण सरकार करवीर संस्थान.

---

७२ करवीर सरकारचें ग्याझेट, २४ मार्च १९०६. [भाग १

एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर स्टेट कोल्हापूर यांजकडून—

सादमजकुरी पावसाचे अवर्षणामुळें कोल्हापूर शहरांतील मढलेले रेकार्डे, पद्धाळे, संवाळें, मझार तलाव, तिटीतल्यांचें धरण, वसतीचें वगैरे तलाव सगळीं मुकळे आहेत व त्यांचीं कामें सगळीं पडलीं आहेत, सबब त्यांतील गाळ ज्या लोकांची इच्छा असेल त्यांस मोफत काढून नेण्यास परवानगी मजकुरी, अशा बाबतींत इकडून रिपोर्ट झालेवरून, मजेर श्रीसरकार हुनरून तसें करण्याबद्दल कि० आ० नंबर ८३२, तारीख १३ मोहे डिसेंबर सन १९०५ चे आज्ञेत: आहेमाबादें, मेहेरबान रावबहादूर दिवाण साहेब सरकार करवीर यांनकडून हु० मा० नंबर २८४, तारीख १६ मोहे मार्च सन १९०६ चे लिहून माले आहे.

तारीख १६ मार्च १९०६.

D. A. VICHARE L. C. E.
एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर.

किरकोळ जाहिराती, नेमणुका वगैरे.

नोटीस नंबर १०१.


मागील दुष्काळसमयीं हंगामी मेजिस्ट्रेट म्याजिस्टर कि० गणेश बाबाजी मेहेरगांवकर यांणीं कि० रा० मंडे ओव्हरसियर यांच्या ताब्यांतील कच्चे मागांतील दुरुस्तीची कामावरील मजूरांना कारकून कि० रामचंद्र सावंता दिगे याचे मदतीनें एक नंबर आकार रुपये ८०४८४ चा मजूर सोडा भरून पैसा देव करून जबराफर केल्याबद्दल अबल काम चालून अलेर मे० रावबहादूर दिवाण साहेब सरकार करवीर यांनकडील इंग्रजी नंबर १२१९, तारीख १९ डेसेंबरी १८९९ चे लिहून आल्यामाणें सदर म्याजिस्टर यांनकडून वरील रकम चकून देऊन व सदरी लिहिलेले कारकून की ज्यांनीं या कामास मदत केली ते सर्व बडतर्फ करण्यांत येत आहेत व ते यापुढें सरकार नोकरीचे अगदी अयोग्य आहेत :—

१. कि० मेहेरगांवकर.
१. कोरे चावन पुणे.
१. कृष्णाजी हरी नाचण.
१. रामचंद्र सावंता दिगे.
१. नारायण कृष्ण दातार.

D. A. VICHARE, L.C.E.,
एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, कोल्हापूर स्टेट.

तारीख २० मार्च १८९९.

दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी काढलेले जाहीरनामे



करवीर संस्थानामधील कटकोळ महालातील दुष्काळ परिस्थितीत
करावयाच्या तजविजी बाबत ठराव


राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले आदेश





राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी पन्हाळ्यावर लागवड केलेला चहाचा मळा व
कोल्हापुरात व्यापारी लोकांच्या सोईसाठी उभारलेली शाहूपूरी व्यापारी पेठ





राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापुरातील शेतीच्या तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी
राधानगरी येथे श्री लक्ष्मी तलावाची उभारणी केली तसेच कळंबा तलावाची व पाटाची दुरुस्ती केली

जाहीरनामा नंबर १८.

तारीख २६ आगस्ट १९१६ इ०

हल्ली करवीर शहरांतील प्रत्येक ऑफिसचे मुख्याकडून त्याचे स्वताचे ऑफिसास आले गेले वेळेचें आठवडापत्रक येतें, तें यापुढें रद्दितकरून त्याऐवजी वारिष्टपतीचे सर्व नोकराबद्दल तें ऑफिसांत प्रत्यही नेमले वेळेस म्हणजे सकाळी ११ वाजतां आस्याबद्दलचें पत्रक मागवावें, पत्रकांत सदर नोकरानी ऑफिसास आस्याबरोबर आपण आस्याची नक्की वेळ नमूद करून आपण आपली सही पत्रकावर शेवटी ऑफिसचे मुख्याची सही होऊन तें स्टेशन बंगस्यावर हुजूर क्लार्कचे ऑफिसांत ११॥ वाजतां अगर तत्पूर्वी येऊन दाखल होईल असें पाठवावें. ऑफिसचे मुख्यानी सदर पत्रकांत आपण स्वतः ऑफिसास आलेली वेळ लिहून मग सही करण्याची आहे. तक्केचेस्वारी फक्त हुजूर स्वारीचे नांवचा रवाना शेरा लिहिण्याचा आहे, पत्रक रवाना केल्हां केलें तीं वेळ मिनिटेंसुद्धां लिहून पाठवावी. ऑफिसचे मुख्य रजावैगेरे कारणानें गैरहजर असतील तेव्हां त्या ऑफिसांत जे मुख्य असतील त्यानी गैरहजरीचें कारण लिहून मुख्याकरितां सही करून पत्रक पाठवावें, कारकून वैगेरे गैरहजर असतील त्याचेबद्दल शेरा गैरहजरीचे कारणाचा लिहून पाठवावा. येणेप्रमाणें तजवीज तारीख १६ माहे सप्टेंबर सन १९१६ इ० पासून विनचूक रहावी. असे हुकूम आपआपले ताब्यांतील कोल्हापूर शहरांतील ऑफिसास देण्याबद्दल तोंदी खात्याचे मुख्याकडे कळविण्यात यावें. हुजूर ऑफिसचे हजरीपत्रक वर लिहिल्याप्रमाणें यावें. याप्रमाणें झाले आज्ञेची प्रसिद्धि ग्याझेटमध्ये होण्याबद्दल व त्याप्रमाणें तारीख १६ माहे सप्टेंबर सन १९१६ इ० पासून अमल सर्व ऑफिसाकडून होण्याबद्दल हुजूरून ठराव नंबर ३०२, कि० जा० नंबर ६६, तारीख २५ माहे आगस्ट सन १९१६ इसवीचें आज्ञेत आलें आहे.

R. R. SHIRGAVKAR,
इं० दिवाण सरकार करवीर.

जाहीरनामा नंबर १९.

जनरल डिपार्टमेंट.

तारीख ३१ आगस्ट १९१६ इ०

अॅन्युअल रिपोर्टासंबंधी माहिती वेळेवर यावी म्हणून ठरलेल्या तारखेस ज्या अमलदाराकडून माहिती पाठविण्यांत येणार नाही, त्यांनी त्या महिन्याचा आपला पगार घेण्याचा नाही. अशाबद्दल हुजूर ठराव नंबर ११२० चा होऊन त्याची प्रसिद्धि ग्याझेटांत केली. त्याप्रमाणें कांही अमलदाराचें पगार बंद ठेवण्यांत आले, परंतु त्याचा व्हावा तसा उपयोग झाल्याचें दिसून न आल्यावरून कौन्सिलर्स खेरीजकरून सर्व खात्यांतील अमलदारांनी आपल्या वरिष्ठाकडे अगर दुसऱ्या अमलदाराकडे माहिती पाठविण्याच्या ज्या तारखा ठरल्या आहेत, त्या तारखेस माहिती न पाठविल्यास प्रत्येक उशीर झाल्या दिवसाबद्दल एक रुपयाप्रमाणें दंड करण्यांत यावा. अशाबद्दल हुजूर ठराव नंबर ३०५ चा होऊन, कि० जा० नंबर ५३१, तारीख २१ माहे आगस्ट सन १९१६ इ० नें आज्ञेत आलें आहे. त्याप्रमाणें तजवीज सर्व खात्यांतील अमलदाराकडून होण्याची आहे. दंड वसूलाची तजवीज प्रत्येक खात्याच्या मुख्य अमलदाराकडून होण्याची आहे.

R. R. SHIRGAVKAR,
इं० दिवाण सरकार करवीर.



प्रशासन गतीमान होण्यासाठी महाराजांनी काढलेले जाहीरनामे

तारीख २२ आक्टोबर १८९७.

नंबर २२.—भयंकर सांथीचे अजारासंबंधी करवीर सरकारांतून झालेल्या रुळीचे आधारें खालीं लिहिल्याप्रमाणें नियम करण्यांत आले आहेत :—

१. कोल्हापूरलगत असलेल्या सातारा जिल्ह्यांतील पुष्कळ ठिकाणीं ग्रंथिक सन्निपात तापाची सांथ जारीनें चालू आहे. त्या सांथीचा प्रवेश करवीर शहरात होऊं नये ह्मणून सावधगिरीचे उपाय योजिणें जरूर आहे, यास्तव फर्माविण्यांत येतें कीं, करवीर शहरांतील तमाम लोकांनीं आपआपल्या घराच्या सर्व भिंतीस आंतून व बाहेरून व घरांतील जमिनीवर हे नियम सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत चुन्याची सफेती दिली पाहिजे.

२. सदरहूप्रमाणें सफेती देण्यास जे लोक चुकतील त्यांचे घरांस म्युनिसिपाल कमिटीकडून सफेती दिली जाईल व त्यासंबंधी झालेला खर्च घरवाल्याकडून वसूल केला जाईल.


३. या नियमाप्रमाणें मुदतींत सफेती दिली आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां आणि ज्या घरांस सफेती घरवाल्यांनीं दिली नसेल या घरांस सफेती देण्याकरितां कमिटीकडून त्या कामाकरितां नेमलेले अमलदार व मजूर लोकांस घरांत शिरण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. त्यांस कोणी प्रतिबंध करील तर कायद्याप्रमाणें त्याजवर खटला करण्यांत येईल.

४. कमिटीकडून सदरहू कामाकरितां घरांत शिरलेले लोकांनीं घरांतील स्त्रियांचे मर्यादेस व ज्याचे त्याचे धर्मास बाध न येईल असें वर्तन ठेविलें पाहिजे ह्मणून त्यांस ताकीद देण्यांत येत आहे. असें वर्तन त्याजकडून होणार नाहीं तो हुकूम अमान्य केल्याबद्दल शिक्षेस पात्र होईल.

५. घरवाले लोकांनीं आपल्या घरांत किंवा घराचे पडीं वगैरे मोकळ्या जागेंत कोणत्याही प्रकारचा केरकचरा सांठून ठेवूं नये. किंवा खताच्या गारी ठेवूं नये. सांठलेला केरकचरा व [illegible] ण्यास म्युनिसिपाल कमिटीचे कामगार किंवा हेल्थ आफिसरकडून सांगण्यांत येईल त्या [illegible] तो काढून शहराबाहेर नेला पाहिजे. तसें त्याजकडून न झाल्यास तें काम कमिटीकडून करावयांत येईल व त्यास खर्च होईल तो घरवाल्याकडून वसूल करण्यांत येईल. कमिटीचे लोक घरांत शिरण्याबद्दल वरचे नियम या कामासही लागू आहेत. कोणी केरकचरा वगैरे सांठून ठेविला आहे कीं काय हें पाहण्याकरितां घरांत शिरण्याचा त्यांस अधिकार आहे.

हुजूर आज्ञेवरून,
M. KUVARJI,
दिवाण सरकार करवीर.

साथीच्या आजारासंबंधी महाराजांनी तयार केलेले नियम



THE KOLHAPUR STATE GAZETTE.

करवीर सरकारचें ग्याझिट.

EXTRAORDINARY.

Published by Authority.

शुक्रवार, तारीख २६ मार्च सन १९०६.

भाग १.

सरकारी जाहिराती, नेमणुका वगैरे.

नोटीस.

दरबार सर्जन इलाखा करवीर यांजकडून,

कोल्हापुर इस्टेटीतील सर्व लोकांस कळवण्याकरितां सदर जाहीर करण्यांत येते की:—

१. हर्ली खास कसबा (महामारी) चा मामला सरकार चेकलिस्ट करण्यांत, त्या ठिकाणचे कामाचार्य सरकारीत्न मोफत मिळण्याकरितां व स्वतः ते ठिक झालेला सही लोक

१२ करवीर सरकारचें ग्याझिट, १२ जानेवारी १९०६. [भाग १

जाहीरनामा.

कसबा खासें.

तारीख १२ जानेवारी १९०६.

चेचर (-आयर लोकांत कलाकलाकरितां जाहिर करण्यांत येते की, कसबे खासेंत खास करी ठिकाणी लागला चार कलेवर दुर झाला व इलाकेत दरहप्ता चालतोहत ठिक सुरक्षित राहिला झाला, यास सर्व लोकां ठिकाणिकेला कारणाने खासक मालां सुरक्षात कारणाचे लवकरचे लाईनरमध्ये जाहिर करण्यांत येत आहे:—

१. तारीख १२ माहे जानेवारी सन १९०६ इसवीसनपुर कसबे खासे सरकारचें मजा हे स्थानचा रहवासि कसेल त्यांने आपले घर. सरकारचे डिस्ट्रॉक्सइन्फर्मरीमध्ये निरनिराळे मजुरावर व सुलिमिन्स डेप्थ मॉलिक्युलरचे ऐसोसिएशनमध्ये १५ दिवसांचे आंत डिस्ट्रिक्टवर कारणाची तपासीर करावी. या मुकर्रर स्थानपुर सरकारी घरें डिस्ट्रॉक्टवर टोपास करीत, त्यांचें घरें सुलिमिनेरिटेशनवर डिस्ट्रॉक्टवर कारणाचे वेळस, तसे सरकारमधुन मंजीत मालुमाने निरनिराळ्यांने मजुर घरवर वेळवा लावेल.

२. सुलिमिनेरिटेशनवर कारणी घरें डिस्ट्रॉक्टवर कारणांत यावें लावी त्यांनी हप्ता कोल, त्यांनी तारीख १० माहे जानेवारी सन १९०६ पे मोर ८० ८० डेप्थ मॉलिक्युलर सुलिमिनेरिटेशन कंपनी लिमी कलेक्टर, बांगलाचे केबी कलकत्ते व हे सरकीत लिखी एथ कलाला गया आहे.

३. घरें डिस्ट्रॉक्टवर कारणाचे तारणची वर्गे त्यांनी त्यांनी घाटेने त्या ठिकाणी कोटी कारणें. त्याचा कारणासंबंधे कोटी कारणाची सर्वतोल, त्यांत सही लिमिटुन देण्याची सोय डेप्थ मॉलिक्युलर लिमि करीत कलेक्टर केबी आहेत.

४. घरें घरीं डिस्ट्रॉक्टवर कारणाचे लिखर लिमुर दोहीं डेप्थ कारण सही. त्यांचा सही साहेबी घाटेने आहे. त्यांनी मेहरबान कोर्ने लिहिला, सारी सरकार कर्नल इलाखा करवीर, यांचे केबीसे, डेप्थने कारणाटोपर्यंत संबंध लिखी. हे मुलगा पाचरी, कोल्हापुरा साहेबीसाठी कोटी लिखर टोपाने कारणी देण्यांत आले आहेत:—

अ गोर्‍ (बाबि, गोरी, लिली, डाली, लिबरपाल, दोघडे व मलीन गोरे) यांनाचिन घोडे व पोहरण कारुन आले पाहाड व खल कांचे मेहेक सही डेप्थांत कारणी व डाएन कांचे घरें घरें डेप्थ मार्गिनल पाल, पाका, पार्सलला, बाबला कोरिया या कार्यांत मजिस्ट्रेला कंपन ती देतुर आहा. पेंचर लिली व कालेली डाक्टरपुरांने लिलमाचे पुढल पुलाचें कला कांचे कार्यांने डारपाला, जात त्यांत डेप्थ लिलवूं लेख, कार्ने सन सन लिहान १० दिवसांचेन घोडके केलेले. डाक्टरपुरांने लिलमाचे कारण डेप्थर कारणांने कार्यांत एक डाक्टरपुराचा सात कर्ने आहे.

ब चालन-चालन कांचे उपाय कालचे डेप्थने डाकेने, कांचेचां कार्ती डिस्ट्रॉक्टवर कारणाचे लाख कचरी दिला नाहीं.

क कचरी- लाल कांचे कारण कालेख कारणांत कारुन लिहान ३० डिसेंबरचेन लाईन डिलमुर कालचे व लेख कांचेनचा डेप्थने पुढल उपाय कालवांतच. दोनचार कांचे डेप्थने डोलपुरांने व टेबलने कोरे कचरीत व ठिक लिख उपाय कालांत.

भाग १] करवीर सरकारचें ग्याझिट, १२ जानेवारी १९०६. १३

ड डोंबारी कालन (डाकरे, कांडी कोरे चाटुकलपाने) लिखा कलेंत कारुन कालेख. ही कांडी कारुन कालचाचारुन लिखरचाना वैलन कांचे, कांडी कांडी कारुन कांचेला चालांचारुन इलारुन कालवी कचरां पुरें कांचे.

इ डांडारी व दुलारी कालन (पुलचे, टेबलें, कार्ने कोरे डांडचा व दुलारी कार्ती डाकरे कोरे) हे लिखर डिस्ट्रॉक्टवर कार्ने डाकरुन त्यांनां कारुन कालेखें चाली नोंदचें व वेलर दाक्षाचुरांने चालांने एक लक्ष्य कडचें लिखरुन त्यांने पुढल कालचे.

च टीप:- एलाखा लिवाली टोपेन, पुढी कोरे मेहेके डाक्टरकाल त्यांत हाल व कालां ते वर्ग डाकरुतीन एलाखा लिवाचांनें अन्यथा पुर मेहेल कालुन कालांत व ती लिखा लिवाचांत डाकुन कालुन कालचा व हे लिखन डिस्ट्रॉक्टवर कारें.

५. त्यांत कारचें घर डिस्ट्रॉक्टवर कारणाचे कर्नेल, त्यांनें ते लिखर कालाचर कोरेल सुलिमिनेरिटेशन डेप्थ कोरेल कोलकाचुरांनचें चाली. डाक्टरे डिस्ट्रॉक्टवरुनचे कालवा देखील कारणाचरुन डाक्टरीन कालांत केलेल.

६. कांडी ठाटोडांनें त्यांत डाक्टरुन कोरे लिखरांनीं दुसरे कांचे कारणाचे कालचे चाली, कांडे डाक्टरांनेल दुलारीनेल, सुलिमिनेरिटेशन कंपनी लिमि करीत, सांत लिहुर मेहेल त्यांत हीं डाकरे दुसरा लिखी चालीन.


७. सदिल लिखरांनेलेचे त्यांत चालन चालीनें मेलाचचें कांचेल, त्यांनीं ती सुलिमिनेरिटेशन डेप्थ लिखरांनाचा ती देण्यांत मेहेल.

मेहेलचें कांडे.


R. V. HARVIE,
सिविल व ज्वेल सर्जिअन्ट.



कॉलरा (महामारी), प्लेग संबंधी शाहू महाराजांनी काढलेले जाहीरनामे




सक्तिच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम या ठरावाद्वारे ठरविण्यात आला




Journal of Orders from the Huzur Office

for the Fasli year 1327 Calender year 1917

विद्यार्थ्यांस मर्दानी खेळ शिकविण्याच्या ठरावास मंजूरी



क्रिकेट व फुटबॉल खेळण्यासाठी जागा देण्याच्या ठरावास मंजूरी



Journal of orders from the Huzur Office


for the Calendar year 190 . Fasli 131

सिटीस्कूलच्या मुलांस खेळण्यासाठी जागा देण्याच्या ठरावास मंजूरी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कला व क्रीडा क्षेत्रात केलेले योगदान

छत्रपति श्रीशाहू महाराज यांनी केलेले भाषण

२७ ऑक्टोबर सन १९०६ साली विजयादशमी दिवशी कं. श्रीमंत छत्रपति शाहू महाराज यांनी शाहूमिलची कोनशिला बसविली त्यावेळी त्यांनी कोल्हापूरच्या जनतेला उद्देशून केलेले भाषण--



(छ. शाहू महाराजांचे हस्ते शाहूमिलची कोनशिला बसविणेत आली त्यावेळी घेणेत आलेले छायाचित्र.)

कर्नल केरीस, सरदार बाळासाहेब आणि सभ्य स्त्री पुरुष हो !

सरदार बाळासाहेब मावरकाट यांनी प्रास्ताविकात सांगितलेल्या मिलच्या प्रकल्पाचा इतिहास मी अगदी लक्षपूर्वक ऐकला आहे.

आम्ही देऊ केलेल्या कांही सवलती व मदतीचा उल्लेख त्यांनी केला. पण मला वाटते की, त्यांनी त्याचा अति उल्लेख केला. कारण त्या सवलती देऊन आम्ही कांही विशेष केले असे नाही. उलट माझ्या संस्थानात कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या तयार वस्तुमध्ये करणारा पहिला प्रकल्प म्हणून शाहूमिलला सर्व प्रकारची मदत करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.


इंग्लड आणि यूरोप खंडातून प्रवास करताना तेथील प्रगतीची गोष्ट पेठेपासिवाय रहावत नाही. इंग्लड आणि इतरत्र औद्योगिक क्षेत्रात झालेली नैत्रदिपक प्रगती पहाण्याची संधी मला लाभली आणि मला वारंवार खटकत की, माझ्या छोट्याशा संस्थानातही तसे कांहीतरी केले पाहिजे. माझ्या छोट्याशा संस्थानातील सर्व साधन सामुग्रीचा माझ्या प्रजेच्या भल्याकरिता जास्तीत जास्त कसा उपयोग करावा हा एक प्रश्न होता. या बाबत माझ्या मनांत सतत विचार घोळत होते आणि एके दिवशी माझ्या सरदार व मानिक प्रजाजनांनी स्वयंस्फूर्तिने मेमकी हीच गोष्ट मनावर घेतलेचे पाहून मला आनंद झाला माझ्या प्रजाजनामध्ये स्वावलंबनाची व स्वकर्तृत्वाची जिद्द ज्वलंत आहे याबद्दल मला आनंद वाटतो आणि ती जिद्द प्रोत्साहित करणेची खरी गरज आहे. माझे युवराज बंधू व इतर संस्थानाधिपती यांनी आपापल्या प्रदेशांत कांही गिरण्या सुरू केल्या आहेत. परंतु त्यापैकी कांही सरकारी मालकीच्या आहेत. अगोदरच राज्यकारभाराच्या असह्य तापाखाली जेरीस आलेल्या राज्यकर्त्यांवर तिच्या नेहमीच्या कार्यव्यतीरिक्त इतर कामे लादून तिच्या शक्ति इतरत्र गुंतवण्यात माझा विरोध आहे. जनतेच्या परस्पर सहकार्याने उभा रहणाऱ्या उद्योगधंद्याचा विकास करणे हे माझे ध्येय होते व तेच राहील आणि माझ्याकडून शक्यती किकोळ मदत व सवलती दिल्याबद्दल आपल्या या मिलच्या प्रकल्पास चांगला हातभार लागला हे ऐकून मला समाधान वाटते.

मी आपणा सर्वांना आश्वासन देतो की, माझ्या संस्थानामधील ही पहिली गिरणी म्हणून या प्रकल्पास माझा संपूर्ण पाठिंबा व सहानभूती राहील आणि या गिरणी-संबंधीच्या कोणत्याही विस्तार योजनेचा माझ्याकडून सहानुभूतिपूर्वक विचार होईल. ही गिरणी बडधा गिरणी मालकांच्या किंवा लक्षाधिशांच्या हाती न देण्याच्या आपल्या निर्धाराशी मी संपूर्ण सहमत आहे आणि मला खात्री आहे की, या प्रकल्पाबरोबर येणारी मोठी जबाबदारी आपण ओळखली आहे. मी अंतःकरणपूर्वक अशी आशा करतो की, या गिरणीच्या भागधारकांचे हितसंबंध सतत सुरक्षित ठेवणे हे तुमचे चिरंतन कर्तव्य राहील व त्यात तुम्ही कसूर करणार नाही आणि व्यापारी कौशल्याची सक्तेदारी फक्त एकट्या मुंबईलाच मिळालेली नाही हे आपण या उद्योगात यश संपादन करून जगजनतेला दाखवून द्याल. अर्थात तुरवातीला तुम्हांला अडचणी येतील परंतु त्यावर मात करणे याच खरा पुरुषार्थ आहे. मी आपल्याला असे ठाम आश्वासन देतो की, माझे तुम्हांला सर्व प्रकारचे मार्गदर्शन आणि सक्रीय पाठिंबा राहील व मी तुमचा सहानभूतिदार मित्र व सल्लागार राहीन. या सभारंभाकरिता आजचा हा अपंत मंगल दिन आपण निवडला आहे.

आजचा हा पवित्र दसऱ्याचा दिवस आहे ! याच दिवशी पूर्वी ज्यानी आपणाला दिगंत कीर्ति व गौरव मिळवून दिला त्यांना आपण अभिवादन करीत आलो आहोत व लढाईतील घोड्यांची आणि शस्त्रांची पूजा करीत आलो आहोत. याच दिवशी कारीगार आपल्या हत्यारांची आणि शेतकरी आपल्या नांगराची पूजा करतो. दिग्विजय संपादन करण्याचा व सीमोल्लंघनाचा हा दिवस !

ही प्रथा अजूनही पाळली जाते. आणि अद्यात भौतिक समृद्धीचे सीमोल्लंघन आपण केले नसले तरी औद्योगिक विकासाद्वारे महनीय यश संपादण्याची प्रतिज्ञा करूया. " पुढलेयाही अधिक किर्तीमान विजय संपादन करावा " हे आपण स्मरणात ठेवूया. अज्ञान, गरीबी व औदासिन्य यावर आपणाला विजय मिळवावयाचा आहे. या दुष्ट शत्रूच्या विरुद्ध आपण निर्भयपणें लढू या ! तुमच्या या प्रयत्नामध्ये तुम्हांस भरघोस यश लाभो अशी माझी अंतःकरणपूर्वक प्रार्थना.


राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शाहूमिलची कोनशिला बसविली त्यावेळी त्यांनी कोल्हापूरच्या जनतेला उद्देशून केलेले भाषण




Journal of Orders from the Huzur Office

for the Fasli year 132 Calender year 19

जिऊर येथील अस्वल बागेत चहाची लागवड करण्याच्या खर्चास मंजूरी




पार्क तयार करण्याबाबतचा ठराव




राधानगरी येथे चहाची लागवड सुरु करण्याच्या खर्चास मंजूरी


राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी पर्यावरण रक्षण विषयक केलेले कार्य



खोदशी पेटा आळते येथील अस्पृश्य लोकांना दुष्काळ कारणामुळे तगाई देणेबाबत ठराव




कोल्हापुरातील महार तलावात जाणाऱ्या गटारीच्या पाण्याचा प्रतिबंध करण्याचा ठराव



शाहू महाराजांनी उभारलेल्या राधानगरी येथील श्री लक्ष्मी तलावाबाबतचा ठराव


राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले आदेश




Journal of orders from the Huzur Office

for the Fasli year 131 Calendar year 190

करवीर संस्थानातील भुदरगड पेठ्यातील दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी धरण प्रोजेक्ट व सर्वे करण्याकरीता खर्चास मंजूरी



सरुड येथील तलावामधील पाणी विनापरवानगी घेतल्यास दंड आकारणी करणे बाबत आदेश




Journal of Orders from the Huzur Office

for the Fasli year 132 Calender year 191

मौजे भोपळेवाडी येथील लोकांचे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यास आवश्यक रकमेची मंजूरी बाबत

राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले आदेश




जनत दुसूर ओलिसांतून झालेल्या हुकुमावरल

Serial No. क्रम संख्या.	Date of receipt. टपाल मिळाले.	Name Department. वगैरे खात्याचे.	Subject matter. आणे दाखविण्यात.
६१८	२-२-५१	मोबदला.	मे. ता. ब. सरकुले— कि. आ. ३१५/५१५१ श्री. म. ल. लक्ष्मीतलावाचे कामी मौजे येजीवडे गांव चीपरे २८ जाताता- त्या लोकांस किंमतीबद्दल [illegible] देऊन घरे सरकारांत घेणेबाबी-
६१९	८-२-५१	कंपनसोल्न	मे. ता. ब. सरकुले— कि. आ. ३११/५१५१ श्री. म. ल. तलावाचे कामी असणे गांवची घरे जाणारत्या लोकांस कंपनसोलन (२८७८/५१६) देणे तसेच ऊनघरे सरकारांत घेणेबाबी-
६२०	"	"	मे. ता. ब. सरकुले— कि. आ. ३११/५१५१ श्री. म. ल. तलावाचे कामी शेलपरे- धीलघरे ७१ जाव असून सदरकामांत येऊन घराचेमालकास देणे- साठी (३२१/१५६) येतांगतनमंजूर

सन १९२ फसली व इसवी सन १९१

Date of final order Disposal मंजूर.	Final order. निकाल दर्ज.
२८-२-५१	मोबदलामंजूर केलाआहे. Kgaikwad
२८-२-५१	कंपनसोलन देणेबाबत मंजूर केलेआहे. Kgaikwad
२५/५/५१	मोबदलामंजूर करणेबाबत आलाआहे. Kgaikwad

श्री महाराणी लक्ष्मीबाई तलाव राधानगरी या मध्ये जाणाऱ्या
घरांबद्दल लोकांना योग्य किंमत देऊन घरे सरकारात घेणे बाबत



घाटमाथ्यापासून ५ मैलाच्या आतील प्रदेशातील वस्ती उठवून ती सर्व जमीन सरकार जमा करण्याबाबतचा ठराव

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शेती सुधारणा संदर्भात प्रसिद्ध केलेले जाहीरनामे

प्रदर्शन वगैरे करून लोकशिक्षणास मदत व्हावी व त्याबरोबरच लोकांस करमणुकीचें साधन व्हावें, या हेतूनें खालीं लिहिल्याप्रमाणें तजवीज करण्याचें हुजुरून कि० जा० नंबर ६९, तारीख १४ माहे आगस्ट सन १९१३ चे आज्ञेंत आलें आहे.

(१.) शेतकी व त्यासंबंधानें हरएक जिन्नस, नांगर वगैरे आउतें, शेतकीचीं जनावरें, आणि घोडे, झशी, गाई, कुत्रीं, व लढाऊ बकरी यांचें प्रदर्शन.

(२.) राजाराम कॉलेजयांत पूर्वी करीत असत त्याप्रमाणें प्रदर्शन.

(३.) पहिल्या प्रदर्शनासंबंधी व्यवस्था व कमेटीचे प्रेसिडेंट मे० पिराव बापुसाहेब घाटगे सर्जेसाव बजारत माजाव चीफ आफ कागल सिनीयर, सी. एस्. आय्. सी. आय्. ई, यांस नेमून त्यांचे दिमतीस मे० नानासाहेब मुळीक यांस एक सेक्रेटरी नेमिलें आहे. दुसरे प्रदर्शनाची व्यवस्था मे० डाक्टर साहेब प्रिन्सिपॉल राजाराम कॉलेज, यांजकडून होण्याची आहे.

(४.) दोन्ही प्रदर्शनाची वेळ चैत्र शुद्ध १४ पासून एकंदर ६ दिवस ठरविण्यांत आली आहे.

(५.) दोन्ही प्रदर्शनास टिकिटें लावण्याचीं असून टिकिटांचें उत्पन्न त्या त्या प्रदर्शनाचें कामाकडेच खर्च करण्याचें आहे, शिवाय सरकारांतूनही ४,५०० रुपये मदती दाखल देण्याचें ठरविलें आहे.

(६.) शेतकी प्रदर्शन वगैरेकरितां जागा रावणेश्वरापासून पेटाळ्यापर्यंतची सर्व सरकारी जागा आणि शाळीय प्रदर्शनास हायस्कूलची इमारत व मागील मोकळी जागा.

(७.) प्रदर्शनाची सर्व साधारण व्यवस्था व बक्षिसें या संबंधानें तपशिलवार जाहीरनामा मागाहून प्रसिद्ध होईल.

(८.) सदरहू प्रदर्शनाचे मुदतीत साटमारी, कुस्त्या वगैरे ही होतील.

हुजूरआज्ञेवरून,

G. R. SHIRGAVKAR, R. R. SHIRGAVKAR,
असिस्टंट दिवाण. इं० दिवाण सरकार करवीर.

शेतकी प्रदर्शन संदर्भातील जाहीरनामा

सरकारी जाहिराती वगैरे.

जाहिरात.

जनरल खातें.

तारीख २९ मे १८९६.

उसाचे घाण्यामध्यें ऊंस लावणाराचा हात सांपडून बोटें वगैरे चिरडून मोठी दुखापत व हात जाया झाल्याचीं उदाहरणें वरचेवर पुष्कळ घडून येत असल्याचें नजरेस आल्यावरून मेहरबान दरबार सर्जन यांजकडून त्या बाबतींत रिपोर्ट करण्यांत आला, तो हुजूर अवलोकनांत घेऊन हुजूर आज्ञेवरून सर्व लोकांस कळण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येतें कीं.—

घाण्यामध्यें हात सांपडणार नाहीं अगर सांपडलाच तर त्यास इजा होणार नाहीं अशा तऱ्हेची त्यांत कांहीं यांत्रिक युक्ती तारीख १ जानेवारी १८९६ च्या आंत कोणी शोधून काढल्यास ज्याची युक्ती सोपी थोडक्या खर्चांत होणारी व पसंत अशी ठरेल त्यास पांचलें बक्षीस देण्यांत येईल. अशा तऱ्हेची युक्ती शोधून काढणारांनीं तिचा नमुना तयार करून तो खालीं सही करणार यांजकडे वर नमूद केल्या मुदतीच्या आंत हजर करावा


M. KUVARJI.
दिवाण सरकार करवीर.

शेती संदर्भातील यांत्रीकी युक्ती शोधून काढणाऱ्यास बक्षिस देण्याबाबतचा जाहीरनामा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शेती सुधारणा संदर्भात प्रसिद्ध केलेले जाहीरनामे




शाहू कालीन अन्नछत्र




रोजगार निर्मितीसाठी शाहू महाराजांनी उभारलेली कोल्हापुरातील
श्री शाहू स्पिनींग आणि व्हिविंग मिल



मुरगुड येथील तलावाचे उद्घाटन प्रसंगाचे शाहू महाराजांचे छायाचित्र



राधानगरी धरण



राजर्षी छत्रपती शाहूकालीन करवीर संस्थानचा नकाशा



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विविध राजमुद्रा